श्री शिवछत्रपतींचे

सप्तप्रकरणात्मक चरित्र

[मल्हार रामराव चिटणीसविरचित]

र. वि. हेरवाडकर

म. म. द. वा. पोतदार यांस
सप्रेम भेट.
स. वृ. पाध्ये
१३.७-६७

मल्हार रामराव चिटणीस–विरचित

शककर्तें श्री-शिव छत्रपती महाराज

ह्यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र

संपादक

रघुनाथ विनायक हेरवाडकर

एम्. ए., पीएच्. डी.
सेंट झेवियर्स कालेज, मुंबई

मूल्य रु. १०·००

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली : जून १९६७

प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
‘तपश्चर्या’
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी : मुंबई ४

'संभवामि युगे युगे'
या गीतावचनानुसार
जिचे ऐतिहासिक युगांत
तेजस्वी दर्शन घडले
त्या महाराष्ट्राच्या
अस्मितेस—

शिवराजाचें आठवावें रूप। शिवराजाचा आठवावा प्रताप।
शिवराजाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं॥

—श्रीसमर्थ

The test of greatness is the page of history.

WILLIAM HAZLITT

पुरस्कार

बखरींचा अभ्यास हा माझे विद्यार्थी डॉ. र. वि. हेरवाडकर ह्यांचा खास आवडीचा विषय आहे. या विषयावर प्रबंध लिहून त्यांनी डॉक्टोरेट पदवी संपादन केली त्याबद्दल मला अभिमान वाटतो. बखर ही इतिहासवजा आहे असे सध्या मानिले जाते. तथापि तो त्या शब्दाचा मूळ अर्थ नाही. बखर (बखेर) हा शब्द अरबीतून आला असून त्याचा अर्थ खबर –वार्ता कळविणारे पत्र असा असावा. हा शब्द मुसलमानांच्या मार्फत मराठीत आला.

मराठी वाङ्मयात बखर वाङ्मय हा स्वतंत्र व असाधारण प्रकार आहे. बखरींचे संपादन करणे हे सोपे काम नाही. आधी बखरी मोडीत. ह्या लिपीत ज–न, ला–क अशासारख्या अक्षरांचा वाचताना घोटाळा होण्याचा संभव बराच असतो. ज, क, न, ला हे निश्चित करण्यास बखरींच्या विषयांशी संबद्ध पण विषयाबाहेरील इतिहासाची माहिती असावी लागते. अर्थ लावण्याचे संदर्भ हे मोठे साधन आहे. बखरलेखक ऐकीव माहितीवरून लिहीत आहे की, स्वतःच्या माहितीने लिहीत आहे ह्याचाही प्रथम विचार करावा लागतो. लेखक समकालीन असूनही त्याला प्रत्येक गोष्ट प्रत्यक्ष ज्ञात असते असे थोडेच आहे ?

भाषेचाही प्रश्न कमी बिकट आहे असे नाही. शिवकालीन भाषा आज समजत नाहीशी झाली आहे. तिच्यात अरबी, फारसी, उर्दू इत्यादि शब्दांचा संग्रह असलेली मुसलमानी भाषा राजसत्तेच्या जोरावर मराठीत घुसली आणि एक वेगळीच जोडभाषा निर्माण झाली. ह्यास्तव बखर-संपादकाला भाषेचाही अभ्यास करावा लागतो. तशा प्रकारचा अभ्यास प्रस्तुत आवृत्तीत दिसतो. यामुळे या आवृत्तीची उपयुक्तता निःसंशय वाढली आहे. तात्पर्य, लिहिलेले तुम्ही छापून प्रसिद्ध करिता ह्यात विशेष काय आहे असे समजणे हास्यास्पद होईल.

ह्या सर्वांहून अत्यंत दुर्गम्य प्रश्न बखर-संपादकाला त्रस्त करीत असतो. आम्हांला ऐतिहासिक दृष्टी कधीच नव्हती व आजही नाही असे माझे निश्चित मत आहे. येथे नमूद करण्यास मला आनंद वाटतो की, इतिहासभूषण म्हणून मान्यता पावलेल्या

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार ह्यांनी हाच विचार दि. २ ऑक्टोबर इ. स. १९६६ रोजी दिल्लीस भरलेल्या संस्कृत साहित्य संमेलनाच्या ऐतिहासिक शाखेच्या अध्यक्षपदान्वये केलेल्या भाषणात स्पष्ट शब्दांत प्रकट केला आहे. ते म्हणाले–'अतिप्राचीनकाले या इतिहासदृष्टिः जागृता दृश्यते सा सर्वार्थेन लुप्ता। सचक्षुराणि अचक्षुः इति आ (अ?) कारकी अवस्था प्राप्ता.'

ह्यानंतर प्रश्न असा उद्भवतो की, ऐतिहासिक दृष्टि ही स्वतंत्र आहे किंवा परावलंबी आहे ? आम्हांला धर्माचा इतिहास लिहिता आला नसता का ? परंतु समन्वयाच्या कल्पनेने ऐतिहासिक दृष्टी जन्मास येणे शक्य झाले नाही. इतिहासाचे विषय होऊ शकतील अशा गोष्टी घडल्या नाहीत तर ऐतिहासिक दृष्टी असून तरी काय उपयोग ? इतिहास राजे घडवीत नाहीत; बुद्धी घडविते. ह्यास्तव आमची ऐतिहासिक दृष्टी लुप्त झाली ह्याचा अर्थ आमची विचारशक्ती नष्ट झाली असे म्हणणे भाग आहे. बौद्धिक कार्य हा इतिहासाचा विषय; मग हे कार्य कोणत्याही क्षेत्रात होवो. नेपोलियनने युद्धशास्त्र निर्माण केले. आमच्याकडे असे कोणी केले का ? आमचे युद्धशास्त्र म्हणजे शत्रूचे पन्नास हजार सैन्य असले तर आपले एक लाख करा व जय मिळवा. एका माणसाला दोन माणसांनी जमिनीवर लोळवावा हेच आमच्या युद्धाचें स्वरूप. ह्यात शारीरिक बलाला जागा; बुद्धीला नाही. अशा लढाया इतिहासाचा विषय होत नाहीत.

असे जर आहे म्हणजे आम्हांला इतिहासदृष्टी नव्हती, असे गृहित धरले तर बखरकारांनी कोणत्या हेतूने इतिहासवजा असलेल्या बखरी लिहिल्या, ह्या प्रश्नाचे उत्तर समाधानकारक रीतीने देता आले तरच बखरींचे मूल्यमापन आपणांस करिता येईल. ते आजपर्यंत कोणी केले असल्याचे मला माहीत नाही. हा प्रयत्न करणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच बिकट आहे.

असो. बखरींसारख्या उपेक्षित वाङ्मयप्रकाराचा विशिष्ट पद्धतीचा अभ्यास डॉ. हेरवाडकर हे करीत आहेत ही गोष्ट स्वागतार्ह होय. अशाच प्रकारचा अभ्यास त्यांच्या हातून उत्तरोत्तर होऊन मराठी साहित्यात भर पडो ही सदिच्छा व्यक्त करितो.

मकरसंक्रांती,
दि. १४ जानेवारी १९६७,
बदलापूर (जिल्हा ठाणे).

नारायण गोविंद चापेकर

उपोद्घात

शककर्ते श्री-शिव छत्रपती महाराज यांचे अवतारकार्य हे महाराष्ट्राच्याच केवळ नव्हे, तर अखिल भारताच्या इतिहासातीलही एक सोनेरी पान आहे. महाराष्ट्राची विच्छिन्न 'अस्मिता' शिवाजीमहाराजांनी जागृत व संघटित केली. तसेच त्यांनी महाराष्ट्राच्या संयोजनाचे स्फूर्तिशाली ध्येय निर्माण केले. महाराजांच्या लोकोत्तर विभूतीमत्वातून विजिगीषू, तेजस्वी स्वत्वाच्या आकांक्षा प्रकट झाल्या व त्रिविक्रम वामनाप्रमाणे जीवनाच्या सर्व कक्षा व्यापून भारतीय संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाला त्यांनी हात घातला. शिवरायांचे चरित्र म्हणजे एक पुण्यतीर्थ आहे. एका उदात्त ध्येयाची ती सांगता आहे. शिवाजी राजे यांनी स्वराज्ययुग निर्माण केले व पुढील साम्राज्ययुगाच्या व्यापक देशाभिमानाची थोर परंपरा घालून दिली. सारांश, शिवशाहीत महाराष्ट्राची 'अस्मिता' बोलू लागली.

भूषण कवी शिवाजीस उद्देशून म्हणतो—'तेरे ही भुजन पर भूतल को भार, कहिबे को सेसनाग दिगनाग हिमाचल है। तेरो अवतार जग पोसन भरनहार, कछु करतार को न तामधि अमल है ॥ साहिन में सरजा समत्थ सिवराज, कवि भूषन कहत जीबो तेरोई सफल हैं। तेरो करवाल करै म्लेच्छन को काल, बिन काज होत काल बदनाम धरातल है॥' (शिवराजभूषण ८७). [महाराज, भूभार तुमच्याच बाहूंवर आहे. शेष, दिग्गज व हिमाचल ही नाममात्रच आहेत. जगत्पालनासाठी तुमचा अवतार आहे. ब्रह्मदेवाला त्याची मुळीच काळजी नाही. सर्व नृपतींत तुम्हीच श्रेष्ठ. तुमचे जीवनही सफल. तुमची सवानी तरवार

म्लेंछांचे निर्दालन करीत असल्यामुळे काळ हा भूमीवर रिकामा हिंडत आहे. म्हणूनच त्याची बेअब्रू होत आहे]. भूषणाच्या मते शिवाजी हा 'जान्यो न परत ऐसे काम है करत कोऊ, गंधरब देव है कि सिद्ध है कि सेवा है।' (सदर ७९). [अलौकिक शौर्यकृत्ये करणारा हा गंधर्व आहे, देव आहे, सिद्धपुरुष आहे की शिवाजी आहे हे न कळे].

शिवचरित्राची रूपरेखा.

भोसले घराणे हे मूळचे चितोड येथील सूर्यवंशीय सिसोदे रजपुतांपासून उत्पन्न झाले. इ. स. १३०३ साली अल्लाउद्दीन खिलजीने चितोडचे राज्य काबीज केले. त्या वेळी चितोडचा रावळ रत्नसिंह व त्याचा मदतनीस सिसोद्यांचा राणा लक्ष्मणसिंह हे मारले गेले. त्यानंतर लक्ष्मणसिंहाचा पुत्र अजयसिंह हा राणा झाला. त्यास सजनसिंह व क्षेमसिंह हे दोन मुलगे होते; पण अजयसिंहाच्या मागून त्यांचा चुलतभाऊ हमीर हा राणा म्हणून वारस ठरला. मुसुल्मानांचे आक्रमण व राज्यावरील हक्क नष्ट झाल्यामुळे ते दोघे बंधू इ. स. १३३४ मध्ये दक्षिणेत आले. त्यांच्यापासून घोरपडे व भोसले या दोन शाखा उगम पावल्या.

पुढे महंमद तुघ्लकाचा हस्तक जाफरखान याने इ. स. १३४७ मध्ये बहामनी राज्य स्थापिले, तेव्हा सजनसिंह व त्याचा पुत्र दिलीपसिंह यांचे त्यास साह्य झाले. त्याबद्दल सजनसिंहास सरदारी व दौलताबादजवळील दहा गावे जागीर म्हणून मिळाली. सजनसिंहाचा पाचवा वंशज उग्रसेन यास कर्णसिंह व शुभकृष्ण हे पुत्र होते. कर्णसिंहाचा पुत्र भीमसिंह याने इ. स. १४६९ त खेळणा किल्ला सर केला. या कामगिरीबद्दल महंमदशहा बहामनी याने त्यास 'राजा घोरपडे बहादूर' हा किताब देऊन मुधोळजवळील ८४ गावांची जागीर दिली. हे घोरपडे घराणे होय. इकडे कर्णसिंहाचा भाऊ शुभकृष्ण हा वेरूळ दौलताबाद येथील वतनदार झाला. हे भोसले घराणे या नावाने प्रसिद्ध झाले. शुभकृष्णाच्या तिसऱ्या वंशातील बाबाजी भोसले हा इ. स. १५३० मध्ये जन्मला. बाबाजीचे पुत्र मालोजी व विठोजी हे पराक्रमी होते. ही भोसले मंडळी निजामशाहीतील रहिवासी होती.

मालोजीचा जन्म इ. स. १५५२ त झाला. मालोजी व विठोजी हे उभयता निजामशाहीत लष्करी नोकरीत शिरले. नंतर सिंदखेड येथील प्रतिष्ठित सरदार लखूजी जाधव याच्या तैनातीत ते होते. 'राजश्री मालोजी राजे ईश्वरभजनीं

तत्पर, गोब्राह्मणांचे प्रतिपालक, निरंतर साधुसज्जन भले रयत यांचे प्रतिपालक, दुष्टांचा निःपात करणार...मालोजी राजांनीं शिखरीं तळें बांधिलें, जीवन केलें, इमारती केल्या, जनयात्रा येऊं लागली.' (रा. खंड ८ ले. ७१). मालोजीस शहाजी व शरीफजी हे पुत्र झाले. निजामशहाच्या मध्यस्थीने शहाजी व जाधवरावकन्या जिजाबाई यांचा इ. स. १६०५ साली विवाह झाला.

मालोजी व विठोजी हे निजामशाही दिवाण मलिकंबर याच्या प्रोत्साहनाने पुढे आले. मलिकंबर हा चतुर मुत्सद्दी होता. त्याने विजापूरच्या आदिलशाहीशी सख्य करून मोगलांच्या आक्रमणापासून निजामशाहीचे काही काळ रक्षण केले. याच वेळीं लखूजी जाधवराव, उदाराम माहूरकर व विठोजीपुत्र भोसले हे मोगलांस फितूर झाले होते. त्यामुळे मोगलांकडील शहानवाजखान याने गोदावरीतीरच्या रोशनगावच्या लढाईत दि. ४ फेब्रुवारी इ. स. १६१६ रोजी त्याचा पराभव केला. तरीही मलिकने आपला तीव्र प्रतिकार चालू ठेवला. पुढे इ. स. १६१६ च्या ६ ऑक्टोबरला शहाजहान हा अजमीरहून निघून मोठ्या सैन्यानिशी दक्षिणेत चालून आल्यावर मलिकंबर व आदिलशहा यांनी दूरदृष्टींने नमते घेतले. मात्र शहाजहान परत फिरल्यावर मलिक बऱ्हाणपूर ओलांडून नर्मदापार झाला. या वेळी त्याने मोगलांस नामोहरम केले खरे; पण ते क्षणमात्रच. पुढे शहाजहानने मलिकची शरणागती पत्करली व नंतर तो इ. स. १६२२ च्या मार्चच्या २४ तारखेस दक्षिणेतून निघून गेला.

मलिक आणि मोगल यांच्या युद्धात मालोजी व शहाजी निजामशाहीच्या बाजूने लढत होते. जाधवरावांच्या फितुरीमुळे भोसले-जाधव यांचे संबंध अर्थातच सरळ राहिले नाहीत. तिकडे शहाजहानचे जहांगिरशी वितुष्ट आले. मलिकने त्या संधीचा भरपूर फायदा घेतला; पण दुर्दैव असे की, मलिकच्या सत्तेचा उत्कर्ष होऊ लागल्याने तो आपणास जड होईल म्हणून आदिलशहाने मोगलांचा पक्ष घेतला. याचा परिणाम म्हणजे आदिलशाहा व मोगल यांच्या कचाटीत मलिक सापडला. तरीही नोव्हेंबर १६२४ च्या भातवडीच्या लढाईत त्याने मोगल, आदिलशहा व कुत्बशहा यांचा बीमोड करून निजामशाहीस प्रचंड यश मिळवून दिले. या युद्धात शहाजीचे खरे तेज प्रकट झाले. शहाजीच्या पराक्रमामुळे मलिक-शहाजी यांचे संबंध बिघडले. अपमान व जागिरीची जप्ती यांमुळे शहाजी इ. स. १६२५ त विजापुरी आदिलशहाकडे गेला. आदिलशहाने मावळ भागाच्या बंदोबस्ताची कामगिरी त्यास

सांगितली. पुढे मलिकने शहाजीस साळ्याच्या घाटात गाठले. (शिवचरित्र साहित्य ले० २२). या प्रकरणात सुप्याचा संभाजी मोहिते हा शहाजीचा साहाय्यक होता. त्याची बहीण तुकाबाई ही शहाजीची दुसरी पत्नी. तिला एकोजी हा पुत्र इ. स. १६३० त झाला. (तंजावरचा शिलालेख).

मलिकंबर दि. १४ मे इ. स. १६२६ रोजी मरण पावल्यावर त्याचा पुत्र फत्तेखान हा दिवाण झाला. या सुमारास गृहकलहामुळे त्रस्त झालेल्या शहाजहानने मूर्तिजा निजामशहा याचा आश्रय घेतला व इब्राहिम आदिलशहासही अनुकूल करून घेतले. शहाजहान हा जहांगिरच्या मृत्यूनंतर दि० ४ फेब्रुवारी इ. स. १६२७ रोजी दिल्लीचा बादशाहा झाला. फत्तेखानास दाभोळ प्रांतातील आदिलशाही सैन्याचा बंदोबस्त न करता आल्याने मूर्तिजा निजामशहाने विजापूरहून शहाजीस पाचारण करून पुणे प्रांताची जप्त झालेली त्याची पूर्वीची जागीर त्यास सुपूर्द केली. या प्रसंगी शहाजीस मोगलांपासून निजामशाहीचे रक्षण करण्याची कामगिरी स्वीकारावी लागली. कारण ते राज्य जिंकण्याचा शहाजहानचा हेतू स्पष्ट दिसू लागला. शहाजीस एकीकडे मोगलांस व दुसरीकडे विजापूरचे मुरार जगदेव व रणदुल्लाखान यांच्या फौजेस तोंड द्यावे लागले. इ. स. १६३०त 'मुऱ्हार जगदे राऊ ईदलशाई मोटे फौजेनिसी निजामशाईवर चालोन आले पुणा कसबा वस्ती जाळून गाढवाचा नांगर पांढरीवर धरिला.' [शिवापूरकर वही-सहा कलमी शकावली, अत्रेकृत नकल पृ. २९]. निजामशहा हा व्यसनी व दुर्बल असल्याने आपल्या भवितव्याबद्दल शहाजीस धास्ती वाटून तो त्या वर्षीच्या डिसेंबरात मोगलास मिळाला. शहाजी मोगलाचा ताबेदार झाला तरी त्यास आपली जागीर सांभाळावयाची होतीच. सुदैवाने पुढे निजामशहाच्या मदतीस आदिलशहा आल्याचे पाहताच सुमारे दोन सव्वा दोन वर्षांनी शहाजी पुनः निजामशहाकडे आला. त्यानंतर शहाजीने मुरार जगदेव व रणदुल्लाखान यांच्या मदतीने महाबतखानाच्या आधिपत्याखालील मोगलसेनेवर स्वारी केली व शत्रूच्या ताब्यातील बहुतेक सर्व मुलूख सोडविला. मुरार जगदेवाची त्याने इतकी मैत्री संपादन केली की, मुरारपंताने नागरगाव येथे दि. २३ सप्टेंबर इ. स. १६३३ रोजी स्वतःची तुला केल्यावेळी शहाजी जातीने हजर होता. [प्रकरण १, परिच्छेद २२]. त्यानंतर आदिलशहाने शहाजहानास निजामशाही मिळवून देण्याचे आश्वासन दिल्यामुळे तो आपला सेनापती खानजमान व पुत्र औरंगजेब यांना दक्षिणेत ठेवून दि. ११ जुलै इ. स. १६३६ रोजी परत गेला.

इकडे शहाजीने प्रसंग ओळखून निजामशहास मोगलांचे स्वाधीन करून रणदुल्लाखानाच्या मध्यस्थीने इ. स. १६३६ च्या ऑक्टोबरात विजापूरकरांचा आश्रय घेतला. [१-१४].

शहाजीच्या साहाय्याने रणदुल्लाखानाने इ. स. १६३७ ते इ. स. १६४० पर्यंत कर्नाटकात तीन स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यांमुळे महंमद आदिलशाहाचे सामर्थ्य वाढले. शहाजीचे वास्तव्य बंगलोर येथे होते. इ. स. १६४० ते इ. स. १६४२ या कालात शिवाजी हा प्रथम बंगलोर येथे व नंतर विजापुरास मातुश्रीसह शहाजीजवळ होता. पुढे इ. स. १६४२ साली तो पुण्यास 'येतांच बारा मावळें काबीज केलीं.' (सभासद). इ. स. १६४४ च्या पहिल्या साहामाहीत शिवाजीचा कारभारी दादाजी कोंडदेव याने शिवाजीच्या नावाने मावळातील किल्ले घेण्याचा उद्योग आरंभिला. दादाजीच्या मृत्यूनंतर आदिलशहाने जिंजीच्या स्वारीवर पाठविलेल्या मुस्ताफाखानाचा जाच शहाजीस वाटू लागला. याचा परिणाम म्हणजे मुस्ताफाखानाने आदिलशहाच्या पर्वानगीने इ. स. १६४८ च्या २५ जुलैस शहाजीस कैद केले (२-१८) व अफजलखानाने शहाजीस विजापुरी आणावे असे फर्मान शहाने काढिले. इकडे शिवाजीने इ. स. १६४९ च्या खळद्‌बेलसरच्या लढाईत फत्तेखान या विजापुरी सरदाराचा पाडाव केला. तिकडे मुस्ताफाखानाचा मृत्यू, अफजलखानास स्वतःच्या वर्चस्वाबद्दल मिळालेले अपयश व शहाजीस वजीर खान महंमद याची अनुकूलता यांमुळे इ. स. १६४९ च्या १६ मेस शहाजीची सुटका झाली. (२-२०). पुढे कनकगिरीचा पाळेगार आपाखान याने आदिलशाहीविरूद्ध बंड केले. ते मोडण्यासाठी अफजलखानाची नेमणूक झाली. त्याच्याबरोबर शहाजीपुत्र संभाजी हा होता. इ. स. १६५४ च्या या लढाईत संभाजी मारला गेला. या वेळी शहाजीने पुढे होऊन पाळेगाराचा पराभव केला. अफजलखानाने संभाजीस पुढे करून त्यास योग्य मदत न दिल्यामुळे शहाजी व शिवाजी या उभयतांच्या मनांत खानाविषयी तिरस्कार उत्पन्न झाला.

शिवाजीच्या वाढत्या सत्तेच्या उत्कर्षामुळे आदिलशहास शहाजीबद्दल संशय निर्माण झाला. त्याचे निराकरण करण्यासाठी शहाजीने दि. ६ जुलै इ. स. १६५७ रोजी शहास लिहिले की, 'हाल्लीं अकर्तुकांचे सांगण्यावरून आमचे जागिरींत गैरहिशेबानें साहेब आतां खलेल करतील तर आम्ही रजपूत लोक आहों, आजपावेतों चार पातशाहींत नोकरी केली, भलतेंच नुकसान सोसून बेअब्रूनें पूर्वी

नोकरी केली नाहीं व पुढें करणार नव्हों....आमची दरकार नसेल तर खुषीनें आम्हांस रजा दिली पाहिजे'. (शिवाजी सूव्हनीर, १९२७ पृ.११६). नंतर शहाजीने विजापूरकरांच्या आज्ञेने इ. स. १६५९ च्या मार्च महिन्यात तंजावर जिंकण्याचा प्रयत्न केला; पण तो त्याच्या हयातीत यशस्वी झाला नाही. इ. स. १६५९ मध्ये शहाजी महाराष्ट्रात येऊन शिवाजीस भेटला. (४–३८). शिवाजी-प्रमाणे शहाजी जड होणार या भयाने आदिलशहाने इ. स. १६६३ च्या एप्रिलमध्ये पश्चिम कर्नाटकात स्वारी केली. त्या वेळी अब्दुल करीम बहलोलखान यानेही शहाविरुद्ध बंड पुकारले. यामुळे चिडून बहलोलखान व शहाजी यांना बोलावून 'सुलतानानें दोघांनाहि पकडलें.' (शि. प. सारसंग्रह. ९४६). परंतु लगेच दोन दिवसांनी शहाजीची सुटका झाली. इ. स. १६६४ मध्ये बेदनूरकर नाईक यास शहाजीने शरण आणिले. या कामगिरीबद्दल आदिलशहाने त्यास मानमरातबाची पत्रे व वस्त्रे पाठवून त्यास गौरविले. मात्र बेदनूरहून परत येताना होदिगेरे येथे शिकारीत शहाजी घोडयावरून पडून दि. २३ जानेवारी इ. स. १६६४ रोजी मरण पावला. शहाजीच्या मागून मनसबदारीची वस्त्रे एकोजीस मिळाली. 'शिवाजीला जर 'राज्य–संस्थापक' म्हणावयाचे तर शहाजीला **'राज्य–संकल्पक'** असें पद देण्यास हरकत नाहीं.' (शहाजी राजे भोसले, पृ. ८४).

शिवाजीचा जन्म दि. १९ फेब्रुवारी इ. स. १६३० रोजी झाला (१–१६). शहाजीचे आयुष्य धामधुमीचे असल्यामुळे शिवाजी व त्याची आई जिजाबाई ही प्रथमपासूनच शहाजीजवळ न राहता वेगळी होती. या उभयतांचे वास्तव्य पुणे जागिरीत असून त्याचा कारभार दादाजी कोंडदेव पाहत असे. वयाच्या विसाव्या वर्षापासून शिवाजी हा स्वतंत्रपणे वागू लागला होता. विजापूरच्या महंमद आदिलशहाच्या इ. स. १६४६ ते इ. स. १६५६ या काळातील सतत आजारीपणामुळे व त्याच्या मृत्यूनंतर दरबारातील स्वार्थी सरदारांच्या भांडणामुळे आदिलशाहीच्या नाममात्र ताब्यात असलेला पुणे जागिरीचा प्रदेश शिवाजीला सहज मिळविता आला. तोरणा इ. स. १६४७ मध्ये (२–९), पुरंदर इ. स. १६४८ मध्ये (२–२२) व रायगडादी इतर किल्ले त्याने लगोलग घेतले. या सर्वांत त्याच्या पराक्रमाचा कळस म्हणजे दि. २५ जानेवारी इ. स. १६५६ रोजी त्याने 'जमावाच्या बळे युद्ध करून जाऊळी घेतली' (जेधे शकावली). शिवाजीच्या स्वराज्यस्थापनेचा आरंभ येथूनच झाला (२–२६).

इ. स. १६५७ मध्ये त्याची मोगलांशी पहिली चकमक झाली. औरंगजेबाने विजापुरावर स्वारी केल्याची संधी साधून शिवाजीने अहमदनगर (२७ एप्रिल) व जुन्नर (३० एप्रिल) ही शहरे लुटली (२–२२, २८); पण औरंगजेबाने आपल्या सैन्याची पुनर्रचना करून शिवाजीस १४ जून रोजी त्या प्रांतातून हुसकून लाविले. पुढे सप्टेंबरात आदिलशहाने मोगलांशी तह केल्यावर शिवाजीनेही तेच धोरण स्वीकारले. औरंगजेब मात्र शिवाजीच्या बाबतीत अत्यंत सावध होता.

शिवाजीचा पुढील उद्योग म्हणजे त्यांची उत्तर कोकणातील कल्याण–भिवंडीची स्वारी (२४ ऑगस्ट इ. स. १६५७) ही होय. (२–२३). इ. स. १६५९ च्या सप्टेंबरात विजापूरचा सरदार अफजलखान शिवाजीच्या पारिपत्यास निघाला. (३–२). परंतु शिवाजीने त्याच्या भेटीतच दि. १० नोव्हेंबर रोजी खानाचा वध केला. (३–२०). नंतर त्याने दक्षिण कोकण व कोल्हापूर प्रांत आक्रमिण्यास सुरुवात केली. इ. स. १६६० च्या २ मार्चला विजापुरी सरदार सिदी जोहार याने त्यास पन्हाळ्यास कोंडिले. (३–२६). तथापि शिवाजी तेथून निसटला. इकडे मोगलांच्या फौजेने शायिस्ताखानाच्या अधिपत्याखाली १९ मे रोजी पुणे काबीज केले. १५ ऑगस्टला खानाने चाकणही घेतले (५–३) व तो २६ ऑगस्टपासून पुण्यास राहू लागला. उत्तर कोकणात खानाच्या सैन्यास शिवाजीने शिरकाव होऊ दिला नाही. तरीदेखील इ. स. १६६१ च्या मेमध्ये मोगलांनी कल्याण सर केले.

पुढील दोन वर्षांत मराठे व मोगल यांच्या झटापटी चालू होत्या. इ. स. १६६३च्या ५ एप्रिलला शिवाजीने खानाच्या पुणे येथील गोटात युक्तीने प्रवेश मिळवून शास्ताखानास जखमी करून 'शास्त' केली. 'खानाचे चिरंजीव यमसदनाप्रती गेले'. [शिवदिग्विजय पृ. २२०]. त्याच्या बायकामुलांचा व बरोबरीच्या मंडळींचा धुव्वा उडाला. [५–६]. त्यानंतर जानेवारी इ. स. १६६४ मध्ये शिवाजीने सुरतेवर स्वारी करून जवळजवळ दहा लक्ष रुपयांची लूट मिळविली. [३–४३].

या साली औरंगजेबाने शायिस्ताखानाच्या जागी अंबेरच्या जयसिंगाची नेमणूक केली. जयसिंगाने दक्षिणेत दिलेरखानासह येऊन पुरंदरास वेढा दिला व रुद्रमाळ [वज्रगड] हा किल्ला घेतला. [५–१६]. शेवटी शिवाजीस १३ जून रोजी तह करणे भाग पडले. मोगलांस तेवीस किल्ले देऊन त्याने आपणाकडे बारा किल्ले ठेविले. याशिवाय विजापूरच्या स्वारीत मोगलांस एकनिष्ठपणे साहाय्य केले. त्यानंतर जयसिंगाच्या प्रेरणेने शिवाजी आग्र्यास औरंगजेबास भेटण्यास

दि. १२ मे इ. स. १६६६ रोजी गेला. [५–२७]. तेथे त्याचा दरबारात अपमान होऊन त्यास एकाएकी मूर्च्छा आली. बादशहाने या अपराधाबद्दल त्यास नजरकैदेंत ठेविले. सुमारे तीन महिने तेथे राहून दि. १९ ऑगस्ट रोजी तो युक्तीने सुटला. [५–३४]. यापूर्वी त्याने आपल्या बरोबरीची माणसे दक्षिणेत पाठवून दिली होती. तो मथुरा, प्रयाग, बनारस, गया, तेलंगण या मार्गाने १२ सप्टेंबरस रायगडी परत आला. [५–३६]. पुढील तीन वर्षे शिवाजी मोगलांच्या वाटेस मुळीच गेला नाही. इतकेच नव्हे तर जसवंतसिंग व शहाजादा शहाअलम यांच्यामार्फत त्याने मोगलांशी सख्य केले. 'राजश्रीनी मुलकाची बटाई केली' [जे. श.] व आपला कारभार अधिक व्यवस्थित केला. बादशाहाने संतुष्ट होऊन त्यास 'राजा' हा किताब दिला.

जानेवारी १६७० मध्ये शिवाजी व मोगल यांच्यांत पुन्हा बिघाड झाला. शिवाजीने पूर्वी मोगलांस दिलेले सर्व किल्ले परत मिळविले. ५ आक्टोबरास त्याने सुरतेवर दुसऱ्यांदा हल्ला केला व लूट मिळविली. यानंतर बागलाण, खानदेश, वऱ्हाड व औरंगाबाद यांवर त्याने लागोपाठ स्वाऱ्या करून दिंडोरी [२७ ऑक्टोबर १६७०] व साल्हेर [७ फेब्रुवारी १६७२] येथे मोगलांचा फडशा उडविला. [५–४८]. दिलेरखानाचे हे अपयश पाहून औरंगजेबाने त्याच्या जागी बहादुरखान (खानजहान) यास दक्षिणचा सुभेदार नेमिले; परंतु त्याला फारसे यश आले नाही. डिसेंबर १६७२ मध्ये अली आदिलशहा मरण पावल्यावर तर शिवाजीचे सामर्थ्य अधिकच वाढले. याच सुमारास वायव्य सरहद्दीवर खैबर प्रांतातील अफगाणांच्या बंडामुळे मोगलांची प्रचंड फौज तिकडे गुंतली होती. त्यामुळे दक्षिणेतील मोगलसत्ता अगदीच कमकुवत झाली होती. या संधीत शिवाजीचा ६ जून इ. स. १६७४ रोजी रायगडास 'छत्रपती' या नावाने राज्याभिषेक झाला. (७–१६). 'महाराजांनीं नवीन शिवशक धराभुवनीं प्रगट केला'. (चित्रगुप्ताची बखर पृ. १०४).

राज्याभिषेकानंतर इ. स. १६७७ त शिवाजीने कर्नाटकतंजावर प्रांतांत दक्षिण-दिग्विजय केला. या कामी गोवळकोंड्याच्या अबुलहसन कुत्बशहाचे त्यास साह्य झाले. दक्षिणेतील जिंजी, वेलोर अरणी इत्यादी महत्त्वाची ठाणी त्याने काबीज करून तिकडे आपली सत्ता प्रस्थापित केली. त्याने आपला सावत्र भाऊ एकोजी यास प्रथम साममार्गाने वश करण्याचा प्रयत्न केला; पण त्यात यश न आल्या-मुळे दंडमार्गाचा अवलंब करून दि. १६ नोव्हेंबर रोजी त्याचा संपूर्ण मोड केला

व तंजावर ताब्यात घेतले. (६–२०). 'चंदावरची फौज बुडविली हजार सिपाई ब्राह्मण व मऱ्हाटे मिलोन पडिले.' (९१ कलमी बखर कलम ८३ राजवाडे प्रत).

उपरांतिक विजापूरचा वजीर सिदी मसूदखान याने मोगलांपासून बचाव करण्यासाठी इ. स. १६७८ मध्ये शिवाजीशी सख्य केले. पुढे अपेक्षेप्रमाणे दिलेरखानाने इ. स. १६७९ च्या ७ ऑक्टोबरास विजापुरावर चढाई केली. (७-३२). त्याला शह म्हणून शिवाजीने जालना-औरंगबादच्या बाजूला आघाडी उघडली. जालनाच्या स्वारीत त्याला भरपूर लूट मिळाली खरी; पण रणमस्तखान या मोगल सरदाराने त्याचा पिच्छा पुरवून नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात त्यास माघार घ्यावयास लावली. मध्यंतरी संभाजी शिवाजीवर रुसून दि. १३ डिसेंबर रोजी मोगलांस मिळाला. (७-२९). त्यास पुढे पश्चाताप होऊन इ. स. १६७९ च्या ४ डिसेंबरास तो शिवाजीकडे परत आला. (७-३०). उत्तर आयुष्यातील या सर्व दगदगीचा ताण सहन न होऊन 'शरीरीं रोगाची भावना होऊन' (मराठी साम्राज्याची छोटी बखर) दि. ४ एप्रिल इ. स. १६८० रोजी 'सीवाजी महाराज छत्रपती कैलासवासी शांत जाहाले' (शेडगावकर बखर). आपल्या अद्वितीय कामगिरीमुळे शिवाजीराजे 'सबन के उपर ही ठाडो रहिबे के जोग' (भूषणकृत शिवाबावनी, १५) [सर्वश्रेष्ठ होते].

शिवचरित्रविषयक साधने.

शिवाजीच्या चरित्राची हकीकत सांगणाऱ्या बखरी म्हणजे शिवछत्रपतींचे चरित्र (सभासद), शिवाजी महाराजांची बखर (चित्रगुप्त), एक्याण्णव कलमी बखर (दत्ताजी त्रिमल वाकेनवीस व अनाजी रंगनाथ मलकरे), सप्तप्रकरणात्मक चरित्र (मल्हार रामराव चिटणीस), मराठी साम्राज्याची छोटी बखर (गणपतराव गोविंदराव बरवे), शिवदिग्विजय, शिवप्रताप, शेडगावकर बखर, भोसलवंशचरित्र, राजवाडे खंड ४ मधील शिवाजीची हकीकत, बुंदेल्याची बखर, मुधोळ संस्थानच्या घोरपडे घराण्याचे वृत्त, रायरीची बखर (फॉरेट) व मराठ्यांची बखर (ग्रँटडफ) या होत. या सर्वांत सभासदाची बखर ही समकालीन असल्यामुळे विशेष महत्त्वाची आहे. चित्रगुप्ताची बखर ही सभासदाच्या बखरीची वाढविलेली काव्यात्मक बखर होय. इतिहासापेक्षा भाषेच्या दृष्टीने ती उल्लेखनीय म्हटली पाहिजे. मुसुलमानी अनुकरणाने केलेले कलमवार लेखन व अद्भुत वर्णनाचा अभाव ही एक्याण्णव कलमी बखरीची वैशिष्ट्ये होत. बुंदेल्याची बखर व घोरपड्यांची

बखर या भाषांतरित असून त्या विरुद्धपक्षीय लेखकांनी लिहिल्या असल्यामुळे त्या पक्षाच्या मताच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतील. फॉरेस्टची रायरीची बखर हे मूळ मराठी बखरीचे इंग्रजी भाषांतर होय. त्यात 'शिवाजीच्या राज्याभिषेकानंतरची माहिती मुळीच नाहीं.' (ऐतिहासिक प्रस्तावना पृ० २१८). चिटणिसांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र हे विस्तृत असून वडिलार्जित कारकीर्दी, दिनचर्या इत्यादी अनेक अस्सल व दुय्यम साधनांच्या आधारे त्याचे लेखन झाल्याचे आढळते. इतर बखरींत मात्र शिवाजीची काही स्वतंत्र व काही आनुषंगिक माहिती दिली आहे. ग्रँट डफची बखर हे मूळ इंग्रजीचे भाषांतर आहे. निव्वळ भौतिक पद्धतीने डफने हा इतिहास लिहिला असून 'मराठी बखरींच्यापेक्षा त्याचा इतिहास जास्त व्यवस्थित आहे हे इकडील लोकांसही मान्य आहे.' (ऐ. प्र. पृ. २९). राजवाड्यांच्या मते 'सभासदी बखर, मल्हार रामरावकृत चरित्र व शिवदिग्विजय या तीन बखरी फार महत्त्वाच्या आहेत.' (सदर पृ. २२०).

अस्सल साधनांच्या दृष्टीने शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २ यांत इ. स. १६८० पर्यंतची मराठी, इंग्रजी, पोर्तुगीज, डच, कानडी, फारसी व संस्कृत या भाषांतील अस्सल पत्रे व समकालीन उल्लेख, शिवाजीची शकावली, शिवशाहीतील सुभेदारांची अकारविल्हे नोंद इत्यादी संग्रहीत झाली आहेत. जेधे शकावली हा ग्रंथ शिवाजीच्या आयुष्यातील घटना व त्यांचा निश्चित काल समजण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरण्यासारखा आहे. राजवाड्यांच्या ८ व्या खंडांत शिवाजीची एकंदर ३६ पत्रे आहेत. त्यांचा खंड १५ हा शिवकालीन पत्रव्यवहाराचा असून त्यात तत्कालीन तंटे व त्यांचे निवाडे आहेत. या खंडात ले० १०, ११ व १२ मध्ये 'बखेर' हा शब्द (इ. स. १६८५ चा) कालदृष्ट्या प्रथम आलेला दिसतो. त्यांच्या खंड ४ मध्ये शिवचरित्रविषयक बखरींच्या प्रामाण्याचे विवेचन केले आहे. काव्येतिहाससंग्रह पत्रे यादी वगैरे यामधील कानूजाबता अष्टप्रधानांची कामे (ले० २) व कैफियत शहाजी भोसले (ले० ६) हे लेख महत्त्वाचे आहेत. संस्कृतातील श्रीशिवभारत (परमानंद) व पर्णालपर्वतग्रहणाख्यानम् (जयरामकवी) हेही तितकेच महत्त्वाचे म्हणता येतील. पर्णालपर्वतग्रहणाख्यानमध्ये इ. स. १६७३ पर्यंत घटना असल्या तरी अतिशयोक्ती व प्राल्हाळ या दोषांपासून ते अलिप्त आहे. फारसी भाषेतील मुहम्मदनामा, आलमगीरनामा, मआसिर—इ—आलमगीरी, मुन्तखबुलुल्बाब,

फुतुहात-इ-आदिलशाही, तारीख–इ–अली, अलीनामा, हफ्तकुर्सी हे सारे ग्रंथ अव्वल दर्जाचे आहेत. मुहम्मद इब्राहीम अझ्झुबैरी याचा बसातीनुस्सलातीन हा ग्रंथ उत्तरकालीन असला तरी अत्यंत माहितीपूर्ण आहे. याशिवाय Dutch Factory Records, Factory Rccords (India Office), Surat Letters तसेच Portugueses e Maratas व Memoires of F. Martin ही अनुक्रमे पोर्तुगीज व फ्रेंच भाषांतील साधने अभ्यसनीय होत. त्याचप्रमाणे अलीकडच्या काळातील शिवचरित्रप्रदीप (आपटे व दिवेकर), शहाजी राजे भोसले व शककर्ता शिवाजी (रियासतकार सरदेसाई), हाऊस ऑफ शिवाजी व शिवाजी (यदुनाथ सरकार), केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया, खंड ४ व श्रीशिवछत्रपती (शेजवलकर) हे अभ्यासकांस निश्चित मार्गदर्शक होतील.

शिव छत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र.

हे चरित्र मल्हार रामराव चिटणीस यांनी दुसऱ्या शाहू छत्रपतीच्या आज्ञेने लिहिले आहे. या चरित्राची सुरुवात 'स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३७ प्रमोदीनाम संवत्सरे ज्येष्ठ बहुल षष्ठी भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजाधिराज श्रीमहाराज प्रतापी शाहू नृप छत्रपती सिंहासनाधीश्वर स्वामी यांणीं राजमान्य राजश्री मल्हारी रामराव चिटणवीस यांसि आज्ञा केली ऐशी जे—' अशी आहे. राज्याभिषेक शक १३७ म्हणजे इ. स. १८११ हे वर्ष होय. तेव्हा 'प्रमोद' संवत्सर होता. धाकटे शाहू महाराज दि. ४ मे इ. स. १८०८ रोजी वारले. (मराठी रियासत उत्तरविभाग ३ (१९३२) पृ. ५११). 'तेव्हां त्यांनीं आज्ञा केली ती आधींच केली असावी व नंतर चिटणिसांनीं १८११ मध्यें आपल्या ग्रंथास आरंभ केला असावा.' (सप्तप्रकरणात्मक चरित्र (१९२४) पृ. ३३) हे काव्येतिहाससंग्रहकारांचे मत मान्य होण्यासारखे आहे. मात्र सदर चरित्रात लेखनस्थळाचा उल्लेख नाही.

चरित्रकार मल्हार रामराव चिटणीस हे सातारकर छत्रपती धाकटे शाहू यांचे चिटणीस (सरकारी कार्कून) होते. 'पुरातन सेवक, लेखनाधिकारी' असा आरंभी ते आपला उल्लेख करितात. त्यांचे घराणे सातारा जिल्हातील बोरगाव येथील असून त्यांचे उपनाम चित्रे असे होते. पेशव्यांचे सरदार सखाराम हरी गुप्ते आंबेगावकर यांचे ते जावई होते व सुप्रसिद्ध खंडो बल्लाळ चिटणीस यांचे ते

पणतू (बाळाजी आवजी – खंडोबल्लाळ – जिवाजी – रामराव–मल्हारराव) होते. (ऐतिहासिक घराण्याच्या वंशावली १९५७, पृ. ४०). त्यांचे बालपण जयतापूर येथे गेले. (मनोरंजन, एप्रिल १९११, पृ. २१९)

प्रथम हे पुण्यास मुख्य चिटणीसपदावर होते. होळकरांनी पुण्यावर स्वारी केली तेव्हा इतरांप्रमाणे यांच्यावरही एक लक्ष रुपयांची पट्टी बसविली. पुढे होळकरांनी अमृतरावास पेशवेपद देण्याचा बेत केला. पेशव्यांची आज्ञापत्रे चिटणिसाकरवी होण्यासाठी यांना सक्त पाहऱ्यात साताऱ्यास नेले. चिटणिसांनी ते कार्य केले; परंतु होळकरांचा कर चुकविण्यासाठी त्यांनी बोरगांवी प्रयाण केले. नंतर रावबाजींनी त्यांचा सरंजाम जप्त केला. चिटणिसांचे चिरंजीव बळवंतराव यांनी ती जप्ती सोडविली.

नाना फडणिसाने सातारकर छत्रपतींची 'अमर्यादा करून चौकी पहारा ठेवून, राजमंडळाचे लोक कोणी जाऊं नये ऐसें केलें. ...राजपत्रें, कागदपत्रें होणें याचें कांहीं एक कारण नाहीं, याप्रमाणें बंदोबस्त केला.' (म. रि. उ. वि. ३ पृ. ५१४). शाहूपेक्षा चतुरसिंगास (विठोजी भोसल्याचा वंशज) ही परिस्थिती अधिक जाचक वाटली म्हणून त्याने पेशव्यांविरुद्ध बंड केले. व्यासराव गोपाळ डबीर, बापू कान्हो फडणीस, मल्हार रामराव चिटणीस वगैरे मंडळी चतुरसिंगास सामिल होऊन त्याजबरोबर रानोमाळ भटकू लागली. पुढे चतुरसिंग कैद होऊन रायगडजवळील कांगोरी किल्ल्यावर इ. स. १८१८च्या १५ एप्रिलास मरण पावला. (सदर पृ. ५१८). मल्हार रामराव चिटणिसांचा मृत्यू इ. स. १८२३ मध्ये झाला. (ऐ. घ. वं. पृ. ४०).

काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात की, 'श्रीमंत छत्रपती धाकटे शाहू महाराज ऊर्फ आबासाहेब सातारकर ह्यांच्या आज्ञेवरून त्यांचे चिटणीस रा० मल्हार रामराव यांनीं मागील कागदपत्रांचे दाखले पाहून व श्रुत असलेल्या माहिती-वरून इ. स. १८१०।११ ह्या सालीं शककर्ते थोरले शिवाजी महाराजांपासून तों धाकटे शाहू महाराजांपर्यंत सर्व महाराजांचीं चरित्रें लिहिलीं. खुद्द मल्हार रामराव व त्यांचे पूर्वज हे मोठे हुद्देदार असून महाराजांच्या अतिनिकट वागणारे असल्यामुळें सर्व कागदपत्र त्यांच्या ताब्यांत होते, आणि परंपरागत आलेली आंतील बारीक बारीक माहितीहि त्यांस इतरांपेक्षां विशेष होती. ह्यावरून अशीं चरित्रें लिहावयास ते योग्य होते हें सांगणें नको.' (श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे (१९३०) उपोद्घात).

सप्तप्रकरणात्मक चरित्राच्या प्रती.

हे चरित्र विविधज्ञानविस्तारात प्रथम भागशः प्रसिद्ध झाले. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :—

(अ) 'शिवछत्रपती यांचें जन्म व पूर्वजवर्णन प्रकरण'–प्रकरण १, जानेवारी व फेब्रुवारी इ. स. १८७७.

(आ) 'राज्यआक्रमण व उपदेशकथन'–प्रकरण २, मार्च, एप्रिल इ. स. १८७७.

(इ) 'यवनाशीं युद्ध'–प्रकरण ३, मे, जून इ. स. १८७७.

(ई) 'राज्यमर्यादाकथन'–प्रकरण ४, जानेवारी, फेब्रुवारी इ. स. १८७८.

(उ) 'दिल्लीपतीपराभव'–प्रकरण ५, मार्च ते सप्टेंबर इ. स. १८७८.

(ऊ) दक्षिणदिग्विजय'–प्रकरण ६, नोव्हेंबर, डिसेंबर इ. स. १८७८ व जानेवारी ते मार्च इ. स. १८७९.

(ए) 'राज्याभिषेक'–प्रकरण ७, ऑगस्ट ते डिसेंबर इ. स. १८८१.

विविधज्ञानविस्तारातील प्रस्तुत चरित्राची प्रत रावबहादूर नीलकंठ जनार्दन कीर्तने यांच्या संग्रहातील होती. विस्तारातून क्रमशः प्रसिद्ध झालेल्या या चरित्राची पुस्तकरूपाने पहिली आवृत्ती (निर्णयसागर) इ. स. १८८२ त व दुसरी आवृत्ती (गणपत कृष्णाजी) इ. स. १८९४ त प्रसिद्ध झाली. कीर्तने यांच्या पहिल्या आवृत्तींत पुढील मजकूर आहे : 'गोविंद खंडेराव चिटणीस यांणीं स्वमुखें वृत्तांत सांगून शिवाजीची बखर सदाशिव लक्ष्मण नातू याजकडून लिहविली आहे. या बखरींतील विशेष माहितीचा कित्येक ठिकाणीं टीपांत व जेथें क्षुल्लक तफावत दृष्टीस पडली त्या ठिकाणीं मुळांतच समावेश केला जाईल.' (पृ. १). ही कीर्तने प्रत होय.

काव्येतिहाससंग्रहकारांनीं हे चरित्र इ. स. १९२४ मध्ये प्रसिद्ध केले. त्याचा इतिहास असा :—

या चरित्राची सुमारे पाच प्रकरणे विस्तारात प्रसिद्ध झाली होती. काव्येतिहास-संग्रह कर्त्यांची प्रतिज्ञा अशी होती की, पूर्वी प्रसिद्ध झालेला ग्रंथ आपल्या मासिकात प्रसिद्ध करू नये. विस्तारात हे चरित्र इ. स. १८७७ सालापासून प्रसिद्ध होत होते; पण ते अत्यंत मंदगतीने व टीपांशिवाय होते. पुढे काव्येतिहास-संग्रहकारांच्या मनात इतर चरित्रांप्रमाणे हेही चरित्र प्रसिद्ध करण्याचे आले.

त्यासंबंधी काव्येतिहाससंग्रहात जाहिरात आली. ती पाहून विस्तारकर्त्यांनी काव्येतिहाससंग्रहकारास पत्र लिहिले की, 'सुमारें पांच प्रकरणें या चरित्राची विस्तारांत प्रसिद्ध झालीं आहेत, बाकी दोनच राहिलीं तीं लौकरच आम्ही पुरीं करणार आहों. ह्याकरितां आपण हें चरित्र स्वतंत्र ग्रंथरूपानें प्रसिद्ध करण्याचा विचार रद्द करावा, म्हणजे विस्तारांत आरंभिलेलें चरित्र अपूर्ण ठेवण्याचें कारण पडणार नाहीं.' यामुळे काव्येतिहाससंग्रहकारांचा विचार इ. स. १९०६।७ पर्यंत तसाच मागे पडून राहिला. दुसरे असे की, इ. स. १८८२।८३ च्या सुमारास हे चरित्र प्रसिद्ध करण्यास संग्रहकर्त्यांस जी साधने उपलब्ध होती ती हळूहळू नाहीशी झाली. ते सांगतात की, 'मजपाशीं ज्या हस्तलिखित निरनिराळ्या प्रती होत्या त्या माझ्या हातून गेल्या व त्या पुनः मिळत ना!' त्या प्रती पुढीलप्रमाणे :—

(क) कै. मल्हार खंडेराव चिटणीस यांनी आपले तीर्थरूप खंडेराव (मल्हार रामरावाचे नातू) त्याजकडून ही चरित्रे देवविली. ती मालकाच्या इच्छेप्रमाणे कायस्थ क्लबास दिली.

(ख) ही प्रत सुवाच्च अक्षराने दौलताबादी कागदाच्या रुंद अशा बंदावर लिहिलेली पुण्यातील शनिवार पेठेत राहत असलेले कै. रंगराव आप्पा पुरंदरे याजकडील. ती बेत तहकूब झाल्यामुळे परत केली.

(ग) तिसरी रा. ब. नीलकंठ विनायक कीर्तने याजकडील होती. ही इंदूरचे श्रीमंत किबे यांनी कोल्हापूरहून लिहून आणून संग्रहित केली. ती रावबहादुरांनी मागितली म्हणून त्यांस परत केली.

या तीन प्रतींपैकी चिटणीस व किबे प्रती या कातड्याच्या जाड पुठ्यांनी बांधिलेल्या असून त्यांतील अक्षर सुरेख व सुवाच्य होते. पुरंदरे प्रत सुटे बंद असलेली होती. तीतीलही अक्षर सुरेख व वळणदार होते. सातारच्या महाराजांकडील एक प्रत रावबहादूर पारसनिसांकडे होती. तीही मिळाली नाही. याप्रमाणे चिटणीस, पुरंदरे, किबे व पारसनीस यांच्या संग्रहातील या चारी प्रती काव्येतिहाससंग्रहकर्त्यांस दुष्प्राप्य झाल्या.

यानंतर बऱ्याच प्रयत्नांती इ. स. १९१२ साली रा. बळवंतराव रघुनाथ चिटणीस [खंडो बल्लाळ चिटणिसाचा पुत्र बहिरव (वडगांवकर) याचे वंशज] सातारा यांजकडून व श्री. बाळासाहेब महाराज कोल्हापूरकर (गुरुमहाराज घराणे) कोल्हापूर यांजकडून अशा दोन प्रती संग्रहकर्त्यांस मिळाल्या. त्या मोडी

प्रतींवरून बाळबोध प्रती करण्याचे काम सुरू झाल्यावर इ. स. १९१९।२० साली चिटणिसांकडून आणखी एक प्रत मिळाली. या तीन प्रतींखेरीज सहाव्या प्रकरणाची एक प्रत पुण्याहून एका मित्राकडून संग्रहकर्त्यांस मिळाली.

काव्येतिहाससंग्रहकारांनी उपरिनिर्दिष्ट तीन प्रती व कीर्तने प्रत (विविधज्ञानविस्तार) या चार प्रतींचा उपयोग सप्तप्रकरणात्मक चरित्र प्रसिद्ध करताना केला. या प्रतींचा तपशील असाः—

(अ) कीर्तने प्रत (द्वितीयावृत्ती इ. स. १८९४)—बाळबोध लिपीतील ही मुद्रित प्रत आहे. हीतील मूळ भाषेचे आधुनिकीकरण बरेच झालेले आढळते. चरित्रकाराच्या मूळ भाषेचा तीत शोध लागत नाही. या प्रतीस कीर्तने यांनी लिहिलेला उपोद्घात चांगला असला तरी भाषा व इतिहास या दृष्टींनी प्रस्तुत चरित्राचा त्यात विचार नाही. शिवाय मोडी हस्तलिखिताचे बाळबोधीत केलेले लिप्यंतर मुळाशी रुजू केल्याचे दिसत नाही. त्याचप्रमाणे मराठी व इंग्रजी ग्रंथांवरून त्याचे प्रामाण्य सिद्ध केलेले नाही. मोडी वाचनाच्या चुकांमुळे नावे व शब्द या बाबतीत घोटाळे झालेले आहेत. उदा० कोंढाणाऐवजी कोखाणा, रायगड ऐवजी प्रायगड, कही कबाडऐवजी आवृत्ती कबिला वाड इत्यादी. शुद्धाशुद्धतेचा त्यात विचार नाही. ही दुसरी आवृत्ती पहिलीचीच नकल आहे इतके असूनही योग्य पाठ ठरविण्यासाठी हिचा उपयोग झाला.

(ब) सातारा प्रत—रा. बळवंतराव चिटणीस यांजकडील ही प्रत होय खर्ची कागदाच्या बंदावर एका बाजूने तिचे लेखन केले आहे. प्रत्येक बंद २०॥ इंच लांब व ६॥। इंच रुंद आहे. या प्रतीत सहावे प्रकरण नाही. उरलेल्या कित्येक ठिकाणी बंद गहाळ आहेत. हीत चिटणिसी वळणाचे असलेले अक्षर सुवाच्य आहे. ही जैतापूर ता० सातारा येथे मिळाली. हिचे एकूण बंद ३४७ असे आहेत. ते असेः–प्रकरण १–३७, प्रकरण २–५६, प्रकरण ३–५६, प्रकरण ४–४४, प्रकरण ५–५०, प्रकरण ६ नाही व प्रकरण ७–८४. एकूण बंद ३४७. यांपैकी ४ बंद अधूनमधून गहाळ आहेत. त्याची नोंद त्या त्या जागी केली आहे.

(क) कोल्हापूर प्रत—श्रीमंत बाळासाहेब महाराज यांजकडील ही प्रत होय. या प्रतीत सहावे प्रकरण नाही. यावरून व इतर बाबी सारख्या असल्यामुळे सातारा प्रत व कोल्हापूर प्रत मूळ एकाच प्रतीवरून तयार झाल्या असाव्या किंवा एकीवरून दुसरी नकलून घेतलेली असावी. (सप्तप्रकरणात्मक चरित्रप्रस्तावनेवरून

निवेदन, पृ. ७). ही प्रत पुस्तकासारखी बांधून तिचा खारव्याचा पुठ्ठा आहे. हे कापड सुटे व विटून गेले आहे. हिचे दोन भाग आहेत. पहिल्या भागात भागवती श्लोक व त्याच अर्थाचे तुकारामाचे अभंग त्याखाली दिले आहेत. हे श्लोक आणि अभंग बाळबोध लिपीत आहेत. हिचे बंद पाठपोठ असे एकूण ८३ आहेत. त्यांपैकी पहिले ४ बंद फाटले आहेत. मात्र पांचव्या बंदापासून पुढील सर्व व्यवस्थित आहेत. श्लोक व अभंग तांबड्या शाईच्या दुहेरी दुरेघी चौकटीत सुंदर लिहिले आहेत. दोन भागांच्या मध्यभागी एक कोरा बंद असून त्यानंतर शिवछत्रपतींचे चरित्र सुरू केले आहे. या दुसऱ्या भागाचे एकूण १६८ बंद आहेत. त्यापैकी शेवटले १४ बंद अखेरच्या ओळी झडलेले व शेवटला एक फाटून गेलेला आहे. बंदाची १२ इंच लांबी व ८॥ इंच रुंदी असून पोर्तुगीज कागदावरील वळणदार बाळबोध अक्षर आहे. मोडी अक्षर चिटणिशी वळणाचे दिसते. दरेक पृष्ठावर १५ ते १६ ओळी आढळतात. यातील सहावे प्रकरण गाळण्याचे कारण समजत नाही. या प्रतीचे एकूण १६८ बंद आहेत. ते असेः—प्रकरण १–२२, प्रकरण २–२०, प्रकरण ३–२६ प्रकरण ४–२१, प्रकरण ५–२८, प्रकरण ६ नाही व प्रकरण ७–४१. एकूण बंद १६८.

(ड) सातारा प्रत २—रा. बळवंतराव चिटणिसांकडील ही प्रत होय. ही फ्रेंच कागदावरील असून अलीकडची दिसते. हिच्यात सर्व प्रकरणे असल्यामुळे संपूर्ण ग्रंथावरून ही तयार झाली असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. अक्षर साधारण असले तरी काही ठिकाणी योग्य पाठ ठरविण्याच्या कामी ही उपयोगी पडली. विशेषतः सहाव्या प्रकरणाबाबत ही फारच उपयुक्त ठरली. हिचे एकूण १६६ बंद पाठपोठ आहेत.

(ई) पुणे प्रत—पुण्याहून आलेल्या सहाव्या प्रकरणाच्या या नकलेचा बराच उपयोग झाला. हिचे एकूण २४ बंद एका बाजूने लिहिलेले आहेत. फुलिस्केप कागदावरील या प्रतीतील अक्षर अलीकडील, पण वळणदार व सुवाच्य आहे.

काव्येतिहाससंग्रहकारांनी शककर्ते श्रीशिव छत्रपती महाराज यांचे सप्तप्रकरणात्मक चरित्र प्रसिद्ध करिताना उपरिनिर्दिष्ट प्रतींपैकीं सातारा व कोल्हापूर या प्रतींवरून मुख्यतः हे तयार केले. सातारा २ व कीर्तने प्रतींचा जेथे योग्य पाठ वाटला तेथे त्यांनी उपयोग केला आहे. ग्राह्य पाठ मूळ संहितेत घालून पाठांतरे पृष्ठांच्या तळटीपांत त्यांनी दिली आहेत. या सर्व प्रती जवळ असूनही

काही ठिकाणी अपपाठ व दुर्बोधता ही अपरिहार्य होती. चिटणीस, पुरंदरे, किबे व पारसनीस या प्रती कधी काळी उपलब्ध झाल्यास हे चरित्र निर्दोष होण्यास निश्चित मदत होईल.

या लेखनास कर्त्याने 'चरित्र' (१-१) 'प्रतापचरित्र' 'कथा' (७-४३) असे संबोधिले आहे. विविधज्ञानविस्तारकर्त्यांनी ते 'श्रीशिव छत्रपती महाराज यांचें सप्तप्रकरणात्मक चरित्र' या नावाने प्रसिद्ध केले. काव्येतिहासकर्त्यांनी तेच नाव कायम करिताना 'शककर्ते' हे साभिप्राय विशेषण योजून प्रसिद्ध केले. 'चिटणीस' बखर हे तिचे रूढ नाव आहे.

प्रस्तुत चरित्र प्रसिद्ध करिताना काव्येतिहाससंग्रहकर्त्यांनी पुढील बदल केले आहेत :—

(१) मूळ मोडी हस्तलिखितात विषयानुरोधाने कलमे नव्हती. विस्तारात हे चरित्र प्रसिद्ध करिताना रा. ब कीर्तने यांनी ती कलमे पाडिली. त्या प्रकारचीच कलमे यात आहेत; पण मागचा पुढचा संदर्भ लक्षात येण्यासाठी कलमास म्हणजे परिच्छेदास अंक दिले आहेत.

(२) मोडीत विरामचिन्हे नसतात. बाळबोध लिपीतल्या ग्रंथांत उभी रेघ किंवा रेघा देण्याचा प्रघात असे. मात्र यात विरामचिन्हे अर्थानुरोधाने दिली आहेत.

(३) चरित्रातील अपुरे शब्द किंवा वाक्ये पूर्ण करण्यासाठी तसेच पूर्वीचा संबंध लक्षात येण्यासाठी चौकटीच्या कंसांत पदरचे शब्द घातले आहेत. त्याशिवायही ग्रंथ वाचता येण्यासारखा आहे.

(४) मूळ हस्तलिखितात कित्येक शब्द विशिष्ट प्रकारे लिहिले आहेत. ती विकृत रूपे बाळबोधीत न देता त्यांची शुद्ध रूपे दिली आहेत. तथापि पाठांतरांत मुळातील रूपे ठेविली आहेत. यावरून कर्त्याने उपयोजिलेली रूपे कोणती ते ध्यानात येईल. उदा० आयुर्भाव (आविर्भाव), क्षेत्रधर्म (क्षत्रधर्म), वौंशी (वंशीं), आग्रह (आग्रह), द्रुष्टांत (दृष्टांत), यक (एक), चंदेरराव (चंदर, चंद्रराव), चेतुर (चतुर), येवनाचें (यवनाचे), शरीरसमंध (शरीरसंबंध), प्रकर्ण (प्रकरण), येत्न (यत्न), भये (भय) इत्यादी.

विषयानुरूप परिच्छेद, इतर प्रतींतील पाठभेद, अर्थनिर्णायक टीपा व अवांतर माहिती ही काव्येतिहाससंग्रहकर्त्यांच्या आवृत्तीची वैशिष्ट्ये होत. मोडी लेखक संकेतदर्शक तरि व विरोधदर्शक तरी यांत भेद करीत नाहीत. ही दोन्ही अव्यये

ते दीर्घान्तच लिहितात; पण या आवृत्तीत त्यांची शुद्ध रूपे दर्शविली आहेत. ओळीच्या शेवटी योग्य पदच्छेद, संस्कृतप्रमाणे ब्रह्म, ब्राह्मण यांतील ह्म, मराठी-प्रमाणे म्हणजे, म्हणून यांतील म्ह, तसेच इ, उ हे स्वर पदान्ती आल्यास दीर्घ केले आहेत. अकारान्त शब्दांचे उपान्त्य ऱ्हस्व इ, उ दीर्घ हवेत; पण ते विकल्पाने दिले आहेत. संस्कृतमधील क्वचित्, तस्मात् यासारखे व्यंजनान्त शब्द मराठीच्या लकबीप्रमाणे स्वरान्त ठेविले आहेत. त्याचप्रमाणे राहा, पाहा इत्यादी हकारान्त धातूची आद्याक्षरे तीच ठेविली आहेत.

काव्येतिहाससंग्रहकर्त्यांच्या इ. स. १९२४ च्या आवृत्तीची मूळ संहिता तशीच ठेवून परिच्छेदक्रमांक, त्यांची समर्पक शीर्षके, व्युत्पत्तीसह शब्दार्थ, ऐतिहासिक चर्चात्मक टीपा, कालपट, शिवचरित्राची रूपरेखा, शिवचरित्राची साधने, प्रस्तुत चरित्राचे ऐतिहासिक व वाङ्मयीन स्वरूप इत्यादी बाबी आम्ही स्वतंत्रपणे देऊन ही आवृत्ती सिद्ध केली आहे. सदर चरित्राची मूळ हस्तलिखिते व त्यांच्या नकला दुर्मिळ असल्याने काव्येतिहाससंग्रहकर्त्यांच्या आवृत्तीचे प्रामाण्य मानिले आहे.

ऐतिहासिक स्वरूप.

प्रस्तुत चरित्राची सुरुवात शककर्त्या युधिष्ठिरापासून असून इ. स. १६८० तील शिवाजीच्या मृत्यूपर्यंत त्यात हकीकत आहे. युधिष्ठिरापासून शिवाजीपर्यंत सार्वभौम राजांचा एकसारखा क्रम त्यात आढळतो. शिवदिग्विजयातही हाच क्रम दिसतो. सभासदाच्या बखरीत मात्र मालोजीपासून पुढील हकीकत दिली आहे.

आता ऐतिहासिकदृष्ट्या प्रस्तुत चरित्रातील घटनांची चर्चा करू :—

१. पहिल्या प्रकरणात युधिष्ठिरापासून पुलोमापर्यंत ज्या वंशावळी दिल्या आहेत, त्या विष्णुपुराणातल्याप्रमाणे असून त्यांत एखाददुसरे नाव गाळलेले व कित्येक ठिकाणी अशुद्ध नावे दिल्याचे राजवाडे म्हणतात. (ऐतिहासिक प्रस्तावना पृ. २२२). त्यांच्या मते मूळ पुराणांतील नावांच्या शुद्धतेविषयी संशय आहे. त्यातच बखरकारांनी व बखरी प्रसिद्ध करणारांनी त्या अशुद्धतेला साहाय्य केले आहे. चिटणीस व शिवदिग्विजयकार यांनी विष्णुपुराण पाहिले होते हे निश्चित. याशिवाय 'युगसंख्येची याद' व 'हस्तनापुरच्या राजांची याद' या दोन बखरींचा उपयोग त्यांनी केला होता. त्यांच्या बखरींत मुळातील चुकांची व घोटाळ्यांची पुनरावृत्ती झाली आहे. त्यांनी शूरसेनापासून पिठोर राजापर्यंतच्या

वंशावळी बहुशः काही पुराणांतून व काही रजपुतांच्या राजावलींतून घेतल्या असाव्या. शहाबुद्दिनापासून पुढील वंशावळी मुसुल्मानांच्या तवारिखांतून घेतलेल्या दिसतात. यवनी वंशावळी अचूक असतात असे नाही. (सदर पृ. २२३).

'शालिवाहन राजा शककर्ता' असा एक उल्लेख आहे. (१-२). यासंबंधी राजवाडे म्हणतात की, 'शकानें वर्षें मोजण्याचा प्रघात ज्या अर्थी शातवाहन राजांचा नसे त्या अर्थी शातवाहनाने विक्रमाला जिंकून दक्षिणेंत शातवाहन शक सुरू केला व नर्मदेच्या उत्तरेस विक्रमसंवत् चालता राहिला वगैरे दंतकथा शके १२२ पर्यंत म्हणजे इ. स. २०० वर्षेपर्यंत राज्य करणाऱ्या शातवाहनांच्या संबंधानें तरी निराधार आहेत असें म्हणावें लागतें.' (सदर पृ. २२५). या दृष्टीने 'नर्मदा दक्षिणतीरीं शालिवाहन शक' चालता झाला.' (१-२). हे मत भ्रामक अतएव निराधार म्हटले पाहिजे. त्याचप्रमाणे हस्तनापूर व दिल्ली येथील शेवटचे पिठोरादी हिंदू राजे यांचा शके ५१२ (५९०) मध्ये यवनांनी पराभव केल्याचे जे म्हटले आहे (१-२, ३ व ६) तेही अनैतिहासिक होय. कारण पिठोर राजाचा पराभव शके १११५ (इ. स. ११९३) मध्ये झाला होता. याचा अर्थ असा की, चरित्रकाराने केवळ इ. स. ७८ ते इ. स. ५९० पर्यंतचा व तोही चुकीचा मजकूर लिहिला व पुढील ६०३ वर्षांची म्हणजे इ. स. ५९० ते ११९३ या काळातील हकीगत गाळली. इतकेच नव्हे तर पुढील काळातील 'अकबरशाहा व शाहाजाहां असे बहूत जाले' असा उल्लेख करून (१-३) मधल्या काळातील पठाणवंशीय सुलतानांचीही हकीकत गाळली. त्यामुळे त्या काळातील समकालीन व त्या काळात न झालेल्या राजांची सरमिसळ केली. कीर्तने प्रतीत 'शक ५१२ साधारण नाम संवत्सर' असे आहे. परंतु राजवाडे सांगतात की, त्या साली 'साधारण संवत्सर नव्हता.' त्यांच्या मते हा ५१२ चा आकडा यादीकारांनी रमलशास्त्राच्या 'अर्कबाणे च शाके च शालिवाहनकः शकः । पैगंबरादि विख्यातो प्रारंभो यवनोदयः' या अशुद्ध श्लोकावरून (अर्क=१२ व बाण=५, एकूण ५१२) घेतला व त्या सालात यवनांचा उदय झाल्याचे चुकीने लिहिले. 'पैगंबर व सुलतान रुकनदीन यांणीं विचार करून...पिठोर राजे याशीं युद्ध केलें' असे मल्हार रामराव सांगतात (१-३) तर शिवदिग्विजयकार 'फकीर व शहाबुद्दीन गोरी' ही नावे देतो (शि. दि. शके १८१७ पृ. १७-१८). म्हणजे बखरकारांनी ५१२ शकात पिठोर राजाचा पराभव, त्याचा विजेता रुकनदीन किंवा शहाबुद्दीन

व (महंमद) पैगंबराचा उदय या तीन गोष्टी दिल्या. वस्तुतः पिठोर राजाचा पराभव शहाबुद्दीन याने इ. स. ११९३ मध्ये केला व शके ५१२ (इ. स. ५९०)त हिजरी सन सुरूही झाला नव्हता. या संदर्भात वरील गोष्टी इतिहासदृष्ट्या बरोबर नाहीत. याप्रमाणे शके ५१२ (इ. स. ५९०) सालांतील दिलेल्या घटना त्या सालात मुळीच झाल्या नाहीत. (ऐ. प्र. पृ. २२८). चिटणिसांनी दिलेली एकलिंगजीची कथा (१–६) ही आठव्या शतकातील बाप्पा रावळासंबंधी खरी आहे. ती पिठोर राजापूर्वीची आहे हेही खरे आहे. रुकनदीन अमीराचे नाव टॉडच्या ग्रंथात पहिल्या खंडाच्या चवथ्या परिशिष्टात आढळते. हा लेख ज्या अर्थी ६६२ हिजरीतला (शके ११८७) आहे, त्या अर्थी रुकनदीन–पिठोर हे युद्ध असंभवनीय ठरते. (सदर पृ. २३०).

लक्ष्मणसिंहजी महाराणा याची स्त्री पद्मिणी असा उल्लेख आहे. (१–६). पण ती भीमसिंगाची पत्नी होती. लक्ष्मणसिंह अल्पवयी असल्याने त्याचा चुलता भीमसिंग हा कारभार पाहत होता. या संदर्भात दिल्लीच्या पादशहाची –अल्लाउद्दिनाची–चितोडवर शके १०१२ (इ. स. १०९०) मधील स्वारी अनैतिहासिक होय. कारण ही स्वारी इ. स. १३०२ मध्ये झाली होती. अल्लाउद्दिनाने चितोड घेतल्यावेळी सजणसिंह हयात होता हे चरित्रकाराचे म्हणणे बरोबर असले तरी सजणसिंहापासून चौथा पुरुष भोसाजी शके १२०० (इ. स. १२७८) मध्ये दक्षिणेत आला हे अर्थातच चूक आहे. चिटणिसांनी शिवाजीचा म्हणजे भोसल्यांचा मेवाडच्या सिसोद्यांशी जो संबंध दाखविला आहे (१–७) तो ऐतिहासिक, शारीरिक व वांशिक हरकतीमुळे निराधार ठरतो असे राजवाडे म्हणतात. (सदर पृ. २३२). इतकेच नव्हे तर सजण-सिंहापासून कर्णसिंहापर्यंतची चिटणिसांनी दिलेली वंशावळ (१–७) कृत्रिम असल्याचेही ते म्हणतात. या वंशावळीत सजणसिंहापासून बाबाजी (बाबजी) पर्यंत पंधरा पुरुष आहेत. बाबाजी शके १४५५ विजयनाम संवत्सरी (इ. स १५३३) त जन्मला. दर पिढीला २६ वर्षे धरिली तर सजणसिंहाचा काल शके १०६२ (इ. स. ११४० हा येतो. परंतु सजणसिंह शके १२२५ (इ. स. १३०३) च्या सुमारास हयात असल्यामुळे उपरिनिर्दिष्ट दोन्ही सन त्याला लागू पडत नाहीत. तात्पर्य, या वंशावळी अविश्वसनीय होत. (सदर पृ. २३३).

मालोजीस देवी भगवतीचा दृष्टांत शके १५२५ (इ. स. १६०३) त झाला असे जे आहे (१–१०) ते टाकाऊ धरिले पाहिजे. हा दृष्टांत शके १५१५

विजयनाम संवत्सरी माघ शुद्ध १५ भानुवासरी झाला असे शिवदिग्विजयकार म्हणतो (श. दि. पृ. ३३) ते खरे दिसते; कारण त्या दिवशी रविवारच होता. (ऐ. प्र. पृ. २३३). शके १५४१त शहाजी राजे यास वजिरी सांगितल्याचे बखरनवीस म्हणतो (१–१२); पण त्या साली म्हणजे इ. स. १६१९त मलिकंबर वजीर असल्याने शहाजीस मनसबदारीचीच तेवढी वस्त्रे मिळाली असली पाहिजेत. (सदर पृ. २३५). मलिकंबर मोगलांच्या विरुद्ध होता. या दृष्टीने दिल्लीच्या फौजेस 'सामोरे जाऊन' हे त्या संबंधीचे विधान (१–१४) इतिहासास धरून नाही. माहुलीच्या लढाईनंतर शहाजी राजे विजापुरास 'शके १५४८ यांत निघोन चालले.' (१–१४). माहुलीची लढाई इ. स. १६३६ च्या ऑक्टोबरात झाली म्हणजे शहाजी त्या सुमारास गेला असे सिद्ध होते. मात्र मलिकने शहाजीची जागीर काढून घेतली तेव्हा म्हणजे शके १५४८ (इ. स. १६२६) त तो प्रथम विजापुरास गेला. माहुलीच्या युद्धाच्या संदर्भात हे साल बरोबर नाही. शिवाजीचा जन्मकाल 'शके १५४९ प्रभव नाम संवत्सरे वैशाख शुा २, गुरुवारीं असा दिला आहे (१–१६); परंतु त्या सालच्या वैशाख शुद्ध द्वितीयेस गुरुवार नसून शनिवार होता. (ऐ. प्र. पृ. २३६). शके १५५१ (जेधे शकावली) हे साल अलीकडे सिद्ध झाले आहे. (पाहा-प्रकरण १ टीप १६).

२. दुसऱ्या प्रकरणात सईबाई ही शिर्के यांची कन्या असून तिचे लग्न शिवाजीशी विजापुरास झाल्याचे चिटणीस म्हणतात (२–५); पण सईबाई ही निंबाळकरांकडील असून तिचे लग्न पुण्यास झाले होते. (सभासद; शककर्ता शिवाजी पृ. २३). 'अलमगीर' हे शहाजहानास म्हटले आहे. (२–६, १९). वस्तुतः ते औरंगजेबाचे नाव होते. चरित्रकार म्हणतात की, औरंगजेबास 'अमदाबादेचे सुभ्यावर फौज देऊन रवाना केलें.' (२–६). वस्तुतः गुजरातच्या सुभ्यावर जाण्यापूर्वी औरंगजेब प्रथम दक्षिणच्या सुभ्यावर होता. गुजराथच्या सुभ्यावर तो इ. स. १६४५ ते इ. स. १६४७ पर्यंत होता. नंतर त्याची नेमणूक अफगाणिस्तानावर झाली. त्यानंतर इ. स. १६४८ पासून मुलतानच्या सुभ्यावर तो होता. पुढे इ. स. १६५३ च्या जानेवारीत तो पुनः दक्षिणेत आला. (श. शि. पृ. ४९). सुपे येथील हवालदार बाजी मोहिते (२–१२) याबद्दल संभाजी मोहिते असे हवे. (सभासद). शिवाजीची कोकणावरील स्वारी (२–१४) ही जावळी प्रकरणा (२–२६) पूर्वी दिली आहे; पण ती नंतर हवी. (श. शि. पृ. ४२ व ५०). शृंगारपूर (इ. स. १६६१) घेतल्याची हकीकत

(२–१४) संभाजीच्या जन्मा (इ. स. १६५७) (२–२९) अगोदर दिली आहे; पण ती नंतर हवी. (शं. ना. जोशी–छत्रपती शिवाजीराजे यांची बखर, १९६० पृ. ११८). सुलतान सिकंदर पादशाहा मागून 'अली इदलशहा पादशाहा जाले' (२–२१) हे बरोबर नसून मुहंमद आदिलशहानंतर अली आदिलशहा (दुसरा) व त्यानंतर शिकंदर आला. (सरकार—शिवाजी पृ. ३४, ४८ व १९०). शिवाजी आग्र्यास जाऊन येण्या (५–३६) पूर्वी तानाजीने कोंडाणा सर केला (२–२६). परंतु शिवाजी आग्र्याहून जाऊन आल्यानंतर इ. स. १६७० मध्ये कोंडाणा सर झाला. (सरकार–शिवाजी पृ. १६३). पुरंदर घेण्याअगोदर नगरचा पुरा मारिल्याचे वर्णन आहे. (२–२२). वस्तुतः तो नंतर मारिला. (सदर पृ. ४९,५० व ३८१). चंद्रराव (२–२६) हे नाव नसून घराण्याचा किताब होय. (श. शि. पृ. २०९). समर्थ भेटीनंतर (इ. स. १६४९) 'महाराज प्रतापगडी येते जाले.' (२–३८). पण प्रतापगड यावेळी अस्तित्वात नव्हता. (ऐ. प्र. पृ. २७५).

३. तिसऱ्या प्रकरणांत अफजलखान तुळजापुरास आल्यावर तेथील 'देवी भोपे यांणीं पळविली.' (३–३). परंतु खानाने 'तीस फोडून, जातियांत घालून, भरडून पीठ केलें.' (सभासद). तुळजापुराहून खान 'पंढरपुरीं आले.' (सदर). रियासतकार म्हणतात की, खान प्रथम पंढरपुरास व नंतर तुळजापुरास गेला. (श. शि. पृ. ६६). यदुनाथ सरकारांचेही तेच मत आहे. (शिवाजी पृ. ६१). 'खानांनींच अगोदर दगा व पुरुषार्थ केला.' (३–२०). डॉ. फ्रायर, स्कॉट, डफ व बुंदेल्याची बखर यांत शिवाजीने दगा केल्याचे म्हटले आहे. यासंबंधी जेधे शकावलीत 'भेटी समई येकांगी करून अफजलखान जिवे मारिला' असे आहे. येकांगी करून म्हणजे द्वंद्वयुद्ध (पृथकयुद्ध) करून. हा अभिप्राय मान्य होण्यास प्रत्यवाय नाही. दोघांची मने मोकळी नव्हती हेच खरे.

अफजलखानाच्या वधानंतर त्याचा पुत्र फाजलखान (प्रमुख) व सिदी जोहर (दुय्यम) असे पादशाहाने पाठविले. (३–२६). रियासतकारांच्या मते सिदी जोहर हा प्रमुख असून फाजलखान हा दुय्यम होता. (श. शि. पृ. ७५). सिदी जोहरने पन्हाळ्यास वेढा दिल्यावर महाराज 'आपण खासा निघोन किलियावरून रांगणा किल्ला येथें चालले. (३–२६). वस्तुतः यावेळी महाराज खेळण्यास (विशाळगडास) गेले. (९१ कलमी बखर, कलम ३९–भारतवर्ष प्रत). अब्दुल करीमखान व बहलोलखान या दोन व्यक्तींचा उल्लेख आढळतो. (३–२९). परंतु ही एकाच व्यक्तीची नावे होती. (श्रीशिवछत्रपती पृ. ४२६). शिवाप्पा

नाईक बिदनूरकर यांनी शिवाजीच्या बसरूरच्या स्वारीच्या वेळी (इ. स. १६६५) तह केल्याचे चिटणीस सांगतात. (३–३६). पण शिवाप्पा यापूर्वीच म्हणजे इ. स. १६६० मध्ये मरण पावला होता. (सरकार–शिवाजी पृ. २२२). राजारामाच्या जन्माचे साल शके १५८३ असे दिले आहे. (३–३७). वस्तुतः तो शके १५९१ (इ. स. १६७०) मध्ये जन्मला. (जे. श. सरकार–शिवाजी पृ. ३८४, स्थिरबुद्धी राजाराम पृ. १७).

शिवाजीने सुरतेवर स्वारी (दुसरी) केल्याचे चरित्रकार लिहितात. (३–४३). त्याच्या पहिल्या स्वारीचा (इ. स. १६६४) उल्लेख करीत नाहीत. ते ही दुसरी स्वारी (इ. स. १६७०) शिवाजी आग्र्याहून येण्यापूर्वी देतात. खरे पाहत ही नंतरची होय. (सरकार–शिवाजी पृ. ३८४). या सुरतेच्या स्वारीनंतर शिवाजीने प्रबळगड घेतल्याचे वर्णन आहे. (३–४४); परंतु तो इ. स. १६५६ अगोदर घेतला होता. (पेशवे दप्तर खंड ३१–२४ अ). 'जालनापूर झांबाडून' (३–४५) ही घटना पुढील कालांतील म्हणजे इ. स. १६७९ मधील जालनापूरची स्वारी होय. (सरकार-शिवाजी. पृ. ३८८).

४. चौथ्या प्रकरणातील श्रावणमासातील दक्षिणा (४-२०) व गारद (गारदी) पायदळ, कवायती (४-२२) हे उल्लेख पेशवेकालातील होत. चिटणिसांचा हा असंबद्धकालनिर्देश आहे.

५. पाचव्या प्रकरणात शिवाजी शायिस्ताखानाच्या गोटात शिरल्यावेळी 'भाद्रपद मास' असल्याचे मल्हार रामराव म्हणतात. (५-४); पण तो चैत्र मास होता. (जे. श.). शहाजी बोदेकीर येथे मरण पावला. (५-९) त्याऐवजीं 'होदिगे (गि) रे' असे हवे. (श्रीशि. छ. पृ. ३५२). महाराजांवर 'दोन सुभे दिल्लीचे आले.' (५-११). वस्तुतः हे सुभे महकूबसिंग, एखलासखान व शायिस्ताखान असे तीन होते. जयसिंगाने शिवाजीकडे सख्याचे अनुसंधान लावण्यासाठी वकील पाठविला (५–१२); परंतु जयसिंग हा उदासीन असून शिवाजीने शरणागती पत्करल्याशिवाय त्यास भेटण्यास तयार नव्हता. (सरकार शिवाजी पृ. १२०). जयसिंगाने दिलेरखानास भेटण्यासाठी महाराजांबरोबर सुभानसिंग मामा दिल्हे.' (५–२०). येथे सुजनसिंग बुंदेला असे पाहिजे. जयसिंग दक्षिणेत येताना त्याजबरोबर औरंगजेबाने यास दिले होते. (आलमगीरनामा ८६८). उत्तरेत (आग्र्यास) जाताना शिवाजीने राजारामास देशी ठेविले (५–२६); पण राजारामाचा जन्म पुढे ४ वर्षांनी म्हणजे इ. स. १६७० त

झाला. (जे. श.). औरंगजेबास भेटण्यासाठी महाराज 'मथुरेस पावले' (५--२६) व तेथून 'दिल्लीस गेले' (५–२७). खरे पाहता या वेळी बादशहाचा मुक्काम आग्र्यास होता. (सदर). आग्र्याहून सुटका झाल्यावर महाराज महाराष्ट्रात म्हणजे 'दक्षिणमानसीं सुरक्षित वीस बेवीस महिनियांत पावले'. (५–३६). हे विधान बरोबर नाही. कारण शिवाजीचे आग्र्यास प्रयाण इ. स. १६६६ च्या मार्च ५ रोजी झाले व त्याचे रायगडास आगमन त्या वर्षाच्या सप्टेंबर १२ रोजी झाले. म्हणजे त्यास एकूण सहा महिने लागले. (सरकार–शिवाजी पृ. १५५–१५७). विजापूरच्या सैन्याची सरनोबतांच्या फौजेशी 'उंबरटी' येथे गाठ पडली. (५–४९); येथे 'उमराणी' असे हवे. (सदर पृ. १९२).

६. शिवाजीच्या राज्याभिषेका [इ. स. १६७४] नंतर दक्षिणदिग्विजय (इ. स. १६७७) झाला असल्याने सहावे प्रकरण हे कालानुक्रमाच्या दृष्टीने शेवटी पाहिजे. (पाहा–टीप, दक्षिणदिग्विजय). शेरखान (६-१२) व नसीर महमदखान (६–१३) या संबंधीच्या घटना उलट दिल्या आहेत. (पाहा—टीप, नासर महमदखान). त्रिवादी येथे शालिवाहन शके १५९५ मध्ये शिवाजीच्या अंगी भवानी संचारल्याचा उल्लेख (६–१७) राज्याभिषेकापूर्वीचा असल्याने बरोबर नाही. 'निराजीपंत तेथे (भागानगरास) ठेविले होते' (६–२३); परंतु सभासद म्हणतो की, प्रल्हाद निराजी हा भागानगरी असून 'निराजीपंत बहादुरखानाजवळ ठेविले होते.'

७. सातव्या प्रकरणात समर्थांच्या आज्ञेने मराठ्यांनी एकमेकांस वंदन करिताना 'जोहार'ऐवजी 'राम राम' म्हणण्याची चाल पडल्याचे म्हटले आहे. (७–२८); पण या कालापूर्वीही 'राम राम' व नंतरही 'जोहार' असे प्रघात होते. (शिवकालीन पत्रसारसंग्रह क्रमांक १९०१ व भारत इतिहाससंशोधक मंडळ इतिवृत्त ३८ पृ. ६). टीप २८ पाहा.

उपरिनिर्दिष्ट बाबींस अन्यत्र ऐतिहासिक उपोद्बलक पुरावा नसल्यामुळे त्या ग्राह्य मानिता येणार नाहीत. त्याचप्रमाणे मेवाडच्या राजपुत्रास झालेला सांबाचा दृष्टांत (१-६), मालोजीस साक्षात्कार (१-१०), शहाजीस स्वप्नगत दृष्टांत (१-१६), शिवाजीस दृष्टांत (२-२०), पांडुरंगाने शिवाजीचे घेतलेले रूप (२-३२), सूर्याजी ठोसरास ब्राह्मणरूपाने सूर्याचा व रामचंद्राचा दृष्टांत तसेच रामदासास पंचवटीस रामचंद्रदर्शन व मारुतीचा साक्षात्कार (२-३३), शिवाजीस रामदासांचे स्वप्नगत दर्शन (२-३५), श्रीच्या तुऱ्याचे मस्तकीहून घरंगळणे

(२-३८), अफजलवधापूर्वी व नंतर शिवाजीस देवीचा दृष्टांत (३-६ व २५), शिवाजीस श्रीचे दृष्टांत (३-३५; ४-२; ४-११; ५-३४; ६-११ व १७), शिवाजीचे भविष्य (७-४०) आणि शिवाजीच्या देहावसानानंतर दुश्चिन्हे (७-४१) ह्याही इतिहासदृष्ट्या प्रमाण मानिता येणे कठीण आहे.

राजवाड्यांच्या मते सप्तप्रकरणात्मक चरित्र, सभासदी बखर व शिवदिग्विजय 'ह्या तीन बखरींत मोठी उणीव म्हटली म्हणजे बहुतेक प्रसंगांचा शक ह्या बखरींत दिलेला नाहीं. 'नंतर', 'पुढें,' वगैरे शब्दांनींच प्रसंगांचें पौर्वापर्य निश्चित करावयाचें आहे. वस्तुतः प्रसंग जसजसे घडले तसतसें वर्णन ह्या बखरनविसांनीं केलें असतें म्हणजे 'नंतर', 'पुढें' वगैरे शब्दांपासूनहि कालाचा बोध, दोन चार महिन्यांच्या चुकीनें, करून घेतां आला असता. परंतु पूर्वापार संगतीनेंच प्रसंग ह्या बखरींत वर्णिले आहेत असें निश्चयानें म्हणवत नसल्यामुळे प्रसंगांच्या कालाचें पौर्वापर्य केवळ अंतःप्रमाणावरून निश्चित करता येत नाहीं. तेव्हां पत्रें, यादी वगैरे बहिःप्रमाणांचा आधार घेऊन जो कालनिर्णय होईल तेवढाच खरा मानून स्वस्थ बसलें पाहिजे, व ह्या कालनिर्णयाच्या आधारावर मागील व पुढील प्रसंगांचा धरमधोक्यानें कालनिर्णय केला पाहिजे. पुढें इतर विशिष्ट बहिःप्रमाण सांपडल्यास ह्या धरमधोक्यानें ठरविलेल्या कालनिर्णयांत थोडाफार फेरबदल होण्याचा संभव असतो, परंतु, बखरींतील मजकुराच्या कालनिर्णयासंबंधीं निश्चयात्मक, चोख व विश्वसनीय विधानें करण्याची ही अशी अडचण असल्यामुळें, प्रसंगांच्या कार्यकारणभावाचा अर्थात् काहींच निर्णय करतां येत नाहीं. प्रसंगांचा कार्यकारण-भाव व पौर्वापर्य अनिश्चित राहिल्यामुळें त्या प्रसंगांची उपयुक्तता व महत्त्व हीही नीट ध्यानांत येत नाहींत...(ऐतिहासिक बोध) करून देण्याचा आव घातला तर असंभाव्य गप्पांचें समर्थन केल्याचें श्रेय मात्र पदरीं पडतें. ह्या दोषाला शिवाजीचा प्रत्येक मराठी इतिहास व चरित्र पात्र झालेलें आहे हें तर स्पष्टच आहे.' (ऐ. प्र. पृ. २५६). या बाबतीत स्वतः राजवाड्यांनींच सुचविलेला मार्ग उपयुक्त ठरेल. तो असा की, 'बखरींत लिहिलेल्या प्रत्येक गोष्टीचा, संदिग्ध शब्दाचा व मित्तीचा शेवटपर्यंत छडा लावीत गेलें पाहिजे'. (सदर पृ. २४३).

प्रस्तुत चरित्रासंबंधी राजवाड्यांचा अभिप्राय असा की, 'वडिलार्जित कारकीर्दी, दिनचर्या, शिवाजीनें पाठविलेलीं व शिवाजीला आलेलीं अस्सल पत्रें व नकला ह्यांचा उपयोग मल्हार रामरावानें केला होता. परंतु सामुग्रीच्या महत्त्वाच्या मानानें मल्हाररावानें शिवछत्रपतींचें चरित्र मोठें नामांकित लिहिलें

आहे असें नाहीं. ह्याचें कारण, महाराष्ट्रांतील त्या वेळच्या विद्येचें मान होय. प्रमाण काय, अप्रमाण काय, मिळालेल्या साधनांचा यथास्थित, चोख व साद्यंत उपयोग कसा करून घ्यावा व कां करून घ्यावा वगैरे गोष्टींच्या अज्ञानामुळें मल्हार रामरावाचें चरित्र जसें वठावें तसें वठलें नाहीं. ग्रँट डफ मल्हाररावाच्या चरित्राला Voluminous म्हणून विशेषण देतो. परंतु माझ्या मतें हें चरित्र बरेंच त्रोटक आहे. अशी जरी या चरित्राची योग्यता आहे, तरी ग्रांट डफच्या ग्रंथांतहि न सांपडणाऱ्या अशा कांहीं गोष्टी मल्हाररावाच्या चरित्रांत सांपडतात ...मल्हार रामराव चिटणीसकृत चरित्राचा इतिहासकाराला बराच उपयोग होईल ह्यात संशय नाहीं. निदान ह्या चरित्रापासून नाना प्रकारच्या शंका घेण्यास अवकाश होईल हें खास आहे.' (सदर पृ. २१९).

यदुनाथ सरकारांनी या चरित्राला 'Rejected' (त्याज्य) असा शेरा मारिला आहे (सरकार–शिवाजी पृ. ३७८) तर प्रा. शेजवलकरांनी याचा दुय्यम दर्जाचा साधनग्रंथ म्हणून उल्लेख केला आहे. (श्रीशि. छ. पृ. ५९६). रियासतकार म्हणतात–'बखरी सर्वथा त्याज्यही नाहींत व सर्वथा ग्राह्यही नाहींत. म्हणजे फिरून त्यांच्या खरेपणाची कसोटी प्रत्यंतर पुराव्यावर व लेखकांच्या भावनेवरच अवलंबून राहणार...श्रीशिवाजीप्रताप बखर ही चिटणिशी बखरीचें ऱ्हस्व स्वरूप असून चिटणीस घराण्यांतूनच आलेली दिसते. एकंदरींत शास्त्र या दृष्टीनें इतिहासाचा अभ्यास करूं इच्छिणारांनीं सर्व साहित्य काळजीपूर्वक वाचून आपापले अभिप्राय बनवावे हेंच इष्ट होय. (शहाजी राजे भोसले, प्रास्ताविक, पृ. १३).

सदर चरित्राच्या ऐतिहासिक प्रामाण्याबद्दल मनात संशय निर्माण झाला तरी चिटणीसासारख्या छत्रपतींच्या पदरी असलेल्या व्यक्तीने अनेक साधनांच्या आधारे हे चरित्र लिहिले आहे हे महत्त्वाचे होय. या चरित्रातील अस्सल पुराव्याने खोटा ठरलेला मजकूर त्याज्य मानिला तरी इतर मजकूर खोटा ठरेपर्यंत खरा मानणे योग्य होईल. त्या मजकुराला निदान संशयाचा फायदा मिळणे रास्त ठरेल. माहितगार व्यक्तीने लिहिलेले हे चरित्र त्यातील दोष मान्य करूनही विश्वसनीय मानण्यास प्रत्यवाय नाही.

वाङ्मयीन स्वरूप.

मराठी बखरलेखन हे इतिहासाच्या भूमिकेने झाले असल्यामुळे अर्थातच

ते सहेतुक आहे. वाङ्मयाची भूमिका नसूनही त्यात वाङ्मयीन गुणांचे अस्तित्व दिसून येते हे विशेष. याचे प्रमुख कारण म्हणजे ऐतिहासिक व्यक्ती, प्रसंग वा वस्तू यासंबंधी बखरकारांना वाटणारी आत्मीयता. स्वकीयांच्या पराक्रमकथा या भावनेच्या समाधानाकरिताच लिहिल्या गेल्यामुळे त्यांत रंजकता अपरिहार्यपणे निर्माण झाल्यास नवल नाही. इतिहासातील प्रसंग वा व्यक्ती यांजवर त्याची दृष्टी पडल्याबरोबर बखरकार जसा स्वतः रंगून जातो तसा इतरांनाही आपल्यासारखेच रंगविण्याचा प्रयत्न करिताना दिसतो. बखरलेखन हे आज्ञेने झाले असल्याने ते सजविण्यासाठी तो पराकाष्ठा करितो. वर्ण्यविषयासंबंधी वाटणाऱ्या जिव्हाळ्यामुळे बखरींतील चित्रणे जिवंत उतरली आहेत. म्हणूनच त्यांत चित्रगुण (pictorial value) आढळतो. यास मल्हार रामराव चिटणीस हे अपवाद नाहीत.

प्रस्तुत बखरीत आकर्षक **व्यक्तिवर्णने** आहेत. उदाहरणार्थ, शहाजीने शिवाजीस विजापुरी नेल्यावर त्यास शिवाजी कसा दिसला ते सांगताना बखरकार सांगतात—'जैसे गुण ऐकिण्यांत आले त्याहून अधिक गुणवान व बोलणें मसलतींत अकस्मात बहूत चमत्कारिक बोलावें, विद्याभ्यास जो करविला तो शीघ्र आणि प्रयास न करितां साध्य व्हावा, स्वरूपें करून सुंदर, शरीरपाटव्य फार चांगलें, सुदृढ, लक्षणवान दौलतीचे ठायीं हत्ती, घोडे, सर्वकाळ कारखाने पाहाणें, कारभारी थोर माणसें शाहणीं यांस माहितगारी विचारणें, त्यांचे सन्मान करणें व चौकशी करणें, लघू मनुष्यें व दुर्गुणी यांचा त्रास करून त्यांची संगती न करणें, दुर्व्यसन कांहीं एक नाहीं, विशाल नेत्र, आजानुबाहू, वयें अल्प असोन प्रौढीनें चालतात.' (२–३). यातील 'विद्याभ्यास जो करविला' या वाक्यात शहाजीचे पितृकर्तव्य सूचित झाले आहे, तर 'वयें अल्प असोन प्रौढीनें चालतात' या वाक्यात विरोधाभास सूचित झाला आहे. या वर्णनात शिवाजीचे व्यक्तिगुण व शरीरगुण यांचा सुंदर समन्वय साधलेला दिसतो. 'औरंगजेब बालत्व असतां परम क्रूर व पराक्रमी. शरीरही मोठें, दराज; मनसबादार, बहूत उद्दाम, दैत्यांश, उग्र, असे शूर प्रौढ होते जाले.' (२–६). हे औरंगजेबाचे वर्णन असेच आहे. विजापुरच्या दरबारात अफजलखानाने केलेल्या 'शिवाजीचा मजकूर इतका कशास पाहिजे ? आपणास आज्ञा करावी म्हणजे जाऊन धरून आणितों. किंवा मारून टाकितों'. (३–२). या प्रतिशेत खानाचा आत्मविश्वास परिणामकारक रीतीने व्यक्त झाला आहे. दक्षिण-

दिग्विजयप्रसंगी व्यंकोजी राजे शिवाजीस भेटण्यास आले असता 'नम्रत्वें बोलोन वांटियाचे बोलणें न करितां, सारेंच आपण खावें ऐसा चित्तीं निश्चय धरिला.' (६-१५). यातील 'नम्रत्वें बोलोन' या शब्दसंहतीला 'वांटियाचें बोलणें न न करितां' याचा छेद देऊन 'सारेंच आपण खावें' हा त्याला दुसरा पूरक छेद देऊन 'ऐसा चित्तीं निश्चय धरिला' यात त्याचे पर्यवसान झाल्याने हे वर्णन प्रभावी ठरते व या पार्श्वभूमीवर पुढे 'यांसि धरावें, वाटा घ्यावा, तरि [ही] गोष्ट थोरपणाचे इजतीमध्यें लायख नाहीं.' (सदर). हा शिवाजीचा थोर विचार विरोधीपद्धतीने विशेष उठून दिसतो. शायिस्तेखानाच्या पारिपत्यानंतर औरंगजेबाने काढलेल्या 'शिवाजी बडा सैतान पैदा हुवा, जें कोण्हीं आजपर्यंत कर्म न केलें, तेंच करितो.' (५-८) या उद्गारात त्याची अगतिकता व शिवाजीची धडाडी ही एकसमयावच्छेदेकरून प्रतिबिंबित झाली आहेत.

या बखरींतील **प्रसंगवर्णने** कशी उठावदार आहेत ते पाहा :—अफजल-शिवाजी भेटीचे वर्णन करिताना लेखक म्हणतो की, 'चार नजरा होतांच खानांनीं वकिलास पुसिलें 'राजे हेच कीं काय?' कृष्णाजीपंतांनीं 'हेच' ऐसे बोललियावरि महाराजानींही पंताजीपंतास विचारिलें 'खान हेच कीं काय?' त्यांनीं 'हेच' म्हणून उभयतांनीं उभयतां एकमेकांस खरें करून भेटीस पुढें होतांच, खान शरिरें करून मोठे उंच दराज होते. महाराज केवळ द्वितीयेचे चंद्रासारखे. खानांनीं भेटण्यांतच हातीं धरून पुढें वोढून घेऊन डावे हाताखालीं दाबून धरिले, आणि हातीं तरवार कटार होती ते कटार चालविली. तेसमयीं महाराजांचे आंगांत जिरे होती, आंग चपळाईनें चोरून घेतांच वार कायम न जाला. खानांनींच अगोदर दगा व पुरुषार्थ केला, फार चांगलें जालें, म्हणून हातांत वाघनखें होतीं त्या हातानीं बहूत जलदी करून पाठीमागून हात पोटावरि चालविला. झगा बारीक होता. व पोटलाही मोठा [होता.] वार कारागार होऊन लागलींच आंतडीं बाहेर आलीं...तरवारीचा वार खांद्यावर केला. त्यानीं पोटापर्यंत वार जाला. खान पुरे होऊन मुर्दा पडला.' (३-२०). या वर्णनात 'राजे हेच कीं काय?' या खानाच्या प्रश्नाला 'खान हेच की काय?' हे शिवाजीचे प्रश्नात्मक उत्तर त्याच्या व्यक्तित्वावर चांगलाच प्रकाश पाडते. 'खान शरिरें करून मोठे उंच दराज होते. महाराज केवळ द्वितीयेचे चंद्रासारखे' हा विरोधाभास हृद्यच वाटतो. 'खानांनींच अगोदर दगा व पुरुषार्थ केला' या ठाम विधानाने शिवाजीच्या पुढील नैतिक भूमिकेला योग्य पुष्टी

मिळाली आहे. खानाचा 'झगा बारीक' व 'पोटलाही मोठा' या शब्दसंहतीं-वरून शिवाजीच्या वाघनखाच्या हाताचे अपेक्षित पर्यवसान चटकन ध्यानात आल्याशिवाय राहत नाही. त्याचप्रमाणे 'तरवारीचा वार खांद्यावर केला' याचा इष्ट परिणाम 'पोटापर्यंत वार जाला' ही स्पष्ट कल्पना येऊन त्याचे पुनः अपेक्षित पर्यवसान 'खान पुरे होऊन मुर्दा पडला' या शेवटच्या वाक्यात झाल्यामुळे हा प्रसंग मनावर ठसतो. या वर्णनातील कल्पनांचा चढता क्रम सदर प्रसंगाच्या निवेदनशैलीचा आत्माच होय.

शिवाजी-शहाजीच्या भेटीचा प्रसंगही असाच उत्कृष्ट आहे. चरित्रकार लिहितो की, 'शाहाजी महाराज पालखींत बसलियावरि, आपण पायउतारा, जोडा न घालितां, पालखी धरून बहूत मर्यादेंकरून लष्करांत डेऱ्यास आले. [महाराज] बसलियावरि, पुढें [राजे] उभे राहिले. ते समयीं महाराज यांणीं [शिवाजी राजे यांस] पुढें जवळ घेऊन बहूतच आनंद [युक्त] व संतोषी होऊन दान धर्म करिते जाले. आणि "श्रीचा वर पूर्वीं जाला तेच पुत्र तुम्ही; जगविख्यात पराक्रम केलात;धर्म-रक्षक तुम्ही निर्माण जालां; तुमचे योगें सर्व कूळ धन्य जालें! सिसोदे यांचे कुळांत निर्माण जालां. त्यांचे धर्म ते पालन तुम्हीं करून या प्रांतीं आलों असतां पुन्हा कुलाचा उदय केलात!!" म्हणोन बहूत गौरवून बोलले असतां [राजे] उठोन नमस्कार करून "सर्व प्रताप स्वामींचे पुण्याचा व चरणांचा. स्वामींचे आशीर्वादें, आज्ञेनें करणें तें केलें!" म्हणोन बहूत विनतीनें व नम्रपणें बोलले.' (४-३९). या प्रसंगातील पावित्र्य व गांभीर्य ही समुचित शब्दांत व्यक्त झाली आहेत हे निर्विवाद.

सुबक **वस्तुवर्णने** हा या चरित्राचा एक विशेष होय. शिवराज्याभिषेकाच्या वेळी सिंहासनसभा कशी केली ते बखरकार निवेदन करतो—'तेथें क्षीरवृक्षांची वेदी वट, औदुंबर यांची करावी तशी करून, त्या ठोकळ्यास सुवर्णें करून तगडें मढून रत्नखचित केलें. प्रमाण आहे तसें केलें. त्याजवरि चित्रें प्रथम वोळ वृषभांचीं, त्याजवर मार्जार [यांची,] त्याजवरि तरसांचीं, त्याजवरि सिंहांचीं, त्याजवरि व्याघ्रांचीं. ऐशीं एक बाजूस आठाप्रमाणें बत्तीस बत्तीस चित्रें चहूंकडे मिळोन काढून [ठेविलीं.] त्यास सिंहासन ऐसें म्हणावें. तसें सिद्ध केलें होतें. ७-१९). या वर्णनात एक विशिष्ट क्रम आहे. तो असा की, प्रथम वृक्षविशेषाच्या संदर्भात वेदीचे वर्णन करून नंतर सुवर्णाचे तगड व त्यावरील जडावाची साभिप्राय कल्पना दिली आहे व पुढे त्यावरील चित्रयोजनेचे औचित्य सूचित

केले आहे. मार्जार, तरस, सिंह व व्याघ्र या प्राणिविशेषांचा अनुक्रमही या संदर्भात लक्षात येण्यासारखा आहे. म्हणूनच या साऱ्या वर्णनातील एकजिनसीपणा नजरेत भरतो. यातील 'त्याजवरि' या पदाची पुनरावृत्ती व षष्ठ्यन्त चान्त विशेषणे यामुळे हे वस्तुवर्णन निश्चितच मोहक वाटते. 'येलूरचा कोट बहूतच मजबूद, ज्याचे खंदकांत पाणी, त्यांत सुसरी, असा बळकट होता.' (६-१८). या वर्णनांतील 'मजबूद' हे विशेषण 'पाणी' आणि 'सुसरी' या तत्संबद्ध नामयोजनेमुळे साभिप्राय झाले आहे. शिवाय 'मजबूद' व 'बळकट' या अनुक्रमे अरबी व मराठी या भिन्नभाषेतील एकार्थसूचक शब्दयोजनेमुळे श्रुतिसुखत्व (Euphony) हा शैलीविषयक गुण निर्माण झाला आहे. सदर लघुवाक्यातील वस्तुवर्णन निरलंकृत शब्दयोजनेमुळे रेखीव वाटते.

संयम या गुणाच्या दृष्टीने प्रस्तुत चरित्राचे लेखन उल्लेखनीय म्हणता येईल. पाल्हाळाला अवसर न देता इष्टार्थ प्रभावीपणे व्यक्त करण्यात चरित्रकार यशस्वी झालेला दिसतो. उदाहरणार्थ, संभाजी मोगलाकडून परत आल्यावर त्याच्या मागील अविचारी कृत्याबद्दल (७--२९) तिळप्राय निषेध न करता त्याची समजावणी, महाराजांनी केली. त्यावेळी महाराज म्हणतात—'तुम्ही सद्वंश, तुम्हांसाठीं राज्य किती संपादिलें ? याचे अधिकारी तुम्ही. सर्व प्रजा हें तुमचें कुटुंब, लेंकराचें ठायीं मोजावें. राजे लोक तुम्ही. शतावधी स्त्रियां [शीं] लग्न केलें असतां शक्तीनसार शतावधी उपस्त्रिया नाटकशाळा ठेवून [वर्तन] केलें असतां युक्त आहे. ~~कर्न~~ परंतु अविचार अगम्यागमन करणें व परस्त्रीबलात्कार हे दोन्ही यशक्षयास कारण. पूर्वी मोठेमोठे राजे व रावणादिक राज्यकर्ते या दोषेंकरून राज्य [क्षयास] व कुलक्षयास गेले. राज्यक्षयाचें करणें [योग्य] न होय.' (७--३१). यातील 'सद्वंश', 'अधिकारी', 'मोजावें', 'तुम्ही', 'युक्त', 'कारण', 'या दोषेंकरून' व 'न होय' हे सर्व शब्द चपखलपणे बसलेले आहेत. इतकेच नव्हे तर प्रौढ शब्दसंहतीमुळे त्यात विचारांचे गांभीर्य निर्माण होऊन याने उदात्ततेची परिसीमा गाठली ~~साठली~~ आहे. या शब्दयोजनेत विचारांची मांडणी सुसंबद्ध झाली आहे. म्हणूनच त्यात विचारसौंदर्य हा गुण आढळतो. त्यातील भावना ही विचारांकित असल्याने ती हृदयाला भिडल्याशिवाय राहत नाही. भावनासौंदर्य नि विचारसौंदर्य यांच्या अपूर्व साहचर्यामुळे या शब्दसंहतीला वाङ्मयीन तेज चढलेले दिसते.

उदात्तता हा चिटणिसांच्या लेखनाचा स्थायीभाव आहे. त्यांच्या

चरित्राचा नायक शिवाजी हा धीरोदात्त आहे. त्याची मातृपितृभक्ती व गुरुभक्ती, त्याचे बंधुप्रेम, मित्रप्रेम व राष्ट्रप्रेम, त्याचा स्त्रीविषयक दृष्टिकोन, शत्रूविषयक दृष्टिकोन व प्रजाविषयक दृष्टिकोन ही सारी त्याच्या व्यक्तित्वाची महत्त्वाची अंगे असल्यामुळे त्या त्या प्रसंगात ती प्रत्ययास येतात चरित्रकाराने त्याचे हे विशेष या चरित्रात यशस्वी रीतीने दर्शविले आहेत. भावनात्मकतेपेक्षा वैचारिकतेकडे चिटणिसांचा अधिक ओढा दिसतो. यामुळेच त्यांच्या लेखनाची पातळी उच्च दर्जाची झाली आहे. तेथून ते पवित्र नि गंभीर दृष्टीने वाचकांना शिवचरित्राकडे पाहावयास लावितात, 'तुम्ही सर्व पराक्रमी आहां. कळेल तसे प्रयत्न करून राज्य व धर्म रक्षावा. ' (७-४०). हे अंतकाल-समयी शिवाजीच्या तोंडी घातलेले शब्द चरित्रलेखनाच्या उदात्ततेची साक्ष देतात. वैचारिकतेमुळे निर्माण झालेल्या या उदात्ततेला भावनेचा स्पर्श झाल्याने तर ती विशेष प्रभावी झाली आहे. उदात्तता या गुणाच्या दृष्टीने शिवाजीने संभाजीला केलेल्या उपदेशाचा उपरिनिर्दिष्ट प्रसंग हा या चरित्रातील सर्वोत्कृष्ट म्हणता येईल.

वैचारिक भूमिकेमुळे मात्र प्रस्तुत चरित्रात रसोत्कटता हा वाङ्मयीन गुण अभावाने दिसून येतो. वस्तुतः चरित्रनायकाच्या जीवनातील विविध प्रसंग मुळात भावनाप्रधान आहेत; पण ते प्रसंग रंगविताना चरित्रकाराच्या लेखनाला मर्यादा पडतात. कदाचित छत्रपतींच्या चरित्रांपैकी ही पहिलीच कृती असल्यामुळे तीत लालित्य, सहजता, रसोत्कटता हे गुण नाहीत. या चरित्राच्या तुलनेने पुढील छत्रपतींची--विशेषतः संभाजी व राजाराम यांची—चरित्रे अधिक सरस उतरली आहेत. सदर चरित्रांतील भाषाशैली प्रौढ असूनही व आशयसंपन्न असूनही वैचारिकतेच्या अतिरेकी भूमिकेमुळे त्यातील आशय उत्कटपणे व्यक्त होत नाहीं. म्हणूनच की काय रसनिर्मितीच्या दृष्टीने या चरित्रातील चित्रणे अपूर्ण वाटतात. सारांश, यातील प्रसंग भव्योदात्त असूनही भावनोत्कटतेच्या अभावी समर्थपणे आस्वाद्यमान होत नाहीत असे म्हणणे भाग आहे.

चिटणिसांच्या या चरित्रात त्यांचे **व्यक्तित्व** कसे प्रतिबिंबित झाले आहे तेही पाहण्यासारखे आहे. शिवाजी महाराजांच्या ध्येयधोरणांविषयी ते सांगतात—' " आपण वडिलांनीं मेळविलें तें खाऊन राहाणें योग्य नाहीं. आपण हिंदू. दक्षिणदेश सर्व म्लेंछांनीं ग्रासिला. देव, ब्राह्मण, क्षेत्रें, गाई यांस बहूत पीडा जाली. धर्म अगदीं बुडाला. तेव्हां धर्म-रक्षणार्थ प्राणही वेंचून धर्म रक्षांवा,

आणि आपले पराक्रमानें नवीन दौलत संपादावी. तें अन्न भक्षून फौज व लोक जमा करावे, आणि वडिलीं मेळविलें तेंही रक्षून नवें साधन करावें हेंच या कुळांत जन्म झालियाचे सार्थक, व श्रेयस्कर. देवावर व दैवावर भार घालून, पुरुष-प्रयत्न–अवलंबन करावें. त्यास दैव जसें जसें साह्य होईल तसें तसें अधीक करीत जावें. मग देव परिणामास नेणार समर्थ आहे." याप्रकारें मनांत कल्पना पूर्व-जन्मांतर-योगें आणूं लागले व निश्चयही तसाच करिते जाले'. (२–८). या वर्णनात स्वकर्तव्य, धर्म, प्रजा, नव्या साधनाचा हव्यास, जीवनाचे सार्थक, दैववाद नि प्रयत्नवाद, प्राक्तन इत्यादिकांसंबंधी लेखकाच्या मनातील उदात्त कल्पना उत्कृष्टपणे आविष्कृत झाल्या आहेत. या सर्वांविषयी त्याची जबरदस्त निष्ठा 'निश्चयही तसाच करिते जाले' या वाक्यात तीव्रपणे व्यक्त झाली आहे. तसेच 'मनुष्यमात्रास स्वल्प प्राप्ती जाली तरी त्यांतच सुख व्हावें. राजद्रव्य येईल त्यांतच मनुष्याचे प्रपंच होऊन द्रव्यसंग्रह व्हावा. ऐशी बरकत सर्वांस. सर्व जन सुखी. राज्यांत ऐसें होतें जालें. सर्वांस धर्मेंकरून चालावें हे वासना निर्माण होती जाली'. (४–३७). या वर्णनात त्याची सुराज्याची कल्पना दिसून येते. ही वर्णने एका भव्य आदर्शाचा साक्षात्कार घडवितात. अफजल-शिवाजी भेटीतील 'खानानींच अगोदर दगा व पुरुषार्थ केला'. (३–२०). या वाक्यात त्याची राजनिष्ठा समर्पकपणे ध्वनित होते.

पारंपरीणता हा प्रस्तुत चरित्राचा आणखी एक गुण. बखरनविसाच्या पौराणिक संस्काराची निदर्शक अशी ही पारंपरीणता **आलंकारिक** स्वरूपात प्रकट होताना दिसते. उदाहरणार्थ, अफजलवध झाल्याचे वर्णन तो करतो— 'ते समयीं जसा शिशुपाल सभेमध्यें सहज लीलेंकरून श्रीकृष्णजीनें मारिला त्याप्रकारें या सभेंत शोभा येती जाली.' (३-२०) किंवा शायिस्ताखानास शिवाजीने कशी शास्त केली ते सांगताना तो म्हणतो—'जसा कालिया साप पत्न्यांचे करुणेंकरून श्रीकृष्णजीनें जित सोडिला, ऐसा खान याचे मानेवरि तरवार ठेविली असतां, काढून, शासन करून, सोडून देऊन [ते] सिंहगडास विजयी होऊन सुरक्षित येऊन पावले.' (५-५). तसेच 'औरंगजेब केवळ दैत्य होय!' (५-२६) हे वर्णन, ही सारी त्यातील आलंकारिकतेमुळे मोहक झाली आहेत. या चरित्रातील साक्षात्कार, स्वप्नगत दृष्टांत, दुश्चिन्हे व चरित्राची फलश्रुती हीही पारंपरिणतेची उदाहरणे होत. 'यवन, दीपावर पतंग तसे, क्षयास जातील' (२-३८) अथवा चंदीचा 'किल्ला बोलों लागला'. (५-१३). यासारखे अलंकार-

या बखरीच्या सौंदर्यात भरच घालतात.

पारंपरिणतेचा दुसरा प्रकार **वाक्संप्रदाय** होय. सप्तप्रकरणातील वाक्संप्रदाय खालीलप्रमाणे:—

(अ) उत्साहसूचक संप्रदाय—

अरेतुरेचे झुंज होणे—दोहींकडेही मोंगल पठाण आडून उभे राहून अरेतुरेचें जुंझ जाले. (१-२१).

उखळून काढणे—मलीक याचा मोड करून उखळून काढिला. (सदर).

रणास आणणे—पांच हजार माणूस खानाचे रणास आणिले. (३-२७).

(आ) क्रोधसूचक संप्रदाय—

गर्दीस नेणे—यास गर्दीस नेऊन मुलाची स्थापना करावी. (१-२१),

(इ) शोकसूचक संप्रदाय—

गर्दीस मिळणे—आपण केशरी पोषाख करून, लढाईत बहूत शर्ते करून गर्दीस मिळाले. (१-३).

गाढवाचा नांगर फिरविणे—कोट पाडून गाढवाचा नांगर फिरविला. (१-२१).

(ई) भयसूचक संप्रदाय—

कुच्या करणे (पाय तोडणे)–भोयांच्या कुच्या केल्या. (३-२०).

(उ) प्रेमसूचक संप्रदाय—

डोळ्याचे पारणे फेडणे–माझें डोळ्याचे पारणें फेडिलें. (३-२२).

(ऊ) संकीर्ण संप्रदाय—

पाय पालटणे (इकडचे तिकडे करणे–व्यवहार)–आज्ञेखेरीज पाय पालटू नये. (४-८).

सप्तप्रकरणात्मक चरित्रात म्हणींचा अभाव दिसतो. याचा अर्थ असा की, चरित्रकाराला स्वतंत्रपणे अर्थव्यक्ती करण्याचे सामर्थ्य आहे. हाही एक विशेष या चरित्राचा मानण्यास प्रत्यवाय नाही.

'**व्याकरणिक विशेषां**'मुळे या चरित्राला भाषादृष्ट्या एक निराळा घाट आला आहे. सदर चरित्रातील हे विशेष पुढीलप्रमाणे—

(१) प्रथमान्त कर्त्यांचे वाक्य कर्मणि प्रयोगात. उदाहरणार्थ, मालोजी राजे त्या सर्पापुढें दूर उभे राहून हात जोडून प्रार्थना केली. (१-१०).

(२) तृतीयान्त कर्त्यांचे वाक्य कर्तरि प्रयोगात. उदाहरणार्थ, याप्रमाणें महाराजांनीं यश घेऊन मातुश्रींचे दर्शनास गेले. (३-२२).

(३) विशेष्यानंतर विशेषणाची योजना. उदाहरणार्थ, भगवें निशाण यांचे हत्ती दोन. (७–१८).

(४) विशेष्याची विभक्ती सर्वनामाला. उदाहरणार्थ, त्यांत राज्यांत. (५–१).

(५) विशेषणाची तृतीया. उदाहरणार्थ, वडिलांची आज्ञा शिरसा. (२–३).

(६) पंचमीच्या अर्थाने तृतीया. उदाहरणार्थ, विजापूरनें निघोन. (१–१३).

(७) आदरार्थी अनेकवचनी क्रियापद. उदाहरणार्थ, (मातुश्री जिजाबाईसाहेब) "...देवाचे व आमचे आशीर्वादें विजयी होशील अशी बोल्लीं. (३–१२).

(८) वर्तमानाचा भूतकाळार्थी उपयोग. उदाहरणार्थ, (शिवाजी राजे) 'वयें अल्प असोन प्रौढीनें चाल्तात. (२–३).

(९) प्रयोजक क्रियापदाबद्दल स्वार्थी क्रियापद. उदाहरणार्थ, 'मादण्णापंत यांचे मार्फतीनें राजकारण, त्यांचे नित्य माहाराजांकडे येणें जाणें असें करीत (करवीत) होते'. (६-९).

(१०) सकर्मक धातूचा लाख्याती (भूतकाळी) कर्तरि प्रयोग. उदाहरणार्थ, 'मुरारपंत हर्ष मानिते जाले'. (१-१५).

(११) प्रधानकर्तृक कर्मणि प्रयोग. उदाहरणार्थ, 'तरि ऐसा विचार (त्वां) करावा होता.' (६-२१).

(१२) विशिष्ट शब्दाचा विशिष्ट अर्थी उपयोग. उदाहरणार्थ, 'इतके समक्ष सभा असंभाव्य (मोठी) असतां आपण बोललां तें अप्रमाण कसें होईल? (१-९).

याशिवाय खालील काही **व्याकरणिक रूपेही** उल्लेखनीय होतः—

(१) द्वितीयेच्या 'तें' प्रत्ययाचा उपयोग. उदा. 'म्हणोन पराभवातें पावून राहिले'. (६-१).

(२) तृतीयेचा 'नीं' प्रत्यय एकवचनात. उदा. 'एकानीं मृत्तिकेचे घोडे करावे, एकानीं काष्ठाचे करावे.' (१-२).

(३) सप्तमीच्या 'ईं' प्रत्ययाचा उपयोग. उदा. 'दक्षिण प्रांतीं' (७-२).

(४) एकारान्त सामान्यरूप. उदा. 'तेथे आले-नंतर'. (२-३९).

(५) बहुता (बहुत याचे अनेकवचनी सामान्यरूप) या शब्दाचा उपयोग. उदा. 'ऐसे बुद्धिवाद बहुता रितींनीं केले असतां.' (६-५). येथे संस्कृतप्रमाणे विशेष्याचे लिंगवचन विशेषणालाही लक्ष्य आहे.

(६) क्रियाविशेषणार्थी सर्वनाम. उदा. त्यास (तेव्हा) व्यंकोजी राजे यांचा तह झाला.' (६-२४).

(७) क्रियाविशेषणार्थी विशेषण. उदा. 'असें होत्सातां.' (२-३२).

(८) निमित्तवाचक (ऊ प्रत्यय असलेल्या) धातुसाधितावर अनुस्वाराऐवजी 'न.' उदा. 'ती बजावून देऊन (देऊ).' (५-३०).

(९) म्हणोन (कारणदर्शक). उदा. हुसेनखान माईणा व लोदीखान दाहहजार स्वारानिशीं आपला प्रांत चंदी वगैरे घेतला म्हणोन चालोन आले. (६-२०).

(१०) म्हणोन (उद्देशदर्शक). उदा. 'स्त्रीस शिक्षा काय करावी? म्हणोन एक दोन गांव खाऊन असावें, अशी हल्बूद करून राखिली.' (६-१९).

(११) म्हणोन (असे या अर्थी). उदा. '"स्वामीचे आशीर्वादें, आज्ञेनें करणें तें केलें!" म्हणोन बहूत विनतीनें व नम्रपणें बोलले.' (४-३९).

(१२) 'व' या उभयान्वयी अव्ययाची पुनरुक्ती. उदा. 'पिता, माता व भगिनी व बंधू, मित्र व वल्लभ थोर थोर.' (६-२).

यावनी शब्दांच्या रेखीव योजनेमुळे वाक्यरचना धारदार होऊन श्रुतिसुखत्व (Euphony) हा शैलीविषयक गुण निर्माण झाल्याचे या चरित्रात आढळते. याची उदाहरणेः—

(१) निमकहराम (फा०)–पादशाही चाकर निमकहराम होऊन दौलत बुडवितात. (१-१३).

(२) मुजाका (खा) (अ०)–'त्याचा मुजाका न धरिता.' (१-१५).

(३) कजाखी (गी) (तु०)–'बहुत कजाखी करून विजयराघव यांस रणांत मारिलें.' (१-१७).

(४) यख्तियारी (अ०)–'त्यांचे मुख्य यख्तियारी कारभारी मुरार जगदेवराव.' (१-१३).

(५) आफरा (फा०) बेकैदी (फा०)–'तुमचा बेटा यांणीं आफरी होऊन बेकैदी करतात.' (२-१६).

(६) जवामर्दी (फा०)–'ते मराठे बहुतच जवामर्दीने लढले.' (३-३२).

(७) गरीबनवाज (अ० फा०)–'ऐसे गरीबनवाज.' (३-२३).

(८) गुमान (फा०)–'गुमान राखीत नाहींत.' (५-१).

(९) फिसाहत (अ०)–'कितीक पुंड पाळेगारांनीं फिसाहत केली होती. (७-३६).

(१०) साफदील (फा०)–'शिवाजी राजे बहुत साफदील' (३-१४).

पारिभाषिक शब्दांमुळे भाषा संपन्न होऊन तिला एक मोहक वळण लागल्याचे प्रस्तुत चरित्रात दिसते. यातील पारिभाषिक शब्द असेः—

१. **युद्धविषयक**–बरकंदाज (फा०) २–२; जेजाला (फा०) ३–२७; करोल (तु०) ४–१४; धमधमा (फा०) ३–२६, मोर्चा (फा०) ३–३०.

२. **सैन्यविषयक**—पागा (फा०) ४-१५; हषम (अ०) ४-१७; हवालदार (अ०) ४-१७; जुमला (अ०) ४-१७; तोफा (तु०) ४-२२.

३. **आरमारविषयक**—गुराबा (अ०) ३-३१; गलबतें (फा०) ३-३१; मुबारें (अ०) ३-३१; दर्यावर्दी (फा०) ३-३१; जहाज (फा०) ३-३१.

४. **राज्यकारभारविषयक**—वजिरी (अ०) २-४; काशीद (अ०) ४-४; जमेनीस (फा०) ४-१०; फरमान (फा०) ७-३; तहगिरी (अ०) बाहली (फा०) ३-४०.

५. **दस्तऐवजविषयक**—करार (अ०) ३-३२; कानूजाबते (अ०) ४-८; कारकीर्दी (फा०) १-१; अर्ज (अ०) ३-३२; तह (फा०) ६-२४.

त्याचप्रमाणे पारपत्यगार (३-२५), रोखापत्र (४-८), भालदार (७-२४) अशासारख्या **संमिश्र शब्दप्रयोगांनी**, "शिवाजी बडा सैतान पैदा हुवा, जें कोण्हीं आजपर्यंत कर्म न केलें, तेंच करितो." (५-८) अशासारख्या **संमिश्र भाषाप्रयोगांनी**, 'कावेसींत आणून घेरून, तोडणी लावून जेर करा म्हटलें तरी करूं. (३-६). यासारख्या **ध्वन्यनुकारी शब्दयोजनेमुळे** व 'फौज, सेना, कोश, खजीना'. (४-३२) यासारख्या **द्विरुक्तीमुळे** या चरित्रात एक आगळे सौंदर्य निर्माण झाले आहे.

काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात—'चिटणिसांची भाषा साधी कारकुनी पेशाची आहे. त्यांची भाषानदी सरळ, संथ अशी वाहते.' (सप्तप्रकरणात्मक चरित्र, १९२४, प्रस्तावरूप निवेदन, पृ. ८). श्री. भालचंद्र यांच्या मते 'त्यांच्या भाषेची संस्कृतता व सौंदर्य हीं पाहिलीं म्हणजे धाकट्या चिपळूणकरांच्या प्रौढ व उद्दाम लेखनाची आठवण होते.' (मनोरंजन, एप्रिल १९११). चिटणिसांसारख्या पुरातनसेवक, माहीतगार, लेखनाधिकारी व्यक्तीने वैशिष्ट्यपूर्ण शैलीत लिहिलेले हे चरित्र इतिहासदृष्ट्या जसे मौलिक आहे, तसे वाङ्मयदृष्ट्याही रमणीय आहे. सामान्य कारकुनी पेशाच्या माणसाने लिहिलेले हे चरित्र पाहिले म्हणजे त्याच्या कलमबहादुरीबद्दल नितांत आदर वाटतो. शिव छत्रपतीचे इतके

सविस्तर, सुव्यवस्थित नि सुंदर चरित्र अन्यत्र आढळत नाही. चिटणिसांनी शिवाजीसारख्या लोकोत्तर राष्ट्रपुरुषाचे चरित्र लिहून इतिहास व वाङ्मय ही क्षेत्रे समृद्ध केली. हे त्यांचे थोर कार्य होय. प्राचीन मराठी गद्यसारस्वताचे हे लेणे सदैव 'अक्षर' राहील यात सुतराम संदेश नाही.

गुरुवर्य नानासाहेब चापेकर यांचा 'पुरस्कार' या आवृत्तीला लाभला याचा आनंद वाटतो. विद्यार्थीदशेत त्यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर अभ्यास करण्याची संधी आम्हांला मिळाली होती. त्या हक्काने 'पुरस्कार'ची विनंती करिताच त्यांनी तिला मान्यता दिली, त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. बखरकारांनी कोणत्या हेतूने इतिहासवजा असलेल्या बखरी लिहिल्या, या त्यांच्या 'पुरस्कारा'तील प्रश्नाला आमच्या मते उत्तर म्हणजे त्यांनी स्वकीयांच्या कर्तृत्वाच्या अभिमानाचे तर्पण करण्यासाठीच बखरी लिहिल्या. त्या वेळी इतिहासदृष्टी नव्हती हा कालाचा दोष मानिता येईल; बखरकारांचा नव्हे.

असो. शिवछत्रपतींच्या चरित्राची ही आवृत्ती सिद्ध करिताना अनेक ग्रंथांचे साहाय्य झाले. त्यांचा ऋणनिर्देश केला पाहिजे. त्याचप्रमाणे एक भावनिक ऋण मान्य केले पाहिजे. ते म्हणजे इतिहासाचार्य राजवाडे यांची तेजस्वी परंपरा चालविणारे कर्तबगार संशोधक नि दोन तपांच्या सहवासात सुतनिर्विशेष प्रेम करणारे प्रज्ञावंत गुरु कै. शंकर नारायण वत्सजोशी, वाईकर यांच्या प्रेरणेनेच येथवर वाटचाल झाली. व्हीनस प्रकाशनचे श्री. सदाशिवराव पाध्ये हे तर या ग्रंथाचे 'प्रकाशविते धनी' म्हणून त्यांचे व सुबक मुद्रणाबद्दल मौज प्रिंटिंग ब्यूरोचे मनःपूर्वक आभार.

शिवजयंती,
दि. २८ मार्च १९६७,
दादर, मुंबई २८.

र. वि. हेरवाडकर

अनुक्रमणिका

अवतारकृत्य (३१) तत्कालीन संतमंडळी (३२) तुकोबांच्या कीर्तनातील चमत्कार (३३) रामदासांचा अवतार (३४) शिवाजीचा सत्पुरुषांविषयी ध्यास (३५) रामदासांचा दृष्टांत (३६) तुकारामांचे पत्र (३७) समर्थांची प्रेरणा (३८) शिवसमर्थ भेट (३९) तुकारामांचा उपदेश (४०) शिवाजीचे आज्ञापालन.

संक्षेप

अ०	अव्यय
[अ]	अरबी
अ० क्रि०	अकर्मक क्रियापद
का०	कानडी
क्रि०	क्रियाविशेषण
तु०	तुर्की
दे०	देशी भाषा
ध्व०	ध्वन्यनुकारी
न०	नपुसकलिंगी
पुन०	पुनरुक्ती
पु०	पुल्लिंगी
प्रा०	प्राकृत
फा०	फारसी
म०	मराठी
ल०	लक्षणेने
वि०	विशेषण
श०	शके

सं०	संस्कृत
स० क्रि०	सकर्मक क्रियापद
स्त्री०	स्त्रीलिंगी
हिं	हिंदी
>	पासून निघालेले
<	पासून आलेले

मुद्रण-शोध

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१	१२	श्रोदेव	श्रीदेव
२	५	पुरणांतील	पुराणांतील
१४	१२	शहाजीराजे	शाहाजीराजे
२१	१०	पडल	पडला
३१	१	थार	थोर
४३	१४	मोरो त्रिमल पिंगले	मोरो त्रिमल पिंगळे
४४	६	पन्याळयासा	पन्याळ्यास
४४	२०	सुखे	सुरवे
४८	२१	कद	कैद
६०	२२	ऐसा[३]	ऐसा[६]
८१	१४	पौटाशीं	पोटाशीं
१३६	६	परिपत्यगार	पारिपत्यगार
१६२	५	यात्र	यात्रे
१७९	२३	व्यकोजीराजे	व्यंकोजीराजे
३३४	७	विशिष्यानंतर	विशेष्यानंतर

॥ श्रीमन्महागणपतये नमः ॥

मल्हार रामराव चिटणीस—विरचित

श्रीशिव छत्रपतीचें सप्तप्रकरणात्मक चरित्र

पूर्वजवर्णन आणि जन्मकथन—प्रकरण १

१. लेखनास आज्ञा.

स्वस्ति[१] श्री राज्याभिषेक[२] शके १३७ प्रमोदीनाम[३] संवत्सरे ज्येष्ठ बहुल[४] षष्ठी भृगुवासरे[५] क्षत्रियकुलावतंस श्रीराजाधिराज श्रीमहाराज प्रतापी शाहू नृप छत्रपती सिंहासनाधीश्वर स्वामी यांणीं राजमान्य राजश्री मल्हारी रामराव चिटणवीस[६] यांसि आज्ञा केली ऐशी जे—" तुम्ही पुरातन सेवक, लेखनाधिकारी; याजकरितां पूर्वीपासून महाराजांचे कुलाचे ठायीं परमप्रतापी पूर्वज[७] होत आले, त्यांणीं पराक्रम केले, सार्वभौम राज्यें केली; तदनंतर कालेंकरून म्लेंछ[८] राज्य होऊन संपूर्ण पृथ्वींतील धर्म-उच्छेद केला. श्रीदेव, ब्राह्मण, तीर्थें व क्षेत्रें, गाई व प्रजा, यांसि पीडा नाना प्रकारें करून बहूत केली असतां, पुन्हां श्रीशिव छत्रपती अवतार होऊन [त्यांनीं] धर्मस्थापना केली, व राज्य-आक्रमण व अमानुषी पराक्रम केले.

---

१. स्वस्ति (अ०) क्षेम, कुशल. २. राज्याभिषेक शक १३७ — इ. स. १८११. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकसालापासून म्हणजे इ. स. १६७४ पासून हा शक सुरू झाला. ३. प्रमोदी (पु०) -हे नाव बरोबर नाही. त्याऐवजी प्रमोद असे हवे. साठ संवत्सरांपैकी हा चौथा संवत्सर. (प्रभव, विभव, शुक्ल, प्रमोद) ४. बहुल (पु० वि०) कृष्ण, वद्य. ५. भृगुवासर (पु०) शुक्रवार ६. चिटनवीस (चिट्नवीस) (फा. चिट (हिं. चिठ्ठी) + फा. नवीस (लेखक) —सर्कारी कारकून, पत्रलेखक ७. पूर्वज (पु०)—भोसले छत्रपती यांचे वाडवडील. चितोड, उदेपूर येथील सूर्यवंशीय महाराणे. (लक्ष्मणसिंग, सुजनसिंग इ.) ८. म्लेंछ (म्लेच्छ) (पु०)— अनार्य. मुसुल्मान या अर्थी.

त्यांजपासून आजपर्यंत राज्यउपभोग वंशपरंपरा दक्षिणचे[1] ठायीं कसे केले, पराक्रम काय केले, हें चरित्र पूर्वील दाखले वगैरे लेहून ठेवले असेल त्या अन्वयें लेहून आणावें. जें श्रवण, पठण, मनन केलें असतां सकल विद्या व गुणसंपन्नता व शौर्य, औदार्य, गांभीर्य, दया, धर्म व नीती हें सहज उत्पन्न होत असावें, म्हणून[2] आज्ञा झाली. त्याजवरून शास्त्राधार विष्णुपुराणादी पुराणांतील दंडनीती,[3] राजधर्म,[4] राजमयूख[5] व रमल–शास्त्र[6] व कारकीर्दी[7] वडिलार्जित होत्या, दिनचर्या, पराक्रमकथा [ही होत्या,] त्यांचे आश्रयेंकरून लेहून निवेदन केलें कीं:—

२. कलियुगातील राजवंश.

पूर्वीं तीन युगें होऊन गेलीं. सांप्रत कलियुग[8] प्राप्त जालें. त्याची संख्या वर्षें सुमारी ४,३२००० चार लक्ष बत्तीस हजार त्यांत गत कली ४९११ चार हजार नऊशें अकरा वर्षें, प्रमोदी संवत्सर चालला आहे, यापर्यंत जालीं. कलियुगास प्रारंभ जाल्यापासून युधिष्ठिर शक प्रथम जाला. वर्षें ३०४४ तीन हजार चवेचाळीस चालला. त्यांत प्रथमपासोन राजे जाले [ते.] आधीं युधिष्ठिर म्हणजे धर्मराज; त्याचे नातू परिक्षिती; त्यापासून पुढें वंशाचे तीस[9] पुरूष शेवटीं क्षेमक राजा यापर्यंत जाले. तेव्हां कलियुगाचा प्रादुर्भाव, बहूत अधर्मप्रवृत्ती जाली. याजमुळें उत्तरेस कलापग्रामीं[10] जाऊन कलियुग[11] सरल्यावरि वंशवृद्धी करावी अैशी ईश्वरी आज्ञा[11] [जाली.] यामुळें योगारूढ होऊन [क्षेमक राजे] राहिले.

---

१ 'दक्षण' असे सर्व प्रतींत आहे. २. 'म्हणोन' कोल्हापूर प्रत. ३. दंडनीती (स्त्री०)-नीतिशास्त्र. ४. राजधर्म (पु०)-राज्यकारभारशास्त्र. ५. राजमयूख (पु०)-'राजतरंगिणी' किंवा 'राजावली' असावा. (पृ. ३३ स. च. १९२४). ६. रमलशास्त्र (न०) (अ० रम्ल्)-यावनी फलज्योतिषशास्त्र. ७. कारकीर्दी (स्त्री०) [फा० कार्कर्द्] राजवटींच्या हकीकती. ८ कलियुग (न०) शालिवाहन शकापूर्वी ३१७९ या वर्षी (दि. १८ फेब्रुवारी खि. पू. ३१०२) भारतीय युद्ध झाले. त्यानंतर लवकरच कलियुग सुरू झाले. (ज्ञानकोश क १७५). ९. युधिष्ठिर, परीक्षिती, जनमेजय, शतानीक, अश्वमेध, कृष्ण, नेमीचक्र, प्युष्ण, चित्ररथ, शुचिरथ, वृष्णिमान, सुषेण, सुनीथ, रुची, नृचक्षू, सुखीबल, परिप्लव, सुनय, मेधावी, नृपंजय, मृदू, तिग्म, बृहद्रथ, वसुदास, शतानीक (दुसरा), उदयन, अहीनर, दंडपाणी, निरमित्र व क्षेमक (कीर्तने प्रत). १०. कलापग्राम–हिमालयात असावे (पृ. ३४ स. च.). ११. याऐवजी 'कलीचे योगें योगारुढ होऊन राहिला' असे वाक्य कीर्तने प्रतीत आहे.

ते समयीं राज्य सुनीक प्रधान यासि दिल्हें. त्याणींही आपले पुत्रास देऊन [तो क्षेमक] राजाबरोबर तपास गेला.

त्याचा वंश महानंदपर्यंत पंधरा[1] पुरूष होते जाले; त्यांणीं राज्य हस्तनापुरीं सार्वभौमपद केलें. महानंद राजा सोमवंशी जाला. तो कलीचे योगेंकरून परम उग्रस्थिति, अधर्मवासनायुक्त, विषयलंपट, परस्त्रीगमनकर्ता [असा] जाला. त्याणीं शूद्र व वैश्य अशा दोन वर्णांच्या स्त्रिया करण्यास क्षत्रियास अधिकार आहे असा धर्म स्थापून शूद्रवर्णांच्या स्त्रिया विवाहित केल्या. त्यांजपासून पुत्र जाला. त्याचें नांव महापद्मानंद असें ठेवून, त्यासच राज्याधिकार देऊन, राज्य दिल्हें. शूद्र-वर्णांत व्यवहारसंपर्क अन्नादी होऊं लागले. सूर्यवंश सोमवंश या कुलींचे संपूर्ण राजे यांतही [शूद्र] व्यवहारसंपर्क जाला. त्या दिवसापासोन राजपुत्र जाले ते रजपूत[2] म्हणवून क्षत्रधर्मेंकरून उत्तरदेशीं राज्य करते जाले. महापद्मानंद याचा वंश बृहद्रथपर्यंत अकरा[3] पुरूष होऊन त्यांनीं राज्य केलें. पुढें निर्वंश जाला.

त्याचा सेनापती पुष्पमित्र याणीं राज्य आक्रमण करून [तें] करूं लागला. त्याचा वंश देवहुतीपर्यंत दाहा[4] पुरूष जाले. त्याचा निर्वंश जाला. त्याचा प्रधान वासुदेव याणीं राज्य आक्रमण केलें. त्याचा वंश सुशर्मा व नारायणपर्यंत चार[5] पुरूष जाले. [त्यांनीं] राज्य केलें. त्याचा निर्वंश जाला.

तेव्हां कोण्ही शूद्र ज्ञातीय क्षिप्रक याणीं राज्य घेऊन सार्वभौम पद करूं लागला. त्याचा वंश अरिष्टकर्मापर्यंत [होऊन] दाहा[6] पुरुषांनीं राज्य केलें. तोंपर्यंत युधिष्ठिर शक तीन हजार चवेचाळीस वर्षें जालीं. नंतर उज्जनींत राजा विक्रम होऊन त्याचा शक रक्ताक्षी नाम संवत्सरीं जाला. त्यांत हस्तनापुरीं राजे जाले ते संख्या; क्षिप्रक याचेच वंशींचे [जाले] अरिष्टकर्मा याचा पुत्र हल,

---

१. प्रद्योत, पालक, विशाख, जनक, नंदिवर्धन, शिशुनाग, काकवण, क्षेमधर्मा, क्षत्रौज, विद्मिसार, अजातशत्रू, दर्भक, द्योच्योदन, नंदिवर्धन (दुसरा), व महानंद (कीर्तने प्रत). २. क्षत्रियांस शूद्रस्त्रियांपासून झालेल्या संततीस राजपुत्र किंवा रजपूत म्हणू लागले. ३. महापद्मानंद, कौटिल्य चंद्रगुप्त, बिंदुसार, अशोकवर्धन, सुयश, दाशरथी, संगत, शालिशुक, सोमशर्मा, धृतधन्वा व ब्रह्मरथ (कीर्तने प्रत). ४. पुष्यमित्र, अग्निमित्र, ज्येष्ठ, वसुमित्र, दशाद्रक, पुलिंद, घोषवसु, वज्रमित्र, भागवत व देवमूर्ती (कीर्तने प्रत). ५. वसुदेव, भूमित्र, सुशर्मा व नारायण (कीर्तने प्रत). ६. क्षिप्रक, कृष्ण, शातकर्ण, पूर्णेच्छ, शातकर्ण (दुसरा), लंबोदर, दिवीलक, मेघस्वामी, शठमान व अरिष्टकर्मा (कीर्तने प्रत).

त्याचे वंशीं पुलोमापर्यंत दाहा[1] पुरूष जाले. तेव्हां विक्रम शक एकटाच पृथ्वीवर चालला. वर्षे १३५.

नंतर प्रतिष्ठान पैठण गंगातीर येथें शालिवाहन राजा शककर्ता निर्माण जाला. आणि उभयतां एकावर एक चालून गेले. ते समयीं उभयतांनीं प्रतिज्ञा केली कीं, एकानीं मृत्तिकेचे घोडे करावे, एकानीं काष्ठाचे करावे; ज्याचे घोडे पलतीरास जातील, त्याणीं आपला शक चालवावा. म्हणून शालिवाहन याणीं मृत्तिकेचे केले, विक्रम याणीं काष्ठाचे केले, आणि नर्मदेंत चालविले. तेव्हां ईश्वरसत्तेनें दोघांचेही घोडे वाहवले, बुडाले. याजवरून उभयतांनीं तह केला कीं, नर्मदापैलतीरीं विक्रमशक चालावा, नर्मदादक्षिणतीरीं शालिवाहन [शक] चालावा. याप्रमाणें [शक] चालते जाले.

त्यांत पांचशें बारा ५१२ वर्षें शालिवाहन शकांत हिंदू राजे हस्तनापुरीं जाले. [ते] प्रथम आंध्र देश म्हणजे तैलंगण आंध्रजातीय कोणी राजा मलुकसेन याचा पुत्र सुरसेन येऊन, पुलोमा यास मारून आपण राज्य घेऊन करूं लागला. त्याचे वंशीं दाहा[2] पुरुष दामोदरसेनपर्यंत जाले.

तेव्हां अभीर म्हणजे गौळी या ज्ञातीचा माधवसिंग म्हणून उत्तरेकडून येऊन दामोदरसेन यासि मारून राज्य घेतलें. त्याचा वंश नृपसिंगपर्यंत साहा[3] पुरूष [यांनीं] राज्य केलें.

तदनन्तर हजरभर[4] रजपूत राजे यांणीं त्यास मारून [ते] राज्य करूं लागले. त्यांचा वंश नऊ[5] पुरूष, [यांनीं] विक्रमचंदपर्यंत राज्य केलें. ते समयीं पृथ्वीपाल म्हणून राजा रजपूत पूर्वेकडून येऊन विक्रमचंद याजला मारून राज्य घेतलें, आणि इंद्रप्रस्थ[6] येथें राजधानी करून राज्य करूं लागला. त्याचा पुत्र उजेनपाल, त्याचा पुत्र उदेपाल, त्याचा पुत्र चेनपाल, त्याचा पुत्र पिठोर[7] असे पांच पुरूष राज्य करते जाले. तों शालिवाहन शके ५१२ वर्षें जालीं. तों पर्यंत धर्मेंकरून हिंदू

१. हल, प्रविलसेन, सुंदर, चकोर, गोमती, पुलुमान, शिवश्री, विजय, चंद्रश्री व पुलोमा (कीर्तने प्रत). २. सुरसेन, माधवसेन, देवसेन, भूसेन, कल्याणसेन, हरिसेन, ब्रह्मसेन, नारायणसेन, लक्ष्मीसेन व दामोदरसेन (कीर्तने प्रत). ३. माधवशिंग, दोपशिंग, राजशिंग, शेरशिंग, हरिशिंग व नृपशिंग (कीर्तने प्रत). ४. 'धीरधर' (की० प्रत). ५. हजरधर, सेन, कौनी, महानु, बीरनाथ, जीवन, उदाईशिंग, कुळानंद व विक्रमचंद (की० प्रत). ६. इंद्रप्रस्थ—दिल्ली (यमुनातीरी) ७. पिठोर–पिठोरा–पृथ्वीराज चौहान.

राज्य चालत असतां कलिप्रभावें करून ईश्वरसत्तेनें यावनीस राज्यपद दक्षिणप्रांतीं व हिंदुस्थानीं व्हावें हा योग प्राप्त जाला.

३. यवन राजे.

ते समयीं पूर्वीं पृथ्वीचे ठायीं सात[१] पैगंबर अवलिया फकीर प्राप्त जाले होते. तेव्हां सुलतान रुकनदीन म्हणोन कोण्ही यवन पुण्यवान होता. त्याची [व] पैगंबर याची गांठ पडून त्याणीं याची सेवा बहुत निष्ठेनीं केली. तेव्हां त्यास पैगंबर याणीं बारा लंगर[२] पाठीवर मारले. ते सोशिले आणि 'बस' असें बोलिले. तेव्हां त्यांणीं वर दिला जे, "बाराशें वर्षे राज्य [तुजला] वंशपरंपरेनें [दिलें तें] इंद्रप्रस्थ व हस्तनापूरचें[३] तूं करशील." ते समयीं [तेथील] धर्मराज्य; तेथें आपली देवता [तिचा] प्रवेश कसा करावा, राज्य कसें घ्यावें, म्हणून पैगंबर व सुलतान रुकनदीन यांणीं विचार करून, कांहीं यवनांस हिंदूंचे वेश देऊन नगरांतील देवता भ्रष्ट केल्या. हिंदूधर्म भ्रष्ट केले. आपली देवता प्रवेश करविली आणि वरप्रयोगेंकरून फौज–जमाव करून पिठोर राजे याशीं युद्ध केलें. त्याणींही बहुत प्रकारेंकरून युद्धें केली, परंतु जय न घडे.

आसमंताद्भागीं सर्व राज्य त्यांणीं सोडविलें. तेव्हां निश्चय केला कीं, ईश्वरानें वर देऊन राज्य त्यांजला दिलें, त्याअर्थीं राज्य जातें, म्हणून कबिले[४] पुरे[५] करून, आपण केशरी पोषाख करून, लढाईत बहूत शर्त[६] करून गर्दीस[७] मिळाले. राज्य गेलें. इंद्रप्रस्थ याचें नांव दिल्ली असें ठेऊन, पातशाहा होऊन, तख्त करून राज्य करूं लागले. त्याचा वंशविस्तार आजपर्यंत राज्य करीत आहेत. त्या वंशांत मोठे मोठे पराक्रमी पादशाहा जाले. समुद्रवलयांकित पृथ्वीचे राजे जिंकून करभार घेऊं लागले. जयपूर वगैरे राजे रजपूत यांस पराभव करून आपले म्हणवावें, शिक्क्यांत नांव घालावें [म्हणून ठेविलें.] पादशाहाचीं चिन्हें, निशाणें वागवावीं; सेवक म्हणवून कन्या पादशाहास द्यावी; डोला[८] पाठवावा, ऐसें करून राज्यें

---

१. याला ऐतिहासिक आधार नाही. २. लंगर (पु०) [फा० लंगर] लोखंडी मोठ्या साखळ्या. ३. हस्तिनापूर (भागिरथीतीरी) दिल्लीहून सुमारे ४० कोस. ४. कबिले (पु०) [अ० कबीला]–बायकामुले. ५. पुरे करून–पुरे करणे–नायनाट करणे, ठार मारणे. ६. शर्त (शर्थ) स्त्री० [अ० शर्त्]–पराकाष्ठा. ७. गर्दी (स्त्री०) [फा० गर्दी]–नाश. ८. डोला (पुं०) [सं० दोला]–ताबूत. सुनी पंथाचे लोक ताबूत करतात.

ठेविलीं. सर्व पृथ्वी यवनमय करून, आपल्या देवता स्थापून, आपले धर्म चालवून मोठेमोठे प्रताप केले. बाराशें वर्षांत पंचावन्न छपन्न पुरुष यांणीं पादशाही करून आपला शक करिते जाले. तो शक 'सन'[१] म्हणून मृगावर चालू जाला. त्यास 'इहिदे' म्हणून आजपर्यंत इहिदेपासून[२] चालतो. त्या वंशीं अकबरशाहा व शाहाजाहां असे बहूत जाले, त्यांचे पराक्रमांचे[३] शाहानामे[४] जाले.

४. विजयनगरचे साम्राज्य.

दक्षिणदेशीं शालिवाहन शके १२०० या शकांत किस्किंदा नगर, वाली सुग्रीव यांची राजधानी. त्याचें हल्लीं विद्यानगर अनीगोंदी [असें नांव आहे.] अनीगोंदी म्हणजे त्या राजाचे हत्ती बांधण्याचें स्थान. यास त्या[५] भाषेनें [असें] म्हणावें, ऐशी आख्या आहे. तेथें त्या स्थानीं किरीटी रामराजा म्हणोन क्षत्रिय होते जाले. त्यांणीं साहा सुभे दक्षिणचे यांत हिंदूधर्म स्थापिला. देव-ब्राह्मणभक्त [असल्यामुळें] सुवर्णाची वृष्टी राज्यांत जाली, व श्रीपंढरीहून पांडुरंग भक्तियोगें नेले[६], ऐशी जग-विख्यात कीर्ती आहे. त्या समयांत ज्ञानेश्वर व भानुदास ब्रह्मनिष्ठ सिद्ध होते. ऐसा राजा परम धार्मिक धर्माभिमानी जाला. त्याणें एकादशीचे दिवशीं म्लेंछ यांस स्पर्श करूं नये म्हणून बसावयासि निराळें घातलें. तेव्हां मातबर यवन सरदार यांस विकल्प येऊन त्याचा प्रधान वैश्य होता त्यास वश करून घेतलें. कलिधर्में धर्म-उच्छेद होणें, त्यायोगें यवनांस [तो प्रधान] अनुकूल होऊन राज्याचा उच्छेद केला. ते दक्षिणेस निघोन गेले. नतर कानडे रामराजे वैश्य यवनांशीं सह राज्य करीत असतां त्यांसही साहाजण म्लेंछ त्या राज्यांतील सरदार वगैरे होते, त्यांणीं रामराजास धरून कैद केले. राज्यहरण केलें. तेही दक्षणेस[७] गेले. तेव्हां साहाजणांनीं यवनांनीं साहा सुभे

---

१. सन-अरबी शुहूर सन मृगापासून सुरू होतो. हा सन इ. स. मागे ५९९ वर्षे असून तो शब्दांनी लिहितात. २. इहिदे (इहदे) [अ० इह्दा] एक. ३. 'पराक्रमे शाहा नांव झालें' (की० प्रत). ४. शाहानामा पु० [फा० शाहनामा] – फिर्दौसीचा राजावलीवर काव्यग्रंथ. येथे ऐतिहासिक ग्रंथ या अर्थी. ५. कानडी भाषेने. ६. पंढरपुराहून विठोबाची मूर्ती कृष्णदेवरायाच्या कारकीर्दीत (इ. स. १५०९) ते इ. स. १५३०) विद्यानगरास नेली असावी (पृ. ३८ स. च. १९२४). पुढे एकनाथाचे पणजे भानुदास यांनी विठोबास पंढरीस आणले. (महिपती—भक्तविजय अ० ४३). ७. रामराजाचा वंश चंद्रगिरी येथे होता.

राज्य वांटून घेऊन, पादशाहा असें म्हणवून घेऊन राज्य करूं लागले. त्यांचे वंश पादशाहाती करूं लागले. त्यांस[१] सुभेः—

१ हैदराबाद भागानगर, सरकार दारुल खिलाफत.	१ विजापूर, दारुल जफर.
१ दौलताबाद खुदस्ते बुनियाद, हल्लीं अवरंगाबाद.	१ सुभे आलजपूर[२] व वराड[३].
१ महमदाबाद—बेदर[४].	१ सुभे खानदेश.
	१ सुभे गोंडवण नागपूर चांदे.
३	३

हे दक्षिण साडेसाहा सुभे. यांचे पोटी महाल, प्रांत, तालुके, किल्ले, देश, दुर्ग आहेत. त्याप्रमाणे साहाजण वांटून बेदर विजापूराखालींच घेतलें. साहा पादशाहा मोठे प्रतापी होऊन पावणेतीनशें तीनशें वर्षेपर्यंत, कोणी अडीचशें, ऐसे पादशाही करते जाले.

५. सिसोदे वंश.

कलियुग प्राप्त जालें असतां सूर्यवंश सोमवंश या कुळांचे ठायीं राजपुत्र रजपूत असें म्हणवून मोरे, पवार, यादव, जाधव, कछवे, तुवर जाट, ऐसे म्हणवून क्षत्रियधर्म करून राज्य करीत आले. तुवर, मोरे, चव्हाण यांणीं इंद्रप्रस्थीं हस्तनापुरीं राज्यें केलीं. कछवे जयपुरीं राज्य करितात. जोतपूर[५] [येथें] बळीचा बंश म्हणून राज्य करितात. बुंधेलखंड गोहद प्रांतीं यादव सोमवंशी राज्य करितात. सूर्यवंश–कुलीच्या ठायीं सिसोदे[६] राजपुत्र हे कोशल देश अयोध्या प्रांतीं राज्य करीत असतां त्यांतून कोण्ही पुरूष दक्षिण प्रांतीं येऊन

---

१. 'ते सुभे' (की० प्रत). २. 'आलनपूर' (की० प्रत). ३. वऱ्हाड (इमादशाही) निजामशाहीत गेले. निजामशाही–अहमदनगर (इ. स. १६३७) शहाजहानने, आदिलशाही– विजापूर (इ. स. १६८६) व कुतुबशाही—गोवळकोंडे (इ. स. १६८७) औरंगजेबाने बुडविली. ४ बेदर (बरीदशाही). ५. जोतपूर—जोधपूर. ६. 'शिसोदे पाठारे प्रभु' (की० प्रत). मेवाडमध्ये चितोड व सिसोदे अशी एकाच घराण्याची दोन राज्ये होती. त्यांचे अधिपती रावळ व राणा या नावाने प्रसिद्ध होते. (पृ. १८ मराठी रियासत–शहाजी राजे भोसले १९३५).

अश्वत्थामाचें स्थान अशेर[१] म्हणतात तेथें कलियुग गतकली[२] पंधराशें वर्षें गेलीं, या समयांत येऊन राज्य आक्रमण करून नर्मदा दक्षणतीर विंध्याद्री व सर्व दक्षिणप्रांतींचें राज्य करीत आले. तें सोळाशें ऐशीं वर्षें त्या वंशानीं राज्य तेथें केलें. तों एकतीसशें ऐशीं वर्षें कलियुग जालें. ते समयीं शालिवाहन राजा शककर्ता जाला. त्यांणीं[३] युद्ध करून राज्य हरण केलें.

६. मेवाडचे राजे.

ते समयीं एक राजपत्नी व एक राजपुत्र पांच सात वर्षांचा राहिला. तो घेऊन नर्मदा-उत्तरतीरीं, मेवाडप्रांतीं, विंध्याद्री पर्वताचे ठायीं [राजपत्नी गेली.] आणि आपण राजस्त्री व हा राजपुत्र बो[४] ला ख ला करून एका ब्राह्मणाचे घरीं पुत्रास गाई राखण्यास ठेऊन त्याचे आश्रयें राहिली. त्यानंतर गोरक्षण करून त्या पर्वतांत असतां त्या मुलास एक लिंग श्रीसदाशिवाचें अकस्मात, अपूर्व, दिव्य, असें दृष्टीस पडलें. त्याणीं[५] ती जागा नीट करून, त्या लिंगास नित्य दुग्धाभिषेक करून, स्नान घालून, अरण्यांतील अरण्यपुष्पें व बिल्वदळेंकरून पूजा करावी, चंदनवृक्ष तोडून गंध करावें, फळें मिळवून नैवेद्य करावा. प्रातःकाळपासून सायंकाळपर्यंत लिंगाचें आराधन, पूजन, सेवा करावी. गाई अरण्यांत सोडाव्या. त्या गाईनीं सायंकाळीं आपण होऊन पुन्हा त्याजपाशीं यावें. त्याणीं घेऊन ब्राह्मणाचें घरीं यावें. याप्रकारें सदाशिवांनीं त्याची सेवा बहूत निष्ठेनें जाली, हें पाहून श्रीसांब प्रसन्न होऊन सादृश्य[६] जाले आणि वर दिला कीं, "पर्वतांतील मेवाड प्रांत याचें राज्य तुजला जयें[७] दिलें. तूं महावंशीचा रजपूत राजा आहेस. ज्या ब्राह्मणाचे घरीं राहातोस तोच ब्राह्मण अनुकूल होईल व द्रव्यही अमुक स्थळीं आहे हें घेऊन राज्य साध्य करणें. धर्मेंकरून प्रजापालन कर." ऐसें वरप्रदान जालें, व त्या ब्राह्मणासही स्वप्नगत[८] दृष्टांत जाला कीं तुझ्या गाई राखितो हा राजपुत्र आहे. यास मी त्याचे भक्तीनें

---

१. 'अशीरी' (की० प्रत). २. 'गतकली १५०० प्रमादी नाम संवत्सर युधिष्ठिर शक पंधराशें वर्ष गेला या समयांत' (की० प्रत). ३. 'त्यानें प्रमादी नाम संवत्सरीं प्रतिष्ठानीं युद्ध करून तें राज्य हरण केलें' (की० प्रत). ४. बोलाखला—गुप्त वेष? 'हा खेद करून' (की० प्रत). ५. 'त्याने' या अर्थी. ६. सादृश्य जाले—दिसले (मूळ अर्थ सारखेपणा). ७. की० प्रतीत हा शब्द नाही. ८. स्वप्नगत—स्वप्नात.

करून प्रसन्न होऊन मेवाड–राज्य दिल्हें आहे. यास तूं अनुकूल होऊन त्यास सांगितलें ते स्थानीचें द्रव्य घेऊन राज्य साध्य करावें.” याप्रमाणें दृष्टांत होतांच त्या ब्राह्मणानीं[1] त्या राजपुत्रापासून गोरक्षण मना करून, द्रव्य सांगितलें तें काढून, आपण त्याचें पुरोहितत्त्व घेऊन, त्या पर्वतामध्यें उत्तमस्थान श्रीभवानी देवी होती तेथें किल्ला बांधिला. त्याचें नांव चित्रकूट असें ठेविलें. त्यासच चितोड असें म्हणतात. ते भवानी देवी [आणि] एकलिंगजी यांचीं परमभक्ती. [तें] कुलदैवत स्थापून सर्व राज्य प्रांत आक्रम केला. भिल्ल राजे होते ते प्रतिकूल, त्यांस मारिलें; अनुकूल ते रक्षून आपले असे करून स्थापिले. श्री एकलिंगजी सांब यांचें देवालय तीर्थ बांधिलें. श्रीचितोड भवानीचें देवालय बांधिलें त्यांची पूजा–अर्चा यथास्थित चालावी असें[1] स्वास्थ्य करून देऊन, एकलिंगजीचे राज्य आणि आपण सेवक दिवाण, ऐसें करून राहिले. पुढें त्यांचे वंशीं पांचशें वर्षें त्या अन्वयें राज्य तेथेंच करिते जाले. तों शालिवाहन शक ५१२ पाचशें बारा जाले.

ते समयीं पिठोर राजा याजपासून इंद्रप्रस्थींचे राज्य सुलतान रुकनदीन याणीं घेऊन, दिल्ली असें नांव ठेवून पादशाहात करूं लागले. त्याचे वंशानीं याशीं[2] बहू वेळ युद्धें केली. परंतु [हे] बहूत पराक्रमें आपलें राज्य रक्षून राहिले. त्या वंशांत धर्मिष्ट व पराक्रमी राजे थोर थोर जाले. वरकड[3] जयपूर, जोतपूर वगैरे यांजवर पादशाहानीं स्वाऱ्या करून जेर केले. तेव्हां त्यांणीं कन्या पादशाहास देऊन डोले पाठवावे [असें] कबूल केलें; आणि पादशाहाचें नांव शिक्यांत घालून, सेवक म्हणवून, त्याचें निशाण माही[4]–मरातब नालकी[5] घेऊन, त्याचे म्हणवून, राज्य संस्थानें रक्षून राहिले. एक याणीं मात्र आपलें राज्य व हिंदू धर्म पृथक रक्षून, गोवध [न व्हावा] व बांग[6] मुलाणा[7] यांणीं राज्यांत न द्यावी असें रक्षून, चाकर न म्हणवणें; निशाण शिक्का आपला; असे अटीनें राहिले.

---

१. ‘असें स्थान करून’ (कीं० प्रत). २. याशीं—चितोडकराशीं. ३. वरकड (वि.)—इतर. ४. माही–मरातब (पु.) [फा. माही–मरातिब्]—मत्स्य व दोन सुवर्णगोल असलेले सन्मानदर्शक चिन्ह. ५. नालकी (खी) स्त्री.–बारा भोयांनी नेण्यासारखी एक पालखी. ६. बांग (स्त्री.) [फा. बाङ्ग्]—मुसुलमानी प्रार्थनेला (निमाज) बोलावण्यासाठी पुकारा. ७. मुलाणा (ना) (पु.) [अ. मौलाना]—मशीदीची व्यवस्था पाहणारा एक बलुतेदार.

त्यांणीं स्वारी करून उपद्रव केले असतां पर्वतांत जावें, पुन्हा राज्य सोडवावें, ऐसे करीत आले. श्री एकलिंगजी सांब व चितोड भवानी देवी यांची भक्ती करून, राज्य रक्षून करीत असतां, त्या वंशांत एक हजार बारा शालिवाहन शक[१] यांत श्री गडमंडळ मेवाड येथें लक्ष्मणसिंहजी महाराणा म्हणोन जाले. त्यांणीं सिंहलद्वीपींहून पद्मिणी स्त्री आणिली. हें वर्तमान दिल्लीचे पादशाहास कळलियावरि त्याणीं स्वारी करून चालून चितोडावर आले. दहाबारा वर्षें मोहीम करून बसले. युद्धें नानाप्रकारें जालीं. कालवशें त्याणीं जेरदस्तींत[२] आणिलें. तेव्हां कटा[३] करून चौदाशें सिसोदे रणांत केशरी[४] पोषाक करून चालून जाऊन पडले. स्त्रिया[५] मारिल्या[५] त्यांत एक राजस्त्री आपले दोन पुत्र एक आरससिंहजी[६] महाराणा व एक सजणसिंहजी[७] महाराणा असे भिल्लांकडे घेऊन गेली. किल्ला[८] चितोड पादशाहांनीं घेतला. राज्यही घेतलें. सर्व राजचिन्हें, दौलत नौबत लुटून घेऊन पादशाहा गेले.

नंतर पुन्हा आरससिंह व सजणसिंहजी यांणीं वयस्क होऊन तें राज्य सोडवून, चितोड घेऊन, आपण राजनगर म्हणवून दुसरा किल्ला करून राज्य आक्रमिलें. पादशाहांनीं चितोडचा दरवाजा पंचरसी होता तो काढून नेऊन आगरे[९] अकबराबाद येथें लाविला; व नोबत नेली ती खाजासाहेब[१०] पीर संस्थान अजमेर, येथें पिरास ठेविली. आणखीही दौलत, राजचिन्हें गेलीं, याजमुळें [महाराणे यांनीं] प्रतिज्ञा[११] केली कीं, 'जे समयीं दिल्लीचे यवनाचें पारिपत्य करून आपली नौबत व दरवाजा व चिन्हें सोडवावीं ते समयीं चितोडची पायरी चढावी.

---

१. कीर्तने प्रतीत 'प्रमोद संवत्सर' हा शब्द अधिक आहे. २. जेरदस्त वि. [फा झेर्दस्त्]-काबीज. याच्याविरुद्ध जबरदस्त. ३. कटा (पु०)-वध, हत्या. 'कट' (की० प्रत). ४. केशरी पोषाक करून-मारीन किंवा मरेन या निश्चेने रजपूत युद्धास जाताना केशरी पोषाख घालीत. ५. हे शब्द की० प्रतीत नाहीत. ६. आरससिंहजी (अरिसिंह)-लक्ष्मणसिंहाचा थोरला पुत्र. हा आपल्या पित्यापूर्वी अल्लाउद्दिनाने चितोड किल्ला घेताना पडला. याचा पुत्र हंमीर याने मुसलमानांचा पराभव करून चितोड परत घेतले. ७. सजणसिंहजी (सजनसिंह)-अजेयसिंहाचा मुलगा. लक्ष्मणसिंहाचा नातू (सोंधवाडा शाखा). ८. अकबराने इ. स. १५६८ मध्ये चितोड घेतले. ९. आगरे अकबराबाद-अकबराचे आवडते आगरा शहर. १०. खाजासाहेब पीर-मैमुद्दीन चिस्ती (पृ. ४३ स. च. १९२४.) ११. प्रतिज्ञा-प्रतापसिंहाने प्रतिज्ञा केली.

तोंपर्यंत निशाणें मागें चालवावीं, ताटांत भोजन करूं नये. पलंगावर निद्रा करूं नये, श्मश्रू करूं नये, जिलिबींत[१] सिंदीचे फडे[२] चालवावे.' असे नेम करून ठेविले. याप्रकारें आरससिंहजी याचे वंश दोनशें वर्षेंपर्यंत जागां जागां किल्ले महालाईत करून वस्ती केली. नंतर उदापूर शहर किल्ला करून, तेथें त्यांचा वंश याप्रमाणें नेम चालवून, यवनाशीं द्वेष करून, त्याचे न म्हणवितां राज्य रक्षून मोठे प्रतापें श्रीएकलिंगजी सांब व श्रीचितोडभवानी [यांची] भक्ती करून हा कालपर्यंत आहेत. त्यांचा वंश हल्लीं भीमसिंहजी महाराणा राज्य करीत आहेत.

श्री महाराणा सजणसिंहजी हें राज्य सोडून अलीकडे सोंधवाडा[३] म्हणून प्रांत आहे तेथें संस्थान राजधानी करून त्याचे वंश तेथें राज्य करीत आले. सजणसिंह यांचे पुत्र दिलीपसिंह महाराणा, त्यांचे पुत्र सिंहजी महाराणा, त्यांचे पुत्र भोसाजी महाराणा, ऐसे चार पुरुष [यांनीं] राज्य तेथें केलें. तों यवनांचा उपद्रव जाला, याजमुळें त्या वंशातील एक घर तेथें राहून शालिवाहन शके[४] बाराशें यांत दक्षणप्रान्ती आले. एक पुरूष आरससिंहजी यांचे घराण्यांतील कछभूज प्रांतीं आले आणि मोठे पराक्रमें तेथें राज्य सोडवून करिते जाले. हल्ली राज्य सिसोदे करतात. सजणसिंह याचे घराण्यांतील एक पुरूष हिमालयांत नेपाळ येथें जाऊन मोठे पराक्रमें राज्य सोडवून, पर्वतांतील चौसष्ट राजे यांचे राज्य घेऊन, किन्नरखंड[५] यासि वाट काढून, पलीकडे एकदोन राजे यांजवर स्वारी केली. ते समयीं लहंबा[६] गुरू म्हणून सहस्रावधी वर्षांचे पुरूष मधे आहेत, त्यांणीं यांसि सांगून पलीकडील खंडाची मर्यादा रक्षावी म्हणून तह करून दिल्हा. असे महान प्रतापी राजे जाले. हल्लीं त्याचे वंश वीर विक्रमसिंग समशेर जंग बहादूर या नांवें राज्य करितात.

७. दक्षिणेतील भोसले.

भोंसाजी महाराणा यांचे पुत्र देवराजजी महाराज दक्षिणप्रांतीं आले. ते भोसावंत 'भोसले' ऐसें म्हणवून गंगा [तीरीं] व भीमातिरीं पाळेगारी[७] करून,

---

१. जिलीब स्त्री० [फा० जिलब्]–स्वारी. २. फडे (पु०) [सं० फटा]–झावळ्या. ३. सौंधवाडा उदेपूर राज्यात. ४. बहुधान्य संवत्सर' (की० प्रत). ५. किन्नरखंड–किन्नरवर्ष नावाचे पृथ्वीच्या नऊ खंडापैकी एक. तिबेट हा प्रदेश. ६. लहंबा–लामा असावा. (प्र. ४४ स. च. १९२४). ७. पाळेगार (पु.) [पाळे–दरी+गार]–पुंड.

जे समयीं जसा प्रसंग पडला तसे राहात. दिवसेंदिवस[1] यवनाचे प्राबल्य बहूत, याजमुळें देशमुख्या व पाटिलक्या करून श्रीसिंगणापूर[2] महादेव हाच एकलिंग कुलस्वामी व श्री तुळजापूरची[3] भवानी हेच चितोडदेवी कुलदैवत [मानिते जाले.] या स्थानीं परमभक्ती करून सिंगणापूरची पाटिलकी साध्य केली. खानवटें, हिंगणी, बेरडी, देउळगांव वेरूळ, वावी, मुंगी, ऐसी वृत्ती साध्य करून त्यांचा वंशविस्तार बहूत धर्मशील, शूर व प्रतापी [असे] होत गेले. त्यांच्या मुख्य वंशीं वंशधर जाले ते:—श्रीलक्ष्मणसिंहजी महाराणा यांस दोन पुत्र—एक आरससिंह महाराणा, एक सजणसिंह महाराणा. १ श्री सजणसिंहजी महाराणा मूळ पुरुष १. त्यांचा पुढें वंश—

२. दिलीपसिंहजी महाराणा
३. सिंहजी महाराणा
४. भोसाजी महाराणा, याज—पासून भोंसले म्हणवूं लागले
५. देवराजजी महाराज
६. इन्द्रसेनजी महाराज
७. शुभकृष्णजी महाराज
८. रूपसिंहजी महाराज
९. भूमींद्रजी[4] महाराज
१०. धापजी महाराज
११. बरहाटजी[5] महाराज
१२. खलोजी महाराज, यांस खलकर्ण म्हणत होते
१३. कर्णसिंहजी महाराज, यांस जयकर्ण म्हणत
१४. संभाजी महाराज
१५. बाबाजी महाराज उर्फ शिवाजी महाराज

याप्रमाणे राणाजीचे[6] घरांतील[6] वंशांतून देवराजजी महाराज दक्षिणेंत आले. दक्षिणेंतील धर्म-उच्छेद जाला. ब्राह्मणांस पीडा बहूत, गोवध अपरिमित, [असा] देवस्थानें, क्षेत्रें, वेद, यज्ञयाग [यांचा] उच्छेद जाला. दिल्लीपती यांणीं हिंदू राजे यांचे तहामुळें बहूत धर्म-उच्छेद[7] केला नाहीं. परंतु साहा[8] यवन यांणीं फार अमर्यादा केली. ते ईश्वरास न साहे, व दाहा सहस्र वर्षें कलियुगांत वेदधर्म

१. 'दिवसंदिवस' (की० प्रत). २. श्रीसिंगणापूर महादेव हे सिंघणराजा (इ. स. १२१०–इ. स. १२४७) याने वसविले. (ता. माण, जि० सातारा). ३. श्री तुळजापूरची भवानी मराठवाड्यात. सोलापूरपासून ९ कोस, उस्मानाबाद जिल्ह्यात. ४. 'रूपसिंहजी' (सातारा प्रत). ५. 'हटजी' कोल्हापूर प्रत. 'बरबटजी' की० प्रत. ६. 'राणाजीचे वंशांतून (की० प्रत). ७. 'देव धर्म उच्छेद (को०). ८. साहा यवन—बहामनी राज्याचे तुकडे (परिच्छेद ४).

राहावा, दक्षिणेंत कावेरीतीरीं[1], कृष्णातीरीं, तुंगातीरीं विशेष राहावा हें पुराणप्रसिद्ध आहे. त्यायोगें सिसोदे, भोंसले राणाजी इकडे आले; त्यांचे कुळीं पुन्हां अवतार होऊन धर्मस्थापना घडावी ऐसा उदयकाळ प्राप्त होऊन संभाजी महाराज यांचे उदरीं चवदाशें पंचावन्न[2] या शकांत बाबजी[3] राजे परम धर्मशील, देवब्राह्मणभक्त, दानधर्मशील व संभावित होते जाले. सिंगणापूर शंभू व तुळजापूर येथील श्रीभवानी कुलदैवत यांची भक्ती बहूत करते जाले. त्या योगें त्यांचे उदरीं मालोजी राजे वडील पुत्र, कनिष्ठ विठोजी राजे, शके १४७५ चौदाशें पंचाहत्तर[4] या शकीं उत्पन्न होते जाले. त्यापूर्वी मालोजीचा जन्म शके १४७२ साधारण संवत्सरीं जाला. त्यांत कनिष्ट विठोजी राजे यांस आठ पुत्र उत्पन्न समर्थेकरून जाले. त्यांचा विस्तार निराळा लिहिला आहे.

८. मालोजी राजे भोसले.

मालोजी राजे बहूत चतुर, पुण्यशील, देवाचे ठायीं भक्तिवान सर्वविद्यासंपन्न जाले. आणि आपण स्वतां पराक्रम करावा म्हणून चौदाशें नव्याण्णव[5] या शकांत लुकजी जाधवराव याचे विद्यमाने दौलताबादचे पादशाहास भेटून घरचीं[6] घोडीं पागे लोक बारगीर[7] ठेवून सरदारी करिते जाले. त्यांस निंबाळकर यांची कन्या दिली. त्यांचे नांव दीपाबाई ऐसें ठेविलें. चाकरीमुळें वेरूळ पाटिलकीचा गांव येथें राहिलें. कुटुंबांसहवर्तमान असतां विठोजी राजे यांस पुत्रसंतान जालें. आपणास संतती नाहीं म्हणोन संतानवृद्धी व्हावी यास्तव दीपाबाई यांणीं बहूत नवस मानसीं केलें व देवधर्म अनुष्ठानें केलीं. यांत नगरचे पीर शाहाशरीफ बहूत चमत्कारिक आहेत त्यांस नवस केला. पुत्र जाले म्हणजे तुमचें नांव ठेऊं. तेव्हां ईश्वर[8] प्रसन्न होऊन प्रथम पुत्र शके १५१६ पंधराशें सोळा जयनाम संवत्सरे, उत्पन्न जाले. त्यांचें नांव शाहाजी राजे ठेविलें. तदनंतर दुसरे पुत्र उत्पन्न जाले. त्यांचें नांव शरीफजी ठेविलें. त्यांत शाहाजीराजे

---

१. 'गोदावरी तीरीं' (की०). २. 'विजय नाम संवत्सर' (की०). ३. बाबाजी राजे-बाबाजी भोसले, कर्णसिंहाचा पुत्र. जन्म इ० स० १५३३ (पृ. १०९ ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावळी १९५७). ४. 'प्रमादी नाम संवत्सरीं' (की०). ५. 'ईश्वर संवत्सर' (की०). ६. 'घोडीं लोक बारगीर ठेवून' (की०); 'घरचीं घोडीं पागे लोक ठेवून बारगिरी सरदारी' (की०). ७. बारगीर (पु०) [फा० बार्गीर्-फा० बारा-घोडा]-मालकाचा घोडा ठेवणारा शिपाई. ८. 'ईश्वरसत्तेने' (की०).

रूपेंकरून व गुणेंकरून परम सुंदर, वय पांच वर्षांचे असोन बोलणार चतुर, घोड्यावर बसणें, शस्त्रविद्यादी सर्व करण्याचा हव्यास, याप्रमाणें गुणसंपन्न होते जाले. पूर्व-ब्रह्मसूत्रयोगें[1] जाधवराव यांस शके १५१८ पंधराशें आठरा यांत कन्या उत्पन्न जाली. शाहाजी राजे गुणसंपन्न पाहून मालोजी राजे त्यांस बराबर घेऊन हिंडूं लागले. मालोजी राजे यांणीं पादशाहींत कामकाजें केलीं. दिवसें दिवस योग्यता वाढत चालली.

९. लुकजी जाधवराव व रंगपंचमी.

तों कोण्हे एके दिवशीं लुकजी जाधवराव देशमुख, सरकार दौलताबाद, सिंदखेडकर, निजामशाई मनसबदार यांणीं शिमघा प्राप्त जाला [असतां] त्याचे पंचमीचा रंग खेळावयास समारंभ करून, सर्व मातबर[2] [लोक] बोलावून आणून नाच-रंगाचा समारंभ आरंभिला. त्यांत सर्व आप्तविषयी[3] मातबर सरदार बोलाविले. त्यांत मालोजी राजे यांस बोलावून नेलें. त्यांणीं शहाजीराजे समागमें नेले. पंधराशें एकवीस या शकांत विकारी नाम संवत्सरे. तेव्हां शाहाजीराजे परम सुंदर, गुणवान पाहून आपलेजवळ जाधवराव यांणीं बसविले. जाधवराव यांस कन्या एकच. तेही वय तीन वर्षांचें याजमुळें सभेंत आली. तिजलाही जवळ बसविलें. उभयतांही सुंदर, समान वय पाहून जाधवराव बोलिले जे—'मुली, तुजला हा भ्रतार पाहिजे कीं काय? उभयतां जोडा योग्य दिसतो.' याप्रमाणें हर्षेंकरून त्यांचा त्यांचा जन्मांतर योग, ईश्वरी सूत्र होणार तदनुरूप जाधवराव यांचे चित्तांत येतें जालें. आणि उभयतांनीं मूल-स्वभावें करून एकमेकांवर रंग गुलाल टाकिते जाले. त्या समयीं सभेंत आप्तवर्ग बसले [होते.] तेही हास्य करून 'जोडा योग्य, युक्त आहे' असें बोलिले. तेव्हां मालोजी राजे सर्वांस बोलिले जे, "जाधवराव आमचे व्याही जाले. त्यांचें बोलणें सर्वांनीं तुम्ही ऐकिलेंच आहे" [असें] म्हणतां सर्वांनीं 'प्रमाण आहे' ऐसें बोलिले. जाधवराव उत्तर न करितां स्तब्ध राहिले.

याप्रकारें समारंभ जालियावर दुसरे दिवशीं जाधवराव यांणीं सर्वांस भोजनाचें

---

१. पूर्वब्रह्मसूत्र न०—दैव, ब्रह्मदेवाने नेमलेली व्यवस्था. २. मातबर-मातब्बर (वि०) [अ० मुअतबर्]—प्रतिष्ठित, माननीय. ३. 'आप्तविषय वगैरेंत मालोजी-राजास' (की०).

आमंत्रण केलें. राजे यांसिही केलें. तेव्हां यांणीं उत्तर केलें. 'आम्ही तुम्ही व्याही जालों. याउपरि भोजन लग्नसमयींच होईल.' असें जालें असतां, हें वर्तमान जाधवराव यांचे स्त्रीस कळलें. तेव्हां त्यांणीं जाधवराव यांस "सोयरीक या मुलीस करणें ते मातब्बर मनसबदार[1] पाहून हे कन्या[2] बहूत समारंभें, ज्याचे घरीं फार दौलत, वस्त्रें, अलंकार तेथें द्यावयाची. आपण सभेंत बोललां हें अनुचित. यांस देणें आमचे चित्तास येत नाहीं." म्हणून आग्रह धरिला. ते समयीं जाधवराव 'आम्ही स्वाभाविकपणें बोलिलों. वचन कांहीं गुंतलें नाहीं' ऐसें स्त्रीचे समाधान करिते जाले. आणि राजे यांस निरोप पाठविला कीं, "शरीरसंबंधाची गोष्ट आपण बोलूं नये. आमचे घरांत कोणाचे विचारास येत[3] नाहीं. ब्रह्मसूत्र असेल तेथें घडेल." त्याचें उत्तर राजे यांणीं सांगून पाठविलें जे—"इतके समक्ष सभा असंभाव्य[4] असतां आपण बोललां तें अप्रमाण कसें होईल? आम्हांस हे जरूर मूल कर्तव्य आहे." ऐशीं परस्परें आग्रहाचीं बोलणीं वाढत चालिलीं. मध्यस्थ रितीनें निश्चयांत गोष्ट न ये. दुराग्रह दोहींकडे वाढला. ऐसा प्रसंग प्राप्त जाला.

१०. मालोजीस साक्षात्कार.

[असा] आग्रह करून राजे बहूत प्रयत्न व श्री देवीची प्रार्थना करिते जाले. शके १५२५ शोभकृत[5] नाम संवत्सरे माघ शुद्ध १५ पौर्णिमे दिवशीं दैवयोगें करून आपलें शेत बाग मळा होता तेथें एकटेच जावें असे मनांत येऊन जाते जाले. अस्तमान समय जाला. ते समयीं एकाग्रचित्तें जाधवराव यांचा आपला कलह श्री कसा सिद्धीस नेहील? आम्हांस भाग्य नाहीं म्हणून वचनें केलीं. "सोयरिक दुसरियास देणार तेव्हां पुरुषार्थच काय उरला? याहून मरण श्रेष्ठ." असे चिंताग्रस्त असतां अकस्मात श्री देवी भगवती स्त्रीरूपें परम लावण्य, शुभ्रवस्त्रपरिधान, नाना प्रकारचे सुवर्णरत्नालंकारभूषणें[6] करून युक्त, भालीं कुंकू-मळवट, नासिकीं मुक्ताफळ दैदीप्यमान,[7] ऐसें दर्शन देती जाली.

---

१. मनसबदार (पु०)–[फा० मन्सब्दार]–अधिकारी; हुद्देकरी. २. 'कन्यादान' (सा०). ३. 'घडत नाहीं' (सा०). ४. असंभाव्य वि०-अतर्क्य. येथें 'मोठी' या अर्थी. ५. 'शोभन' असे हवे. ६. 'सुवर्णमय अलंकारें युक्त' (की०). ७. दैदीप्यमान—व्याकरणदृष्ट्या 'देदीप्यमान' असे हवे. दीप्+यङ्+शानच्—दीप् (प्रकाशणे) या धातूचे कर्मणि पौनःपुन्यार्थक वर्तमानकाळाचे कृदन्त.

ती अवलोकन करून नेत्र झांकले, भयशंकित होऊन भ्रांतिगत दिशा जाली असतां, भगवतीनेंच यांस आश्वासन देऊन "मी देवी आहें. तूं भय पावूं नको. सावध हो. तुझा भाव शुद्ध पाहून तुजवर कृपा करावी म्हणोन प्रसन्न होऊन दृश्य जालें.[१] तुझे कुळी श्रीसांब अंशें करून अवतार घेऊन धर्मस्थापना करणार. देवब्राह्मणांस पीडा जाली आहे, ती दूर जाली[२] पाहिजे. याजकरितां तुजवर प्रसन्न जालें.[१]" म्हणतांच यांणीं साष्टांग नमस्कार घातला आणि अंजुली जोडून खालीं पाहात उभे हर्षें गदगद रोमांच [युक्त] होऊन राहिले. ते समयीं श्री भगवतींनीं वरप्रदान दिलें कीं, 'तुझे वंशीं अवतार पुरूष शककर्ता होईल, तो दुष्टांचा संहार करून धर्मरक्षण करील व तुझे वंशीं सत्तावीस पुरूष राज्य करतील' असा वर देऊन जवळ वारूळ होतें तें दाखविलें. देवीनें 'यांत द्रव्य विपुल आहे तें घेणें. तुझें मनेच्छित[३] प्राप्त होईल' असें सांगून अदृश्य जाली.

त्यानंतर राजांची भ्रांती जाऊन देवीचा साक्षात्कार जाला असतां आपण विस्मृती पावलों, भाषण केलें नाहीं, म्हणून बहूत व्याकुलता [प्राप्त जाली.] व श्रीची प्रसन्नता जाली, दर्शन जालें या हर्षें कृतकृत्यता मानून घरास जाणें अथवा तेथून उठणें विसरले. प्रहर रात्र जाली असतां विठोजी राजे यांणीं मालोजीराजे अद्याप कांहीं आले नाहींत, कोठें आहेत म्हणोन समाचारास सेवक पाठविले. तों राजे अरण्यांत, बागेंत आहेत, येण्याचा मनोदय नाहीं, म्हणोन सेवक गेले होते त्यांणीं येऊन सांगितलें. त्याजवरून आपणच निघोन बागेंत गेले. ते समयीं त्यांजवळ श्रीचा प्रसाद साक्षात्कार जाला हें वृत्त संपूर्ण सांगितलें. त्याजवर तेही बहूत हर्षायमान होऊन रात्र फार जाली, घरास चलावें म्हणोन बोलिले, आणि घेऊन आले. त्याजवरि दुसरे दिवशीं श्रींनीं वारूळ दाखवून द्रव्य सांगितलें तेथें जाऊन आहे नाहीं पाहावें; परंतु द्रव्य साध्य जालियास कसें आणावें, कोठें ठेवावें; राज्य यवनांचें; द्रव्य जाऊन प्राण व प्रतिष्ठा दोन्ही जाणार, ऐसें चिंतन[४] केलें. तों ते दिवशींचे रात्रीस श्रीचा दृष्टांत जाला कीं, "तूं भय कां पावलास? मी प्रसन्न होऊन द्रव्य दिलें, त्यास विघ्न कदापी होणार नाहीं. या द्रव्येंकरून बहूत दान धर्म करावा, संपन्नता विशेषात्कारें वाढेल.

---

१. 'झालें' (की०). २. 'करणार' (की०). ३. 'मनोरथ सिद्धीस जातील' (की०).
४. चिंतन-चिंताग्रस्त, काळजीनें व्याप्त.

भयच वाटत असल्यास द्रव्य काढून श्रीगोंदें येथें शेषावा नाईक पुंडे[1] परम भले द्रव्यवान आहेत, त्यांचे घरीं ठेवावें; तो तुझें द्रव्य ठेवून तुजला पाहिजे तसें देईल." याजप्रमाणें दृष्टांत जालियावरि मालोजी राजे यांणीं बंधूस हें वर्तमान सांगून, तिसरे दिवशीं रात्रीस उभयतां बंधू व विश्वासू माणसें दोन चार घेऊन वारुळासंनिध जाऊन खणावयासि लागले. तों आंत मोठा भुजंग सर्प पाहिला. ते समयीं सर्वही भयाभीत होऊन पळाले. आणि मालोजी राजे त्या सर्पापुढें दूर उभे राहून हात जोडून प्रार्थना केली कीं, "श्री देवींनीं येथें द्रव्य मजला सांगितलें तें प्रमाण आहे, तरि तुम्हीं कृपा करून द्यावें, स्थळ सोडून जावें" म्हणतांच तो सर्प तेथून निघोन गेला. नंतर यांणीं खाणून सर्व द्रव्य घेऊन आले. ते दिवशीं घरींच[2] ठेवून विचार केला जे—'श्रीगोंद्यांत श्रींनीं सांगितलें तेथें नेऊन ठेवांवें' म्हणोन शेषावा नाईक यांचे घरीं गेले. त्यांणीं यांस पाहातांच बहुत सन्मानयुक्त नेऊन बसविलें, आणि कां आलेत म्हणोन विचारलें. एकांतास घेऊन गेले. त्यांसही दृष्टांत जाला होता कीं, "यांचें द्रव्य तूं ठेवणें आणि यांस पाहिजे तसे देत जाणें." हें वर्तमान राजे यांस त्यांणीं सांगितलें. नंतर राजे यांणीं द्रव्य ठेवावयाचें आहे तें सांगितलें. तें नाइकांनीं मान्य केलें. ते दिवशीं यांस घरीं ठेऊन आदर केला, जेवणास उठविलें; भोजन जालियावरि 'तुम्हास श्रीनीं द्रव्य दिलें, तेव्हां भाग्योदयच तुमचा दिसतो. उत्तम आहे. तुम्हांस दौलत राज्य प्राप्त जालियावर तुमची पोतेदारी[3] वतनी आम्हांस परंपरागत करून द्यावी," ऐसे बोलिले. यावर यांणींही मान्य केलें. नंतर परस्परें आण[4] शफथ करून घरास आले आणि द्रव्य नेहून[5] त्यांचे घरीं ठेविलें.

श्रीचे वरेंकरून आपलें घरीं द्रव्य जालें. त्याप्रभावेंकरून दिवसेंदिवस अधिकच योग्यता वाढली. सर्वांसही मान्यता[6] [वाढूं लागली.] जेथें जावें तेथें हे थोर आहेत, असें उदितभाग्य वाढूं लागलें. निजामशाही चाकरी करीत होतेच. घरीं घोडे आणखी खरेदी [करून] पागा वाढविली. हजार पांचशें केली. श्री-शिखर महादेव येथें चैत्रीं यात्रा बहूत येणें, उदक नाहीं, यात्रेस श्रम होतात [असें] जाणून मोठें विस्तीर्ण तळें बांधिलें. त्यांत उदक अपरिमित राहूं लागलें.

१. 'पुंडे त्रिवर्ग बंधू' (की०). २. 'घरीं येऊन' (की०). ३. पोतदारी' (सा० व की०). पोतदार-पोतेदार (पु०) (फा०)-नाणेपारखी. ४. 'आपण' (सा०). ५. नेहून-नेऊन. ६. मान्यता (स्त्री०)—महत्त्व, मोठेपणा.

याजमुळें यात्रेस फार सुखावह जालें. व श्रीवेरूळ येथें घृष्णेश्वराचें[1] देवालयाचा जीर्णोद्धार केला व शिवालय तीर्थही बांधलें. ऐसे जागां जागां देवालयें व क्षेत्रीं धर्मही देवीचे आज्ञेप्रमाणें करिते जाले. आणि जाधवरावांचे शरीरसंबंधाचा प्रयत्न कसा करावा हें बहूत चिंतन लागलें.

११. पादशहाचा लुकजीस आदेश.

त्यानंतर निंबाळकर अनुकूल साह्य करून वर्तमान पादशहास श्रुत केलें कीं, "जाधवराव यांचें आमचें सर्व सभेंत या रीतीनें बोलणें जालें असतां, आग्रहास पडून, शरीरसंबंध करीत नाहीं म्हणतात." तेव्हां पादशहांनीं जाधवराव यास आज्ञा सांगून पाठवली कीं, 'भोसले यांचा तुमचा करार शरीरसंबंधाचा जाला असतां आग्रह करितां तो करूं नये. मूल द्यावी.' त्याजवरून जाधवराव यांणीं अनमान[2] करून उत्तर पाठविलें. तेव्हां 'अनमान काय निमित्त करतात,' हे विचारावयास पाठविलें. त्या समयीं "यांचें भाग्य वैभव आमचे बराबरीचें नाहीं, वरकड शरीरसंबंधच आहों. आमचे घरांत सर्वांचे विचारें समान स्थल पाहून कन्या द्यावी, ऐसें आहे." ते समयीं पातशाहाचे मनांत आलें कीं, "आम्ही सांगितलें असतां आग्रह करितात. त्या अर्थें मालोजी भोसले यांस त्यांजहून सवाई मनसब वैभव देऊन हे गोष्ट करावी. भोसले मनसब द्यावयास योग्य व शूर. कामें काजें ही केलीं आहेत." म्हणोन पंचहजारी[3] मनसब, 'राजे' ऐसा किताब लिहून, शिवनेरी जुन्नर वगैरे तालुका सरंजाम[4] व साहेब-नौबत[5] दिल्ही. जाधवराव याहून भाग्यवान केलें. आणि याउपरि यांचे पुत्रास कन्या द्यावी म्हणून आज्ञा केली. तेव्हां जाधवराव व त्यांची स्त्री [इत्यादिक] सर्वांसही हर्ष होऊन पादशहाचे मनोगत व मूलही सुंदर, गुणवान, कुलीन म्हणोन मान्य करिते जाले. दौलताबादेसच लग्नसमारंभ करिते जाले. शके १५२६ यांत लग्न

---

१. घृष्णेश्वर–(सं० घृसृण–कुंकुम, केशर)–बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक. घुसृणेश शिवालय एक नाव आहे. २. अनमान (पु०) [सं–अ+मन्] दुर्लक्ष. काव्येतिहास-संग्रहकार 'अमान्य' असा अर्थ देतात. (पृ. ४६ स. च. १९२४.) कीं० प्रतीत-हा शब्द नाही. ३. पंचहजारी मनसब–पाच हजार घोडदळ ठेवण्याचा अधिकार ४. सरंजाम पु० [फा० सरञ्जाम्] जागीर. ५. साहेबनौबत (स्त्री०) [अ० साहिब्-नौबत] हत्तीवरील डंका.

केलें. लग्नांत खासा पादशहा येऊन योग्यता दिली. फारच समारंभेंकरून लग्न [जालें,] व तरतुदेनें[1] पादशाहास मेजवानी व वरकड वजीर व सरदार यांस [मेजवान्या] केल्या. बहूत द्रव्य खर्चिलें. साडे[2] करून त्या मुलीचें नांव जिजाबाईसाहेब ठेविलें.

१२. शहाजीस वजिरीची वस्त्रे.

त्याजवर कांहीं दिवस गेलियावर पादशाहा वारले. त्यांस मूल[3] दोन. एक आठ वर्षांचा व एक सहा वर्षांचा [असे] लाहान होते. मुलांची आई बेगम [यांनीं] कारभारी कोण करावा असें सारे मनसबदार जमा करून मसलत केली. त्यांत शाबाजी अनंत, 'चतुर' ज्यांस म्हणतात ते होते. त्यांणीं "शाहाजी राजें गुणेंकरून बुद्धीकरून [युक्त] मर्द, शूर, द्रव्याढ्य, इत्यादी सर्वलक्षण[4]-संपन्न ऐसे पाहून वजिरी यांसच द्यावी तर हे पातशाहात जतन होते." याप्रमाणें निश्चय करून बेगमेस अर्ज केला. त्यांणींही फारच उत्तम आहे म्हणून, हेंच कर्तव्य सिद्धांत करून, शाहाजी राजे यांस वजिरीचीं[5] वस्त्रें दिल्हीं. बहुमान देऊन वजिरी शके १५४१ पंधराशें एकेचाळीस यांत सांगितली. आणि पादशाहाजादे यांस शाहाजीराजे यांचे मांडीवर बसविलें. 'राजे' ऐसा किताब होता तो 'महाराज' ऐसे पत्रीं लेहूं[6] लागले. याजवरि राजे सर्व पादशाहातीचा आटोप[7] करून शाबाजी चतुर यांचें अनुमतें दौलत चालवूं लागले. याप्रमाणें कांहीं दिवस चाललें.

१३. शहाजीविरुद्ध कट.

नंतर सारे मनसबदार एकत्र करून विचार केला कीं, मलिकअंबर हे विजापूरचे सरदार, चांगसखान यांचे कारभारी. चांगसखान खावंद वारला. त्याजवरून[8] यागी[9] होऊन विजापूरनें[10] निघोन दौलताबादेस फकिरीवेश धरून होते. ते शाबाजीपंत

---

१. तरतूद (स्त्री०) [अ. तरद्दुत्]–व्यवस्था. २. साडे–साडा (पु०)–वधूस द्यावयाची साडी. ३. 'मुलें' (की०). ४. 'गुण' (की०). ५. शहाजींचा जन्म शके १५१६ चैत्र शु. ५ (दि. १८–३–१५९४) रोजीं झाला. (पृ. २० म. रि. शहाजीराजे भोसले (१९३५). तो यावेळी २५ वर्षांचा होता. मलिकंबर इ. स. १६२६ मध्ये मरण पावला (पृ. ३७ सदर). शहाजीच्या वजिरीचे हे साल बरोबर दिसत नाही. ६. 'लिहूं' (की०) ७. आटोप (पु०)–संरक्षण. ८. 'त्या योगें' (की०). ९. यागी (वि०)–विरक्त. १०. विजापूरने–पंचम्यर्थी तृतीया.

व सर्व मिळोन [विचार करिते जाले.] "फकीर अवलिया दिसतो; परंतु बहूत शाहाणे योग्य, होय; कोण्ही मातबर आहे; परीक्षा करुन दौलतींत शाहाणे माणूस राहावयाजोगे कोण्ही मातबर आहे." म्हणून फकिरी सोडवून दौलत सरंजाम देऊन बाळगिले. त्याजवरि त्यांणीं सर्व यवन यांशीं भेद करून "नांव पादशाहा, परंतु सर्व आक्रम हिंदूंनीं केला, हें चांगलें नाहीं. व शाहाजी राजे वजीर होऊन, धणी त्यास अनुकूल, बहूत योग्यता वाढली." हें सर्व यवनांस दुःसह, व जाधवराव यांस आपणांहून अधीक जाले; वजीर, तेव्हां त्यांचें घरीं जाणें येणें असह्य, म्हणून यवनांचे संमतांत मिळोन सर्व[1] यांशीं द्वेष करूं लागले.

महाराजापाशीं नारो त्रिमल्ल कारभार करीत होते. शिवनेरी किल्ला व जुन्नर वगैरे तालुका राजे यांचेकडे होताच. त्यालगतीं चाकणचें[2] ठाणें मातबर, त्याखालीं प्रांतही चांगला, जाणून महाराजांनी आपणाकडे तालुका ठाणेंसुद्धां करून घेतला. चाकणचें ठाणें पूर्वीं बराबर[3] हा हबशी होता, त्याणीं शके बाराशें सोळा जयनाम संवत्सरे, बांधिलें व बावनकसी देवजी मजगा मलकंबरी ऐसें बांधून पाळागारी करून होता. तो मेलियावर तालुका निजामशाही जाला. याउपरि राजे यांणीं आपणाकडे घेतला. त्या तालुक्याचे बंदोबस्तास दादाजी कोंडदेव कुलकर्णी मौजे मलठण तर्फ पाटस, प्रांत पुणें यांस पाठविलें. जिजाबाईसाहेब यांस प्रथम पुत्र जाले, त्यांचें नांव संभाजी राजे ठेविलें. [असो]

शाहाजी राजे यांचा द्वेष सर्व कारभारी मनसबदार[4] करूं लागले. तथापि यांची जड[5] भारी. मनसुब्यांनीं हरएकप्रकारें राजास हारीस आणावें, हें न घडे. ते समयीं हे पादशाहात बुडाली तरी बुडो, परंतु हिंदू राजे यांचा कारभार चालूं न द्यावा, ऐसा सर्व यवन यांणीं कट केला. त्यांस जाधवरावही अनुकूल जाले. आणि दिल्लीस राजकारण करून अलमगीर[6] पादशाहा याची फौज मदतीस आणविली. तें राजकारण सिद्ध होऊन दिल्लीहून मीरजुमला सरदार [व] पंचवीस तीस हजार फौज चालून आली. ते समयीं शाबाजी अनंत यांचा व राजे

---

१. 'समस्त' (की०). २. चाकण–पुण्याहून उत्तरेकडे सुमारे २० मैलांवर. एका हबशी पाळेगाराने येथे १२९४–९५ च्या सुमारास चौकोनी भुईकोट व खंदक बांधला असे काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात. (पृ. ४९ स. च. १९२४). ३. 'बरार' (की०). ४. 'मनसबदार मातबर' (की०). ५. जड (स्त्री०)–वजन. ६. अलमगीर हे औरंगजेबाचे नाव होते. येथे शहाजहान असे हवे.

यांचा घरोबा बहूत, त्यांणीं सल्ला दिली, 'पादशाही चाकर निमकहराम[1] होऊन दौलत बुडवितात. तुम्हीं याजउपरि विचार पाहून चालावें.' याजप्रमाणें सांगितल्यावरि राजे यांचें म्हणणें पडलें, 'काय चिंता? दिल्लीची फौज आली तर मनसबा करून व युद्ध करून पराभव करितां येईल. धणी मात्र कायम पाहिजे' ऐसें हिमतीनें सांगितलें असतां, शाबाजीपंत यांचे सलेस[2] न ये. 'घरफूट चांगली गोष्ट दिसत नाही. धणी बायको व मुलें पडलीं. आपलें राजकारणही दुलंग[3] असावें.' त्याजवरून राजे यांणीं नारोपंत मजमदार[4] यांचे भाऊ बाळकृष्णपंत हणमंते, राजकारण विजापूरचें असावें म्हणून सुलतान शिकंदर पातशाही करीत होते, त्यांचे मुख्य यख्तियारी[5] कारभारी मुरार जगदेवराव [यांजकडे पाठविलें. त्यांनीं] त्यांची भेट घेतली. राजकारण सिद्ध केलें. त्यांचाही आदर बहूत पडला जे, "मातबर उमदे सरदार व काबील[6] यांचें राजकारण अनायासें आलें.[7] त्यांस आणून ते पादशाहात क्षीण जाली आहेच, त्यांतील भाग[8] आपण साध्या करावा." हें चित्तीं आणून जाहागीर मनसब देण्याचा करारनामा ठरावून दिला आणि वकिलास बहुमान वस्त्रें, जवाहीर देऊन राजे यांजकडे पाठविलें.

१४. लुकजी जाधवरावाचा फितूर.

याजवरि दिल्लीची फौज मीरजुमला घेऊन आले. तेही समीप येऊन पोहोंचली. त्यांस सारे सरदार जाधवराव मलीक[9] वगैरे जमाव करून सामोरे जाऊन ते व हे एक होऊन चालून आले. ते समयीं राजांनीं विचार केला जे :—दौलताबाद मैदान मुल्ख यांत लढाई घेणें चांगलें नाहीं. हा विचार करून कोंकणांत माहुली[10] किल्ला येथें पादशहा [व] बेगम साहेब यांस घेऊन गेले. नंतर सारी फौज माहुलीस चालून गेलियावर तेथें साहा[11] महिने युद्ध नानाप्रकारें केलें.

---

१. निमकहराम (वि०) [फा० निमक्–नमक्(मीठ)+अ० हराम्–(निषिद्ध)–बेइमान. २. सला (पु. स्त्री.) [अ० सलाह]–हितवाद. ३ दुलंग–दुलग वि० [दु (दोन)+अलंग (ओळ)–दुटप्पी. ४ मुजुमदार (पु०) [अ० मज्मूअ]–वसुली कार्कून. ५. यख्तियारी (पु०) [अ० इख्तियारी]–अधिकारी. ६. काबील (वि) [अ० काबिल्]–कर्तबगार. ७. 'जालें' (सा०). ८. 'प्रांत' (की०). ९. मलीक–मलिकंबर दिल्लीच्या फौजेस सामोरा गेला हे अनैतिहासिक होय. कारण तो दिल्लीकरांच्या नेहमी विरुद्ध असे. १०. माहुली किल्ला—ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात. ११. 'सहा महिने सुद्धां सामग्री तयारी करून युद्ध केलें' (की०).

त्यांत त्या फौजेवरि छापे घालणें व मोर्चे[1] मारणें व लढाई इत्यादी [करून] बहूत हैराण फौज केली. ऐसें असतां बेगमसाहेब इजकडे त्यांणीं राजकारण करून भेद केला. त्याजवरून[2] कची[3] होऊन हिंमत निघोन गेली.[2] जाधवराव यांणीं बुद्धिभ्रंश केला. तेव्हां आपले सारे सरदार यांजकडे[4] राजकारण लाविलें. हें वर्तमान शाहाजी राजे यांस समजतांच खावंद दुलंग जाला याउपरि आपण आग्रह करणें [यास] प्रयोजन नाहीं. आपण यांचे म्हणविलें. निमक खाऊन पादशाहात आपलेसाठीं खराब केली, बुडविली, हें [अपेश] कशास घ्यावें? खावंदच त्यांस अनुकूल जाला, त्याचे दैवेंकरून घडणें तैसें घडो. म्हणून विजापूरचें राजकारण सिद्ध जालेंच होतें, तिकडे जावें, ही पातशाहात सोडावी, ऐसा विचार करून आपली जमियेत,[5] सलतनत,[6] फौज, कुटुंब घेऊन शके १५४८ यांत निघोन चालिले. ते समयी शरीफजी राजे यांस सरदारी, लोक व सरंजाम निराळा होता, त्यांस तुम्ही तिकडे मिळोन असावें, असें सांगून ते पादशाहींत राहाविले,

१५. शहाजीचा पाठलाग.

[इकडे] जाधवराव फौज कांहीं घेऊन पाठलाग करीत आले. त्याचा मुजाका[7] न धरितां शिवनेर तालुकियांत येऊन, जिजाबाईसाहेब गुरुदर[8] होतीं, त्यांस त्या तालुकियाचा बंदोबस्त यथास्थित करून, यांस नेणें ठीक नाहीं म्हणून ठेविलीं. बराबर पुत्र संभाजी राजे घेतले. बाईसाहेब यांजपाशीं कारभारी बाळकृष्णपंत[9] हणमंते व संक्रोजी नीळकंठ व सोनोजीपंत व रघुनाथ बल्लाळ कोरडे ऐसे व[10] कांहीं सरदार ठेविले. आपण दरमजल चालले. जाधवराव व फौज मागें आली असतां फलटणपर्यंत आले. फौजही पोहोंचली. फलटणीं जगपाळ नाईक निंबाळकर पुंडपणा करून दाहा हजार फौजेचे सरदार,

---

१. मोर्चे मारणें—मोर्चे लावणे (तोफा डागणे) असा मूळ शब्दप्रयोग आहे. येथे 'मुसुल्मानांच्या मोर्चांवर हल्ला करणे' या अर्थी. 'मोर्चे लावणें' (की०). २. 'हिंमत खचली' (की०). ३. कची-(कच्ची)-संकटग्रस्त. ४. 'थांनीं याजकडे' (की०). ५. जमियेत, जमियत, जमेत (स्त्री०) [अ० जम्इयत्]-जमाव. ६. सलतनत (स्त्री०), सल्तना (पु०) [अ० सल्तनत्]-फौज. ७. मुजाका (स्त्री०) [अ० मुझायका]-हर्कत, पर्वा. ८. गुरूदर (होतीं-) (गुरु+उदर)-आदरार्थी अनेकवचनी नपुंसकलिंगी प्रयोग. ९. 'कृष्णाजीपंत' (की०). १०. 'असे कांहीं सरदार ठेविले' (की०).

महाराजांचे आप्त[1], ते हे एक जाले, याजमुळें याउपरि आपला परिणाम नाहीं, समजोन जाधवराव व फौज माघारी निघोन गेली. आणि पादशाहा व बेगम यांस दौलताबादेस घेऊन गेले. दिल्लीची फौज कुमकेस आणिली होती, त्याशीं करारमदार होता त्याप्रमाणें देऊन परत लावून दिली. ती निघोन गेली. राजे विजापुरीं निघोन आले. ते समयीं दौलताबादेकडील शिवनेरी[2] वगैरे तालुका होता त्याचा बंदोबस्त करून कायम राखिला आणि विजापुरीं पावले. तेव्हां मुरारपंत सामोरे येऊन आदरें घेऊन गेले. पादशाहाची भेट घेतली.[3] कराराप्रमाणें कर्नाटक प्रांतीं बेंगरूळ, होसकोटा, बाळापूर व सिरकटे वगैरे तालुका[4] हवालीं केला. त्याजवर बंदोबस्तास कारभारी नारोपंत हणमंते पाठविले. दौलताबाद पादशाहींतील मातबर, कर्ते, नामांकित वजीर[5], सरदार आले. याजउपरि ते पादशाहातच[6] आक्रम करावयासि येईल जाणोन पादशाहा व मुरारपंत हर्ष मानिते जाले.

१६. शिवाजीचा जन्म.

त्या समयांत इकडे जिजाबाईसाहेब गुरुदर[7] म्हणोन शिवनेरी येथें ठेविलीं होतीं. त्यांस [पुत्र जाला.] शिवनेरी येथें शिवाई देवी बहूत जाग्रत आहे, तिजला बाईसाहेबांनीं नवस केला जे, पुत्र जाला म्हणजे तुझें नांव ठेवीन. त्यानंतर दिवस पूर्ण होऊन प्रसूत सुसमयीं शके १५४९ पंधराशें एकूणपन्नास, प्रभवनाम संवत्सरे वैशाख शु॥ २ गुरुवारीं पुत्र जाला. शुभ चिन्हें जालीं. विजापुरीं महाराज यांस शुभ शकुन जाले. सा[8] ग्रह उच्च पडले. सर्वलक्षणसंपन्न जाले. नांव शिवाजी राजे ऐसें ठेविलें. शाहाजी राजे यांस स्वप्नगत दृष्टांत जाला कीं, 'तुझे वंशीं अवतारी पुरूष होणार तो पुत्र निर्माण जाला.' हें वर्तमान [कळविण्यास] हुजरे, कारकून विजापुरास गेले त्यांस सोन्याचीं कडीं, वस्त्रें बहुमान दिल्हे. आणि दानधर्म गोप्रदानादी बहूत केला. साखरा, मिठाई वाटली.

---

१. आप्त–निंबाळकर हे शहाजीचे मामा. मालोजीची पत्नी दीपाबाई ही निंबाळकर घराण्यातली. २. 'शिवनेरी व घोडप' (की०). ३. 'झाली' (की०). ४. पाचवा परगणा कोलार येथे गाळला आहे. (पृ. ५० स. च. १९२४). ५. वजीर–शहाजी ६. 'त्यांस पादशाहाच' (की०). ७. 'गरोदर' (की०). ८. शिवाजीच्या परिचित असलेल्या जन्मकुंडलीवरूस ४ ग्रह उच्चींचे रवि, चंद्र, मंगळ व गुरु व स्वगृहींचा १ शुक्र असे होते. (पृ. ५१ स. च.).

बहुत संतोष होऊन नाच वगैरे समारंभ केला. पादशाहास कळोन त्यांणींही[1] बहुमान वस्त्रें पाठविलीं. याप्रमाणें आनंद होता जाला.

१७. तंजावराकडील राजकारण.

नंतर शके[2] १५५० यांत मोहिते यांची कन्या निश्चय करून दुसरें लग्न शाहाजी महाराज यांणीं केलें. त्यांचें नांव तुकाबाईसाहेब[3] असें ठेविलें. त्यांचे उदरीं पुत्र जाले, त्यांचे नांव वेंकोजी राजे ऐसें ठेविलें. आणि जाहागीर बाळापूर होसकोटें होतें तिकडे गेले असतां विजयराघव म्हणून चंजावनूरकर संस्थानी होते. त्यांस पांचशत स्त्रिया होत्या. त्यांचें व त्रिचनापल्लीचे संस्थानिक यांचा कलह वाढला. त्रिचनापल्लीकरांनीं राजे यांशीं राजकारण केलें जे, विजयराघव यांजवरि मसलत करावी. त्यांत [तें] ठाणें हस्तगत करून आम्हांस द्यावें. फौजेचा खर्च व पांच लक्ष रुपये व लूट येईल ते आपणास[4] देऊं." त्याजवरून त्यांचे कुमकेस जाऊन चंजावनूरकरावर चालून गेले. विजयराघव बाहेर येऊन युद्ध बहूत जालें. ते समयीं महाराजांनीं फौज निवड[5] करून, घोडे चालवून, बहुत कजाखी[6] करून विजयराघव यांस रणांत मारिलें[5]. [त्याचा] मोड जाला. फौज[7] लुटली आणि [महाराज] ठाणें यांत शिरले[7]. ते संस्थान बहुत चांगलें पाहून आपणच बंदोबस्त केला. त्रिचनापल्लीकराचा तह ठाणें आम्हांस द्यावें, द्रव्य घ्यावें, ऐसा होता. तें द्रव्य आम्हांस नको, संस्थानच ठेवावें, ऐसें बोलोन आपणाकडे राखिलें. आणि राजधानीस योग्य म्हणोन तेथें कांहीं दिवस राहाते जाले.

१८. मलिकंबराचे मीरजुमलाशी युद्ध.

[इकडे] दौलताबाद येथें बूसाहेब[8] व शाबाजी अनंत व माधवराव वगैरे मनसबदार यांणीं विचार करून मलिकास वजिरी देऊन कारभार चालवीत

१. 'त्यानेंही मुलास दागिने वस्त्रें पाठविलीं' (की०). २. 'शके १५५२' (की०). ३. तुकाबाई–सुप्याच्या बाजी व संभाजी मोहित्यांची बहीण. एकोजी हिचा पुत्र. ४. 'आपण घेणें' (की०). ५. 'निवडे घोडे सुद्धां कजाकीन विजय राघव यांस रणांत मारिलें.' (की०). ६. कजाखी–कजागी (स्त्री०) [तु० कझ्झाकी] धाडस, शौर्य. ७. 'फौज लुट्टन ठाणें घेतलें' (की०). ८. 'बेगमसाहेब' (की०).

असतां, दिल्लीची फौज [घेऊन] मीरजुमला दौलताबादेचे कुमकेस आले होते, ते माघारे गेले असतां, पादशाहा यांणीं त्यांस बहूत निषेध केला कीं, "दौलताबादची पादशाहात कमकुवत जाली, शाहा पादशाहा म्हणवितात, ते सारें बंड मोडून सुभे सोडवावयाचे[1] ऐसें तुमचे माहितगारींत असोन[1], त्या दौलतींत प्रवेश जाला असतां, तुम्हीं सोडून आलां हें नाकरेपण[2] केलें." म्हणून आणखी फौज कुमकेस देऊन माघारे रवाना केले. ती फौज परतोन आली हें वर्तमान मलिक वगैरे यांस कळलियावरि आपली फौज जमाव करून चालून गेले. त्यांचीं यांची गांठ बऱ्हानपुरनजीक पडली. आणि युद्ध बहूत जालें. मलिकास जखमा लागल्या. फार शर्त केली. दिल्लीची फौज मोडली. पळूं लागली. तिचा पाठलाग करून नर्मदेपर्यंत घालविली. हत्ती घोडे मालमवेश[3] लूट घेऊन, यश घेऊन परत आले. फत्ते पावले.

१९. मलिकंबराचे विजापूरकरांशी युद्ध.

मलिकाचा शिक्का "बंदे[4] मलिकांबर चांगसखानी[4]" याजप्रमाणें होता. प्रांत वगैरे धारे बांधून लावणी केली. ते धारे मलिकांबरी अद्यापी म्हणतात. न्याय मनसुबी हरएक करावी. ऐसें प्रकारें करून पादशाहात मुलें दाबून आपणच करिते जाले. यामुळें मुरारपंत [यांनीं] विचार केला जे "दौलताबादेचे पादशाहाचीं मुलें दाबून मलिक आपण पादशाही करितों हें ठीक नाहीं;" म्हणोन त्याजवर सरजाखान वगैरे सरदार कांहीं फौज देऊन दौलताबादेकडे रवाना केले. ते भातोडीचे[5] तलावावर चालून मुकामास गेले. ते मलिकास समजलियावरि तेही चालून आले. युद्ध बहूत जालें. तळें फोडून पाणी बंद केलें. फौज घाबरी जाली. सरजाखान वगैरे सरदार पाडाव करून नेले. फौज लुटली. फत्ते पावले. सरदार नेले त्यांस वस्त्रें देऊन लावून दिल्हे. ते नामोहरम[6] होऊन विजापुरीं आले.

२०. कनकगिरीकरांचा पाडाव.

शाहाजी महाराज चंजाउरीं असतां कनकगिरीकर संस्थानी यांणीं महाराजाकडील तालुका बाळापूर वगैरे यांत उपद्रव केला. हें वर्तमान समजलियावरि

---

१. 'सोडवावयाचे माहीत असून' (की०). २. नाकरेपण (न.) [सं. न+कर्तृत्व] –दुर्बलता. ३. मालमवेश-मालमवेशी (स्त्री०) [अ० माल+मवेशी]–चीजवस्त. ४. 'बंदे दरगाह यगानी मलिकंबर चागसखानी' (की०). ५. भातोडी–नगर जिल्ह्यात. ६. नामोहरम (वि०) [अ० ना+महरूम्]–पराभूत.

संभाजी राजे, वडील पुत्र, फौज, कारभारी व सरदार बरोबर देऊन पाठविले. त्या प्रांतीं सरसुभा अफजलखान म्हणून विजापूर पादशाहाकडून होता, त्याणीं कनकगिरीकर याजपासून कांहीं द्रव्य घेऊन आंतले[१] हातें त्यांस मदत दिली. या युद्धांत संभाजीराजे[२] होणारानुरूप गोळा लागून ठार जाले. याजवरून शाहाजीराजेन्च चालून जाऊन पाळेगार कनकगिरीकर याचें पारिपत्य केलें. कनकगिरी घेतली. अफजखान आपले पादशाहींतील असोन हे गोष्ट केली याजवरून[३] वाईट मानोन यांसि नतिजा[४] लावावा[३] तरि पादशाहास मनांत वांकडें भासेल, म्हणोन सबूरी[५] केली. अफजलखान याणीं आपली निखालसता[६] दाखविली. तेव्हां प्रसंगेंकरून पादशाहापाशीं गेल्यावरि पाहून घेऊं. म्हणून टाळा[७] दिला आणि चंजाउरास गेले.

२१. मलिकंबर व शहाजी यांचे युद्ध.

या समयांत पादशाहा व मुरारपंत यांणीं आपली फौज मलिकावरि गेली ती नामोहरम जाली म्हणून, विचार करून, मातबर[८] सरदार व फौज जमाव करिते जाले.[८] आणि हे मसलत शाहाजी महाराज यांजवांचून सिद्धीस जाणार नाहीं म्हणून त्यांसि येण्याविशीं पत्रें पाठविलीं. तेव्हां महाराज यांणीं तुकाबाईसाहेब [व] वेंकोजी राजे पुत्र तेथें ठेवून आपण विजापुरीं निघोन येते जाले. यानंतर पादशाहा व मुरारपंत यांणीं वर्तमान सांगून मलिकाचें पारिपत्य करावें हें जरूर, [असें] बोलिले असतां यांसही अवश्यकच जाणून[९] पादशाहा व पंत व महाराज व बाजे[१०] उमराव[११] सर्व बसोन [त्यांनीं] मसलत ठरविली जे, आपली फौज बुडविली याचा सूड यथास्थित घ्यावा म्हणून मनसबा केला.[१२] शाहाजी राजे यांचें मानस मलिकानीं अमर्यादा करून, पादशहास दाबून पादशाही करितो हें अयुक्त.

---

१. आतले हातें–गुप्तपणे. २. संभाजीचा मृत्यू इ. स. १६५४ मध्ये झाला. सुरतसिंग व उमाजी हे पुत्र. [पृ. ८३ शहाजीराजे भोसले म. रि. १९३५]. ३. 'वाईट, म्हणोन यांसि कांहीं करावें तर' (की०). ४. नतिजा (पु०) [अ० नतीजा]–शिक्षा. ५. सबूरी (स्त्री०) [फा० सबूरी]–शांतपणा. तहकुबी. ६. निखालसता (स्त्री०) [नि+अ० खालिस्] शुद्धभाव. ७. टाळा (पु०)–टोलाटोली, चालढकल. ८. 'मातबर सरदार रवाना केले' (की०). ९. 'म्हणून' (की०). १०. बाजे [फा० बअझि] काही, इतर. ११. उमराव (पु०) [अ० उमरा–अमीरचे अनेकवचन]—सर्दार. १२. मनसबा (पु०) [अ० मन्सूबा]–विचार.

आम्ही त्यांचें निमक पूर्वी खादलें आहे त्याअर्थी यास गर्दीस[1] नेऊन मुलाची स्थापना करावी, हें युक्त आहे. याजवरून सर्व जमियत एक करून मुरार जगदेवराव व राजे व सर्व सरदार निघून जाऊन मलिकावरि मोहीम[2] केली. मलीकही बमैफौज[3] चालून आले. मार्गी येतां पुणें लुटलें, जाळिलें. कोट पाडून गाढवाचा[4] नांगर फिरविला. त्यांची यांची गांठ म्हसवडानजीक[5] पडली. पंत व महाराज व अफजलखान व रणदुल्लाखान व सर्जाखान व बाजे सरदार पोख्त[6] सामानानिशीं[7] होते. त्यांणी तोफा चालवून युद्धास प्रारंभ केला. दोन प्रहरपर्यंत युद्ध केलें. दोहींकडेही मोंगल पठाण आडून[8] उभे राहून अरेतुरेचें[9] जुंझ जालें. शाहाजी महाराज यांणीं हजार दोन हजार धारकरी[10] निवड करून "तुम्ही शूर, हा समय परीक्षेचा, मलीक बुडविला पाहिजे, आमचे सोबती व्हावें, म्हणजे जसें काम लागेल तसें बक्षीस पावाल," म्हणून घोडे चालवून तरवारा आपणही धारकरी घेऊन केल्या. लोक रणास[11] फार आले. तेव्हां राजे यांस जखमा अंगावरि जाल्या असतां रणदुल्लाखान व अफजलखान यांसि सांगून पाठविलें जे, 'ये समयीं सर्वांनीं चालून घ्यावें.' आणि आपण पुढें घोडे घातले. लढाईची शर्त करून तरवार, तोफा व तिरंदाजी चालती जाली. आणि मलीक याचा मोड करून उखळून[12] काढिला. फौज उधळून दिल्ही. पळूं लागले. तेव्हां विजापूरची फौज पाठलाग करीत चालले. मलीक भीमातीरापर्यंत, नजीक कोरेगांव, पिटला. तों नदीस पाणी चढलें. उतार न सांपडे. ऐसें पाहून मलिकानीं नदीस शरण येऊन प्रार्थना केली कीं, 'शत्रूस जिवंत हातीं सांपडणें याजहून हक्क[13] होणें हेंच बरें.' म्हणोन आपण उतार जागा पाहून

---

१. गर्दीस नेणे [फा० गर्दी]–नाश करणें. २. मोहीम (स्त्री०) [अ० मुहिम्म्]–स्वारी. ३. बमैफौज–बमय [अ० मय–सह]–फौजेसुद्धा. ४. गाढवाचा नांगर फिरविणे—वाटोळे करणे, जमीनदोस्त करून त्याचे शेत करणे. ५. म्हसवड—भोर संस्थानांतील हे गाव असावे [स. च. पृ. ५२]. ६. पोख्त (वि०) [फा० पुख्ता]–मजबूत, प्रौढ. ७. सामान (न०) [फा० सामान्]—चिलखतादी हत्यारांची सामुग्री. ८. आडून–आड (अ०)–विरुद्ध मार्गात प्रतिबंधरूपाने. 'अट्टून' (की०). ९. अरेतुरेचे जुंझ–अहमहमिकेने (अधिक उत्साहाने) केलेले युद्ध. 'और तऱ्हेचे' (की०). १०. धारकरी (पु०)–योद्धा. ११. रणास येणे–मरणे. १२. उखळणे (उ० क्रि०) उच्चाटन करणे. १३. हक्क होणे [अ० हक्क]–मरणे. 'हलाल' (की०).

'या[1] नशीब [या] ताले' म्हणून, ईश्वराचें स्मरण करून, घोडा पुढें चालविला. तों उतार लागून पार जाले. श्रीनें व भीमानदीनें मार्ग दिला. मागें सारी फौच उतरोन पैलतीरीं गेली. तों इतक्यांत विजापुरची फौज मागून येऊन पावली. पाहातात तों नदीस पूर असंभव्य! मलिक पैलतीरीं पावला! हें पाहून "श्रीनीं त्यास मार्ग दिला, पार नेलें. याउपरि आपण महत्प्रेत्न करणें, पाठलाग करणें युक्त नव्हे. बाजद बरसात[2] पाहून घेतां येईल म्हणोन तेथेंच मुकाम करून राहाते जाले.

२२. मुरारपंताची तुळा.

[तेथें] शके १५५५ श्रीमुख नाम संवत्सरे, भाद्रपद वद्य अमावास्या, सूर्यग्रहण, सोमवती ऐसा उत्कृष्ट पर्वकाळ[3] प्राप्त जाला. ते समयीं मुरारपंत यांणीं भीमा-इंद्राइणी संगम, नागरगांव येथें जाऊन, त्या स्थळीं पर्वाचे ठायीं तुळा सुवर्णादिकें करून बहूत केल्या. धर्म फार केला. ब्राह्मण आले त्यांस व क्षेत्रोक्षेत्रीं तुळेचे द्रव्य पाठविलें. आणि 'नागरगांव' ऐसें नांव होतें तें 'तुळापूर' ऐसें ठेविलें. आणि त्या पर्वतकाळांतच तो गांव ब्राह्मणांस अग्रहार[4] करून दिल्हा. राजे यांणींही आपली तुळा सुवर्णरौप्यादीद्रव्यें करून केली आणि धर्म केला. त्याप्रमाणें गांव ब्राह्मणांकडे व नांव तुळापूर[5] ऐसें चालत आहे. 'हत्तीची तुळा कशी करावी' म्हणून [मुरारपंतीं] मातबर सरदार वगैरे जमा जाले होते त्यांस प्रश्न केला असतां कोणाची कल्पना न चाले. उत्तर दिलें नाहीं. तेव्हां शाहाजीराजे याणीं उत्तर केलें कीं, हत्ती नावेंत घालून, ती नाव पाण्यांत घालून हत्तीचे भारें नाव पाण्यांत जितकी जाईल ती मर्यादा खूण करून नंतर हत्ती काढून द्रव्य त्या सीमेपर्यंत [नाव] बुडे ऐसें घालावें, म्हणजे तुळा जाली. ते समयीं पंत राजे यांवरि बहूत प्रसन्न होऊन संतोषी जाले. तारीफ केली. आणि विजापुरास पुन्हा माघारे जाण्याचा निश्चय केला. याप्रमाणें जन्मकथानक-प्रकरण[6] समाप्त.

---

१. या नशीब या ताले [अ. नसीब (दैव)—ताले (अने०) [अ० तालिअ (दैव)]—हाय रे दैवा! 'या नशीब या ताला' (की०). २. बाजद बरसात—बाज [अ० बाद—नंतर] बरसात (सं. वर्षर्तु)—(पावसाळा)—पावसाळ्यानंतर. ३. पर्वकाळ—(पर्वणी)—पुण्यकाल. ४. अग्रहार पु. (सं. अग्र+हृ)—ब्राह्मण देवस्थानादिकांना निर्वाहासाठी दिलेले. ५. तुळापूर—पुण्याच्या ईशान्येस सुमारे १२ मैलावर. मुरारपंताची तुळा दि. २३-९-१६३३ रोजी झाली. संभाजीच्या शवास येथे अग्नी दिला होता. [उग्रप्रकृती संभाजी पृ. ९९ (१९३५)] ६. 'शिव छत्रपती—जन्मकथन व पूर्वजवर्णन प्रथम प्रकरण (की०).

राज्य-आक्रमण आणि सज्जन-सेवन—प्रकरण २

१. शहाजीस शिवाजीचा वेध.

श्री शाहाजी महाराज व मुरार जगदेवराव [यांनीं] विजापुरास परतोन जाण्याचा निश्चय केला असतां, शाहाजी महाराज [यांनीं] पूर्वी माहुली[1] किल्ल्याहून दौलताबादेचे पादशाहींतून जाते समयीं जिजाबाईसाहेब गुरूदर निभावणार[2] नाहींत, म्हणून शिवनेरींत ठेविलीं [होतीं] तेथें [त्यांस] शिवाजी राजे पुत्र जाले. महाराज चंजाऊर प्रांतीं जाहागिरींत गेले, तिकडेच राहिले. जिजाबाईसाहेब [यांचे व] पुत्राचे भेटीस फार दिवस जाले. सात वर्षांचें वय जालें. त्यास अवलोकन करावें [अशी इच्छा महाराजांस जाली.] सात वर्षांत सर्व विद्याभ्यास केला. बहूत स्वरूपें करून सुंदर, गुणवान, लिहिणें,[3] घोड्यावर बसणें, हत्तीवर बसणें, तालिमखाना, शस्त्रविद्या, तिरंदाजी करणें, बंदूक मारणें व शास्त्र—अभ्यास यासही प्रारंभ केला. बोलणें व कल्पना[4]—चातुर्य [बहूत.] ऐसे गुण श्रवण करून [महाराज] बहूत उत्कंठित होते. त्यांत वडील पुत्र संभाजी राजे युद्धीं[5] पडले [म्हणून] राज्यास अधिकारी [हे.] संपत्ती मेळविली त्यास हे [अधिकारी] व श्रीचा दृष्टांतही यांचे जन्मकाळीं जाला, तो पुत्र हा.

---

१. माहुली हा शब्द सा० व दो० प्रतीत नाही. 'परळी किलियांतून' सा० २. २. निभावणे अ० क्रि० [सं० निर्वाहन]—संकटातून पार पडणे. ३. लिहिणे—यावरून शिवाजीस लेखनकला अवगत होती असे दिसते. शिवाय शास्त्राभ्यास होताच. ४. कल्पनाचातुर्य (न०)—बुद्धिचातुर्य. ५. युद्धीं—कनकगिरीच्या युद्धात.

वरही श्रीचा पूर्वी जाला आहे. म्हणून बोलावणें पाठवून घेऊन येऊन भेटीअंतीं बहूत दानधर्म व साकरा वाटणें [असा] उत्सव केला आणि समागमें घेतलें. किल्ले व जाहागीर यांचे बंदोबस्तास कारभारी होते तेच ठेविले.

२. जागिरीचा बंदोबस्त.

नंतर विजापूरीं[१] आलियावरि मुरार जगदेवराव यांनीं राजे यांचा पराक्रम पादशाहास निवेदन करून फार तारीफ केली. आणि सन्मान हत्ती घोडे जवाहीर देऊन पुणें देश, सुपें,[२] बारामती, इंदापूर, बारा मावळें सरंजाम दिल्हा. त्याचा कारभार शिवनेरीं दादाजी कोंडदेव होते त्यांजकडेच सांगितला त्याणीं मावळें येथें लांडगे बहूत व शामलाचे[३] उपद्रवें करून उजाड जालीं होतीं व प्रांतही जागां जागां मोंगली अंमल इजारेयाचा[४] याजमुळें पडला होता. त्याचा तह करून, कौलकरार[५] देऊन लावणी केली, आणि, मावळांत मावळचे जमेदार[६] मेळवून, मावळे लोक बरकंदाज[७] ठेवून, जो लांडगा मारून आणील त्यास बक्षिस द्यावें, अैसें करून वस्ती व लावणी करविली. निमताने[८] वगैरे धारे बांधून कौल दिल्हा. शामलाकडील उपद्रवाचा बंदोबस्त जागां जागां चौक्या लोक ठेवून केला आणि आबादानी[९] केली.

३. शिवाजीस बादशहाच्या भेटीस नेण्याचा निश्चय.

इकडे महाराज शाहाजी राजे यांणीं शिवाजी राजे विजापूरीं नेलियावर जैसे गुण ऐकिण्यांत आले त्याहून अधीक गुणवान व बोलणें मसलतींत अकस्मात बहूत चमत्कारिक बोलावें, विद्याभ्यास जो करविला तो शीघ्र आणि प्रयास न करितां साध्य व्हावा, स्वरूपें करून सुंदर, शरीर-पाटव्य[१०] फार चांगलें, सुदृढ, लक्षणवान दौलतीचे ठायीं हत्ती घोडे, सर्वकाळ कारखाने[११] पाहाणें, कारभारी

---

१. विजापूरीं आलियावरि—शहाजी या वेळी तुळापुराहून विजापुरास आला. २. 'सुपें' हा शब्द की० प्रतीत नाही. ३. शामल पु०—जंजीऱ्याचे शिद्दी (काळ्या रंगाचे). ४. इजारा (पु०) [अ० इजारा—मक्ता. ५. कौल (पु०) [अ० कौल्]—अभयवचन. ६. जमेदार [फा० जमाअत्-दार्] टोळीचा पुढारी. ७. बरकंदाज (पु०) [फा० बर्कन्दाझ्]—बंदूकधारी. ८. निमतान (पु०) [फा०]—पिकांचा अंदाज. ९. आबादानी (स्त्री.) (फा०)—समृद्धी. १०. शरीरपाटव्य (न०)—शरिराचा चपळपणा. 'शरीरपाठ व्यापार चांगले (की०). ११. कारखाना (पु.) [फा. कार्खाना]—कार्यालय.

थोर माणसें शाहणीं यांस माहितगारी विचारणें, त्यांचे सन्मान करणें व चौकशी करणें. लघू मनुष्यें व दुर्गुणी यांचा त्रास करून त्यांची संगती न करणें, दुर्व्यसन कांहीं एक नाही, विशाल नेत्र आजानुबाहू, वयें अल्प असोन प्रौढीनें चालतात. असें पाहून फारच हर्षायमान [जाले.] "हा पुत्र भाग्यवान होईल, दृष्टांत जाला, वडिलांस वरप्रदान जालें, तो पुरुष हाच होय; व ज्येष्ठ[1] [होत्साते] दौलतीचे अधिकारीही हेच," म्हणून कृतनिश्चय करिते जाले. आणि यांस मुरारपंत व वजीर यांच्या भेटी करणें, बराबर नेणें करिते जाले. महाराजांचे वय विशेष नसतां मर्यादा व आज्ञापालन करून, मर्जी तेच समजोन, वडील म्हणजे ईश्वर, त्यांची आज्ञा तोच धर्म हें लक्ष धरून वडिलांची आज्ञा शिरसा[2] [वंद्य] जाणोन अवज्ञा न करितां वर्तते जाले. याजवरून शिवाजी महाराज यांस पादशाहाचे दर्शनास न्यावें ऐसा निश्चय केला. पंतांनींही पातशाहापाशीं राजे यांचे पुत्र आले ते बहूत योग्य, गुणसंपन्न वजिरी[3] करावी ऐसे, पुढें दौलत चालवावयाजोगे, सांभाळावयाजोगे आहेत म्हणोन तारीफ केली. यांणींहि दर्शनास आणावे सांगितलें. तें पंतांनीं महाराजांस सांगितलें.

४. शिवाजीचा विरोध.

त्याजवरून सुमुहूर्त पाहिला असतां, शिवाजी राजे यांणीं महाराजास सांगून पाठविलें जे—"आपण हिंदू व हे यवन, परम नीच, यापरते नीच दुसरे कोण आहे? अंत्यजादिकांचा संपर्क करितात. त्यांची सेवा करणें, त्यांचें अन्न भक्षणें, आर्जव करणें, त्यांस नमस्कार करणें, [यांनीं] माझे प्रकृतीस फार त्रास उत्पन्न होतो. [यवन] गोवधादी करितात. ब्राह्मणवध व निंदा धर्माची हे पाहाणें परम अनुचित दिसतें. आपण रस्त्यांनीं जातां गोवध होतो. तें पाहातांच त्याचा शिरच्छेद करावा ऐसे वाटतें व श्रम वाटतात. गाईस पीडा पाहावी त्याहून आपलें जीवित्व व्यर्थ. वडील काय म्हणतील हेंच[4] [संकट] येऊन पडतें;[4] नाहीं तरि पाहातांच समयीं गाईस पीडा करणाऱ्याचा वध करवावा हें मनांत येतें. मुसलमानांचा संसर्ग करणें चांगलें नाहीं. तसेंच पादशाही दरबारास जाणें अथवा हरयेक अमीर यांचे घरीं जाणें ठीक नाहीं." [परत]

---

१. हा शब्द की० प्रतीत नाही. २. शिरसा–विशेषणार्थी तृतीया. ३. वजिरी (स्त्री०) [अ० वझीर्]–मोठा हुद्दा. ४. 'हें चित्तांत वागतें यास्तव उपाय नाहीं.' (की०).

येतांच [शिवाजी राजे यांनीं] स्नान करावें, दुसरीं वस्त्रें घ्यावीं, असें करूं लागले. आणि याअन्वयें सांगून पाठविलें.

याजवरून राजे यांणीं बहूत निषेध केला. "आम्ही यांची वडिलोपार्जित उपार्जना[1] करून सेवा करीत आलों. वैभव, योग्यता पादशाहापासूनच मेळविली. तुम्ही वडील पुत्र सर्वजाण असतां हें बोलणें, आचरण, चांगलें नाहीं. ऐसें करूं नये," म्हणून कारभारी यांजपासून बोध करविला. तथापि यांचे विचारास कांहीं एक[2] गोष्ट[2] न ये. [हें] जाणून महाराजाचे समान वयस्क मैत्र याजपासून सांगविलें व जिजाबाईसाहेब यांजपासूनही बोध करविला आणि आपणही समक्ष आणून कित्येक प्रकारें समाधान[3] केलें कीं, "पृथ्वीचे अधिपती ते, आपला धर्म आपण रक्षून त्यांची सेवा करणें, त्याअर्थीं[4] त्यांचे धर्मास विरुद्ध दाखवूं नये.[4] पूर्वींपासून देवादिक, दैत्यांचें प्राबल्य असतां, रावणाचे घरीं देवांनीं कालाची प्रतीक्षा करून जसें म्हटलें तसें चालले. तुम्हीहि[5] थोरले वंशांतील.[5] ईश्वरास असें न करणें असतें तरि तुमचे वंशांतील सार्वभौम पद कां जातें? असो. या काळीं असाच समय! या अर्थी तसेंच चालून आपले वैभव आम्ही इतके श्रम करून तुम्हांसाठीं मेळविलें व लौकिक मेळविला तो जतन करून पुढें दिवसेंदिवस पादशाहाची कृपा अधीक संपादन करावी." या रितीनें बहूत प्रकारें सांगितलें असतांही खंबीर[6] ढळेना. जी वृत्ती होती त्यांत अंतर न पडे. "गाई-देव-ब्राह्मणांस पीडा करितात त्याकरितां प्राण गेला तरी जावो, वडिलांची आज्ञा शिरसा [वंद्य] परंतु हें पाहाणें नाहीं." ऐसेंहि 'उद्दामपणें[7] बोलों लागले. ते समयीं राजे यांणीं आपले कारभारी यांसह विचार केला जे—"हे 'म्लेंछ' म्हणतांच अधीक तिरस्कार करितात. आम्ही पादशाही चाकर. त्यांचा[8] धर्म, पादशाहात त्यांची, त्यांस [मुलाचे विचार] कळलिया वाईट पडेल.[8] यांची बुद्धी व दैव विचित्र दिसतें. ईश्वरनिर्मित[9] काय आहे न कळे. यास्तव यांस लांब ठेवावें हें युक्त."

---

१. उपार्जना (स्त्री०)-आर्जव; मनधरणी. २. हे शब्द की० प्रत देत नाही. ३. समाधान (न०)-समजूत. ४. हे शब्द की० प्रत देत नाही. ५. हे वाक्य की० प्रतीत नाही. थोरले वंश-शिसोदे-सूर्यवंश. ६. खंबीर (पु०)-निश्चय. 'खंबीर वृत्ति' (की०). ७. 'उदासपणें' की० व सा०. ८. हे वाक्य कीर्तने प्रतीत नाही. ९. ईश्वरनिर्मित (वि.)-ईश्वराने योजिलेले.

५. शिवाजीची पादशहाशी भेट.

एके दिवशीं आग्रह करून पादशाहाचे भेटीसही नेले असतां त्यांणीं त्यांस मुजरा करणें, अथवा आदब[१] [बजावणें] तें न करितां जाऊन बसले. चित्तांत फार व्यग्र[२] जाले. पादशाहांनीं पंतांस विचारलें, "हेच राजाचे पुत्र कीं काय?" तेव्हां पंतांनीं सांगितलें, "बहूत गुणवान विद्वान आहेत. निशस्त[३] व बरखास्त[४] दरबार अद्यापि पाहिला नाहीं; परंतु आपले सेवेसि योग्य आहेत," म्हणोन विडे देऊन निरोप देवविला. पादशहांनीं पोषाख जवाहीर राजे यांचे पुत्र, प्रथम भेटीस आले, म्हणोन सन्मान दिल्हा. हे घरीं आल्यावरि स्नान करून, तीं वस्त्रें [यांचा] त्याग केला. नंतर पंत यांस [महाराजांनीं] हें वर्तमान, "याचें चरित्र बोलणें असें पडतें, आम्हीं प्रयत्न [होईल] तितका केला, याजकरितां प्रौढ होत तों लांब ठेवितों," सांगितलें. यांनींही सलाह दिल्ही आणि तारीफ केली. त्या समयीं शिवाजी महाराज यांचें लग्न शिर्के[५] यांची कन्या करून बहूत समारंभें केलें. नांव सईबाई असें ठेविलें. आणि विचार करून दादाजी कोंडदेव सुभेदार पुणें येथील मोहसबा[६] देण्यास आले होते, त्यांस ठेऊन घेऊन पुण्यास जिजाबाईसाहेब व राजे बराबर देऊन रवाना केलें. शके १५५९. बराबर कारभारी पूर्वीं शिवनेरींत होते ते दिल्हे.

६. औरंगजेबाची निजामशाहीवर स्वारी.

[इकडे] दिल्लीमध्यें अलमगीर[७] पादशाही[८] करीत होते[८]. त्यांस पुत्र औरंगजेब उत्पन्न शके १५४० यांत जाले होते व आणखी तीन पुत्र होते. त्यांत औरंगजेब बालत्व असतां परम क्रूर व पराक्रमी. शरीरही मोठें, दराज[९]; मनसबादार, बहूत उद्दाम, दैत्यांश, उग्र, असे शूर प्रौढ होते जाले. हें पादशाहानीं पाहून [त्यांस] अमदाबादेचे सुभ्यावर फौज देऊन रवाना केलें. ते सुभा घेऊन, कांहीं दिवस

---

१. आदब (स्त्री०) [अ० आदाब्]–वंदन, मुजरा. २. व्यग्र (वि०)–क्षुब्ध. ३. निशस्त (स्त्री०) [फा० निशस्त]–बैठक. ४. बरखास्त (फा० बरखास्त्)–विसर्जित. ५. सईबाई ही निंबाळकरांची कन्या होती. तिचे लग्न दि. १७–४–१६४० रोजी झाले. (श०शि०प्र. २०९) ६. मोहसबा (पु०)(अ०)–आढावा, हिशेब. ७. येथे शहाजहान असे हवे. आलमगीर (जगज्जेता) हे औरंगजेबाचे नाव होते. ८. क्री० प्रतीत हे शब्द नाहीत. ९. दराज [फा० दराझ्]–उंच बांध्याचा. (मूळ अर्थ दीर्घ).

तेथील दौलतीचा उपभोग करून होते. तों मलिकानीं पादशाही फौज नामोहरम करून घालविली. त्याजवरून पादशाहानीं [औरंगजेबास] अमदाबादेहून आणविले आणि दौलताबादेवर फौज [व] मातबर सरदार बराबर देऊन रवाना केलें. त्या संधींत मलिकांबर व साबाजीपंत दोघेही निवर्तले. पादशाहात कमकुवत पडली. मलिकाचे लेक फत्तेखान कारभार करूं लागले. हे वर्तमान कळलियावरी औरंगजेब दरमजल चालून येऊन बराणपूर, आशेर[1] घेतली. खानदेश हस्तगत करून येऊन दौलताबादेस पोहोंचले. आणि दौलताबादेस मोर्चे देऊन खडकी[2] म्हणून गांव नजीक होता, तेथें मलिकानीं पेठ बसविली होती, ते जागा चांगली म्हणोन आपण खडकीवर राहिले. तें शहर वसवून नहर[3] आणिले. रस्ते वगैरे तरतुदीने करून त्याचें नांव औरंगाबाद असें ठेविलें शके १५६० यांत; व नगरचा किल्ला बांधिला. नंतर कांहीं दिवशीं दौलताबाद घेऊन सर्व पादशाहात दौलताबादची आक्रमून खानदेश, वराड, सुभे खुदस्ते बुनियाद औरंगाबाद येथील सुभेदारी करून औरंगजेब राहाते जाले.

७. दादाजीचा कारभार.

शिवाजी महाराज पुणियास आल्यावर रंगमहाल[4] म्हणून वाडा दादाजी पंतीं बांधिला होता तेथे राहाते जाले. दादाजीपंतीं प्रांत पूर्वीं लाविलाच होता. जागां जागां प्रांतास उपसर्ग देणार यास नतीजा[5] देऊन प्रांतींची आबादानी करून, महाराजांची मर्जी रक्षून, यांचे आज्ञेप्रमाणें कारभार करून व यांस महितगारी व दौलतीची कवाईत[6] सांगून चालविते जाले. राजेसाहेब वडील पुत्र, सर्व दौलतीचे खावंद हे होत, आणि यांचे गुण व शाहाणपण, दैव विचित्र दिसतें, जाणून आज्ञा[7] तसेंच राखून चालावें, म्हणून चालले. महाराजांनींही वडिलीं ठेविले सेवक आणि कर्ते, बहुत पोख्त इतबारी[8] जाणून त्यांची मर्यादा वडिलांप्रमाणें धरून, भिडेनेंच त्यांशी वागावें असें मनांत आणून [तसें] करिते जाले.

---

१. आशेर–अशेरी–ब्ऱ्हाणपूरच्या उत्तरेस. यास 'दक्षिणचा दरवाजा' म्हणतात. २ खडकी–निजामशाहीची राजधानी. ३. नहर (पु०) [अ० नहर्] पाट; नळ, कालवा. ४. रंगमहाल—यास 'लाल महाल' असे इतरत्र म्हटलेले आढळते. (स. च. पृ. १००). ५. नतीजा (पृ०) [अ० नतीजा]–शिक्षा. ६. कवाईत (स्त्री.) [अ० कवाइद्; अनेकवचन काइदाचे]–कारभार. ७. आज्ञा–शहाजी राजे यांची. ८. इतबारी (वि०) [अ० इअतिबारी]–विश्वासू.

एके दिवशीं दादाजीपंतांनीं सरकार बागेंतील पाडाचा[1] आंबा महाराजांचे स्वारीबरोबर असतां तोडिला, आणि आपणच आम्हीं स्वामींचे आज्ञेखेरीज हा विचार केला म्हणोन आम्हांस शासन असावें, हात तोडावा, बोलिले. आणि तोडावयास चाकर यांसि सांगितलें असतां, सर्व बराबर होते [त्यांनी] व महाराजांनीं सांगितलें "हें करणे श्रेयस्कर नव्हे, तुम्ही मालिकच[2] आहां," असें म्हटलें. त्याजवरून पंतांनीं एक अस्तनी[3] आंगरखियाचि कापून लांडी केली. आणि सर्वांस सुचविलें जे, "याप्रमाणे महाराजांचे आज्ञेखेरीज चालूं नये." असें निष्ठेनें व द्यानतदारीनें[4] इतबारें करून स्वामींचें कार्य तें प्राणापरतें[5] जाणोन, सेवा [पंत] करीत होते,

८. शिवाजीचा निश्चय.

ते समयीं महाराजानीं विचार केला जे, "आपण वडिलांनीं मेळविलें तें खाऊन राहाणें योग्य नाहीं. आपण हिंदू. दक्षिणदेश सर्व म्लेंछांनीं ग्रासिला. देव, ब्राह्मण, क्षेत्रें, गाई यांस बहूत पीडा जाली. धर्म अगदीं बुडाला. तेव्हां धर्मरक्षणार्थ प्राणही वेंचून धर्म रक्षावा, आणि आपले पराक्रमानें नवीन दौलत संपादावी. तें अन्न भक्षून फौज व लोक जमा करावे, आणि वडिलीं मेळविलें तेंही रक्षून नवें साधन करावें हेंच या कुळांत जन्म झालियाचें सार्थक, व श्रेयस्कर. देवावर व दैवावर भार घालून, पुरुष-प्रयत्न-अवलंबन करावें. त्यास दैव जसें जसें साह्य होईल तसें तसें अधीक करीत जावें. मग देव परिणामास नेणार समर्थ आहे." याप्रकारें मनांत कल्पना पूर्व-जन्मांतर-योगें आणूं लागले. व निश्चयही तसाच करिते जाले. वय असेंच वेंचणें व्यर्थ, म्हणून दादाजी कोंडदेव यांस सल्हा विचारली. त्यांणींही "आपण मनांत आणिलें परंतु या कर्माचा शेवट लागणें परम दुर्घट आहे. सर्व पृथ्वी यवनांनीं बहूत काल पादाक्रांत केली. स्थळें व किल्ले,[6] जागे[7], फौज त्यांची पृथ्वींत भरून निघाली[8]. या करण्यास

१. हा प्रसंग शिवापूरनजीक शाहबाग येथे घडला असावा. (स. च. पृ. १००).
२. मालिक (पु०) (अ०)–धनी. ३. अस्तनी (स्त्री०) [फा० आस्तीन्]—बाही.
४. द्यानत (दानत) (स्त्री०) [अ० दियानत्]–नेकी. ५. प्राणापरता–प्राण+परता (वि०) [सं. पार–पलीकडे]—अतिशय प्रिय. ६. किल्ला–(पु०)[अ० कल्आ]–गड, कोट. ७. जागा (पु० स्त्री०) [फा० जायगाह्]–स्थळ. ८. सा० व को०. 'फौज त्यांची भरली' की०.

आपणांस मातबर स्थळें असावीं; हिंदू राजे व हिंदू फौज जागां जागां आपलें साह्य करीत असें असावें; आपणही परम दुष्कर कर्में, श्रम, साहस जिवाहून अधीक करावें; त्यास ईश्वराची अनकूलता व येखादे सिद्ध पुरुषाचा आशीर्वाद घडावा, तेव्हां अशा गोष्टी अवलंबाव्या. असें असून साहेब मनांत आणितात हें कठीण. वडील यवनांची सेवा करून, योग्यता मेळवून, त्यांजपासून दौलत मेळवून, त्यांचें जें [अन्न] खात आहेत याचा विचार म्हणावा, तरि हे युगच विपरीतच आहे. तेव्हां दिवसेंदिवस धर्म अधीक क्षयास जाणार. तेथें साहेब[1] चित्तांत आणितात हें दुरासद.[2] काल-देश-वर्तमान[3] तिहीं करून मनसब्यास येत नाहीं. नवे न मिळे आणि वडिलीं दौलत, मनसब, सरंजाम, लौकिक मेळविले ते गमाविले हें वांच्यास न यावें."

अैसे प्रकारें मसलत सांगितली असतां महाराजांचे चित्तास त्यांनीं मसलत करण्याचे गूण सांगितले तितके मात्र घेऊन, दोष ठसले नाहीत. उपेक्षा करणें ठीक नाहीं. आपण चित्तांत आणिलें तसें करावें. धर्म वृद्धिंगत करावा यासाटीं प्राण, दौलत गेली तरी जावो, परंतु प्रयत्न करावाच करावा. हेंच मनःपूर्वक [चित्तास] येतें जालें. ते समयीं पहिलीं दौलतींतील माणसें संक्राजी नीलकंठ व बाळकृष्णपंत मजमदार व सोनोपंत [व] रघुनाथ बल्लाळ कोरडे शिवाय सरदार वगैरे ममतेंत मसलतींत येतील[4] ते ते तसे प्रकारे[4] घेऊन, आणखी चांगले मर्द शिपाई, नांवाचा[5] माणूस[5] पाहून, त्यास जवळ ठेवावें, कारकून चांगला कर्ता, लिहिणार पाहून ठेवावा, असें करूं लागले. तशींच राजकारणें करावीं. मातबर चहूं जागांचे मराठे यांसि आप्तपणा करावा, पत्रें लिहावीं, त्यांस आणोन भेट घ्यावी, आपण त्यांजकडे जाऊन आम्हांस अनकूल असावें ऐसें बोलावें अैसें करण्यांत ज्यांनीं महाराजांचें बोलणें परम आदराचें, पराक्रमाचें ऐकावें त्यांस वेध लागून वाटावें कीं, "हा[6] महाराज परम थोर होय, याच्येच लक्षें चालावें, हें सांगतील तसें करावें, प्राणहि गेले तरी जावोत, परंतू याची सेवा करून याचे आज्ञेत चालावें." अशीं सर्वांचीं चित्तें वेधून घेतलीं. याप्रमाणें शके १५६३[7] यांत [या मसलतीचा] आरंभ करिते जाले. तों वय चवदा[8] पंधरा वर्षांचे जालें.

---

१. 'साहेबीं' सा०. २. दुरासद (वि०) [सं० दुर+आ+सद]—मिळण्यास कठिण. ३. कालदेशवर्तमान—काल, स्थल आणि परिस्थिती. ४. 'त्याप्रमाणें' की०. ५. की० प्रतीत हे शब्द नाहीत. ६. 'हे महाराज परम थोर होत' की०. ७. '१५६२' की०. ८. '१३ वर्षांचे' (की०). 'पंधरा सोळा वर्षांचे' सा० २.

९. तोरणा–स्वराज्याचे तोरण.

तेव्हां तोरणा[1] किल्ला विजापूरी पादशाहींतीलच, येथें राजकारण करून मावळे लोक पासलकर, कंक माळुसरे वगैरे सरदार ठेऊन ममतेंत ठेविले [होते], त्यांचे हातें वरील नामजाद[2] लोक यांस वश करून, भेद करून, किल्ला आमचे निसबतीस[3] द्यावा, आम्हीं पादशाहापासूनही आपलेकडे करून घेऊं, म्हणून वश करून घेतला. आणि किल्ला पाहावयास जाऊन पाहून प्रचंडगड असें नांव ठेविलें. दुरजा[4] देवीचा डोंगर याचे संनिध फार चांगला पाहून, तेथें वस्ती करून किल्ला करावा असें चित्तांत आणून सांप्रदायानरूप लोक हवलदार,[5] कारकून नेमून किल्ला केला. त्या पर्वतास तीन माच्या[6] चांगल्या होत्या. त्यांसही काम लावून बांधिल्या व किल्ल्यास इमारत करविली. आणि किल्ल्याचें नांव राजगड ठेवून माच्यांचीं नांवें एक सुवेळा व एक संजीवनी व एक पद्मावती अशीं ठेवून चार किल्लेच असे केले. राजधानीस राहाण्यास योग्य अशी कल्पना करून बांधिते जाले. हें वर्तमान पादशहास कळलियावरि शाहाजी महाराज यांस विचारिलें. यांनीं सांगितलें जे, "त्या किलियावरि दुसरेकडील कांहीं गलबल[7] आढळली याजवरून बंदोबस्त तोरण्याचा केला. त्यालगती[8] जागा चांगली दिसली, तेथेंही मेटें[9] बांधून जागा करविली. आमचे जाहागिरीलगत चांगली जागा, आम्हांकडेच असावी," असें बोलोन सरपोष[10] राखिला. आणि शिवाजी राजे यांस व दादाजी कोंडदेव यांस निषेध करून लिहिलें "हें करणें चांगलें नाहीं." दादाजीपंत यांस लिहिलें जे "तुम्ही जवळ असोन हें कसे करवितां?" तेव्हा त्यांणीं आंतील पर्याय होते ते लेहून पाठविले. "शिवाजी राजे यांस विनंती केली, परंतु त्यांचे चित्तांत ते[11] गोष्ट कांहीं एक न[11] ये." यांजमुळें बहूत यागी[12] जाले.

---

१. तोरणा–पुण्याच्या नैर्ऋत्येस सुमारे २० मैलांवर. २. नामजाद (वि०) [फा० नाम्झद्]–नियुक्त. ३. निसबत–(स्त्री०) [अ० निस्बत्]–पक्ष, दिमत. ४. दुरजा (दुर्गा ?) देवीचा डोंगर–तोरण्याच्या अग्नेयीस ३ मैलांवर व सिंहगडाच्या नैर्ऋत्येस सुमारे १० मैलांवर. ५. हवलदार (पु) [फा० हवालादार्]–शिपायांचा नाईक. ६. माची (स्त्री.)–किल्ल्याच्या तटाखालील उतार. ७. 'गडबड' की०. ८. लगत (क्रि० वि०)–जवळ. ९. मेटें (न०)–चौकी, पहारा. 'किल्ले' की०. १०. सरपोष (पु) [फा० सर्पोश्]–गुप्तपणा. ११. 'ते कांहीं नये' की०. १२. यागी (वि०) (हिं०)–दुःखी.

१०. दादाजीचा मृत्यू.

तो पादशाही खजाना[1] विजापूरीं जात होता त्याची बातमी राखून, त्याजवर लोक पाठवून, आणिला व प्रचंडगडावरिही द्रव्य सांपडलें. तेव्हां दादाजीपंतीं सांगितलें, "आपण आक्रम घालणें, [त्याचा] पाया घातला, हें युक्त नव्हे. दैवावर भार ठेवून हें कर्म आरंभिलें. [परंतू] आपले स्वामित्व तें किती? पादशाहाती चार चहूंकडे. दिल्लीचा सुभा साहेबजादाच[2] येऊन औरंगाबादेंत [राहिला] आहे. महाराज वारंवार लिहितात. केलें कर्म सिद्धीस न गेल्यास फार वांकडें पडेल. तथापि साहेब दैवाचे दिसतात. कर्तृत्वबुद्धीही विचित्र दिसती. फार सावधपणें जें करणें तें करावें," बोलले. आणि याउपरि "यांजपाशीं कारभार करणें युक्त दिसत नाहीं, महाराजांस तेथें पेंच यांचे करण्यांनीं पडून आपण न केलें असतांही आपणांवरि येईल." म्हणून चिंताग्रस्त होऊन राहिले. तों शरिरीं व्यथा होऊन क्षीण जाले. देह-अवसानसमयीं महाराजांस जवळ नेलें "आम्ही बहुतां दिवसांचे पदरचे सेवक, आमचा शेवट जालाच; परंतु वडिलीं वाढविलीं माणसें व मुल्क, द्रव्य [आम्हीं] जतन केलें. [पुढें] साहेब खावंद [आहेत] सर्व पाहून जतन करावें," म्हणून आपले पुत्र[3] स्वाधीन केले आणि [ते] वारले.[4]

११. शहाजीचें तंजावरास प्रयाण.

या संधींत शाहाजी महाराज यांनीं दादाजीपंतांस "द्रव्य जमा जालें असेल तें पाठवावें," लिहिलें. तों हे वारले. नंतर महाराजांनीं उत्तर पाठविलें कीं, "येथें खर्च वाढला आहे, याउपरि खर्चास खजीना आणवणें तो कर्नाटक प्रांतींचा आणावा. येथील पाठवीत नाहीं," असें लिहिलें. त्याजवरून सर्व आटोप पुत्रानीं केला, अचाट कर्म करूं लागले, द्रव्य व मुल्क त्यांचाच आहे म्हणून संतोष मानिते जाले. आणि आपण येथेंच विजापुरीं जवळ राहाणें ठीक नाहीं, म्हणून चंजाउराकडे जाण्याजी मसलत काढून तिकडे जाते जाले.

---

१. खजाना (पु०) [अ० खिझ्झाना]–कोश. २. साहेबजादा (पु०) [फा० साहिब्–झादा]–राजपुत्र. ३. दादाजीचा पुत्र कृष्णाजी. ४. दादाजी दि. ७ मार्च इ. स. १६४७ त मरण पावला. (श. शि. पृ. २४ व सरकार–शिवाजी पृ. ३८१).

१२. चाकण व सुपे कावीज.

यानंतर चाकणचें ठाणें येथें फिरंगोजी नरसाळा हवलदार होता तो महाराजांस येऊन भेटला. त्याजवरि संतोषी होऊन ठाणें त्याचे स्वाधीन केलें. वरकडही[1] तालुकियांत जे जेथें होते व आज्ञेंत चालिले,[1] त्यांचीं कामें त्यांचे स्वाधीन करून, दादाजीपंतीं[2] [जे] धारे कौल दिले, त्या धाऱ्यांनींच प्रांत-वहिवाट यथास्थित चालावी असें करविलें.[2] सिद्दी[3] बिलोल पाग्या जुना होता त्याचें चालणें महाराजांचे विचारांत न पडे. ते समयीं [तो] पागा ठेऊन शाहाजी महाराजांकडे उठोन गेला. बाजी[4] मोहिते, तुकाबाई साहेबांचे भाऊ, यांचे स्वाधीन सुपें येथील ठाणें व तालुका होता. त्यांस भेटीस बोलाविलें असतां न आले, जाणून त्यांजवर स्वारी केली. त्यांस धरून आणून, पागा वगैरे घेऊन, महाराजांकडे चंजाउराकडे पाठवून दिल्हे.

१३. शिवाजीचे राजकारण.

त्यानंतर सामराजपंत रांझेकर यांस 'पेशवे[5]' असें पद दिलें. आणि महाराजांनीं विचार केला जे, तीन हजार पागा[6] व मावळे लोक दाहा हजार जमा केले, मोगलांचे किल्ले प्रांत घेतले, हे जतन जाले पाहिजेत. यास द्रव्य पाहिजे. द्रव्येंकरून लोक राजी राहातात. किल्ले कोटावरून मुलूख जेरदस्तींत[7] येतो. मुलूख हस्तगत जाला म्हणजे राज्य साध्य होतें व मोंगलाई[8] राज्यांत बिकट जागा सह्याद्रीचा बांधारा होता; त्यांची फौज आली असतां [तो] आपणांस आश्रा होय. त्यांस असाध्य, यास्तव हा आधीं साध्य करावा. साधण्यास त्या मुलखांतील कजाखीचे लोक व माहीतगार पावसांत डोंगरांत जाणें, चढणें, पळणें, झाडींत शिरणें हे मावळे व कोंकणे लोक यांजवांचून घडणार नाहीं. म्हणोन तेच लोक अधीक ठेवून त्यांस सरदार येसाजी कंक व तानाजी

---

१. 'वरकड जे जेथें होते ते आज्ञेंत चालले' की०. २. याऐवजी 'पूर्वीचे कौल यथास्थित प्रांत वहिवाटींत चालले' की०. ३. 'सिद्दी बिलाल' सा० व की०. ४. सभासद 'संभाजी मोहिते' असे म्हणतो (सभासद बखर). ५. पेशवा (पु०) [फा० पेश्वा]—पंतप्रधान. ६. पागा (स्त्री०) [फा० पाय्—गाह्]—घोडदळ. ७. जेरदस्त [फा० झेर्दस्त्]—काबीज. ८. मोंगलाई—मुसुल्मानी.

मालुसरे व पासलकर व देशपांडे मुसे[१] खोरें, पौड[१] खोरें व हिरडस[२] मावळ वगैरे प्रभू लोक यांस किताब, सरदाऱ्या देऊन, नांवाजसी[३] [चे] लोक व शिपाई असे ठेविते जाले. आणि विचार केला कीं, किल्ले कोट घ्यावे, प्रांतांत अमल बसवून नीतीने रयतेस[४] सुख वाटे कीं "ईश्वरा, यांचें राज्य चिरकाल होवो." अशी लावणी कौल देऊन करावी. यवनांचा उत्कर्ष आहे, त्यांचीं मोठीं मोठीं शहरें व जागा, तेथें द्रव्य बहूत आहे, यांची पाळत राखून [तीं] मारावीं, म्हणजे दुष्ट यवन सहजच आयास[५] येतील. आणि[६] आपण झाडी सह्याद्री धरून होतील तसे यत्न करावे. तसेच त्यांचे तालुक्यांतील[६] द्रव्यवान असतील ते जेरदस्तींत आणोन त्यांजपासोन निवेल[७] तसें[७] खंड अथवा कर्ज म्हणोन द्रव्य घ्यावें. म्हणजे सहजच तो[८] द्रव्यहीन होतो. आपणास [त्या द्रव्याचा] जमावाचे खर्चास उपयोग पडतो. जाणून या रितीनें द्रव्य[९] साध्य[९] करिते जाले. लोकांस द्रव्य पाऊं लागलें म्हणजे लोक राजी राहातात. नामांकित कर्ते माणूस शिपाई असेल तेथून आणावयास अवघड पडत नाहीं. या विचारें तमाम किल्ले यांचीं राजकारणें[१०] करविते जाले. किल्ले घेण्यास आपणच खासे[११] जावें. धारकरी[१२] यांजबरोबर आपणच[१३] माळेस[१४] अगोधर चढावें.[१३] तसेंच भेदानीं व माहितगार मावळे लोक यांचे युक्तीनें घ्यावें. कोट-घेरियाचे गांवचा सेकार[१५] अगोठीस[१६] किल्ल्यावरि जाणार, त्या दिवसांत धारकरी निवड करून किल्ल्याचे घेरांतील गांव तेथें आपले लोक मजूर करून डोईवर भारे घ्यावे, त्यांत तरवारा घालून आपणही त्यांत जावें. किल्ल्यावर जाऊन किल्ला घ्यावा. असे अनेक प्रकारें सीमेपरती[१७] मेहनत करून महाराज किल्ला घेत चालले. ते बांधारीचे कांगोरी,[१८]

१. हवेली तालुका, पुणे जिल्ह्यात. २. भोर प्रांत. ३. नांवाजसी (स्त्री) [फा० नवाझिश् + ई]—तारीफ, गौरव. ४. यानंतर 'वागवावें. त्यांनीं अशी प्रार्थना करावी.' असे की० आहे. ५. आयास पु० (सं. आ + यस्) येतील—श्रमी होतील. ६. हे शब्द की० नाहीत. ७. हे शब्द की० देत नाही, ८. तो—शत्रू. ९. की० हे शब्द नाहीत. १०. राजकारणें (न०)—राज्यासंबंधी मसलती. ११. खासा [अ० खास्सा]—स्वतः. १२. धारकरी (पु०)—योद्धा. १३. याऐवजी 'पुढें व्हावें' की०. १४. माळ (स्त्री०)—दोराची शिडी. १५. सेकार—शेकार (पु०)—छपराचे गवत वगैरे सामान. १६. अगोठी (स्त्री०)—[सं० अग्रवृष्टी]—पावसाळ्याची सुरुवात. 'आगोटीस' की०. १७. सीमेपरती—पराकाष्ठा. १८. कांगोरी—मंगळगड. महाड (जि० कुलाबा) येथून आग्नेयीस ११ मैल.

तुंग,[1] तिकोना,[1] लोहगड,[2] राजमाची,[3] कुवारी,[4] भोरप,[5] धनगड, केळजा आदिकरून किल्ले घेतले. मावळें सारीं सोडविलीं. जवळजवळ पुंड देशक[6] पाळेगार होते ते कोण्हास ममतेंत घेऊन आपले केले. आम्हांस राज्य साधून म्लेंच्छांचें पारिपत्य करून, महाराष्ट्र धर्म वृद्धीतें पावऊन रक्षणें, तेव्हां जसे ज्या हुनरेंकरून[7] आपले होतील [तसे] त्यांस आपले करावे. यांत त्यांजपासून विपरीत दिसों लागल्या, त्यांचें पारिपत्य करावें. ते समयीं मोरोपंत पिंगळे व कारभारी संक्राजीपंत वगैरे साहस कर्मांत जवळ होते, तेही बहूत धाडसेंकरून उपयोगीं पडूं लागले. असें राज्यसाधन [याचा] हव्यास दिवसेंदिवस अधीकच चालला.

बांदल देशमूख तर्फ हिरडस मावळ हे येऊन न भेटत, तेव्हां त्यांजवर स्वारी करून धरून आणले, मारले. रोहिडा[8] किल्ला घेतला. त्याजवरून दहशतही लोकांस पडली. किल्ले कोट घेतले त्यांजवर विश्वासू आणि मर्द असे हवालदार सरनोबत[9] घाटगे, निंबाळकर, गुजर, पालकर, जगताप, शिर्के, मोहिते, असे पाहून ठेविले. व[10] सरदाऱ्या माहाडीक घाटगे, घोरपडे, शिर्के, मोहिते मातबर पाहून, लोक स्वार ठेवून, दिल्ह्या.[10] माणूस योग्य पाहून वाढविले. फौजेचा जमाव केला.

[इतक्यांत] विजापूरचे पादशाहींतून सातशें[11] पठाण तिकडे बदलून चाकरी राहावयास आले. त्यांस चाकर ठेवावे न ठेवावे, व कसें करावें? मुसलमान लोक, विजापूरच्या पादशाहींतून आले, विजापूरकरांचा आपला द्वेष पडला, ठेवावे कसे? यांचा भरंवसा मानावा कसा? म्हणून विचार करितां गोमाजी नाईक पानसंबळ हवालदार, जिजाबाईसाहेबांचें लग्न जालें ते समयीं जाधवराव यांणीं त्यांचे सेवेसि दिल्हे [होते.] शाहाणे, वडिलांचे चाकरीचे विश्वासू जाणून त्यांजवरि इतबार ठेवून, त्यांची अब्रू वाढवून सेवा घेऊं लागले [होते.] त्यांनीं उत्तर केलें कीं, "महाराज राज्य-आक्रमण करणार. आले लोक न ठेवितील

१. तुंग, तिकोना—पवना व मूळा यांच्या खोऱ्यांत. २. लोहगड—काल्र्याहून ४ मैल. ३. राजमाची—बोरघाटाहून ६ मैल. ४. कुवारी—मुळशी पेटा, जि. पुणे. ५. भोरप (सुधागड). ६. 'देशमुख' की०. ७. हुनर—हुन्नर (पु०) [फा. हुनर्]—युक्ती. ८. रोहिडा (विचित्रगड)—भोरपासून ४ मैल. ९. सरनोबत (पु०) [सर + अ० नौबत्]—स्वतंत्र नगारा असलेला सेनानी. १०. हे वाक्य की० प्रतीत नाही. ११. 'पांचशें सातशें' की०.

तरि पर-राज्यांतील चांगलें नामी माणूस कसें येईल?" असें बोलले. ते सलाह फार चांगली वाटून चाकर ठेविले. त्यांची सरदारी राघो बल्लाळ अत्रे यांसि सांगितली.

१४. कोंकणवर स्वारी.

त्यानंतर सोंढवळकर[१] व कोंढवळकर, हपसियाचे चाकर, मर्द जमातदार होते. त्यांचे राजकारण महाराजांकडे आलें. "आपली स्वारी कोंकणांत यावी, म्हणजे तळा[२] घोसाळा[३] घेऊन देतों." व जंजिरियाचेंही राजकारण आलें. यांजवरून खासा स्वारी कोंकणात जाऊन दोन किल्ले तळा घोंसाळा व पेबचा[४] किल्ला घेतला. प्रांतांत अमल बसविला. बिरवाडी[५] सैदाची, मेट चांगलें पाहून किल्ला केला. याप्रमाणें करून नंतर हरिहरेश्वराचें[६] दर्शन करून, तिकडून येतां मार्गीं गोवलेकर[७] सावंत येऊन भेटले. त्यांस नांवाजून चाकर ठेविलें. त्यांजपाशी तीनशें होनांची तरवार नामांकित होती ती महाराजांना कळलियावरि तीनशें होन व पोषाख देऊन घेतली. तिचें नांव 'भवानी' असें ठेविलें. प्राप्त जालियावरि बहुत यशस्वी जाली. तिची पूजा नित्यनेमें आदरेंकरून करिते जाले. हरिहरेश्वरास जाण्यांत जंजिरे याचें व राजापूरचें [अशीं] राजकारणें करून गेले, परंतु पक्कें न दिसलें, त्याजवरून माघारे आले.

राजापुरीं बाळाजी आवजी प्रभू [होते.] पूर्वीं हबसी याचे दिवाण मजमदार आवजी प्रभू यांजवरि इतराजी त्याची होऊन, त्यांस मारिलें; याजमुळें राजापुरीं मामाचे घरीं, त्याणीं द्रव्य देऊन मुलें माणसें सोडविलीं, तेथें होते. राजकारणाचें पत्र आलें, तें अक्षर फार चांगलें व मजकूरही बहूत तारफेचा पाहून त्यांस येण्याविषयीं पत्र पाठविलें असतां, कर्ज फिटल्यावांचून जाणें ठीक नाहीं म्हणून आले नाहींत. स्वारी वरघाटी येतां दळवी[८] पाळेगारी करीत होते ते मोडून

---

१. सोडबेलकर व कोडबेलकर (की०) २. तळा (तळगड)–माणगाव जि. कुलाबा. ३. घोसाळा (वीरगड)–रोहे (जि० कुलाबा) येथून ६ मैल. ४. पेब (विकटगड)–पनवेल (जि० कुलाबा) येथून ९ मैल. पेबी नावाची देवी आहे म्हणून हे नाव असावे (स. च. पृ. १०४). ५. रोहे तालुका (जि० कुलाबा). ६. दक्षिण कोकणातील सावित्री नदीच्या मुखाजवळ (सदर). ७. गोवेल (चिपळूण) येथील 'सावंताचे घरीं धोप (लांब व सरळ) तरवार नामी' (शिवदिग्विजय पृ. १५४). ८. दळवी [सं. दलपती].

त्यांचे हातीं प्रांत, जागे होते ते घेतले. राजगडास येऊन तेथें शिवापट्टण असें नांव ठेऊन किल्ल्यानजीक घरें, रस्ते, पेठ असें करविलें व शिवापूर[1] येथें पेठ करविली. आंब्राई[2] तेथें व पुण्यांत लावविली. रायगडचें राजकारण आलें. तेथें जाऊन, रायगड भेद करून घेतला. तो किल्ला हबसी याजकडे होता. शके १५६८. किल्ला बहूतच नामी, उंच, बिकट पाहून फार संतोषी जाले. त्याजपाशीं चांगला डोंगर होता तो पाहून किल्ला केला. नांव लिंगाणा[3] ठेविलें आणि राजगडास आले. आणि कल्याणावरि स्वारी करावी, कल्याण प्रांत घ्यावा, म्हणून आबाजी सोनदेव पाठविले. त्यांनीं फौज सुद्धां जाऊन शहर लुटलें, मुलूख घेतला व किल्ले घेतले. ते त्यांसच सुभा सांगून त्यांजकडेच ठेविले. शहरात मुलाणा[4] हयाती सुभेदार होता [तो] दस्त केला. त्याची सून परम सुंदर होती, ती आबाजीपंतीं ठेऊन घेऊन त्यास वस्त्रें देऊन निरोप दिला. तो विजापूरीं जाऊन [त्यानें] बोभाट सांगितला.

सामराजपंतास जंजिरे येथील राजकारण सांगितलें. तें बेताप्रमाणें न जालें. नाकर्ते[5] असा शब्द ठेवून मोरो त्रिमल पिंगले यांस राजगडीं ठेविलें होतें त्यांस पेशवाई दिली. निळो सोनदेव कामावर[6] पडले जाणून बाळकृष्णपंताची मजमू काढून दिल्ही. अंणाजी दत्तो यास सुरनिसी[7] दिल्ही. गंगो मंगाजी यास वाकेनिसी[8] सांगितली. माणकोजी दाहातोंडे यांस सरनोबती होती ते वारले. पागा शिलेदार अधीक वाढत चालले. त्याजवरून नेताजी पालकर यास सरनोबती दिल्ही. राघो बल्लोळ यांस फौजेची सबनिसी[9] दिल्ही. पायलोकांची सरनोबती येसाजी कंक यास सांगितली. याप्रमाणें पायलोक[10] व पागासरदार [यांचा]

---

१. खेडेबारे या गावाजवळ, (तालुका हवेली). २. शहाजीने लाविलेली ही आंबराई 'शहाबाग' म्हणून प्रसिद्ध आहे. शिवाजीने ती सुधारली असावी. (स. च. पृ. १०४). ३. लिंगाणा–महाडहून ईशान्येस १४ मैल. सह्याद्रीचे हे शिखर पिंडीच्या आकृतीचे असल्यामुळे शिवाजीने लिंगाणा हे नांव दिले. (स.च.पृ.१०५). ४. या सुभेदाराचे नाव मुल्ला अहंमद नटिया (नवातियह) (श. शि. पृ. ५१). तो बडी साहिबीणीचा (महंमद आदिलशहाची आई) पक्षपाती होता. (शेजवलकर–शिवछत्रपती १९६४ पृ. ७४). ५. नाकर्ता वि० [सं० न + कर्तृ–कर्ता]–अक्षम. ६. कामावर पडले–उपयोगी झाले. ७. सुरनिसी (स्त्री०) (फा०)–सनदा वगैरेवर शिक्का मारण्याचे काम. ८. वाकेनिसी (स्त्री.) [अ०]–वृत्तांतलेखन. ९. सबनिसी (स्त्री०) (फा०)–शिबंदी व सरकारी नोकर यांना पगार वाटण्याचे काम. १०. पायलोक–पायदळ.

गाहाकरून[1], घाट चढून चंदन[2], वंदन[2], केळजा[3], पांडवगड[4], नांदगिरी[5] हे किल्ले घेऊन सातारियास आले. महाराजांचें पुण्यप्रभावेंकरून, सातारा, परळी आदी किल्ले स्वल्पप्रयासें आले. ते घेऊन इकडील बंदोबस्त किल्लेदार यथास्थित करून, अंणाजी दत्तो सुरनीस व माल सावंत यांस पनाळप्रांतीं पाठविलें. त्यांणीं पनाळा वगैरे घेतले. हें वर्तमान महाराजांस कळतांच पनाळा-प्रांतीं जातां वसंतगड[6] घेतला. तेथून शिरोळ वगैरे ठाणीं घालीत पनाळ्यासा गेले. पावनगड[7] घेतला. विशाळगड[8], बावडा[9], रांगणा[10] किल्ले घेतले[11] आणि कोंकणांत उतरून राजापूर शहर लुटलें. तेथेंही बहूत द्रव्य सांपडलें. महाराजांचे प्रभावें, जेथें जावें तेथें कार्य फत्ते व्हावीं असें होऊं लागलें. त्या प्रांतींचे किल्ले, कोट, ठाणीं, जंजिरे यांत ठाणीं घालून, सुभा रावजी सोमनाथ यांस सांगून ठेविले. बाळाजी आवजी लिहिणार येथें आहेत, त्यांस आणवा म्हणून सांगून आणिले. अक्षर लिहिणार व बोलणार शाहाणे असे पाहून, कर्ज होतें त्यास वारावयास पैसा देऊन, चिटनिसीचीं वस्त्रें साडेतीन सनगें व कलमदान रुपेचें देऊन चिटनिसी सांगितली. शके १५७०. त्यांचे बंधू दोघे होते, त्यांत चिमणाजी आवजी जमाखर्ची लिहिणार पाहून मजमूची फडनिसी[12] दफ्तरदारी दिल्ही. धाकटे शामजी आवजी यांस रायगडची कारखानिसी[13] सांगितली आणि पाठविले.

स्वारी माघारी येतां शृंगारपूर येथें सुरवे पाळेगारी राज्य करून होते. दाहा पांच हचार लोक पाहिजे तसे बाळगून असतां तें संस्थान आपलेसें व्हावें, त्यांणीं आपले लक्षांत वागावें, हें महाराजांचें मानस. सुरवे यांजपाशीं कारभारी शिरके, पिलाजी व तानाजी शिरके होते. पिलाजी शिरके वकिलीस महाराजांकडे आले. सुरवे यांचें राजकारण बनून येईना; तेव्हां वकील तेथेंच दस्त करून

---

१. गाहाकरून–जमाव करून (स. च. पृ. १०६). २. चंदन, वंदन–साताऱ्याच्या ईशान्येस १० मैल. ३. केळजा–केंजळगड? वाईच्या वायव्येस ११ मैल. ४. पांडवगड–वाईच्या वायव्येस ४ मैल. ५. नांदगिरी (कल्याणगड)–साताऱ्याच्या ईशान्येस १४ मैल. ६. मिरजेजवळ? ७. पावनगड–पन्हाळयाच्या पूर्वेस. ८. विशाळगड–कोल्हापुराहून ४५ मैल. ९. बावडा–कोल्हापुरहून ३६ मैल. १०. रांगणा (प्रसिद्धगड)–कोल्हापुराहून ५५ मैल. ११. यापुढे 'रांगण्यांचें. नांव खेळणा ठेवलें.' सा. सा. २ व को०. १२. फडनिसी (स्त्री०)–मुख्य कारकुनी. १३. कारखानिसी (स्त्री०) (फा०)–कार्खाना कार्कुनाचे काम.

ठेविले आणि फौज पाठवून संस्थान घेतलें. सुरवे बुडविले. वरकड शिरके हबसाणांत परागंदा होऊन गेले, त्यांचे राजकारण महाराजाकडे आलें. ते[1] व हे अनुकूळ जाले. सर्वांस आणून सरदारी व सेवा सांगून आपणांपाशीं ठेविले. ते बहूत निष्ठेनें चालूं लागले याजवरून वाढविले. जेथें जावें तेथें चांगलें मनुष्य शिपाई व कर्ते, गुणी कारकून लिहिणार पाहून ठेवावे. महाराज गुणग्राहक, पद्महस्ती.[2] याप्रमाणें माणसांनीं उमेदीनें कार्यें अधीकच करावीं, ऐसें होऊं लागलें. याप्रमाणें दाभोळापासून राजापूर [पावेतों] देश, किल्ले, बांधारीसुद्धां महाराजानीं घेतले. सर्व हतवीर्य होऊन, 'महाराज परम भले, धर्मबुद्धी, यांचे राज्य वृद्धीस पावावें,' हे सर्वांस इच्छा निर्माण होऊन महाराजांचे आश्रय करिते जाले. राजापूरची[3] स्वारी [होऊन] देश, दुर्ग फत्ते करून राजगडास आले[3]. प्रभाकर उपाध्ये यांचे पुत्र बाळंभट व गोविंदभट जवळ ठेवून उपाधीक परंपरागत त्यांचे स्वाधीन केलें.

महाराजांनीं कल्याणापासून राजापूरपर्यंत कोंकण घेतलें. किल्ले, कोट घेऊन बंदोबस्त केला. राजगडनें रायगडास आले. तेथून सर्व जमियत करून, सरनोबत व सरदार फौजेची निवड करून, चेउलावर स्वारी केली. शहर लुटलें. सोनें, रुपें, मोतीं, माणीक, हिरे इत्यादी द्रव्य बहूत सांपडलें. तीन दिवस मुक्काम केला. कोट घेतला. रामेश्वर तेथें [देवस्थान], त्याचें दर्शन करून खजोजी[4] ठाणेदार कैद केला.

१५. विजापुरास बोभाटा.

हे [सर्व] वर्तमान वरचेवर विजापुरीं जात गेलें. मुलाणा हयाती कल्याणाहून गेला. त्यानीं पादशहास शिवाजी राजे यांनीं बहूत फंद[5] केला, किल्ले कोट फार घेतले, खजिने मारले, शहरें मारलीं वगैरे बोभाट[6] सांगितला. 'याचें पारिपत्य लौकर करावें. दिवसेंदिवस बळावत चालले, हे चांगलें नाहीं.' [असेंही सांगितलें.]

---

१. ते व हे–परागंदा झालेले व पिलाजी शिर्के. २. पद्महस्ती (वि०)–पद्मचिन्ह असलेला. यशस्वी. ३. हे वाक्य की० नाही. ४. खजोजी–हे नाव मुसुल्मानी दिसते. खजोजी हा फिरंग्यांचा हस्तक असावा (स. च. पृ. १०८). 'खोजोजी' की०. ५. फंद (पु०) [फा० फन्द्]–बंडाळी. ६. बोभाट (पु०) [बोभ + आट प्रत्यय]–गवगवा.

त्याजवरून सारे अमीर जमा करून विचार केला आणि बाजी सामराज म्हणून सरदार दाहा हजार फौजेनिशीं, [शिवाजीस] धरून आणावें [असें] सांगून रवाना केले. ते महाडपर्यंत गेले. तों महाराज स्वारी करून, चेऊल लुटून, ठाणीं घालून राजगडास पावले. हें कळलियावरि बाजी खराब होऊन, असाध्य जाणून, माघारे फौजसुद्धां विजापुरीं गेले.

१६. "लेक आपले स्वाधीन नाहीं."

तेव्हां पादशहांनीं राजे कर्नाटक-प्रांतीं होते, त्यास लेहून पाठविलें कीं, "तुमचा बेटा यांणीं आफरी[1] होऊन बेकैदी[2] करतात. किल्ले कोट, ठाणीं घेतलीं. शहरें लुटलीं. तुम्हीं पातशाहींतील उमराव विश्वासू असतां, हें करितां ठीक नाहीं. तरि त्यांस हुजूर आणवावें." त्याजवरून उत्तर पाठविलें कीं "लेक आपले स्वाधीन नाहीं. हजरतीने[3] त्याचें पारिपत्य पाहिजे तसें करावें." असें सांगून व लिहून पाठवींत गेले असतां, पादशहास राजे याचा इतबार न पडे. राजे यांनीं शिवाजीराजे यांस पत्र लिहिलें जे, "आम्हांवर तुमचे बेकैदी वर्तणुकेवरून इतराजी[4] पादशाहाची जाली. तुम्ही करितां व केलें हें चांगलें न केलें. याउपरि पादशाहास जाऊन भेटावें. पादशाही किल्ले, कोट व मुलूख त्यांचे आज्ञेप्रमाणें सोडून देणें." असें बहूत प्रकारें लिहिलें.

१७. शिवाजीचा शहाजीस इशारा.

ते समयीं महाराजांनीं विचार केला जे, "वडील देवाप्रमाणें, त्यांची आज्ञा ते शिरसा प्रमाण. परंतु आम्हांस धर्म-उच्छेद जाला, म्लेंछमय सर्व जालें, हिंदू धर्म बुडाला. तो जिवाभ्य[5] श्रम करून स्थापावा हें प्राप्त. हेंच मनांत. तेव्हां वडिलीं लिहिलें तसें चालणें कसें घडतें? त्याहून हें श्रेयस्कर होय. तथापी [हा] मार्ग अवलंबिला, [त्यावरून] वडील लिहितात, तेव्हां, पादशाहाची बेमर्जी[6] आम्हांमुळें वडिलांवरि, यास्तव वडिलांस श्रम वाटत असतील, याचा

१. आफरी (पु०) [अ० इफ्राद्]-बंडखोर. २. बेकैदी (स्त्री०) [फा० बी-कैदी] स्वैरवर्तन. ३. हजरत (पु०)-स्वामी. हा शब्द की० नाही. ४. इतराजी (ना०) [अ० इयति-राझी]—अप्रसन्नता. ५. जीवाभ्य-जीवादारभ्य (क्रि० वि०) जिवापलीकडे. ६. बेमर्जी (स्त्री०) [फा०-बी+अ० मर्झी]-इतराजी, बेखुशी.

विचार कसा करावा ?" म्हणोन विचारग्रस्त होते. जवळ स्त्री सईबाई–साहेब होतीं, त्यांस "प्राप्त जाला विचार असा, वडिलांचीं पत्रें आलीं, कसें करावें ?" [असें] ते समयीं विचारिलें. त्यांनीं उत्तर केलें जे, "आम्ही स्त्रिया. 'स्त्रीबुद्धिः[1] प्रलयंगता' असें शास्त्र आहे. साहेबांजवळ मोठे मोठे सरदार व सरकारकून आहेत, त्यांस येविषयींची सलाह विचारून करणें तें करावें. तथापी विचारिलें त्याअर्थीं आमचे विचारें दिसतें कीं, "साहेबीं राज्य साधावें, देव–ब्राह्मणांची स्थापना करावी, धर्म रक्षावा, हे इच्छा धरिली, ते देवावर भार घालून [चालवावी.] चांगले गोष्टीस देव यश देणार, देईल. वाईट होणार नाहीं. राज्य साधणें यास मोह काय उपयोगी ? महाराज[2] दूरदेशीं,[3] संस्थानही मजबूद, तिकडेच बळावून असावें. इकडील स्वस्थता जालियावरि आणावें.[4] असें लिहून पाठवावें. त्यांसही या गोष्टीचा संतोषच आहे." असें याप्रमाणें बोललियावरि महाराजाचे मनोगत, अंतःकरणांत विचार तेच बोललीं, यावरून फारच संतोष[5] पावले. आणि सर्वत्र कारकून व सरदार यांस जमा करून विचारितां याच अन्वयें त्यांतही सर्वांच्या सलाह पडल्या. तेव्हां हाच विचार ठरला. "आम्ही गेल्यावर पादशहा गौरव करणार, करितील म्हणावें, तरि आम्हीं किल्ले कोट घेतले ते सोडीत नाहीं. अधीकच घेणार. याचें त्यांस सुखावह कसें वाटेल ?" असें ठरावून उत्तरें निविष्ट[6] दाखवावयाजोगीं पाठविलीं; व आंतून महाराजांस, "आपण तो प्रांत बळावून फौज जमियत करून व आणखी साध्य करून, हिंदू राजे यांचीं सख्य–साध्यता राजकारणें करून असावें. तों आम्ही लवकरच इकडील बंदोबस्त करितों. नंतर इकडे येण्याचें करावें. तोंपर्यंत सावधतेनें असावें" असें लिहिलें.

१८. शहाजीस कैद.

तेव्हां शाहाजी महाराजांनीं दाखवावयाजोगीं पत्रें आलीं तींच पाठवून आपले स्वाधीन लेंक नाहीं अशी खातरजमा[7] करविली. तीं पत्रें पाहिलीं. परंतु

१. स्त्रीबुद्धिः–आत्मबुद्धिर्हितार्थाय गुरुबुद्धिर्विशेषतः। परबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयंगता॥ २. महाराज–शहाजी. ३. दूरदेशी–तंजावरी. ४. आणावे–'यावें' असे अधिक चांगले. (स. च. पृ. ७४). ५. 'दाब (सोन्याचा कमरपट्टा) चौलक्ष होनांची सईबाईस दिली' (मराठी साम्राज्याची छोटी बखर पृ. १९). ६. निविष्ट–प्रविष्ट. ७. खातरजमा (स्त्री०) [फा० खातिर्जमुअ]–खातरी.

राजे याचा विश्वास पडून संशय पादशाहाचा न जाई. तेव्हां बाजी घोरपडे त्या प्रांतीं होते, त्यांस सांगोन हरतऱ्हेनें शाहाजी राजे कैद करून आणावे, असें करविलें. राजे ते समयीं त्रिवादी[1] नजीक चंदावर येथें असतां घोरपडे याणीं भोजनास म्हणून बोलावून निखालसपण दाखविलियावरून जेवणास गेले. तेथें दगा करून धरिले आणि पादशाहापाशीं घेऊन आले.

१९. औरंगजेब दिल्लीचे तख्त बळकावितो.

त्या संधीत दिल्लीहून औरंगजेब यांस त्यांची बहीण[2] तेथें होती त्यांनीं, औरंगाबादेस सुभा करून होते, त्यांस लिहिलें जे, "बादशाहाची बदनजर[3] जाली, बेहोष[4] जाले आहेत, तरि तुम्हीं सत्वर येऊन पादशाहीचा बंदोबस्त करावा." अशी तेथील बातमी येतांच महकूबसिंग यास सुभेदारीवर ठेवून आपण फौजेसुद्धां दिल्लीस जाण्याचा मनसबा केला. शिवाजीराजे बहूत प्रतापी, पुंडपणें बळावले, योग्यता आली, सामान, लोक चांगले जथविले,[5] आपले किल्लेकोटही घेतात, गेलियावरि अधीकच घेतील. त्याअर्थी आपण असतां हिसाब[6] धरीत नाहींत, मागें सुभे ठेवणें त्याशींही सुरळीत चालणार नाहींत, हें एक. दुसरें, मर्द शिपाई, आपणांस मसलत पडली त्याअर्थीं आपले सेवक करून बरोबर घ्यावे, सुभाही सांगावा. म्हणून राजकारण पाठविलें. "तुम्ही बराबर यावें" असें सांगून पाठविलें असतां महाराजांनीं अनादर करून वकिलास सांगितलें "आम्हांस तूर्त विजापूरची मसलत पडली [आहे.] शाहाजी महाराज [यांवर] इतराजी होऊन पेचांत आहेत, हें एक जालेवांचून येणें घडत नाहीं" [असें] सांगून निरोप वकिलांस दिला. गेले नाहींत.

औरंगजेब दरमजल निघोन दिल्लीस गेले. अलमगीर[7] पादशाह बाप कद करून डोळ्यात सळया फिरविल्या. आणि आपण तख्तावरि बसोन पादशाहात करूं लागले. या गलबलीत[8] चार अमीर औरंगजेब यांचे भाऊ होते, त्यांनी लढाई

---

१. 'त्रिवापी' की०. २. रोशन–आरा. ३. बदनजर (स्त्री०) [फा० बद्–अ० नझ्र]–वाईट दृष्टी. ४. बेहोष [फा० बी–होश्]–धुन्द, बेशुद्ध. शहाजहानास अपस्माराचे झटके येत (स. च. पृ. १०९). ५. जथविणें. (स. क्रि.)–जमविणे. ६. हिसाब (पु०)–पर्वा. ७. येथे 'शहाजहान' हवे. ८. गलबल–(स्त्री०) [अ० घलबा]–गडबड; हुल्लड.

केली. त्यांत उदाराम[1] माहूरकर देशमूख होते ते युद्धीं पडले. त्याची स्त्री इणें हिंमत धरून, आपली सरदारी कायम करून युद्ध केलें. फत्ते पावलियावरि वर्तमान कळलें. त्याजवरून तिजवर संतोषी होऊन 'रायबागीण'[2] होय, म्हणून किताब 'रायबागीण' असा औरंगजेबांनीं दिल्हा. माहूरचे देशमुखीचें फरमान[3] तिचे नांवें करून देऊन, कांहीं दिवशीं औरंगाबादचे सुभ्याचे निसबतीस चाकरी करावी म्हणोन पाठविली. मुरादबक्ष व सुजातशाह[4] [व] दाराशुक्र[4] असे तिघे भाऊ होते ते औरंगजेबांनीं मारून आपणच पादशाही बळकाविली. याजप्रमाणें[5] जाऊन दिल्लींचें आधिपत्य बहिणीनीं लिहिल्यावरून प्राप्त होऊन करिते जाले.[5]

२०. बादशहाची खातरजमा.

इकडे शाहाजी महाराज विजापुरीं आणिलियावरि पादशाहांनीं फार सांगून पाहिलें व मुरारपंत यांजपासून सांगविलें असतां "पुत्र स्वाधीन नाहीं." हींच बोलणीं पडत गेलियावरि भिंतीस कोनाडा करून, त्यांत एक चिरा बसवावयाची जागा राखून, चिनलें. असें केलें आणि याउपरि ल्याहावे जे, "आमची हे आवस्था जाली, तुम्ही बादशाही मुलूख, किल्ले न द्याल तरि आम्हांस चिरा बसवून शेवट करितात" [असें राजांस बादशाहानें म्हटलें.] त्याजवरून पत्रें लिहिलीं. नित्य राजे यांस एकदोन वेळे त्यांतून काढावें व फिरून ठेवावें असें करूं लागले. उत्तर आलियावरि चिरा बसवावा [असा] निश्चय केला. ते समयीं महाराजांस बहूतच पश्चात्ताप जाला. तेव्हां "आपण जाऊन परिणाम नाहीं; धर्मस्थापनेसाठीं हें कर्म केलें. श्रीनीं आपले मुळें वडिलांस हा समय प्राप्त केला. तेव्हां जाऊन अथवा मसलत करून कांहीं होत नाहीं. अधीकच[6] वांकडे पडणार.[6] त्याअर्थी महाराजांस तैसाच प्रसंग प्राप्त जाल्यास आपणही देहत्याग करावा. यापरती तोड[7] दिसत नाहीं. चालून जाऊन युद्ध केलें तरि अधीक पीडा करितील." असे बहूत चिंताग्रस्त असतां रात्रीं श्रीचा दृष्टांत जाला कीं, "राजे

१. 'उमराव' की०. २. रायबागीण–राजव्याघ्री. ३. फरमान (पु०) [फा० फर्मान्] आज्ञापत्र, सनद. 'फर्मानं राजपत्रकम्' राजव्यवहारकोश. ४. मूळ नावे शाहा सुजा व दारा शिकोह. ५. हे वाक्य की० नाही. ६. हे वाक्य की० नाही. ७. तोड (स्त्री०) [सं० तुड्–तोडणे; प्रा. तोड]—उपाय.

यांस भय लागू देत नाहीं. हें संकट परिहार करितों.[१] चिंता[२] करूं नको.[२]" याजवरून संतोषी होऊन आंतून बातमी याप्रमाणें पोहोंचविली, आणि पत्रें आलीं त्यांचीं उत्तरें पाठविलीं कीं, "आपले दैवें करून होणार तसें होईल; आमचे दैवीं असेल तसें आम्हीं करणार." तीं पत्रें दाखविलीं आणि पुसतां सांगितलें "पुत्र स्वाधीन नाहीं, पाहिजे तसें करावें." तेव्हां पादशाहानीं निश्चय केला जे, "प्राणापर्यंत आली असतां [यांचे हातें] गोष्ट घडत नाहीं. स्वाधीन असते, तरि हरतऱ्हें करून आणविते. याउपरि यांचा अपराध नाहीं." अशी खातरजमा जाली. याजवरून रणदुलाखान व मुरारपंत व सरजाखान यांणीं अर्ज केला जे, "यांचे स्वाधीन बेटा नाहीं, [हें] प्रमाण.[३] शाहाजी राजासारिखे अमीर, मर्द असे प्रकारें मारूं नये. मोठ्या कामावर घालून मारावे." अशी फारच रदबदली[४] करून वांचविलें. आणि रणदुलाखान जामीन[५] होऊन स्वाधीन करून घेतले. जागीर करार राखून उपकार केला. त्यास वाई, कराड, रहिमतपूर जागीर होती.

२१. मुरारपंतांचा खून.

नंतर कांहीं दिवशीं सुलतान सिकंदर पादशाहा शरिरीं पीडा होऊन वारले. त्यानंतर त्यांचे लेंक अली इदलशाहा पादशाहा जाले. व बेगम बूसाहेबीण[६] त्यांची मातुश्री, इणें पादशाहा लाहान त्यास घेऊन आक्रम[७] केला. स्त्रीबुद्धी! मुरारपंतावर कांहीं अंतर[८] आणून दस्त करावे मारावे, हें चार त्यांचे द्वेषी होते त्यांनीं सांगितल्यावरून, विचार न करितां, बोलावून आणून, कैद करून मारावे [असें ठरविलें.] हें त्यांस कळतांच जवळ हौद होता त्यांत स्नान करून शिखात्याग[९] करून संन्यासग्रहण केलें असतां तसेंच मारिलें. याप्रमाणें स्त्रीनाइकी[१०] बाळनाइकी[११] जाली! [हें] पाहून [१]शाहाजीराजे निघोन कर्नाटकांत गेले.

---

१. 'करिते' की०. २. हे वाक्य की० नाही. ३. प्रमाण (न०)—निश्चितपणा. ४. रदबदली (स्त्री०) [फा० रद्द–उ–बदल]–तरफदारी; वकिली. ५. जामीन (पु०) [अ० झामिन्]–जिम्मेदार, हमीदार. ६. 'बडीसाहेबीण' की०. ७. आक्रम (पु०) [सं० आ+क्रम्]–वर्चस्व. ८. अंतर (न० सं०)–चूक, कसूर. ९. 'शिकात्याग' की०. १०. स्त्रीनाइकी (स्त्री०)–स्त्रीस्वामित्व. 'राज्य स्त्रीबल पाहून' की०. ११. बाळनाइकी (स्त्री०)–बालराजा मुख्य असलेले राज्य.

२२. कोंडाणा व पुरंदर सर.

इकडे शिवाजीमहाराज यांनीं किल्ले कोंढाणा येथील भेद तानाजी मालुसरे यानी आणल्यावरून त्यास किल्ला घ्यावयास पाठविलें. किल्लेदार उदयभान रजपूत [होता.] मालुसरे यांनीं भेद करून, माळ लावून वरते चढतात, हे बातमी उदयभान यास समजतांच हुशार होऊन चालून आला. युद्ध जालें. इकडील तिकडील लोक कामास आले. महाराजांचे दैवेंकरून उदयभान रणीं पडला. फत्ते[१] जाली. किल्ला घेतला. हें वर्तमान कळलियावरि महाराज किल्ला पाहावयास गेले. किल्ला फारच चांगला पाहून किल्ल्याचें नांव 'सिंहगड' असें ठेविलें. तानाजी मालुसरे याचे भाऊ सूर्याजी मालुसरे यास तेथील सुभा देऊन ठेविलें.

नंतर नगरशहरावरि चालून गेले. पुरा[२] मारिला. तेथें[३] सोनें, रुपें, कापड बहुत मत्ता सांपडली.[३] हत्ती व पांच सातशें घोडे पाडाव[४] करून आणिले. द्रव्य[५] पदरीं जालें. लोकांस बक्षिसें बहुमान देऊं लागले[५]. याजवरून माणूस बहुत कामकाज करूं लागले.

नीळकंठ हैबतराव सरनाईक, मर्द, शहाणे, परमक्रूर होते. यांजकडे किल्ला पुरंदर दौलतमंगळ[६] पादशाही, मुरारपंतीं, बांधिला होता. [सरनाईक-यांस] इनामगांव व गावगन्ना[७] हक्करुसूम[८] चालत होते. निजामशाही[९] लोक पादशाहाशीं बदलून चालूं लागले[९]. त्याजवरून औरंगाबादेचे सुभ्याची फौज चालून किलियावरि आली. खावंदाशीं निमक हरामी न करावी असें लोकांनीं सांगितलें. ते न ऐकलें. म्हणून स्त्रीनीं सांगितलें असतां तिजला तोफेचे तोंडी बांधून उडविली. पादशाही फौजेंत हें वर्तमान समजलें तेव्हां फौज उठोन गेली. असे तपीळ,[१०] क्रूर, पुंडावे करून किल्ला बळकावून होते. ते वारले. पुत्र निळो नीळकंठ व पिलाजी नीळकंठ व संक्राजी नीळकंठ असे तिघे भाऊ चांबळीकर[११] सर नाईक

१. फत्ते (स्त्री०) [अ० फत्ह]–विजय; यश. २. पुरा (पु०) [सं० पूर]–शहराची पेठ. ३. याऐवजी 'तेथें माल पुष्कळ सांपडला' की०. ४. पाडाव (पु०)–पराभव. ५. याबद्दल 'लोकांस बक्षिस दिलें. लोक संतोषी झाले' की०. ६. 'दौलत मोगल' की०. ७. गावगन्ना (क्रि०वि०)–प्रत्येक गावास. ८. हक्करुसूम (पु०) [अ० हक्क–अ० रुसूम (रस्मूचे अनेकवचन)]–निरनिराळ्या प्रकारचे हक्क. ९. याऐवजी 'निजाम शाही केला. पादशाही शिबंदी ठेवून चालूं लागले' (की०). १०. तपीळ (वि०) [सं० तप+ईल प्रत्यय]–तामसी. ११. चांबळी–पुरंदरच्या उत्तरेस.

ब्राह्मण तिघेही भांडूं लागले. निळोपंत याचा व दादाजी कोंडदेव याचा पूर्वीं घरोबा चालत होता, त्याजवरून महाराजाशींही स्नेहानींच होते. महाराज राजगडानें निघोन सुपे-देशीं जावें म्हणून पुरंदरावरून चालले. नारायणाचे[1] देवालयाजवळ मुकाम केला. ते समयीं किल्ल्यावरील लोक यांणी विचार केला जे, 'घर-कलह सरनाईक करितात, तेव्हां किल्ला हरकोण्ही घेईल, गमावितील. याकरितां शिवाजीमहाराज थोर व भोंवता मुलूख, किल्ले यांचे जाले. यांचे पदरीं पडावें. असा बेत करून त्रिवर्गास बोलले जे, "राजे साहेबांचा व तुमचे वडिलांचा घरोबा ; अनायासें स्वारी जवळ आली, तुम्हीं जाऊन भेट घ्यावी, त्यांचा आदर करावा, त्रिवर्ग भांडतां हें त्यांसि बोलावें, ते सांगतील तसें चालावें," म्हणून सांगितलें. यावरि त्यांचेही विचारास येऊन, भेटले. महाराजांस राहाविलें. त्या दिवसांत दिपवाळीचा सण आला. तेव्हां स्नानास किलियावरि बोलाविलें. ते समयीं "चार मातबर सरदार यांस टाकून यावें हें ठीक नाहीं." [महाराज] बोलले. तेव्हां 'मानकरी असतील तितके घेऊन यावें,' सांगितलें. यावरून किलियावरि गेले. तीन दिवस वरतेच राहिले. ते सणाचे दिवसांत त्रिवर्गाचें प्रकरण मनास आणूं लागले. वडील भाऊ दोघांस[2] [दाद] लागूं देत नाहीं.[2] त्यारून[3] त्या दोघांचें विचारें महाराज थोर, यांचे पदरीं पडावें असें राजकारण महाराजांशीं लागलें. लोकांचें [राजकारण] होतेंच. महाराजांस[4] तेंच कर्तव्य अगत्य जाणून त्यांस हातीं घेतलें व तिघे फर्जंद[5] व लोक सर्व अनुकूल जाले[4] तिसरे दिवशीं निरोप घेऊन यावें, तों निळोपंत निजावयास गेले हे बातमी उभयतांनीं कळविलियावरि किल्यावरील लोक संधानावरि[6] होते. ते व आपले लोक पाठवून निळोपंतास दस्त केले. आणि त्रिवर्गांसहीं किल्ल्याखालीं बराबर आणिलें. किल्ला घेतला. किल्ल्याचा बंदोबस्त केला. 'इनाम गांव चांबळी व हक्क त्रिवर्गांनीं यथाविभाग खावे आणि सुखरूप राहावें, [असें] सांगून बराबर घेतले. सेवा सांगितली. हिरोजी फर्जंद व हरबाजी व तुळोजी असे तिघे शिपाई जाणोन वाढविले. याप्रमाणें पुरंधर किल्ला फत्ते करून, सुप्यास जाऊन, श्री जेजोरी [येथें] देवदर्शन करून राजगडास माघारे आले. जेजोरींत राजवाडा बांधविला.

---

१. पुरंदरच्या पायथ्याशी. २. याबद्दल 'दोघांस कांहीं न देत?' की०. ३. त्यावरून? ४. ही वाक्ये की० नाहीत. ५. फर्जंद (पु.) [फा० फर्ज़न्द]–पुत्र. ६. संधान (न०) [सं० सम्+धा) –सूत्र.

२३. कल्याणचा खजिना.

कल्याण प्रांत पाहावयास स्वारीस गेले. तेथें गेलियावरि मालमावेशा[1] सांपडली ते पाहून मोजदाद[2] करून राजगडास पाठविली. बहुत द्रव्य सांपडलें. महाराजास संतोष जाला. हें पाहून आबाजीपंतीं अर्ज[3] केला जे, एक स्त्री बहूत सुंदर, लावण्यवान महाराजांचे सेवेशीं योग्य जाणोन ठेविली आहे." असें बोललियावरि मातबर दरबार करून, आबाजीपंतास "तुम्ही स्त्री चांगली आहे बोललां ती पाहाण्यास घेऊन येणें, 'म्हणून सांगितल्यावरून तिला वस्त्रें भूषणें देऊन आणिली. महाराजानीं तिला पाहून परम संतोषी जाले आणि बोलले जे, "इचें लावण्य असेंच आमचे मातुश्रीचें असतें, तर आमचेंही स्वरूप असेंच जालें असतें!" याप्रमाणें दरबारांत बोललियाकरि सर्वांस आश्चर्य वाटतें जालें. आबाजीपंतास सांगितलें, "राजांनीं, ज्यांस यश पाहिजे त्यांनीं, उच्छिष्ट स्त्री-अंगिकार करूं नये; परस्त्री-अभिलाष करून रावणादिक क्षयास गेले. त्यांत राजास प्रजा सर्व अपत्याचे [जागां] होत. स्त्रिया करणें तरि शतावधी शक्ती पाहून कराव्या असा राजधर्म आहे." तेव्हां महाराज थोर होत, असें सर्व मानिते जाले. आणि त्यासमयीं त्या स्त्रीस वस्त्रें अलंकार देऊन तिचा सासरा विजापुरास गेला [होता] त्याजकडे पाठविली[4]. जागा चांगली पाहून तेथें इमारत करावी म्हणोन त्याचें काम आबाजीपंतासच सांगितलें. आणि रायगडास आले.

२४. नाशिकचा बंदोबस्त.

मोरो त्रिमळ पिंगळे पेशवे नासीक प्रांतीं फौज, सरदार देऊन रवाना केले त्यांणीं जाऊन सत्तावीस किल्ले बांधारीचे घेतले. त्यांजकडेच तेथील बंदोबस्त सांगितला.

---

१. मालमावेशा (स्त्री०) [अ० माल्–अ० मवेशी]–चीजवस्त. 'माल मवेसी' सा०. २. मोजदाद (स्त्री.) (सं० मा–मोजणे+फा० दाद्)–मोजणी; गणना. ३. अर्ज (पु०)–[अ० अर्झ्]–निवेदन; विज्ञप्ती. ४. शिवाजीने कल्याण भिवंडी दि. २४ ऑक्टोबर इ. स. १६५७ मध्ये घेतली (सरकार–शिवाजी पृ. ३८२).

२५. महाराजांची लग्नें.

महाराजांनीं आपलीं लग्नें करावीं असें चित्तांत आणून, तीन लग्नें अवकाशें करून दोन तीन वर्षांत केलीं. शरीरसंबंध जाधवराव, मोहिते व गायकाड[1] [यांशीं करून] केलीं.

२६. 'जावली फत्ते केली.'

चंदरराव[2] मोरे जावलींत, दाहा हजार लोक पदरीं, तसेच किल्ले व खोरे बळावून होते. महाराजांनीं त्यांशीं सलूक[3] लावून 'तुम्ही आमचे म्हणावें, आज्ञेंत वागावें, चालावें' असें राजकारण करविलें असतां, मुदाईनें[4] महाराजांस खातरेंत न आणितां चालूं लागले. याजवरून महाराजांनीं विचार केला जे, "मावळे लोक यांचा सरदार जवळ, पुंड, राजकारणें करून हातीं न लागे; तेव्हां कावेबाजीचे[5] हुनरे हातीं घ्यावा." म्हणून विचार करून त्याजकडे बोलण्यास राघो बल्लाळ सबनीस यांस पाठविलें. शें दोनशें लोक बरोबर निवडक दिल्हे. त्यांनीं जावळीस जाऊन शरीरसंबंधाचें बोलणें लाविलें. आणि तेथेंच राहिले. तेथील विचार पाहातां चंदरराव कैफी[6] पाहिला. लोकांचीही फूट. राजकारण सिद्ध करून महाराजांस सांगून पाठविले जे, "साहेबांचे पुण्यप्रभावें चंदरराव याचें काम करितों. साहेबीं स्वारी हरएक निमित्यें या रोखें [करावी.] येणें सिद्ध करावें. येथील संकेताप्रमाणें कार्य करून सूचना करितों, तसें घाटाखालीं उतरून यावें." त्याजवरून महाराजांनीं सबनिसाचे लिहिले अन्वयें राजगडाहून पुरंदरीं आले. तेथून श्रीमहाबळेश्वराचे दर्शनास गेले असतां, त्या अवसरांत रघुनाथपंतांनीं चंदरराव [व] त्याचे भाऊ सूर्याजीराव या दोघांस खलबतास म्हणून नेलें. तेथेंच मारिलें. आणि [पंत] दरवाज्यास आले. तों लोक कांहीं सावध जाले. थोडे होते. त्यांस मारामार करून, संभाळून आपले

---

१. गायकवाड असावे. सकवारबाई गायकवाडाकडील असून तिचे लग्न जानेवारी १६५७ मध्ये झाले. (श. शि. पृ. २०९). २. चंद्रराव हा घराण्याचा किताब (सदर पृ. ४२). ३. सलूक (पु०) [अ० सुलूक्]—सख्य. ४. मुदाई (स्त्री०) [अ० मुद्दई]—दावेदारी. ५. कावेबाजी—(स्त्री०) [फा० काव् (खणणे)—फा० बाजी प्रत्यय]—कारस्थानीपणा. 'भ्रमणं नामं कावा स्यात्' रा. व्य. को. ६. कैफी [फा० कैफी] मादक पदार्थ सेवन करणारा.

लोकांत आले. तेथून निघतां संभाजी कावजी यानीं मोरे याचे कारभारी हणमंतराव म्हणून नामी सरदार होते, त्यांस मारिलें. महाराज महाबळेश्वरीं होते, तेथें देवाचें दर्शन होऊन, सूचना येतांच निसणीचे[१] घाटें जावलीस गेले. जावली दोन प्रहरपर्यंत भांडली. नंतर ठाणें घेतलें. चंदरराव याचे लेंक बाजीराव व कृष्णराव धरिले व[२] कबिलेही धरिले[२]. ते पुरंदरी नेऊन कैदेंत ठेविलें. आणि उभयतां पुत्र मोरे पुण्यास नेऊन दक्षिणेकडे निमजगा[३] आहे तेथें मारिले. कबिले कैदेंत होते ते कांहीं दिवशीं सोडिले. जावली फत्ते केली. शके १५७७ मत्ता बहूत हातीं लागली. वासोटा किल्ला घेतला. त्याचें नांव व्याघ्रगड ठेविलें शिवतरें[४] खोरें येथें दादाजीपंत म्हणून मोरे यांजकडील राहात होते, ते दस्त केले. तेंही खोरें घेतलें. याप्रमाणें मोरे यांचीं ठाणीं प्रांत होता तो घेतला[५].

२७. प्रतापगड वसविला.

नंतर प्रतापगडीं मेट मेढा[६] [घालून] बांधिलें होतें ते जागा फार चांगली पाहून किल्ला वसविला. इमारत करविली. त्याचें नांव प्रतापगड असें ठेविलें. कांहीं दिवस तेथें राहून, तेथील बंदोबस्त करून राजगडीं स्वारी आली.

२८. बेदर व जुन्नर मारली.

आणि बेदरावर स्वारी करावी असा विचार करून, जमाव करून स्वारीस गेले; ते बेदर शहर मारून मालमत्ता घेऊन ठाणीं घेतलीं, व माघारे येते जाले. मधीं[७] प्रांतांत महाल, ठाणीं लुटीत येऊन पोंचलें.[७]

जुन्नर व चाकण येथें औरंगजेबाकडील सुभ्यांनीं ठाणीं घातलीं होतीं, तिकडे जाऊन जुनर मारून, अंमल बसविला. चाकणचा किल्ला घेतला.

---

१. निसणीचा घाट–महाबळेश्वराच्या पश्चिमेस. शिडीसारखा आहे. २. हे वाक्य की० नाही. ३. निमजगा [फा० नमाझ]–मुसुल्मानी प्रार्थनेचे स्थळ. ४. शिवतर खोरे–भोरहून कोकणात जाताना वरंघ गावाजवळ. ५. शिवाजीने जावळी १५ जानेवारी इ. स. १६५६ रोजी घेतली. (सरकार–शिवाजी पृ. ४४). रियासतकारांच्या मते हा प्रकार ता. २७–१–१६५६ रोजीं घडला. (श. शि. पृ. ४४). ६. मेढा (पु०)–उभ्या लाकडांचा कोट. ७. हे वाक्य की० नाहीं.

२९. संभाजीचा जन्म.

वडिल स्त्री सईबाई–साहेब गुरुदर होती ती प्रसूत जाली. पुत्र जाला. शके[1] १५७९, हेमलंबीनाम संवत्सरे, जेष्ठ शु॥ द्वादशीस. त्याचा समारंभ साकरा वगैरे वांटून, दान धर्म करून, नांव संभाजीराजे असें ठेविलें.

३०. शिवाजीचे अवतारकृत्य.

पृथ्वीचे ठायीं धर्माची ग्लानी जाली, व देव-ब्राह्मण-यज्ञयागउच्छेद जाला. पृथ्वीस पीडा जाली असतां, पूर्व–युगांतरीं देवांनीं मनुष्यवेषें अवतार धारण करून व महान ऋषी ब्राह्मण भूदेव निर्माण होऊन धर्मस्थापना घडावी; तसेंच कलियुगाचे ठायीं धर्म–उच्छेद जाला असतां ईश्वरी अंशेंकरून राजे निर्माण व्हावे व ऋषी यांनींही अवतार धारण करून कर्म–ज्ञान–उपासना–कांडत्रयात्मक वेदमार्ग दाहा[2] हजार वर्षेपर्यंत स्थापावा, अशीं विष्णुपुराणादिकांचे ठायीं वचनें आहेत. त्या अन्वयें म्लेंछमय पृथ्वी जाली, सर्व धर्म–उच्छेद जाला, गाईब्राह्मणांस बहूत पीडा जाली. त्यायोगें शिवाजीमहाराज पूर्वीं श्रीचें वरप्रदान होऊन निर्माण जाले. त्यांस बुद्धी म्लेंछांचा उच्छेद करावा आणि धर्म स्थापावा अशी जाली अततां, त्यांस साह्यभूत ऋषींचे अवातर सत्पुरूष सिद्ध असे त्या काळाचे ठायीं बहूत निर्माण जाले. कलियुगाचे ठायीं मुख्य धर्म उपासना, नामस्मरण कीर्तन हे सुलभ उपाय. यांची स्थापना करून धर्मही रक्षिते जाले.

३१. तत्कालीन संतमंडळी.

चिंचवडाचे ठायीं [मोरया] देव श्रीगणपति-उपासक, साक्षात्कारीच, गणपतीनें प्रत्यक्ष दर्शन द्यावें, भोजनादी [कर्मे] एके ठायीं घडावीं, असे परम सिद्ध व तपस्वी [होते जाले.] त्यांनीं कीर्तनधर्म व उपासना स्थापिली, निगडी[3] येथें रंगनाथस्वामी व विठ्ठलराव त्यांचे बंधू हे विजापूरीं[4] पादशहाची सेवा करीत असतां श्रीदत्तात्रेय सांप्रदाय, श्री-साक्षात्कार असे, रंगनाथस्वामी ब्रह्मचारी

१. संभाजीचा जन्म दि. १४-५-१६५७ रोजी झाला. (श. शि. पृ. २०९); (सरकार– शिवाजी पृ. ३८२) २. कलौ दहसहस्रेषु हरिस्त्यजति मेदिनीम् । तदर्धं जान्हवी-तोयं तदर्धं ग्रामदेवताः ॥ हा श्लोक येथे चिंतनीय आहे. (स. च. पृ. ११५). ३. निगडी–सातारा जिल्ह्यात. ४. 'बेदरीं' की०.

व विठ्ठलराव गृहस्थधर्में करून [होते. त्यांनीं] उपासना, कीर्तन भक्ति स्थापिली. औरंगाबादेस वामन जाले. पहिठणीं[1] निंबाजीबाबा हे थोर सिद्ध जाले, तसेच बोधलेबावा जाले. जयरामस्वामी ब्रह्मचर्य-व्रतें करून व तीर्थें व तपें करून भगवद्भक्तियोग परम सिद्ध कृष्णउपासक दत्तात्रेय शांत सांप्रदायी महायोग्य असे बडगावीं जाले. केशवस्वामी भागानगरीं परम सिद्ध. कीर्तन-भक्ति-ज्ञानस्थापक जाले. परमानंद बाबा पोलाद-पुरीं[2] बहूत योग्य, तपस्वी, सिद्ध जाले. तसेच त्रिंबक नारायणाश्रम-बाबा जाले. पाटस येथें मौनीबाबा जाले. अचलपुरी म्हणून गोसावी परम सिद्ध जाले, [ते] संगमेश्वरीं राहिले. श्रीतुकारामबावा लोहगांव देहू येथें जन्मान्तर-योगें शूद्रवर्णात मोरे म्हणून कुळीं उत्पन्न जाले. श्रीपांडुरंगाचे परम भक्त, धुरीण होऊन, पांडुरंगाचा साक्षात्कार प्रत्यक्ष व पूर्ण कृपा त्या योगें अभंगें करूनच सकल धर्म व शास्त्रें, पुराणें यांचें प्रमेय[3] रचना करून जगदोद्धार करिते जाले.

३२. तुकोबांच्या कीर्तनांतील चमत्कार.

त्यांचें कीर्तन ऐकावें म्हणून शिवाजीमहाराज सिंहगडाहून रात्रीस घोड्यावर बसून दोन हुजरे[4] बराबर घेऊन पुण्यास येऊन, कीर्तनास ओळख न देतां बसून, कीर्तन ऐकून जावे. असें होत्सातां[5] एके दिवशीं नित्याप्रमाणें पुण्यांत वाण्याचे घरीं तुकोबांचें कीर्तन चाललें आहे, शिवाजी महाराज जाऊन कीर्तन ऐकत बसले आहेत, तों अविंधाचें[6] प्राबल्य [असल्यामुळें] महाराज कीर्तनास येत असतात अशी बातमी अविंधास कळलियावरून, चाकणचे ठाणियांतून दोन हजार पठाण[7] पाठवून ते तो वाडा वेढून उभे राहिले.[7] हें कीर्तनांत लोकांस कळून कथेंत गलबल जाली. शिवाजीराजे यांस धरून न्यावें तरि वोळख पुरून सांपडत नाहींत. याजकरितां सर्वांसच धरून न्यावें, मारावें [असें] पठाण बोलूं लागले. तें तुकोबास कळतांच "सर्व [जणांनीं] स्वस्थ बसावें, कीर्तन ऐकावें" म्हणून सांगून श्रीपांडुरंगाचा धावा केला. शिवाजीराजे भय न पावतां कीर्तन ऐकत बसले. तों

१. पहिठणीं–पैठणी २. पोलादपूर हे सावित्रीच्या काठीं. महाड तालुक्यांत. ३. प्रमेय (न०) (सं०)–प्रमाणांनी सिद्ध करावयाचा विषय. ४. हुजरे (पु०) निकटवर्ती सेवक. ५. होत्सातां (क्रि०वि०)–होत असतां. ६. अविंध (पु०) [सं० अ+व्यध्]–मुसुल्मान; भोक न पाडलेला (मोतीं, कान). ७. हे शाहिस्तेखान पुण्याहून परत गेल्यावर इ. स. १६६३ मध्ये घडले असावे. (स. च. पृ. ११७).

इतक्यांत श्रीपांडुरंगांनीं शिवाजीमहाराज यांचें स्वरूप धरून, घोड्यावर बसून, वाड्यांतून पठाणाचे आंगावरून बाहेर निघाले. ते पाहून राजे जातात [म्हणून] त्यांचे मागें सारे पठाण लागून गेले. त्यांस अरण्यांत वेऊन जाऊन नाशातें पावविले आणि गुप्त जाले. इकडे महाराज कीर्तन ऐकून आरती जाल्यावरि सिंहगडास निघोन गेले.

३३. रामदासांचा अवतार.

तसेच सर्व जगाचा उद्धार घडावा म्हणून श्रीमारुतीचा अवतार श्रीराम[१]–उपासक अैसेच[१] तदंश श्रीरामदास स्वामी निर्माण जाले[२]. गंगातीरीं[३] जांब म्हणून गांव आहे तेथील वृत्तिवंत[४] कुळकर्णी, परंपरा–श्रीरामभक्त, त्यांत सूर्याजीपंत परम धर्मशील, तपस्वी, श्रीसूर्यउपासना करिते जाले. श्रीरामचंद्राची व मारुतीची परम भक्ती करिते जाले. त्यायोगें ब्राह्मणरूपें सूर्य प्रत्यक्ष होऊन दर्शन जालें. रामनवमींत मध्यरात्रीं, श्रीचे देवालयीं साक्षात्कार होईल सांगून, प्रसाद देऊन अदृश्य जाले. यांणीं त्याअन्वयें मध्यरात्रीं श्रीमारुतीचे देवालयीं असतां श्री—रामचंद्र साक्षात्कार होऊन पंचायतन[५] पुजेस दिल्हें, व 'दोन पुत्र उदरीं होतील ते जग–विख्यात कीर्ती करून जगाचा उद्धार करतील, भगवद्भक्त सिद्ध होतील" [अशी] आज्ञा जाली. याअन्वयें दोन पुत्र जाले. ज्येष्ठ ते प्रपंच व परमार्थ दोन्ही करून गृहस्थाश्रमधर्में त्या प्रांतींच परम कीर्ती करून भगवद्भक्त जाले. दुसरे रामदासस्वामी बालविरक्त, व्रतबंध[६] जाला असतांच सावधान म्हटलें. तेव्हां प्रपंच कशास करावा म्हणून तपश्चर्या अरण्यवास करिते जाले. गायत्री पुरश्चरणें[७] व उपासना, अष्टांग[८]–योगसाधन व ज्ञान [यांनीं] संपन्न असे होत्साता गंगातीराचे ठायीं अरण्यांत फलाहार, पर्णाहार, शीतोष्ण–पर्जन्य–सहनादी उग्र तप करिते जाले. तदनंतर पंचवटीस बारा वर्षें राहून उपासना केली. तेसमयीं श्रीरामचंद्र दर्शन व मारुतीचा साक्षात्कार होऊन उपदेश जाला. तेव्हांपासून श्रीमारुतीचे

---

१. 'श्रीरामदास उपासक कलियुगीं, जसें पूर्वी अगस्तिमुनी श्रीरामउपासना स्थापक झाले, असेंच' की०. २. जाले सन १५२६. की० ३. गंगातीरीं–गोदावरीतीरी ४. वृत्तिवंत (पु०)–वतनदार. ५. पंचायतन (न०)–शिव, विष्णू, सूर्य, गणपती व देवी यांचा समुदाय. ६. विवाह? ७. पुरश्चरण (न०)–मंत्राचे जपानुष्ठान. ८. अष्टांगयोग (पु०)–यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान व समाधी इ०

नित्य दर्शन, भोजनादी एक ठायीं घडावें असें जालें. तेथें आज्ञा जाली कीं, "तुम्हांस जगदोद्धारास्तव अवताररूपी निर्माण केलें. तरि जगांत संचार करून जनांस उपासनामार्ग लावावा. शिवाजीराजा धर्मस्थापनेस अवश्यभूत भीमावतार[1] जाला त्यास साह्य होऊन सहवास करावा." त्यायोगें श्रीकृष्णातीरीं येऊन, चाफळ येथें पर्वतांत घळी[2] आहे तेथें राहून, श्रीकृष्णास्नान व मनाचे श्लोक करून पांचसात घरीं भिक्षा करावी, एक श्लोक होय तों उभें राहावें, पीठ येईल तें खडकावर मळून पानगे[3] करून भक्षावें. केव्हां निरशनव्रतें पर्वतांतच असावें असे असते जाले.

३४. शिवाजीचा सत्पुरुषांविषयी ध्यास.

कोणे एके समयीं महाराज महाडचे मुकामीं कांहीं कार्यांचे उद्देशें असतां तेथें [एका] सत्पुरुषाचें कीर्तन जालें. त्यांत ध्रुवाख्यान-कथा जाली. तेव्हां श्रीनारदांनीं ध्रुवास कृपा करून उपदेश केला. त्यायोगें भगवत्साक्षात्कार होऊन, या लोकींचें राज्य भोगून ध्रुवपद प्राप्त होऊन भक्तशिरोमणी मुक्तीस अधिकारी जाले. हें श्रवण करून आपणांस असे प्रकारें नारदाचे सारखा सत्पुरुष याची कृपा होऊन, आपण म्लेंच्छ वधून धर्म स्थापावा हा संकल्प केला, हा सिद्धीस जाऊन भगवत्कृपा होय असें घडावें, हा निजध्यास[4] प्राप्त जाला. सर्व सत्पुरुषांचीं दर्शनें घेतलीं, व त्यांचे त्यांचे निर्वाह, उत्साह, महोत्साह, अन्नदानें यांची स्वस्थता गांव भूमी आदी करून [देऊन] करून दिली. सर्वांचे आशीर्वाद घेतले. आणि आपले अंतःकरणीं तसें आचरण व प्रताप [व्हावा असें आणिलें.]

३५. रामदासांचा दृष्टांत.

पुढें रामदासस्वामी यांची कीर्ती श्रवण केली. त्यांचें दर्शन, प्रसाद व्हावा [हा] बहुतच वेध लागला. आणि भेटीविषयीं एकदोन वेळ प्रयत्न केला. परंतु पर्वताचे ठायीं दर्शन न घडे. हे आले असतां त्यांनीं निश्चय पाहाणें

---

१. भीमावतार—शंकरावतार. 'भीमस्थाणु रुद्रउमापतिः (अमरकोश). २. घळी-घळ (स्त्री०)—गुहा. ३. पानगा (पु०) पानाला पीठ लावून भाजलेली भाकरी. ४. निजध्यास (पु०) [सं० निदिध्यास]—एकाग्रता.

यास्तव अन्य ठिकाणीं जावें, असें जालें. ते समयीं बहुतच रात्रदिवस दर्शनाविषयीं चिंतन करूं लागले. तेव्हां एके दिवसाचे [ठायीं] स्वप्नगत स्वामींचें दर्शन होऊन प्रसाद श्रीफळ दिल्हें. "तुमचा हेतू सर्व पूर्ण होईल. मनोरथ सिद्धीस जातील. ज्या किल्ल्याचा उद्योग करितां तोही उदईक हस्तगत होईल." [असें] सांगून अदृश्य जाले. हे जागृत होऊन पाहातात, तों[1] नारळ हातीं आहे, स्वामी नाहींत[1]! हें पाहून चित्तवृत्ती बहुत उद्विग्न दर्शनाविषयीं जाली. प्रातःकालीं किल्लाही हस्तगत जाला. तेव्हां आणखी प्रयत्न कोणी पाठवून करविला जे, "आपणांस दर्शन द्यावें. नाहींतरि राज्यत्याग करून येणें प्राप्त." म्हणून हें कसें घडतें, हें चिंतन करितां यांणीं "आम्ही निस्पृह, अरण्यचर, तुम्ही धर्मस्थापक म्हणून तुमचेंच कल्याण चिंतून तुमचे राज्यांत येऊन, वास करून आहों. समयानरूप[2] दर्शनही घडेल" [असें] सांगितलें.

३६. तुकारामांचें पत्र.

नंतर तुकारामबावांस आपण येथें यावें, दर्शन द्यावें, म्हणून पत्र पाठविलें, व श्रीदेव चिंचवडकर यांचेंही दर्शन घेऊन त्यांस वृत्तांत सांगितला? असतां, तुकारामबोबा यांनीं पत्र लिहिलें. अभंग पंधरावीस कडवीं करून "तुम्हीं रामदास यांचे ठायीं निश्चय केला तो दृढ करावा; आम्ही तेच ते, भेद नाहीं; त्यांजपासूनच सर्व कार्यसिद्धी व मनोरथ शेवटास जावे, असेंच निर्मित[3] आहे; तुम्हीं तेथेंच विश्वास ठेऊन आपलें मनोगत पूर्ण करावें." म्हणोन निरोप सांगून कारकून गेले होते त्यांजपाशीं पत्राचें उत्तर अभंग करून पाठविलें तें:—

॥ श्री ॥

विरंचीनें[4] केलें ब्रह्मांड सकळ। तयामाजी खेळ नानायुक्ती ॥ १ ॥ युक्तीचे बाळक[5] तपोनिष्ठ ज्ञानी। गुरु-भक्ती मानीं विश्वासेंसी ॥ २ ॥ ऐसा[3] तुझा प्रेमा कळे कांहीं एक। पाहोनियां लेख पत्रिकेचे ॥ ३ ॥ शिवनाम तुझें ठेविलें पवित्र। छत्रपती सूत्र विश्वाचें कीं ॥ ४ ॥ व्रत तप नेम योग ध्यान कळा। करोनि मोकळा

१. तों स्वामी नाहींत. प्रसाद नारळ हातीं आहे (समर्थांची बखर (१९५०) पृ. ५०). २. 'समयानुरूप' असे हवे. ३. निर्मित (न. वि.)–पूर्वनियोजित. ४. विरंची (पु०)–ब्रह्मदेव ५. 'चाळक' की० ६. 'तैसा' सा० २.

जाहालासि तूं ॥ ५ ॥ हेत लागला हा आमुचेया भेटी । पत्रामाजी गोष्टी हेची थोर ॥ ६ ॥ याचें हें उत्तर ऐके गा भूपती ! लिहितों विनंती हेताचि हे ॥ ७ ॥ अरण्यवासी आम्हीं फिरूं उदासीन । दर्शन हें हीन अमंगळ ॥ ८ ॥ वस्त्रावीण काया झालीसे मळीण । अन्नरहित जिणें फळाहारीं ॥ ९ ॥ रोड हात पाय दिसे अवकळा । काय तो सोहळा[1] दर्शनाचा ॥ १० ॥ तुका म्हणे माझी विनंती सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नको ॥ ११ ॥

ऐसी माझी वाणी दीनरूप पाहें । करूणा त्या आहे हृदयस्थासी ॥ १ ॥ नव्हों[2] केविलवाणे नाहीं आम्ही दीन । सर्वदा शरण पांडुरंगा ॥ २ ॥ पांडुरंग आम्हां पाळिता पोशीता । आणिकाची वार्ता काय तेथें ॥ ३ ॥ तुझी भेटी घेणें काय हो मागणें । आशेचेंही शून्य केलें तेणें[3] ॥ ४ ॥ निराशेचा गांव दिघला आम्हांसी । प्रवृत्ती[4] भावासी सांडियेली[4] ॥ ५ ॥ पतिव्रतेचें मन पतीसच भेटों । तैसे आम्हीं विठो-माजी नांदों ॥ ६ ॥ विश्व हे विठ्ठल नाहीं कांहीं दुजें । देखणें[5] हें तुझें तुजमाजी[5] ॥ ७ ॥ तुजही विठ्ठल व्हावा ऐसा वाटे । परी एक मोठें आडवेंची ॥ ८ ॥ सद्गुरू श्रीरामदासाचें भूषण । तेथें घालीं मन चळूं नको ॥ ९ ॥ बहु स्थानीं वृत्ती चाळविल्या जेव्हां । रामदास्य तेव्हां । घडे केंवी ॥ १० ॥ तुका म्हणे बापा चातुर्यसागरा । भक्ती एक थारा भाविकांसी ॥ ११ ॥

३७. समर्थांची प्रेरणा.

या प्रकारेंकरून तुकारामबावांचें उत्तर आलें. चिंचवडचे श्रीदेव यांचें दर्शन घेऊन त्यांसही प्रश्न केला कीं, "आमचा मनोरथ श्रीनारदांनीं ध्रुवास कृपा केली, तैशी सद्गुरुकृपा घडावी. आम्ही चित्तीं धरिला धर्म सिद्धीस जाऊन श्रीहरिप्राप्ती व्हावी." तेव्हां त्यांनीं सांगितलें "रामदासस्वामींचे ठायीं निश्चय धरावा, तुम्हीं चित्तीं धरिले तसे अधिकार सर्व गूण तपेंकरून ज्ञानभक्तियोगें उपासनेंकरून पुर्णत्वास येऊन सिद्ध-दशा-प्राप्त जाली [आहे.] आम्हां सर्वांस मान्य, वंद्य आहेत. तुमचे मनोरथ त्यांजपासून सिद्धीस जाणार." याजवरून बहुत उद्युक्त जाले असतां, यांचा वेध पाहून, स्वामींनीं पत्र पाठविलें तें पत्रः—

---

१. सोहळा (पु०) [सं० सौहार्द]–आनंदायक प्रसंग. २. नव्हों–नव्हे. 'नहों' (निर्णयसागर गाथा). ३. तेणें–त्या पांडुरंगानें. ४. 'प्रवृत्ती भागासी सांडियेलें' (नि. गा.). ५. 'देखणें तुझेंही तयामाजी' (नि. गा.).

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसि आधारू। अखंड स्थितीचा निर्धारू श्रीमंत योगी ॥ १ ॥ परोपकाराचिया राशी। उदंड[1] घडती जयासी। तयाचे गुणा-महत्त्वासी। तुळणा कैंची ॥ २ ॥ नरपती हयपती गजपती। गडपती भूपती जळपती। पुरंदर[2] आणि शक्ती[3]। पृष्ठभागीं ॥ ३ ॥ यशवंत कीर्तिवंत। सामर्थ्यवंत वरदवंत ॥ पुण्यवंत नीतिवंत[4]। जाणता राजा ॥ ४ ॥ आचारशीळ विचारशीळ। दानशीळ धर्मशीळ ॥ सर्वज्ञपणें सुशीळ। सर्वांठायीं ॥ ५ ॥ धीर उदार सुंदर। शूर क्रियेसी तत्पर ॥ सावधपणें नृपवर। तुच्छ केला ॥ ६ ॥ तीर्थ-क्षेत्रें तीं मोडलीं। ब्राह्मण-स्थानें भ्रष्ट जालीं ॥ सकळ पृथ्वी आंदोळली[5]। धर्म गेला ॥ ७ ॥ देव-धर्म गो–ब्राह्मण। करावयासी रक्षण ॥ हृदयस्थ जाला नारायण। प्रेरणा केली ॥ ८ ॥ उदंड पंडित पुराणिक। कवीश्वर वैदिक याज्ञिक ॥ धूर्त तार्किक सभानायक। तुमचे ठायीं ॥ ९ ॥ या भूमंडळाचे ठायीं। धर्म[6] रक्षी ऐसा नाहीं ॥ महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां ॥ १० ॥ कांहीं धर्म-कृत्यें चालती। आश्रित होऊन कितेक असती। धन्य धन्य तुमची कीर्ती। विश्वीं विस्तारली ॥ ११ ॥ कित्येक दुष्ट संहारिला। कितेकासी धाक सुटला। कितेकासी आश्रयो जाला। शिव कल्याण राजा ॥ १२ ॥ तुमचे देशीं वास्तव्य केलें। परंतु वर्तमान नाहीं घेतलें। रुणानुबंधें[7] विस्मरण जालें। काय नेणो ॥ १३ ॥ सर्वज्ञ-मंडळी धर्ममूर्ती। सांगणें काय तुम्हांप्रती। धर्मस्थापनेची कीर्ती। सांभाळिली पाहिजे ॥ १४ ॥ उदंड राजकारण तटलें[8]। तेथें चित्त विभागलें। प्रसंग नसतां लिहिलें। क्षमा केली पाहिजे ॥ १५ ॥

३८. शिवसमर्थ भेट.

याप्रमाणें पत्र आलें याजवरून महाराज[9] यांस निश्चय जाला[9] कीं, "या उपरि स्वामीचें दर्शन घडतें, कृपा करितात." म्हणून चाफळीं जाऊन पर्वतांत गेले असतां स्वामींची भेटी अकस्मात जाली. ते समयीं साष्टांग नमस्कार केला.

---

१. उदंड (वि० क्रिवि०) [सं० उद्+दंड]–फार. २. पुरंदर (पु०)–इंद्र. ३. शक्ती (स्त्री०)–देवी. ४. 'जयवंत' सा० २. ५. आंदोळणे (उक्रि) [सं० आंदोलन]–कंप पावणे. ६. 'धर्मरक्षिक' सा० २. ७. ऋणानुबंध (पु०) [सं० ऋण+अनुबंध] –प्राक्तन. ८. तटणे–(अक्रि.) [सं० तट]–अडणे. ९. 'महाराज याणीं निश्चय केला' सा० २.

स्वामींनीं मस्तकीं हात ठेऊन उठविलें, आणि आशीर्वाद दिल्हा जे, "सर्व मनोरथसिद्धी होईल." ते समयीं राजे यांणीं प्रार्थना[1] कीं, "अनुग्रह-प्रसाद घडावा." तेव्हां स्वामींनीं उत्तर केलें कीं, "आम्ही निस्पृह, अरण्यचर. तुम्हीं या छंदीं पडो नये." तेव्हां यांणीं आग्रह केला कीं, "यासाठीं राज्यत्याग करीन. स्वामीपरता लाभ मानीत नाहीं." असा दृढनिश्चय व भाव पाहून महाराज बहूत तृषाक्रांत जाले पाहिले. तेव्हां तेथेंच कुबडीनें खाणून उदक केलें. तें घ्यावें सांगितलें. यांणीं चूळ भरून नेत्रांस लाविलें. आणि [उभयतां] खालीं सिंगणवाडी[2] येथें आंब्राईत आले. महाराजांस स्नान करवून श्रीमारुतीस अकरा नमस्कार करविले. आणि उपदेश जाला. नंतर उभयतांचा चार घटका आणखी एकांत झाला. तें वृत्त ते व तेच[3] जाणत. महाराजांनीं लक्ष रुपयांचे होन, मोहोरा, पुतळ्या[4] अशी खिचडी करून, त्यांत कांहीं मोतीं[5] रत्नें घालून स्वामीस अभिषेक-पूजा केली ती सर्व सुवर्णाचीच केली. तें द्रव्य स्वामींनीं त्या काळीं अरण्यांत उधळून दिल्हें आणि सर्व गुराखी पोरें बोलावून जमा करून लुटण्यास सांगितलें. लुटविलें त्या स्थानीं अद्यापी कोण्हास कांहीं मोहोर, पुतळी असें एखादे समयीं [सांपडतें] असें आहे. त्यानंतर वानरें भोंवतीं होतीं, त्यांत एक वानरास प्रसाद आण सांगितलें. त्याणीं झाडावर जाऊन दोन आंबे आणिले, ते दिले. [तेव्हां महाराज म्हणाले.] "सेवा व नित्य सहवास होत असावा, राज्य संपादिलें यांतील उपभोग [स्वामीकडून] माझे हातीं घडावा, येविषयीं आज्ञा व्हावी." तेव्हां "उपाधीचे [आम्हांस] कारण नाहीं. अरण्यवास, पर्वतवास सोडावयाचा नाहीं," [असें स्वामींनीं] म्हटल्यावरून "कांहींतरी सेवा घ्यावी," [असा] आग्रह केला. ते समयीं "अकरा[6] मारुती यांस पूजा, नैवेद्य [यांसाठीं] अकरा बिघे जमीन याप्रमाणें त्या गांवचे गांवीं देऊन पूजा करवावी. जेथें श्रीराम-स्थापना, भक्ती, पूजा, तेथें उत्साह,[7] पूजा, नैवेद्य साहित्य करीत असावें" [अशी] आज्ञा

---

१. 'प्रार्थना केली' असे हवे. २. चाफळहून अर्धा मैल. ३. 'उभयतां' की०. ४. 'पुतळ्या रुपये' सा० को०. ५. 'मोत्यें' असें हवें. मोतीं हे एकवचन. ६. अकरा मारुती-चाफळ (दोन), उंब्रज, पारगाव, मसूर, शहापूर, शिराळे, शिंगणवाडी, मनपाडळे, माजगाव, बाहे. (स. खं. आळतेकर, समर्थचरित्र श. १८५५ पृ. १०४). ७. उत्साह (पु०) [सं. उत्+सह्]-उत्सव.

केली. आणि "सर्वही सेवा तुमचे हातें यथावकाशें घडेल. पूर्वी श्रीकुल देवतावर जाला तोच भीमावतार तुम्ही. संकट समयीं श्रीदेवीचें स्मरण करावें. हृदयस्थ होऊन आज्ञा करील तसें करीत असावें. नित्यनेम पांच[1] चालवावें. परमार्थ ग्रंथ-दासबोधाचें अवलोकन अथवा श्रवण कांहींतरी करावें, मानसपूजा आणि सगुण-मूर्ति-पूजा आणि जप व तीर्थ-सेवन असें पांच नेम चालवावे. शास्त्रें वेद यांणीं धर्म स्थापिले तसे दृढ चालावे. समागमही इच्छाल तेव्हां घडेल." याप्रमाणें आज्ञा करून घोड्याची लीद पडली होती ती वोंजळ भरून पदरीं घातली, आणि लेंड्या मोजविल्या. आठ होत्या. ऐशीं हजार घोडीं [यांची] पागा होईल, आणि यवन, दीपावर पतंग तसे, क्षयास जातील." अशी आज्ञा करून निरोप दिल्हा. ते समयीं कल्याण गोसांवी समीप होते त्यांस आज्ञा केली कीं, "तुम्हीं राजासमागमें जाऊन श्रीरामचंद्रजीचें दर्शन टेकावरि[2] करवावें आणि श्रीस आमची प्रार्थना सांगावीं जे, "राजे यांस तुरा प्रसाद द्यावा." त्याजवरून श्रीपाशीं आले. पूजा करून उभे राहिले. कल्याण गोसांवी यांणीं प्रार्थना केली, तों श्रीचा तुरा मस्तकींहून घरळून[3] खालीं आला. महाराजांनीं घेऊन कृतकृत्य जाले. नमस्कार घातला. या रितीनें महाराजांस अनुग्रह जाला[4] असतां नित्यनेम तीर्थसेवन, भक्ती, अंतर्निष्ठ ज्ञान, परमार्थ व राज्यवैभव [यांचा] दिवसें दिवस उदय प्राप्त होता जाला. ज्या काळीं स्मरण करावें तेव्हां तत्काल एकांतीं व स्वप्नगत श्रीस्वामीचें सादृश्य दर्शन [होऊं लागलें.] कल्याण स्वामी वगैरे शिष्य त्यांतच यांचीही गणना होती जाली. यांस राजनीती व क्षत्रधर्म[5] म्हणून ग्रंथही अवलोकनास पाठविले. आणि "मुख्य प्रजापालन, धर्मस्थापन त्या अंगें राज्यउपभोग सेवन करावे, हाच तुम्हांस मुख्य योग व तपश्चर्याही तुमची येणेंकरूनच सफळ होय. सर्वजनांचें पोषण करून धर्में करून राज्य [करतें] होत्साता श्रीभक्ती करीत असावें." अशी आज्ञा जाली ती मान्य करून महाराज प्रतापगडीं येते जाले.

३९. तुकारामांचा उपदेश.

तेथें आले-नंतर प्रतापगडाहून श्रीतुकारामबावाकडे पत्र व कारकून पाठविले जे,

---

१. 'नित्यनेम चालवावा' की०. २. टेक-टेप (पु० न०)—टेकाड; लहान डोंगर. ३. घरळणे (अकि०)—घरंगळणे, घसरणे. ४. 'शके १५७१, विरोधिनाम संवत्सरे वैशाख शु॥ ९ मु० चाफळ येथें' की०. ५. 'क्षात्रधर्म व राजधर्म' की०.

"आपण एक वेळ कृपा करून येऊन दर्शन घडावें. श्रीरामदासस्वामींनीं कृपा करून मनोरथ सिद्धीस नेले, सनाथ केलें. हें सर्व वृत्त आपणास निवेदन करण्याचा हेतू बहुत लागला आहे म्हणोन." त्याजवरून "शीघ्र कालें, कारणें करून' भेटी होणें ते सहज रितीनें होईल म्हणून सांगून पाठवून, उत्तर अभंग करून पाठविले ते :—

तुम्हापाशां आम्हीं येवोनिया काय। वृथा शीण होय चालण्याचा ॥१॥ मागावें हें अन्न तरि भिक्षा थोर। वस्त्राचिये थार[1] चिंध्या बीदी[2] ॥२॥ निद्रेसि आसन उत्तम पाषाण। वरी तें प्रावर्ण[3] आकाशाचें ॥३॥ तेथें काय करणें कवणाची आस। वायां होय नाश आयुष्याचा ॥ ४ ॥ राजगृहा यावें मानाचिया आशे। तेथें काय वसे समाधान ॥ ५ ॥ रायाचिया घरीं भाग्यवंता मान। इतरा सन्मान नाहीं तेथें ॥ ६ ॥ देखोनीया वस्त्रभूषणाचे जन। तात्काळ मरण येतें आम्हां ॥ ७ ॥ ऐकोनियां मनीं उदास व्हाल जरी। तरी आम्हां हरी उपेक्षीना ॥ ८ ॥ आतां हेंचि तुम्हां सांगेन कौतुक। भिक्षे ऐसें सुख नाहीं नाहीं ॥ ९ ॥ तप-व्रत-याग महा भले जन। आशाबद्ध हीन वर्तताती ॥ १० ॥ तुका म्हणे तुम्ही श्रीमंत नांवाचे। पूर्वील देवाचे हरीभक्त ॥ ११ ॥

आतां एक योग साधावा हा नीट। भल्याचा हा वीट मानूं नये ॥ १ ॥ जेणें योगें तुम्हां लागूं पाहे दोष। ऐसा हा सायास करूं नको ॥ २ ॥ निंदक दुर्जन सांगातें असती। त्यांची युक्त चित्तीं आणूं नको ॥ ३ ॥ परिक्षावे कोण राज्याचे रक्षक। विवेकाविवेक पाहोनियां ॥ ४ ॥ सांगणें नलगे सर्वज्ञ तूं राजा। अनाथाच्या काजा साह्य होसी ॥ ५ ॥ हेंचि ऐकोनियां पाऊं समाधान। आतां या दर्शना काज नाहीं ॥ ६ ॥ घेवोनिया भेटी कोण हो संतोष। आयुष्याचे दिवस गेले गेले ॥ ७ ॥ एकदोनी कर्मे जाणोनीयां वर्मे। आपुलीया भ्रमें राहें आतां ॥ ८ ॥ कल्याणकारक अर्थ याचा एक। सर्वांभूतीं देख एक आत्मा ॥ ९ ॥ आतां रामीं मन ठेऊनीयां राहें। रामदास पाहें आपणची ॥ १० ॥ तुका म्हणे राया धन्य धन्य स्थिती। त्रैलोक्यीं हे ख्याती कीर्ती तुझी ॥ ११ ॥

आतां हे विनंती प्रधान-अष्टका। प्रभूसी विवेका ऐशा सांगा ॥ १ ॥ प्रतिनिधी

---

१. थार (पु०) [सं० स्थान, स्थिर]–आश्रय. २. बीदी–बिदी (स्त्री०) [सं० वीथि] मार्ग. ३. प्रावर्ण (न०)–प्रावरण, पांघरूण.

मनरंजक चतूर। सात्विकाचें घर तुम्हांपाशीं ॥ २ ॥ मजुमूचे धणी लेखन-कारक। पत्रींचा विवेक समजावा या ॥ ३ ॥ पेशवे सुरनीस चिटणीस डबीर। राजाज्ञा सादर सेनापती ॥ ४ ॥ भूषणपंडित विद्या अध्ययन। वैदिका नमन माझें असो ॥ ५ ॥ पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनी। श्रवणीं विवंचोनी घाला राया ॥ ६ ॥ सात्त्विक प्रेमळ दृष्टांतांचें मत। बोलावें बहुत कळावया ॥ ७ ॥ यथास्थित नेम सांगणें ते राया। अर्थ पाहावया नेदां भीड ॥ ८ ॥ भीडे ऐसा बोल गाळुनीया अर्थ। अनर्थकारी तुम्हां होईल तें ॥ ९ ॥ सत्यवंशीं जन असाल भूषण। अर्थ हा सांगणें वाचोनियां ॥ १० ॥ तुका म्हणे तुम्हां नमन अधिकाऱ्यां। सांगावें तें राया पत्र माझें ॥ ११ ॥

राया छत्रपती ऐकावें वचन। रामदासीं ध्यान लावा वेगीं ॥ १ ॥ रामदासस्वामी सोयरा सज्जन। त्यासि तनुमन अर्पी बापा ॥ २ ॥ मारुतीअवतार स्वामी प्रकटला। उपदेश केला तुजलागीं ॥ ३ ॥ रामनाममंत्र तारक केवळ। जालासे शीतळ उमाकांत ॥ ४ ॥ उफराठी नामें जपतां वाल्मीक। जाला पुण्यश्लोक तात्काळिक ॥ ५ ॥ तेंच बीज त्याची वसिष्ठ-उपदेश। त्याहून विशेष काय आहे ॥ ६ ॥ आतां धरूं नको भलत्याचा संग। राम पांडुरंग कृपा करी ॥ ७ ॥ धरूं नको आस आमुची भूपाळा। रामदासीं डोळा लावीं वेगीं ॥ ८ ॥ तुझी चाड नाहीं आम्हां छत्रपती। आम्ही पत्रपती त्रैलोक्याचे ॥ ९ ॥ चारी दिशे आम्हां भिक्षेचा अधिकार। नेमिली[1] भाकर भक्षावया ॥ १० ॥ पांडुरंगीं आमुची जाली पूर्ण भेटी। हातांत नरोटी दिधली देवें ॥ ११ ॥ आतां पडूं नको आमुचिया काजा। पवित्र तूं राजा रामभक्त ॥ १२ ॥ विठ्ठलाचे दास केवळ भिकारी। आम्हां लागीं हरी उपेक्षीना ॥ १३ ॥ शरण असावें रामदासा लागीं। नमन साष्टांगीं घाली त्यासी ॥ १४ ॥ तुका म्हणे राया तुज असो कल्याण। सद्गुरू शरण असे बापा ॥ १५ ॥

४०. शिवाजीचे आज्ञापालन.

याप्रकारें उत्तर व निरोप आलियावरि बहूत समाधान पाऊन कृतार्थ जाले. स्वामींनीं आज्ञा केली त्याअन्वयें परमार्थ व प्रपंच, राज्य, प्रजापालन, धर्मस्थापन, करिते जाले. आणि पृथ्वीचे ठायीं दिगंत कीर्ती संपादन करून

---

१. 'नमिळे' सा० को० व सा० २.

श्रीरामदास स्वामींचे अनुग्रहें हे संत मंडळींत परम पवित्र यांत गणना, योग्यता, असे जाले.[१]

याप्रमाणें राज्य-आक्रमण उपदेश कथन–प्रकरण समाप्त.

---

१. पुढील मजकूर की० प्रतीत अधिक आहे:–'याप्रमाणें राज्य संपादून सत्कीर्ती व्यय धर्म करून करिते झाले. आणि म्लेंछ यांचा पराभव करून गोब्राह्मणांस पीडा होती ती दूर करून धर्म स्थापिला आणि राज्य संपादिलें. तें राज्य धर्माप्रमाणें चालविण्यासारखीं मनुष्यें योजून त्यांजवर आपण पाहात; आणि कांहीं परत्र साधन करावें याकरितां साधूंचा सहवास, वरचेवर जाणें येणें, तेंही करीत; आणि श्रीरामदास स्वामींनीं उपदेश केला व त्यांनीं नित्यनेम सांगितल्याप्रमाणें गुरुआज्ञा मान्य करून करीत. या योग्य सर्वांसच गणणें. स्वस्थ अंतःकरणें करून स्वामींचे चरणीं दृढनिश्चय झालेवरून योग्य झाले.'

अफजलवध—यवनयुद्धप्रसंग—प्रकरण ३

१. ‘तेही मनोरथ सिद्धीस गेले.’

श्रीशिवाजीमहाराज यांणीं महाराष्ट्र-राज्य[1] आक्रमण केलें. त्यांत चालण्याची[2] मर्यादा बहूत[3] चांगली करून, श्रीरामदास स्वामींची कृपा होऊन उपदेश व्हावा इच्छिलें. तेही मनोरथ सिद्धीस गेले. यानंतर प्रतापगडीं इमारत बहूत चांगली केली आणि प्रतापगडींचें इमारत करणें यांत महाबळेश्वर येथील देवळाचा जीर्णोद्धार व श्रीकृष्णाउगमाचें देवालय व पोवळी[4] ऐसी इमारत करविली.

२. अफझलखानाची प्रतिज्ञा.

[इकडे] बेगम बडे साहेबीण व अली इदलशाहा पादशाहा यांणीं [मनांत आणिलें जे,] “शिवाजीराजे बहूत आफरी जाले; प्रांत, किल्ले, कोट घेतले; बेदरपर्यंत स्वारी करूं लागले; फौज, लोक व खजीनाही फार जाला. याचा विचार पोख्त मनसबा मसलत करून कोण्ही उमदा सरदार पाठवून त्याचें पारिपत्य केल्यावांचून ठीक नाहीं. बापाचेंही ऐकत नाहीं, कसें करावें?” ते समयीं अफजलखान याणी प्रतिज्ञा केली कीं, “शिवाजीचा मजकूर इतका कशास पाहिजे? आपणास आज्ञा करावी म्हणजे जाऊन धरून आणितों, किंवा मारून

---

१. ‘महाराष्ट्र’ शब्द की० प्रतीत नाही. २. चालण्याची मर्यादा—वर्तणुकीचे नियम, पद्धती. ३. ‘राजनीतीप्रमाणें’ की०. ४. पोवळी (स्त्री०)—देवळाभोवतालची भिंत.

टाकितों." याप्रमाणें बोलल्यावरि पादशाहांनीं नवाजीस करून, वस्त्रें बहुमान देऊन व फौज, तोफखाना, लवाजमा,[1] ऐसे देऊन खानाची रवानगी केली.

३. खान निघाला.

ते पंधरावीस हजार फौज व पायदळ दाहा हजार गारद व तोफखाना व मावळे लोक त्या प्रांतांतील माहीत असावे म्हणून तीन हजार ठेवून, मोठे अहंकारें[2] करून, निघोन दरमजल[3] येतां तुळजापुरीं श्रीदेवीस उपद्रव करावा, तों देवी भोपे यांणीं पळविली. तेथून पंढरपुरीं आले. त्याही स्थळीं उपद्रव केला. परंतू देव बडवे यांणीं लपवून राखिला. तेथून महादेवाचे रोखें देव-ब्राम्हणांस अनिवारपणें[4] उपद्रव करीत जवळ आले.

४. शिवाजीचा बंदोबस्त.

[त्यावेळीं] महाराज राजगडीं होते. मोंगली फौज, झुंझ बाहेर घेणें. चांगलें नाहीं, म्हणून सर्व कारभारी वगैरे मेळवून विचार ठरविला. आणि राजगडनें निघोन प्रतापगडास आले. तमाम किल्ले कोटांचा बंदोबस्त केला. पागा वगैरे जमा केल्या. प्रतापगडास गेले.

५. खान वाईस येतो.

हें वर्तमान खानास कळतांच पुण्याकडील रोंख[5] टाकून, इकडेच जावें म्हणून दरमजल येऊन वाईस राहिले आणि विचार केला जे, "शिवाजीराजे झाडींत शिरले. त्यांस हुनरें करून बाहेर काढावें अथवा इतबार पडेल तसा पाडून समक्षता जाली म्हणजे जसें कळेल तसे रितीनें पादशाही चाकरी करून दाखवावी." ऐसा कापट्यविचार करून वकिलीस कृष्णाजी भास्कर यांसि सविस्तर मनांतील बेत मनसबा कळवून सांगून पाठविलें.

६. शिवाजीस देवीचा दृष्टांत.

इकडे महाराजांनी अफजल वाईस येऊन भिडले म्हणून सर्व मुतसदी[6] व

---

१. लवाजमा (पु०) (अ० लवाझिमात्.)–परिवार. २. अहंकार (पु०)–ईर्ष्या. ३. दरमजल (स्त्री०) [फा० दर+अ० मन्झिल्]–प्रत्येक टप्पा. ४. अनिवार (वि०) [सं० अनिवार्य]–अमर्याद. ५. रोंख (पु०) [फा० रुख्]–दिशा; बाजू. ६. 'मुत्सदी' की०.

सरदार जमा करून "याशीं कोणतेप्रकारें लढाई द्यावी, विचार कसा करावा, कावेंसीत[1] कसें आणावें[1]; मोंगली फौज, प्रथमच समरांगणीं गांठ घालून लढाई दिली तरि माणूस फार खराब होईल. यास्तव आपले लोक कायम राहून त्याचा नाश होय ऐसा हुनर जाला पाहिजे. आम्हीं[2] राज्य सोडविलें, शहरें मारलीं, स्वारीशिकारी करितों तें निराळें.[2] हे पठाण जात हट्टी, उभे राहून, आडून[3] माणूस खराब करितील. यास्तव हुनरच[4] करून जेर करावा," हा विचार चांगला. म्हणून श्रीदेवीची प्रार्थना केली. ते समयीं देवी महाराजांचे आंगीं आविर्भाव[5] होऊन सांगितलें जे, "अरे मुला, तूं चिंता कां करितोस ? तुजला वर माझा आहे. हें अरिष्ट दूर करीन. तुजला हे शिकारच साधून देतों. चिंता न करणें." [असें] आश्वासन दिल्हें. याप्रमाणें महाराजांचे आंगीं श्री [नें] आविर्भाव करण्यास प्रारंभ केला म्हणजे बाळाजी आवजी चिटणीस व वाकेनीस यांस सांगितलें [होतें] जे, "जे समयीं आंगांत संचार होऊन [देवी] सांगेल तें एकांतीं तुम्हीं उभयतांनीं मात्र असोन लेहून ठेवून नंतर दाखवीत जावें. तिसरेयास कळों नये." याप्रमाणें नेम करून दिल्हा [होता.] त्याप्रमाणें महाराज सावध होऊन, देवीचें सांगणें ऐकून घेऊन, फारच हर्ष पाऊन बोलते जाले जे, 'अफजलाचें काम आपण करितों. चिंता नाहीं. श्रीनींही आश्वासन दिल्हें; तेव्हा फत्ते होती. आमचे मनाचा उल्हास व शुभचिन्हें यश येण्याविषयीं दिसतात. व तुम्ही सर्व कारभारी व शूर [सरदार] यांचा उत्साह दिसतो." असें प्रकारें बोलल्यावरि सर्वांची सला हेच पडली जे, "महाराजांचे मनांत करणें येतें तें आम्हांसही[6] अवघड वाटत नाहीं. अफजलाचा मजकूर[7] काय आहे ? महाराज समरांगणीं युद्ध करा म्हणतील तरीं करूं. कावेसींत आणून, घेरून, तोडणी लावून जेर करा म्हणतील तरी करूं. महाराजांनीं स्वस्थ किल्ल्यावरि असावें." या प्रकारें उमेदीनें व एकविचारें बोलते जाले.

७. खानाची वकिली.

तों खानाकडील वकील येऊन पोहोंचले. तें कळलियावरि परवानगी देऊन

---

१. कावेसीत आणणे (फा० कावेश)—युक्तीने पकडणे. हे वाक्य की० नाही. २. सदर. ३. अडणे (अ. क्रि.)—वेढणे, अडविणे. ४. हुनर (पु०) [फा० हुनर्]—युक्ती. ५. आविर्भाव—आविर्भूत (वि०) (सं०) हवे. अवतरलेली. ६. यापुढे 'असें घडावें' को० अधिक. ७. मजकूर (पु०) [अ० मझ्कूर्]—पाड.

किलियावरि भेटीस नेले. भेट जालियावरि आगत स्वागत विचारून राहाण्यास स्थल पार[१] येथें खालीं दिल्हें [आणि] सावकाशपणें सविस्तर बोलणें होईल म्हणून राहाण्याचे जाग्यास पाठविलें. आणि त्यांची मुदारत[२] फार चांगली आदरपूर्वक करविली. चौकी, माणसें ठेवून बंदोबस्त केला. दुसरे दिवशीं बोलावून घेतलें. महाराजांनीं सर्व मातबर सरदार सरकारकून जमा करून दरबार करून बसले. वकिलाशीं बोलण्यासि प्रारंभ केला कीं, "खान कां आले? काय मनसबा चित्तांत आहे? मार्गीं येतां देवब्राह्मणांस व प्रांतास उपद्रव फार केला?"

तेव्हां याणीं उत्तर केलें कीं, "खानांचें सांगणें आहे कीं, तुमचे वडील व आम्ही एक पादशाही [चे] चाकर. तुमचे वडिलांचा आमचा स्नेह, भाईचारा[३]; दुसरा विचार नाहीं. तुम्ही त्या पादशाहींतील उमराव असोन किल्ले कोट घेतले, शहरें मारितां, पादशहास रुजू[४] होत नाहीं, हे पुंड-पाळेगारी करितां. वरकड पादशहाचे मनांत शाहाजीराजे यांचा बेटा बहूत मर्द, काबील जाला आहे. आम्हांस संतोष जाला आहे. याणीं[५] असें न करितां [चालावें.] प्रांत सोडविला आपले पादशाहींतील, तो त्यांचाच आहे. दुसरे पादशाहींतील [प्रांत] सोडविले हे मोठी गोष्ट केली.[६] ऐशीं माणसें आमचे पदरीं पूर्वीपासून [आहेतच.] शाहाजी राजे यांस [आम्हीं] वाढविलें व [त्यांचें] चालविलें. त्यांचे बेटे हे. यांणीं घेतला प्रांत यांजकडेच कायम राखावा. व आणखी मोठीं कामें त्यांचे हातीं[७] घ्यावीं. त्यांनीं येऊन भेटावें. आज्ञेंत चालावें. बापाचा कह्या[८] मानीत नाहींत, पादशाहींतही हुकुमांत नाहींत, ऐसें नसावें. त्यांजवर कृपा करून याहून विशेष, सर्व वजिरी त्यांचेच स्वाधीन करून चालावें, ऐसें आहे. हें जाणोन खानास तुम्हांकडे पाठविलें. तुम्ही बेकैदी करितां, हें नसावें. हें वाकडें पादशाहास वाटून खानांस तुम्हांस सर्व गोष्टी सांगून घेऊन यावें म्हणोन पाठविले आहेत." खानांचें म्हणणें कीं, "जाली गोष्ट बरी जाली; याजउपरि तुम्ही पादशाहाचे आज्ञेंत सरळ चालले असतां आम्ही सर्व गुन्हे[९] माफ[१०] करऊन हे मनसब सरंजाम

१. पार—हे प्रतापगडच्या पायथ्याशी. २. मुदारत स्त्री० [अ० मुदारात्]—संभावना, बर्दास्त. ३. भाईचारा (पु०) [सं० भ्रातृ + आचार]—भाऊपणा. ४. रुजू (स्त्री०) [अ० रुजूअ]—पसंत. ५–६. याबद्दल "यास्तव आमचेकडील प्रांत घेतला तो त्यानें सोडावा, दुसऱ्याचा घेतला तो त्याकडेच राखावा." की०. ७. हातीं—हातून. पंचम्यर्थी तृतीया. ८. कह्या (पु० हिं.) [सं० कथ्]—आज्ञा. ९. गुन्हा (पु०) [फा० गुनाह]—अपराध. १०. माफ (वि०) [अ० मुआफ्]—क्षमा.

व आणखी विशेष करून देण्याचा जिमा आमचा आहे. येविषयीं पाहिजे तशी खातरजमा[१] करून घ्यावी आणि भेटीस यावें. तुमचे वडील पादशाही मनसबदार. तुम्हीं गुन्हेही केले असतां त्याजवर कृपा करून जागीर चालवितात. त्याहून अधीक तुमचें चालवूं."

८. शिवाजीचें उत्तर.

या अन्वयें बोलणें पडल्यावरि महाराजांनीं ऐकून घेऊन [उत्तर केलें.] "बहूत चांगलें आहे; खान म्हणतात हे आमचे बऱ्याचीच गोष्ट म्हणतात; आम्हांसही हेंच कर्तव्य आहे. आम्हीं केलें तें कितेक पुंड पाळेगार मोडले व सरकारी मुलूक [याची] आबादानी, बंदोबस्त केला. दुसरे पादशाहींतीलही मुलूक घेतला व किल्ले वगैरे बांधिले. लोक फौज नामी[२] म्हणून माणूस जमा केले. हे सर्व पादशाहाचीच दौलत वाढविली आहे." म्हणून निरोप दिला. वकील बिराडास गेले.

९. वकिलाचा गौप्यस्फोट.

दुसरें दिवशीं [वकिलास] आणखी एकांतीं नेऊन, "तुम्हीं ब्राह्मण आणि भले आहां. आम्हीं राज्य महाराष्ट्र करून, धर्म बुडाला, देवब्राह्मणांस पीडा, सर्व म्लेंछमय जालें. गाईंस अपरिमित पीडा होतात, हें सर्व दूर करणेयास तुम्हीं अनुकूल असल्यास खानाचें अंतःकरण व मनसबा काय आहे तो अकृत्रिमपणें[३] सांगावा. तुम्हांशीं आमचा दुसरा विचार नाहीं." ऐसें [राजे] बहूत गौरव करून युक्तीनें बोलले. यानंतर वकील ब्राह्मण "राजा धर्मरक्षक होणार, याचें दैव व पराक्रम व माणसें विचित्र दिसतात. व पुण्य व तेजही विचित्र दिसतें. यास्तव हें वृद्धीसच पावावें[४]," म्हणून मनांत येऊन, "खानाचा विचार भेटी जशी घडेल तशी निखालसता करून देऊन घ्यावी, आणि त्यांतच दगाबाजी करावी. हेच चित्तांतील खबिरी दिसोन येते," म्हणून सांगितलें.

---

१. खातरजमा (स्त्री०) [फा०खातिर्जमूअ]–संशयनिराकरण. २. नामी (वि०) [फा० नाम्]–उत्कृष्ट. ३. अकृत्रिमपणा (पु०)–मोकळेपणा. ४. पावावें–पाववावे या अर्थी.

१०. वकिलास निरोप.

याजवरि महाराजही अवतारी पुरुष, तें बोलणें ऐकून "हा त्यांचा मनसबा, तरि 'धर्मोवर्धति'[१] प्रमाण आहे, तरि यांतच आमचा मनसबा देव सिद्धीस नेईल. आम्हीही भेटींतच त्यांचा विचार आहे तसें श्रीचे कृपें कार्य करूं. याउपरि आम्हांकडील बोलणें पूर्वीं सांगितलें त्या अन्वयें [करून] आम्हांसही पादशाहाची सफाई[२] करणें जरूर येविशीं किलाफ[३] वाढले ते दूर होण्याची खंबिरी खानांनीं आमची खातरजमा करून द्यावी.[४] [ती] खान यांणीं भेटून समक्ष बोलणें जाल्यावांचून होणार नाहीं. हे निरोप सांगून, हरतऱ्हा करून, किल्ल्यानजीक भेटी व्हावी असें करून घेऊन यावें." याप्रमाणें महाराज बोलले, त्याजवरून कृष्णाजीपंत [यांनीं] महाराजांचा प्रभाव पाहिला जे, "असें दुर्घट कर्म करून कार्यसिद्धी करतील, स्वतां बुद्धीकरून व शौर्य करून [मोठे.] माणसेंही यांचे पदरीं मोठीं मोठीं मनसबाबाज[५] व शूर एकदील दिसतात." ऐसें मनांत आणून बोलले, "फार चांगलें, आम्ही खानास हरतऱ्हा करून भेटीस घेऊन येतों. आपण याचा विचार पोख्त करणें तसा करावा." याजप्रमाणें परस्परें बोलणें होऊन वकिलास बहुमान वस्त्रें देऊन, त्याजबराबर आपणाकडील पंताजीपंत बोकिल हिवरेकर[६] यांस देऊन लवाजिमासुद्धां [महाराजांनीं] रवाना केलें.

११. भेटीचा करार.

[नंतर] उभयतां खानापाशीं येऊन महाराजांचें बोलणें सर्व सांगितल्यावरि खानाचा मृत्यू [समीप आला] त्या योगेंकरून महाराजांचें मनोगत तसेंच मान्य जालें. "भेटी शिवाजी राजे घेतात हें सिद्ध करून आलां हे मोठी गोष्ट केली. काम जालें." म्हणून वकिलाची फार तारीफ[७] करून खान खूष जाले. आणि खानानीं विचारिलें जे, "राजे पाहाडाखालीं येतात न येतात ? पाहाडांत फौज जाणें व लोक जाणें [हें अवघड,] त्या अर्थी खालीं यावें." तेसमयीं इकडील वकील [यांनीं व] कृष्णाजीपंतीं सांगितलें, "मार्ग मोठा व लाखों फौज राहावी

---

१. धर्मोवर्धते असे हवे. 'धर्मवृद्धि होणें' की०. २. सफाई (स्त्री० फा०)–अन्तःशुद्धी. ३. किलाफ (पु०) [अ० खिलाफ्]–संशय. ४. 'घ्यावी' की०. ५. 'मनसबवान' की०. ६. हिवरे–पुरंदरच्या परिसरात चांबळी नदीवर. ७. तारीफ (स्त्री०) [अ० तअरीफ्]–प्रशंसा.

ऐसी जागा व पाणी पाहिजे तसें, पाहाडांत [आहे.] नदीच[1] चालली आहे. याप्रमाणें राजे आहेत तेथें आपण एक वेळ भेट होऊन निखालसता जालियावरि पाहिजे तेथें येतील" याजवरून जावलीस जावें असें करारांत[2] आलें. फौजसुद्धां जावलीस भेटीस येतात हीं पत्रें वकिलानीं लिहिलीं. आपण भेटीची तरतूद[3] करावी असें सांगून पाठविलें.

१२. जिजाबाईचा आशीर्वाद.

याजवरि महाराजांनीं सर्व कारभारी व सरदार आदिकरून जमा करून विचार करून बोलले जे "मोंगल खालीं येतो तेव्हां भेटी घेणें वगैरे कसें करावें?" म्हणून गौरऊन सर्वांस विचार पुसिला, व मातुश्री जिजाबाई साहेब यांस विनंती केली. याजवरून त्यांणीं उत्तर केलें जे, "तूं जें मनीं धरितोस तें देव सिद्धीस नेतो[4]. कुलदीपक आमचे पोटीं निर्माण जाला आहेस. करसील, मनीं धरिसील, तें देव शेवटास नेईल. यास्तव तुमचा हर्ष तेंच बहुत विचारें करून सावधतेनें चार माणसें तुम्हांजवळ कर्ती, शाहाणीं आहेत त्यांचे विचारें [करणें तें] करावें. देवाचे व आमचे आशीर्वादें विजयी होशील" अशीं बोलली[5]. वरकड सर्व यांणीं ही सांगितलें जे, "महाराज आज्ञा करितील ते प्राणापरती[6] कस्त[7] करूं आणि शेवटास लाऊं, हेंच सर्वांचें लक्ष."

१३. महाराजांची तयारी.

याप्रमाणें सर्वांचा विचार घेऊन, मातबर कारभारी व आपण बसोन विचार केला कीं, "खान येणार त्यास झाडी तोडून फौज राहाण्यास मैदान करावें. घाटाची वाट उतरणें चढणें यास हत्ती व घोडे येणें यास रस्ता चांगला एकच करावा. त्यांत वरकड वाटा लाहानसान झाडून मोडाव्या. झाडें तोडून व खणून बंद कराव्या. जागां जागां गुप्त प्रकट चौक्या धारकरी नामी लोक सावध [यांच्या,] त्यांत कारकून योजोन झाडींतील वगैरे नाक्यास ठेवावे. किल्ल्याखालीं

---

१. कोयना नदी. ही प्रतापगड व महाबळेश्वराचा डोंगर यांमधून वाहते. २. करार पु० [अ० करार्]–ठराव. ३. तरतूद (स्त्री०) [अ० तरद्दुद्]–व्यवस्था. ४. 'नेईल' की०. ५. बोललीं–आदरार्थी नपुसकलिंगी अनेकवचन. ६. परती–(परौंता, परता) क्रि० वि०–पलीकडे. ७. कस्त (पु० स्त्री०) [अ० कस्द्]–मेहनत; पराकाष्ठा.

बुरजानजीक[1] जागा मैदान होती तेथें भेटीस सदर[2] म्हणून मांडव घालून सखलाद[3] मखमल[4] किनखापी[5] मढून, फार आराष[6] करून एकापुढे एक थोर लाहान बैठका खलबतास वगैरे जागे करावे. सामानही बहूत मेजवानीचें व वाटेचें व मुकामाचें करावें" असें सांगून तमाम[7] तरतूद करविली.

१४. उभयतांचे अंतस्थ हेतू.

हें वर्तमान खानास कळलियावरि शिवाजी राजे बहूत साफदील आणि आपले भेटीचा बहूत आदर धरितात असें मानून कापट्यबुद्धीनें "बरें आहे, भेट मात्र व्हावी, मनांत बेत तसें करून पादशाही चाकरी करीन." हें याचें मानस. महाराजांचे मनांत "यास फार स्वच्छता दाखवून खाली आणावें आणि भेटींतच कार्यसाधन करावें." याप्रमाणें परस्परें अंतःकरणांत धरून बाह्यतः बहूतच सफाई दाखविते जाले.

१५. खान येऊन उतरतो.

तदनंतर वकिलांस पत्रें पाठविलीं. "येण्याचा बेत करावा. वाटा वगैरे तयार जालें आहे." त्याजवरून थोरला तोफखाना व बुनगे[8] वाईनजीक घाटाखालींच[9] ठेवून, सडी फौज निवड करून, घाट चढून रडतोंडीचा रस्ता नीट केला होता त्या मार्गें उतरोन पारानजीक कोइनेचे कांठीं खानानीं मुकाम केला. महाराजांनीं मुकामाची जागा नेमिली होती तेथें मंडप व सामान-साहित्य सर्व फौजेचे बेजमीचें असें करून ठेविलें होतें. खान येऊन उतरल्यावर बहूत समाधान पावले. परस्परें आदर बहूत, परंतू मनांतील बेत आणीक प्रकारचे! खान खालीं येऊन मुकाम जालियावरि महाराजांनीं "वडील[10] भाऊ संभाजी राजे यांचा घात याणींच केला, तो सूड घेईन" म्हणून बोलले. खान मुकामाचे

---

१. बुरूज (पु०) [अ० बुर्ज्] कोटाचा बंदिस्त भाग. २. सदर (स्त्री०) [अ० सद्र]–बैठक. ३. सखलाद–त (स्त्री०) [अ० सकलात्] –शेन्दरी किंवा निळे कापड. ४. मखमल (स्त्री०) [फा० मख्मल्]–उंची कापड. ५. किनखाप (पु०) [फा० किम्खाब]–बहुरंगी जर्तारी कापड. ६. आराष (स्त्री०) [फा० आराइश्]–सजावट. ७. तमाम [अ० तमाम्]–संपूर्ण. ८. बुनगे (न०) [फा० बुन्गाह्]–गैर लढाऊ लोक. ९. पसरणीचा घाट. हा घाट चढल्यावर जावळीस जाताना रडतोंडीचा घाट लागतो. १०. कनकगिरी येथे संभाजीचा घात. (प्रकरण १ परि० २०).

जागांच भेटीस राजे यांणीं यावें बोलले. यावरि वकिलांनीं सांगितलें जे, "भेटीची जागा व बैठक बहूत तरतुदीची केली आहे. तेथें आपणही येऊन त्यांणीं तिकडून यावें, हें राजे यांचें मानस. साहेबांची भेटी मात्र व्हावी, नंतर येणीं जाणीं सर्व घडेल. त्यांचें मानस तशीच भेटी घ्यावी." बोलल्यावरि 'उत्तम आहे,' बोलले. सारी फौज ठेऊन सडे भेटीस जावें. तेही सडेच येणार. अैसा सिद्धांत केला आणि वकिलांनीं महाराजास कळविलें.

१६. शिवाजीची ताकीद.

ते समयीं वडील पुत्र संभाजी राजे यांस व मातुश्री जिजाबाईसाहेब यांसि किल्ल्यावरि ठेविलीं. जागां जागां नाकेबंदी व वाटा [यांत] जेथें जसा जमाव पाहिजे तसा टोळ्या करून भोंवतें दुरून कोसाचे अंतरानें ठेविले. त्यांस इशारत[1] करणें ते सरदारांस सांगितलें कीं, "आम्ही किल्ल्यावरून उतरतां करणा[2] वाजला म्हणजे आपलाले जमावांनीं पुढें चालत यावें आणि बाणाचे टपयात[3] उभें राहावें. त्याप्रमाणें त्यांणीं सावध असावें." अैशी ताकीद केली. आपण खासा किल्ल्यावरील सर्व बंदोबस्त करून, दरवाज्यांत लोक जमाव मोठे मोठे सरदार असावे, त्यांणीं आम्ही कचेरीस पावल्यावरि पुढें चालून यावें. बराबर निघण्यास हजार दोन हजार धारकरी [असावे] त्यांणीं जागचे जागां उभें राहात, पुढें नेमिले तितक्यांनीं यावें." याप्रमाणें सांगून, किल्ल्याचे गिर्दनवाईस[4] लोक, तोफा, सामान दारुगोळा वगैरे ठेवून, आपण खासा जाऊन, सर्व फिरोन पाहून [बंदोबस्त] करविला. यांप्रमाणें बेत सांगितला तसा जाला न जाला हे चौकशी केली. रघुनाथ बल्लाळ सबनीस यांस जागे, नाके, यांचे चौकशीस ठेविलें नेतोजी पालकर सरनोबत यासि फौज सारी संकेताप्रमाणें सिद्ध करून खान खालीं बुडवितांच फौजेनें तोफखाना, बुनगे दस्त[5] करावे. घाटावरून उपराळा[6] येऊं न द्यावा. मार्ग नीट केला यांतून झाडें मोठीं तोडून टाकून मार्ग एकच आहे तोही बंद करावा. चढून जाऊं लागतील ते जाऊं देऊं नये. याप्रमाणें करविलें.

---

१. इशारत (स्त्री०) [अ० इशारत्] –खूण; सूचना. २. करणा (पु०) [फा० कर्ना; कर्नाय्]. शिंगासारखे वाद्य. ३. 'टप्यांत' की० ४. गिर्दनवाई (ही) (स्त्री०) [फा० गिर्द्–नवाही]–कोटाच्या तटाचे संरक्षण. ५. 'फस्त' (की०). ६. उपराळा (पु०) [सं० उपरि+आलुच्]–मदत.

१७. "अफजलखान विषय तो किती आहे?"

[नंतर] मोरोपंत पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस, बाळाजी आवजी चिटणीस व रावजी सोमनाथ, गंगाजी मंगाजी व रघुनाथ बल्लाळ कोरडे, शिव उपाध्ये, कृष्णाजी नाईक, सुभानजी नाईक व गोमाजी नाईक पानसंबळ हवालदार व त्रिंबक भास्कर वगैरे कारभारी व मावळे[1] सरदार व मराठे[1] सरदार एक करून विचार केला. ते समयीं सर्वांचे मनोदय "महाराजांचे चित्तांत येईल तें करितील व होईल. जे आज्ञा ते प्राणापरती आंगेजणी[2] करावी," हेच सर्वांनीं सला व एकनिष्ठता [दाखविली.] "महाराज धर्म-स्थापना करणार व बुद्धी व जयही[3] दिवसेंदिवस अधीकच होवो हे सर्वांची इच्छा. अफजलखान विषय तो किती आहे!" ऐसा सर्वांस हर्ष वाटून महाराजांचे करण्यासच सर्वांचें अनुमोदन, व त्या अन्वयें तरतूद व मजबुदी करिते जाले. आणि ते समयीं किल्ल्यावरि कारभारी जिजाबाईसाहेब व संभाजीराजे यांजपाशीं पेशवे व सुरनीस चिटणीस यांणीं असावें म्हणोन ठेविलें, आणि मातुश्रींस व राजे यांस [त्यांचे] हवालीं केलें. "आम्हीं ही होड आरंभिली. श्री सिद्धीस नेईलच. कदाचित वाकडेंही पडल्या तुम्हीं घाबरे न होतां बेत केला याप्रमाणें खान व फौज गर्दी करून बुडवावे, राज्य रक्षावें," असें सांगितलें. सर्वांचेंही चित्त अफझलखान खालीं आला यास कधीं बुडवूं! हेच उत्कंठा पाहून महाराजांस अधीकच हर्ष उत्पन्न होऊन लोकांस नवांजून, दिलासा देऊन "तुम्ही सर्व शूर, पराक्रमीच आहां. आमची मदार[4] तुम्हांवरच आहे. या यवनाचा पाड तो काय? मोठा मस्त हत्ती, त्याचे मस्तकींचा मणी प्रयत्नेंकरून काढून, त्याजवर आरोहण करून [बसणें] मनुष्याचे अनुकूलतेनें होतें. मग तुम्ही सर्व अनुकूल असतां याचा हिसाब तो काय!" ऐसें सर्वांस स्फुरण व्हावयाजोगें गौरऊन बोलोन[5] आदर करून, "ये समयीं सर्वांनीं आपली शर्त व सावधता सांगितली तशी करावी. राज्यवृद्धीस पावेल तसतसें आहे तें सर्व तुमचें आहे," म्हणोन नवांजून जेथील तेथें एक एक सरदार नेमून देऊन, आपण आंगांत जिरे[6]

---

१. मावळ्यांचे पायदळ व मराठ्यांचे घोडदळ. २. आंगेजणी (स्त्री०) [फा० अंगेझ्-अंगेख्तन्]-उठावणी; पराक्रम. ३. 'वय' की० ४. मदार (स्त्री० पु०) [अ० मदार्]-भार. ५. 'बोलाऊन' सा० को०. वरील पाठ सा० २. ६. जिरे-(न०) [फा० झिरिह्]-साखळीचे चिलखत. 'जरीची कुडती' (सभासदाची बखर).

[चढवून] त्याजवरि झगा घातला. तसेंच डोईस जिरे-टोप[१] घालून वरतें पागोटें घातलें. चोळणा[२] काच्या[३] घालून उजवे हातीं भवानी तरवार घेऊन व विचवा डावे हातीं, वाघनखें, पाठीं ढाल. याजप्रमाणें सिद्ध झाले असतां ते समयींचें ध्यान बहूतच उग्र व अपूर्व, [असें] सर्व अवलोकन करिते जाले. फौज भोंवतीं जागां जागां ठेविलीं कीं, रानझाडी, सावजांचें भय इत्यादी निमित्यें चौक्या ठेविल्या होत्या.

१८. खानाचे आगमन.

[यानंतर] खालीं खानास सूचना भेटीची करावी म्हणोन वकिलास चिठी लिहिली. त्याजवरून खानांनीं भेटीची[४] जागा कशी आहे वगैरे चौकसी [करितां] आपले इतबारी पाठविले[४]. त्यांनीं पाहून बहूतच तरतूद, बैठका, कारंजीं वगैरे आराष, किनखापी मंडप[५] [अशा] जागा केली आहे, निखालस जवळ कांहीं एक गलबल फौज लोक [यांची] नाहीं ऐसें सांगितलें. यावरि फौज सारी ठेऊन, मातबर सरदार व उमदे शिपाई निवडून बराबर घेतले. ते समयीं वकिलांनीं अर्ज केला जे, "राजे यांस, लोक बहूत जाणें यांत इतबार राहाणार नाही. तेही सामान आणितील ऐसें नसावें. इकडील व तिकडील नेमणुकीनेंच भेटीचे जाग्यास जावें." त्याजवरून खालीं सर्व ठेवून, खानाची उमेद "नजरेस मात्र पडावे, त्यांचा हिसाब काय आहे?" ऐसें म्हणून डोंगरी चढूं लागले. मधीं मधीं बराबरचे लोक जिलीब[६] आदिकरून ठेवीत ठेवीत पुढें आले. खासा एक पालखी व पांच पन्नास लोक याप्रमाणे भेटीचे जाग्यानजीक आले.

१९. महाराजही तेथे आले.

तें महाराजांनीं पाहून किलियास व सर्वांस हुशार करून मातुश्रींस व देवास नमस्कार केला. मातुश्रींनीं 'विजयी भव' आशीर्वाद दिल्हा. तेव्हां महाराजही

---

१. जिरेटोप (पु०)–शिरस्त्राण. 'डोईस मंदील बांधिला त्यांत तोडा बांधिला.' (सभासद). २. चोळणा (पु०) [का० चलण]–तुमान. ३. काच्या (पु०) [सं० कच्]–सोगा (खोवणे). चोळणा घातल्यावर कंबर वस्त्राने बांधिली असावी. ४. याऐवजी 'भेटीची जागा कशी आहे हे पाहण्यास आपलेकडील विश्वासू येऊन खानांनी चौकशी केली.' की०. ५. 'पडदे' सा०२. ६. जिलीब (स्त्री०) [फा० जिलब्]–स्वारीपुढील लोक.

बोलले जे, "वडील भाऊ संभाजी राजे यांसि दग्यानीं मारविलें त्याचें उसनें घेतों. साहेबांचे उदरीं जन्म घेतला आहे. साहेबांचे मनोदय तेच देव सिद्धीस नेईल." याप्रमाणें बोलोन दरवाजियास आले. आणि करणा इशारतीचा वाजविला. तेथें धारकरी व लोक निवड करून उभे करीत करीत आपणही तेथें आले. त्या अन्वयें[1] पालखींत बसोन दरवाज्याखालीं येऊन उभे राहिले. जवळ खिजमतगार म्हणून तानाजी मालुसरे व येसाजी कंक हिरोजी व नागोजी फरजंद ऐसे पांच पन्नास लोक घेऊन व कृष्णाजीपंत व गोविंदपंत दिवाणजी त्यांजकडील व आपले वकील पंताजीपंत बोकील, एकदोन शिपाई कारकून ऐसे निघोन सदरे-नजीक आले. खानही पालखींतून उतरले. हेही उतरून सदरेस उभयतां गेले.

२०. खानाचा वध.

चार नजरा होतांच खानांनीं वकिलास पुसिलें "राजे हेच कीं काय?" कृष्णाजीपंतांनीं 'हेच' ऐसे बोललियावरि महाराजानींही पंताजीपंतास विचारिलें 'खान हेच कीं काय?' त्यांनीं 'हेच' म्हणून उभयतांनीं उभयतां एकमेकांस खरें[2] करून भेटीस पुढें होतांच, खान शरिरें करून मोठे उंच दराज[3] होते. महाराज केवळ द्वितीयेचे चंद्रासारखे. खानांनीं भेटण्यांतच हातीं धरून पुढें ओढून घेऊन डावे हाताखालीं दाबून धरिले, आणि हातीं तरवार कटार होती ते कटार चालविली. तेसमयीं महाराजांचे आंगांत जिरे होती, आंग चपळाईनें चोरून[4] घेतांच वार कायम न जाला. खानांनींच अगोदर दगा व पुरुषार्थ केला, फार चांगलें जालें, म्हणून हातांत वाघनखें होतीं त्या हातानीं बहूत जलदी करून पाठीमागून हात पोटावरि चालविला. झगा बारीक होता. व पोटलाही[5] मोठा [होता.] वार कारागार[6] होऊन लागलींच आंतडीं बाहेर आलीं. तेव्हां बगलेंत दाबून धरिलें होतें तें लौकर सोडून ढकलून दिल्हें. 'शिवाजीनीं दगा केला, शिपाईगिरीची शर्त केली,' ऐसें बोलोन डावे हातें पोटला सावरून फिरंगेचा[7] वार 'आब हमारी' तलवार देखो' म्हणून महाराजावरि चालविला. डोईत जिरे होत्री ती किंचित

---

१. त्या अन्वयें–त्यानंतर? २. 'खैर' की०. 'उभयतां एकमेकांस आदरें करून' सा० २. ३. दराज (वि०) [फा० दराझ्]–उंच; दीर्घ. ४. 'काढून' की०. ५. पोटला (पु०)–कोथळा. ६. कारागार (वि०) [फा० कार्गर्]–परिणामकारक. ७. फिरंग (स्त्री०)–तरवार.

तुटोन जखम गव्हाइतकी लागली. महाराजानीं सफाई करून 'तुम तो बडे और पठाण, आब हमारी भवानी शिवाजीकी देखो,' म्हणून तलवारीचा वार खांद्यावर केला. त्यानीं पोटापर्यंत वार जाला. खान पुरे होऊन मुर्दा पडला. हें पाहून महाराज निघते जाले. तों सैद बंडेखान[1] पठाण याणीं जलदी करून आंगावर आला. हें पाहून येसाजी कंक याणीं त्याजवर वार चालविला. तो तेथेंच पुरा जाला. याजवरि गोविंदपंत दिवाण सरकोन आला त्यास 'तूं ब्राह्मण. पुढें येऊं नको' बोलले असतां चालून आला. ते समयीं जवळ तानाजी मालुसरे होते त्याणीं व जिवबा माहला याणीं त्याजवर पटा चालविला. जखम लागली. महाराज 'ब्राह्मण आहे, शिपाईगिरी व खांवंदाची[2] चाकरी केली. पुरा करूं नका' ऐसे बोलले. याप्रमाणें इकडील व तिकडील यांची हातघाई होण्यांत भोई व खिजमतदार यांणीं जलदी करून खानाचा मुर्दा पालखींत घालून चालविला. हें पाहून येसाजी कंक व तानाजी मालुसरे यांणीं जलदी करून, महाराजांस बाहेर काढून देऊन भोयांच्या कुऱ्या[3] केल्या, आणि खानाचें डोचकें कापून रुमालांत घेऊन आले. शके १५८१ विकारी नाम संवत्सरे मार्गशीर्ष शु॥ सप्तमी[4]. याप्रकारें करून अफजलखान मारून महाराज विजयी जाले. ते समयीं जसा शिशुपाल सभेमध्यें सहज लीलेंकरून श्रीकृष्णजीनें मारिला त्याप्रकारें या सभेंत शोभा येती जाली.

२१. खानाच्या सहकाऱ्यांची दुर्दशा

इतकें होतें तों दिवस दोन चार घटका राहिला. सायंकाळ होत आला. त्या अवसरीं महाराज किलियाचे दरवाज्यास पावले. इशारतीप्रमाणें तोफा करविल्या. तों खानाचे गोटांत भेटीच्या तोफा जाल्या मानिते जाले. महाराजांची इशारत होतांच मावळे लोक व फौज व सरनोबत चालून गोटावरि आले. तोफखाना वगैरे बुनगे दस्त केले. गोविंदपंत दिवाण वगैरे जलदीनें गोटांत जाऊन खानाचें वर्तमान कळतांच सर्व हतवीर्य होऊन अवसान सोडून पळूं लागले. खानांनीं माहितगार म्हणून मावळे लोक खंडोजी खोपडा तीन हजार

---

१. 'बडेखान' सा० सा. २ व को०. सैदबंडा (सभासद) २. खावं (विं) द (पु.) (फा० खावन्द)–स्वामी. ३. कुऱ्या करणे (भरणे, पाडणे)–मांडीच्या शिरा तोडणे. ४. या दिवशी गुरुवार होता (जेधे शकावली). दि. १० नोव्हेंबर १६५९.

मावळेनिशीं ठेविला होता. त्याणीं अफजलखान याचा लेंक व कबिला दोन तीनशें लोकांनिशीं स्वारानिशीं आपले लोक माहितगार कांहीं देऊन काढून कोइने [चे] काठानें कराडीं पावतसे केले. वरकड हत्ती घोडे, चीजवस्त, जराबाजरा[1] सर्व दौलत एके दिवशीं महाराजांस प्राप्त जाली. ज्यांणीं हत्यार धरिलें त्यांस मारिलें. हत्यार न धरी त्यास हत्यार व घोडें घेऊन सोडलें. गोरगरीब यांचा बचाव करून लाऊन दिल्हें. तोफखाना व बुनगे तिकडे लोक ठेविले [होते] त्यांस इशारत करऊन दस्त केले. चौदा हजार घोडे व पाऊणशें हत्ती, दोन तीन हजार उंट शिवाय बैल तोफखानासुद्धां पाडाव केले. खंडोजी खोपडाही पाडाव आला. त्याचा शिरच्छेद तेच समयीं करविला. वरकड सरदार मातबर सांपडले ते वस्त्रें देऊन लाऊन दिले. गोविंदपंत, कृष्णाजीपंत पाडाव आले, त्यांस वस्त्रें दिल्हीं व कृष्णाजीपंत यांस बहुमान वस्त्रें देऊन लाऊन दिल्हें.

२२. "दिवस सोन्याचा उगवला!"

याप्रमाणें महाराजांनीं यश घेऊन मातुश्रींचे दर्शनास गेले. मातुश्रींनीं पोटाशीं धरून "संभाजीचा सूड घेतलास, माझे डोळ्याचें पारणें फेडिलें व शिपाई-गिरीची शर्त केली, आणि देवानीं खैर[2] केली, भेटी जाली, आजचा दिवस सोन्याचा उगवला!" ऐसें बोलिलीं. आणि महाराजांवरून लिंबलोण करून सतका[3] करविला. दानधर्म बहूत करून, समागमें होते, कामें केलीं, त्यांस बक्षिसें, वस्त्रें भूषणें, तैनाता वाढविणें, पालख्या, अबदागिरें,[4] सोन्याचीं कडीं व द्रव्य देऊन "तुम्ही सर्व होतां म्हणोन राजे खैर होऊन आले," ऐशी तारीफ गौरव करून मोठा आनंद करितीं जालीं.

२३. शिवाजीचा सर्वांस वेध.

झाडी तोडून वाटा बंद केल्या होत्या याजमुळें मावळे लोकांनीं जागचे जागां खानाची फौज, घोडीं धरलीं. याप्रमाणें खानास बुडवण्याचें महाराजांनीं मोठें

---

१. जराबाजरा (फा० जराबजरा)– कण न कण. २. खैर स्त्री० [अ० खैर्] –कृपा. ३. सतका–सतगा (पु०) [अ० सदका]–ओवाळणी, कुरवंडी. ४. अब्दागीर (न०) [फा० आफ्ताव–गीर]–सूर्यपान.

धाडस करून व साहस–पराक्रमें करून यश संपादिलें. म्लेंछ पादाक्रांत करण्यास अवतारी पुरूष निर्माण होऊन, श्रीचें वरप्रदान तसें, महाराजांनीं अफजलखान बुडविला. आणखी लोक यांणीं त्या समयीं श्रम व पराक्रम केले, त्यांच्या सर्वांच्या भेटी घेऊन, नवांजसी करून, जसे ज्यांचे श्रम तसेच प्रकारें त्यांचे आदर करून वस्त्रें भूषणें, खर्चास देऊन, तैनाता वाढवून करणें तसें केलें. पायचे [होते] यांस घोडीं बसावयास दिल्हीं. सरदार होते त्यांस पालख्या, आफतागिरें देऊन संतोषी केलें. जखमी यांच्या जखमा, आपले व त्यांचे[1] यांच्या बांधवून खर्चावयास दिल्हें. युद्धीं पडले त्यांचे लेंक आणवून चाकर ठेविले. ज्यांचें मूलबाळ नाहीं त्यांचे बायकोचे पोटास व लाहान मुलें त्यांस बालपरवेसी[2] करून दिल्ह्या. याप्रमाणें लोकांचे आदर करून बहुमान नवांजीस केली. अफजलाकडील सांपडले सरदार [त्यांस] वस्त्रें देऊन लाऊन दिल्हे. रणीं पडिले त्यांस माती देवविली. दातीं तृण धरिलें त्यांस चीजवस्त सुद्धां सुटका करविली. ज्यास खर्चास नाहीं त्यास देविलीं.[3] ऐसे गरीबनवाज[4]! ज्यास भूतदया, असा हा राजा परम भला, यास यश यावें, याचे कारणीं जीवित तृणप्राय [मानून] प्राणही वेंचावे, आणि याचें कार्य करावें; जेणें करून राजा संतोषी तेंच करावें, ऐसें लहानापासून थोर यत्किंचित[5] लोकांचे लक्ष महाराजांचे ठायीं [लागतें जालें.] याप्रमाणें वेध सर्वांस लाविला. किल्लेकोट घेणें, शहरें मारणें, मोठेही फौजेचा हिसाब न धरणें, ऐसे लोक आंगेजणी धरून करूं लागले. महाराजांनीं अफजल-खान जोराबर असतां पराक्रमें करून मारला. अघटित कर्में केलीं. महाराजांनीं किल्ल्याचे खालीं अफजल बुडविला त्या बुरजाचे नांव 'अफजल बुरूज' ठेविलें. अफजल याचें डोचकें त्या बुरजाखालीं पुरविलें.

२४. 'पुढें विचार कसा करावा?'

अफजल फौज सुद्धां गारद केला, खानास राजांनीं आपले आंगें[6] मारिलें, हें वर्तमान विजापुरीं गेलियावरि अली इदलशाहा पादशाहा याची आई बेगम बडी साहेबीण व पादशाहा बहूत विचारांत पडोन 'मोठा सरदार नामांकित बमे[7]-फौज

---

१. त्यांचे–शत्रूकडील. २. बालपरवेसी–बालपर्वर्शी (स्त्री०) [सं० बाल+(फा०) पर्वरिश्]–बालसंगोपनार्थ नेमणूक. ३. देवविली या अर्थी. ४. गरीबनवाज [अ० घरीब्+फा० नवाझ्]–दीनांचा पोशिन्दा. ५. यत्किंचित–सर्व. ६. आंगें–कोशल्यानें. ७. 'फौजेसुद्धां' की०.

बुडविला. पुढें विचार कसा करावा?' म्हणून तमाम अमीर बोलावून विचारांत पडले जे, "पादशाईस वाईट दिसतें. शिवाजीराजाशीं द्वेष वृद्धिंगत केला. मर्दुमी आंगेजणी करून करणें अचाट[1] करितो. लोकही तसेच मर्द. खजीना बहुत केला. किल्ले-कोट-प्रांतांनींही बळकट जाले. खान बुडविल्यावरून सर्वांसही दहशत ऐसें जालें. यास उपाय काय करावा? याउपरि कांहीं ठीक दिसत नाहीं. सुमान-अल्ला[2] कसें शेवटास नेईल? तह करून आपलेसे करावे तरि याउपरि हातीं लागणार नाहीं." ऐसे फारच गिरफदारींत[3] पडिले. शहरभर पादशाहात शिवाजीराजा बुडवितो हेच जन चर्चा करूं लागले. यानंतरि खान बुडविलियावरि विजापुरी किल्ले कोट राहिले ते दहशतीनेंच येऊं लागले. महाराजही त्या प्रांतीं फौज पाठऊं लागले.

२५. प्रतापगडास भवानीची स्थापना.

महाराजांची श्रीतुळजापूरचे देवीचे ठाईं अत्यंत भक्ती. तुळजापुरीं दर्शनास जावें हे इच्छा जाहाली. यावरि श्रीनीं दृष्टांत दिल्हा कीं, "आपणांस येथेंच मूर्ती करून स्थापना कर, म्हणजे तुझे नवस मानसिक येथेंच पुरवीन." याजवरून महाराजांनीं गंडकीची[4] शिळा आणवून कारेगार[5] तुळजापुरीं पाठवून तेथील ध्यानाप्रमाणें मूर्ती अत्यंत सुंदर करविली. आणि प्रतापगडावरि श्रीदेवीची स्थापना करावी, जागा फार चांगली, बालेकिल्ल्याखालीं[6] कोटांत देवालय करून सुमुहूर्तें अर्चा बहूत द्रव्य खर्चून, ब्राह्मणभोजन करून स्थापिली. देवीस पूजा, नैवेद्य, पारपत्यगार[7], हुद्देदार, व कारभारी, पुराणिक ऐसे नेमून देऊन त्यांस तनखा[8] गांव लाऊन दिल्हे. उत्साह नवरात्राचा [त्यास] नेमणूक, वस्त्रें जवाहीर वगैरे देऊन नेहमीं चालावें ऐसें करून दिल्हें. त्याजप्रमाणें चालतें जाले. व श्रीदेवी तुळजापुरीं जाऊन नवस द्यावे [ते] येथेंच कृपा करून पावती[9] जाली.

---

१. अचाट (वि०) [सं० अत्यर्थ] विलक्षण; अतर्क्य. २. सुभानअल्ला (पु०) [अ० सुभान-पवित्र+अ० अल्लाहु]-पवित्र ईश्वर ३. गिरफदारी (स्त्री०) [फा० गिरिफ्तारी]-विवंचना. ४. गंडकीची शिळा-गंडकी (नेपाळ) नदीतील शिळा. ५. कारेगार (पु०) (फा० कारीगर्)-शिल्पशास्त्रज्ञ. 'कारीगर' की०. ६. बालेकिल्ला (पु०) (फा० बाला-उंच+अ० कल्आ)-पहाडी किल्ल्याचा उंच पोटकिल्ला. ७. पारपत्यगार (पु०) [सं० परिपति-रक्षक+फा० गार]--प्रशासक. ८. तनखा (पु०) [फा० तन्खाह्]-वेतन. ९. 'पाववित' की०.

२६. फाजलखानाची रवानगी.

अफजलखान मारल्यावरि त्याचे लेंक फाजलखान विजापुरीं गेला होता. त्याणीं "राजे यांजवरि आपणास रवाना करावें, बापाचें उसनें घ्यावें" म्हणून बहूतच आग्रह करून, हुकूम घेऊन, फौज, तोफखाना तयारी करून मोहीम करावी ऐसें केलें. ते समयीं पादशाहानीं सरज्याखान व सिदी जोहर सरदार फौजेनिशीं बराबर दिल्हे. आणि वस्त्रें देऊन रवानगी केली. ते समयीं महाराजांची स्वारी पन्हाळप्रांतीं आली होती. तेव्हां मोंगल चालून पन्हाळ्यास आला, त्यास येतो तसा येऊं द्यावा [असा महाराजांनीं] विचार केला. यावरून येऊन किल्लयास वेढा घालून बसला. महाराजांनीं आपली फौज मागें घालून मोर्चे मारणें, रसद[1] बंद करणें, कही[2] मारणें हें करविलें. चार साहा महिने [वेढा] बसला. पावनगडचे डोंगरास धमधमे[3] रचून तोफेची मारगिरी करीत असतां, हिसाब न धरून लढले. तेव्हां विचार केला जे, "आजपर्यंत द्रव्यानीं व माणसांनीं खानास खराब केला. याउपरि आपण बाहेर जाऊन वोढा[4] लावावा." हे मसलत करून किलियाच्या लोकांची व सामानाची वगैरे भरती करून, आपण खासा निघोन किलियावरून रांगणा किल्ला येथें चालले. हे बातमी फाजलखान यास समजलि-यावरि मोरचे उठऊन महाराजांचे पाठीमागें लागावें म्हणून चालला. ते समयीं दोन चार कोशांवरि रांगण्यानजीक पावले. तों मागें मोंगल जवळ आला ही बातमी आली. यावरून मावळे लोक ठेविले. त्यांत सरदार बाजी प्रभू, देशपांडे हिरडस मावळ, यास पांच हजार हषमांनिशीं ठेविलें. त्यानीं सांगितलें "साहेबीं निघोन जावें, गनीम थोपोन खिंड चढून देत नाहीं." याप्रमाणें बोलिल्यावरि "उत्तम [आहे.] आम्ही किलियावरि पावलों म्हणजे तोफेची इशारत करूं, नंतर तुम्ही निघोन येणें." ऐसें सांगून ठेविलें. तों फौजही येऊन पावली.

२७. बाजी प्रभूचा पराक्रम.

बाजी देशपांडे याणीं मोंगली फौज खिंडीनजीक आली पाहून जागां जागां

---

१. रसद-रस्त (स्त्री०) [फा० रसद्] – युद्धसामुग्री २. कही (स्त्री० फा०) – दाणावैरण आणणारी लष्करी तुकडी. ३. धमधमा (पु०) [फा० दम्दमा] – तोफा ज्या उंचवट्यावर चढवितात तो. ४. वो(ओ)ढा (पु०) [सं० अवकर्ष] – ताण, दाब. 'वेढा' की०.

मोर्चे बांधून व झाडींत लोक उभे करून गोळ्या व जेजालांचे[1] दुरटे[2] चालविले. फौज तुंबऊन[3] राखिली. चढूं दिली नाहीं. तों महाराज किलियावरि पावले. तोफा जाल्या. नंतर देशपांडे यांणीं महाराज पावले "या उपरि डोंगर धरून निघावें, पळावें हें काय ? येथेंच लढाई घेऊन मोंगली फौज नामोहरम[4] होय तें करावें, चाकरी करून दाखवावी." म्हणोन जमाव धरून उभे राहिले. त्या अवसरीं त्यांणीं कर्नाटकी प्यादे[5] पुढें करून तोफांचा मार देत फाजलखान याणीं पुढें चालून घेतलें, आणि लगट केला असतां दोनप्रहरपर्यंत देशपांडे यांणीं लढाई मारली आणि हजार दोन हजार लोक निवड करून बाजी प्रभू यांणीं फौजेवर चालून घेतलें. तिसरा प्रहर जाहाला. पठाण व लोक बहूत मारिले. मर्दुमीची शर्त केली. पांच हजार माणूस खानाचे रणास आणिले.[6] तों बाजी देशपांडे यांस गोळा लागून उडाले; ठार जाले. मावळे लोक यांस सरदार पडिला, धीर न निघे, जाणून संभाळून डोंगर धरून निघाले ते किल्ल्यास पोहोंचले. मोंगल खिंड[7] चढून किल्ल्यानजीक पावला. मावळची हवा, अरण्य, डोंगरांत अडचणीची जागा. छावणी[8] करावी, किल्ल्यास मोर्चे लावावे, तरि शिवाजी राजे हरहुनरें पूर्वीप्रमाणें फौज या अडचणींत गवसून[9] बुडवितील, हें जाणून धीर न होतां, पावसाळा दिवस जवळ आले म्हणून, नामोहरम होऊन, तसेच कूच करून [फाजलखान] पन्हाळ्यास आले. तेथेंही बसण्याचा दम न पुरे. शिवाजीराजा दगा करील. मैदानांत निघत नाहीं. तेव्हां हुनरबाजी दिसती. भरंवसा न पुरे. म्हणून विचार करून बाजत[10] बरसात यावें म्हणून विजापुरास निघोन गेले.

बाजी देशपांडे स्वामिकार्यावरि शिपाईगिरीची शर्त करून रणीं पडले. त्याचे लेंक बाबाजी[11] बाजी यांस आणून, नवांजून त्यांची सरदारी त्यांचे हवालीं केली. त्यांचे भाऊ सात होते त्यांस आणून सातजणांस पालख्या व तैनाता करून ठेविलें. मावळे लोक यांची सबनिशी सांगितली. बक्षीस दिल्हें.

---

१. जेजाला (स्त्री०) [फा० जेजाल्] – लांब नळीची फिरविता येणारी बंदूक. २. दुरटा (पु०) – तोफांचा भडिमार. ३. 'दाबून' की०. ४. नामोहरम वि [फा० ना + महरूम्] – पराभूत. ५. प्यादा (पु०) [फा० पियादा] – पायदळाचा शिपाई. ६. रणास आणणे–मारणे. ७. ही घोडखिंड होय. ८. छावणी (स्त्री) [सं. छादनी] –सैन्याचा तळ. मूळ अर्थ छप्पर. ९. गवसणे (अ० क्रि०) [सं. गवेषण]–कचाटीत सापडणे. १०. बाजत-बादज [फा. बादझ्.]—नंतर. ११. 'बाळाजी बाजी' की०.

२८. जंजिरेकरांची धास्ती.

महाराज या मसलतीस गुंतले जाणून खैरतखान व याकूदखान[1] हपसी यांणीं जमावानिशीं जंजिरे यांतून तळा–गडास वेढा घातला होता. विजापुरी फौज नामोहरम होऊन गेली, महाराज खेळण्यास आले, तिकडून रायगड प्रांतीं स्वारी येणार [हें] कळोन [ते] वेढा उठऊन जंजिरे प्रांतीं निघोन गेले. मोंगली फौजेनें पन्हाळा प्रांत खराब केला. त्यास राघो बल्लाळ अत्रे यांस सुभा देऊन ठेविलें. त्यांणीं मुलुकाची संचणी[2] करून, कौल देऊन प्रांत लाविला. महाराज रायगडास जाते जाले.

२९. रुस्तूमखानाचा पराभव.

नंतर कांहीं दिवशीं रांगण्यास रुस्तूमखान यानें जमाव करून विजापुराहून पांच सात हजार फौज घेऊन येऊन वेढा घातला. किल्लेदार यानीं लढणें तसें लढून, फौजेंत गलबल करणें, छापे घालणें, [मोर्चे] मारणें तसें केलें. महाराजांनींही कुमक पोंचविली. तेव्हां वेढा घालून बसणें दम न पुरे, जाणून [रुस्तूमखान] निघोन गेला. रुस्तूम नामोहरम होऊन गेल्यावर अबदुल करीमखान व बहलोलखान दाहा हजार फौजेनिशीं पन्हाळे–प्रांतीं चालून आले. रांगण्यास वेढा देऊन बसल्यावर महाराजांनीं कुमकेस फौज पाठविली. किल्लेकरी यांणीं [आंतून हल्ले केले] व बाहेरून फौज आली त्यांणीं रसद बंद केली. गनिमी[3] काव्यानीं छापे घालूं लागले. याजमुळें दम न निघे. बरसात आली जाणून नामोहरम होऊन जातेसमयीं यांनीं दुमदारी[4] मारून कांहीं हत्ती, घोडे पाडाव आणिले. याप्रमाणें रांगणा येथें विजापूरकरांनीं हा किल्ला बेलाग,[5] चांगला, आधीं घ्यावा[6] म्हणजे तो प्रांतच साधला म्हणून उपद्रव केला असतां, पराभवातें पावले. विजापुरी सरदार नामोहरम होऊन गेले.

३०. जंजिरेकरांशी तह.

जंजिरेकर हबशी यांणीं तळें[6] येथें मोर्चे दिल्हे होते, व जागां जागां चोरून

---

१. 'याकुबखानखान' कीं०. २. संचणी (स्त्री०) [सं० संचयन]-सान्याचा ठराव. ३. गनिमी कावा–आडमार्गाने शत्रूला जेर करणे. मुसुल्मानाशी लढताना मराठे असे करीत. ४. दुमदारी (स्त्री०) [फा० दुम्दार्]–पिछाडीचे सैन्य. ५. बेलाग (वि०) [फा० बी+सं० लग्]–अभेद्य. ६. तळें–तळगड (परि० १४ प्र० २).

उपद्रव करितात, त्यांचें पारिपत्य करावें म्हणोन बाजीराव पासलकर देशमूख मोसेखोरेकर यांस हषमलोक जमाव देऊन [महाराजांनीं] पाठविलें. त्यांनीं जाऊन राजपुरीस शह दिल्हेवरून जंजिरेकरांकडील काय सावंत[1] चालून आला. लढाई चाली. दोन्हीकडील खासे सरदार बाजीराव देशमूख व काय सावंत हे रणीं पडले. त्याजवर महाराजांनीं आणखी जमाव देऊन रघुनाथ बल्लाळ सबनीस पाठविले. त्यांणीं जंजिरेकरांचा प्रांत तमाम लुटला. गरदीस मेळविला. जंजिरेकर यांचे लोक चालून आले ते लढाई देऊन मोडिले. त्याजवरून जंजिरेकर हबशी यांणीं तह केला जे, "आपण याउपरि महाराजांनीं घेतला प्रांत, किल्ले यांस [आम्हीं] उपद्रव करूं नये. तुम्ही आमचा प्रांत राहिला यास उपद्रव लाऊं नये." याप्रमाणें तहनामा ठराऊन रघुनाथपंत कांहीं द्रव्य घेऊन परतोन आले.

३१. शिवाजीचा आरमारी दरारा.

त्याजवरि कांहीं दिवस तहाप्रमाणें चालत आले. [पण] आणखी उपद्रव करूं लागले, यावरून वेंकाजीपंत यांस फौज व लोक देऊन [महाराजांनीं] पाठविलें. त्यांणीं सिदीचे लोक आले त्यांशीं लढाई मारून व प्रांतास उपद्रव करून नतीजा[2] दिल्हा. हलखुद[3] ठेविले. त्या प्रांतीं जागां जागां डोंगर पाहून किल्ले बांधिले. दंडाराजपुरी हा डोंगर बांधिला. याप्रमाणें किल्ले करून सिदीचा उपद्रव, लबाडी आपले तालुक्यांत न चालावी असें केलें. पांच सात हजार लोक त्या प्रांतीं जागां जागां नेहमी ठेऊन जंजिरेकर यांचें कांहीं न चाले असें केलें. जंजिरा पाणियांत किल्ला, जेर न होय, असाध्य, [तो] आपणांस यावा, समुद्रांत सत्ता करावी, म्हणून बहुत चित्तांत हेतू धरून आरमार करावें असा बेत करून जाहाजें सज [वि] लीं. नवीं तयार करविलीं त्यांचीं नांवें गुराबा[4], तरांडीं[5], गलबतें[6],

---

१. काय सावंत हा कुडाळकर सावंतांपैकी नसावा. कारण कुडाळकर हे आदिलशाहीकडून शिवाजीशी लढत होते तर हा सिद्दीचा हस्तक होता. २. नतीजा (पु० अ०)–शिक्षा. ३. हलखुद [अ० हाल्+फा० खुद्]–आहे त्या स्थितीत. 'यथावस्थं तु हालखुदम्' रा० व्य० कोश. ४. गुराब (स्त्री०) [अ० घुराब्; इं० ग्रॅब] —लढाऊ तारू. ५. तरांडे (न०) [सं० तरंड]–मोठे तारू. ६. गलबत (न०) [फा० गल्बत्; पोर्तु० गव्हलत; इं. गॅली]–वल्ह्यांनी चालविलेले पसरट जहाज.

मुबारें[1], सिबाडे[2], पगार[3], मचवे व थोर तिरकती पाल[4] असे जातींचीं चारपांचशें तयार करविलीं. यास दाहापांच लक्ष रुपये खर्च केला. त्याजवरि सरदार दर्यासागर[5], मायनाक भांडारी वगैरे यांसि सुभेदारी देऊन तोफा वगैरे सामान, दर्यावर्दी[6] लोक लढाऊ व कोळी व खलाशी देऊन [ठेविले.] यांणीं दर्यांत स्वारी-शिकारी करून जंजिरेकर याजवरि दहशत पाडिली. दर्यांत सर्व टोपीकर[7] यांजवर इभ्रत पाडोन, सावकारी माल जाहाजें लुटोन, माल हरजिनसी दर्यांतील पैदास्ती[8] करून महाराजांस आणोन देऊं लागले, व खर्चही आरमाराचा मोठा तो चालविते जाले. समुद्रांत सत्ता बसविली. दर्याकिनारां जागां जागां शहरें मारूं लागले व बेटें चांगली पाहून किल्ले बांधूं लागले. समुद्रांत सत्ता जाली. त्याजवर द्रव्यही अपरिमित सांपडों लागलें.

३२. बाजी घोरपड्यांचे पारिपत्य.

राजापूर प्रांत [याचा] महाराजांकडे अमल. त्यास सावंताचा[9] लगता[10] जवळ[9]. त्यास नतीजा देऊन संस्थान घ्यावेसें मनांत आणिल्यावरून खेमसावंत व लखमसावंत, देसाई प्रांत कुडाळ, हे विजापुरी पादशाहींतील मनसब करून होते. त्यांणीं पादशाहास अर्ज केला जे, "शिवाजी राजे यांचें पारपत्य करणे येविशी हरोळी[11] आम्हांस देऊन आणखी कुमकेस फौज द्यावी, म्हणजे आपण पारपत्य करून कोंकण सोडवितों." याजप्रमाणें करार केल्यावरून खवासखान दाहा हजार फौजेनिशीं रवाना केलें. त्याजबराबर बाजी घोरपडे मुधोळकर हेही दिल्हे. बाजी घोरपडे यांणीं शाहाजी महाराजांस दगा[12] करून धरून आणिले [होतें] हें महाराजांचे अंतःकरणांत सलत होतें व शाहाजी महाराज यांणीं ही "घोरपडे यांणीं उपकार केलें हें तुम्हांस कळलें आहेच. तुम्हीं

१. मुबारे-मोबार (न०) [अ० मुअवर्]-खाडीतले तारू. २. सि (शि) बाड (न०)-मोठा मचवा. ३. पगार (पु०)-कमी हलणारी होडी. ४. तिरकती पाल (न०) [सं० त्रि+काष्ठ+पल्लव]-तीन शिडांचे जहाज. ५. दर्यासागर (पु०) [फा० दर्या-सरंग]-दर्यासारंग ?-समुद्रावरील अधिकारी. ६. दर्यावर्दी (पु०) (फा० दर्या-नवर्द+ई)-खलाशी. ७. टोपीकर-युरोपियन लोक. ८. पैदास्ती (स्त्री०) फा० पैदाइश्]-उत्पन्न; फायदा. ९. याबद्दल 'त्यांस सावंताचीं गलबतें उपद्रव करीत' की०. १०. लगता (पु०) लगत (स्त्री०)-समीपता. ११. हरोळी-हरोल (स्त्री:) [फा. हरावुल्]-आघाडी. १२. दगा (पु०) [फा. दघा]-घात.

पुत्र विजयी जालां आहां, तरि कधीं[1] तरी उसनें घ्यावें," असें सांगून पाठविलें होतें. तें महाराजांचे अंतःकरणीं पक्कें होतें. सावंत यांणीं हरोळी केली, बाजी घोरपडे बराबर नेमले, खवासखान घाट उतरून येतो [हें] कळोन महाराज फौज, पागा, तोफखाना वगैरे तयार करऊन, पन्हाळ्यास येऊन फौज सुद्धां चालून गेले. तों बाजी घोरपडे पुढें आपली फौज कांहीं जमाव सुद्धां घरास आले होते. तेव्हां महाराज बातमी येऊन[2] मुधोळ नजीक गेले. बाजी घोरपडे यांचें पारिपत्य आधीं करावें म्हणोन वेढा घालून भोंवता प्रांत लुटला. ते समयीं घोरपडे चालून आले तेव्हां त्यांशीं लढाई दिली.[3] ते मराठे बहूतच जवामर्दीने[4] लढले. बाजी घोरपडे रणीं पडले. [महाराजांनीं] सांपडले तितके मारिले. नंतर ठाणें घेऊन गांव लुटला. याप्रमाणें पुढें फौज व घोरपडे गेले त्यांचे पारिपत्य केलें. हे खवासखान यास बातमी गेली असतां, महाराज तसेच खवासखान याजवरि चालून गेले. तों बाजी घोरपडे मारिले, फौज बुडविली, मुधोळ प्रांत लुटला, सामान [महाराजा] बराबर भारी आहे, हें कळतांच घाट उतरून [कोंकणांत] यावें तें अवसान न पुरे. तसाच माघारा निघोन महाराजांची गांठ न पडूं देतां [परत] विजापुरास गेला.

३३. शिवाजी फोंडे घेतो.

[इकडे] महाराजही फिरोन सावंताचे मुलकावरि चालून गेले. कुडाळ प्रांतीं जाऊन बहूत खराबी आरंभिली. तो शह सावंतांस सोसणें [यास] अवसान न पुरे, जाणून कुडाळ सोडून फिरंगणांत गेले. महाराजांनीं प्रांत हस्तगत करून ठाणीं घातलीं. फोंडें याचा कोट जुंझूं लागला. ठाणें मजबूत, आणि लोकही हिमतीनें लढूं लागले. महाराज मोर्चे देऊन बसले. किल्ला जेरीस नये, ते समयीं सुरुंग तयार केले. उडवावे तों घाटावरून बहलोलखान मदतीस फौज घेऊन आला. हें कळल्यावरून मोर्चे उठवावे, आधीं मोंगल आला याचें पारपत्य करून, मग येऊन किल्ला घ्यावा, ऐसा विचार केला. आणि लष्कर निघण्याची तयारी केली. किलियांतील लोक, फौज[5] शह[6] पडल्यामुळें उठोन जाती जाणून बेफामपणें

---

१. 'संधी पाहून' की०. २. 'ठेऊन' की०. ३. 'देऊन' सा० सा० २ व को०. ४. जवामर्दी (स्त्री०) [फा० जवान्मर्दी]–शौर्य. ५. फौज–महाराजांची. ६. शह–(पु०) [फा० शह्‌–राजा]—बहलोलखानाचा दरारा.

बुरजावरि, तटावरि उभे राहिले. या संधींत सुरुंग तयार होते त्यांस बत्ती देवविली. त्याणीं किलियांतील लोक फार जायां जाले. किल्लेदार उडोन गेला. लोक घाबरे जाले. तेव्हां स्वारी जाण्यास तयार जाली होती[१], तशीच हल्ला करून किल्ला घेतला. कोट फत्ते केला. हें वर्तमान घाटावरि बहलोलखान येत होता त्यास कळलें. मदतीस जावें [तों] तेंच ठाणें गेलें हें जाणून परत गेला. महाराज फत्ते पावले. किल्ला फोंडें येथें महाराजांनीं इभ्रामखान याणीं हल्लेचे समयीं काम करून निशाणाबराबर आधीं गेला त्याची नवांजीस करून त्यासच सुभा देऊन ठेविलें. त्या प्रांतीं [महाराजांनीं] भिवगड[२], पारगड डोंगर चांगले पाहून किल्ले वसविले.

३४. सावंतांस अभय व फिरंग्यांवर जरब.

[इकडे] सावंत फिरंगाणांत गेले, तेथें फिरंगियाचे वस्तू[३] महाराजांचे प्रतापतेजेंकरून भयास्तव त्यांस आश्रय देऊन ठेवणें [यास] अवसान न पडे, जाणून सावंतांनीं महाराजाकडे वकिलीस पितांबर शेणवी शाहाणे माणूस पाठविले. "आम्ही सावंत, भोंसले कुळी आमची, तेव्हां आपले आहों. स्वामींशीं निष्ठेनें चालावें ऐसा निश्चय जाला आहे, तरि आपण कृपा करावी." म्हणून कितेक प्रकारें सांगून पाठविलें. याजवरून अभय देऊन भेटीस आणविले. वाडी प्रांत त्यांचे वतन, देशमुखी खाऊन, चाकरी करून, खंडणी देऊन सुरळीत चालावे ऐसें करून त्यांची स्थापना [महाराजांनीं] केली. त्यांचे सरदार तान सावंत व राम दळवी मातबर मर्द सरदारी करून होते. त्यांस नवांजून चाकर ठेविलें. याजप्रमाणें सावंताचे पारपत्य करून महाराज फत्ते पावले. हें पाहून फिरंगियांणींही वकील पाठविला. आणि "दरसाल तोफा नव्या तयार करून पांच चार द्याव्या; जवाहीर, दर्यांतील जिन्नस[४] फिरंगाणी पाठवीत जावे; आणि कौल आपले जाहाजांस द्यावा" म्हणून बोलणें लागलें. [वकील पोशाख व जवाहीर व नाना प्रकारचे जिन्नस, आरसे[५], फानसे[६], वगैरे घेऊन येऊन [त्यांची त्यांनीं]

---

१. थानंतर 'ती तहकूब करून' की०. २. 'भीडगड' की०. येथे भीमगड असे हवे. 'लखम सावंत देसाई पो। कुडाळ यांहीं भीमगड फोंडे प्रांतें फिसाद केली.' (शिवचरित्र साहित्य ३–४३८). ३. वस्तू–वस्त (श० अ०) [अ० वासिता–माध्यम]–कडून. ४. जिन्नस (पु० स्त्री०) [अ० जिन्स्]—वस्तू, चीज. ५. आरसा (पु०) [सं० आदर्श]–दर्पण. ६. फानस–फाणस) (पु०) [अ० फानूस्] कन्दील.

नजर केली. त्याजवरून कौल देऊन तह ठराविला. याप्रमाणें फिरंगी यांजवरि जरब बसविली.

३५. सिंधुदुर्ग बांधिला.

ते समयीं जंजिरेयासारखी जागा आपणांस असावी म्हणून बहूत चिंता करून श्रीस प्रार्थना केली असता दृष्टांत जाला कीं, "जंजिरा या कालीं साध्य नाहीं, सातशें[1] वर्षांचा मुहूर्त त्यास दिल्हा आहे. तूं समुद्रापाशीं स्थळ मागावें." याजवरून तीन उपोषणें केलीं असतां समुद्रानीं दृष्टांत दिल्हा कीं, "मालवण[2] म्हणोन कोळियाचें बेट गलबतें उभीं करण्याचें लाहान आहे तें तुला दिल्हें. तेथें जागा करावी." त्याजवरून दुसरे दिवशीं पाहाविलें[3], तों समुद्राचें पाणी लांब जाऊन ते बेटावेरी जागा विस्तीर्ण जाली. याप्रमाणें समुद्र प्रसन्न होऊन स्थळ दिल्हें. याजवरून बहूत संतोषी होऊन पांच साहा कोशांवरि समुद्राचे पाण्यांत जागा बेलाग पाहून किल्ला बांधिला. त्याचें नांव सिंधुदुर्ग ऐसें ठेविलें.

३६. हसनूर लुटलें.

हसनूर[4], प्रांत [बिदनूर], शहर मातबर दर्याकिनारां आहे.[4] तेथें बहूत द्रव्याधिपती आहेत म्हणून समजलियावरि बातमी आणून स्वारी करावी, शहरें मारावीं, प्रांत घेऊन ठाणीं घालावीं, असें महाराजांनीं चित्तांत आणून, ते समयीं सारें आरमार सिद्ध करून, आपणही थोरलें पाल याजवरि बसोन, दर्यातून जावें असा सिद्धांत करून खुषकीनें[5] फौजा रवाना केल्या. आणि मालवणावरून दर्यामार्गेच जाऊन हसनूर पेठ असावध होती तेथें जाऊन पेठ लुटली. प्रांतही लुटला. तीन चार दिवस स्वारी तेथेंच राहून सर्व मत्ता जाहाजावरि चढविली. सुरतेचेसारखें[6] शहर होतें. दोन तीन करोडींचा[7] विषय सांपडला. तो घेऊन त्याप्रांतीं कडवाल,[8] सिद्धेश्वर, मिरज, अंकोलें, कोदरें,

---

१. सातशें वर्षांचा मुहूर्त–'जोशी म्हणाला होता कीं, हा मुहूर्त साध्य झाल्यास ७०० वर्षें शत्रूचा प्रवेश येथें होणार नाहीं (स. च. पृ. १६५). २. की० 'मालवण' हा शब्द नाही. ३. 'पाहिलें' की०. ४. 'बसनूर प्रांतीं व बिदनूर प्रांतीं शहरें मातबर आहेत. दर्याकिनारा आहे. की०. ५. खुषकी स्त्री० [फा० खुश्की]–जमीन. ६. 'सुरतेचे स्वारीसारखे' सा० की०. ७. करोड (वि०) [सं० कोटि]—असंख्य. ८. कडवाल (कडवाड)—कारवार.

हु मा ऊ द हीं ठाणीं घेतलीं. अमल बसविला. गोकर्ण महाबलेश्वर ही जागा घेतली. श्रीदेवाचें दर्शन घेऊन तेथें दानधर्म बहूत केला. याप्रमाणें प्रांत घेतला. हें पाहून शिवाप्पा नाईक बिदनूरकर संस्थानी होते त्यांस बहूत भय प्राप्त होऊन [त्यांनीं] वकील पाठविले, आणि महाराजांस नजराणा पोशाख, जवाहीर, लाख रुपये नख्त[1] नजर ऐसें पाठविलें. आणि तह ठरावून महाराजांचे दर्शनास आले. दरसाल खंडणी तीन लक्ष देत जावी ऐसा ठराव केला. त्याजवरून महाराज त्याजवर संतोषी होऊन खंडणी ठराविली. याप्रमाणें घेऊन, आपले म्हणवून असावें ऐसें करून तेथें वकिलीस उमाजीपंत आपणांकडून ठेविले. याप्रमाणें स्वारी करून महाराज रायगडीं आले.

३७. राजारामाचा जन्म.

ते समयीं रायगडीं सोयराबाई साहेब गुरूदर होतीं तीं प्रसूत जालीं. पुत्र जाले. शके[2] १५८३-प्लवनाम संवत्सरे चैत्र शु॥ नवमी. जन्मतां गर्भ पालथा जालियाचें वर्तमान महाराजांस कळलियावरि बहुत हर्ष पाऊन बोलले जे, "हा राजा परम भाग्यवान, पराक्रम बहूत करील, सर्व प्रजा वृद्धिंगत करून पालन करील; दिल्लीची पादशाहात पालथी घालील." ज्योतिषी यांणींही जन्मकाल[3] वर्तवून भविष्य [केलें] व ग्रह सबल उंच पडले[3], सांगितलें. चैत्र शुद्ध नवमीस जन्म जाला त्यावरून राजाराम ऐसें नांव ठेविलें. दानधर्म केला साखरा वाटल्या.

३८. किल्ले, आरमार उभे केले.

महाराज रायगडींहून देशांत जावें म्हणून सातारा प्रांतीं आले. पहिले सारे किल्ले घेतलेच होते. कांहीं ठाणीं राहिलीं [होतीं] तीं वाई, कराड, कोल्हापूर आदिकरून [घेऊन] ठाणीं घातलीं. निंबाळकर, घाटगे वगैरे पुंडपणा करून होते त्यांस[4] दबावासाठीं जागां जागां किल्ले नवेच बांधिले. वारूगड[5], भूषणगड[6],

१. नख्त—नक्त—नगद (स्त्री०) [अ० नक्द]—रोकड. २. 'शके १५९१ सौम्य संवछरे फाल्गुण सुध १५ राजगडी राजाराम उपजले' (जेधे शकावली). ३. 'जन्म-भविष्य व ग्रह सबल उंच पडले' की०. ४. 'त्यांचे' की०. ५. वारूगड—ता० माण ६. भूषणगड—ता० माण.

महिमानगड[१], वर्धनगड[२], सदाशिवगड[३], मछिंद्रगढ[४] हे नवेच बांधिले, व जुनेही हस्तगत केले. जागां जागां कोकणांत व मावळांत, देशांत डोंगर चांगला आढळेल तेथें व समुद्र किनारां किल्ले बांधावे, ऐसे करिते जाले. यासि कारण येक, देशास प्रांतास जाग्याचा[५] आधार होतो, जागा असेल तेथें सुभा जमयतीनें ठेवणें घडतें. त्या दहशतीनें दुसरा शत्रू आपले देशांत उपद्रव लावीत नाहीं, व देशक[६] आदिकरून पुंडपणें बळावत नाहींत. सर्वांवर सलाबत असती. हें मनांत आणून किल्ले बांधिले. लाहान[७] सामान्य[७] किल्ला, पाणीही वरतें नाहीं, तेव्हां शत्रूस उपायास जागा होती ऐसें नाहीं. शत्रू चालून आला तो लागलाच डोंगरावरि चढून तटास लागत नाहीं. शत्रू चालून येतो हें पाहून आपले लोक सावध होतील, दगडच लोटतील, तरि त्यांचे दबावानें गनीम दबेल. इतकियांत आपलाही उपराळा [होईल.] दुसरीं ठाणीं, किल्ले, कोट, सुभे जवळ असतील ते मदत करतील. त्याणें किलियास अपाय होणार नाहीं. ऐसी कल्पना करून किल्ले केले. समुद्रकिनारां किल्ले मालवण, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, रत्नागिरी, खांदेरी, कुलाबा ऐसीं बेटें[८] बांधिली. तेथें आरमार आश्रयानें राहावें, लागावें, ऐसें केलें. उंदेरीचें[९] बेट आरमार उभें करून बांधिलें, त्याचें नांव पद्मदुर्ग[१०] ठेविलें. आरमार समुद्रांत, याणीं द्रव्य बहूत आणावें. तें किलियाचे बंदिस्ती [स] व खर्चास आरमारसुद्धां [खर्च] करावें. आरमारकरी यांणीं त्या ठिकाणीं जागां जागां किलियाचे लगतीनें तारवें खुंटवून असावें, ऐसें करविलें. जंजिरेनजीक महाराज बेट बांधूं लागले त्यावरून हबशी यांणींही किलियानजीक किल्ले जंजिरे याजजवळ बांधिले. उंदेरी[११] बांधिली.

३९. कल्याण–बिदनूरपर्यंत साम्राज्य.

कल्याण अहद तहद[१२] फोंडें बिदनूरपर्यंत कोंकण, किल्ले सुद्धां, राज्य

---

१. महिमानगड–ता० माण. २. वर्धनगड–ता० कोरेगाव. ३. सदाशिवगड–कराडच्या ईशान्येस. ४. मछिंद्रगड–कराडच्या आग्नेयीस. ५. जागा–सुरक्षित स्थळ. ६. देशक (पु०) देशमुख, देशपांडे इ० देशाधिकारी. ७. 'लाहानसान' सा०. ८. 'ठाणीं बांधिलीं' की०. ९. जंजिऱ्याजवळ कासे खडक असावा (स. च. पृ. १४८). १०. पद्मदुर्ग–जंजिऱ्याचे वायव्येस. कासे हे नाव. ११. उंदेरी–थळच्या (ता० अलीबाग) पश्चिमेस. सिद्दी कासम याने १६८० मध्ये खांदेरीवर हल्ला करावा म्हणून उंदेरीवर किल्ला बांधिला (स. च. पृ. १६७). १२. अहदतहद–[फा० अज़्हद ता–हद्द]–पर्यंत–पासून].

महाराजांचें जालें. देशींही राज्य सातारा[1] पनाळा आदिकरून किल्ले प्रांत राज्य सोडविलें. विजापूरची पादशाहात फार करून घेतली. राहिली तीही पादाक्रांत करूं. हे[2] पादशाहात दस्तांत आलीच.[2] त्यांतील अमीर आले तितके नामोहरम जाले.

४०. अधिकाऱ्यांच्या नेमणुका.

याउपरि दौलताबादेंतील[3] पादशाहींत वेध लावावा हें मनांत आणिलें. कांहीं कांहीं स्थळें त्यांचींही आलीं आहेतच. परंतु दोन वेध करूं नयेत. एक पुरतें करून मग दुसरें करावें या आदेशामुळें[4] टाकिलें होतें. यानंतर मोरोपंत पेशवे यांस कल्याणप्रांत,[5] भिवंडी वगैरे ठाणीं प्रांत व सत्तावीस रामनगर वगैरे किल्ले घ्यावे, खानदेश, बागलाण प्रांत घेऊन अम्मल बसवावा म्हणून पाठवून देऊन तो तालुका एकंदर त्यांचेच स्वाधीन केला. सुभेदार, कारकून, हवालदार, दरखदार,[6] हे सरकारांतून हुजरून[7] देऊन देखरेख त्यांचे स्वाधीन करविली. त्यांचे निसबतीस याप्रमाणे ठेविले. अण्णाजी दत्तो सुरनीस यांस चेउलपासून तहद फोंडेपर्यंत कुडाळ, दाभोळ, राजापूर निसबतीस सुभेदार, कारकून, दरखदार वगैरे देऊन त्यांचे स्वाधीन देखरेख केली. दत्ताजीपंत वाकेनीस यांचे स्वाधीन वरघाट वाईपासून तहद कोल्हापूर तुंगभद्रातीरपर्यंत तालुका [दिला]. देखरेख करावी म्हणोन सुभेदार, कारकून, दरखदार देऊन करविलें. हवालदार, दरखदार कारकून वगैरे हुजरून तहगिरी[8] बाहली[9] करणें तें करून ठेवावें, तालुकियाची खबरदारी व किलियावरि इमारती करणें व सामान दारूगोळा वगैरे दास्तान[10] करणें याची चौकशी करून नेमणुकेप्रमाणें करावें. आणि सरकारची आज्ञा येईल तसें वर्तावें. याप्रमाणें करविते जाले.

---

१. 'सारा' सा० व को०. २. 'अशी उमेद त्यांस झाली' की०. ३. दौलताबाद पादशाही–मोंगलांच्या ताब्यातील निजामशाहीचा प्रदेश. ४. आदेश–रामदासांचा? (स. च. पृ. १६७). 'अन्देशामुळे' की० (विचारामुळे)–हा पाठ बरा दिसतो. ५. 'कल्याण प्रांतीं' को० ६. दरखदार (पु०) [अ० दरक + फा० दार]–वंशपरंपरागत अधिकारी. ७. हुजूरकडून या अर्थी. ८. तहगिरी–तगिरी (स्त्री०) [अ० तध्यीर्] –बडतर्फी. ९. बाहली-बहाली (स्त्री०) [फा० बहाल्]–पुनः नेमणूक. १०. दास्तान (न०) [फा० तोश्दान् दाश्तन्]–साठा.

४१. प्रतापराव सरनोबत होतात.

नेतोजी पालकरास सरनोबती होती त्यास ते स्वारीस प्रांतास[1] गेले होते. इकडे जरुरीचें कार्य पडिलें म्हणून निकडीनें लेहून आणविले असतां समयास न आले, जाणून इतराजी करून, त्यांची सरनोबती दूर करून राजगडीं कडतोजी[2] गुजर किल्ल्याचे सरनोबत शाहाणे, शूर असून त्यांनीं बहूत कामें केलीं होतीं, त्यांस आणून, त्यांचे नांव प्रतापराव ऐसें ठेऊन सरनोबती दिल्ही. त्यांणीं पादशाहींतील हिसाब न धरितां मर्दुमी करून, स्वारी शिकारी करून लढाई करणें, शहरें मारणें, करूं लागले. शाहाणे कर्ते, मर्द, विश्वासू ऐसे जाले. त्यानीं बालाघाट[3], परांडा, हवेली, कलबर्गे, कल्याण, आवसें, उदगिरी तहद गंगातीरपर्यंत भागानगरचे पादशाहींत स्वारी करून, शहरें मारून लूट घेऊन आले.

४२. शहाजीकडील सरदारांचा गौरव.

शाहाजी महाराज यांजपाशीं व्यंकाजी दत्तो, मकाजी आनंदराव पाळक लेंक[4] भोंसले सेवेंत होते. [ते] निघोन महाराजांकडे कर्नाटक प्रांताहून आले. सरदार चांगले, मर्द, वडिलांकडोन आले म्हणोन बहूत गौरव करून नवाजीस करून वाढविले. कामें सांगितलीं.

४३. सुरतेवर स्वारी.

यानंतर सुरत शहर मातब्बर, स्वारी करावी या विचारें हरकारे[5] बातमीदार बहिरजी नाईक पाठविले होते. ते बातमी आली [कीं] बहूत द्रव्य सांपडेल व प्रांतही मोठा आहे; त्याजवरून विचार करून महाराजांनीं प्रतापराव गुजर सरनोबत, निळो सोनदेव व अण्णाजी दत्तो सुरनीस, मानसिंग मोरे, [6]रूपाजी भोंसले, मकाजी आनंदराव, व्यंकाजी दत्तो आणखी सरदार नामी नामी, पंचवीस हजार फौज, दाहा हजार हशम निवड करून लांब लांब मजली करीत कोळवणांतून[7] सुरतेस रवाना केले. आपणही वरकड फौजसुद्धां वरून[8] चालले. तों सुरतेचा सुभा

---

१. 'प्रतापगडास' को०. २. 'तानाजी गुजर' की०. ३. बालाघाट इत्यादि स्थळे निजामशाहीतील मोगलहद्दीत. ४. पाळक लेंक (पु०स्त्री०न०) [सं-पालक + का० लेक]—लेकवळा; दासीपुत्र. ५. हरकारा-हल्कारा (पु०) [फा० हर्कारा]—जासूद, हेर. ६. हा शब्द को० नाही. ७. कोळवण-कोळयांचा मुलूख. (जव्हार वगैरे). ८. वरून-घाटावरून.

चालून आला, त्यासि मोडिलें. कोटास मोर्चे दिल्हे. पांच चार दिवस मुकाम केला. सावकार बहूत व मातबर होते. मोतीं, माणीक, हरजिन्नस जवाहीर, सोनें, रुपें, द्रव्य कोट्यावधीचा माल सांपडला. सुरतेवरि स्वारी महाराजांची गेली हें औरंगाबादेस कळलियावरि [तेथील सुभेदार] याणीं मोहबतखान व दाऊदखान आठदाहा हजार फौजेनिशीं सुरतेचे कुमकेस पाठविले. उदाराम माहूरकर याची स्त्री रायबागीण व त्याचे लेंक जगजीवन हेही चार पांच हजार फौजेनिशीं दुसरे मार्गें आले. ऐशा दोन्ही फौजा दो वाटांनीं चालून आल्या असतां त्याजवरून महाराजांनीं सारे लोक पुढें गेले होतेच, आपण सडे होऊन फोजेचे तोंडावरि गेले. त्यांत रायबागीण जात होती त्या मार्गेकरून बोरटीकर[1] देशमूख राजपाटील व यशवंतराव रामाजी, विश्वासराव हतनूरकर व दिनकरराव बागराव यांस हुकूम केला जे, "रायबागीण उमरखिंडींतून जाऊं न द्यावी बुडवावी," ऐसे सांगून रवाना केले. त्यांणीं जाऊन वाट बंद केली. आपण मोहबत खानावरि गेले. खंडासें[2] म्हणून शहर आहे त्यानजीक गांठ पडली. युद्ध दोन प्रहरपर्यंत होऊन मोंगली फौज घोडीं घालून मोडिली. चार हजार घोडे, दाहा हत्ती पाडाव केले. लूटही फार सांपडली. कांहीं लोक पळून गेले त्यांचा पाठलाग न करितां सुरतेचीं लूट निभावून जाणें, रायबागीण आली तिचें पारिपत्य करणें म्हणून तसेच चालून आले. बागराव वगैरे सरदार यांनीं माने यांचे तळ्यावरि[3] जाऊन तेथून रायबागीण येतां खिंडींत अडविली होती, तों महाराज येऊन पावले. आणि वेढा देऊन कांहीं लढाई देऊन तिजला बुडविली. दोन तीन हजार घोडीं, पांच हत्ती पाडाव केले. रायबागीण व तिचा लेंक जगजीवन [हीं] धरिलीं. ती शरण आली[4]. याप्रमाणें महाराजांनीं सुरतेची स्वारी करून, दोन्ही फौजा लुटून, यश घेऊन शत्रूवरि दहशद घालून लूट[5] सुद्धां [ते] सुरक्षित रायगडास येऊन पावले. मार्गीं येतां रामनगरही मारिलें. रायबागीण हीस बहुमान देऊन सोडून दिली.

४८. प्रबळगड घेतला.

त्याजवरि प्रबळगडावरि[6] किल्लेदार केसरसिंग हाडे रजपूत होते. भेदानीं

---

१. 'बेरटीकर' की०. २. 'खेडास' की०. 'खंडाचें' को०. खेडासे सा० २. ३. 'तळावर' की०. ४. 'जाली' असे सर्व प्रतींत आहे. ५. 'मालमत्ता सुरतेची... पांच क्रोड होनांची आणली' (सभासद). ६. पनवेलच्या (जि० कुलाबा) पूर्वेस.

किल्ला न ये जाणून महाराजांनीं स्वारी केली. मोर्चे लाविले. किल्ला कांहीं भांडला. महाराजांचा प्रताप विचित्र! किल्ला बहूत थोर विस्तीर्ण असतां महाराजांची हल्ला जाली कळोन, केसरसिंग यार्णी कबिले यांचें जोहर केलें. एक लेंक व आई चुकोन राहिली. केसरसिंगानीं चालून घेतलें. खासा व आणखी रजपूत रणीं ठार जाले. किल्ला फत्ते जालियावरि महाराज किल्ला पाहावयास पालखींत बसोन चालले. ते समयीं शेला पालखींतून बाहेर पडला, त्यास बोरीची काटी लागली. तेव्हांच पालखी उभी केली आणि बोलले जे, "या[1] काटीने आम्हांस उभें राहा म्हटलें[1] तेव्हां खालीं द्रव्य आहे. खाणावें." म्हणून सांगितलें. खाणून पाहातां पांच चार लाख मोहोरांचा चौत्रा[2] सांपडला. महाराज दैवी पुरूष! नंतर किलियावरि गेले. केसरसिंग वगैरे रजपूत ठार जाले [होते] त्यास अग्नी देवविला. त्याची आई व लेंक सांपडलीं. तीं गौरव करून जवळ ठेविलीं. कांहीं दिवशीं त्यांसि समाधानानें 'आपले देशीं जातों,' बोललियावरि वस्त्रें द्रव्य देऊन लाऊन दिल्हीं. याप्रमाणें प्रबळ किल्ला महाराजांनीं फत्ते केला.

४५. महकूबसिंगाचा पाडाव.

हें वर्तमान व आणखी मुलूख घेतला [तें] दिल्लीस औरंगजेब पादशाही करीत होते त्यांस समजलें. तिकडील बंदोबस्तासच चार पांच वर्षें लागलीं. सुरतेवरि स्वारी करून सुरत मारिली; किल्ले, कोट, ठाणीं दौलताबाद तालुकियांतील घेतली; फौजा[3] बुडविल्या; स्वारी करून प्रांत लुटतात; धामधूम[4] मांडिली, हें वृत्त समजलें. यावरि बहूत चिंताक्रांत होऊन औरंगाबादेस सुभेदारीस इखलासखान व महकूबसिंग ठेविले [होते] त्यांस पादशाहांनीं नसिहत[5] करून लिहिलें जे, "तुम्ही काय करितां! अफजल मोठे आंगेजणीनें शिवाजीनें मारिला, विजापुरी पादशाहात [येथील] किल्ले प्रांत बहुत घेतला, त्यांजकडील अमीर मोठे मोठे चालून गेले ते नामोहरम केले." हें वर्तमान

---

१. 'या ठिकाणीं जे आम्हांस उभें केलें.' की०. २. चौत्रा–चौथरा–चबुत्रा (पु०) [फा० चोतरा. म० चौ+थर]–चौकोनी उंच ओटा. ३. 'फौज बुडविली' को०. ४. धामधूम (स्त्री०)–दंगल, बंडाळी. ५. नसिहत–नसीहत–नशेत (स्त्री०) [अ० नसीहत्]–उपदेश; समजावणी.

कळलियावरि [औरंगजेब] सर्द[1] होऊन औरंगाबादेस लिहिल्यावरून महकूबसिंग रजपूत, सुभे यांणीं दाहा वीस हजार फौजेनिशीं रवाना केला. तो चालून आला. त्याजवरी प्रतापराव गुजर सरनोबत फौजसुद्धां पाठविले. नगरानजीक गांठ पडली. युद्ध बहुत जालें. महकूबसिंग रजपूत ठार झाला. दाहा[2] हजार घोडीं व हत्ती व लूट बहुत सांपडली. ती घेऊन माघारे आले. त्याजवरि दुसरे वर्षीं स्वारी त्या प्रांतीं महाराजांनीं करून औरंगाबादेचा पुरा मारिला. जालनापूर पेठ झांबाडून,[3] सुभा चालून आला त्यांशी युद्ध देऊन मोडिला. याप्रमाणें फत्ते केली, आणि रायगडास आले.

४६. महाराजांची धर्मस्थापनेची इच्छा.

नंतर महाराजांनीं विचार केला जे, "किल्ले, कोट प्रांत घेतला; फौज व पागा जाली; जागांजागांचे माणूस उत्तम तितके जमा केले; हषमी लोक जागांजागांचे नामी ठेविलें; तसेच सरकारकूनही मोठे, कर्ते, शाहाणे मेळविले; ते समयीं आपण धर्मस्थापनेची इच्छा धरिली, हिंदुधर्म स्थापावा हेंच मानस, तसेंच देवानीं कृपाकरून आजपर्यंत घडविलें; पुढेंही शेवटास तोच नेणार, नेईल म्हणून आक्रम केला; राज्य साधिलें. याचा पाया रीत घालून, धर्मेंकरून प्रजापालन करणें हें सिद्धीस न्यावें." म्हणून चित्तांत आणून पूर्वी जे जे राजे धर्मेंकरून राज्य करून वृद्धीस पावले, ते कोणते रितीनें चाललें व शास्त्राचे ठायीं पुराणांतरीं महान राजे आचरण करीत आले, त्याअन्वयें [आपणही] करावें ऐसें केलें.

[याप्रमाणें] अफजलवध नानाप्रकारें यवनांशीं युद्ध तृतीय प्रकरण समाप्त.

श्रीभगवानउवाच

संरक्षणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम् ॥
धर्म संस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ १ ॥
रक्षावयासि साधूंतें माराया पातकी जनां ॥
स्थापावयासि धर्मातें जन्में युगयुगांतरीं ॥ १ ॥

---

१. सर्द [सं० शरद्, फा० सर्द्]–नाखूष, खिन्न. मूळ अर्थ थंड. २. 'पांच हजार घोडीं पागेस लाविलीं' (शिवदिग्विजय पृ. २१५). ३. झांबाडणें (उ० क्रि०)–हिसकावून घेणें.

राज्यमर्यादास्थापनें[1] [आणि] पितृदर्शनें[2]—प्रकरण ४

१. श्रीकृपेचे सामर्थ्य.

श्रीशिवाजीमहाराज [यांनीं] मनोरथ धरिला तसें श्रीनें राज्य, प्रांत, स्थळें, देश, दुर्ग ऐसें करून दिल्हें. यवन यांचें प्राबल्य होऊन धर्म-उच्छेद जाला, तो [धर्म] स्थापावा ऐसा संकल्प केला, त्या अन्वयें श्री [कृपे] नीं यवनांचा पराभव व्हावा ऐसें घडूं लागलें. या उपरि धर्मेंकरून चालावें म्हणोन [महाराज] बंदोबस्त करिते जाले.

२. शिवाजीची राज्यव्यवस्था.

पेशवाई मोरो त्रिमल पिंगळे यांस, साहा वर्षें शामराजपंतानीं केलियावरि त्यांची काढून दिल्ही होती; तेच कायम करून त्यांचे स्वाधीन तालुका प्रांत केला तोच कायम केला. निळो सोनदेव यांस बाळकृष्णपंत हणमंते यांची मजमू[3] काढून दिल्ही होती तेच कायम केली. आणि त्यांणीं दोनतीनशें कारकून दफ्तरचे ठेऊन एकबेरजी[4] लिहिणें दफ्तर वगैरे सालाचे सालास पाहून करीत

१. राज्यमर्यादास्थापन—राज्यव्यवस्था. २. यानंतर 'श्रीशिवछत्रपति शककर्ते यांनीं केलें तें' की०. ३. 'मुनिमी' की०. ४. एकबेरजी (स्त्री०)—जमाखर्चाची पहिली नोंद.

असावें, ऐसें केलें. अण्णाजी दत्तो [यांस] सुरनिसी होती व तालुका प्रांत होता तो कायम केला. सोनोपंत यांजकडे डबिरी[१] दिल्ही. दत्ताजीपंत यांजकडे [प्रथम] पागेची सबनिशी होती. त्यांस एके समयीं पागेचा झाडाचंदी[२] विचारितां तोंडानें हजार पांचशें घोड्यांचीं नांवें व चंदी नांवनिशी त्यांनीं सांगितली! याजवरून यादी आणवून पाहातां त्याप्रमाणेंच [जमली], कांहीं एक अंतर नाहीं!! हें पाहून बहुत तारीफ करून त्यांजकडे वाकेनिशी, गंगो मंगाजी यांची दूर करून दिल्ही[३] [होती] तेच कायम केली.[३] प्रतापराव गुजर सरनोबत होतेच. पंडितराव उपाध्ये, धर्माध्यक्ष रघुनाथभट व बाळंभट केले. न्यायाधीश निराजी रावजी केले. या प्रमाणे अष्टप्रधान असावे ते ते दरख[४] पाहून हे केले, आणि यांणीं तालुके [वहिवाटावे][५] व फौज घेऊन कामगिरीस जावें. सन्निध त्यांस एक एक मुतालीक[६] करून देऊन यांणीं कामकाज चालवावें. खासा [प्रधान] असतील [तेव्हां] त्यांणींही करावें. याप्रमाणें करून दिल्हें. बाळाजी आवजी चिटणीस होतेच. दाहापांच कारकून लिहिण्यास ठेवून, त्यांचा बंदोबस्त करून देऊन, त्यांनीं चिटणिशी करावी. माहाल मुलूक येथें व सरदारांबराबर त्यांचे कारकून चिटणिशीवर एक एक जावा. याप्रमाणें करून दिल्हें. फडणिशी, मजमूकडील दफ्तरदारी, चिमणाजी आवजी [कडे] होतीच. पारसनिविशी[७] नीळकंठराव प्रभू यांस दिल्ही आणि शेषावा नाईक पुंडे यांस पूर्वी मालोजी राजे यांणीं पोतदारी— विशीं वचन दिल्हें होतें, त्यांचा वंश शामजी नाईक पुंडे यांजकडे पोतदारी [दिली] होती ती कायम केली.

३. बारा महाल व अठरा कारखाने.

माहाल[८] बारा व कारखाने अठरा केले त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें :—

---

१. डबीर (पु०) [फा० दबीर्]—खाजगी कार्कून. २. झाडाचंदी (स्त्री०) [सं० झाटन+हिं० चंदी]—दाणावगैरेचा हिशेब. ३. याबद्दल 'आणि गंगो मंगाजी यांजकडे पागा दिली' की०. ४. दरख (पु०) [अ० दरक्]—अधिकार, हुद्दा. ५. वहिवाट—(स्त्री०) [सं० वह्+वृत]—कारभार. ६. मुतालीक (पु०) [अ० मुतअल्लिक्]—उपमंत्री; नायब. ७. पारसनिवीशी—फारशी पत्रव्यवहाराचे काम. ८. माहाल—महाल (पु०) [अ० महल्ल्]—खाते.

द्वादश कोशांस बारा माहाल म्हणावें.

१. अंतःपुर–दरुणी[1] महाल.	१. माहाल–टंकशाला.[6]
१. द्रव्यभांडार–माहाल पोतें.[2]	१. माहाल शिबिकादि–यानें.
१. धान्यागार–माहाल कोठी.	१. माहाल इमारत.
१. अश्वधन–माहाल पागा.[3]	१. माहाल सौदागिरी.[7]
१. गोधन–माहाल थटी[4]	१. माहाल चौबिना.[8]
१. आराम क्षेत्रें–माहाल शेरीबाग[5]	१. वसनागर–जामदारखाना.[9]
६	६

१२

अष्टादश शाला, अठरा कारखाने.

१. गजशाला–हत्तीमाहाल, पीलखाना.	१. मल्लशाला–तालीमखाना.
१. अंबारखाना–धान्यसंग्रह–स्थल.	१. रत्नशाला–जवाहीरखाना.
१. भेरीदुंदुभी–नगारखाना.	१. पाकशाला–मुदबखखाना.
१. यंत्रशाला–तोफखाना.	१. शस्त्रशाला–शिलेखाना.
१. वैद्यशाला–शरबतखाना.	१. तांबूलशाला–शराबखाना.
१. पानीयशाला–आबदारखाना.	१. रथशाला–गाडीखाना.
१. उष्ट्रशाला–शुतरखाना.	१. जिन्नसखाना.
१. शिबीरशाला–फरासखाना.	१. लेखनशाला–दफ्तरखाना.
१. खेटकशाला[10]–शिकारखाना.	१. नाटकशाला–नटखाना.
९	९

१८

---

१. दरुणी महाल (पु०) [फा० दरूनी = आतील] – जनाना. २. पोते (न०) [फा० पोता]–तिजोरी. ३. पागा [स्त्री०] [फा० पाय्–गाह्]–रिसाला; अश्वशाला. ४. थटी–थट्टी (स्त्री०) [प्रा० थट्टि = जनावर] – गोशाला. ५. शेरी (स्त्री०)– खासगी. ६. टंकशाला (स्त्री०) – नाणी पाडण्याचा कार्खाना; टाकसाळ. ७. सौदागिरी – सौदागरी (स्त्री० फा०) – व्यापार. ८. चौबिना, छबिना (पु०) [फा० शबीना] – रातपहारा. ९. जामदारखाना (पु० फा०) – वस्त्रागार व रत्नागार. १०. खेटक (न०) [सं० खेट, का० खेड] – ढाल.

याप्रमाणें माहाल व कारखाने, त्यांसि दरोगे[१] अधिकारी कारकून व हवालदार[२] वगैरे त्या त्या कामाचीं शाहाणीं माणसें उपयोगी पाहून बंदोबस्त करून दिल्हा.

४. इतर नेमणुका.

रघुनाथ बल्लाळ कोरडे सबनीस होते. त्यांजकडे इमारत, किल्ले, कोट वगैरे पाहून करावें व सामान किलियावरील भरती, चौकशी करावी [म्हणून] सांगितलें. रावजी सोमनाथ शाहाणे पाहून कारभारांत ठेविले, व राजापूर सुभा त्यांजकडे होताच. आबाजी सोनदेव [यांस] कल्याण प्रांत सुभा होता. त्या प्रांतीं किल्ले, कोट यांच्या इमारती त्यांजकडे सांगितल्या. राघोबल्लाळ अत्रे यांस स्वारांचा सुभा दिल्हा. राघो मित्र म्हराठे यांस हुजरे[३] लोकांचा हवाला दिल्हा. व खासबारदार,[४] इटेकरी,[५] पटेकरी,[६] ढालाईत,[७] जासूद,[८] काशीद[९] वगैरे जिलीबीचे चाकरीचे लोक यांस सबनीस एक, एक हवालदार, नाईक पाईक[१०] करून नेमून दिल्हे. गोमाजी नाईक पानसंबळ यांस कापडाचे जामदारखानियाचा हवाला दिल्हा. मातबर सरदार, शरीरसंबंधी निंबाळकर, घाटगे, शिर्के, मोहिते, माहाडीक, जाधव, पालकर, मानसिंग मोरे, रुपाजी भोसले, मकाजी आनंदराव वगैरे यांस पागा यांचे सुभे [व] सरदाऱ्या दिल्ह्या. कंक, मालुसरे, फर्जंद, पासलकर, नाईक व देशपांडे मावळचे प्रभू वगैरे मोठे मोठे [यांनीं] कामें केलीं, त्यांस मावळे लोकांच्या सरदाऱ्या व पागा निसबतीस योग्यतेनुरूप देऊन वाढविलें. पायलोक यांची सरनोबती येसजी कंक यास दिल्ही.

---

१. दरोगा–दारोगा (पु०) [फा० दारूघा]–देखरेख ठेवणारा, मुकादम. २. हवालदार–हवल्दार (पु०) [फा० हवालदार]–काही शिपायांचा नाईक. ३. हुजऱ्या (पु०)–जवळचा चाकर. 'हुजूर लोकांचा' की०. ४. खासबारदार (पु०) [फा. खास्बर्दार]–खाशाची शस्त्रे धरून बरोबर चालणारा. ५. इटेकरी (पु०) [सं० ऋष्टि, यष्टि + करी]–भालेकरी. ६. पटेकरी (पु०) [सं० पट + करी]–तरवार-बहाद्दर. 'दहा पट्टेकरी तर एक इटेकरी' अशी म्हण आहे. ७. ढालाईत (पु०)–सैन्याचे निशाण बाळगणारा. ८. जासूद (पु०) [अ० जासूस्]–निरोप्या. ९. काशीद–कासद (पु०) [अ० कासिद्]–पत्रदूत. १०. पाईक–पायक (पु०) [फा० पैक्]–हल्कारा.

५. रायगड 'बेलाग केला.'

रायगड जागा बहुत थोर, बांकी,[1] बेलाग, किल्ला फार चांगला, राजधानीस योग्य स्थळ जाणून किल्ल्याचें काम इमारत आबाजी सोनदेव यांस सांगून कडे तासविले, बंदिस्त केले आणि बेलाग केला. आणि आंत राजमंदिर, दौलत-बंक,[2] प्रगटसभा व मंत्रसभा व धर्मसभा व चित्रसभा व आदर्श [मंदिर] ऐशीं नांवें ठेवून त्याप्रमाणें जागे बहूत तरतुदीचे व माहाल राण्यांचे निराळे निराळे याप्रमाणें खासगत राहाण्याची जागा करविली. तशीच पागा घोडियांस राहाण्याची चिरेबंदी लादणीचीं[3] घरें, गजशाळा, पाकशाला, कोठी वगैरे अठरा कारखाने, बारा माहाल, यांचीं स्थळें करविलीं. बाजार दुरस्ता चिरेबंदी जोतीं[4] घालून करविला. मातबर सरकारकून, सरदार व कारकून लोक यांस घरें सरकारच्या इमारती करून ठेविले. ज्याची जशी योग्यता तशीं [घरें] करून दिलीं.

६. खासगीकडील नेमणुका.

मातुश्री जिजाबाईसाहेब यांचे खासगीचे लोक, सेवेचे व शिबिका व पुराणिक, नित्यदान वगैरे धर्म करणें [यास] खासगी खर्च पाहिजे तसा नेमून देऊन त्यांस दिवाण,[5] कारभारी करून दिले; व चार माहाल[6] यांस लोक व सेवेचे लोक व बायका व खासगी खर्च वगैरे यांची नेमणूक करून देऊन, त्याचप्रमाणें तनखा लावून देऊन दिवाण एक व दरखदार चिटणीस, फडणीस यांजकडील कारकून नेमून देऊन पुराणिक ब्राह्मण ऐसे निराळे निराळे बंदोबस्त करून, राजधर्माप्रमाणें खोजे[7] व सेवेच्या बायका चौकीच्या वगैरे करून देऊन, पुराणिक यांजपासून नित्य पुराण, स्त्रियांचे धर्म व पातिव्रत्य-धर्म व इतिहास श्रवण करावे ऐसें करविलें. कारभारांत बोलों नये. कदाचित उत्तम गोष्ट बोलणें तरि आग्रह न करितां महाराजांची मर्जी पाहून विनंती मात्र करावी. करणें न करणें पाहून महाराज करतील तसें मर्जीनें आज्ञेनें वागावें. याप्रमाणें धारा करून दिल्हा.

---

१. बांकी-बाकां (वि०) [सं० पाक-आपत्ती] बळकट, बेलाग. २. बंक (स्त्री० सं०)-चौकी (महाद्वार?) ३. लादणी (स्त्री०)-विटादगड. ४. जोते (न०) (सं० युक्त)-उंच ओटा. (वाहनांतील लोकांना विकत घेता यावे म्हणून). ५. दिवाण (पु०) [फा०-दीवान < अ० दैवान्]-व्यवस्थापक. ६. महाल (पु०)-अंतःपुरे ७. खोजा (पु०) [फा० खॉजा]-नपुसक सेवक.

७. कारभाराचे 'बंद बांधून दिल्हे.'

कारभारी यांणीं ज्याजकडे जो कारभार नेमला व ज्यांचे जे हुद्दे,[१] ते ते त्याचे त्याणीं करावे, व कोण्हाचें काम [दुसरे] कोणीं करूं नये व आग्रह कोणाचा कोणीं धरूं नये, द्वेष करूं नये. तत्रापि एखादे ठाईं [द्वेष] पडल्यास महाराजांनीं निखालसता करून द्यावी. आज्ञा करतील तसें चालावें. फारच [द्वेष] पडल्यास त्यांत त्यांत शरीरसंबंध करून देऊन मोडावें. लहान कामाचे हुद्देदार यांणीं थोर लोक यांची अमर्यादा,[२] महाराजांचे जवळ असणें व कृपा, याजमुळें करूं नये, व कारभार–विषय बोलों नये. आपलाली सेवा करून मर्यादेनें असावें. यांत अंतर पडल्यास शिक्षा करावी. तसेंच सरकारकून यांणीं जे समयीं ज्यांची[३] चाकरी व उपयोग तशी घालमेल[४] करावी. करणें असल्यास[३] दुसरें काम अथवा जसें सांगितलें तसें [लोकांनीं] निष्ठेनें चालावें. त्याप्रमाणें सर्वांनीं मान्य करून चालावें, ऐसें केलें. शरीरसंबंधी व लोक व पागे, सरदार, शिलेदार यांणीं आपलें बोलणें, काम असेल तें आपले नाईक जुमलेदार[५] यांजपाशीं बोलावें. त्यांणीं सरदारांसि बोलावें. त्यांणीं सरनोबतास सांगावें अथवा मुत्सदी यांजपासून बोलवावें. रूबरू[६] गवगवा काडीमात्र करूं नये. सरदार, सोयरे लोक, शिपाई यांणीं महाराजाशींच एखादा अर्ज करणें तरि कारकून यांजपासून करवावा. रूबरूच एखादी गोष्ट बोलणें, ती मर्यादेनें बोलावी. त्यांचें ऐकून उत्तर कारकुनापाशीं अगर अमुक कारभारी यांस सांगतों म्हणून गौरव करून, विडे वगैरे देऊन, निरोप द्यावा. कारभार विषयांत ज्यास जें सांगितलें असेल त्याखेरीज [दुसरे कोणीं] काडीमात्र बोलों नये. जवळ असणार, कृपेंतील, त्यांणीं सर्वकाळ जवळ असोन शिपाईगिरीच्या, घोडियांच्या वगैरे गोष्टी बोलाव्या. त्यांजवर कृपाही करून वस्त्रें, भूषणें द्यावीं, घोडीं द्यावीं. परंतु कारभार करणें तो सरकारकून यांणींच करावा. यांणीं आपलें बोलणें असेल तें कारभारी यांजपाशीं बोलोन बोलवावें. याप्रमाणें बंद बांधून दिल्हे.

---

१. हुद्दा (पु०) [अ० उह्दा]–काम. २. या शब्दानंतर 'अथवा' सा० सा० २ व को०. ३. 'ज्यांची चाकरी उपयोगी तसे घालमेल करूं नये' को०. 'ज्यांची चाकरी व उपयोग तसे घालमेल करून करणें आल्यास' सा० 'ज्याची चाकरी व उपयोग तशी घालमेल करून करणें असल्यास' की० सा० २. ४. घालमेल (स्त्री०) [घाल + सं० मिल्]–गोंधळ. ५. जुमलेदार (पु०) [अ० जुम्ला + दार्]–सव्वाशे घोडेस्वार, शेदीडशे पायदळ यावरील अधिकारी. ६. रूबरू – रोबरो [फा०] – समक्ष.

८. किल्ल्यांचा बंदोबस्त.

किल्ले, कोट ठाणीं घेतलीं त्यांचा बंदोबस्त सुभेदार एक व हवालदार व कारखानीस व सबनीस न सरनोबत व तट-सरनोबत व फडणीस कारखाननीस याचा[1] हस्तक हे दरखी अधिकारी[1] करून दिल्हे. त्यांत हवालदार[2] इतबारी[3] व घरंदाज, कुलीन, मर्द शाहाणे ऐसे पाहून म्हराठे ठेविले. सुभेदार व सबनीस, ब्राह्मण देशस्थ, कराडे, कोंकणस्थ, मध्यंदिन[4] ऐसे विश्वासू शाहाणे मर्द स्वामिसेवातत्पर पाहून योजिले. कारखानीस प्रभू लोक, बाळाजी आवजी प्रभू चिटनिवीस यांचे निसबतीस धंदा देऊन त्यांचे तर्फेचे नेमून दिल्हे. सरनोबत व तट–सरनोबत हे म्हराठे केले. हवालदार याणीं सदरेस कारभार करावा. परवानगी[5]–रसानगी[6] दरवाज्याची व किल्ल्याची त्याजकडे. किलियाचा तनखा, दाणा-गल्ला, दारूगोळा, सामान आणवणें हाही[7] कारभार त्याजकडेच. शिक्का त्याचे नांवें. किलियाचे मुख्यत्व त्याजकडे. सुभेदार याणीं सर्व कारभार करावा तो त्याचे विचारें, अनुमतें करावा. सबनिसाकडे हाजिरी लोकांची व चौकशी. कारखानिसानीं कोठीचा जिन्नस, जमा व खर्च व दारूगोळा, इमारत, रोजमरा[8] वाटणें हें लिहिणें करणें, त्याजकडे. याप्रमाणें करून दिल्हें. चालण्याचे कानू[9]–जाबते करून दिल्हे. त्याप्रमाणें एकाचें काम एकानें न करितां सर्वांनीं एक लक्षें करून चालावें, याजप्रमाणें केलें. किल्ल्याचें काम नाजूक जाणून फार सावध, इतबारी, चांगलीं माणसें तींच[10] योजून किल्ल्यास ठेविलीं. अश्वारूढ व सभासद[11] व गडकरी, मेटकरी, परवारी[12] रामोशी ऐसे करून दिल्हे. परवारी, रामोशी यांणीं तटाखालील चौक्या कराव्या. कदाचित एकांत एक विरूद्ध चालूं लागले, तरि हें वर्तमान कळतांच बदलून दुसरे ठेवावे. आणि रोखापत्र[13] याजवरि शिक्का करणें व सरकारपत्र येणें, हें सर्व

---

१. याऐवजी 'यांच्या हस्तकीं, देखरेखी अधिकारी' की०. २ हवालदार (पु०) [अ० हवाला + फा० दार]–रखवालदार. ३. इतबारी (वि) [फा० इअतिबारी] – विश्वासू. ४. म (मा)ध्यंदिन (पु०) – यजुर्वेदी वाजसनेयी शाखेचा. ५. परवानगी –पर्मानगी (स्त्री० फा०)–अनुज्ञा. ६. रसानगी (स्त्री० फा०)–मुखाने अगर चिठ्ठीने दिलेली अनुज्ञा. पर्वानगी–रसानगी = बंदोबस्त. ७. 'बाह्य' की०. ८. रोजमरा (पु० फा०)–दिवसाचे वेतन. ९. कानूजाबता–[अ० कानून् (स्त्री०) + अ० झाबिता पु०]–नियम. १०. 'रीतीचीं' की०. ११. सभासद (पु०)–फिर्यादी दाखल करणारा. १२. परवारी (पु०)–महार नोकर. १३. रोखापत्र (न०) [अ० रुक्आ + सं० पत्र]–आज्ञापत्र.

हवालदार यांचे नांवें. संध्याकाळीं दरवाजा लावून कुलूप लावावें, आपण येऊन तें मागतीं वोढून पाहून हवालदार याणीं आपले आंगेंकरून किल्ल्या घेऊन जावें. आपले जवळ उशासि ठेवाव्या. प्रातःकालीं येऊन, कुलूप काढून, दरवाजा उघडावा. रोज गस्त[१] सर्व दरखदारसुद्धां घालावी. जागां जागां पाहरे यांची चौकशी हवालदार याणीं करावी. त्याजवरि सरनोबतानीं गस्तीची व लोकांची रात्रीची चौकशी करावी. तटसरनोबत यांनीं किल्ला लाहान थोर, त्यांचे पाहरे यांस दोनचार पाहरे नाजूक जागा जागे असतील त्यांची चौकशी त्यांणीं करावी. किल्ला कोट पाहून माणसांची भरती नेमणूक [करावी.] त्यांस अडिसेरी[२] व नख्ती[३] वगैरे बेजमी[४] किल्ला पाहून, जकीरा[५] दाहा पांच वर्षांची बेजमी गल्ला, लाकूड-फांटें, जिन्नस-मात्र दारुगोळा व चुना वाटून तयार, ऐसे सुद्धां, अमकें किल्ल्यावर अमकें सामान, याप्रमाणें धारे बांधून दिल्हे. किल्ल्याचे तट जेथें सोपे होते [तेथें] ते तासून व सुरुंग लावून इमारती करून बेलाग करविले. कोणतेही किलियास इमारत नाही ऐसें नाहीं. हवालदार यांस दिवटी, भालदार, पालखी योग्यतेनुरूप किल्ला पाहून [दिल्हें.] वरकडांस दिवटी, चाकर, पोरगे वगैरे नेमून दिल्हे. हवालदार याणीं रात्रंदिवस सदरेस सावध, लोकसुद्धां, हत्यारबंद असावें. किलियाखालीं नाकियास, वाटेचे जागां मेट, तेथेंही लोक, चौक्या ठेवाव्या.

दाहा माणसांचा दाहिजा, त्यांत एक नाईक नऊ पाईक; त्यांत बंदुखी व आडहत्यारी[६], सांग[७] [वाले,] बरची [वाले,] इटेकरी, पटेकरी पाहून ठेविले. लोक ठेवणें [ते] खासा महाराजांनीं आपण नाईक पाईक करणें [तें करावें.] जसे माणूस मर्द चांगले इतबारी त्याची परीक्षा, हाजिरी करून ठेवावें. आणि [नंतर] कामें योजून दिल्हीं. याप्रमाणें किल्लो किल्ल्यांचे बंदोबस्त निराळे निराळे करून देऊन, ते किल्ले सुभेदार, मामलेदार, तालुकदार यांचे निसबतीस लावून त्यांणीं किलियावरि सामान यत्किंचित नवें जुनें करवणें, खर्च लोकांस वगैरे जाला तो पाहून [देणें,] नवी भरती करून देऊन, याप्रमाणें त्यांणीं करणें तें

---

१. गस्त (स्त्री०) [फा० गश्त]-फिरती. २. अडिसेरी (स्त्री०)-अर्धीच शेर. ३. नख्ती-नगदी (स्त्री०) [अ० नक्द]-रोकड. ४. बेजमी-बेगमी (स्त्री० फा०) -पुरवठा. ५. जकी (कि)रा (पु०) [अ० झखीरा]-कोठार. ६. आडहत्यारी (पु०) [स० अर्ध + हत्यार]-किरकोळ शस्त्रधारी. ७. सांग (स्त्री० हिं०)- भाला.

सरकारकून[1] तालुकेयांस नेमून दिल्हे, त्यांस विचारून करून द्यावें. लोक व दरखदार यांची तगिरी व बाहाली, गयाळ[2], मयत, नाकारे[3] कामगार [यांस दूर करणें] हें हुजुरसनदेनें व्हावें. त्याचा इतला[4] कोण्हाकडे नाहीं. तालुकदार यांणीं करणें तें महाराजांच्या आज्ञेप्रमाणें करावें. ऐसे रितीनें सर्व कामें विभाग-परत्वें लावून देऊन आज्ञेखेरीज पाय[5] पालटूं नये आणि जेथील तेथें आयास न होतां घडत असावें असें करून दिल्हें. किल्ले कोट हे आपले राज्याचा जीवप्राण. प्रांत घेतले त्यांचे संरक्षण किल्ले होत. मोठीं मोठीं संकटें पडलीं असतां किल्ले, कोट, जंजिरे सावध, तरि मोठेही शत्रूंचा हिसाब धरावयाचा नाहीं. म्हणोन किलियांचा बंदोबस्त फार बारीकपणें चौकशीनें करविला.

९. प्रांताचा बंदोबस्त.

आतां मुलखाचा व प्रांताचा बंदोबस्त केला जे, प्रांताचे प्रांतास सुभा. त्यास मजमदार, चिटणीस, फडणीस दफ्तरदार, हुजूरचे दरखदार यांचे निसबतीचे, याप्रमाणें असावे. गावगन्ना[6] कमावीसदार[7] त्यांणीं सर्वांनीं [वसूल] तालुकदार यांचे अनुमतें करून, हिशेब त्याजपाशीं आणून, त्यांचे अनुमतें दफ्तरांत दफ्तरदार यांजपाशीं गुजरावे[8] ऐसें करविलें.

१०. पागांचा बंदोबस्त.

पागा यांचा बंदोबस्त केला जे, मोगलमवाशी[9] लोक लुटले त्यांचीं घोडीं, तशींच खरीदी करून [आणलेलीं] व शिंगरें–पागा, मादवान[10]–पागा वगैरे जागा चांगली पाहून ठेवून, उत्पन्न करून तयार करून [ठेविलीं.] व दर्यांतील वगैरे अरबी, कच्छी, ताजी, माणकी[11] ऐसे मोटमोठे अवलादीचे[12] घोडे, घोड्या

१. 'सरकारांतून' सा० ब० की०. २. गयाळ वि० [सं० गत] – बिनवारस. ३. नाकार (पु० फा०) – निरुपयोगी. ४. इतला–इतल्ला (पु० स्त्री०) [अ० इतिलाअ]—वार्ता. ५. पाय पालटणे — अदलाबदल किंवा फेरफार होणे. ६. गावगन्ना (क्रि० वि०)– दरगावास. ७. कमावीसदार (पु०) – वसुली अधिकारी; अमीन. ८. गुज(द)रणे [फा. गुझर्. आज्ञार्थीरूप गुझश्तन्‌चे]–प्रविष्ट करणे. ९. मवासी (पु०) [अ० मुआसी]–लुटारू. १०. मादवान (स्त्री०) [फा० मादियान्] घोडी. ११. माणकी– माण (जि. सातारा) येथील? १२. अवलाद–औलाद (स्त्री०) [अ० अव्लाद्. अनेकवचन व्लद् (पुत्र) चे]–कुळी.

आणून पागा जमविल्या. बारगीर[1] घोडियास, तो मर्द, घोडें निगेनें[2] जपून राखणार व करोल[3]–निशाण लावणार व आडहत्यारी, ऐसे रूबरू परीक्षा घेऊन पाहून त्यांस एक पोरगा याप्रमाणें दिल्हें. शिलेदार ठेवणें ते निराळे ठेविले नाहींत. पागेंतच घोड्यांची किंमत करून, तो पैका देऊन, पागेंतच लावावे. पागा म्हणजे खासगी जाली. शिलेदारीनें ठेविल्या त्यास आपला बोढा लागून घोडें ताजे राखणार नाहीं व सत्तेंतही वागणार नाहीं. चाकरी नकोशी वाटल्यावरि निघोन जाईल, म्हणून [शिलेदार] पागाच करून ठेविले. पंचवीस घोडियांस एक हवालदार [नेमिला.] दाणा, वैरण, जिन्नस, सामान सर्व पाहून जतन त्याणीं निगासुद्धां[4] चौकशी करावी. चाकरी माणूस व बारगीर सांगणें त्याजकडे. तो मर्द, शाहाणा, इतबारी[5] ऐसा पाहून ठेविला. पंचवीस घोडियांस पखाली[6] एक व नालबंद[7] एक. याजप्रमाणें पांच हवाले म्हणजे सवाशें घोडे, यांस जुमला असें नांव. त्यास एक जुमलेदार व कारकून एक. ऐसे पांच जुमले त्यांस एक सुभेदार म्हणावें. तो सुभेदार करणें तो नामांकित, मर्द; त्यास पालखी व मजमदार एक; त्याणीं सर्व कारभार करावा. असे सुभेदार दाहा म्हणजे एक हजारी. त्यास सरदार मराठे मर्द, इतबारी पाहून, सरदारी देऊन, त्याचे स्वाधीन तितके केले. त्यास मजमदार, दिवाण व जमेनीस[8] एक याप्रमाणें देऊन त्यास पालखी व हत्ती उंट, याप्रमाणें करून दिल्हे. याप्रमाणें त्यास पंचहजारी म्हणून थोर [नांव.] याचे स्वाधीन पांच हजार. तो फार मातबर सरदार; त्यास लवाजिमा, नौबत, निशाण, हत्ती वगैरे करून देऊन पद्धती केल्या. त्यांणीं सर्वांनीं सरनोबत यांचे आज्ञेंत राहून स्वारीशिकारी चाकरी करावी, असें केलें. कांहीं शिलेदार मानकरी यांचे ठेविले. त्यांणींही सरनोबताचे आज्ञेंत वागावें. घोडियाचे वोळखणीस चौकावरि,[9] फऱ्यावरि,[10] शिक्का केला तो करावा, ऐसें केलें. सरनोबत याणीं स्वारीशिकारी करावी. त्याजपाशीं सर्व दरखदार, दिवाण, मजमदार,

---

१. बारगीर (पु०) [फा० बार्गीर् < फा० बारा = घोडा] धन्याचा घोडा बाळगणारा. २. निगा (घा) (स्त्री०) [फा० निगाह्]–काळजी. ३. करोल (पु०) [तु० करावुल] –बन्दुकस्वार. ४. 'नगांसुद्धां' की०. ५. 'बारगीर' की०. ६. पखाली (पु०) [सं० पयस् + खल्ल] – चामड्याची पाण्याची पिशवी वाहणारा. ७. नालबंद (पु०) [अ० नअलबंद्] – नाल ठोकणारा. ८. जमेनीस (पु०) [फा० जम्अ + नवीस्– हिशेबतपासनीस ९. चौक (पु०)–पाठीच्या कण्याचे शेवट. १०. फरा (पु०) [सं० फलक]–मांडीचे किंवा खांद्याचे हाड]

चिटणीस, फडणीस, जमेनीस, वाकेनीस असे करून दिल्हे. हत्ती, अंबारी, जरीपटका,[1] हत्तीवरील नोबत ऐसें दिल्हें. वाकेनिसानीं त्याचा वाका दिनचर्या लेहून नित्य पाठवीत असावें. वरकड दरखदारांनीं आपलाले दरख करावे.

११. बातमीचे खाते.

बातमीस हल्कारे ठेविले. त्यांची नाइकी बहिरजी नाईक यांस दिल्ही. त्यांजवरि महाराजांचा इतबार. बातमीचे[2] झाडून काम बहूतच तरतुदीनें राखून मुलखांतील, स्वराज्य व परराज्य व सरकारकून, सरनोबत, सर्व सरदार, सुभे, मामले व शहरें यांजकडील, किल्ले वकील गेले त्यांजपाशीं हलकारे यांजकडील बातमी सर्व त्या नाइकापाशीं आखबार[3] लाखोटेपत्रें व जबानी यावी. त्याणीं सर्व बातमी येईल ती [महाराजांस] कळवावी. पत्रें येतील तीं चिटणिसापाशीं द्यावी. त्याणीं त्यांचे सारांश लेहून, यादी करून, नित्यचे नित्य दिनचर्या येतील तैसे समजावीत असावे.[2]

१२. घोड्यांची नालबंदी.

घोडियांस नालबंदी महिनापंधरा दिवशीं जसें काम लागेल तसें करणें. त्यास [ज्यांस] नवे नाल लागतील त्यांचे नाल फोडणें व जुनें लोखंड निघेल तें व नवें नालांस अमकें लागलें, एकंदर नवे नाल अमके लागले, त्यांचें लोखंड अमके खंडी जालें, ऐसें सालास पागे यांणीं सरकारजमेस धरून समजावावे. याप्रमाणें बारीक चौकशीनें धारे केले.

१३. स्वारीची रीत.

सरनोबत यांणीं पागा घेऊन स्वारीस जावें, मुलूख मारावा, त्याची लूट काडीमात्र [बाहेर] जाऊं न देतां आणून रुजू करावी. येविशीचा बंदोबस्त:— प्रथम स्वारी निघालेवरि एक मजल जावें. तेथें ज्या [चें] जें असेल तें सर्व जमेनीस याणीं लेहून ठेवावें. आठमाही स्वारी करावी. पावसाचे दिवस आले

१. जरीपटका (पु०)–मुख्य निशाण. २. याऐवजी 'अशी बातमी सर्व मुलुखांतील स्वराज्य परराज्यांतील ठेविली. नाईक यानें पत्रें पाठवीत असावीं तीं चिटणिसानें नित्यच्या नित्य दाखवित असावीं' की०. ३. आखबार (स्त्री०) [अ० अख़्बार्–अनेकवचन खबरचे]–बातमीपत्र.

म्हणजे नदीनाले भरले नाहींत तों आपले तालुकियांत यावें. तेव्हां[1] जवळ आलियावरि लूट सरकारजमेस आली ती आलीच. बाकी मोजदाद करून, स्वारी जातां लेहून ठेविलें त्याप्रमाणें ज्यांचें त्यांस देऊन, बाकी सरकारजमेस करावें. त्यांत ज्यास जें पाहिजे तें त्याचे तैनातींत धरून, किंमत करून द्यावें.[1] छावणीस जागां जागां प्रांतांत नेमणूक असेल तशा पागा पाठवाव्या. लष्करात बटीक,[2] बायको, कळवांतीण,[3] कलाल[4] नेऊं नये. कारण माणूस बेखबरदार राहातें. असावध असलिया दगा पावेल. व्यसनी माणूस असलिया चाकरी होणार नाहीं. चुकावील. धावणी[5] धुपणी होणार नाहीं. सरकारकामास अंतर पडेल. म्हणून ताकीद केली. नेईल त्यास शिक्षा करावी. म्हणून ताकीद करून करविलें. आणि लुटींत बायको पोर धरूं नये. ब्राह्मणांचे वस्तीस व देवास उपद्रव न लावावा. गाई धरूं नये, धरल्यास गाईवासराची तडातोड[6] होईल, यास्तव हें करूं नये. खंडणीत [ब्राह्मण] बोल[7] घेऊं नये, यवन घेत जावा. ही ताकीद करविली. आज्ञेस अंतर पडल्यास शिक्षा, क्षमा न धरितां, यथायोग्य अन्याय पाहून करावी. चाकरीवरून दूर करावा. याप्रमाणें भय. माणूसमात्र काडीची तफ़ावत[8] न करितां, महाराज आपणांस पाहिजे तसें देणार, मग अंतर कां करावें ? म्हणून लाहानापासून थोर निष्ठेनें, इमानानें, आज्ञावचन [पाळून] केवळ ईश्वर आपला, त्याची अवज्ञा न करितां चालते जाले. स्वारी येतां झाड्न [न] तैनाता हिशेब करून वाराव्या. याप्रमाणें करविलें.

१४. स्वारीच्या जमाती.

महाराजांनीं मावळे लोक वगैरे हशमी जमविले. त्यांत पांच हजार माणूस निवड धावणार असें स्वारीबरोबर [ठेविले.] करोल, सांग, बरची, पटेकरी यांच्या जमाती केल्या. तीस, चाळीस, साठ, शंभर ऐसे लोक, त्यांस कारकून, असे जथे केले. त्यांणीं स्वारीबराबर चालावें. पुढें, मागें, बाजूनें चालण्याची

---

१. याबद्दल ‘लूट सरकारी शिवाय ज्याची त्यास द्यावी.’ की०. २. बटीक–बटकी (स्त्री०)–मूळची गरती, पण नंतर व्यभिचारी झालेली स्त्री. ३. कळवांतीण–कळवंतीण (स्त्री०) [सं. कला + वत्]–नर्तकी. ४. कलाल (पु०) [अ० कलवार. सं० कल्यापाल] – दारूविक्या. ५. धावणी धुपणी (स्त्री०) – श्रम. ६. तडातोड–ताडातोड (स्त्री०) [ध्वन्यर्थक ताड्]–वियोग. ७. बोल (स्त्री०)–तारण. ८. तफावत (स्त्री०) [अ० तफ़ावुत्]–अंतर, फरक.

नेमणूक त्याप्रमाणें चालावें. त्यांस पोशाख चांगले. मंदील बांधावयास, सखलादा, व ताडपत्री[1] व पैठणी पासोड्या याप्रमाणें हजार दोन हजार माणूस कोण्हास सोन्याचीं व कोण्हास रुप्याचीं[2] कडीं, मोहनमाळा व कंठ्या, व हत्यारांस सोन्यारुप्याचे कट,[3] तैनालें[4] करून दिल्हीं.

१५. पागांची तैनात.

स्वारीस पागा जाणार, त्याखेरीज हुजूरपागा जवळ नेहमीं पांच हजार घोडीं, तीं बहूत चांगलीं, जीनसामान रुपेसोन्याचें व त्यांजवरि बारगीर मोठेमोठे लोक, करवल हत्याबंद, पालखी–नशीन[5] ऐसे ठेविले. खासे घोड्यांवर सोनें, रुपें, जडावाचें जीन व सरोसरा[6] ऐसीं दोनशें घोडीं. याप्रमाणें पांच हजार पागा बराबर जवळ नेहमीं राहावी अैसी करून ठेविली. सर्वांस तैनात केली. ती समयाचे समयास पावावी. शिवाय लग्न, मुहूर्त हरएक प्रयोजन त्याची नेमणूक ब्राह्मणांस अमके रितीनें, वरकडांस ज्याचे त्याचे योग्यतेनें देणें तें देवावें. कोण्ही कर्ज करूं नये. उफानखोरी[7] करूं नये. माणूस योग्य पाहून ज्याची जशी प्रतिष्ठा तशींच वस्त्रें भूषणें देऊन त्याहून अधीक त्याणीं करूं नये. ज्याची तैनात करणें त्याचें कुटुंब व खर्च, योग्यता पाहून त्या अजमासें चौकशी करावी. देणें थोडे खर्च फार तरि कर्ज करील, खर्च थोडा देणें फार तरि बेज्याहा[8] वर्तणूक करून दिवाळखोर होईल. दिवाळखोर असलिया तो अधीक व्यसनी होईल. जाणोन योग्यायोग्य पाहोन [तैनात] करून द्यावी. मर्यादेहोन अधीक कोणी केलें व कर्ज [केलें] तरि त्यास दूर तत्काल करावें.

१६. छावणीच्या जागा.

पागा राहाण्यास छावणीच्या जागा, तेथें पागा गेलियावरि सुभेदार यांणीं

---

१. 'ताडपत्री व पैठणी पासोडे ओढण्यास.' की० २. 'रुप्याची मोहनमाला' की०. ३. कट (पु०)–बन्दुकीच्या दस्त्याच्या नळीचे वेढे. ४. तैनाल-तहनाल (न०. [फा० तह्नाल्] – शस्त्राच्या म्यानाचे टोपण. ५. पालखी—नशीन (वि० फा०) –पालखीचा मान असलेला सर्दार. ६. सरोसरा (पु०) [फा० सरासरी] – घोड्या) शिरोभूषण. 'सरोसरः प्रोथ (नाक) चर्म'. रा. व्य. कोश. ७. उफानखोरी(न. पुचे [फा० उफान सं० उत्+पवन] – उधळपट्टी. ८. बेज्याहा – वेजा – बेजहा. [फ.) बीजा] – अयोग्य. 'बेनाहक' की० .

दाणा, चरीदा,[१] माणसें राहाणें हजरी गैरहजरी पाहून चौकशीनें बेजमी करून चालवावें. हिशेब होऊन, देणें फाजील हुजूर परवानगीनें द्यावें. कामकाजें केलीं त्यांचीं चौकशीनें बक्षिसें द्यावीं. वाढवावीं. निकामी, योजिलें स्थळीं कामाचें नाहीं, तरि दुसरा [माणूस] अधिकारी यांणीं समजावून ठेवावा. याप्रमाणें छावणीचे दिवसांत करून, मागती स्वारीशिकारीस आज्ञेप्रमाणें मनसब्यानुरूप तयार असावें, जावें. फौज घरीं राहिली, निःकारण तैनात वाढली, निःप्रयोजन [तैनात] खातां स्वामिकार्य राहातें, दहशत [राहात] नाहीं, राज्यसाधणें घडत नाहीं. कृतकृत्य मानून, शत्रूंशीं सख्य करून राहिल्यास तें [राज्य] वृद्धीस जात नाहीं, व शत्रू आहेत [ते] हेंही हरण करितात, [तेणें करून] सुख पडत नाहीं. यास्तव प्रतिवर्षी स्वारी करावी ऐसें करविते जाले. लूट येईल ती जमा धरून, कापड व दागिने नीट करावे, धोवावे. त्यांस किंमती घालून जे जिन्नस असतील ते ज्यास जसे पाहिजेत [तसे] त्याचे वेतनांत द्यावे. वेतन समयास न पावलें तरि त्याचें कुटुंब उपवाशीं मरेल. त्यांचा द्रोह श्रेयस्कर नव्हे. तसेंच माणूसही दिलगीर असलेयास नाशास कारण. फितवा-फांदडा[२] करून अपाय करील. म्हणून महाराज सावधपणें [वेतन समयास पावेसें] करविते जाले.

१७. पायदळाची व्यवस्था.

हषम मावळे लोक, त्यांत दाहिजा एक, त्यांस एक नाईक. पांच नाइकांस हवालदार एक. पांच हवालेयांस एक जुमला. पांच जुमल्यांस सरदार एक. त्यांस तैनाती यथायोग्य कुटुंब तशा द्याव्या. चांगलें माणूस गुणी दुसरीकडे जाईल म्हणून योग्य तसें केलें. लग्न-मुहूर्त-प्रयोजन यास नेमणूक करून द्यावी.[३] त्यास खर्च त्याणीं अधीक करूं नये. उफानखोराचें पारिपत्य करावें. बदराहा[४] चालेल. त्याची क्षमा किमपि, कोण्हीं न करावी. यथायोग्य पाहून शिक्षा करावी. तोही स्वल्प अन्याय [असेल तर] उग्र दंड न करावा; बहुत अन्याय [असेल] त्यास स्वल्प दंड असें न होतां पाहून करावें, ऐसें केलें. शेतकरी चाकर लोक यांचा धारा रयतेप्रमाणें करून त्यांचे तैनातींत द्यावा. वरकड पावणें नख्त, गल्ला,

१. चरीदा – चरिंदा (पु०) [फा. चरन्द्] वैरण; चराई. २. फितवा (फितूर)– फांदडा (फांदा) (पु० [अ० फुतूर]–स्वामिद्रोह. ३. 'असेल तसें द्यावें' की० व सा० २: ४. बदराहा (ह) (स्त्री० फा०)–गैरचाल.

कापड, जिन्नस देऊन, बाकी [राहिल्यास] वरात[1] देऊन झाडा सालाचे सालास हजरी गैरहजरी पाहून करावा. बाकी ठेवूं नये. कोणास मोकासा[2] देऊं नये. वरात देऊन पावावें. मोकासा दिल्यास त्यांचीच सत्ता गांवांत होऊन रयतेस उपद्रव देतील, यास्तव [मोकासे] न दिल्हे. बेकैदी करितील, जमेदार [व] ते एक होऊन रयत नागवितील, यास्तव मोकासे न दिल्हे. राजा शासन न करी तरि प्रजा भीत नाहीं. प्रजा कशी? तरि जसे मस्त हत्तीस भयभीत होतात; तो गज मदरहित जाल्यास त्याची हेलना करितात; अथवा सर्प विषरहित त्यास भीत नाहींत, हें जाणून यथान्याय शिक्षा प्रजेस करून चाल करून दिल्ही.

१८. जमीदार-वतनदारांचे धारे.

सुभे तालुके दिल्हे [त्यांस] जसे शत्रू जवळ लगतीं,[3] त्याप्रमाणें प्रतिकारार्थ हषम फौज त्यांचे जिमेस नेमोन देणें ते देऊन ठेविली. प्रांताची लावणी, गांवगन्ना मोजणी करून धुरुंग[4], चावर,[5] रुके[6], पैके,[7] दोऱ्या,[8] खंड्या[9] व खडक्या[10] आदिकरून ज्या देशीं जशीं नांवें, जशी चाल, त्याप्रमाणें काठी[11] घालून बिघे करून त्यांस इस्ताव्यानें[12] कौल देऊन व मालाचा आजमास करून आकार करून वसूल घ्यावा. ऐसें करून ज्याजती जलाल रयतेस लागूं न द्यावा याप्रमाणें ताकीद केली. वतनदार कदीम[13] पाहून अभय देऊन आणावे. त्यांच्या मनसुब्या बरहक[14] करून त्यांचे हातें काम घेऊन लावणी करावी. ऐसें करून जमीदार, वतनदार आदिकरून त्यांस हकरुसूम[15] यांचे धारे नेमणूक करून दिल्ही. रयतेस बेजाबता[16] कोण्ही एकाचा उपद्रव न लागावा,

---

१. वरात (स्त्री०) [अ० बरात्]–हुण्डी; चेक. २. मोकासा (पु०) [अ० मुकासा]–गावाच्या उत्पन्नातील भाग. ३. 'वागतात' की० ४. धुरुंग (पु०)–गावाची मर्यादा? एक चौरस माप. ५. चावर–चाहूर (पु० न०) [सं० चतुर]–एकशेवीस बिघे. ६. रुका–रुक्का (पु०) [अ० रुक्आ] अडीच, पाच किंवा आठ बिघे. ७. पैका (पु०)–पैसा, रुक्याचा चवथा भाग. ८. दोरी (स्त्री०)–ऐशी किंवा एकशेवीस बिघे. ९. खंडी (स्त्री०) [द्रा० कंडी]–एकशेवीस बिघे. १०. खडक्या (पु०)–निजामशाही पैका. ११. काठी (स्त्री०) [सं० काष्ठ]–पाच हात, पाच मुठी लांब (काठी). १२. इस्तवा (पु०) [अ० इस्तिवा)–जमिनीचा वाढता सारा. १३. कदीम [पु० अ०]–जुना. १४. बरहक [फा०]–न्यायाने. १५. हकरुसूम (पु० अ०)–अधिकार. १६. बेजाबता (पु०) [फा० बी+अ० झाबिता]–अन्याय.

हलकूद[1] चालावें. सरकार–चाकरी याप्रमाणें करावी, ऐसें केलें. पूर्वीही धारे दादाजी कोंडदेव व मोरोपंत व अण्णाजी दत्तो वगैरे यांणीं केले ते चालवे.

१९. देवस्थानांची व्यवस्था.

प्रांत, देश हस्तगत जाले तेथें थोर थोर देवस्थानें होतीं, त्यांस प्राचीन धर्मादाय चालत आले [ते] यथास्थित चालविले, व नवीन देवस्थानें पाहून त्यांच्या पूजा-अर्चा, नैवेद्य, उत्साह,[2] अभिषेक, नंदादीप करून दिल्हे, व त्यांस पारपत्यागार[3] नेमून देऊन त्यांची स्वस्थता केल्याप्रमाणें चालावेसें केलें. ग्रामदेव यांस नैवेद्य नंदादीप चालते केले. तसेंच थोर–लाहान क्षेत्रें येथें ब्राह्मणांची कुटुंबें पाहून त्यांस वर्षासनें, नेमणुका त्याच गांवीं करून दिल्ह्या, व थोर थोर सत्पुरुष यांसही गांव, भूमी, उत्साह चाले ऐसें करून दिल्हें.

२०. विद्येस उत्तेजन.

वेदशास्त्र अगदीं उच्छिन्न जालें [होतें,] त्यास एक ग्रंथ अधीत जाला त्यास मणभर धान्य; दोन ग्रंथ [अधीत जाले] त्यास दोन मण; पंचग्रंथी,[4] दशग्रंथी[5] यांस पांच मण दाहा मण, परीक्षा करून [द्यावें] तसेंच पंडित जसा जो विद्वान त्यास योग्यता पाहून, स्वदेशींचे त्यांस भात व द्रव्य, विदेशी यांसि द्रव्य याचीं वर्षासनें, श्रावणमासीं सर्वांस पंडितराव यांणीं परीक्षा करून [देत जावीं.] अधीक विद्या होईल त्यास अधीक मोईन[6] वाढवावी. मोठे मोठे पंडित, वैदिक, प्रतिष्ठित येतील त्यांच्या सभा करून, सत्कार करून त्यांस शंभर पन्नास अधीक [ही रुपये] योग्यतेनुरूप द्यावे, ऐसें करून दिल्हे. याजमुळें दिवसेंदिवस अधीक विद्या वृद्धीस पावती जाली. अग्निहोत्र घेणार, त्यांस तितकें द्रव्य देऊन घेवावें. त्याची मोईन अधीक करावी. तसेंच यज्ञ करणार, त्यांस द्रव्य लागेल तसें

---

१. हलकूद–हालखुद्द–आहे त्या स्थितीत. 'यथावश्यं तु हाल्खुदम्' रा० व्य० को०. २. उत्साह (पु०) [सं० उत्+सह्]–उत्सव. ३. पारपत्यगार (पु०) [सं० परि+पत्–परिपति+फा० गार]–प्रशासक. ४. पंचग्रंथी (पु०)–संहिता, ब्राह्मण, आरण्यक, पदे, व क्रम (यजुर्वेद) यांचा अभ्यासी. ५. दशग्रंथी (पु०)–संहिता, ब्राह्मण, आरण्यक, शिक्षा, कल्प, व्याकरण, निघंटु, निरुक्त, छंद व ज्योतिष (वेद व उपांगे) यांचा अभ्यासी. ६. मोईन (स्त्री०) [अ० मुअय्यन्]–नेमणूक.

मोईन बांधून देऊन यज्ञ करवावे. याप्रमाणें देवब्राह्मणांची स्थापना करून नित्यदानें व नैमित्य प्राप्त जालें असतां कसें करावें [त्याप्रमाणें केलें.] तसेंच जागां जागां अन्नछत्रें व नित्यब्राह्मणभोजन, इच्छाभोजन ब्राह्मणांस, यांचा निबंध बांधून दिल्हा. ब्राह्मण आपले राज्यांतील दुसरे राज्यांत यांचा करावयास न जावे ऐसें केलें.

२१. चोरांस शासन.

आपले राज्यामध्यें चोरभय अगदीं नसावें ऐसें मनांत आणून जागांजागां बेरड, चोर, आडेकरी[१] होते त्यांस धरून आणून कित्येकांचे शिरच्छेद केले. आणि ज्या ज्या देशांतील होते त्या त्या प्रांतांतील किल्ले, ठाणीं, कोट येथें असाम्या[२] नेमून देऊन त्यांस शेतें वगैरे [देऊन] गडकरी यांत[३] घेरियाचे[४] चौकीस नेमून, त्यांची जीविका चालेसें करून, यांतून चोरी कोणी केली असतां शिरच्छेद करावा, ऐसें [केलें.] प्रतिगांवास रखवाली एक बेरड त्या किल्ल्याचा त्या प्रांतांत असावा. चोरी जालिया त्यानें भरून द्यावी [नाहीं तर] पत्ता लावून द्यावा, ऐसें केलें. याजमुळें राष्ट्रांत कोठेंही चोरभय नाहीं ऐसें जालें.

२२. तोफखान्याचा बंदोबस्त.

तोफखाना याचा बंदोबस्त—लहान मोठ्या तोफा यांस गाडे करऊन, त्यांस दुसरे छकडे दारूगोळ्याचे, व दारू बहुत चांगली तयार असावी. माळेस बैल ज्या तोफेस जसे पाहिजेत तसे दोहेरी सामान, सुतार, लोहार, चांभार, रसीदार, तबलदार[५] गोलंदाज, असें पाहिजे सामान तसें करून, तोफखान्याला हत्ती तोफा ढकलणार, गारद पायदळ, एक एक तोफेस अमकें असावें असें करून त्याचा अधिकारी कारकून, हवालदार, मर्द, शाहाणे तरतूद करणार, त्यांणीं दारूगोळा, बाण[६] कैच्या[७] तयार करणें, तरतुदीनें, जवामर्दीनें, तोफा लावणें, काढणें, कवायती करणें, ऐसें करावें. ऐशा दोनशें तोफा तयार चालू नेहमी गाड्यावर राहाव्यासें केलें.

---

१. आडेकरी वि० [आड+सं०कृ—कर] —वाटमाऱ्या. २. 'असावेसें' की०. ३. यास? ४. घेरिया (पु०) [सं० ग्रह]—भोवतालचा प्रदेश ५. तबलदार (पु०) फा० तबर्दार] — लाकूडतोड्या. ६. बाण (पु०)—दारू भरलेली लोखंडी नळी. ७. कैची० (स्त्री० तु०) —चोवीस बाणांची जुडी.

२३. हत्ती—पीलखाना.

हत्ती पीलखाना—तीनशें साडेतीनशें हत्ती, त्यांत सरदार व पागा यांचे निसबतीस नेमणूक तसे देऊन, बाकी खासगीकडील जिलिबीचे व स्वारीचे निशाणनोबतीचे नामी, मर्द पाहून [नेमिले. ते] कोतवाल अंबाऱ्या, हौदे असे शंभर हत्ती तयार असावे. त्यांचीं सामानें व चारणीच्या[1] जागा व रतीब वगैरे नेमणुका करून दिल्ह्या.

२४. उंट—सुतारनाला.

तसेच उंट हजार दीड हजार. यांत लदाऊ[2] निसबतीस पागा वगैरे व सांडणीस्वार[3] व सुतारनाला वगैरे ऐसें करविलें.

२५. गोशाळा—थटी.

थटी—गाई, म्हशी बहूत. दोन चार हजार गाई, त्यांचीं खिलारें केलीं. तीं मानदेश, भिंवरथडी[4] वगैरे गवताचीं रानें पाहून जागां जागां ठेविलीं. त्यांची शुश्रूषा गौळी चाकर ठेवून बहूत रितीनें व्हावी ऐसें करविलें. तसेंच महिषी पांच हजार, खिलारें करून त्यांस गौळी व धनगर यांचे स्वाधीन [केलें.] त्यांणीं देशांत व कोंकणांत सड्यांवरून[5] जागां जागां राहावें. त्यांचे घारे व मोजदादी करून लोणी वगैरे उत्पन्न यावें. एकादे समयीं जिकडे जसें खर्चास दूध वगैरे ब्राह्मणभोजनास पाहिजे तरि [तसें] हजारों शेर एकदांच यावें; तसेंच लोणी तूप यावें; ऐसें करविलें, तसेंच मेंढरे यांचे धनगर करून खिलारें पंचवीस हजार करविलीं. त्यांची मोजदाद वर्षांतून दोन वेळ ठेवावी. उत्पन्न खर्च पाहून खर्चास [देवविले.] दसऱ्याचे खर्चाची वगैरे येण्याच्या मोइनी केल्या.

२६. दिनचर्येचे नेम.

याप्रमाणें सर्व दौलतीचा बंदोबस्त बहूत तरतुदीनें करून आपण नित्य दिनचर्या

---

१. चारणी (स्त्री०)—चरण्याची क्रिया. २. लदाऊ (वि० हिं०)–ओझे लादण्याचे. 'लढाऊ' की० हा पाठ बरा दिसतो. ३. सांडणीस्वार (पु०) [दे० प्रा०सण्ढी] –उंटिणीवर बसणारा टपालाचा जासूद. ४. भिंवरथडी (वि०)–भिवर (भीमा)+ थडी (तट)–भीमथडी. भीमानदीच्या तीरावरील ५. सडा (पु०)—डोंगरपठार.

करण्याचे नेम केले कीं, उषःकालीं उठावें. ते समयीं गायक यांणीं श्रीभगवंताचे स्तुतिपाठ [करावे.] वीणा, मृदंग [इत्यादि] मंगलवाद्यें, नगरखाना यांचें श्रवण करून उठावें. कांहीं प्रातःस्मरण करून सर्वकर्ता भगवान हे[1] संकल्प करून शौच विधियुक्त करावा. नंतर गो-सेवनदर्शन, मंगलालंभन[2] करून स्नान गंगादिमहानदी-उदकें करावें. जपध्यान, देवतार्चन करावें, ते समयीं सर्व शिष्ट ब्राह्मण सभापंडित यांणीं धर्मचर्या करावी. पुराणश्रवण करून, चार घटका दिवसास तिलक वस्त्रें अलंकार भूषणें घेऊन[3] तिरंदाजी व निशाण एक घटका करून सभेस यावें. तेथें सर्व कार्यकर्ते कारभारी वगैरे यांणीं आपलालीं कार्यें विचारून करावीं. जे जे दर्शनास येतील त्यांजकडे कृपायुक्त अवलोकन करून त्यांचे मुजरे घ्यावे; कोणाकडे अवलोकन करून किंचित हास्य करावें; कोणाशीं कांहीं भाषण करावें; कोणास कार्यें सांगावीं. ऐशीं सर्वत्रांचीं अंतःकरणें वेधून घ्यावीं. सर्वांस भासावें जे, माझे ठायीं कृपा विशेष आहे. ऐसा सर्वत्र आले त्यांचा गौरव करावा. दाहा घटका दिवस आलियावरि दोनचार घटका विविक्त[4]-स्थानीं ज्याचा[5] करणें त्याशीं मंत्रविचार करावा. नंतर बारा घटका दिवसास ब्राह्मणभोजनाचें उदक सोडून, नैवेद्य करून सर्व[6] पंक्तिभोजन करणार यांसहवर्तमान भोजन करावें. आणि तांबूल घेऊन चार घटका पुन्हां मंत्रसभेचे ठांई पत्रें आलीं व पाठविणें [तीं] अवलोकन करणें व कार्ययोजना व मागील दिवशीं आयव्यय झाला, दुसरे दिवशीं [किती] करणें, हें पाहून चार घटका अंतःपुरांत वामकुक्ष करावा. बारा घटका दिवस राहातां पुन्हा सभेस येऊन सर्व कारखाने, माहाल यांची चौकशी पाहाणें आपण जाऊन पाहाणें करावें. सभा करून न्याय–मनसुबी जाली केली ती अवलोकन करून दाद–फिर्याद मनास आणावी. साहा चार घटका दिवस राहातां बाहेर स्वारी बाग, आराम[7] देवालयें अथवा कारखाने यांत जावी. घोडा फेरणें, बोथाट्या[8] वगैरे खेळून सायंकाळ जाला असतां येऊन सभेस बसून सर्वांचे मुजरे घेऊन, दोन घटका रात्रीं जप,

१. 'हा' की० २. मंगलालंभन (न०) [सं० मंगल + आलंभन]—वृषभादी शुभ वस्तूंना स्पर्श करणे. ३. 'घालून' की०. हा पाठ ग्राह्य. ४. विविक्त (न० सं०) –एकांत. ५. 'ज्याशीं' की०. ६. 'सर्वांस' सा० को० व की०. ७. आराम (पु०) [सं० आ + रम्. फा० आराम्] –क्रीडाभुवन. ८. बोथाटी (स्त्री०)–काठीच्या टोकाला लाकडाचे किंवा कापडाचे गोळे बांधून ती फिरविण्याचा खेळ.

ध्यान करून, कांहीं पुराण व दासबोध दोन समास श्रवण करून भोजन करावें. तांबूल घेऊन सभेस दोन घटका बसोन कारभार-विचार करून एकांतीं चार घटका बसावें. बातमी, नाजूक कामें, पत्रें आलीं तीं व चोरबातमी[1] हेर ठेवून आली ती व द्रव्याचे, धान्यांचे निरख[2] हे श्रवण करून अंतःपुरांत जावें. -याप्रमाणें नित्यविधी नेमिला तसें त्या त्या घटका विभागल्या त्यांत तेंच करावें. न्यूनाधिक्य होऊं नये. ऐसे नेम केले. याखेरीज नैमित्तिक अवश्य कार्य उत्पन्न होईल तें सावधपणें त्यांतच निरालस्यपणें करीत असावें.

२७. नररत्नांचा संग्रह.

याप्रमाणें सर्व कारभारी यांणींही नियमेंकरून चालावें. आपलाले[3] कार्यास तत्पर असावें. अशीं मनुष्यें, केवळ रत्नेंच, अशीं संग्रह केलीं. आपण सर्वगुण-संपन्न होत्साता सर्व गुणी जन यांचे गूण समजावे. त्या अन्वयें त्यांचे सत्कार करावे. विनोद, हास्य व रहस्य गोष्टी एखादे समयीं करणें तें दोन चार असामी चांगले योग्यतेचे, दुर्व्यसनी नव्हेत, त्यांजशींच एकांतस्थानीं कोणाएकास न समजे असें करावें. लघुमनुष्य अथवा दुर्गुणी [यांशीं] किंवा बाहेर सभेंत करूं नये. आपण करूंच नाहीं; आणि कोणीं केलें असतां त्याचा तिरस्कार करावा, याप्रमाणें करिते जाले. सर्व काल युद्धचर्चा व घोडीं शस्त्रें यांची व परराज्य-साधनाचीच [चर्चा] करीत असावें. कांहीं एक चित्तास विराम[4] पाहिजे तरि भुखन कवी याजपासून मनोरंजन करावें.

२८. भूषण-कवीचा गौरव.

भुखन-कवी हे, दिल्लीस पादशाहापाशीं त्यांचे बंधू चिंतामण-कवी मनोरंजन करून होते, त्यांचे घरीं असतां, घरांतच राहातात ऐसें कोणी घरच्यानें म्हटलें. तेव्हां आम्हांस यवनांचें अन्न भक्षावयाचें नाहीं म्हणोन निघोन प्रथम कमाहूचे पहाडांतील राजा याजकडे जाऊन बहूत चतुरपणें त्याचें मनोरंजन करीत होत्साते राहिले. त्याणीं यांचा बहूत सन्मान करून दक्षणा लक्ष रुपये देऊन, दोन्ही घरास जाण्यास निरोप [देते] समयीं दिले. आणि गर्वेंकरून भाषण केलें कीं, "असा

१. 'चार बातमी' की०. २. निरख (पु०) [फा० निर्ख्] - भाव. ३. आपलाले (वि)-आपाआपले. ४. विराम (पु०)-करमणूक.

दाता पृथ्वीवर [दुसरा] कोण आहे!" असें बोलला. ते कवीनें ऐकोन त्याजवरि तत्काळ उत्तर केलें कीं, "ऐसे दाते शतंभीष्म बहूत आहेत. परंतु ऐसा याचक कोणी तुम्हीं पाहिला नाहीं कीं, लक्ष रुपये तुमचे गर्वोक्तीनें दिल्हे हे तुच्छ आहेत, [असें समजेल.] या द्रव्यास आम्ही स्पर्श करावयाचे नाहीं," [असें] म्हणून निघाले, ते दक्षिणप्रांतीं शिवाजी महाराज यांची कीर्ती श्रवण केली होती, तेथें येऊन महाराजांची भेटी घेतली आणि महाराजांस विचारलें कीं, "यवनांचा शत्रू कोणी असेल त्याजपाशीं आम्ही राहाणार." तेव्हां महाराजांनी उत्तर केलें कीं, 'मी यवनांचा काळ आहें!' त्याजवरून महाराजांपाशीं राहून मनोरंजन बहूत प्रकारें कविता करून करिते जाले. आणि महाराजांचा प्रताप पाहून नूतन ग्रंथ 'शिव-भूखन[१]' म्हणून कविता [बद्ध] करिते जाले. महाराजांची मर्जी बहूत प्रसन्न क्षणक्षणाचे ठायीं करिते जाले. ऐशी वहिवाट पांच चार वर्षें जाली. नंतर महाराजांची आज्ञा घेऊन दिल्लीस घरास जाण्यास निरोप घेतला. महाराजांनीं वस्त्रें, भूषणें, हत्ती, घोडे, जवाहीर, लक्षावधी रुपये देऊन पुन्हा येण्याविषयीं सांगितलें. आग्रह केला. त्यांणींही मान्य केलें. लौकर येतों ऐसें बोलोन गेले.

२९. भूषणावर बादशहा खूश झाले.

दिल्लीस गेलियावरि तें वर्तमान पादशाहास समजलें कीं, भूषण कवी शिवाजी राजे यांजकडून सन्मान पावून आले. ऐसें ऐकोन त्यांचे बंधू तेथें चिंतामण कवी यांस आज्ञा केली कीं, 'तुमचे बंधू भुखनकवी भेटीस आणावे.' त्याजवरून चिंतामण कवी यांणीं सांगितलें कीं, 'आमचे यजमान आपणांस बोलावितात.' तेव्हां उत्तर केलें कीं, "आमचे यजमानांचे [हे] शत्रू, त्यांचे दर्शन आम्हांस कशास पाहिजे? आमचे मुखांतून शिवाजीचे प्रतापाहून दुसरें निघावयाचें नाहीं. त्या योगें यांस क्रोध येईल." तेव्हां [चिंतामण] यांणीं बहूत प्रकारें सांगितलें, व पादशाहास अर्ज केला जे, "कवी दर्शनास येतील, परंतु शिवाजीचे प्रताप वर्णितील. आज्ञा जाली तरि आणूं." पादशाहांनीं '[घेऊन] यावें' आज्ञा केली. त्याजवरून चिंतामण कवी भुखन कवी यास घेऊन गेले. भेटी जाली. हुकूम जाला कीं, 'कांहीं वर्णन करावें.' तेव्हां यांणीं सांगितलें कीं, "आपण हात धोऊन

---

१. शिवराजभूषण शके १५९६ (इ. स. १६७४) ज्येष्ठ वद्य १३, रविवार रोजी पूर्ण झाले (शिवचरित्रप्रदीप श. १८४७ पृ. ३०६).

बसावें. आम्ही वर्णन वीररस [पर] करूं, ते समयीं आपला हात मिशांवर जाईल." तेव्हां हात धुण्याचें[1] कारण काय, विचारिलें असतां "आपणांस श्रृंगार[2] प्रिय, आमचे बंधू श्रृंगाररस वर्णितात, तेव्हां आपला हात विजारेस लागतो. याजकरिता हात धोवावा, हात धोऊन बसावें." नंतर पादशाहांनीं सांगितलें जे, "आमचा हात मिशीवर न गेला असतां, शिरच्छेद करूं" [असें] म्हणून हात धुतला. भुखन कवी यांणीं कवित्तें[3] म्हणावयास प्रारंभ केला. [त्यांत] आधीं महाराजांचा प्रताप वर्णिला. तेव्हां 'आम्हांविषयीं कवित्व म्हणावें' सांगितलें. आणि "सार्व-भौमपद आमचे. सर्व राजे आम्हांस करभार देऊन मांडलीक होत, ऐसें वर्णावें." [अशी] आज्ञा केली असतां "सर्व पृथ्वींतील राजे पुष्पवृक्ष होत आणि आपण [पादशाहा] भ्रमर, सर्वांचा मधू सेवन करणार, ऐसें वर्णून, त्यांत शिवाजी राजे हे चंपकवृक्ष होत" ऐसे वर्णिलें, कीं चंपकास भ्रमर शिवत नाहीं. तेव्हां पुन्हां पादशाहांनीं "हात धुवविला याचें कारण वर्णावें" सांगितलें असतां, साहा कवित्तें उत्कृष्ट वीररस [युक्त] वर्णन केलीं. सातवे कवित्तास पादशाहाचा हात मिशीवर अकस्मात आवेश येऊन जाता जाला. [तें] पाहून कवित्व आटोपिलें. पातशाहा बहूत खूष जाले. आणि सन्मान, बक्षीस, वस्त्रें, जवाहीर, हत्ती दिल्हे-गौरव केला. हें वर्तमान महाराजांकडील वकील यांणीं सर्व लिहिलें. त्याजवरून महाराज बहूत प्रसन्न होऊन पुन्हा येण्याविषयीं पत्रें पाठविली. आणिलें.

३०. गुणिजनांचा सत्कार.

याप्रमाणें महाराजांनीं एक एक मनुष्य रत्नाप्रमाणें परीक्षा करून वाढविलें [व त्याचा] संग्रह केला. तसेंच नाना प्रकारचे गुणिजन यांचा संग्रह [केला.] गायक व विद्वान येतील त्यांचे मनोरथ पूर्ण करून दिगंत किर्ती जावी ऐसें केलें. त्यांस सत्कार व द्रव्य देणें [तें देऊन] गायन नृत्य [श्रवण] अवलोकन समयाचे समयास, त्यांचे ठाईं व्यसनासक्त न होतां करिते जाले.

३१. 'शिकार करणे [तो] राजधर्म'.

तसेंच कोणतेंही दुर्व्यसन नाहींच नाहीं. शिकार करणें [तो] राजधर्म. ते महिन्या दोन महिन्या एखादे समयीं [करावी.] त्याचे कारखानदार

---

१. 'धुवणें' सा० व को०. २. औरंगजेब ललितकलांचा द्वेष्टा होता असे काव्येतिहास-संग्रहकार म्हणातात (स.च.पृ.२०५). ३. कवित्त-कवित्त–कबीत (न. हिं.)–कवित्व.

चित्ते-बाज[1] पायदामे[2] व पक्षी-बाज,[3] लगड,[4] वाघरा,[5] जाळीं[6] वगैरे जल [चर] स्थल [चर] व खेचर म्हणजे आकाश, [अशी] तीन प्रकारची शिकार. यांत मनुष्यास पीडा करणार दुष्ट पशू प्रयत्नें व्याघ्र, वृक मारावें. मेध्य[7] मृगादिक कार्यकारण श्राद्धादिकांस वधावे, ऐसें करिते जाले.

३२. षड्गुणांची जोपासना.

याप्रमाणें राज्य आक्रमण करून, त्यांचे निबंध[8] बांधून सरकारकून, पागा, लोक, फौज, सेना, कोश, खजीना [असे] सर्वगुणसंपन्न[9] जाले. सर्व मंत्री कार्यकर्ते यांसहवर्तमान राज्याचे घारे करून राज्य करणें तें, षड्गुण संधी, विग्रह, या [न], संस्थान, आसन, द्वैधीभाव, यांस यथाकाल अनुसरून करिते जाले. संधी म्हणजे शत्रू कसा आहे, त्याचें उणें कोठें कसें आहे [हें] पाहाणें व त्याशीं मैत्री अथवा विरुद्ध करणें न करणें या [स] संधी म्हणावें. विग्रह म्हणजे प्रयत्नेंकरून शत्रूशीं अथवा परराजा याशीं कलह निर्माण करणें. यान म्हणजे आपलें बल व दुसरेयाचें बल कसें ही विविक्षा[10] करून त्याजवर चालून जाणें, तें कोणते प्रकारें कसें जावें हें पाहाणें यास यान म्हणावें. संस्थान म्हणजे उपेक्षा करून आपले स्थलीं उगेंच असणें अथवा देशाचे ठाईं जाऊन कोठें राहावें, युद्धभूमीस कोठें उभें राहून व्यूहरचना कशी करावी, हें संस्थान[11] म्हणावें. द्वैधीभाव म्हणजे कांहीं मैत्री व कांहीं आपला दर्प त्याजवर ठेवणें, दाब ठेऊन चालणें, हा साहावा गुण. [हे] कोठें कसे करावें हें पाहून [योजना] करिते जाले.

३३. द्वादशमंडलविचार.

द्वादशमंडल—अरी, मित्र, उदासीन म्हणजे आपले राज्याचे भोंवतें चहूं बाजूंस

---

१. चित्ते-बाज (पु.) [सं० चित्रक+फा० बाझ्] – क्रूर किंवा चपळ ससाणा. २. पायदामा (पु.) [फा० पाय्दाम् सं० पाद+दाम (दावे)] – फूस लावणारा पक्षी (ससाणा). ३. पक्षी-बाज (पु०) – पक्ष्यांस मारणारा (श्येन). ४. लगड (पु०) बहिरी ससाणा. ५. वाघ (ग)रा (स्त्री०) [सं० वागुरा; म० वाक+दोर] जाळी. ६. 'चित्तेबाज, पायवाके, शाहीन, बहिरी, लगड, वाघरा, जाळीं, की०. ७. मेध्य (वि.) [सं० मेध्] – मारण्यास योग्य. ८. निबंध (पु.) – नियम; निर्बंध. ९. गुण (पु.) – अंगे. १ स्वामी २ अमात्य ३ सुहृद् ४ कोश ५ राष्ट्र ६ दुर्ग ७ बल (फौज, सेना व कोश, खजीना ही द्विरुक्ती होय.) १०. विविक्षा (स्त्री०) [सं० विच्; विश्] – तपास. ११. संस्थान–संश्रय (आश्रय) ? (चिटणीस-राजनीती प्र० ५).

राज्याचे लगत राजे. त्यांत प्रथम जवळ राज्य [ज्याचें] त्यासि अरी म्हणावें. त्याशीं आपणाशीं नित्य संबध. त्यासि सर्वकाळ रक्षीत असावें. त्याचे पलीकडे राज्य त्यास मित्र म्हणावें; कांकीं, त्याचा आपला अरी एक. त्याजमुळें सहज मैत्री असती. त्याचे पलीकडे राजा तो आपला उदासीन. विशेष त्याशीं आपणाशीं कारण नाहीं. प्रसंगेंकरून त्याचें राज्य घेणें तरि अथवा मैत्री करणें तरि प्राप्तकालें करावी. ऐसे चहूं दिशांस तीन तीन यांची विविक्षा पाहाणें, यास द्वादशमंडलविचार म्हणावें.

३४. शत्रू-मित्रांची परीक्षा.

तसेंच शत्रू व मित्र यांत सहजशत्रू व सहजमित्र, दुसरे कृत्रिम शत्रू व कृत्रिम मित्र हे परीक्षा करणें. सहजमित्र आपले कन्येचे पुत्र, बापाचे बहिणीचे पुत्र, आईचे बहिणीचे पुत्र, मातुल, शालक, व मध्यमंडळराजा [हे] सहजमित्र असतात. सहजशत्रू म्हणजे बंधू व बापाचे बंधूंचें पुत्र व दायाद व आपले मंडळाजवळ ज्याचें राज्यमंडळ तो राजा. [हे] सहज-शत्रू म्हणावे. आतां कृत्रिम शत्रू म्हणजे सहजमित्र जे आहेत त्यांशीं कांहीं कारणें करून शत्रुत्व करणें आलें व उदासीन-मंडळचा राजा याशीं [शत्रुत्व] करणें, राज्य घेणें [आलें] यांस कृत्रिमशत्रू म्हणावें. तसेंच सहजशत्रू जे त्याशीं मैत्रीकार्य करून संपादून [त्या] अन्वयें कार्य करणें, अथवा जवळ [ज्या] राजाचें मंडळ त्या राजाशीं सख्य राखणें. हे कृत्रिम मित्र म्हणावे. तसेंच वृद्धिक्षयस्थान जाणणें म्हणजे आपली वृद्धी राज्य, सैन्य, कोश कसे आहे [त] दुसरियाचे कसे, [आपले] उणे असल्यास धीर धरणें, [दुसरियाचे] अधीक जाल्या उद्योग करणें, यास म्हणावें. याची सर्व विविक्षा करावी.

३५. सप्तदुर्व्यसनांचा त्याग.

सप्तदुर्व्यसनें यांचा त्याग [करावा]. द्यूत म्हणजे पण करून खेळणें व मद्य-सेवन, गायनाचेच ठायीं आसक्त होणें, शिकारीचाच बहूत छंद, तसेंच स्त्रियांचे ठाईं आसक्त बहुत होणें[1]-हीं कामज चार;[2] क्रोधज तीन-दंड उग्र करणें,

१. 'बोलणें' की०. २. ही तर पाच होतात. गीतवाद्यनृत्यांस तौर्यत्रिक असे नाव आहे. मनूने कामज दहा व क्रोधज आठ मिळून अठरा व्यसने गणिली आहेत. मृगयाक्षो दिवास्वप्नः परिवादः स्त्रियो मदः। तौर्यत्रिकं वृथाट्या च कामजो दशको गणः ॥४७॥ पैशुन्यं साहसं द्रोह ईर्ष्यासूयार्थदूषणम्। वाग्दण्डजं च पारुष्ये क्रोधजोऽपि गणोष्टकः ॥४८॥ मनुस्मृति अ० ७.

पारुष्य म्हणजे दुसरियाचें उणें भाषण करणें, अर्थदूषण म्हणजे दुसरियानें उत्तम कर्म केलें त्यास दोष ठेवणें, हीं तीन. एकूण सात व्यसनें यांचा त्याग करणें, यास सप्तव्यसनत्याग म्हणावें

३६. देशकालवर्तमानाचे उपाय.

याचा विचार पाहून, देश, काल, वर्तमान पाहून कोठें काय करावयास चार उपाय—साम, दान,[1] दंड, भेद. साम म्हणजे [शत्रूशीं] समानत्वें चालणें, दान म्हणजे कांहीं देऊन चालणें, भेद म्हणजे त्याचे राज्यांत फितूर करणें, दंड म्हणजे त्याजवर निग्रहच करणें, हें पाहून [करिते जाले.] काल म्हणजे कोणते कालीं काय कर्म करावें, देश म्हणजे कोणते प्रकारें कोणते स्थळीं जावें, वर्तमान म्हणजे तेथें[2] व आपला विचार सांप्रत कसा चालतो हें पाहाणें पाहावें. दत्तापहार म्हणजे आपण दिलें तें हरण करणें. [दिलें तें] कदापि कोण्हाचें हरण करूं नये. शब्दार्थज्ञान म्हणजे परराज्यांतील दूत येतील त्यांचें अगर [आपले] मंत्री यांणीं [बोलणें] बोलले व पत्रें आलीं व पाठवणेचीं यांचा अर्थ जाणून जें करणें तें धर्मेंकरून उत्तर करणें, समजणें. ऐसी नीती करून राज्य चालविते जाले.

३७. धर्मांचे राज्य.

त्या योगेंकरून राज्याचे ठायीं बहूत सुभिक्ष व सर्व प्रजा, मनुष्यमात्र, सुखी. पृथ्वीच्या ठायीं रस-धान्य-उत्पत्ती बहूत. कालचे कालास वृष्टी होणें, कोणतेंही ईतिभय[3] नाहीं. गाई दुग्ध बहुत देत्या जाल्या. फलपुष्पवृद्धी [होती] जाली. मनुष्यमात्रास स्वल्प प्राप्ती जाली तरी त्यांतच सुख व्हावें. राजद्रव्य येईल त्यांतच मनुष्याचे प्रपंच होऊन द्रव्यसंग्रह व्हावा. ऐशी बरकत[4] सर्वांस. सर्व जन सुखी. राज्यांत ऐसें होतें जालें. सर्वांस धर्मेंकरून चालावें हे वासना निर्माण होती जाली. याप्रमाणें धर्मेंकरून राज्य संपादन करून, नीतीकरून [सर्व प्रजांचें] पालनपोषण करिते जाले. आणि याप्रमाणें दौलत संपादन केली व बंदोबस्त ऐसे प्रकारें केला.

---

१. दान यास दाम किंवा संप्रदान असेही म्हणतात. २. तेथे-शत्रूकडे. ३. ईति (स्त्री० सं०)-उपद्रव. अतिवृष्टिरनावृष्टिर्मूषिकाः शलभाः शुकाः। प्रत्यासन्नाश्च राजानः षडेता ईतयः स्मृताः ॥ रघुवंश १-६३. ४. बरकत (स्त्री० अ०) – भरभराट.

३८. शहाजी शिवभेटीस निघतो.

हें वारोंवार[१] वृत्त शहाजी महाराज यांस लिहीत गेले. आपलें दर्शन घडावें, संपादिले अर्थ यांचा उपभोग आपणांस घडावा, अशी उत्कंठा लिहीत गेले. त्याजवरून[२] त्यांणींही [उत्तर पाठविलें,[२]] "तुम्हांस भेटावें, पाहावें, प्रताप श्रवण करून बहूत संतोष जाला." श्री जेजोरीचे देवास नवस केला होता जे, शिवाजी राजे राज्य साध्य करून हिंदू-धर्म-स्थापना करण्याचें इच्छितात तें सिद्धीस निर्विघ्न जावें, म्हणजे लक्ष रुपयांच्या सोन्याच्या मूर्ती करून पाठवूं. त्याप्रमाणें तेथें कर्नाटकी कारेगार यांजपासून करवून पाठविल्या. शिवाजी राजे जाऊन पाहावे, राज्य पाहावें, म्हणोन पादशाहाचे निरोपाचा उद्योग केला, जे, "बहुत दिवस जाले, श्रीकुलस्वामीचें दर्शन घेण्यास गेलें पाहिजे." तेव्हां पादशाहांनीं [सांगितलें,] "तुम्ही जातां, तुमचे पुत्र आफरी होऊन वर्ततात, त्यांस बहुत प्रकारें बोध करून भेटीस आणावें, त्यांणीं तुमचे रितीनें पादशाहींतील अमार[३]–चालीनें चालावें, आले असतां वजिरी सांगोन सर्व पादशाहात त्यांचे स्वाधीन करून सेवा घेतां येईल, म्हणोन शिवाजी राजे आपलेसे होऊन राजकारण लावावें."[४] [असें] सांगितलें असत शहाजी महाराज यांणीं, "पुत्र आपले स्वाधीन आहेत नाहींत ही खातरजमा पूर्वी जाली आहे; तत्रापि प्रयत्न तितका करून पाहातों, आम्हांस आपणांवाचून अन्य प्रकार नाहीं; कुलस्वामीचें दर्शन घेऊन पुत्राचीही भेटी घेऊन, चार गोष्टी विचाराच्या सांगोन आज्ञेंत चालावे ऐसें करून पाहातों." म्हणोन [उत्तर] पाठविलें. तेव्हां पादशाहास राजे वश व्हावे उत्कंठा होतीच. "जाऊन करून पाहावें, जाल्यास उत्तम, नाहीं तरि तुम्हीं त्यांत मिळोन राहूं नये, आमचे आम्हांपाशीं यावें," ऐशी खातरजमा करून घेऊन निरोप दिल्हा. यांजलाही भेटून पुन्हा इकडील दौलतीचे बंदोबस्तास येणें अवश्यक [होतें,] कबूल करून त्या प्रांतींहून येणें जालें.

३९. उभयतांची भेट.

श्रीतुळजापुरीं येऊन श्रीदेवीचें दर्शन घेऊन देव-ब्राह्मणपूजा करून, श्रीपंढरीस येऊन पुढें पत्रें पाठविलीं. तेथून श्रीशिखरशंभुमहादेवदर्शन,

---

१. 'वारंवार' की०. २. 'त्यायोगें त्यांनींही लोभास्तव उत्तर पाठविलें.' की०. ३. अमार-अमीर? अमरसुद्धा होऊ शकेल. ४. 'लागावें' सा०

ब्राह्मणभोजन, महापूजा करून येतां, तेथें इकडोन पुढें लोक पाठविले ते गेले. शिवाजी महाराज सामोरे जाण्यास निघाले. बहूत दिवशीं दर्शन [घेणें] तें श्रीदेवाचे[१] संनिध घ्यावें हा निश्चय करून, मार्गी जागां जागा प्रांतांत येतील तेथें सर्व तरतूद [करून] सामान करविलें. आपण व सर्व सरकारकून, फौज, सरदार, पागा, हत्ती, संपत्ती [यांचा] जमाव करून पुढें सरनोबत पाठविले. तों महाराज श्रीजेजोरीस आले, तेथें आपण जाऊन पोहोंचले. आणि श्रीचे संनिध भेटी घेतली. जिजाबाईसाहेबही श्रीसंनिध भेटलीं व राजस्त्रियाही भेटविल्या. तिकडोन व्यंकोजीराजे व तुकाबाईसाहेब व सर्व कारभारी, सरदार लोक आले, त्या सर्वांस भेटले आणि इकडील सर्व कार्यकर्ते यांच्या व सरदार लोक यांच्या भेटीचा सभारंभ करून भेटविले. शाहाजी महाराज पालखींत बसलियावरि, आपण पायउतारा, जोडा न घालितां, पालखी धरून बहूत मर्यादेंकरून लष्करांत डेऱ्यास आले. [महाराज] बसलियावरि, पुढे [राजे] उभे राहिले. ते समयीं महाराज[२] यांणीं [शिवाजी राजे यांस] पुढें जवळ घेऊन बहूतच आनंद [युक्त] व संतोषी होऊन दानधर्म करिते जाले. आणि "श्रीचा वर पूर्वीं जाला तेच पुत्र तुम्ही; जगविख्यात पराक्रम केलात; धर्म-रक्षक तुम्ही निर्माण जालां; तुमचे योगें सर्व कूळ धन्य जालें! सिसोदे यांचे कुळांत निर्माण जालां. त्यांचे धर्म ते पालन तुम्हीं करून या प्रांतीं आलों[३] असतां पुन्हा कुळाचा उदय केलात!!" म्हणोन बहूत गौरवून बोलले असतां [राजे] उठोन नमस्कार करून "सर्व प्रताप स्वामींचे पुण्याचा व चरणांचा. स्वामीचे आशीर्वादें, आज्ञेनें करणें ते केलें!" म्हणोन बहूत विनतीनें[४] व नम्रपणें बोलले. आणि देवब्राह्मण दानधर्म बहूत केला. ब्राह्मणभोजनें बहूत करून पुण्यास निघोन येते जाले. तेथें दोन महिने राहून, बरोबर लोक सरदार आले त्यांचे आदर-आतिथ्य बहुत-प्रकारें केलें. सन्मान केले. महाराजांची नित्य सेवा करणें व सर्व वर्तमान सांगणें, कारभार होणें तो आज्ञा घेऊन कागदपत्र लिहिणें महाराजांचे नांवें, ऐसें करिते जाले. सर्व संपत्ती हत्ती

१. एक तपानंतर नातेवाईकास देवालयात भेटावे असा संकेत आहे. ताराबाईने आपला नातू रामराजा याची भेट अशीच घेतली होती. 'आईसाहेब खाली राहून राजे आले त्यांची भेट बहूत दिवसांची म्हणून श्रीकृष्णातीरीं शकुन्तेश्वर याचे देवालयीं घेतली. (थोरले शाहूमहाराज यांचे चरित्र, शके १८१५ पृ. ९८).
२. तृतीयान्त कर्त्याचे वाक्य कर्तरिप्रयोगात. ३. 'आलां असतां' की० व सा० २.
४. 'विनयें' की०.

घोडे दाखविले. महाराज यांणीं तरवार बहूत किमतीची आपले हातीं होती [ती] दिली. ती परम यशस्वी, तिचे नांव तुळजा ऐसें ठेऊन नित्य पूजा भवानीबरोबर करावी ऐसें केलें.

४०. शहाजीचा निरोप.

नंतर प्रतापगडीं जाऊन देवदर्शन करावें, राजगड, रायगड, सर्व संस्थानें पाहावीं, असा हेत[1] धरून राजगडास जाऊन प्रतापगडास आले. देवदर्शन करून तेथील सर्व संपत्ती दाखवून अफजलखान बुडविला, पराक्रम तरतूद ज्या स्थळीं जसें केलें [तसें] तें निवेदन केलें. तेथून रायगडास जाऊन तेथील राजमंदिरें, दौलत,[2] हत्ती[2], घोडे, पागा, फौज सर्व दाखविली. तदनंतर सातारियास येऊन, श्रीरामदास स्वामींचें दर्शन करवून सर्व स्थळें दाखवीत पन्हाळियास गेले. तेथें महाराजांस व तुकाबाईसाहेब व व्यंकोजी राजे यांस पाहिजे [त] ते पदार्थ नजर केले. पोषाख, जवाहीर, हत्ती, घोडे पाहिजे तें देऊन बराबर खर्चास खजीना मुबलग[3] दिला. मेजवान्या केल्या. सर्व गुणिजन यांचे गूण दाखविले. बराबर [चे] सर्व सरकारकून, सरदार यांस मेजवान्या करून वस्त्रें, जवाहीर यथायोग्य व लोकांस वस्त्रें दिलीं, व महाराजांचे सेवेचे लोक यांस वस्त्रें, भूषणें, बहूत द्रव्य देऊन, "महाराजांचे वृद्धाप्य[4], यांत यांस बहुत प्रकारें जपावें." असें सर्व सांगोन, कांहीं दिवशीं, "मीही त्या प्रांतीं दर्शनास येण्याचा योग[5] करितों" ऐसें बोलोन, "येथें राहाण्यांत तिकडील दौलतीचा बंदोबस्त राहणार नाहीं" हें शाहाजी महाराजांचें म्हणणें व जाण्याचा मानस, याजवरून जाण्याचा बेत ठरवून, "जातां पादशाहाशीं गोडच बोलून पुढें जाण्याचा योग[6] करावा" [ऐसें] सांगोन, बहूत संकटें करून व व प्रयासें वारोंवार पायांवरि मस्तक ठेवून निरोप दिल्हा. चार महिने या प्रांतीं महाराज राहून, नंतर विजापुरास जाऊन, येथील[7] बोलणें याउपरि सफाईनें चालावें असें बहूत करून केलें[8] आहे म्हणून सांगोन,

---

१. हेत (पु०) हेतू; इच्छा. 'बेत करून' की० व सा० २. 'हेत करून' सा०. २. 'दौलत होती ती' को०. ३. मुबलग—मुबलक—मबलग (वि.) [अ० मब्लघ्] —विपुल 'मबलग' सा० व को०. ४. वृद्धाप्य (न०) [सं. वृद्ध+आप्]—म्हातारपण. ५. 'बेत' को०. ६. 'बेत' को०. ७. येथील—शिवाजीकडचे. ८. 'गेले हे' सा० व को०

शिवाजी महाराजांनीं पादशाहास पोषाख, जवाहीर, हत्ती घोडे, दिले ते आपणांकरितां पाठविले म्हणोन देऊन चंजाऊर प्रांतीं निरोप घेऊन गेले.

४१. 'याप्रमाणें राज्यसाधन'.

याप्रमाणें महाराजांनीं राज्य साधन केलें. त्याचे धारे, पाये अचल. पुढें बहूत काळ या पायांनीं जो चालेल त्यास भय कदापि नव्हे[1], ऐसे [धारे, पाये[2]] घालोन, वडील शाहाजी महाराजांस आणोन, त्यांस सर्व पराक्रम व संपत्ती निवेदन[3] करून दर्शन घेतलें. संतुष्ट केलें.

राज्यमर्यादाकथन [आणि पितृदर्शननाम चतुर्थ] प्रकरण समाप्त.

---

१. 'नव्हावें' को०. 'धर्म होऊं देणार नाहीं' की०. हा पाठ बरा. २. 'असे नीति-मर्यादेचे पाये' की०. ३. 'दाखवून' की०.

[१] दिल्लीपतिपराभव–प्रकरण ५

१. शायिस्ताखान चालून येतो.

श्रीशिवाजी राजे यांणीं राज्य सोडवून, किल्ले, कोट, ठाणीं प्रांत बहूत घेतला; त्यांत[२] राज्यांत बहूत रितीनें मर्यादेनें पाये घालून चालतात; मनुष्यें पदरीं बहूत चांगलीं मेळविलीं; [त्यांचेजवळ] खजिना, द्रव्य बहूत जालें; त्या योगेंकरून व युक्तीकरून बहूतच मनसबेब्राज; मोठे धाडसेंकरून शिपाईगिरी करितात. बहूत [लोकांचा] जमाव केला; किल्ले कोट फार घेतले; नवी स्थळें केलीं; खजिनाही विपुल केला; लोक एकदील व सुखी; फौज फार व माणसें पराक्रमी; सरदार, सरकारकून मोठे मोठे मनसबेदार[३] मेळविले; बालाघाट, परांडें, कलबर्गें, आवसें, उदगिरी[४], गंगातीरपर्यंत स्वारी-शिकारी करितात; औरंगाबादेचा पुरा लुटला; जालनापूर मारिलें; महकूबसिंग व आपले सुभ्याची फौज गेली ती मारली, गर्दीस मेळविली, हत्ती पाडाव नेले; सुरत मारली; रायबागीण व मोहबतखान सरदार गेले ते बुडविले; हीं वर्तमानें वरचेवरि दिल्लीस पादशाह औरंगजेब यांस कळलीं. याजवरून पादशाह बहूत दिलगीर[५] होऊन विचारांत पड लेकीं, "आम्ही या प्रांतींच बंदोबस्तास गुंतलों. हा सोडून जावें, तरि मूळ हें; यास अपाय होईल. शिवाजींनीं तरि धूम मांडली. तिकडील पादशाहाती जेर करून, आमच्या फौजा

१. 'शिवछत्रपति यांनीं दिल्लीपति पराभव केला तें कथन प्रकरण पंचम' की०.
२. 'त्या राज्यांत' की०. ३. 'मनसबदार' की०. ४. उदगीर–पुण्याहून पूर्वेस दोनशे मैल. ५. दिलगीर (फा०)—असंतुष्ट, दुःखी.

बुडवून, लुटून प्रांत घेतला. गुमान[१] राखीत नाहींत. विजापूर [ची] तरि पादशाहातच घेतली; अफजलखान मोठे धाडसें, आंगेजणीनें मोहरा[२] मारिला. वरकडही उमराव नामोहरम केले. [आमचे] पादशाहाजादे व दिलेलखान मध्यप्रांतीं होते यांणींही राजे यांचा उत्कर्ष लिहिला. तेव्हां आपण जाऊन मसलत करणें ठीक नाहीं. शिवाजीराजा मसलतीनें आटोपत[३] नाहीं. अगोदर दोन्ही पातशाहाती भागानगर व विजापूर हस्तगत होतील तेव्हांच जें घडणें तें घडेल. नाहीं तरि एकटेच शिवाजीराजे आंगेजणी करितील. प्रसंगीं त्यांसही[४] साह्य करितील, नामोष[५] जाईल." यास्तव विचार करून एखलासखान याची सुभेतगिरी करून, पादशाहाचे मातुल शाइस्ताखान यांस सुभा देऊन, नवांजीस करून, फौज तोफखाना वगैरे सामान बहूत पोख्त व खजिना ऐसे बराबर [देऊन] मब्लग साहित्यानिशीं रवाना केलें. "शिवाजीराजे यांचा बंदोबस्त हरतऱ्हेनें दोन्ही पादशाहातींशीं तह [करून] व साह्य घेऊन आधीं करावा," हें सांगून रवाना केले. बराबर रोहिले, पठाण, उदबक[६] व रजपूत वगैरे पोख्त सरदार दिल्हे. ते दरमजल येते जाले. त्यांणीं येतां अगोदर सुभ्याचा बंदोबस्त केला. आणि [मग] महाराजांवरि चालून आले.

२. महाराजांची उमेद.

[इकडे] महाराज रायगडीं होते; तेथून सर्व तयारी, फौज व सरदार, पागा आणवून, जमाव करून राजगडास आले. तमाम हषम एके ठायीं केले. सर्व सरकारकून, सरदार जमाव करून विचार केला जे, "गनीम चालून आला. यास कोणते उपायें व हुनरें-करून जेरजूर[७] करावा, तंबी[८] कशी पोंचवावी, आपली फौज लोक जायां[९] न करितां कसा उपाय करावा?" ते समयीं सर्वांचे विचारें संमतें "मोंगली फौज; बाहेर कही-कवाड[१०], सामान, रसद[११]

१. गुमान (पु०) [गुमान्]विचार, पर्वा, काळजी. २. मोहरा (पु०)[फा०मुह्रा]—उत्कृष्ट माण्स. ३. 'आटोपीत' सा०. ४. भागानगर व विजापूर येथील बादशाहांस. ५. नामोष (नामोश) पु० [अ० नामूस्]—कीर्ती; अब्रू. ६. उदबक—उझबेग लोक. ७. जेरजूर [फा० झेर्]—पराभूत—हस्तगत वगैरे (समाहारद्वंद्व). जेरबार. ८. तंबी—तम्बीह—(स्त्री०) [अ० तम्बीह्]—दटावणी. ९. जायां [अ० झाइअ]—निरुपयोगी. १०. कहीकवा (बा) ड (न०) [फा० कही+सं० कपाट]-गवत, लाकूड फाटा इत्यादि (समाहारद्वंद्व) ११. रसद—रस्त (स्त्री०) [फा० रसद]—युद्धोपयोगी सामुग्री.

जवाब[1] धरून [तिची] बंदी करावी. आधींच पुढें तोंड देऊन लढाई कशास करावी? बंदी करून घाबरा पाडावा.[2] एखादे गडसंधीस[3] मारून काढावा, किंवा एकादे किलियास येऊन मोर्चे देऊन बसूं द्यावा, तेथें मारावें. ऐसे कित्येक प्रकारें कावेसीनेंच[4] घाबरा करावा." ऐसें ठराऊन महाराजांनीं, "संकट आलें यास काय करावें?" म्हणून श्रीदेवीची प्रार्थना केली. त्याजवरून आंगीं आविर्भाव[5] होऊन सांगितलें. जे, "सर्वांस सांगा, चिंता करूं नका. जसा अफजल मारिला, तसाच याचाही अपजय करून लावून[6] देईन. तुम्हांस यश देईन." इतकीं वाक्यें निघालीं तीं चिटणीस वाकेनीस यांणीं लिहिलीं. तीं वाक्यें संचार गेलियावरि उभयतांनीं श्रुत केलीं. महाराजांनीं ऐकून घेऊन सर्व पार पाडणार श्रीसमर्थ! त्यांनीं अंगिकार केला आहेच [तेव्हां] चिंता नाहींच. शत्रूचें पारिपत्य करूंच." हे उमेद धरून[7] [राहिले.]

३. खान चाकण घेतो.

खान येतां आधीं चाकणचे किल्लयास मोर्चे[8] दिले. ते समयीं संभाजी कावजी पागे होते. बळकट, घोडें उचलावे ऐसें बळ, मर्द होते. त्याजवरि महाराजांची इतराजी कांहीं कारणें करून जाली होती. त्यांणीं[9] पागासुद्धां जाऊन [ते] खानास भेटले, व बाबाजी राम होनप, देशपांडे प्रांत पुणें, हे पुढें जाऊन बराणपुरींच मिळाले [होते.] माहितगार म्हणून जवळ सन्मानें ठेविले. चाकण[10] फिरंगोजी नरसाळा हवालदार यांणीं भांडविली.[10] ईशान्य कोनींचा बुरूज सुरुंगांनीं [खानानें] उडविला. तेव्हां किल्ला जेर जाला. कौल घेऊन व महाराजांची आज्ञा नेऊन[11] किल्ला नरसाळे यानीं तहानीं दिला. त्यास "तुम्ही शिपाई खरे, मर्द आहां, तुम्हांस वाढवितों. आम्हांपाशीं राहावें." म्हणून खान याणीं म्हटलें असतां ये समयीं राहात नाहीं म्हणून निघोन नरसाळा महाराजांकडे

---

१. जवा (बा) ब (पु० अ०)—प्रत्युत्तर (म्हणून) 'जबाब' की०. २. 'करावा' की०. ३. गडसंध(द)—स्त्री०—अडचणीची जागा. ४. 'काबेबाजीनें' की०. ५. आविर्भाव (पु० सं०)—प्रगट स्वरूप. ६. 'मारून' की०. ७. 'धरिली' की०. ८. मोर्चा (देणे—लावणे) (पु०) [फा० मुर्चा]—तोफा डागणे. ९. तृतीयान्त कर्त्याचे वाक्य कर्तरिप्रयोगात. १०. चाकण—पुण्याहून उत्तरेस १८ मैल. 'चाकण किल्ला ××× भांडविला.' की०. ११. 'घेऊन' की०.

आला. महाराजांनीं त्यास शर्त केलीस म्हणोन नवांजून किल्ले भूपाळगड[1] येथील हवाला देऊन पाठविलें. चाकण घेऊन खान याणीं पुणियास मुकाम केला.

४. शायिस्ताखानास 'शास्त' केली.

महाराजांनीं प्रतापराव गुजर सरनोबत यांस तमाम पागा देऊन कहीकबाड चालूं न द्यावें, रसद बंद करावी, अंतरें करून रोखून धरावा, म्हणोन रवाना केलें. आपण खासा तमाम मावळे लोक निवड करून राजगडाहून सिंहगडास आले. तेथून विचार केला जे, "कांहीं एक साहसकर्म करून [खान] यास मारावा. म्हणून खानाचे गोटावर चालून जावें, छापा घालावा, आपणच जाऊन खानाचें डोचकें कापून आणावें" ऐसे कित्येक बेत चित्तांत दृढ करून कवाईत केली. कात्रजेचे[2] घाटानें जागजागां झाडांस पोत[3] बांधावे आणि बैलांचे शिंगासही बांधावे. करणेकरी, शिंगाडे पांच पंचवीस यांणीं डोंगरांत बिकट जागियांस असावें. त्यांणीं आम्ही फत्ते पाऊन इशारतीचा करणा सिंहगडचे वाटेस एक वाजवूं, ते समयीं पोत उजळणार मावळे लोक त्यांजबरोबर नेमोन दिल्हे होते त्यांणीं उजळावे. करणेकरी यांणी करणे, शिंगें, बाजे करून सर्वांनीं निघोन जावें. म्हणजे त्या मार्गीं[4] छापा आला असें पाहून फौज व खान तिकडे जाईल. इकडे अवकाश पडल्यास[5] गोठ लुटावा. अगर [वेळ] पडेल तशी मसलत करून आपण सिंहगडास पोंचावें. असें[6] [निश्चित] करून,[6] मावळे लोक यांस सिंहगडचे वाटेनें जागां जांगां हजार, पांचशें असे जथे[7] करून देऊन घालणीचे[8] जाग्यास उभे केलें. त्यांणीं करण्यांतील बारीक नळीची इशारत होतांच मिळत जावें. असें सांगून आपण आंगांत जिरेटोप त्याजवरि आंगराखा,[9] पागोटें घालून, चोळणा काच्या घालून तरवार विचवा एक हातीं, वाघनखें एक हातीं, पाठीशीं ढाल, याप्रमाणें [तयारी] करून पायउतारा बराबर धारकरी येसजी कंक, तानाजी मालुसरे, दादाजी बापूजी देशपांडे, चिमणाजी बापूजी देशपांडे व सुरवे असे

---

१. भूपाळगड–सातारा जिल्ह्याच्या खानापूर तालुक्यात. भूपाळ नामक राजाने हा बांधिला असे म्हणतात. २. कात्रज–पुण्याहून दक्षिणेस ६ मैल. ३. पोत (पु०) [सं. प्रोत का॰ पोत्तु = जाळ, फा० पूद]–जळता काकडा. ४. 'मार्गें' की०. ५. 'सांपडल्यास' की०. ६. 'असा ठराव करून' की०. ७. जथा (पु० स्त्री०) [सं० यूथिका)–समूह. ८. घालणी (स्त्री०) [सं० घातय]–छापा, हल्ला. ९. 'अंगरखा' सा० २. की०.

घेऊन, मातबर निधडा[१] माणसें पंचवीस तीस असामी केवळ जवळ असावे [म्हणून घेतले.] पांच साहा हजार लोक निवडून घेतले, ते ठेवीत ठेवीत आंबे[२]–वोहोळ येथपर्यंत [आले.] पांच सातशें तेथें ठेवून, गोटानजीक[३] दोनतीनशें ठेवून, गोटांत [राजे] शिरले. काळोख, भाद्रपद[४] मास, कांहीं पाऊस[४] [होता.] त्या दिवसांत गोटांत शिरून कोण्हीं पुशिलें कोण म्हणोन, तेव्हां चौकीचे लोक म्हणोन सांगत सांगत बाडाजवळ[५] आले. बागेलगत बाड होतें. त्यांत येऊन झाडांचे आश्रयाचें चौकी चुकावून, बाड चिरून, वरकड लोक बाहेर ठेवून, एक दोन असामी[६] धारकरी बराबर येसजी कंक, दादाजी बापूजी देशपांडे घेऊन बाडांत शिरले. आंतील डेऱ्याजवळ गेले. तों खोज्या जागा होता. त्यास[७] एक जण [धारकऱ्यास] तरवार मानेवरि ठेवून बसविलें. आणि आपण खासा पुढें गेले. खानाचा लेक निजला होता त्यास तेथेंच जेब[८] करून निजले जागांच मारिला. आणि खानाचे बिचोब्यांत[९] गेले, आणि छातीवर चढोन बसले. वार करावा तों बायको [नें] जागी होऊन पाहिलें, आणि पाय धरिले. तिजला दबाविली. तेव्हां तिनें ये समयीं मारूं नये. जीवदान द्यावें व मजला चुडेदान द्यावें ऐशी बहूत ग्लानी करून, करुणा भाकून प्रार्थना केली. महाराजांचे अंतःकरणांत[१०] द्रव जाला. परंतु "आपण येऊन हें कर्म केलें व निभावून गोठपार होऊन, बचावून आपले लोकांत मिळून गेलें पाहिजे यास कसें करावें?" म्हणोन मनांत विचार करून, "खान वांचून मोहीम केली तरी काय चिंता? पारिपत्य करीन, रणांत मारीन" म्हणून बहूत सावध [पणें] खबरदारीनें दाबून धरून गळ्यावरि तरवार ठेविलीं[११], व एक हातें पोटास नखें लाविलीं,[११] आणि खान यास बोलिले जे, "ये समयीं तुझा प्राण वाचविला तरि इमान द्यावें जे आम्ही हात धरून

१. 'निधड' की०. २. आंबे–वोहोळ–हल्लीचा आंबिल ओढा. पुण्याहून पर्वतीस जाताना हा लागतो ३. गोट (ठ) पु० [का० गाट्टु = सीमा सं० गोष्ठ]–छावणी, तळ. ४. हा काल बरोबर नाही. 'शके १५८५ शोभ (न) नाम संवछरें चैत्र शुध अष्टमी रविवार शास्ताखानावरी पुणियात सिवाजी राजा खासा जाऊन छपा घातला' (जेधे शकावली.) ५. बाड स्त्री० [फा० बयाझ्] —तंबूची कनाथ (पडदा). ६. यापुढे 'निकम' (निकाम ? = भरपूर) की०. ७. 'त्याचे मानेवर तरवार ठेवून एकजणास बसवून' की०. ८. जेब स्त्री० [अ० झर्ब]—ठार. ९. बिचोबा-बिचवा (पु.) [फा० बीचोबा]—बिनखांबी तंबू. १०. 'अंतःकरणास द्रव आला' की०. ११. 'ठेविली होती' 'लाविलीं होतीं सा० व की०.

नेऊ[1] तेथपर्यंत न बोलतां बराबर यावें, तेथून सोडिल्यावरि जावें; आणि कांहीं तरि शास्त[2] करितों याकरितां शास्ताखान म्हणावें; बायकोनें ही बराबर यावें. या प्रमाणें उभयतां इमान कुराण शपथ घेऊन, मधीं गलबल केलिया मारून टाकूं." असें करार करून हाताचीं दोन बोटें कापून घेतलीं. ते समयीं शास्ताखान भयाभीत[3] जाला. त्यास हातीं धरून घेऊन बायकोसुद्धां बाडापाशीं येऊन, आल्या वाटेनें बाहेर आपले लोकांत येऊन, शिवाजी तो मी, तूं मोहीम करून आलास, तुझें पारिपत्य करीन. यास्तव युद्ध न करितां फिरोन जावें. नाहीं तरि मारीन." असे बोलोन तेथून गोठाबाहेरील लोकांत मिळून, आंबे[4] वोहोळांत लोक ठेविले [होते] त्यांत मिळाले आणि इशारतीचा करणा केला. तों लोकांनीं कात्रजेचे डोंगरांत पोत उजळले व करणे वाजविले. खान बहूत सर्द, खजील[5] होऊन गूल[6] न करितां बाडांत आले. तों लेंक मारिला [पाहिला.] लोकांस सांगण्यास देखील शरमिंदे[7] जाले.

५. खानाच्या सैन्यात गलबल.

इतक्यांत खोजे वगैरे चौकीचे लोक यांत गूल जाली. लष्करांतही छापा आला अशी एकच गूल होऊन, लोक तयार होऊन कात्रजेचे वाटे[8] चहूंकडे धावूं लागले. गलबल पडली. यांत कोणी कोणास मिळेना. कांहीं पळूं लागले. कांहीं तयार होऊन छाप्याचे रोखें चालले. तों महाराजांनीं जागां जागां लोक ठेविले त्यांचे इशारतीच्या संकेताप्रमाणें मेळवीत मेळवीत मोठे प्रतापें यश घेऊन, जसा कालिया साप पत्न्यांचे करुणेंकरून श्रीकृष्णजीनें जित सोडिला, ऐसा खान याचे मानेवरि तरवार ठेविली असतां, काढून, शासन करून, सोडून देऊन, [ते] सिंहगडास विजयी होऊन सुरक्षित येऊन पावले.

---

१. 'नेऊन' सा. नेऊं या अर्थानें. निमित्तवाचक धातुसाधितांवर (ऊं प्रत्यय असलेल्या) अनुस्वार न देता त्याऐवजी 'न' घालण्याचा जुन्या मराठीचा प्रघात. २. शास्त (स्त्री०) [अ० सियासत्] – शिक्षा. ३. भयाभीत (वि.) भयभीत – भयाने बद्दल भया हे सामान्यरूप असल्यामुळे तृतीया अलुक. ४. 'आंबील वोहाळांत' सा० २. ५. खजील [अ० खजिल्] – लज्जित. ६. गूल (पु०) [अ० घूल्] – गडबड; गलगा. ७. शरमिंदा [फा० शर्मन्दा] – लाजलेला. ८. यापुढे 'व' सा०.

६. खान ना-हिम्मत.

तों प्रातःकाळीं गनिमाच्या फौजा झाडींत[1] जाऊन झाडांस व बैलांचे शिंगांस पोत बांधिले [आहेत], छापा नव्हे! असें पाहून सिंहगडाखालीं येऊन उभ्या राहिल्या. ते समयीं किल्ल्यावरून तोफेची मारगिरी केली. त्याणीं निशाणाचे हत्तीस गोळा लागून पडिला. लोकही फार जायां जाले. ऐसेंही जालें असतां महाराजांनीं विचार केला जे, "मोंगल वेढा[2] घालून बसले. यास्तव किल्ल्याचा बंदोबस्त करून, आपण पलीकडील वाटेनें उतरोन राजगडास जाऊन [पावावें.]" पावले. शास्ताखान ते दिवशीं फौजसुद्धां किलियाजवळ उभे राहिले. "पाउसाचे[3] दिवस, शिवाजी दगेखोर, मोठी[4] आंगेजणी [मीं] पाहिली. अफजल मारिला असें ऐकिलें. तसेंच आम्हांसही केलें असोन सोडिलें. जीवदान दिलें व शास्त केली. मोर्चे देऊन बसण्याचे दिवस नाहींत. फौज पावसानीं सडेल, व फौजेंत फितवा[5] असेल, तरिच डेऱ्यापर्यंत लोकसुद्धां येऊन पोंहचून बाडांत पोहोंचले. आणि आपणावरि एहसान[6] केलें." ऐसे प्रकारें कित्येक अंदेशे मनांत आणून, बाजतबरसात मसलत करणें पाहून करितां येईल म्हणून ना-हिमत होऊन, पुणें येथें शिवाजीचे नजीक राहाणें ठीक नाहीं जाणून, दरमजल कोस दोन कोसांच्या मजली करीत करीत पेडगांवीं[7] जाऊन छावणीस राहिला.

७. महाराजांनी बक्षिसे दिली.

याप्रमाणें शास्ताखान यास शास्त करून नामोहरम करून घालविला. महाराज बहूत संतोषी जाले. बरोबर लोक नेले त्यांस सर्वांस नावांजून, आपले बराबर धाडसें केलीं म्हणून सर्फराजी[8] करून बक्षिसें दिल्हीं. देशपांडे दोन असामींस पालख्या[9] दादाजी बापूजी व चिमणाजी बापूजी यांस दिल्ह्या.

---

१. 'झाडांत' सा०. २. वेढा (पु०) [सं० वेष्ट्]-गराडा; घेरा. ३. हे चूक दिसते. कारण हा चैत्र महिना होता (जे. श.). ४. 'मोठा' सा० व को०. मूळ फा० अङ्गेज हा शब्द पुल्लिंगी आहे. ५. फितवा (पु०) [अ० फुतूर्]-शैथिल्य. ६. एहसान (स्त्री०) [अ० इहसान्]-कृपा; उपकार. ७. पेडगाव-नगर जिल्ह्याच्या श्रीगोंदे तालुक्यात भीमेकाठी. ८. सर्फ (र्फ़ी) राजी (स्त्री०) [अ० सर्फ़राझी]-बढती. ९. पालखी (स्त्री०) [फा० पाल्की, सं० पर्यंकिका, का० पल्लक्कि]-शिबिका.

८. "शिवाजी बडा सैतान".

शास्ताखानाचें पारिपत्य केलें, नामोहरम होऊन छावणीस [आले] हें वर्तमान दिल्लीस गेलें. ते समयीं पादशहांनीं आश्चर्य केलें, व [त्यांस] क्रोधही आला. "शिवाजी बडा सैतान[1] पैदा हुवा, जें कोण्हीं आजपर्यंत कर्म न केलें, तेंच करितो. आपले सुभे बुडविले. खान गेले त्यांची गती अशी केली. किल्ले, कोट, मुल्ख घेतला. त्याचा बंदोबस्त, पारिपत्य चांगलें जालें पाहिजे," म्हणून बहुत विचारांत पडून, खानाचे बराबर सरदार लोक दिले होते त्यांजवर इतराजी करून [त्यांच्या] मनसबा, सरंजाम जप्त केले. आणि खानानीं इतकें सामान बराबर दिलें असतां जाऊन आब[2] गमावला, नामोहरम जाले. शास्तही करून घेतली. म्हणून तुम्हीं हुजूर[3] निघोन येणें, ऐसें फर्मान[4] [त्यांस] पाठविले[4] आणि हुजूर बोलवून घेतले. [खान] निघोन गेले.

९. शहाजीचा मृत्यू.

यानंतर शाहाजीमहाराज चंजाऊर प्रांतीं बेंगरूळ तालुकियांत होते तेथून रणदुल्लाखान वगैरे फौज चित्रदुर्ग तालुकियांत होती तेथें मदतीस बोलाविलियावरून आले. त्या तालुकियांतील गांव बोदेकीर[5] म्हणून तुंगभद्रा-तीरीं आहे. तेथें शिकारीस गेले. तों ससाची शिकार उठली. त्याचे मागें घोडा लाविला. तेव्हां गवचींत[6] घोड्याचा पाय जाऊन अटकळला[7]. घोडा व आपण तेच स्थळीं पडले. तेथेंच समाप्त जाले. शके[8] १५८३ प्लवनाम संवत्सरे, माघ शु॥ पंचमीस कैलासवास केला. हें वर्तमान महाराजांस आलें. तेव्हां बहूत श्रमी[9] होऊन "आपण आजपर्यंत पराक्रम केले ते महाराजांस वारोंवार लिहिले, त्यांणीं

---

१. सैतान (पु०) [अ० शैतान्] – पापमूर्ती – २. आब (पु० स्त्री०) [फा० आब] – प्रतिष्ठा ३. हुजूर (पु०) [अ० हुझूर्] – दर्बार; समक्ष; लक्षणेने स्वामी. ४. फर्मान (पु० फा०) – आज्ञापत्र. 'फर्मान' व 'पाठविले' यांच्यामध्ये 'समजाविले' सा० सा २ व को०. ५. 'होदिगेरे' असे हवे. ही मोडीवाचनाची चूक दिसते. ६. गवची – (स्त्री०) खड्डा. 'गवेचींत' की०. ७. अटकळणे (अ० क्रि०) – [सं० अर्ध + स्खलन, का० अड्ड + खळण] – ठेचकळणे. 'अटकला' की० व सा० २. ८. ही तिथी बरोबर दिसत नाही. 'शके १५८५ शोभ(न)कृत संवछरें माघ शुध शष्टी शनवारी शाहाजी राजे परलोकास गेले' (जेधे शकावली). ९. श्रमी-श्रमित (वि०) [सं० श्रम्] — दुःखी.

गौरव केला; याउपरि आपणांस वडील नाहींतसे[1] जाले," म्हणून खेद केला. जिजाबाई साहेब यांणीं सहगमन करण्याविषयीं आग्रह धरिला. हें पाहून आपण जाऊन मांडीवर बसोन राहाविलीं. बहूत रितीनें समाधान केलें. आणि सांप्रदायिक उत्तरक्रिया आरंभून लक्षावधी रुपये दानधर्म महादानें[2] केलीं. बोदेकीर येथें महाराजांची छत्री बांधविली. आणि तो गांव महाराजांची पूजा अर्चा व खर्च तेथें परिपत्यगार नेमून चालावा ऐसे[3] भरून त्यांस लावून दिल्हा.[3]

१०. जैसिंग, दिलेलखान चालून आले.

यानंतर पातशाहांनीं विचार केला जे, "मिरजा जैसिंग यांस मोहिमेस पाठवावें. ते हिंदू आहेत. राजकारण तह करून अथवा युद्ध करून हातीं लागल्यास घ्यावे अगर मसलत[4] करावी," म्हणून जैसिंग यांस सुमेदारी देऊन त्यांचे बराबर दिलेलखान पठाण विश्वासू मातबर सरदार दिल्हे. फौज, तोफखाना वगैरे सामान बहूत पोख्त करून दिल्हें. ते दरमजल येऊन, औरंगाबादेस पोहोंचोन सुभ्याचा बंदोबस्त केला, आणि महाराजांवरि चालून आले.

११. श्रीची आज्ञा.

तेव्हां महाराज विचारांत पडले जे, "दोन[5] सुभे दिल्लीचे आले ते बुडविले. श्रीनें त्यांचे पारपत्य केलें. हल्लीं मातबर सरदार मोठे आंगेजणीचे व सामान भारी असे आले. बरें, देव पार पाडणार! काय चिंता आहे!" म्हणून श्रीची प्रार्थना केली जे "या शत्रूचा पराभव कसा करावा?" ते समयीं श्रीचा संचार आंगीं होऊन बोलिले जे "अरे मुला, ये समयींचा प्रसंग कठीण आहे. याचा पराभव घडत नाही. तुजला दिल्लीस जाणें घडेल, तेथेंही कठीण प्रसंग प्राप्त होईल, परंतु तेथून निभावून[6] आणीन, तीर्थयात्रा बहूत घडतील. आजपर्यंत रक्षिले तसेंच रक्षीन." अशी आज्ञा जाली. ते चिटणीस,

---

१. 'नाहींतसे' हा अनेक-वचनी प्रयोग लक्षणीय आहे. त्याऐवजीं आधुनिक मराठीतील 'नाहीसे' हा प्रयोग व्याकरणदृष्ट्या अशुद्ध होय. २. महादाने-तुला-पुरुषादी सोळा मोठी दाने. ३. 'म्हणून त्यांचे ताब्यांत केला.' की०. ४. मसलत (स्त्री०) [अ० मस्लहत]–कपटव्यवहार. ५. वस्तुतः हे सुभे महकूबसिंग, एखलासखान व शायिस्ताखान असे तीन होते. ६. निभावणे (अ० क्रि०) [सं० निर्वहन]–बचावणे.

वाकेनीस यांणीं लेहून ठेविलियाप्रमाणें वाचून दाखविलें. तें ऐकून घेऊन बहूत संतोषी जाले. "सर्व प्रकारें श्री निभावणार आहे," असें बोलले. आणि विचार केला जे "जैसिंग आले, हे हिंदू आहेत, यांशी सख्याचेच विचारें बोलावें" म्हणून रायगडनें निघोन राजगडास आले. फौजा जमा केल्या.

१२. जैसिंगाकडून सख्याचे अनुसंधान.

[इकडे] जैसिंग व खान भीमा उतरून आले तों राजे राजगडीं आले हें कळोन सिंहगड व पुरंधर यांचे मधी[1] येऊन मुकाम करून राहिले. आणि जैसिंग यांणीं महाराजांचें चरित्र व राज्य-आक्रमणशक्ती पाहून "हा राजा हिंदू, परम धार्मिक, भला, धर्मस्थापना करणार, नीतीकरून राज्य चालवितो; यास कसेंही रक्षून पादशाहाची चाकरीही मनसबेचे युक्तीने बजावावी. युद्ध यांशी केलें असतां जय अथवा अपजय कसें पडेल [कोण जाणे.] याची फौज व लोक, सामान, जातीनें मनसबा [करणार] व ठिकाणें[2] बांकीं, सर्वगुणसंपन्न आहेत[2]. वरकड सरदार नामोहरम होऊन गेले तसेच आपणासही घडल्यास[3] ठीक नाहीं. आपण आब[4] रक्षून जावें." ऐसा विचार करून महाराजांकडे सख्याचें अनुसंधान[5] करावेंसें करून, वकिलाबराबर सांगून पाठविलें जे, "औरंगजेब बलवान, पृथ्वीपती. त्यांशीं तुम्हीं सख्य करावें; शत्रुत्वेंच राहून परिणाम या कालीं लागणार नाहीं; आम्ही हिंदू जयपूरचे राजे, तुम्ही उदापूरचे[6] घराण्यांतील सिसोदे थोर वंश[7] आहां. धर्मस्थापना हिंदू धर्म तुमचे कुलपरंपरा चालत आला तोच करितां. यास्तव तुम्हांस अनुकूल आहों. तुमचा बचाव करून राज्य रक्षावें हें आमचे चित्तांत्त बहूत आहे. तुमचे मानस काय आहे तें कळवावें."

१३. तसाच महाराजांचाही भाव.

असें[8] सांगून पाठविलें असतां महाराजांनीं गोष्ट मनांत आणिली तसाच यांचाही भाव आला. "श्रीची आज्ञा तसें एक वेळ दिल्लीस जावें, आपला[9] पूर्व

---

१. मधी (क्रि०वि०) [सं० मध्य]–मध्ये. २. याऐवजी 'ठिकाणें चांगलीं; बाकी सवर्गुणसंपन्न आहेत.' की०. ३. 'घडल्या' की०. ४. 'अबरू' की०. ५. अनुसंधान (न० सं०)–धोरण; योजना ६. 'उदेपूरचे' की०. ७. 'थोरवंशज' की०. ८. 'म्हणून' सा० सा० २ को०. ९. आपला पूर्व प्रांत—आपल्या पूर्वजांच्या हक्काचा मुलूख.

प्रांत दृष्टीस पडून गंगादी यात्रा पुण्यक्षेत्रें [पाहणें] हेंही घडेल. यास्तव सख्याचें बोलणें आलें तेंच उत्तम," म्हणून वकील आले त्यांचा गौरव बहुमान करून आपले वकील त्यांजबराबर पाठवावे, बोलणें लावावें, हा विचार करून, सर्व सरकारकून यांचे विचारें[१] विचार ठरावांत आणून, रघुनाथभट पंडितराव यांस हत्ती, घोडे लवाजिमा बराबर देऊन त्यांजबराबर वकिलीस पाठविलें. जैसिंग राजे यांस व खानास बहुमान वस्त्रें, पोशाख पाठविले.

१४. वकिलाची दिलेलखानाशी भेट.

ते [रघुनाथपंत] जाऊन भेटल्यावरि बोलणीं जालीं. त्यांत महाराजांचें बोलणें "आपण पादशाहाशीं सख्य असावें [म्हणतां], तेंच आम्हांस कर्तव्य. आम्हांकडे प्रांत व किल्ले, मुलूख आम्हीं आपले बाहुबळेंकरून पर-तालुकियांतील मेळविले, त्यांस पादशाहाकडून उपसर्ग[२] नसावा; आणि पादशाहाची स्वच्छता[३] घडावी; भेटी होऊन अधीक सर्फराजी व्हावी, हें आपणांस आवश्यक आहे; त्याअर्थी आमचा आपणाशीं दुसरा अर्थ नाहीं." हें बोलणें बहुत निखालसतेचें[४] ऐकून घेऊन जैसिंगराजे यांणीं उत्तर केलें कीं, "तुम्ही हिंदूधर्मउच्छेद जाला तो दक्षिण प्रांताचे ठाईं स्थापना करून देवब्राह्मणसंरक्षण करितां, हें आम्हांस संतोषकारक आहे. तुम्हीं आमचे रामसिंग जसे पुत्र तसेच आम्हांस [आहां.] तुम्हांशीं शपथपूर्वक दुसरा अर्थ नाहीं. तुमचे मतलब पादशाहाकडून काय काय करून घ्यावयाचे असतील ते लेहून पाठवावे, समजवावे. त्यासारखें पुढील बोलणें चालू होईल." म्हणून वकिलापाशीं सांगून दिलेलखान याची भेट करविली. त्यास बहुमान वस्त्रें, जवाहीर आणिलें तें देविलें. बोलणींही समजाविलीं. त्याची सलाह घेऊन, पंडितराव यास वस्त्रें बहुमान देऊन, त्यांजबराबर महाराजांस बहुमान वस्त्रें, जवाहीर देऊन परतून रवाना केलें.

१५. खानाचा दुराग्रह.

ते महाराजापाशीं येऊन जैसिंगाचीं बोलणीं समजाविलीं. महाराजांनीं आपले मतलब लेहून काढिले. "आम्हीं राज्य घेतलें हें दरोबस्त[५] आमचें अम्हांकडे

१. 'सर्वांचे विचारें' कीं०. २. उपसर्ग (पु०) [सं० उप+सृज्]–उपद्रव; त्रास; ३. स्वच्छता [स्त्री०] [सं० स्वच्छ]–शुद्धता; निर्मळपणा ४. निखालस (वि०) [नि+अ० खालिस्]–सरळ; शुद्ध. ५. दरोबस्त [फा०]–सर्व, तमाम.

राहावें. वरकड दक्षिण प्रांत यांतील चौथ, सरदेशमुखी आम्हांकडे चालावी. किल्ले, कोट घेतले ते व नवे केले ते आमचे आम्हांकडे असावे. आणि सख्य घडावें." ऐसे मतलब सांगून पुन्हा वकील रवाना केले. आणि त्यांणीं जाऊन यादी[1] दाखविल्या, बोलणीं सांगितलीं. तेव्हां महाराज तह करितात हा सिद्धांत जैसिंगास निश्चयाचा कळला. आणि भेटी व्हावी नंतर परस्परें निखालसता ठरोन, बोलणीं करार करितां येतील, ऐसा ठराव केला. तेव्हां दिलेलखान यांचे विचारें, "लागलीच भेटी घेऊन बोलणीं पक्केपणांत [आणून] या जातीचा तह ठरवूं नये; सर्व वाके पादशाहास लिहून पाठवून तेथून आज्ञा येईल त्या अन्वयें पुढील विचार करावा. मसलत करून आलों, हा दाब[2] वाढवून कांहीं प्रांत, किल्ले सोडवावे आणि नंतर करणें तें करावें. पादशाहाकडील उत्तरें येत तों आम्ही पुरंधर[3] घेतों, तुम्हीं सिंहगड घ्यावा." ऐसें बोलणें आग्रहाचें पडलें. ते समयीं "शिवाजी राजे तहानें येतात हें वाईट नाहीं. पादशाहाचे आज्ञेप्रमाणें त्यांचेंही बरें पादशाही मतलब करून [घेऊन] आपलेसे करावे, दौलताबाद तालुक्यांतील प्रांत, किल्ले घेतले ते तहानीं सोडवावे" हें उत्तम, असें (जैसिंगानें) सांगितलें असतां खानाचा आग्रह न सुटला. "पादशाहास लिहून करणें तसें करूं," म्हणून वकिलास निरोप देवविला.

१६. पुरंदरचा वेढा.

आणि [खान] आपण कूच[4] करून, पुरंधरानजीक येऊन, मोर्चेबंदी करून वेढा घातला. रुद्रमाळचे डोंगरावर दमेदमे[5] रचून, तोफा चढवून मारगिरी[6] केली. आणि हल्लेनीं किल्ला घ्यावा. किल्ला म्हणजे हिसाब काय आहे? हल्ला[7] करावी. ऐसा विचार केला. ते समयीं महाराजांनीं राजगडाहून केदार[8] दरवाज्याकडून रसद पोंहचविली. लोकांची भरती केली. वरचेवरि मदत करिते

१. यादी (स्त्री०) [फा० याद्]–टिपणे. याद ही एखाद्या विशेष दर्जाच्या माणसाकडून येते. २. 'दाब बसवून' सा० २. ३. पुरंध-(द) र–पुण्याहून आग्नेयीस २५ मैल. ४. कूच (न.) [फा० कोच्]–प्रयाण; मजल. ५. दम्दमा–धम्धमा (पु०) [फा० दम्दमा]–तोफ चढविण्याचा उंचवटा. ६. मारगिरी (स्त्री० फा०)–मारा. ७. हल्ला (स्त्री० पु०) [अ० हम्ला]–चढाई; छापा. ८. केदारेश्वराचा दरवाजा गुप्त असावा. (स. च. पृ. २५९)

जाले. मोर्चे मारून उठऊन[१] दिल्हे. त्याजवरून फारच अभिमानें करून आग्रहास प्रवर्तला. आपली कुल जमियत एक करून, आपण खासा नारायणाचे देवळापाशीं उभे राहून, लोक पायउतारा करून, किलियावरि हल्ला चढविली. तोफेची मारगिरी करून पेंढार[२] वगैरे पुढें घातलें, त्याचे मागें गारद;[३] त्याचे मागें पठाण[४] लोक, तोफा; त्यामागें आपणही चालून घेतलें. याजवरून किलियावरून मुरार बाजी देशपांडे माहाडकर प्रभू मावळे लोकांचे सरदार होते. त्यांणीं लोक निवड करून, धारकरी घेऊन, हल्लेवरि चालून घेतलें. पेंढार कापून पिटलें. मागें पठाण व गारद होते, ते उभे राहिले, त्यांजवरि सरसून[५] आले. पठाण हजार दोन हजार गोळी व तरवार चालवून[६] रणीं पाडिले. मावळे लोकही बहूत पडिले. सारी हल्ला मारून डोंगराखालीं पिटीत आणिली. तेव्हां खासा दिलेलखान चालून गेले. त्याजवरि मुरार बाजी लोकसुद्धां चालून आले आणि लोक मारीत सुटले. तेव्हां खानही आपले जागां दंग[७] जाला. पुढें हल्ला चालेनासें [मावळ्यांनीं] केलें. खान तोंडांत बोट घालून चकित जाला. शिपाईगिरीची शर्थ केली! मावळे लोक हे शिवाजीपाशीं सैतानखाना आहे म्हणून बोलोन 'कौल घ्यावा' असें सांगून पाठविलें असतां "तुम्ही तुरुख,[८] तुमचा हिसाब काय? तुमचा कौल कशास पाहिजे? मी शिवाजीचा चाकर आहें! मरून खस्त[९] होऊन तुम्हांस नामोहरम करीन!!" असें बोलोन [मुरार बाजीनें] पुढें चालून घेतलें. तेव्हां दिलेलखान याचे हातचा तीर लागून, आणखीही जखमा बहूत चढून रणीं ठार पडले. लोकही त्यांजबराबर बहूत पडले. वरकड सांवरून निघोन किल्ल्यावर गेले तों महाराजांकडील आणखी नामी लोक भरतीस आले ते पोहोंचले. नगारे, करणे वाजूं लागले [कीं] किल्ला हुशार आहे, तोफा चालूं लागल्या, धोंडी लोटल्या. हें कळोन खान खजील होऊन शेवटास हल्ला जाणार नाहीं, हटानें करणें, लोक मार [वि] णें चांगलें नाहीं, म्हणून गोटास आले. अस्तमानही जाला.

१. 'उघळून' सा० २. २. पेंढार–रा–री (न०)–लुटारू घोडेस्वार. (रामोशी, महार इ.) ३. 'गारदे' की०. ४. पठाण (पु०) [पुश्तान=डोंगरी लोक. सं० पक्थन् ?]–मुसुल्मानाची एक जात. ५. सरसून–सरसावून, चाल करून. ६. 'चालून' को०. ७. दंग (फा०)–चकित; हतबुद्ध. ८. तुरुख (क) (पु०) [सं० तुरुष्क]–मुसुल्मान. मूळ अर्थ तुर्कस्तानात राहणारा. येथे निंदाव्यंजक. ९. खस्त (वि० फा०)–नष्ट.

१७. दिलेलखान सर्द होतो.

तेव्हां जैसिंग यांणीं सांगून पाठविलें जे, "हें करितां हें चांगलें नाहीं. शिवाजी राजाचीं माणसें एकाहून एक अधीक आहेत. किल्ला येणार नाहीं. एक किलियास इतकीं माणसें खराब केलीं. खडे खावविले. तेव्हां सारे किल्ले मोठे झाडींतील कोंकणबांधारी वगैरे कसे येतील? शयाद्रीचे किल्ले बिकट, झाडी रान यास कसें कराल? शिवाजी राजे राजकारण करून येऊन भेटत होते तें सोडून विश्वासही गमाविलात. राजकारण तोडिलेंत. पुढें विचार काय? इतक्यांत सिंहगडावरि सुलतानढवा[1] [करावा] म्हणून सरदार फौज देऊन मोर्चे लावावयास पाठविला होता, त्यास महाराजानीं छापा पाहाटेस पांच चार टोळ्या करून गर्दी करून घालून बुडविला,[2] सरदार मारिला, फौज लुटून घेतली." हेंही वर्तमान आलें. याजवरून खान सर्द होऊन जैसिंग यांसि बोलिले जे, 'राजे यांसि पुन्हा भेटीचें राजकारण विश्वास ज्या रितीनें पडेल तसें करून, करवावें; परंतु त्यांत पुरंदरास मोर्चे आम्हीं लावून हल्ला केली, प्रतिज्ञा केली असतां गोष्ट न घडली येविषयीं किल्ल्यावर आमचें निशाण त्यांनीं घेऊन [आमचे] लोक चढवावे. पुन्हां किल्ला त्यांसच तहांत द्यावा. हें मात्र करून घेऊन मागील बोलणें आहे त्याप्रमाणें चालवावें."

१८. खानाने 'फौज उठविली'.

याजवरून जैसिंग राजे यांणीं "प्रयत्न करून घडेल तितकें पाहूं" म्हटलें.[3] महाराजांशीं जैसिंग यांचे चित्त मिळालें होतेंच. खानाचे दुराग्रहामुळे वकिलास निरोप दिला (होता) आंतून ऐक्यता[4] होती. पुन्हा वकील पाठवून "जाली ती गोष्ट बरीच जाली. याउपरि पूर्वीं बोलणें आहे तेंच कायम करून किल्ल्यावरि मात्र एक वेळ निशाण[5] ध्यावें आणि किल्ला तुम्हींच ठेवावा" [असें] सांगून पाठविलें असतां महाराजांनीं सांगून पाठविलें जे, 'निशाण [तुमचें] घेऊन किल्ला दिल्हा हें कांहीं घडणार नाहीं. खानानीं दोनशें पांचशें हजार लोकांनिशीं पाहिजे तसें किल्ल्यावरि येऊन किल्ला पाहून फिरोन जावें." ऐसें सांगून

---

१. सुलतानढवा–घाडसी हल्ला. 'स्यात् साहसाधिरोहस्तु सुलतानढवाभिधः' रा. व्य. को. २. 'उडविला' की०. ३. 'म्हणोन' सा० सा० २ व को०. ४. 'एक विचार होता' की०. ५. निशाण (न०) [फा० निशान्]–ध्वज, झेंडा.

पाठविलें. यावरून खान किल्ल्यावर जावे ऐसें ठरोन खानास पांचशें लोकांनिशीं किल्ल्यावर घ्यावें ठरलें, आणि किल्ल्यावरि दोन हजार माणसें बहूत नामी[१] लोक, सामान, तोफा वगैरे बहूतच तरतुदीचे[२] शिलेपोष[३] दुरस्ता उभे [करून,] सदरेस[४] बैठक तरतूद करून [खानास] वरतें घेतलें. सामान पाहातां बहूत चांगलें, दगाबाजी करूं म्हणतां चालावयाचें नाहीं, गर्दीस मेळवितील, दगा पावूं, म्हणोन खालीं उतरोन येऊन शरमिंदे जाले. "केलें कर्म[५] शेवटास न गेलें; किल्ले, कोट घेणें अवघड गोष्ट; राजे यांचे माणूस बहूत चांगले, मर्द व तरतूद राजाची [चांगली] व लढाई करण्याची शर्त जाली म्हणोन गोटांत आले. भेटी व्हावी हा सिद्धांत जालाच होता. परंतु रुद्रमाळ[६] खानानीं दमदमे रचून घेतली ती परत द्यावी आणि पुरंधरापासून फौजा उठून जाव्या, नंतर भेटीचा योग घडेल असें सांगून पाठविलें. यावर रुद्रमाळ परत दिली [व] फौज उठविली.

१९. जैसिंगाची खातरजमा.

यानंतर पंडितराव यांसि पुन्हा रवाना केलें. "तुमचा विश्वास कसा पडतो? एक वेळ बोलणें ठरावांत आणिलें असतां तुम्हींच तह बिघडविला. आतां भेठी कशी घ्यावी? हे खातरजमा[७] व्हावी." म्हणून [रघुनाथ पंडित] बोलल्यावर आण शफत[८] खानासह निखालसता जैसिंग यांणीं करून देऊन "यादीचा करार ठराऊन लिहिले मतलबाप्रमाणें पादशाहापासून करून आणूं," ऐसें ठराऊन खातरजमा केली. जैसिंगाचें म्हणणें "तुम्ही आम्ही एक रजपूत. [तुम्ही] राणे सिसोदे आम्ही कछवे.[९] शरीरसंबंधीच आहो; जसे रामसिंग तसेच तुम्ही आम्हांस; दुसरा प्रकार [मनांत न धरावा,] ज्यांत तुमचें बरें तें सर्वप्रकारें करीन." म्हणून वकील रवाना केले.

---

१. नामी (वि०) [फा० नाम्]–उत्कृष्ट. २. तरतूद (स्त्री०) [अ० तरद्दुद्]–व्यवस्था. ३. शिलेपोष (स०) (वि०) [फा० सिलह्पोश्]–चिल्खती, हत्यारबंद. ४. सदर (स्त्री०) [अ० सद्र]–सभामंडप; श्रेष्ठासन ५. 'नेम' की. ६. रुद्रमाळ–पुरंदरच्या ईशान्येस. यास 'वज्रगड' हेही नाव आहे. पुरंदरच्या माचीचे (पायथा व शिखर यामधील सपाट जमीन) संरक्षण रुद्रमाळ किल्ला करतो (सरकार-शिवाजी पृ. १११). ७. खातरजमा (स्त्री०) [फा० खातिर्जमूअ]–समाधान ८. आण शफत (स्त्री०) [सं० आज्ञा–शप्]–प्रतिज्ञा. ९. कछवे–रामाचा पुत्र कुश याच्या वंशातील.

२०. महाराज भेटीस आले.

त्यांणीं जाऊन सर्व वर्तमान समजाविलियावरून भेटीस आले. आपली फौज व हषम लोक निवड करून बराबर घेतले. उभयतां पेशवे व सुरनीस[१] संभाजी महाराजांपाशीं फौज पंचवीस तीस हजार व हषम असे किल्ल्याचा बंदोबस्त करून ठेविले. बरोबर सरदार, सरकारकून,[२] फौज, पागा पंचवीस तीस हजार व हषम दाहा हजार मावळे लोक त्यांस पोषाख बादली[३] व पैठणी[४] [होते.] घोड्यांस सामानें सोनें रुपें यांचीं; व मुत्सद्दी सरदार वगैरे यांचे आंगावरि जवाहिरें; तसेंच हत्तीचीं सामानें भरजरी, पायीं सोन्यारुप्याच्या सांखळ्या; अंबाऱ्या,[५] हौदे[६] सोन्यारुप्याचे ऐसे शेंपन्नास; तसेच खिजमतगार,[७] हुजरे वस्त्रें अलंकार सोन्याचे येणें करून युक्त; पायचे सरदार यांस सोन्यारुपे [चीं] कडीं, सांखळ्या, कंठ्या, या प्रमाणें तरतूद करून, आपण खांसा साधा पोशाक करून अंबारींत बसोन, हातीं तरवार तीर-कमान घेऊन, पाठीमागें मुत्सद्दी[८] व सरकारकून व सरदार यांच्या अंबाऱ्या पंचवीस चाळीस, पुढें हत्ती कोतवाल,[९] जिलीब[१०] लोक, शाहाजानी[११] धाडी, करणे, शिंगें रुप्याचीं पंचवीस पन्नास[१०], अैसे भेटीस आले. जैसिंग यांचा इतबार पक्केपणें पुरला होताच, बेकिलाफ[१२] उभयपक्षींही जाला होताच. महाराज आले हे बातमी येतांच जैसिंगही खान यांस बराबर घेऊन, फौज स्वारी तयार करून सामोरे गेले. आणि इकडील तिकडील लोक, सरदार हजार पांचशें खासे नेमून त्यांच्या समारंभें करून भेटी करविल्या. नंतर खासाही भेटले. परस्परें बहूत आदर जाले. महाराजांचे लोक व सामान तरतूद पाहून सर्वही बहूत चकित जाले. "ज्याचें देणें व संपत्ती अशी, तेव्हां लोक जिवाची परवा कशास ठेवितील? किल्ले कोट येणें, मोठे धाडसाचीं कर्में [करणें] असें

१. सुरनीस (पु०)–सनदावगैरेवर शिक्का मारणारा अधिकारी. २. 'सरकारखानदार' की०. ३. बादली (वि०). सूत रेशीम व जर यांचे विणलेले. ४. पैठणी (वि०) [सं० प्रतिष्ठान]–पैठणचे (पागोटे इ०). ५. अंबारी (स्त्री०) [अ० इमारी]–हत्तीवरील सछत्र बैठक. ६. हौदा (पु०) [अ० हौदज्] हत्तीवरील छत्र नसलेली बैठक. ७. खिजमतगार (पु०) [फा० खिद्मतगार]–सेवक. ८. मुत्सद्दी (दी) (पु०) [अ० मुतसद्दी]–कारभारी. ९. कोतवाल (पु० फा०) [सं० कोट्टपाल]–स्वारीपुढें शोभेसाठी चालविलेले. १०. या ऐवजी "संगे लोक मर्द होते शिंगाडे यांचीं शिंगे रुप्याचीं होतीं" की०. ११. शाहाजानी धाडी–(पु०)–शहाजहानच्या वेळेसारखे भाट. १२. बेकिलाफ (पु०) [फा० बी० + अ० खिलाफ्]–निर्वैर.

सामान असतां अगाध[1] काय आहे ?" ऐशी चर्चा करूं लागले. सर्वांचे पोशाख व आभरणें, अमीर लोक, मातबर सरदार पाहून राजा कोणता हा संदेह जनास पडला. महाराजांनीं जवाहीर देखील अंगावर विशेष घातलें नाहीं. भेटी जालियावरि जैसिंग व महाराज एके अंबारींत बसून डेरियास आले. तेथेंही एक आसनीं बसले. विडे, पान आदर[2] होऊन गोटास जाण्याचा निरोप दिल्हा.

दुसरे दिवशीं, "दिलेलखान यांचे डेरियास जावें, पादशाही इतबारी, मातबर अमीर आहेत" म्हणून जैसिंग यांणीं सांगितल्यावरून ठरलें. बरोबर सुभानसिंग[3] मामा दिल्हे. त्यांसह महाराज त्यांचे डेरियास जातां खान गोटाबाहेर सामोरे येऊन गेले. वस्त्रें, बहुमान, जवाहीर, हत्ती, घोडे, राजे यांस दिल्हे; व मानकरी मुत्सद्दी यांस वस्त्रें, जवाहीर देऊन तहाचें बोलणें परस्परें चालतें जालें. सुभानसिंग यांणीं राजियाचें बोलणें सांगितले—यावरून "जैसिंग राजे सुभेदार, वडील[4], पादशाहाचे[5] इतबारी, आम्ही त्यांचे ताबिनांत[6], ते करितील त्यांत आम्ही आहों." ऐसें खान सफाईनें बोलले. महाराज गोटास आले. नंतर जैसिंग व दिलेलखान यांस मेजवान्या महाराजांनीं बहूत तरतुदीनें केल्या. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें व मातबर सरदार अमीर यांसही वस्त्रें, जवाहीर योग्यतेनुरूप दिल्हें. त्यानंतर खान व जैसिंग यांणींही महाराज यांसि मेजवान्या केल्या. सरकारकून सरदार यांस वस्त्रें, जवाहीर दिल्हें. महाराज यांस जवाहीर, हत्ती, घोडे देऊन समारंभ केला. जैसिंगाची ममता मनःपूर्वक व बोलणें [गोड], उत्तम प्रकारें निखालसता जाल्या. "राजा परम धार्मिक, कुलीन होय, यास यश येऊन दिवसेंदिवस वृद्धिंगत [होवो,[7]] दैववान व पराक्रम करणें विचित्र दिसतें. यास्तव जसें साहित्य होईल तसें याचें करावें, यास राखावें, म्हणून करिते जाले. ते समयीं जंजिरेकर सिद्दी संबळ हपशी जैसिंग यांजकडे आले होते. महाराजांनी जंजिरा आम्हांकडे देवावा बोलणें घातलें असतां,

---

१. अगाध—अशक्य या अर्थी. २. 'अत्तर गुलाब' की०. ३. सुजनसिंग (बुंदेला ?). हा जयसिंगाच्या बरोबर बादशहाने दिला होता. ४. 'वयें वडील' की०. ५. 'पादशाहीचे ठायीं इतबारी आहेत.' की०. ६. ताबीनात [अ० ताबिईन अनेकवचन ताबिअचे]—आश्रित; स्वाधीन. ७. 'पावावें' सा० सा० २ व को 'पावो' की०.

"पादशाही चाकर ते, औरंगजेबाची आज्ञा पाहिजे, तुमचे मतलबांत लिहून पाठवूं," ऐसें उत्तर केलें. नंतर राजे निरोप घेऊन राजगडास आले.

२१. बादशहाच्या भेटीचा करार.

[जैसिंगानें] तहनामे लेहून, त्यांत पूर्वी कलमें लिहिलीं [तीं] व जंजिरे याचेंही कलम लेहून आणविलें.[१] डाकेवरि[२] रवाना केलें. येथें जालें वर्तमान वाके सर्व लिहिले. "राजे भेटीस दिल्लीस यावयाचें ठरलें. यादीवर[३] रुकार[४] होऊन सनदा[३] याव्या. आम्ही उभयतां बाहादारीस[५]—निभावणीस ठेवावे[५] म्हणजे दिल्लीस येतात.[६] नंतर आपणही सफाई करून सर्फराज करावे." असे कितेक प्रकार जैसिंग यांणीं लिहिणें तें लिहिले. आणि कूच करून नदी भीमातीरीं मुकाम केला. नंतर पादशाहाचीं उत्तरें आलीं. "उभयतां निभावणी बाहादारीस[७] व्हावें. जंजिरे कलम बोलों नये. वरकड किल्ले, कोट पादशाही दौलतींतील सोडावे. त्यांतही दौलताबादेखालील प्रांत, किल्ले हे सोडावे. चौथाई व सरदेशमुखी करार करावी. हुजूर भेटीस आलियावरि येथून प्रांत, किल्ले सफाईची चाल पाहून देणें तें देतां येईल." ऐशीं उत्तरें यादीवर स्वाल[८] होऊन आलीं. यावरि महाराजांस पत्रें पाठवून आणवून पुन्हा जैसिंगांनीं ठराव केला. "विजापूर प्रांतांतील त्या पादशाहींतील [प्रांत किल्ले] घेतले[९] त्यांजविषयीं बोलों[१०] नये, व त्या लगतीं कांहीं प्रांत व किल्ले दौलताबादेखालील हेही जुन्नर वगैरे तालुके राहावे.[११] बाकी सत्तावीस किल्ले, त्रिंबक नासिक प्रांत, बागलाण, खानदेश सोडावे.[१२]" ऐसे ठरोन करार यादी, तहनामे करून

---

१. 'आणिलें' सा० सा० २ व को०. 'पूर्वकलम जंजिरे याचें लिहून' की०. २. डाक (स्त्री० हिं०)–घोड्याचे किंवा सांडणीचे टपाल. टपालाची मूळ कल्पना खलिपाच्या राज्यातील मोआवियाने सुरू केलेल्या बरीद (अ०) म्हणजे टपाल यापासून घेतली. (कृ. पां. कुळकर्णी–मराठी व्युत्पत्तिकोश (१९४६) पृ० ३४७). ३. 'यादी व रुकार सनदा' सा० व को०. ४. रुकार (पुं०) [फा० रु+सं० कार]–संमती. लेखाची नक्कल घेतल्याबद्दल रु असे चिन्ह असे. ५. बाहादारी–बाहीदारी (स्त्री०) [सं० बाहू+फा० दारी]–जामिनकी. 'बहादरीस' निभावणीस व्हावें की० व सा० २. ६. 'येतों' की०. ७. 'बहादरी सांगून' की०. ८. स्वाल–साद (स्त्री०) [अ० सहीह्]–सही; मान्य. ९. घेतले–कर्ता शिवाजी. १०. बोलों नये–याचा कर्ता मोगल. ११. राहावे–शिवाजीकडे. 'राखावे' की० व सा० २. १२. सोडावे–याचा कर्ता शिवाजी.

उभयपक्षींचे वकील जाऊन, तेथून तहनामे करार होऊन यावे, नंतर जाण्याचा बेत करावा. ऐसें ठरावून आपलेकडील मातबर माणूस देऊन महाराजांकडील सोनोपंत डबीर यांचे मेहुणे रघुनाथ बल्लाळ कोरडे, बरे, शाहाणे, पारसनीस[१] होते जाणून, दिल्हे आणि दिल्लीस रवाना केले.

२२. खानाचा मत्सर.

जैसिंग राजे व दिलेलखान औरंगाबादेस जावयाचा विचार ठरावून जात विजापूर प्रांतीं खंडणी घ्यावयाची, महाराज बराबर फौजसुद्धां यावे म्हणोन बोलोन, कूच करून निघाले. जैसिंग व महाराज [यांणीं] एके अंबारीत बसावें, [उभयतांची] बहूत निखालसता, हें पाहून आपली अंबारी मागें चालवणें वगैरे [दिलेलखानास) असह्य वाटूं लागलें. तेव्हां पेडगावीं आपले राहाण्यास ठाणें बांधावयाचें म्हणून काम लावून तेथेंच खान राहिले. महाराज व जैसिंग पुढें गेले. खंडणी जाली. नंतर महाराज निरोप घेऊन दिल्लीचे जाब[२] येतांच जाणें पडेल, किल्ले कोट वगैरेचा बंदोबस्त जाला पाहिजे, म्हणून निरोप घेऊन निघाले. जैसिंग औरंगाबादेस गेले.

२३. किल्लेकऱ्यांची सत्त्वपरीक्षा.

राजे पन्हाळिवरून येते जाले. तेव्हां महाराजांनीं विचार केला जे, "आपण किल्ल्यांची खबरदारी केली तसे रितीनें किल्लेकरी चालून खबरदार, सावध आहेत नाहीत पाहावें. म्हणून रात्रीसच किलियावरी गेले. आणि हवालदार यास हाक मारून " महाराज आले, गनिमाची झड[३] मागें आली आहे, दरवाजा उघडून किल्ल्यावरि घेणें." ऐसें सांगितल्यावरून तटावरि सारे अधिकारी दरखदार[४] व लोक घेऊन हवालदार येऊन उभे राहून रात्रीस दरवाजा उघडूं नये हे कैद[५] महाराजीं करून दिल्ही, यास्तव उघडीत नाहीं; "शत्रू आला असला तरि घेरियाचे लोक व खालील हुशार करून रोखून राखितों, महाराजांनीं दरवाज्यानजीक

---

१. पारसनीस [पु० फा०]–फार्सीपत्रव्यवहार करणारा. २. जाब (पु०) [अ० जबाब्]–उत्तर. ३. झड (स्त्री०) [ध्व. प्रा. दे. झडी]—पाठलाग. ४. दरख (क) दार (पु०) [अ० दरक्+फा० दार]–वंशपरंपरागत अधिकारी. 'खबरदार' की०. ५. कैद (स्त्री० अ०)–नियंत्रण; शिस्त.

खालीं तटालगत असावें; येथूनही[1] तोफा व लोक करवळ उभे करून पुढें येऊं न पावे ऐसें करितों."' ऐसा अर्ज केला असतां, "तुमची सर्फराजी होईल, आज्ञाही आमची व परवानगीही आम्हींच सांगतों, दरवाजा उघडावा." ऐसें बोलल्यावरि[2] "दरवाजा उघडीत नाहीं, रात्र थोडी आहे, मागील गलबल पडूं देत नाहीं," ऐसें उत्तर केलें, याजवरि "तुमचें पारपत्य केलें जाईल. तुम्ही चाकर इतबारी, सांगितलेप्रमाणें चालवें तें घडत नाहीं, हें चांगलें नव्हे, पारपत्यें होतील." असें भयही घालून सांगितलें. तथापी दरवाजा उघडिला[3] नाहीं. तों प्रातःकाळ जाला. तों सर्व कारभारी, हवाल्दार हात बांधोन, दरवाज्याजवळ येऊन, कुलपें काढिलीं. आणि महाराजांस आंत घेऊन "आम्ही अन्यायी, पारिपत्य करणें असेल तें करावें"[4] असें बोलले. यावरि महाराज त्यांजवरि बहुत संतोषी जाले. त्यांस नावांजून सर्फराज केलें आणि वाढविलें. "आज्ञा तसे चालतां, इमानी, इतबारी, प्रमाण आहां," ऐसें बोलोन त्यांचा गौरव केला, आणि निघोन सातारियावरून राजगडास चालले. श्रीरामदासस्वामींचें दर्शन घेऊन, सर्व वृत्त निवेदन करून, 'दिल्लीस जाणें प्राप्त, कसें करावें?' विचारिलें. "जावें, फत्ते पावाल, संकट दूर होईल, तूर्त प्रसंगें जाणेंच प्राप्त आहे," ऐशी आज्ञा जाली.

२४. बाजी मुरार यास सर्फराजी.

नंतर आज्ञा घेऊन राजगडीं पावले. तेथें आलियावरि मुरार बाजी यांणीं पुरंधरीं लढाई बहूत शर्तीची मारली, शिपाईगिरीची सीमा केली, शेवट जखमा लागून मुर्द्याचें मांस ढालेंत भरून नेलें, यावरून बहूत संतोषी होऊन, त्यांचे पुत्र बाजी मुरार यांस आणून, नवांजिसी करून, पालखी, वस्त्रें बक्षीस देऊन, त्यांची सरदारी त्यांस सांगून, दोन गांव उरवडें वगैरे म्हणून मुठेखोरें[5] यांतील इनाम वंशपरंपरेनें करून दिले. याप्रमाणें सर्फराज केले.

२५. बादशहाचे कारस्थान.

यानंतर स्वारी रायगडावर गेलियावर दिल्लीहून पादशाहांनीं विचार केला

---

१. 'शत्रू पुढें न येण्याचा बंदोबस्त वरून करून रोखून पुढें येऊं देत नाहीं' की०.
२. 'बोलविल्यावरि' सा०. ३. 'उघडीत नाहीं.' को० 'उघडीतना' की०.
४. 'करवावें' सा०. ५. 'मुसेखोरें' की०.

जे, "शिवाजी राजे यांस तह ठरावून, आपणापाशीं आणून, कसेंही करून निरोप न देतां गोवून ठेवावें. सफाईनें चालिल्यासि[1] इकडीलच मातबर कामें सांगावीं. किंवा[2] शिवाजी दगाबाज, हुनरी[3] आहे. कोठेंही अंतर पाहून करूं[4] येईल तसा विचार करावा. उगेच मसलत लांबवून सरदार फौज पाठविणें, खासा स्वारी करणें, हें या करण्यानीं घडत नाहीं." म्हणोन सर्व तहनामा, जैसिंग यांणीं लिहिलेप्रमाणें, चौथ, सरदेशमुखी विजापुरी प्रांत तालुके व त्या लगत किल्ले कोट करार करून, जंजिरे याचें कलम[5] गाळून, हें बोलूं नये; सत्तावीस किल्ले व तो प्रांत सोडावा; पादशाही उमराव म्हणून, येथें भेटून रुजू[6] होऊन, सर्फराज होऊन जावें. ऐसें ठरवून यादीवर स्वाल[7] व सनदा करून[7] जैसिंग यांजकडे रवाना केलें. 'तुम्हीं बाहादार[8] होऊन खातरजमा करून रवाना करावें, लिहिलें. वकील गेलेयाचीं पत्रें रवाना करविलीं. तीं जैसिंग यांजपाशीं येऊन पावलियावरि त्यांणीं पंडितराव यांस बोलावून घेऊन महाराजांकडे सर्व[9] रवाना केलें. ते घेऊन आले आणि दिल्लीस जाण्याचा विचार पक्केपणें ठरावांत आला.

२६. महाराजांचे प्रयाण.

याजवरून कारभारी मातबर या सर्वांस विचार पडला जे, "हें कर्म दुर्घट दिसतें. दिल्ली म्हणजे दोन महिन्यांची वाट, स्वदेश नव्हे, तेथें जाणें! औरंगजेब केवळ दैत्य होय! हें संकट कसें निभावेल?" ऐसा विचारही कोण्ही कोण्ही महाराजांस सांगूं लागले. महाराजांनीं उत्तर केलें कीं, "एक वेळ दिल्लीस जाणेंच प्राप्त. श्रीनींही जाणें घडेल, परंतु[10] निभावून आणीन, आज्ञा केली आहे. तो प्रांत, दिल्लीचें स्थान व पूर्वील आपले वडिलांनीं उत्तरप्रांतीं राज्यें केलीं ती जागा अवलोकन तरी करावी. आणि त्या प्रांतीं भागीरथी, यमुना हीं तीर्थें करावीं. बाहादारही बळकट आहेत. पादशाही तहनामे करार होऊन आले. यांत आपणास चौथ, सरदेशमुखी हे राज्यविभाग असे कायम

---

१. 'चाललेस' को० २. 'कीं' सा० व को०. ३. हुन(न्न)री (पु०) [फा० हुनर्] –धूर्त, युक्तिबाज. ४. 'करून' सा० २. ५. कलम (न० अ०)–मुद्दा; बाब. ६. रुजू (स्त्री०) [अ० रुजूअ]–हजर; दाखल. ७. 'स्वाद करून सनदी करून' की०. ८. 'बहादर' की०. ९. सर्व–खिलत–खिलात (पु०) [अ० खिल्अत्]– सन्मानाचा पोशाख वगैरे. १०. 'परतोन' की.

जाले. पुढें श्रीहरी करणार तसें वाढेल. कसाही प्रसंग पडल्या कळेल तसें निभाऊन येऊं." ऐसा सिद्धांत करून सर्वांस सांगितलें आणि 'जावें' हाच विचार सबल पक्ष ठरविला. देशीं जिजाबाईसाहेब व राजारामसाहेब यांस ठेविलें. मोरो पंडित पेशवे, अण्णाजी दत्तो सुरनीस व निळो सोनदेव मजमदार हे तीन सर्वाध्यक्ष, यांचे स्वाधीन राज्य करून रायगड प्रांतांत ठेविले. आपण बराबर संभाजी राजे घेतले. कारभारी निराजी[1] रावजी न्यायाधीश, बाळाजी आवजी चिटणीस, त्रिंबक सोनदेव डबीर, जीवनराव माणको, नरहर बल्लाळ सबनीस, दत्ताजी[2] त्रिंबक, राघो मित्र, प्रतापराव गुजर सरनोबत, दावजी गाढवे, हिरोजी फर्जंद वगैरे कित्येक मातबर सरदार विश्वासू[3], पांच चार हजार[3] पागा चांगली निवड करून घेतली व फौज पांच हजार घेतली. त्यांत हषमी सरदार कंक,[4] मालुसरे, देशपांडे ऐसे घेतले. सर्व राज्याचा बंदोबस्त पूर्वी धारे करून दिल्हे याप्रमाणें चालवें ऐसें करून देऊन सर्व फौज व पागा हषम लोक राज्यरक्षणास ठेविले. तिकडे कसाही प्रसंग पडिला असतां तुम्ही जवामर्दीनें[5] राजाराम साहेबांस घेऊन राज्य रक्षावें, ऐसें पेशवे, मजमदार, सुरनीस यांस सांगोन आपण औरंगाबादेस आले. जैसिंग यांची भेटी जाली. बोलणीं होऊन त्यांणीं बाहादार उभयतांनीं या प्रांतींच असावें ऐसें ठरोन रामसिंग, त्यांचे पुत्र, चार हजार फौजेनिशीं बराबर दिल्हे. ते व महाराज निघोन दरमजल नर्मदा, चमेली उतरून मथुरेस[6] पावले.

२७. रामसिंगाने भेटीस नेले.

रामसिंग यांणीं राजे यांस घेऊन आल्याचें वृत्त पुढें पादशाहांस लेहून पाठविलें. त्यांणीं मुकामाचे मुकामास सर्व बंदोबस्त आदरेंकरून निखालसतेने करविला. शिवाजी राजे कसेही येऊन भेटावे हेंच मानस. राजे मथुरेस गेले ते कांहीं दिवस गोकुल-वृंदावनादी करून नंतर निघतेसमयीं मथुरेचे चोबे ब्राह्मण

---

१. निराजी राऊजी शाहाणा, त्रिंबकजी सोनदेव (सोनाजीपंताचे पुत्र), माणको हरी सबनीस, दत्ताजी त्रिंबक, हिरोजी फर्जंद, राघोजी मित्रा व दावलजी गाडगे (सभासद). २. 'दत्ताजी गंगाजी' की०. ३. 'विश्वासू याचे च्यार हजार पागा' को०. ४. 'लोक' की०. ५. जवामर्दी (स्त्री०) [फा० जवान्मर्दी]–शौर्य, पराक्रम. 'जहामर्दीनें' की०. ६. याला ऐतिहासिक आधार नाही. कारण बादशहाचा मुकाम या वेळी आग्र्यास होता (पारसनीससंग्रह—पत्र क्र० १०).

[त्यांतील एक] एकटा पुढें आला. हत्तीवर बसावें तों अवलोकन केला. त्यास महाराज बोलले, "बेवकूब[१] ब्राह्मण! समय न पाहातां आला." उत्संगळ[२] शब्द ब्राह्मणास महाराजांचे मुखांतून निघाला. तो ब्राह्मणानें ऐकून प्रतिशब्द तसाच देऊन "मी नव्हे, राजा, तूंच तसा होस!" म्हटलें. तेव्हां त्यास पुढें बोलावून, हातीं धरून, "आम्ही तुम्हांस बोललों, हे क्षमा करावी" म्हणोन गौरवून विचारिलें जे, "तुम्ही आम्हांस असें कां बोललां?" यांणीं उत्तर केलें, "आम्ही प्रमाण[३] बोललों व तुम्ही बोललां तें योग्यच. असे समयीं [आम्हीं] पुढें[४] येऊं नये, परंतु अकस्मात आलों. आम्ही बोललों कसें[५], तरि दिल्लीश्वर केवळ रावण ऐसाच क्रूर होय! त्याचे भेटीस तुम्ही मोठा प्रताप करून, त्याचें राज्य घेऊन थोडके फौजेनिशीं जातां, आणि पुत्रही समागमें नेतां, हा कोण विचार केलात? चांगलें नाहीं." असें म्हणतां त्याचे बोलण्यास बहूत चांगले ऐसें मानून त्याचा सन्मान वस्त्रें-द्रव्यें करून केला आणि तेथील उपात्धिक[६] त्यास दिलें. दरसाल पांचशें रुपये वार्षिक करून दिल्हे. त्याचा गांव त्या प्रांतींच लावून दिला. रामसिंग यांस सांगून चालावा ऐसें केलें: तो अद्यापि चालत आहे. नंतर त्यासही समागमें घेऊन दरमजल दिल्लीस[७] गेले. जाऊन पावलियावरि रामसिंग यांणीं पादशाहास भेटून राजे आले येविषयीं अर्ज केला. त्याजवरून दिवस मुहूर्त चांगला पाहून भेटीस आणावें, सांगितलें. त्याप्रमाणें उत्तम दिवस पाहून भेटीस नेले.

२८. राजे यांनी 'कुर्नीस केली नाहीं.'

ते दिवशीं पादशाहांनीं बहूत तरतुदीनें अदालत[८] मजालस[९] करून सर्व वजीर, बक्षी[१०], व उमराव मातबर जमा करून यांस नेलें. भेटीस जाण्यापूर्वी नजर करणें,

---

१. बेवकूब (वि०) [फा० बी०+अ० वुकूफ]–अविवेकी (निंदाव्यंजक). २. उत्संगळ (वि०) [सं० उच्छृंखल]–अविचारी, उद्दाम. ३. प्रमाण (न०)–योग्य; सत्य. ४. बाहेर पडताना एकच ब्राह्मण समोर येणे हे अशुभ मानितात. ५. कसे (क्रि० वि०) [सं० कथम्]–का (कारण) या अर्थी. ६. उपात्धिक–उपाधीक (स्त्री०) [सं० उपाध्याय]–पौरोहित्य व त्याचे वतन. ७. हे निराधार आहे. 'शके १५८८ पराभव संवछरें जेष्ट शुध द्वितीया राजश्री सिवाजी राजे अगरियास पाऊन औरंगजबची भेटी घेतली' (जे० श०). ८. अदालत (स्त्री०) [अ० आदालत्]–न्यायकचेरी ९. मजालस (स्त्री०) [अ० मज्लिस्]–राजदरबार. १०. बक्षी (पु० फा०)–उमेदवारांची शिफारस करून मन्सब देवविणारा.

कुरनिशात[1] व दाब-आदाब [बजावणें[2]] पादशाही कायदे सर्व रामसिंग यांणीं सांगून ठेविले. "जे प्रसंगी तुम्ही येथें आलां तेव्हां येथील रंग राखून, येथून आपले मतलब सिद्ध करून देशीं जावें हें उत्तम." ऐसें बहूत रितीनें सांगून ठेविलें. ते समयीं 'बरें' बोलले असतां, भेटीस गेलियावरि यवनास भुईस हात लाऊन सलाम करणें हें काय? हे इर्षा[3] मनांत येऊन बावरेपणें रामसिंगानीं सांगितला मार्ग सर्व सोडिला आणि कुर्नीस केली नाहीं. हें रामसिंगानीं पाहून, नजर घेऊन, आपण पुढें होऊन, रामसिंग याणींच केली. उजवे बाजूस अमीर उभे [होते त्यांत उभे] राहण्यास हातानें पादशाहानीं दाखविलें. त्याजवरून खान व रोहिले वजीर राजे मारवाडकर जसवंतसिंग[4] यांचे वरते जाऊन उभें राहावें ते बसले. हें रामसिंग याणीं पाहातांच आपण पुढें होऊन उभे राहिले. तेव्हां पादशाहानीं खुणेनें विचारलें. [रामसिंग बोलले] "दक्षिणी राजे होत[5], अदालत कधींच पाहिली नाहीं." ऐसें बोलले ते समयीं पादशाहानीं मनांत आणिलें जें, 'कुरूप[6] व खंबीरच हा होय.' म्हणून तोंडास रुमाल लावून किंचित हास्य करून आश्चर्य केलें. आणि सन्मान–रितीप्रमाणें कधीं आलां? काय खबर आहे? हे प्रश्न केले. यांणींही उत्तरें समर्पक केलीं. विरस[7] न दाखवितां[7] सन्मानें करून बोलोन डेरियास जाण्यास निरोप, विडे देऊन, दिला. खर्चास व मेजवानी पाठविली. फौजसुद्धां अजमास[8] करून दरमहा बांधून देविला. रामसिंग बराबर डेरियास घेऊन आले. "येथें आलां, तेव्हां फार विचारें चालावें, केली ही गोष्ट पूर्वीं आपण सांगितलें असतां कशी केलीत?" ऐसें बहूत प्रकारें ममतेचे अर्थें सांगून हवेलीस[9]

---

१. कुर्निसात (स्त्री०) [तुर्की. कोर्निश् (कुर्नीस) ए. व.]–नम्रतापूर्वक वंदन. २. दाबआदाब स्त्री० [अ० अदब्]–सन्मान (ठेवणे)–छातीवर हात एकावर एक आडवे ठेवून नम्रतेने उभे राहणे. 'खुरनिषाद आदाब बजावणें' की०. ३. ईर्षा (र्ष्या) (स्त्री० सं०)–चुरस; अभिमान. ४. 'जसवंत सिंग...त्याचे शेजारीं खालते उभें राहावयासाठीं हुकूम [पातशाहांनीं] केला'. (सभासद). ५. 'होते' सा० सा० २ व को०. ६. कुल्लब? कुल्लब–कुलब = दमदार, धैर्यवान (स. च. पृ. २६३). 'पुरुष' की० हा पाठ बरा दिसतो. ७. 'सनदा दाखवितां' की०. ८. अजमास–अद्मास (पु०) [फा० आइमाइश्]–अंदाज, गणती. ९. हवेली (स्त्री०) [फा० हवीली < अ० हवाला]–मंदिर; वाडा.

निघोन गेले. याजवरि[1] कांहीं दिवशीं पादशाहांनीं यांस राहाण्यास, हवेलींत राहावें[1] व फौजही आसपास जवळ उतरावी ऐसें ठिकाण, हवेली योजून देवविली. तेथें आपले सलतनतेनिशीं[2] [राजे] जाऊन राहिले.

२९. "राजे यांणीं आम्हांपाशीं असावें."

त्याजउपरि रामसिंग मध्यस्थ याजपाशीं[3] "करार यादीबुदी[4] जाल्यावरून देशींहून आलों, येण्याचें मानस तसें केलें, इकडील हवा मानत नाहीं, यास्तव कराराप्रमाणें करून देऊन, तिकडील कार्यभाग[5] सांगणें ते[5] सांगून निरोप देवावा" हें बोलणें [बादशाहाशीं] लाविलें. 'बरें आहे' [असें पादशाह] बोलले, आणि "राजे यांणीं आम्हांपाशीं असावें, मोठीं मोठीं कार्यें करावीं, सर्फराजी अधीक करून घ्यावी, जाण्याची तातड[6] कां करितात? त्यांचे मतलब करार होऊन गेले आहेतच," असें उत्तर जालें. नंतर राजे यांणी वरकड वजीर मातब्बर यांच्या भेटी घेण्याविषयीं विचारिलें. ते परवानगी जाली. ज्यांचे घरीं जाणें योग्य, त्यांच्या भेटी, घरीं जाणें येणें केलेयावरि रामसिंग यांजपासून बोलविलें जे, "राजे यांचें म्हणणें प्रथम आलों, कराराप्रमाणें मतलब कागदपत्र होऊन निरोप द्यावा.[7] पुन्हां जे समयीं प्रसंग, उपयोग काम पडेल ते समयीं पत्रें येतील तेव्हां पाहिजे सामान तसें घेऊन येऊन कामगारी बजावूं," ऐसें बोलणें लाविलें. [बादशाहानें] ऐकोन घेतलें, आणि मनांत आणिलें जे, "प्रथम भेटीस[8] यांणीं कुरनीस, दाब-आदाब न केली व पुढेंही येथें राहून स्वच्छतेनें[9] नौकर म्हणवून चाकरी करावी, हुकुमांत[10] चालावें हें दिसत नाहीं; वरकड[11] बहूत योग्य, मर्द व शिपाई, मनसबेदार, धाडसाचे माणूस, सर्वगुणसंपन्न दैववान [पुरूष] आपले हातीं लागून, हुकमांत चालून निखालसता जालियास वजिरी देऊन सर्व राज्यभार यांजवर ठेवावा ऐसी योग्यता आहे.

---

१. 'त्याजवर महाराज कांहीं दिवस पादशाहानें हवेलींत राहावें की०. २. सलतनत (स्त्री०) सल्तना (पु० अ०)-फौज. ३. याबद्दल 'याचे मार्फत' असे असावे (स. च. पृ. २६३). ४. यादीबुदी (स्त्री०) [फा० याद्-बूद्]-निश्चित यादी, ठराव. ५. 'काय सांगणें तें' की०. ६. तातड (स्त्री०) [सं० तन्; त्वर?]-घाई; जलदी. ७. 'घ्यावा' की०, ८. भेटींत' की०. 'भेटी' सा० व० को०. ९. 'स्वस्थतेनें' की०. १०. 'हुकूममात्र' सा० व० को०. ११. वरकड-वस्तुतः.

निरोप दिला असता जाऊन फंद[1] करण्यास चुकावयाचे नाहींत, कसेंही येथें गोवून ठेवून ममतेंत ज्या रितीनें येतील तसें आणावें. करार व तह ठरला, बाहादारही मोठे दिले, त्याअर्थी [आपण] बावगी गोष्ट करणें युक्त नाहीं. ममतेनें व बोलण्यानें हातास लागले तरि घ्यावे. नाहीं तरी दाब[2] ठेवून तरी हातीं घ्यावे. निरोप देणें ठीक नाहीं" ऐसें दृढनिश्चयांत आणून रामसिंग याजपासून सांगितलें जे "राजे आले, मोठे कर्ते शिपाई आणि मनसब्यानीं, चतुरतेनें सर्व गुणें योग्य. यांणीं चाकर म्हणवून, तिकडील[3] जाहागीर आहे ते राखून, इकडेही करोडों रुपयांचा तालुका स्वाधीन करितां येईल. लाख पन्नास हजार फौज बाळगून आम्हांजवळ या प्रांतींच राहून कामें काजें करावीं. तिकडेही पुत्र ठेवून चालवावें. तिकडील पादशाहातींत बंडें वाढलीं तीं मोडावीं. तो तालुका व इकडील[4] घेऊन त्यांचा [व] फौजेचा बेहडा[5] करून घ्यावा. चाकर म्हणवून सर्फराजी करून घ्यावी. यांत सफाई दिसलियावरि वजिरीही यांस सांगावी. सर्व इतबार ठेवावा. ऐसे आमचे चित्ती [आहे] व या कामास लायख राजे आहेत. यास्तव तुम्ही कसेही उपायें राजे यांस या मतलबावरि आणावें."

३०. "जरब देणें प्राप्त."

याजवरून रामसिंग यांणीं सर्व वृत्तांत सांगितले. यांची खंबिरी[6] [अशी कीं,] "या प्रांतीं राहाणें व इकडील दौलत घेणें घडावयाचें नाहीं. मतलब करारांत आले ते करून देऊन त्या[7] प्रांतीं सुभे आहेत त्यांसहवर्तमान तिकडील कामगिरी सांगावी. ती बजावून देऊन[8]." ऐशींच बोलणीं पडत गेलियावरून "शिवाजीची खंबीर ढळत नाहीं, हातीं लागत नाहीं, कसें करावें," हाच विचार करिते जाले. "ऐकत नाहीं त्याअर्थी दाबूनही पाहावें," म्हणून एके दिवशीं जाफरखान अमीर पादशाहाचे केवळ इतबारी, खिलावणे,[9] जवळ होते, त्याजपाशीं खुलासा

१. फंद (पु० फा०)–बंडाळी. २. दाब (पु०) [सं० दभ्]–दडपण. ३. तिकडील–दक्षिणेतील. ४. इकडील–उत्तरेतील, 'वाईकडील' की०. ५. बेह (हे–हा) डा–(पु० हिं०)–नेमणूक, तपशीलवार पत्रक. ६. 'याची खंबीर' सा० व० को०. ७. त्या प्रांतीं–दक्षिणेत. ८. 'देऊन'–देऊं (अनुस्वाराबद्दल 'न') सा० व० को०. ९. खिलावणे (न०) [सं० खेल्]–खेळ; क्रीडा. (ल०) प्रीतिपात्र.

निघाला जे, [राजे] कुरनूश करीत नाहींत व हुजूर चाकरी करून राहात नाहींत. बहूत खंदेपणा[१] जात नाही. त्या अर्थी जरब देणें प्राप्त." ऐसें रोषयुक्त बोलणें पडलें. ते समयीं जाफरखान, शास्ताखान यांचे आप्त, याजमुळें पादशाहाची मर्जी पाहून अधीकच चढी[२] देऊन बोलले. हे बातमी राजे यांस लागली. तेव्हां जाफरखान यांचे हवेलीस जाऊन, त्यांस कित्येक अर्थ ममतेचे, "तुम्ही पादशाहापाशीं बहूत लगत व मेहेरबानींत आहां; आमचें साहित्य करीत असावें," बोलले असतां त्यांणीं मनावरतें[३] 'बरें' म्हणोन, महाराजांचा संशय, काय करितील हा दाब भेटण्यांत बसण्यांत वाटून[४], गांठ[५] तोडोन, निरोप वस्त्रें देऊन लावून दिल्हें.

३१. बादशाहा अधिकच संशयी.

पुन्हा पादशापाशीं बोलण्याविषयीं रामसिंगास महाराजांनीं सांगून बोलविलें जे, "दक्षणची मसलत सर्व आपणांस सांगावी, येथून मर्जी असल्यास फौज सामान द्यावें, किंवा तिकडे जैसिंगांस हुकूम करावा. ते व आपण मिळोन सर्व दक्षण काबीज करून देतों." ऐसें बोलविलें असतां पादशाहाचे मनांत प्रशस्त न पडे. अधीकच संशय वाटूं लागला. आणि करार शपथ दिल्ही व बाहादार दिल्हे हे अडचण, तेव्हां केवळ बेमानी दाखविणें चांगलें नाहीं. परंतु जरब देऊन आपले मनांत तसे पळयावर[६] आणावे म्हणून पोलादखान यांसि हुकूम केला जे, "राजे यांचे मोकाबल्यानीं[७] तुम्ही आपली फौज पंचवीस हजार घेऊन, लोक सुद्धां उतरोन चौकी द्यावी, आणि हुकुमाशिवाय बाहेर जाणें येणें न घडे ऐसें करावें." ऐसें सांगून चौक्या पाठविल्या. ते भोंवतें दुरून येऊन उतरले. हें राजे यांस समजल्यावरि रामसिंग यांस सांगून पाठविलें, "तुम्ही बाहादार असून हे गोष्ट काय आहे ? अर्ज करावा. पादशाहाची मर्जी आम्ही येथेंच असावेंशी दिसती. ते आम्हांस मान्य आहे," ऐसें बोलविलें. तेव्हां

---

१. खंदेपणा (पु०) [फा० कन्दा–कुन्दा, सं० स्कंद्]–साहस; स्वैरपणा; २, चढी (स्त्री०) [सं० स्कंद]–भर. ३. मनावरतें 'बरें'–मनात एक, पण वरवर 'बरें'. "बाहेर 'बहुत बरें' म्हणून बोलिला" (सभासद). ४. 'वाढवून' सा० व को०. ५. गांठ तोडून–मुलाखत संपवून. ६. पळयावर आणावे–हेतूप्रमाणे वागण्यास लावावे. ७. मोकाबला (पु०) [अ० मुकाबला]–तुलना; विरोध.

त्याणीं अर्ज केला. ते समयीं [बादशाहानीं] "राजे यांचें अंतःकरण शुद्ध होऊन, हुजूर राहून, चाकरी मोठे इतबाराची करावी तें ऐकत नाहींत, यास्तव हें करणें प्राप्त [पडलें.] वरकड तुम्ही या पल्ल्यावर[१] आणावें. या पल्ल्यास येत तों हेंच करावयाचें. वरकड जैसिंग राजे व दिलेलखान बाहादार [असून] सरकारी करारनामे गुंतले [आहेत], राजे यांस वांकडें करणें तरि पारिपत्य करण्यास काय गुंता[२] [होता] ? परंतु ते गोष्ट करावयाची नाहीं. तुम्हीही सुभेदार यांस लिहून राजे निखालस पक्केपणें होऊन सरकार-आज्ञेंत चालत ऐसें त्यांणींही लेहून सांगून करावें[३]", म्हणून सांगितलें. तें सिंग यांणीं राजास येऊन कळविलें.

३२. महाराजांनी देशी सर्वांस लावून दिले.

ते समयीं राजे यांनीं सिंग यांस सांगितलें जे, "आम्हांस पादशाहाची मर्जी[४] [संपादणें] त्या अर्थी आम्ही येथेंच राहातों. जेव्हां निखालसता पडत जाईल [तेव्हां] तसेंच कामकाजही करितां येईल. परंतु चिरंजिवास व फौजेस इकडील हवा मानत नाहीं. यास्तव निरोप देवावा. कार्याकारण[५] [माणूस] ठेवून घेणें तें घेतों. बाकी लावून देतों." त्याजवरून पादशाहास विचारिलें. त्यांणीं "लोक फौज जाऊं देणें हें सहजांत काम होतें, हालकूद होतात, त्या अर्थी निरोप द्यावा" सांगितलें. पुत्रास लावून देणें ते "तिकडे जाऊन फंद न करीतसे जिम्मेदार मध्यस्थ देऊन रवाना करावे," ऐसें बोलले. तें सिंग यांणीं सांगितल्यावरि "जिम्मेदार देणें कशास ? व आम्हांस या प्रांतीं कोण जिम्मेदार होतो ? पादशाहाची मर्जी तसे उभयतांही राहातों." म्हणून शागीर्दपेशा, कांहीं पागा कार्याकारण ठेवून, हषमपैकीं कांहीं सरदार ठेवून, कारभारी मंडळी ठेविली. वरकड कारकून, पागा, फौज सर्व [लोक] प्रतापराव गुजर सरनोबत[६] यांजबराबर जावे, चांगलीं घोडीं हत्ती वगैरे जावे" सांगितलें. त्यांणीं जातां आड[७] घातली, "साहेबासाठीं प्राण गेले तरी जावोत, परंतु टाकून जाणें घडणार नाहीं." ऐसा सरनोबत, सरदार व लोक यांचा निश्चय जाणून सर्वांचे समाधान

---

१. 'आपल्या बोलण्यावर' की०. २. गुंता (पु०) [सं० ग्रंथ]-हरकत. ३. यानंतर 'असें करवावें' सा०. ४. मर्जी (स्त्री०) [अ० मर्झी]-खुशी. ५. कार्याकारण (वि० सं०)-जरूरीपुरता. ६. यानंतर 'दत्तो मंगाजी, त्र्यंबकराव वाकनीस' की०. ७. आड (स्त्री०) [सं० अर्ध; का० अड्ड]-हट्ट; आग्रह.

करून प्रतापराव यांस "हा प्रसंग ऐसेच रितीनें, मोठे हुनरें यांतून बचावून जाण्याचा आहे, समजोन तुम्हांस निरोप दिल्हा. याजकरितां 'जावें' सांगितलें. याजवरून देशीं सर्वांस लावून दिलें. आणि प्रधान वगैरे कारभारी यांस सांगावें, "ते व तुर्म्ही बहूत खबरदारीनें राहावें, आम्हांविषयीं काडीमात्र चिंता करूं नये व जिजाबाईसाहेब यांसही समाधान करून सांगावें." ऐसे सांगून लावून दिल्हें.

३३. मिठाई पाठविण्याचा बहाणा.

त्याजवर विचार चित्तांत केला जे, "या संकटांतून पार कसें पडावें? पादशाहाचें म्हणणें तसें इमान प्रमाण देऊन; आपण अवलंबिलेला मार्ग यवनांचे अन्न न घेणें, धर्मस्थापना करणें तें सोडून; त्यांचे म्हणवून त्यांजवळ वजिरी दौलत मेळवून राहावें; किंवा मोठें धाडसें, हुनरें करून यांतून बचावून जाण्याचा समय आहे तसें करून आपले संकल्प सिद्धीस न्यावे; तरिच' [तें] घडेल.' त्या अर्थी आपणास तरि प्राणही गेले असतां [हा] संकल्प सोडावयाचा नाहीं. यास्तव जाहंबाजीनें[२], श्रीवर भार ठेवून, पार पडावें हाच निश्चय करून, आठा दिवशीं आपले गुरुवारचा उत्साह [करितों] ऐसे करून, सर्वांस मिठाईच्या[३] डाल्या[४] भरून पाठवाव्या असा बाहाना[५] निर्माण करून पाठवूं लागले. मिठाईच्या डाल्या कशाच्या[६] जातात ऐसा चौकीस संदेह जाला. याजवरून चौकशी केली. एक, दोन, चार वेळ पाहिलें असतां मिठाईच जाती, डाल्या, बहंग्या[७] भरून जातात, हें कळोन चौकशी करणें सोडिलें. आणि महाराजांची दिनचर्या व बारीक बातमी, काय उमेद, पल्लयावर येतात न येतात, हे पादशाहानीं ठेविली होती. ते पादशाहास राजे राहाण्याचा निश्चय करून, निखालसता होऊन, आपण इकडील चाकरी चाकर म्हणून करावी, मनसब दौलत मेळवावी, बहूतच

१. याऐवजी 'हा विचार पडला' की०. २. जाहं (जहां) बाजी (स्त्री० [फा० जान्बाझी]–जिवावर उदार होऊन केलेला पराक्रम. वस्तादगिरी. ३. मिठाई (स्त्री०) [सं० मिष्ट]—गोड पदार्थ. 'मेवा' (सभासद). ४. डाली (स्त्री०) [सं० डलक]–करंडी. 'पेटारे' (सभासद). ५. बाहाना–बहाणा (पु०) [फा० बहाना]–निमित्त; ढोंग. 'भाहाना' को०.'बाहाना' सा० २. 'बहाणा' की०. ६. 'कशा' सा० सा० २ व को०. ७. बहंगी (स्त्री०) [सं० विहंगम, विहंगिका हिं०]—कावडीतून नेण्याचे ओझे; बंगी.

निष्ठेनें चालावें, ऐसें खंबिरांत आलें असें दिसोन बातमी जाण्याजोगें बोलणें करण्यांत निःसीम डौल[1] महाराज दाखवूं लागले.

३४. शिवाजीची सुटका.

जैसिंग व रामसिंग [यांनीं] शफथपूर्वक[2] बाहादार होऊन आणिलें असतां बादशाहांनीं बेइमानी[3] नजर धरली. याजवरून [त्यांनीं] महाराजांशीं अंतरंगापासून दुसरा विचार [ठेविला] नाहीं. सर्व बातमी राखणें व बाहेरून राखण करणें,[4] खर्चास पावते करणें, पादशाहाशींही बोलणें [वगैरे ते] करिते जाले. त्याजवर महाराजांनीं चौकीचे लोक यांसि बहूत सफाई दाखविणें, आदर करून बोलणें, मेजवान्या करणें, वस्त्रें, द्रव्य देणें, जवळ बोलावणें, ताजीम-तवाजू[5], विडे-पान करून, आपलेसे करून, त्यांत बोलणें तें पादशाहास उत्कंठेनेंच सफाई दिसोन कृपा कधीं करतील, असेंच [महाराज] दाखविते जाले. ह्या बातम्या वरचेवरि पादशाहासही कळत गेल्या. ऐसें दृढ[6] जालियावरि आपले कारभारी लोक इतबारीसुद्धां निघण्याचा बेत सिद्ध केला. ज्या मार्गेंकरून जाणें व तीर्थें करणें तीं तीं मोठीं शहरें व क्षेत्रें येथें हुंड्या करून सावकारींत द्रव्य श्रीकाशीसुद्धां जागां जागां रवाना केलें. फौज पागा, लोक आधीं रवाना केले होते. दिल्लींत राहिले लोक यांत कोण्हास दुखणें, कोण्ही चाकरी टाकिली, कोण्ही उठोन गेले, ऐसें करून संकेत करून त्यांतही देशीं जाणार, पाठवणें, त्यांस जावयास सांगितलें. केवळ बराबरच निभावावयाजोगे व घ्यावयाचे त्यांस संकेत सांगून पड्यांनीं[7] अमके स्थळीं राहावें ऐसे ठेविले. कांहीं रामसिंग याचे आश्रयेंकरून घालविले. आणि देशचे लोक राहात नाहींत, उठोन जातात, ऐसे दाखवून राहिले तेही युक्तीनें हलके केले. नंतर शहरचे लोक शागीर्दपेशास वगैरे दोन-चारशें ठेविले. यांगीं दुरोन असोन चाकरी करावीसें केलें. शरिरास आराम नाहीं [हा] बाहाना करून आपण निजले. प्रहर साहा घटका दिवस येई तों निजावें,

---

१. डौल (पु०) [अ० दौ ल]-रीत; तऱ्हा. २. यानंतर 'करून' सा० व को०. ३. यापुढे 'केली' की०. ४. 'राखणें' की०. ५. ताजीम-तवाजू (स्त्री०) [अ० तअझीम्-अ० तआझुअ]-आदरसत्कार व वस्त्रे वगैरे अर्पण करणे. ६. 'ऐसी तयारी' की०. ७. पडदा (पु०) [फा० पर्दा]-आवरण (ल०) गुप्तपणा.

बहूत करून आंतच गैरराबत्यांत[1] राहावें ऐसें करूं लागले. राबता गैरराबता ऐसें आठ पंधरा दिवस करून दाखवून कामकाजासाठीं कारकून, कारभारी, हुजरे लोक जाणें येणें तसे बेतांनीं सारे बाहेर काढिले. श्री मारुती [नें] लंकेंत जाऊन जशी ख्याती केली, सीताशुद्धी घेऊन निघोन गेले, तसें आपण युक्ती करून जाहंबाजी हुनर करून पादशाहास दगा देऊन जावें, म्हणून श्रीदेवीस प्रार्थना केली. देवीनेंही आश्वासन दिलें, "निघणें, निभावून नेईन," ऐसा स्वप्नगत दृष्टांत होऊन सांगितलें. यावरि सर्वांस आधीं काढून दिलें. त्यांणीं अमके पुऱ्यांत जाऊन गुप्तरूपें असावें, हे जागे वगैरे आधींच निश्चयांत आणिले [होते.] तेथें सर्व पोहोंचले. अशी बातमी आणून आपण खासा व संभाजीराजे पेटारियांत बसोन गुजरीचे[2] वेळेस मिठाईच्या बंग्या जातात म्हणून त्यांत निघाले. पलंगावरि खासा पोषाख तसाच ठेवून हिरोजी फर्जंद यास बेत सांगितला कीं, "तूं पलंगावरि रजईची[3] वळकटी करून, निजले आहेतसें दाखवून बुक्या[4] मारीत बसावें. मध्यरात्रींनंतर निघोन अमके स्थळीं येऊन पोहोंचावें." याप्रमाणें तो पलंगापाशीं बुक्या देत खोलींत बसला. "महाराजांनीं जावें, मागें आपणांस जसें पडेल तसें पडो, महाराजांचे कृपें आपणही निघोन येतों," म्हणून राहिला. प्रातःकाळ जाला, चार घटका दिवस आला. "महाराजांस निद्रा लागली आहे, गूल करूं नका," ऐशी ताकीद करून आपणही निघोन कामाहून येतों, म्हणोन ठिकाणास गेला. महाराज व सर्व निघाले ते शहरचे पश्चिमेस पुरा बाहेर होता तेथें बेताप्रमाणें सर्व एक होऊन, आठ चार दिवस वेष पालटून, जागां जागां फुटून, कोण्ही बैरागी, कोण्ही गोसांवी ऐसे होऊन, ब्राह्मण[5] यांणीं शूद्रवेष ऐसे करून राहिले.

३५. महाराजांचा शोध.

इकडे प्रहर दिवस आला, हालचाल नाहीं, ऐसें पाहून शहरचा शागीर्दपेशा

---

१. गैरराबता (पु०) [अ० घैर (व्यतिरिक्त)–अ० राबिता (संबंध)]–येण्याजाण्याचा प्रतिबंध; व्यवहाराची मनाई. २. गुजरी (स्त्री०) [फा० घु (गु)झ्री]–सायंकाळचा बाजार; (ल०)संध्याकाळ. ३. रज (जा) ई (स्त्री०) [फा० रझाई; सं० रंजिक]–उबदार पांघरूण. रझा नावाच्या मनुष्याने याचा प्रथम शोध लाविला त्यावरून (कुलकर्णी–म. व्यु. को० ४. बुकी (क्की), बुका (क्का) (पु० स्त्री०) [सं० बुष्क ? बुक्क ध्व देप्रा० बुक्का]–मुठीचा आघात. ५. 'ब्राह्मण, वाणी, शूद्र, वैश्य' की०.

नवा[1] ठेविला ते व चौकीचे लोक पाहातात तों राजे नाहींत! तों कारभारी आदिकरून कोण्हीच नाहींसें पाहून गूल केली. चौकशी करितां निघोन गेले, नाहींत!! असें समजोन पोलादखान यास समजाविलें. त्याणीं पादशाहास जाऊन अर्ज केला जे, "राजे निघोन दग्यानीं गेले." हें पादशाहास कळलियावरि पोलादखान याजवरि इतराजी केली. मनसब जफ्त करून चौकी बसविली व [राजे] निघाले ते रामसिंग यांचेच सल्ल्यानें निघाले असतील हा संशय धरिला, तों रामसिंग याणींही अर्ज केला जे, "शिवाजी राजे निघोन गेले. आपण[2] शफथ देऊन आणिले [असतां] हजरतीनें[3] चौकी पाठविली, दस्त केले. मर्जी सरकारची!!" बोलले. तेव्हां "काय चिंता? [राजे] जातील तेथें पारिपत्य करीन. तुम्ही मध्यें[4] म्हणून इतकी सबुरी[5] केली." ऐसें म्हणून शहरांतही चौकशी करविली. तमाम तालुकेदारांस[6] पत्रें पाठविलीं, "जेथें [राजे] सांपडतील तेथें दस्त करावे" व मार्गांनींही लोक रवाना केले. परंतु शोध न लागे. तेव्हां[7] हरिफाई[8] करून निघोन गेले हें मनांत अपूर्व मानिते जाले.

३६. शिवाजीचे राजगडास आगमन.

[इकडे] महाराज[9] [यांनीं] आठचार दिवस नानाप्रकारचे वेष धरून कांहीं [लोक] तेथून पुढें मथुरेस रवाना केले.[9] आणि आपण दाहावीस असामी कारभारी व हुजरे सरदार इतके एक जिवाचे बैरागी होऊन मथुरेस जाऊन पावले. तेथून देशीं जाणें ठीक नाहीं; चौकशी बहूत चालली आहे; निभाव पडणार नाहीं; आपणास यात्रा भागीरथी, काशी वगैरे करणें; संभाजी राजे लहान, [त्यांचा] पायीं निभाव पडणार नाहीं, म्हणून मथुरेंत काशीपंत व कृष्णाजीपंत व विसाजी-पंत त्रिवर्गबंधू, देशस्थ ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे आप्त, विश्वासू, रोजगारी[10] तेथें होते, त्यांचेजवळ मथुरे[11] उपाध्ये यांचे विचारें [संभाजी राजे यांस] ठेवून,

१. 'नांव' की०. २. आपण–रामसिंग व जयसिंग. ३. हजरती (स्त्री०)–हजरत (पु०)–वंद्य पुरुष; स्वामी. ४. 'मध्यस्त' को०. ५. सबुरी–सबूर (स्त्री०) [फा० सबूरी]–शांतपणा. ६. तालुके (क) दार (पु०) [फा० तअल्लुक्दार्]–जिल्ह्याच्या भागाचा अधिकारी. ७. 'एथें' की०. ८. हरिफाई–हरिफी (स्त्री०) [फा० हरीफी]–धूर्तता. ९. याबद्दल 'महाराज आठ चार दिवस नानाप्रकारचे वेशें राहून तेथून पुढें मथुरेस रवाना झाले' की०. १०. रोजगारी (पु०) [फा० रोझ्+फा० गारी)–व्यावसायिक. ११. मथुरे उपाध्ये–मथुरेचे तीर्थोपाध्ये (परिच्छेद २७).

आम्ही अमके मार्गीं जाणार तें न समजों देतां, आम्ही अमूक स्थळीं आलिया-वरि सांगून पाठवूं, तेथें घेऊन यावें, असें सांगून ब्राह्मणाचा वेष संभाजी राजे यांस देऊन गुप्तरूपें ठेविलें. समागमें विसाजीपंत व चोबे[1] उपाध्ये घेतले. आपण सर्व मंडळीसह बैराग्याचे[2] वेष धारण केले होते, तसेच बैराग्यांचे मेळ्यांत मिळोन तेथून कुरुक्षेत्रास गेले. तेथून उत्तरमानास, हरिद्वार करून, गंडकी[3], अयोध्या [यांचें] दर्शन करून, श्रीकाशी व प्रयाग हे यात्रा करून गयेस आले. तेथें गयावर्जन[4] केलें. निघतां श्रीविष्णुपदावरि मोहोरा घालून, पद भरून गुप्तरूपें निघाले. त्रिस्थली[5] यात्रा, कार्तिकस्नानें[6] माघस्नानें[7] सांग करून बराबरचे सर्व [लोक] यांजपासून गयावर्जन वगैरे करवून, देवगड[8] चांदें येथें येऊन, श्रीगंगातीरचीं[9] क्षेत्रें करीत करीत उत्तरमानस करून दक्षिणमानसीं सुरक्षित वीस बेवीस महिनियांत पावले. महाराज पुण्यश्लोक. त्याप्रमाणें पुण्य-क्षेत्रें यात्रा व देवदर्शन घेऊन निभावून आले. गंगातीरीं मंथनकालेश्वरादी[10] करून कुशतर्पणास आले. तीर्थविधी केला. तेथून पुढें एके गांवीं[11] येऊन राहिले. त्या गांवीं गरीब एक कुळवाडी होता त्याचे गोठ्यांत राहिले. त्याची आई वृद्ध होती, ती स्वाभाविकपणें "तुम्ही बैरागी आलां, अन्न द्यावें, परंतु गांवीं देशींची फौज येऊन गांव लुटून नेला. काय करावें?" ऐशी बोललिया-वरि यांणीं[12] देशींची फौज कोणकोणाची आली विचारलियावरि "शिवाजी राजा याचा तेलंगराव सरदार फौजा घेऊन आला, गांव लुटला. शिवाजी राजा दिल्लीस गेला त्यास पादशाहानीं पारिपत्य कां अद्यापी न केलें? आम्हां गरिबांस बहूत उपद्रव होतो." असें बोललियावरि महाराज मनीं फार समाधान

१. चोबा (भा) (पु०) [सं० चतुर्वेदी. हिं. चोबे]–क्षेत्रोपाध्याय (विशेषतः मथुरेचे). २. बैरागी (पु०) [सं० विरागी]–गोसावी. ३. गंडकी (शालिग्रामी) नदी नेपाळातून उगम पावून पाटण्याजवळ भागिरथीस मिळते. ४. गयावर्जन (न०) (अप०) गयावर्द (र्धे) न, [सं० गया+व्रजन]–गया येथील धार्मिक विधी. ५. त्रिस्थली (स्त्री०)–काशी, प्रयाग व गया. ६. कार्तिकस्नान–(न०) अश्विनी पौर्णिमेपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत कृत्तिका नक्षत्र मावळण्यापूर्वी राधा-दामोदराप्रीत्यर्थ करावयाचे स्नान. ७. माघस्नान (न०)–पौषी पौर्णिमा ते माघी पौर्णिमेपर्यंत सूर्योदयापूर्वी माधवा (श्रीकृष्ण) प्रीत्यर्थ करावयाचे स्नान. ८. देवगड चांदें–गोंडवन. ९. श्रीगंगातीर–गोदावरीतीर. १०. मंथनकालेश्वर, कुशतर्पण–तैलंगण. ११ इंदूर (निजामाबाद) कडबली प्रांत (९१ कलमी बखर, क० ५६). १२. 'त्यांनीं' की०.

पावले जे, "आपण विदेशीं गेलों असतां प्रसंगेंकरून मोठे संकटांत पडलों, देवानीं निभावून हे दिवस दाखविले [हें] प्रमाण. परंतु आम्ही नसतां आम्हांप्रमाणें राज्य रक्षून सर्वांवर दाब आहे. अम्मल उगवितात तेव्हां बहूत[1] केली." असें मानून तिजला आश्वासन दिलें कीं, 'तुझें बरें होईल. तुझें नांव काय?' वतन[2] वगैरे विचारून घेतलें. तेथून भागानगरचे तालुकियांतून विजापूरचे इतल्ल्यांतून[3] महाराज जवळ देशीं येऊन पन्हाळा प्रांतीं आलियावरि सांगून पाठविलें आणि आपण तसेच वेशेंकरून राजगडास येऊन पावले. मातुश्रीचें दर्शन घेतलें. शके १५८८, पराभव नाम संवत्सरे, मार्गशीर्ष[4] वद्य दशमीस आले. तें समयीं बहूत आनंद होऊन कुरवंड्या व दानधर्म, साखरा वाटणें वगैरे मातुश्रीनीं करऊन सर्वांसह मंगलस्नानें करविलीं. तोफांची सरबत्ती[5] केली. [महाराजांनीं] वस्त्रें भूषणें सर्वांसह परिधान केलीं.

३७. मोठा उत्साहसमारंभ झाला.

हें वर्तमान सर्वांस राज्यांत महाराज येऊन पावलें ऐसें कळतांच तमाम सरकारकून व सरदार, सुभेदार व कारखानदार व देशक[6] व ग्रामक लोक व उदमी सावकार लोक दर्शनास आले.[6] आणि सर्वांनीं नजरा व पोषाख व आपले तालुकियांतील उत्तम पदार्थ जिन्नस उपायनें नजरा घेऊन येऊन भेटले. सतके[7] महाराजांवरून केले. ऐसा मोठा उत्साहसमारंभ होता जाला. किल्लोकिल्लियांस तोफा-सरबत्ती केली. लोक आले त्यांचे गौरव भाषण-अवलोकनें करून योग्यतेनुरूप महाराजांनीं सर्वांचे केलें. मोठे संकटांतून निभावून महाराज देशीं आले हा उत्साह सर्वांस जाला. दानधर्मही बहूत केला. बराबर गेले होते त्यांस श्रमसाहस ज्यांणीं जसें केलें त्यांस त्याप्रमाणें गौरव व नांवांजिसी करून तैनाता जाजती व पोशाख जवाहीर देणें, पालख्या देणें, हत्ती वगैरे [देणें] तसे दिल्हें.

---

१ 'बहुत बरें' की०. २. वतन (न० अ०)-जात, धंद्रा, मालमत्ता व जन्मभूमी इ०. ३. इतल्ला (पु० स्त्री०) [अ० इत्तिलाअ]—संबंध (संबंधाचा प्रदेश). ४. 'मार्गसीर्ष शुध पंचमीस' (जेधे शकावली). ५. सरबत्ती [स्त्री० फा०]—धडाका; स्फोट. ६. 'दैशिक, ग्रामिक लोक सावकार सर्व दर्शनास येते झाले.' की०. देशक व ग्रामक म्हणजे देशमूख, देशपांडे, पाटील इत्यादी प्रांतांतील व गावांतील वतनदार मंडळी. ७. सतका (गा) (पु०) [अ० सदका]-ओवाळणी; दानधर्म.

महाल गांव दिल्हे. निराजी[1] रावजी न्यायाधीश व त्रिंबक सोनदेव डबीर व बाळाजी आवजी चिटणीस यां तिघांची बहुत तारीफ केली, व या समयीं यांची सेवा बहूत जाली, मोठें कारस्थान [केलें] व उपयोगी पडले म्हणून बहूत कृपा करून अंतरंगांत ठेविले. शिवाय आणखी कारकून, सरदार, हुजरे वीस पंचवीस असामी [यांनीं] दिल्लीस व यात्र बराबर सेवा केली त्यांस बहूत सर्फराज केलें, वाढविलें. हिरोजी फर्जंद यास पालखी व बक्षीस देऊन वाढविलें. पागा-सरदारी दिली. आणि त्रिंबक वगैरे किल्ले तहामध्यें सोडिले होते, त्यास पेशवे यांस ते किल्ले प्रांत घ्यावा म्हणून रवाना केलें. फौज पागासुद्धां जाऊन चहूं महिन्यांत सोडवून फत्ते करून प्रांतसुद्धां अम्मल बसविला. चाकण वगैरे ठाणीं घेतलीं.[2] संभाजी[3] कावजी तिकडे [मोंगलाकडे] मिळाले होते, त्यांस चाकणप्रांतीं लोक गेले त्यांणीं पागासुद्धां लुटून मारिलें.

३८. जैसिंगावर रोष.

तिकडे दिल्लीस शोध बहूत रितीनें करितां न लागला. शिवाजीराजे गेले हा अपराध रामसिंग याजवर ठेवून जैसिंग याचा सुभा तगीर[4] केला. आणि दिल्लीस हुजूर बोलावून घेतलें. दिलेलखान[5] यास सुभेदारीचें काम सांगितलें.

३९. कुळवाडी-कुटुंब व काशीपंत यांस बक्षीस.

गंगातीरीं येतां महाराज ज्याचे घरीं राहिले होते त्याचे आईस आश्वासन दिलें होतें. देशीं आल्यावरि त्याजला कुटुंबासह बोलावून आणून द्रव्य, वस्त्रें दिलीं. लूट काय गेली विचारून तितकें द्रव्य आणखीं दिलें. आणि सेवेसि ठेविले.

[पुढें] मथुरेस पत्रें पाठविलीं जे, "देशीं सुखरूप पावलों, याउपरि सावधपणें संभाजीराजे यांस घेऊन येणें." ऐसें काशीपंतास लिहिलें. त्यांणीं संभाजीराजे

---

१. निराजीपंत, दत्ताजीपंत व राघो मित्रा यांस अनुक्रमे न्यायाधिशी सरकारकुनी, वाकनिसी व हुजूर लोकांचा हवाला सांगितला (सभासद). २. 'बसविलीं' को०. ३. परिच्छेद ३. ४. तगीर (वि०) [अ० तघ्यीर्]-काढून टाकलेला. जैसिंगास दक्षिणच्या सुभेदारीवरून बडतर्फ केले (९१ कलमी बखर-क० ५९, फॉरेस्ट प्रत). ५. शाहजादा मुअज्जम यास मे १६६७ मध्ये दक्षिणचा सुभेदार नेमिले. दिलेलखान दुय्यम होता (सरकार-शिवाजी पृ. १५८).

यांस घेऊन येतां, वाटेनें [त्यांचें] स्वरूप सुंदर, सतेज [तेव्हां] हा कोणी मातबर आहे ऐशी चौकशी पडली. ते समयीं "आम्हीं ब्राह्मण, हा आमचा मुलगा[1]," म्हणून फराळ एके जागां बसोन काशीपंतांनीं केला. ऐसे प्रकारें संकटेंकरून निभावून आलियावरि महाराज फार संतोषी होऊन, 'विश्वासू खरे!' म्हणून 'विश्वासराव' ऐसा किताब देऊन वाढविले. तिघे[2] भाऊ यांस पालख्या व मातबर तैनाता करून वाढविले. लाख रुपयांचे होनांचा त्यांजवरि सुवर्णाभिषेक करून बक्षीस दिल्हें.

४०. अनुपस्थितीतील आढावा.

किल्ले प्रांत येथील महाराजांनीं दिल्लीस गेलियापूर्वी बंदोबस्त करून देऊन इमारती करविल्या, त्याप्रमाणें चालल्या होत्या. त्याच सर्व किल्ले, कोट पाहून तयार जाल्या, त्या चांगल्या वाईट अधीकउणें कोठें करणें तें, नवीन करवणें तें करविलें. लोक सरदार वगैरे जेथें जैसे पाहिजेत तसे ठेवणें, जुने ठेविले [होते] त्यांजपासून कामकाज कसें[3] घडलें उपयोग गैरउपयोग पाहून नवे जुने करार, दूर करणें, हें सर्व पाहून, आपण राज्यांत हिंडोन, श्री स्वामींचें दर्शन व श्रीजेजोरी, शिंगणापूर शंभू, प्रतापगड देवी [यांचें] दर्शन करून मागतीं रायगडीं आले.

४१. बाळाजी आवजींचे चातुर्य.

एकदां बाळाजी आवजी चिटणीस[4] यांस राजकारणी पत्र ल्याहावयास सांगितलें होतें, तें पत्र निकडीनें जावयाचें म्हणोन [त्यांस] बोलावून आणोन 'पत्र सत्वर गेलें पाहिजे, आणा' म्हणोन आज्ञा केली. ते समयीं पत्र लिहिलें

१. 'कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनीं...संभाजिराजियास ...आपला भाचा म्हणवून [ते] राजगडास आले' (सभासद). त्या उभयता ब्राह्मण बंधूंनी [काशीपंत व बाजीपंत] हा मुलगा आपल्या कुटुंबातील आहे अशी खात्री दिली (९१ कलमी बखर–क० ५७, सरकार प्रत). २. 'कृष्णाजी त्रिमळ शिवाजीबरोबर आधींच आला. काशी त्रिमळ व त्याची आई संभाजीला घेऊन आली. आणि विसाजी मथुरेसच राहिला. विश्वासराऊ हा किताब कृष्णाजीपंताला शिवाजींनें दिला असें दिसतें. बखरींत एक लाख होन बक्षीस दिलें म्हणून म्हटलें आहे तें अतिशयोक्त आहे' (ऐ. प्र. पृ. ४४६). ३. 'कसें घेऊन' सा० व को० 'कसें चाललें' की०. ४. 'चिटनिवीस' को०.

नव्हतें. महाराजांनीं पत्र 'आणा' म्हणतांच लिहिलें आहे, बोलले. तों 'वाचून दाखवा' आज्ञा जालियावरि खिशियांत हात घालून दोन बंद कोरे कागद, गुंडाळी होती, ती काढिली आणि अस्तमानसमयीं दिवटी[1] जवळ होऊन पत्र साद्यंत वाचून दाखविलें. त्याहावयास सांगितलें तसे मतलब बहूतच कारस्थानीचे, त्या अन्वयें लिहिलें म्हणोन [महाराजांनीं] तारीफ केली. तों दिवट्या हासला. त्यास महाराजांनीं 'कां[2] हासलास' म्हणून विचारिलें. त्याणीं न सांगावें तरि हुकूम जाहाला, बोललें पाहिजे, म्हणून यांजकडे पाहिलें. तेव्हां हे विचारांत पडून जालेप्रमाणें सांगितलें जे, "कागद तयार नव्हता म्हणून कोराच वाचिला. आतां तयार करणार. अपराध केला, क्षमा करणार स्वामी समर्थ [आहेत!]" ऐसे बोलोन मुजरे केले. तों दिवट्यानींही कागद कोराच वाचिला यास्तव हासलों[3] म्हणून कुरनीस केली. त्याजवरि बरें[4] केलें, पत्र लेहून[4] वाचून दाखवा बोलले. ते समयीं तेथेंच बसोन पत्र लिहिलें आणि पुन्हा वाचून दाखविलें, तों पूर्वी वाचिलें त्याप्रमाणेंच अक्षरें व मतलब संगतशुद्ध! पूर्वी वाचलें तें व फिरोन वाचलें [तें] यांत तिळप्राय न्यून अधीक नाहीं!! पाहून महाराज बहूत संतोषी जाले. तारीफ केली. 'चिटणीस योग्य व तर्केकरून योग्य' ऐसा गौरव करून पोषाख अंगावरील उताराचा व मोत्यांची कंठी व पदक व शिरपेंच[5] बक्षीस दिल्हें. ते समयीं यांणीं अर्ज केला जे, "सर्व राज्यांतील, सरकारकून, सरदार, किल्ले, कोट, ठाणीं येथील चिटणिसी व कारखानिसी व जमिनिसी[6] तीन धंदे स्वामींनीं करून दिल्हे ते बक्षीस असावे; कोठें चालत नाहींत ते चालावे; व दाभोळ सुभे येथील सरदेशमुखीचें वतन आपणांस करून द्यावें." त्याजवरून महाराज कृपावंत होऊन वचन दिल्हें. [हे] धंदे[7] या राज्यांतील सांगितले, व दाभोळचे सरदेशमुखीचीं वतनपत्रें करून दिल्हीं. दिल्लीचे स्वारींत बहूत उपयोगीं पडले; याजवरून राजकारणी कारभार, समीपचा कारभार, विश्वासू[8] [पाहून यांजकडे] ठेवून बहूतच कृपा [महाराज करूं] लागले.

---

१. दिवटी (स्त्री०) [सं० दीपवर्ति]–लहान दिवा; मशाल. २. 'कोण्हास हांसलास' को०. ३. 'हांसें आलें' को०. ४. बार पत्र लिहून' की०. ५. शिरपेंच (पु०) [फा० सर्पेच्]–पागोट्याचा अलंकार. ६. जमनीसी (स्त्री० फा०)–हिशेबतपासणी. ७. [हे] 'धंदे यांजकडील राज्यांतील' सा० व को०. ८. 'विश्वासू ठेऊन' सा० व को० 'विश्वास ठेवून' सा० २ व की०.

४२. संभाजीचा विवाह.

संभाजी महाराज यांचा विवाह करावा ऐसा सिद्धांत करून पिलाजी[१] शिर्के यांची कन्या शरिरसंबंध सिद्धांत करून बहूतच तरतूद साहित्य करऊन मोठे समारंभें करून पांचचार लक्ष रुपये खर्च होऊन करिते जाले. वधू जाली त्यांचें नांव येसूबाईसाहेब ऐसें ठेविलें.

४३. दिलेलखानास 'दबाऊन' राखले.

यानंतर वराड प्रांतीं स्वारीस गेले. दिलेलखान[२] औरंगाबादचा सुभा करून होते. त्यांचे ताबिनांत[३] आणखी लोक वगैरे सामान देऊन एखलासखान पादशाहांनीं दिल्लीहून पाठविले. तेही आले. महाराज [यांनीं] देशीं येऊन सत्तावीस किल्ले व ठाणीं बागलाण घेतलें. मुलूख मारितात,[४] स्वारीशिकारी करितात, वराडांतील करंजें[५] शहर मारिलें, बहूत मत्ता सांपडली, तेथून बराणपुरास महाराज गेले, तेथील पुरे मारिले. हें वर्तमान दिलेलखान यांस कळोन आपण बहलोलखान व बहादरखान, एखलासखान जमियतसुद्धां[६] चालून आले. इंद्रायणी[७] नजीक गांठलें. तेव्हां युद्ध करून दबाऊन[८] राखून, महाराज राजगडीं जाऊन लूटसुद्धां पावले.

४४. शाहजाद्याचे राजकारण.

हें वर्तमान राजे पुन्हा देशीं गेलेयावरि स्वारीशिकारी करितात, फंद करितात, औरंगजेबास कळलें. ते सययीं बहूत दिक[९] होऊन, मोठा शत्रू शिवाजी निर्माण जाला. हस्तगत जाला असतां हरिफाईनें हातचा निघोन गेला. जो सुभा पाठवावा त्याचे हातें कांहीं एक घडत नाहीं. खासा आपण जावें तरि इकडील बंदोबस्त राहिला पाहिजे. म्हणोन आपले पुत्र शाहाजादा यांसच सुभेदारी देऊन

---

१. 'पिलाजीराव शिर्के याची लेक जिऊबाई संभाजी राजांस केली.' (रा. खं. ३ ले० १५७). 'हें लग्न तळकोंकण काबीज केल्यानंतर म्हणजे इ. स. १६६१ नंतर झालें (वा. सी. बेंद्रे–छत्रपती संभाजी महाराज (१९६०) पृ. १२५) २. परिच्छेद ३८ टीप ४ पहा. ३. 'ताब्यांत' की०. ४. 'मारीत' की०. ५. 'कारंजें मोंगलाईत' (सभासद). लाडाचे कारंजे असेही म्हणतात. ६. 'व इंद्रमणी असे उमराव' (सदर). ७. 'भीमातीर पावेतों' (सदर). ८. 'दबून राखून की०. ९. दिक–दिक्क (स्त्री. अ०)—त्रस्त.

रवाना केलें. बराबर सरदार मातबर भावसिंग रजपूत वगैरे दिले. ते निघोन औरंगाबादेस येऊन पावले. हें वर्तमान महाराजांस कळलें. दिल्लींत[१] जाण्यांत शाहाजादाची रीत सर्व माहीत जाली होती. "द्रव्याचे लालची, पेंडीचें[२] ढोर अशी [रीत] आहे! काय चिंता आहे?" [महाराज] बोलले. पादशाहांनीं पुत्र येतां "तुम्हीं शिवाजीचे गळां पडूं नये. तुमचे वस्तू[३] त्याशीं मसलत निभावणार नाहीं, त्याशीं द्वेष न करावा, सुभे बुडविले तसे पादशाहाजादा बुडविला ऐसें लौकिकांत आलें असतां ठीक नाहीं. पादशाहीस अपाय होईल. यास्तव तहाने व गोडीनेंच आपलेसे करून [आपला] प्रांत जतन[४] करावा." ऐसें सांगितलें होतें. त्याजवरून शाहाजाद्यांचें मानस तह करावा [ऐसेंच होतें.] "पूर्वीं महाराज दिल्लीस गेले ते समयीं यांचे[५] ठायीं आदर-व्याप[६] [न करतां] पादशाहांनीं नजरबंदी केली,[५] हें ठीक न केलें. शिवाजीराजे सारखे अमीर हातीं राखावे" ऐसेंच [शाहाजाद्याचें] संमत होतें. आंतून सफाईच होती. तेच हल्लीं आले. परंतु मनसबा काय आहे हा संशय [महाराजांस] होता, तों शाहाजादा याणीं राजकारण तहाचें पाठविलें जे, "तुम्हीं आम्हीं सफाईनें चालवें." ऐसें तिकडून आल्यावरून महाराजांनीं "बरें आहे, तूर्तंच बिघाड कशास पाहिजे? त्याचा आदर आहे तों काय मतलब आहे हेंच पाहावें," म्हणोन आपणही रुकार देऊन राजकारण चालविते जाले.

४५. उभयतांचा तह.

[परंतु] मुसलमान सरदार यांशीं राजकारण करणें, बोलणें [यास] विश्वास पुरत नाहीं. तेव्हां भावसिंग आहेत कळलें, याजवरून "आपणही भावसिंग यांचे विद्यमानें बोलावें," ऐसें ठरवून बाळाजी आवजी चिटणीस यांचा व भावसिंग यांचा दिल्लींतील स्नेह. त्यांजकडे पाठवणें, जाणें, येणें हे करीत होते. याजवरून चिटणीस[७] यांस बराबर लवाजिमा, पागा, हत्ती, घोडे, लोक देऊन

१. 'दिल्लीस गेले तेव्हां' की०. २. गवताच्या पेंडीने उधळलेले जनावर धरले जाते तसे. 'पेंढीचें' की०. ३. वस्तू (श० अ०) [सं० वस्तु]-कडून; हस्ते. ४. जतन (स्त्री०) [सं०यत्न]-निगा; जपणूक ५. 'यांचें ठायीं पादशाहानीं नजरबंदी केली, की०. ६. आदरव्याप (पु०) [सं० आ + दृ + वि + आप्]-मानसन्मानाचा उद्योग. ७. 'रघुनाथपंत कोरडे यांस औरंगाबादेस पाठविलें' (सभासद).

राजकारणास पाठविलें. त्यांणीं जाऊन पादशाहाजादे यांची व भावसिंग यांची भेट घेतली. महाराजांनीं वस्त्रें, जवाहीर, हत्ती पाठविले ते पावते केले आणि बोलणें चालतें केलें जे, "राजे आपण होऊन पादशाहास भेटावें, कामें काजें करावीं, येथें बोलणीं तह ठरले तसे मुद्दे हासल[1] व्हावें [म्हणोन दिल्लीस गेले.] दरम्यान[2] मातबर दिल्हे असोन चौकी बसविली. बदनजर[3] जाली. बाहादार यांचेंही कांहीं न चाले. तेव्हां विश्वास कोणते[4] रितीनें धरावा? राजकारण कसें चालावें?" हें बोलले. ते समयीं शाहांनीं[5] उत्तर केलें कीं, "पादशाहाचे अंतःकरणांत राजाविषयीं विपरीत भाव कांहीं नव्हता व हल्लींही नाहीं. याणीं[6] निखालस[7] होऊन आपणापाशीं राहावें, वजिरीचीं कामें यांचे हातून घ्यावीं, हें [राजे] कबूल न करीत. याजवरून हरयत्नेंकरून दाबून करावें म्हणोन करावयास गेले, तें राजास मानलें नाहीं. आणि ते निघोन आले. पुढेंही आम्हांस येते समयीं आज्ञा केली जे, "राजे यांशीं वांकडें न चालावें. जाली ती गोष्ट बरीच जाली. शिवाजी राजे सारखे मनुष्य मागें जालें नाहीं, पुढें होणार नाहीं. आमचे हातीं लागावे म्हणोन यत्न केला असतां, वांकडें मानून[8] गेले. बरें असो. त्यांची मर्जी. तिकडेच राहून कामें काजें करावीं. पूर्वी तह जाले तेच कायम करून देऊन त्यांचे विचारें चालावें. आम्हांस वांकडें करणें असतें, तर तेच समयीं करितों. परंतु शिवाजी राजे अशा रितीनें गेले हें युक्त न केलें." ऐसें बोलोन 'सफाई करावी,' या प्रमाणें हुकूम आहे." ऐशीं बोलणीं जालियावरि चिटणीस यांणीं "हल्लीं आपण या रितीनें बोलतां व भावसिंगही खातरजमेनीं सांगतात, त्या अर्थीं हें सर्व वृत्त महाराजांस लेहून उत्तरें आणवितों. नंतर पुढील बोलणें चालऊं." म्हणोन दोन्हीकडील आपलें बोलणें व शाहाचें जालें ते अर्थ लिहून पाठविले. त्याजवरून महाराजांची आज्ञा [जाली], "बोलणें चालू करून मतलब सिद्ध करावे." ऐशीं उत्तरें गेलियावरि पुन्हा बोलणें केलें. "आपण सफाईनें चालणार ते कसे? आम्हांस वाकडें चालावयाचें नाहीं. पूर्वील तह कायम होऊन चालावें. सारी फौज कुमकेस येणें अथवा समक्ष भेटी होणें हें पुरतेपणें परस्परें

१. हासल (हशील) (न०) [अ० हासिल्]-प्राप्त. २. दरम्यान (पु०) [फा० दर्मियान्]-मध्यस्थ. ३. 'नजरबंदी केली' की०. ४. 'कोण्हे रितीनें' को०. ५. शाहा-शाहाजादा. ६. यांणीं-शिवाजीनें. ७. निखालस (वि.) [नि०+अ० खालिस्]-शुद्ध; स्नेह-शील. ८. 'जाणून' की०.

निखालसता पडल्यावांचून[१] घडणार नाहीं. कांहीं मुलूक करार तहाशिवाय करून थोडी बहुत फौज नेहमीं कुमकेस[२] पाहिजे तशी राहील." त्याजवरून बोलण्यांत तह ठराव जाला कीं, "संभाजीराजे यांचे नांवें पांच[३] हजार फौजेचा सरंजाम लाऊन त्यांत पांच हजार फौज नेहमीं राहावी, मातबर माणूस कोणी याणीं ते लोक घेऊन राहावें. त्याचे नांवें हातें मदतीचें कामकाज घ्यावें." त्याजवरून उभयपक्षीचीं बोलणीं सिद्धांतांत आणून ठराविले जे, "सत्तावीस किल्ले बांधारी[४] खानदेश, बागलाण प्रांत सुद्धां घेतला तो महाराजांनीं सोडावा; मनसब पांच हजार फौजेस सरंजाम जाहागीर आवसें[५] बाळापूर वऱ्हाड प्रांतीं तालुका लाऊन द्यावा; व पूर्वीचे करार आहेत ते[६] चौथाई, सरदेशमुखी चालावी; विजापूर तालुक्यांतील प्रांत किल्ले व त्या लगत दौलताबादेखालील किल्ले मुलूक पेशजीचे[७] तहाप्रमाणें महाराजांकडे राहावे." याप्रमाणें तहनामा ठराऊन महाराजांकडे लेहून पाठविलें आणि उत्तरें आणून करार ठरविला. शाहाजादे यांचीं दस्तकें[८] व सरंजाम तालुक्यांच्या सनदा वगैरे घेऊन बाळाजी आवजी चिटणीस महाराजांपाशीं आले. महाराजांस जवाहीर, वस्त्रें, हत्ती, घोडे वगैरे शाहाजाद्यानीं दिले ते आणून प्रविष्ट केले. तिकडील वकील बराबर घेऊन आले, त्यांस महाराजांनीं सत्तावीस किल्ले यांच्या चिठ्या[९] देऊन, वस्त्रें देऊन निरोप दिल्हा. मनसबेस वऱ्हाड प्रांत व आवंढा पट्टा[१०] दोन किल्ले व त्याखालील मावळें[११] ऐसा लावून घेतला. त्यास अमल बसवण्यास रावजी सोमनाथ सुभेदार करून कांहीं फौज लोक देऊन पाठविले. तिकडील अमल बसल्यावरि पांच हजार फौज औरंगाबादेस चाकरीवरि पाठवावीसें करून अमल बसला तेव्हां प्रतापराव गुजर सरनोबत सरदार, त्याजबरोबर कारभारी अनाजी रंगनाथ मळेकर व येसाजी मल्हार ऐसे दिल्हे. ते शहरास जाऊन राहिले. शाहाजादा व महाराज यांचा तह होऊन बहूतच सफाई [नें] परस्परें निखालसता होऊन चालूं लागले.

---

१. 'झाले शिवाय' की०. २. कुमक (स्त्री० तु०)–मदत. ३. 'हप्त हजारी दौलत द्यावी' (सभासद). ४. बां (बा) धारी (पु०)–डोंगरावरील प्रदेश; किल्ल्यांची रांग. ५. आवसें–आवसा–उस्मानाबाद जिल्ह्यात (मराठवाडा). ६. ते–त्याप्रमाणे. ७. पेशजी (क्रि० वि० अ०) [फा० पेश्‌–अझी]–पूर्वी. ८. दस्तक (पु० फा०) –पर्वाना ९. चिठी–(स्त्री०)–सोडणुकीचे पत्र. १०. आवंढा पट्टा–सिन्नर तालुक्यात (नासिक जिल्हा). ११. 'वऱ्हाड प्रांत' की० 'माहाल' सा० २.

४६. बादशहाने तह मोडला.

[नंतर] शाहाजादे यांणीं तहाचें सर्व वर्तमान पादशाहास लिहिलें. तेव्हां त्यांस तह जाला हा प्रशस्त वाटला नाहीं. "शिवाजी राजे निःसीम आपलेसे होऊन तिकडील दक्षिण प्रांत दोन्ही पादशाहाती भागानगर, विजापूर सोडवून आपणांस द्यावे, त्यांतून आणखीही प्रांत आपले[1] फौजेचे बेजमीस[2] लावून घ्यावा," ऐसे [पातशाहा] लिहीत गेले. महाराज यांणीं तह जाला याजमुळें दोन वर्षें स्वारी करणें तें विजापूर तालुका वगैरे यांतच करून खंडणी वगैरे घेऊं लागले. किलियाच्या इमारती पाहाणें, दौलतीचा बंदोबस्त, उपभोग हेंच केलें. दोन वर्षे तह चालला असतां दिल्लीहून औरंगजेबाचे चित्तांत आलें जे, "याप्रमाणें राजे यांशीं तह करून चालणें ठीक नाहीं. अधीकच बळावत चालले. दोन्ही पादशाया त्यांनीं घेतलियावरि इकडीलही मसलत करतील. यास्तव त्या[3] पादशाहींतील प्रांत, किल्ले, खंडणी घ्यावी ते आपणांस द्यावी तें घडत नाहीं. त्या अर्थी तह मोडावा. स्वारी करणें, प्रांत किल्ले घेणें ते, तेच घेतात. हें पुढें जड पडेल." याजवरून शाहाजादे यांस लिहिले जे, "राजे[4] यांजकडील [त्यांनीं तहांत] प्रांत, किल्ले घेतले ते माघारे घ्यावे[4], फौज सरनोबत [यांस] घालवून द्यावें. हात[5] पोंचल्यास लुटून घ्यावें. तेव्हां शाहाजादे यांची व महाराजांची अंतर्यामीं निखालसता यामुळें त्यांणीं सरनोबत यांस सूचना केली व महाराजांसही लिहिलें, तेहां महाराजांनीं सरनोबत व फौज[6] बोलावून घेतली.[6] आवसें वगैरे तालुका त्यांणीं[7] जप्त केला.

४७. मोगल उमरावांस तंबी.

महाराजांनीं मोरोपंत पेशवे यांस फौज देऊन रवाना केलें. सालेरीपासून[8] सर्व तालुका सत्तावीस किल्ले घेवविले. बागलाण, खानदेश [यांत] अम्मल बसविला.

---

१. आपले–शिवाजीकडील. २. बेज (ग) मी (स्त्री० फा०)–पुरवठा. ३. 'या' की०. ४. याबद्दल 'राजे यांजकडील प्रांत किल्ले दिले ते माघारे घ्यावे' सा० २ व की०. ५. हात पोचणे–शक्य होणे. ६. 'फौज पत्र पाठवून मागें आणविली.' की०. ७. त्यांणीं–मोगलांनी. ८. सालेर–मुलेर–बागलाण तालुक्यात (नासिक जिल्हा). सालेरचा किल्ला प्रतापराव, आनंदराव व मोरोपंत पेशव्यांनी व मुलेरचा किल्ला मोरोपंताने इ. स. १६७२ मध्ये घेतले (सरकार–शिवाजी पृ. १८३).

आणि सरनोबत वगैरे सर्व फौज घेऊन खासा स्वारीस निघाले व बऱ्हाणपूरपर्यंत गेले. खानदेश [मध्यें] खंडणी घेत लुटीत गेले. बऱ्हाणपूरचे पुरे मारिले. [ते] लुटून वऱ्हाडप्रांतीं येऊन करंजें वगैरे शहरें मारीत मुकाम करीत बे-मबलग[1] लूट व द्रव्य खंडणी घेतली. आणि [परत] येत असतां दिलेलखान व बाहदारखान व एखलासखान, बहलोलखान व इंद्रमणी ऐसे उमराव चालून आले, त्यांशीं युद्ध करून, तंबी[2] पोहंचऊन दब्राऊन सारिले. हिसाब न धरितां पराभव करून राजगडीं येऊन पावले.

४८. सालेरची लढाई.

[इकडे] पेडगांवपर्यंत दिलेलखान मागें आला, आणि फौज माघारी घेऊन, दाहा हजार फौजेनिशीं सालेरीवरि पेशवे यांजवरि चालून गेला.[3] हें वर्तमान महाराजांस कळतांच प्रतापराव गुजर, पागा फौजेनिशीं तिकडे रवाना केले. त्यांणीं दरमजल जाऊन दिलेलखान याजवरि छापा[4] घालून गांठून घाबरा केला. कही व रसद बंद केली. दिलेलखान व एखलासखान युक्तीनें निघोन कोणारगड[5] येथे रुमाजी नळगे दोन हजार लोकांनिशीं होते, हे बातमी लाऊन लुटावे म्हणून चालून गेले. तेथें[6] मावळे लोक यांणीं गट[7] बांधून युद्धाची शर्त केली. दोन हजार पठाण रणीं पाडिले. रुमाजी नळगे रणीं ठार पडले. नंतर सालेरीस खान जाऊन मोर्चे देऊन बसले. तों प्रतापराव जाऊन पावले. घाटाकडून मोरोपंत पेशवे चालून आले. मोगल मधींच घेरून घाबरा केला. रसदबंदी केली. तेव्हा मोर्चे सोडोन निघोन चालला. [तों] लगट करून एखलासखान यांसि गांठलें. युद्ध बहूत जालें. पांच हजार माणूस पठाण घोडे घालून मारिले. एखलासखान[8] सडा पळून गेला. दिलेलखान दुसरे वाटे

---

१. बेम (मु) (मो)ब्लग(क) (वि०) (फा० बी + अ० मब्लघ्)–असंख्य 'बे मुगलबा' की०. २. तंबी (ह) (स्त्री० अ० तम्बीह्)–धमकावणी; दटावणी ३. 'आले' को० 'गेले' सा० व सा० २. ४. छापा (पु०) [फा० चापीदन् तु० चापौल्–चपावल्]–हल्ला ५. सभासद म्हणतो की, कणेरागड येथे रामाजी पांगोरा हशमांचा हजारी होता. कणेरागड चांदवडजवळ (नाशिक जिल्हा). ६. 'येथें' सा०. ७. गट बांधून–भरगच्च टोळ्या करून. ८. खासा इखलासखान व बेलोलखान पाडाव (कैदी) झाल्याचे सभासद म्हणतो. मुहकमसिंगही पाडाव झाला (सरकार–शिवाजी पृ. १८२).

घाटावर गेले. त्यांजवरि [मराठे] जाऊन पडले, त्यांजला सांवर पडूं[1] दिला नाहीं. ते निघोन मातबर मजली करीत औरंगाबादेस पोंचले. पेशवे यांस लूट बहूत सांपडली. हत्ती, घोडे पाडाव करून आणिले. बराबर सरदार आनंदराव, व्यंकोजी दत्तो, रुपाजी भोसले, सुरेराव काकडे, खंडोजी जगताप, संताजी जगताप, मानसिंग मोरे, विसाजी बल्लाळ, मोरो रंगनाथ, मुकुंद बल्लाळ हे[2] होते. त्यांणीं लढाईत बहूत शर्त करून कामें केलीं. सुरेराव काकडे रणीं पडले. बहलोलखान सरदार लढाईत पाडाव आले. हें वर्तमान सर्व महाराजांस लिहिलें. त्याजवरून बहूत संतोषी होऊन तोफा करविल्या. जासूद[3] पत्रें घेऊन आले त्यांस सोन्याचीं कडीं, वस्त्रें बक्षीस दिल्हें. बहलोलखान व आणखी सरदार पाडाव आले त्यांस वस्त्रें देऊन रवाना शहरास खर्चास देऊन केले.

४९. हंसाजी मोहिते यांस 'हंबीरराव' केले.

याजवरि विजापूरकडील रणमस्तखान व बहलोलखान पन्हाळ प्रांतीं यावें म्हणोन सदल[4] कोल्हार पर्यंत धामधूम करीत आले. हें वर्तमान कळतांच सरनोबत यांस फौजसुद्धां[5] रवाना केलें. त्यांची यांची गांठ उंबरटी[6] तालुकियांत पडली. युद्ध जालें. दोनप्रहरपर्यंत लढाई चालली. पाणी नाहीं [त्यामुळें] मोंगल आयास[7] आणिला. ते समयीं तह करून "महाराजांकडील प्रांतांत याउपरि येणार नाहीं" असा करार करून निघोन गेला. हें वर्तमान महाराजांस कळलियावरि महाराजांनीं सरनोबत यांस "तह करून मोंगल सोडिला हें ठीक न केलें. आयास आला तसाच बुडवावा,[8] हें कां न केलें?" ऐसें लिहिलें. सरनोबत तह करून भागानगर प्रांतीं देवगड, रामगड पर्यंत स्वारी करून खंडणी चौथाई घेत घेत पुन्हा देशीं आले. तों रणमस्तखान [व] बहलोलखान पुन्हा जमाव करून पन्हाळा प्रांतावर आले. हें वर्तमान महाराजांस कळलें. महाराजांनीं

---

१. 'घेऊं' की०. २. 'शिदोजी निंबाळकर व गोंदजी जगताप' ही अधिक नांवे सभासद देतो. ३. जासूद (पु०) [अ० जासूस्]–दूत. ४, 'संपगाव' की० 'सदल कोल्हार' को० 'सदगल काल्हार' सा०२. ५. याबद्दल 'सरंजाम तोफा पागा लोक वगैरे मोठी तयारी करून देऊन सरदारांसुद्धां' की०. ६. 'उंबराणीस' (सभासद). उमराणी विजापूरच्या पश्चिमेस ३६ मैल (सरकार–शिवाजी पृ.१९२). 'बरटी' को० 'उमरटी' की० व सा०२. ७. आयास (पु०) [सं० आ+यस्]–श्रम; थकवा. ८. बडवावा सा० व को०.

सरनोबतास "तुम्ही तह करून सोडिला असतां चालून आला. इतबार धरिलात. तेच समयीं बुडविला नाहींत." म्हणून शब्द लाविला. [आणि त्यांस] पुन्हां त्यांजवर रवाना केलें. ते गेले. बावसे[1] ज [न ?] व सरीवर जाऊन मोगल गांठिला. युद्धप्रसंग बहूत जाला. प्रतापराव याणीं बेइमानी यांणीं[2] केली [असा] महाराजांचा शब्द आला म्हणून लोक निवड करून घोडे चालविले. [मोंगलाची] खराबी बहूत केली. तों प्रतापराव[3] गोळा लागून रणीं ठार पडिले. ते समयीं हसाजी मोहिते सरदार जुमलेदार होते, त्यांणीं सरदार पडले असतां लढाई सांवरून, आंगेजणी करून, पुन्हा चालून घेतलें, आणि मोंगल कापून काढिला. पळूं लागला. मोड जाला. तेव्हां विजापूरपर्यंत पिटीत घालविला. [हसाजी मोहिते] फत्ते पावले. सर्व संभाळून महाराजांचे प्रतापें रायगडीं आले. महाराजांनीं वस्त्रें-भूषणें देऊन फारच नांवांजीस करून 'हंबिरी[4] केली,' म्हणोन 'हंबीरराव' ऐसा किताब दिल्हा आणि सरनोबती त्यांजलाच करार करून वस्त्रें दिल्हीं.

५०. हंबीररावांची मर्दुमी.

[नंतर त्यांस] स्वारीस पाठविलें. ते बागलाण प्रांतीं जाऊन गुजराथ प्रांतीं गेले. अमदाबाद प्रांतापर्यंत जाऊन मुल्क लुटून, शहरें मारीत खंडणी घेऊन नर्मदातीराकडून बराणपुरीं आले. खानदेशींची खंडणी करून, माहूर तालुकियांत जाऊन, तेथील खंडणी केली. जालनापूर, शिंदखेड येथील खंडणी घेऊन गंगातीरीं देशीं आले. तों दिलेलखान व आणखी उमराव चालून आले, ते-समयीं लांब लांब मजली करून चालले. मागें गनीमही चालला. त्यांस दबाऊन[5] राखून यश घेऊन महाराजांचे दर्शनास आले. सुरक्षित लूटसुद्धां खजीनासुद्धां पावले. सर्व महाराजांस नजर केली. महाराज बहूत संतोष जाले. व एकंदर वृत्त महाराजांनीं विचारिलें तेव्हां त्यांनीं जसें जसें ज्या ज्या ठिकाणीं होत गेलें तसें तसें सर्व इत्थंभूत महाराजांस निवेदन केलें. [नंतर त्यांस निरोप दिला.]

---

१. 'जेसरीवरि' (सभासद). नेसरीवरी हवे. मोडी वाचनाची चूक. गडहिंग्लज-जवळ घटप्रभेच्या उत्तरेस एक मैलावर नेसरी खिंडीत हे युद्ध दि. २४ फेब्रुवारी इ. स. १६७४ रोजी झाले (श. शि. पृ. १५४). २. यांणीं-विजापूरकरांनी. ३. 'प्रतापराव सरनोबत तरवारीचे वारानें ठार जाले' (सभासद). ४. हंबि (बी) री (स्त्री०) [अ० अमीरी]-शौर्य. ५. 'दाबून' की०

५१. सरदारांस बढती.

[पुढें] कानो मोरदेव गपचूप यांस सरनोबतांची मजमू होती, ती दूर करून अनाजी रंगनाथ पुरंधरचे सबनिसीवर होते, ते शाहाणे कर्ते पाहून त्यांस सरनोबताची मजमू दिल्ही. बकाजी फर्जंद यांस कारभार दिल्हा. संताजी घोरपडे यांणीं कामें बहूत केलीं. शिपाई मर्द जाणोन हंबीरराव यांणीं विनंती केलियावरून तैनात जाजती करून जुमलेदारी दिल्ही. तसेच धनाजी जाधवराव हे व्यंकोजी खांडेकर यांचे जुमल्यांत होतें, त्यांस ते सरदारी योग्य जाणोन त्यांसही जुमलेदारी दिल्ही. याप्रमाणें दोन सरदार हंबीरराव यांणीं विनंती करून वाढविले. याप्रमाणें हसाजी मोहिते, बीड[1] परगणे याचे देशमूख, यांणीं चाकरी मर्दुमी केली.

५२. दिल्लीपतीस नामोहरम केले.

[या प्रकारें] महाराज यांणीं दिल्लीहून सरदार आले व मसलत जाली असतां [त्यांस] नामोहरम[2] केलें. [स्वतः] दिल्लीस जाऊन ख्याती करून [युक्तीनें परत] आले. ऐसें दिल्लीपती यांसि नामोहरम केलें. महाराज राजगडाहून रायगडीं गेले. [याप्रमाणें] दिल्लीपतिपराभव प्रकरण पंचम समाप्त.

---

१. हंसाजी मोहिते हा कसबे तळ-बीड येथील राहणारा. (स. च. पृ. २६९).
२. नामोहरम (वि०) [फा० ना-महरूम]-निराश, पराभूत.

दक्षिण-दिग्विजय*–प्रकरण ६§

१. "ईश्वरानींच त्यांजला वैभव दिलें."

श्रीशिवछत्रपती यांशीं औरंगजेब यांणीं बहूत प्रकारें[1] पूर्वीं शाहाजादेपणांत, औरंगाबादीं असतां, राजांचा पराभव करावा म्हणोन प्रयत्न केला. पुढें दिल्लीस जाऊन पादशाहा जालियावरि यांचा पराभव करावा म्हणोन सुभे पाठविले. त्यांचे वस्तू [कांहीं] न जालें. त्यानंतर भेटीस नेऊन आपलेसे करावे, म्हणोन दिल्लीस नेऊन दगाबाजी केली असतांही [ती] न[2] चालली. [नंतर] आणखी मोहीम केली तेही पराभवातें पावली. तेव्हां आपले ठायीं, "ईश्वरानींच त्यांजला वैभव दिलें, आपण यत्न करणें ठीक नाहीं" म्हणोन पराभवातें पावून राहिले.

२. शिवाजीची पुत्रांस शिकवण.

महाराजांचा प्रताप दिवसेंदिवस वाढत चालला. संभाजी राजे प्रबुद्ध[3] जाले. त्यांस व राजारामसाहेब यांस विद्याभ्यास करवावा, सुशिक्षित असावे, म्हणोन

---

* हे प्रकरण कीर्तने, सातारा २ व पुणे या तीन प्रतींवरून तयार केले आहे. सातारा व कोल्हापूर प्रतींत हे प्रकरण नाही. §कीर्तने प्रतीचा मथळा 'शिवछत्रपति यानीं दक्षिण दिग्विजय केला ते कथन प्रकरण, षष्ठ.' सातारा २ 'प्रकरण साहावें प्रारंभ. शिवछत्रपती.' व पुणे प्रत 'प्रकर्ण साहावें दक्षिण दिग्विजय.' १. यानंतर 'स्पर्धा करून' की०. २. 'नचजाली' पुणे. ३. प्रबुद्ध (वि० सं०)—प्रौढ. (लक्षणेने) हुषार.

घोड्यावर बसणें, शास्त्रविद्या, शस्त्रविद्या, तालीम,[1] तिरंदाजी[2] सर्व करविते जाले. आपण राजे व हे राजपुत्र. पुढें राज्यास अधिकारी हेच. आपण महाराष्ट्रराज्य आक्रमून धर्मस्थापना केली, ते पुढें वृद्धीस यांचे हातें पावावी. अष्टप्रधान यांतच[3] राजपुत्रांची गणना आहे. सर्व अमात्य राजाचा वाम भुज, युवराज राजपुत्र हा सव्य[4] भुज असें आहे. त्या अर्थी[5] हे सुशिक्षित असावे म्हणून लेखनादी अभ्यास[6] करविला. आणि उत्तम वृद्ध सेवक समीप ठेविले. दंडनीती, राजधर्म, हे सांगविले.[7] राजपुत्रधर्म, पितृसेवा कायावाचामनें करावी; जीं कर्मे करणें तीं पित्यास संतोष उत्पन्न होय अशीं करावीं; कोणतेंही कर्म पित्यास तिळप्राय विषाद उत्पन्न होय ऐसें करूं नये; पित्याची कृपा ज्याजवर असेल[8] त्याजवरि आपण कृपाच करावी; ज्याचेठायीं पित्याचा द्वेष त्याशीं आपणही करावा, त्यासि प्रीती करूं नये; पित्यानीं संतुष्ट होऊन युवराजपद कारभार सांगितला असतां गर्वारूढ होऊं नये; संपत्तीचे मदें आणि तारुण्याचे मदेंकरून उन्मत्त होऊं नये; पिता, माता व भगिनी व बंधू, मित्र व वल्लभ[9] थोर थोर प्रतिष्ठित असतील [त्यांचा] व प्रजादिकांचा अपमान करूं नये. मोठीही[10] वृद्धी पावला असतां पित्याची आज्ञा उल्लंघन करूं नये, हाच पुत्राचा धर्म श्रेयस्कर आणि भूषणापेक्षां भूषण होय. बंधुवर्ग असतील त्यांत आपण युवराज जालों, कारभार करतों, म्हणून गर्व धरून आपण सर्वांहून अधीक ऐसें कदापी मानूं नये. राजाची आज्ञा पालन न केली व बंधूंची अवगणना केली असतां द्रोहें[11] करून [तो युवराज] पदच्युत होतो. यदू आदीकरून राज्यास सिंहासनादीकरून [योग्य असतांही] अनधिकारी जाले. पितृद्रोहेंकरून असें घडलें. ज्येष्ठ असतांही असें जालें व बंधुहेलना[12] करून दुर्योधनादी नाश पावले. यास्तव बंधुवर्गांचे अर्थ त्यांस देऊन त्यांचीं मनोधारणें[13] रक्षून विशेष वाढूं न देतां रक्षावें. बहूत नम्रत्वें

---

१. तालीम (स्त्री०) [अ० तअलीम्]—व्यायामशिक्षण. २. तिरंदाजी (स्त्री०) [फा० तीर्–अन्दाझी]—धनुर्वेद; धनुर्विद्या. ३. 'याचे' पु० ४. सव्य(वि० सं०)—मूळ अर्थ डावा. ('वामं शरीरं सव्यं' अ० को०) येथे (चुकीने रूढ) उजवा. ५. 'त्यार्थे' सा० २. (त्या + अर्थे यांचा संधी). ६. थापुढे 'करवून पंडितांचा सहवास करविला' की० व सा० २. ७. 'समजाविले' की०. ८. 'आहे' पु०. ९. वल्लभ (पु० सं०)–प्रियजन. 'व वल्लभ 'याबद्दल 'जवळ' सा २. १०. 'कोणीही' पु०. ११. द्रोह (पु०) [सं० द्रुह्]–वैर. १२. हेलना (स्त्री० सं०)–अनादर; हेटाळणी. १३. मनोधारण (णा) (न० स्त्री० सं०)–मनधरणी. 'मनोधार' की०.

करून सकलगुणसंपन्न असोन सर्व मंत्री व सेवक-जन उत्तम यांचा सहवास व युक्ती श्रवण करून राज्यांतील माहितगारी[१] व राज्य करण्याच्या युक्ती अवगत करून घ्याव्या. त्यांची मान्यता रक्षावी. उत्तम जनांची संगती करावी. नीच व दुर्व्यसनी यांची कदापि मैत्री करूं नये, [त्यांचा] सहवास न करावा. असे बोध करविले. राजांनीं पुत्रांस बहूत प्रकारें रक्षावें. मत्त हत्तीस अंकूश नसल्यास तो अनर्गल[२] होतो, सर्वांचे घात करतो; तसेच पुत्र रक्षिले नाहींत, आणि लघुमनुष्यांची[३] संगती जाली व मद जाला असतां, आपणच राज्य करावें म्हणून इच्छा धरून अनर्गल होतील. तेणेंकरून राज्यक्षय होईल. जें मांस-आमिष[४] अमुक स्थळीं आहे ऐसें व्याघ्रास कळलियावरि त्याचें निवारण होत नाहीं, तसेंच पुत्रांचें निवारण मग करूं गेलें तरी घडत नाहीं. यास्तव उत्तम सुशिक्षित, प्रौढ सेवक सावध ऐसे जवळ ठेवावे. सिंहाचे पिलांस असावध रक्षक असले तरि त्यांसच भक्षून आणखी जनांस भक्षून नाश करितात. यास्तव [रक्षक] सावध असावे. राजाचे कुळीं अनीतिमान पुत्र निर्माण जाला म्हणजे तें राज्य व कूळ शीघ्र क्षयास जातें. म्हणोन बहूत नीतीनें रक्षिणें तसें रक्षिलें. आणि मातबर सरकारकून प्रौढ यांजपाशीं बसावें, दरबारांत बसावें, कारभारांत[५] माहीत होत जावें ऐसें सांगून करविते जाले. श्रीरामदासस्वामी यांचे दर्शन, सहवास करण्यास [युवराज संभाजी यांस] पाठविले होतें.

३. न्यायाचे राज्य.

तसेच [दरम्यान] निळो[६] सोनदेव मजमुदार वारले. त्यांचे पुत्र दोघे. वडील नारोपंत, धाकटे रामचंद्रपंत. परंतु नारोपंत नाकाबिल,[७] आर्ष[८] होते. म्हणून रामचंद्रपंत यांसच पद देऊन मजमूचें काम त्यांजपासून घेऊन चालविलें. निराजी रावजी न्यायाधीश हे परम चतुर, शाहाणे, तर्कज्ञ,[९] यांस न्याय

---

१. माहितगारी (माहीतगिरी) (स्त्री०) [अ० माहीयत्+फा० गा (गि)री]-ज्ञान. २. अनर्गल (ळ) (वि०) [सं० अ+अर्गला]-स्वच्छंदी. ३. लघु (वि०)-नीच. ४. आमिष (न० सं०)-प्रलोभन. ५. 'कारभार माहीत होत जावे' सा० २. ६. निळो सोनदेवांचा मृत्यू इ. स. १६७२ मध्ये झाला (सरदेसाई-स्थिरबुद्धी राजाराम (१९३६) पृ० १५७). ७. नाकाबिल (वि) [फा० ना-अ० काबिल्]-कर्तृत्वहीन. ८. आर्ष (वि० सं०)-मूळ अर्थ पूज्य (ऋषीप्रणीत). येथे (लक्षणेने) मंद, अव्यवस्थित. ९. तर्कज्ञ (वि० सं०)-मर्मज्ञ.

करण्याविशीं [सांगितलें.] राज्यांतील अनेक प्रकारचे न्याय येतील ते नीतीनें करावे. दंड करणें त्यास न केला व न करावा त्यास केला असतां राज्यास अकल्याण, व न्याय करणें त्यांत लोभ धरून वृत्ति-उच्छेद जाले[1] असतां परम पाप [होय.] त्यायोगें राज्य क्षयास पावतें. यास्तव नीतिशास्त्राप्रमाणें विद्वान, पंडित ब्राह्मण व सभासद चतुर व सभ्याधान[2] म्हणजे न्यायास[3] आले त्यांस बोलावणें आणणें करणार[4] यांस म्हणावें तसेच आणखी न्यायकर्ते दाहा पांच घेऊन, सर्वांचे मतें न्याय निवडून, राजास निवेदन करून, किमपि अन्याय होऊं न देतां करीत असावें; व कोणाचीही दाद[5]-फिर्याद आली असतां न लागली, मनास आणली नाहीं, असें न घडतां काम करावें. न्याय करणें तें बहूत दिवस लावून त्याची जीविका[6] बुडाली असें न होतां तत्काळ गोरगरीब [आदिकरून] सर्वांचे न्याय होत असावे. कोणासही विपरीत शासन, द्रव्य-हरण होऊं नये. असें बहूत रितीनें सांगून, मुख्य गोष्ट राजाचा धर्म प्रजापालन करणें व न्याय अन्याय पाहाणें, धर्म कोण्हीं आचरिला व अधर्म कोण्हीं केला हें पाहून शिक्षा करणें, यास्तव हें सावधपणें करावें. नाहीं तरि राज्यास वाईट म्हणून सांगून लघुजन यांचे न्याय करणें ते त्या त्या ज्ञातींतील सभ्य असतील व त्यांचे त्यांचे धर्म असतील त्याअन्वयें व देवधर्म व जातिधर्म विविक्षा करून करीत जावें. असें सांगून करविते जाले.

४. मद्यपानबंदी.

महाराजांस मद्यप्राशन करणार व कैफी[7] मनुष्य यांचा बहूत त्रास. सेवेचे लोक व समीप राहाणारे यांणीं कैफ सेवन केला तरि तत्काळ त्यास शिक्षा करीत. बहूतच [कैफ] केला, व्यसनी जाला, तरि सेवेंतून दूर करावें. कलाल[8] यांचीं दुकानें सरकार आज्ञेखेरीज असों नयेत. ठेवावीं त्याजवरि सरकार-पागा व

१. 'जाली' पु०. या दृष्टीने 'वृत्ती उच्छिन्न जालीं असतां' असे हवे. २. 'सभ्यधान' की०. ३. 'ज्यास' की०. ४. 'करणें' पु०. ५. दाद-फिर्याद (स्त्री०) [फा० दाद्+अ० फर्याद्]-न्यायासाठी गाऱ्हाणे. ६. जीविका (स्त्री०.)-निर्वाह-साधन. ७. कैफी (वि० फा०)-मादक पदार्थांचे सेवन करणारा. ८. कलाल (पु०) [सं० कल्यापाल.] कल्ला (दारू) हा प्राकृत शब्द मूळचा. त्याचा अनुसारी संस्कृत शब्द नाही. तेव्हा कल्यापाल हे संस्कृतीकरण नंतरचे. 'ल' हा विशेषण प्रत्यय प्राकृतातील आहे.]-मद्याचा व्यापारी. (कुलकर्णी-मराठी व्युत्पत्तिकोश, पृ. १४५).

कारखाने यांस [मद्य] परवानगीनें चिठीनें देत जावें [अशी सक्ती होती.] सैन्यांत तरि[1] तें नेऊं नये. कैफी माणूस जालें म्हणजे बेखबरदार होऊन कार्यनाश[2] होतो. आणि मनस्वी पापाचार घडतो. म्हणोन बहूत मर्यादा शिक्षा करणें असें करून ठेविलें.

५. व्यंकोजी राजे 'बहुतच विलक्षण.'

शाहाजी महाराजांनीं चंजाऊर प्रांतीं राहून तो प्रांत रक्षण[3] केला. ते समाप्त जाले.[3] ते समयीं नारो त्रिमल हणमंते कारभारी सर्वाभ्य[4] आणि व्यंकोजी राजे तेथें होते, त्यांणीं त्यांचे विचारें चालोन रक्षावें असें केलें. नारोपंत यांणीं अग्निहोत्र घेऊन सोमादियज्ञ[5] करून दीक्षित जाले. त्यांचे पुत्र रघुनाथ नारायण बहूत कर्ते व शाहाणे, धूर्त, विद्वान ऐसे जाले. शाहाजी महाराज वारल्यावरि त्यांणीं दौलत कायम राखून द्रव्यादिसंग्रह बहूत केला. व्यंकोजी राजे बालत्व दशा होती तों त्यांचेच करण्यांत चालत आले. नंतर स्वतां[6] पाहावें, पराक्रम थोडा असून व्याप करावे, हे इच्छा धरिली.[6] परंतु बुद्धीकरून कमी पडले. आणि सांगितल्याप्रमाणें चालावें तेंही न घडे. असें होऊन कारभारी व थोर माणसें यांचें[7] केलें चांगलें न वाटून, सामान्य जन, हलकीं माणसें यांची प्रतिष्ठा बाळगून[8] त्यांचें ऐकूं लागलें. याजवरून रघुनाथपंतीं विचार केला, "याजपाशीं राहून वडिलीं मिळविली ती प्रतिष्ठा जतन होणें संकट दिसतें. धणी हे [खरे,] परंतु शिवाजी महाराज यांचे गूण व कर्तृत्व दिवसें दिवस वृद्धिंगत होत चाललें. दौलतीचे खावंद ते. त्यांचे दोष आपणावर येतील. यास्तव स्नानसंध्या करून स्वस्थ राहावें, क्षेत्रवास करावा ऐसें मनांत येतें. परंतु दौलतीस कमी आपण असोन पडेल, हाही स्वामिकार्याचा दोषच होय. म्हणोन कांहीं ऐकतील तितकें सांगावें." ऐसे उदासवृत्तीनें कांहीं करतील तें

१. 'तर तें अगदीं जाऊं देऊं नये' की०. २. यानंतर 'द्रव्यनाश होतो' की०. ३. जतन केला आणि कैलासवासी समाप्त जाले' पु०. ४. सर्वाभ्य [वि० क्रि० वि० सं० सर्वस्मात् सर्वादारभ्य; 'आभ्य' अवशेष]–सर्व कामांतील. ५. सोमयज्ञ –सोमयाग (यात सोमरसपान होते म्हणून). ६. 'स्वतां व्याप व पराक्रम थोडा असून करावे' पु०. 'नंतर त्यांनीं स्वतः व्याप व पराक्रम थोडा असोन कारभार करावा इच्छा धरिली' की०. ७. 'त्यांनीं केलेलें' सा०. ८. 'बोलगुज' की० गुपित या अर्थी.

पाहावें ऐसें करूं लागले. [व्यंकोजी राजे] बहूतच विलक्षण, कांहीं वाकडें केल्या, "राजेसाहेब, आम्ही तुमचे परंपरा [गत] व वडिलोपार्जित सेवक, तुमचें हित तेंच करावें हें आम्हांस श्रेयस्कर जाणून करतों, तें आपणास चांगलें वाटत नाहीं. सामान्य माणसांचा सहवास, आदर धरतां हें चांगलें नाहीं. वडिलीं कीर्ती कशी अर्जविली ?[1] तसेंच वडील बंधू शिवाजी राजे यांणीं कसें राज्य वृद्धीतें पाववून दिगंत विख्यात जाले आहेत ? त्यांचे भाऊ आपण. तसें चालवें. विख्यात व्हावें. आहे हें रक्षून नवें राज्य साधून पराक्रम करावे. आम्ही समीप असतां कांहीं न जालें [असें] शिवाजी राजे म्हणतील. आमचे हातें सेवा घ्यावी व आम्हींही करावी हेंच आम्हांस उचित. द्रव्य व लोक पदरीं असतांना नाचीजपणें[2] लोकांहातीं द्रव्याचा व्यय व्यर्थ करवितां. वडिलीं कीर्ती मेळविली त्याहून अधीक करून दाखवावी. तरीच त्या कुळांत जन्म घेतल्याची योग्यता आहे." ऐसे बुद्धिवाद बहुतां[3] रितींनीं केले असतां त्यांचे विचारास न येऊन त्यांचेठायीं दिवसेंदिवस अनादर करूं लागले. हितावह बोलणें तेंच अनहित[4] वाटूं लागलें. त्याजवरून त्यांणीं सर्व वृत्त, यांची चाल, महाराजांस लिहिली. महाराजांनींही पत्रें लिहिलीं कीं, "तुम्ही उदासीन राहातां, रिकामे लोकांहातीं कांहींएक उद्योग[5] न करितां खाववितां, वडिलीं थोर माणसें विश्वासू जोडिलीं त्यांचे अनादर करितां, [हें] विहित नव्हे." परंतु लघुमनुष्यांनीं बुद्धीस भ्रंश बहूत केला. ते समयीं पंतांनीं विचार केला जे, "यांचें अन्न वडिलोपार्जित भक्षिलें. तेव्हां यांचे ठायीं वाईट इच्छिणें योग्य नाहीं. यास्तव यांचे वडील बंधू शिवाजी राजे, महाराजांचे ज्येष्ठ, पुत्र, राज्याचे अधिकारी, त्यांजपाशीं जावें हें उत्तम."

६. रघुनाथपंत शिवाजीकडे निघतात.

ऐसें मनांत आणून एके दिवशीं व्यकोजीराजे यांस बोलण्यांत बहूत प्रकारें बुद्धिवाद केला असतां, त्यांणीं विचाराचे मार्ग एकीकडे ठेवून उत्तर केलें कीं,

---

१. अर्जविली—अर्जिली (मिळविली.) २. नाचीज (वि.) [ना–चीझ्]–निष्फळ ३. बहुतां–बहूत याचे अनेकवचनी सामान्यरूप. 'बहूत रीतींनीं की० 'बहुता रितीनें' सा० २ व पु०. ४. अनहित [म० अन (अन्य)+सं० अहित]–खरा अर्थ सहित. येथे (चुकीने रूढ) अहित; अकल्याण. ५. 'उपयोग' सा० २.

"तुम्ही चाकर, सांगूं तितकें करून असावें." ऐसें बोलिले असतां रघुनाथ पंतीं तत्काल उत्तर केलें कीं, "राजे हो! आम्ही तुमचे सेवक खरेंच, परंतु तुम्हांपासून गेलियावरि तुमचे अर्धासनींच बसण्यास योग्य आहों." हें उत्तर केलियावरि त्यांस फारच वाईट वाटलें. ते समयीं पंतीं कुटुंबासह[1] निरोप घेतला जे, "शिवाजी महाराज यांचें दर्शन करून येतों," म्हणोन निघाले[2] "आपण येथें प्रसंगीं बोललों तसेंच करून दाखवावें [असें] चित्तीं आणून "हर एक पाळेगार याशीं सख्य करून शेवटास नेणें[3] तरि यांचे राज्यास विपरीत. हें करणें अश्लाघ्यच[4] होय. शिवाजी राजे यांस राज्य साधण्याचा बहूत हव्यास,[5] दिवसें दिवस अधीकच संपादन करितात, त्यांजकडे जावें" हाच सिद्धांत केला. "त्यांतही आम्ही त्यांचे वडिलांचे पदरचे, म्हणोन उगेच जाणें ठीक नाहीं. राजे यांस राजकारणाचा आदर बहूत, तेव्हां इकडील संस्थानें यांचीं राजकारणें घेऊन जावीं. म्हणोन चंदी[6] वगैरे राजकारणें सिद्ध केलीं. हें राज्य नवीन राजांचे पदरीं घालावें हें सिद्ध केलें. आणखी कित्येक राजकारणें करून कर्नाटकांतून महाराजांकडे जावें म्हणून यावयास निघाले. ते समयीं मनांत विचार आणिला जे, "विजापूरची पादशाहात बहूत करून सुटली व दबावांत[7] आली, हाताखालीं घातली आहेच.[7] तेव्हां महाराजांस कर्नाटक प्रांतीं येण्यास भागानगरची पादशाहात मधीं[8] आहे. हें महाराजांस मनसब्याचे अर्थें येण्यास अवघड दिसेल. यास्तव भागानगरचेंही राजकारण[9] [व] सख्य जातां सिद्ध करून जावें." म्हणून भागानगरानजीक आले. तेथें आकण्णा मादण्णापंत हे कुल्कारभारी[10] वजिरी करीत होते. त्यांस कसें भेटावें? राजकारण परिस्फुट आधीं न होतां सिद्धीस जावें म्हणून, त्यांस थोर ब्राह्मण पंडित आले म्हणजे त्यांचेठायीं विशेष प्रेमा होता [हें] जाणून, आपण पंडित होऊन,[11] प्रातःकालीं स्नानसंध्यासमयीं जावेसें करून, सर्व लवाजिमा दूर दाहा वीस कोशीं[12] ठेवून, त्यासमयीं गेले.

---

१. 'कुटुंबास' की०. २. 'निघोन' सा० २. ३. 'नेलें' की०. ४. 'अश्लाघ्याचें' की० व पु०. ५. हव्यास (पु०) [अ० हवस-हवे अशी आस]-उत्साह, हौस. ६. चंदी-(जिंजी)-दक्षिण अर्काट जिल्ह्याच्या वायव्येस. मद्रासहून ८० मैल. ७. दबाव (पु०) [सं० दभ्, अ० दब्दब]-भीती. 'दबावांत घातली आहेच' की० व पु०. ८. 'मध्यें' की० ९. 'राजकारण जाणून सख्य सिद्ध' की०. १०. कुल्कार-भारी (पु०) [अ० कुल+फा० कार्बारी]-सर्वाधिकारी. ११. होऊन-वेश घेऊन. १२. कोशीं [सं० कोश]-कोसांवर.

७. रघुनाथपंत व मादण्णापंत यांची भेट.

मादण्णापंत बहूत थोर, ब्राह्मणांचे ठायीं निष्ठा, दानधर्मशील, नित्य लक्षभोजन व्हावें, तें भोंवतीं अन्नछत्र[1] करून त्यांतून सर्वांचीं [भोजनें जाल्याची] बातमी आलियावरि आपण भोजन करावें, ऐसें वृत्त चालवीत होते, हें जगविख्यात[2] आहे, त्यांची भेट घेतली. तेथें पंडितजनसमाज [याची] सभा होऊन शिव सर्वोत्तम व विष्णु सर्वोत्तम हा विषय [निघून] बोलणें चाललें होतें. तेव्हां रघुनाथपंत हे वैष्णव स्वतां असतां शिव सर्वोत्तम हाच पक्ष अंगिकार करून, शिव सर्वोत्तम हें स्थापून सर्वांचें समाधान केलें. विष्णुपक्ष निर्बल जाला असतां पुन्हां वैष्णवपक्षीं बोलणें करून विष्णु-सर्वोत्तमपक्ष-स्थापना केली. आणि पुन्हा द्वैतवादियांस[3] दूषण करून अद्वैत[4] प्रतिपादन केलें. तेव्हां मादण्णापंत बहूत संतुष्ट[5] होऊन बहूत थोर विद्वान जाणून, गौरव करून, स्तुती केली. "आपण स्वामी सत्पात्र थोर आहां," असें म्हणून "कोठून आलां, काय अपेक्षित, आज्ञा करावी," विचारिलें. ते समयीं यांणीं उत्तर केलें कीं, "आम्हांस द्रव्याची किंवा भूमिग्राम-जीविकेची अपेक्षा किमपि नाहीं, आपण बहूत सुज्ञ[6], धर्मिष्ठ, शास्त्रज्ञ आहां. आपणापाशीं एकांतस्थलीं कांहीं एक चर्चा चार घटका करावी इतकी मात्र इच्छा आहे." ऐसें बोलल्यावरि पंत यांसि एकांतीं घेऊन गेले. तेव्हां यांणीं "आम्ही पंडित याचक[7] नव्हे, शिवाजी महाराज यांचे सेवक, रघुनाथपंत नामाभिधान [होय.] राजे साहेबांकडे कर्नाटकचीं राजकारणें गेलीं आहेत व या प्रांतींचीं आपलीं स्थळें पाहावीं, यास्तव चंजाऊरप्रांतीं जावयाचें[8] योजून आपणांशीं व पादशाहींत स्नेह करावा; आपणांपासून समयपरत्वें उपयोग पडावे; तिकडून इकडील उपयोग तेच पडावे, ऐसें चित्तीं धरून आपली भेट घ्यावी [अशी] आज्ञा;[9] यास्तव आलों. आपण धर्मशीळ व राजे धर्मस्थापना करावी हा अभिमान धरितात, करितात. त्यास आपण साह्य असावें. आपले प्रभू यांचाही उपमर्द न करितां आपले

१. अन्नछत्र (न०) [सं० अन्न + सत्र (विस्तार]–मुक्तद्वार. २. 'नगर विख्यात' की०. ३. द्वैतवादी–जीव व शिव (परमात्मा) भिन्न मानणारे. माध्वमतानुयायी. ४. अद्वैत(वादी)–जीव व शिव एकच (मानणारे. शांकरमतानुयायी). ५. 'संतोषी' सा० २. ६. 'सुज्ञे' सा० २. ७. 'याचेक' सा० २. ८. जावयाचें योजून इ०–'शिवाजीराजे यांनीं' (अध्याहृत). 'जावयाचें आहे, योजून' की०. 'जाण्याच योजून' सा० २. ९. आज्ञा 'शिवाजीराजे यांची' (अध्याहृत).

प्रभूसहवर्तमान सख्य घडावें." हें ऐकून मादण्णापंत पंतांवरि[1] बहूत समाधान [पावले कीं] बोलणें व युक्ती थोर असून असे प्रकारें येऊन भेटले. महाराजांची कीर्ती पूर्वीं परिचितच व यांचीही ऐकिली होतीच. तेव्हां बहूत आदर करून बोलणीं होतीं तितके[2] पक्ष ऐकून त्याविषयीं सिद्धांत शपथपूर्वक[3] स्नेह अक्षयी चालावा, दोहींकडील मनोदय सिद्धीस जावे ऐसें करून, पंतांस ठेवून घेऊन सर्व लवाजिमा आणविला. पादशाहाची भेटी करवून, जातां या मार्गें जावें, भेटी घडाव्या, असें करून मेजवानी वस्त्रें देऊन, पादशाहासह[4] पत्रें राजे यांस दिल्हीं. याप्रकारें राजकारण सिद्ध करून [पंत] निघाले आणि महाराजांचे दर्शनास आले.

८. महाराज तंजावरास निघाले.

महाराज हें कळलियावरि[5] सामोरे[6] जाऊन, सन्मान करून घेऊन आले. [रघुनाथपंतीं] महाराजांस त्या प्रांतींचे पदार्थ आणिले ते नजर केले. तो प्रांत बहूत सुबर्णाचा,[7] होनांचा, त्यांत सुवर्णाचा बिचोबा, चांदण्यांस[8] खांब सोनियाचे मढींव, व दिवट्या सोनियारुपियाच्या शतावधी, तसेंच अंबाऱ्या हौदे व घोडियांचीं[9] सामानें नजर आणिलीं. खजिनाही आणिला. तें सर्व नजर केलें. महाराज बहूत प्रसन्न जाहाले. कर्नाटक प्रांतींचीं चंदीचीं वगैरे स्थळांचीं राजकारणें घेऊन आले, तींही यथावकाशें श्रवणारूढ केलीं. महाराजांस राज्य साधनाविषयीं प्रेमा, हव्यास.[10] त्यांत राजकारणें पक्कीं करून घेऊन पंत भेटीस आले, व्यंकोजीराजे यांचे अव्यवस्थित चालणें [कळून] पूर्वार्जित दौलत सर्व तेथें,[11] शाहाजी महाराजांपाशीं पदार्थ राहिले ते यावे, राज्य पाहून नवीन संपादावें, तेथील बंदोबस्त पक्केपणें राहावा, हे उत्कंठा महाराजांस जाली. आणि पंतावरि बहूत संतुष्ट जाले. "मुजमूचा धंदा आपला परंपरागत आपणांकडे चालावा" [असें] पंताचें बोलणें पडलें. त्याजवरून त्यांस वस्त्रें[12] देऊन [तो धंदा] सांगितला. आणि चंजाऊरप्रांतीं जाण्याचा सिद्धांत करून तयारी

१. पंतांवरि–पंतांसंबंधी. 'पंतावरि बहूत संतुष्ट झाले' की०. २. 'तदपेक्षापूर्वक' की०. ३. 'शफथपूर्वक' सा० २. ४. पादशाहासह पत्रें–पादशाहाची व आपली पत्रें. किंवा पादशाहास मान्य असलेली पत्रे. ५. 'किलियावरती' सा० २. ६. ही भेट पन्हाळ्यास झाली (श. शि. पृ. १७९). ७. 'सुवर्णाच्या होनांचा' की०. ८. चांदणी–(स्त्री०)–छत; चांदवा. ९. 'चौघड्यांचीं सामानें' की०. १०. 'ध्यास' सा० २. ११. 'तेथें राहिली' की०. १२. 'वस्त्रें देऊन सांगितला' की०.

करविली. बरोबर पागा चाळीस हजार घेतली. तसेंच हशम लोकही घेतले. चतुरंग सेना, म्हणजे गज, रथ, अश्व, पदाती यांस म्हणावें. तसें सैन्य बहूत तरतुदीनें घेऊन शत्रुपराभव करणें, दैवावरि भार घालून करणें युक्त नव्हे. दूर जाणें तेव्हां द्रव्य बहूत व सेना व राजकारण हीं तिन्हीं दृढ असावीं. राजकारणें पंत पक्कीं करून आलेच होते. सेना व द्रव्यही अनुकूल आहेतच, म्हणून तींही बहूत घेतलीं. मनसबा कसा करावा, कसें जावें, हें पंतांसह विचार करितां पूर्वीं थोर थोर राजे शास्त्राधारें नीतीकरून चालत आले. तें शास्त्रमत पंतांनीं उद्घाटन[1] केलें जे, शत्रुपराभवास मुख्य कारणें दोन आहेत. एक दैव व एक पुरुष प्रयत्न. त्यांत दैव हा पूर्वपक्ष; दैव पंगू होय. प्रयत्न हा सिद्धांत होय. कसें? तरि जे उत्तम मुहूर्तें निघाल्या कार्यसिद्धी होती, तरि सेना–आदीकरून कशास पाहिजे? सुमुहूर्तें एकटेंच जाऊन जय पावावें. म्हणजे दैवप्रधान[2] [हा वाद] प्रमाण. अथवा अन्य सामान्य जन यांणींही उत्तम मुहूर्तेंकरूनच राजाचा पराभव करावा ऐसें व्हावें, तें घडणार[3] नाहीं; अथवा विजयप्रद मंत्र–अनुष्ठानेंच करून जय होत असावा तें घडत नाहीं. वास्तव सैन्य, द्रव्य, अमात्य मंत्रज्ञ, हें मुख्य साधन. तेव्हां प्रयत्न हाच सबल पक्ष होय. आणि दैव[4] व प्रयत्न यांचें ऐक्यच आहे. एकास एक दोन्हींही अनुकूल पाहिजेत. एक नसल्यास एकेंच करून सिद्धी होत नाहीं. रथास[5] एकच चाक असल्यास रथ चालत नाहीं. यास्तव याअर्थीं पाहातां यत्नावांचून दैवेंच करून कार्यसिद्धी होणार नाहीं. तेव्हा मुख्यत्व प्रयत्नाकडे. दैव त्यास साह्यभूत, पंगू आहे. प्रयत्नेंकरून सिद्धीस जातें. म्हणून दोन्हींची अपेक्षा करून चालावें. दैव प्रयत्न पाहातां दोन्ही एकच होत."

ऐसे पंत बोलले असतां महाराज सर्वजाण [त्यांस] फारच मानवलें. आणि सुमुहूर्त पाहून, अनुष्ठानप्रयोगादी[6] ब्राह्मणांस सांगोन, सर्व सैन्य उत्तम उत्तम शूर सरदार, कारभारी, सामान पोख्त, ऐसे घेऊन निघते[7] जाले. राज्याचा मागील

---

१. 'तें शास्त्रमत पंतांनीं उद्घाट केला' सा० २ व पु०. 'तीं शास्त्रमतें पंतांनीं निवेदन केलीं' की०. २. 'दैव प्राधान्य–प्रमाण' सा० २. ३. 'तें तर घडत नाहीं.' की०. ४. 'द्रव्य व प्रयत्न' की०. ५. 'एकच रथास चाक असल्यास' सा० २ व पु०. ६. अनुष्ठानप्रयोगादी–विधिपूर्वक धर्मकृत्यवगैरे. ७. जानेवारी इ. स. १६७७ च्या आरंभी शिवाजी राजगडाहून कर्नाटकाकडे जाण्यास निघाला (सरकार–शिवाजी पृ. २७४).

बंदोबस्त केला. उभयतां पुत्र यांस ठेविलें व मोरोपंत पेशवे, अंणाजीपंत सुरनीस हे ठेविले. दिल्लीस जातां मागें यांणीं राज्यकारभार चालविला हें जाणून राज्य स्वाधीन करून, जवळ शत्रू होते त्यांशीं जसे रितीनें सख्य अथवा आपण गेले[1] असतां मागें त्यांचा उपसर्ग न पडे, राज्यरक्षण होय, असें सर्व पाहून, राज्यकारण राखून, फौजही पाहिजे तशी ठेविली. बहादूरखान याशीं कांहीं शत्रुत्व होतें त्यासि ममतेंत घेतला. विजापूरचा[2] तह होताच.

९. भागानगरास आगमन.

[यानंतर] आपण निघोन विजापुरी देशांतून[3] भागानगर प्रांतीं गेले. भागानगरास रघुनाथपंत यांसि पुढें पाठविलें. समागमें निराजी रावजी यांसि दिल्हें. उभयतां जाऊन पावले. भागानगर प्रांतांतून जातां प्रांतास तिलप्राय उपसर्ग लागूं न दिल्हा. बहूतच कैद[4] करून, दाणा, वैरण, लाकूड आदिकरून सर्वांनीं विकत घ्यावें; काडीमात्रास कोणीं ढका लावूं नये; बेकैदी [कोणीं] केली असतां त्याचीं हातबोटें[5] तोडावीं, ऐसा बंदोबस्त करविला. महाराजांची कैद, आज्ञा उल्लंघन कोण्हीं एक न करावी ऐसी [पूर्वीची] होतीच. भागानगरा-समीप गेलियावरि मादण्णापंत सामोरे येऊन, आदरेंकरून भेटी जाल्या. पादशाहाही दादमहालावरि[6] आले. महाराज गेले. पादशाहाची व महाराजांची भेटी दादमहालावरि जाली. उभयतां गालिचा[7] टाकून एकासनीं बैसले. बरोबर महाराजांकडील हंबीरराव सरनौबत व रघुनाथपंत व निराजीपंत व दत्ताजीपंत वाकनीस व बाळाजी आवजी चिटणीस असे होते, त्यांसही बसण्यास परवानगी होऊन बसले. मादण्णापंत यांनीं पादशाहाकडून फारच निर्मळपणें निखालसता[8] करविली. महाराजांनींही सफाईनेंच भेट घेऊन परस्परें आदरेंकरून बोलणीं जालीं. बराबर लोक, सरदार होते त्यांचे सन्मान करून त्यांस दर्शन दिल्हें.

---

१. 'गेलों असतां' असे हवे. २. वस्तुतः हा तह विजापूरचा वजीर सिद्दी मसौद याने शिवाजीशी पुढे म्हणजे ऑगस्ट इ. स. १६७९ मध्ये केला (सरकार–शिवाजी पृ. ३१०). ३. 'देशाहून' सा० २ व पु०. ४. कैद (स्त्री० अ०)–शिस्त; नियंत्रण. ५. 'त्याचीं बोटें हात तोडावे' की०. ६. दादमहाल (पु०) [फा० दाद्+अ० महल्ल]–न्यायमंदिर. ७. गालिचा (पु०) [तु० गालीचा]–लोकरीचे आसन. 'गालीच्या टाकून एकासनीं बसले.' पु० व की० 'गालिच्यावरि टेकून एकासनीं बसले' सा० २. ८. 'स्वच्छता' पु०.

लोकांचें[1] कु वा न[2] [?] व सेना[1] पाहून आपले ठायीं पादशाहा बहूतच दंग जाले. तारीफ केली. "लोक असे व त्यांस देणींही तशींच. तेव्हां मोठेमोठे धाडसाचीं कामें आंगेजणीनें होणें अशक्य काय?" म्हणोन लोकांची तारीफ केली. "हत्ती नामी किती आहेत?" असें पादशाहांनीं विचारलियावरि मावळे लोक कंक, मालुसरे मोठेमोठे सरदार पन्नास[3] शंभर ब-पोशाख[4] व सामानसुद्धां होते ते आणवून मुजरे करवून भेटविले, आणि "हेच हत्ती बाळगिले आहेत" म्हणोन उत्तर केलें! तेव्हां पादशाहांनीं बहूत आश्चर्य मानिलें. तारीफ करून महाराजांची स्तुती फारच केली. परस्परें स्नेहाचे रितीनें बोलणीं होऊन शाहांनीं शिवाजी महाराजांचा आदर[5] सन्मान बहूत करून विडे पान, वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे दिल्हे. महाराजांचे आंगास आपले हातें अत्तर[6] लाविलें. निखालसपणा फारच जाला. बराबर मातबर कारभारी यांसही वस्त्रें दिल्हीं. नंतर महाराज निरोप घेऊन डेरियास आले. एक महिना भागानगरीं मुकाम होता. मादण्णापंत यांचे मार्फतीनें राजकारण, त्यांचें नित्य महाराजांकडे येणें जाणें असें करीत[7] होते. महाराजांस व सर्व मुत्सद्दी सरदार यांस मादण्णापंत यांणीं मेजवानी करून भोजनास नेलें. सर्वांस वस्त्रें दिल्हीं, व महाराजांसही वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे, नजर केले. महाराजांनीं मादण्णापंतांस मेजवानी भोजनाची केली. वस्त्रें, जवाहीर हत्ती, घोडे [दिल्हे] व त्यांजकडील मंडळीस वस्त्रें दिल्हीं. आणशफत होऊन निखालसता जाली. पादशाहासही महाराजांनीं डेरियास आणोन बहूत तरतुदीनें मेजवानी वस्त्रें, जवाहीर देऊन केली. सर्व अमीर यास यथायोग्य वस्त्रें जवाहीर दिल्हे. शफत-प्रमाण जाहालें पादशाहांनीं "हे पादशाहात तुमचीं होय, दुसरा विचार नाहीं," ऐसा भाईचारा[8] करार उभयपक्षींचा जाला. वरकड भागानगरीं अमीर, मनसबदार होते [त्यांस] ज्याची जशी योग्यता, जसा आदर करावा, तसे रितीनें त्यांचे घरीं

१. याऐवजी 'उत्तम सेना' की० २. कुर्बान? (अर्पित या अर्थी). ३. 'पांचपन्नास हजार लोक' की०. हे 'हाजर केले' याबद्दल बाळबोध प्रत करताना झाले असावे (स. च. पृ. २८१). ४. ब-पोशाख (वि०) [फा० ब (सह) + फा० पोशाक्]- पेहराव केलेले. 'बं हा' सा० २. ५. 'आपण' की०. ६. अत्तर (न०) [अ० इत्र]- पुष्पगंधार्क. ७. करीत-करवीत या प्रयोजक रूपाबद्दल स्वार्थी क्रियापदाची योजना. 'महाराजांकडे येणें जाणें असें होते' की० व सा २. ८. भाईचारा (पु०) [सं० भ्रातृ + चर्]-भाऊपणा; स्नेह.

जाणें व त्यांस आणणें ऐसें केलें. आणि सर्व आपले लक्षांत घेतले. सुदिन पाहून पादशाहाचा निरोप घेतला. निरोपास हत्ती पांच, घोडे पांच, वस्त्रें, जवाहीर, पोशाख पांच, ऐसा बहुमान महाराजांस शाहांनीं दिल्हा. परस्परें हरएक विशीं साह्य करावें ये विशीं शफत-प्रमाण जालें [व] निरोप[1] घेतला.

१०. केशवबोवांच्या सहवासात.

भागानगरीं केशवबोवा महापुरुष तेथें होते त्यांचे भेटीचा लाभ जाला. सत्पुरुषांचे ठायीं महाराजांचा बहूत आदर, त्यांचें कीर्तन तें उपदेशच होय, जाणून श्रवण करते जाले. त्यांचा सत्कार द्रव्य, वस्त्रें, भूषणें देऊन केला. भागानगरीं वकिलीस प्रल्हादपंत ठेविले.

११. कर्नाटकात जाण्यास निघाले.

कर्नाटकप्रांतीं जाण्यास निघाले ते तुंगभद्रातीरास करनोळ कडपें येथें गेले. तेथें खंडणी पांच लक्ष[2] होन घेऊन, तेथून निवृत्तिसंगमावरून[3] श्रीशैलास[4] गेले. अंतरपुरीवर[5] सर्व फौज ठेवून सडे गंगास्नानास गेले. तेथें गेलियावरि [तें] बहूत रम्य स्थान पाहून येथेंच वास करावा ऐशी,[6] योगभ्रष्ट[7] महाराज, त्या योगेंकरून, बुद्धी उत्पन्न होती जाली. कारभारी होते त्यांसि बोलों लागले जे, "आमचे मनोरथ सर्व संपूर्ण श्रींनीं केले. उभयतां पुत्र आहेत. तुम्ही सर्व कारभारी प्रतिसृष्टिकर्ते असेच आहां. तसेच द्रव्यादिसंग्रह व सेना,[8] प्रांत, किल्ले, कोट हें संपादिलें आहे. याउपरि आमचे बुद्धीस परावृत्ती जाली कीं असे स्थानींच राहून वास[9] करावा." ऐसें बोलों लागले याजवरून सर्वांसही संकट निर्माण जालें. बहुतांनीं सांगणें, विनंती करणें, तशी केली असतां वृत्ती फिरेना. राजे सर्वज्ञ, त्यांस सर्व अवगत. तेव्हां रघुनाथपंतीं श्रीची प्रार्थना केली.

---

१. शिवाजी मार्च इ. स. १६७७च्या आरंभी भागानगरहून निघाला (सरकार-शिवाजी पृ. २८०). २. 'हजार' सा० २ 'पांच लक्ष होन' (९१ कलमी बखर-क० ८० राजवाडे प्रत). ३. निवृत्तिसंगम–भवनाशी व कृष्णा यांचा संगम. कर्नूलच्या ईशान्येस २४ मैल. ४. श्रीशैल–निवृत्तिसंगमाहून पूर्वेस ३७ मैल. ५. अनंतपूर हवे. ६. 'ऐसे' पु०. ७. योगभ्रष्ट (पु०)–योगसाधनात विघ्न आल्यामुळे पुनर्जन्म पावलेला. ८. 'लोक' सा० २. ९. 'हें देह श्रीस अर्पण करावें, शिरकमल वाहावें, ऐसें योजिलें' (सभासद).

त्यासमयीं श्रीदेवीचा महाराजांचे आंगीं आविर्भाव जाला. आणि बोलली जें "तुला या कर्मेंकरून मोक्षप्राप्ती घडावयाची नाहीं. तुजपासून अमानुषी कर्मे दुर्घट करविलीं व[1] आणखीही करावयाचीं महत्कृत्यें पुढें घडावयाचीं आहेत.[1] धर्मस्थापना[2] व प्रजापालन करावयास अधिकारी तुजला केलें आहे. मनीं कर्म धरलें तें न धरावें." असें [जें] जालें तें लेहून ठेविलें. तें श्रवण केलें.[3] आणि श्रीची आज्ञा अशी जाली म्हणोन रघुनाथपंतीं व सर्वांनीं बहूत प्रकारें प्रार्थना केली. ते समयीं 'श्रीची इच्छा, आज्ञा, ते करणें प्राप्त' म्हणोन ते स्थळीं लक्षब्राह्मणभोजन करण्याचा संकल्प करून, घालविलें. धर्मही बहूत केला. घाट[4] बांधविला. तपस्वियांस स्नानसंध्येस गुहा[5] बांधविली. दाहा बारा दिवस तेथें होते.

१२. चंदीप्रांतात प्रवेश.

याप्रमाणें करून तेथून दरमजल चंदीप्रांतीं गेले. येलूरचे[6] ठाण्यास वेढा घातला. जवळ डोंगर चांगले होते ते पाहून किल्ले वसविले. त्यांची नांवें साजरा गोजरा ऐशीं ठेविलीं. येलुरास मोर्चे लावून जेर केलें. तों शीरखान चालून आला. नरहरी बल्लाळ सबनीस यास दाहा हजार मावळे लोक देऊन व फौज देऊन मोर्चे किल्लयास लाविले तसेच कायम ठेवून आपण त्रिमली[7] महालास शीरखानावरि चालून गेले. त्याजपाशीं पांच हजार पठाण तोलदार[8] होते व हत्ती, द्रव्य, बहूत होतें. त्याशीं झगडा जाला. महाराजांनीं आंगेंकरून घोडे चालवून धारकरी यांजबराबर तरवार केली, आणि शीरखान मोडून उधळिला. गर्दीस मेळविला. त्याचे हातीं मुलूख होता तेवढा काबीज केला. पांच हजार घोडे, बारा हत्ती व द्रव्य मबलग[9] प्राप्त जालें. यश घेऊन माघारे आले, तों येलूर नरहरपंतांनीं फत्ते केलें [होतें].

---

१. 'व आणखी करावयाचें महत्कृत्य पुढें घडावयाचें आहे.' पु०. २. 'स्वधर्मस्थापना' सा० २. ३. 'करविलें' की०. ४. गणेशघाट (सरकार-शिवाजी पृ. २८१). ५. 'मठ स्नानसंध्येस व धर्मशाळा' (शि. दि. पृ. ३०३). ६. 'शके १६०० कालयुक्त संवछरे श्रावण सुध १४ करनाटकातील वेळार कोट रघनाथ पंती व अनंदराव याणी वढा घालून घेतला' (जे. श.). ७. तिरुवादी येथे दि. २६ जून १६७७ रोजी (श. शि. पृ. १८६). ८. तोलदार (वि.) [सं. तोल+ फा० दार]–बलाढ्य. ९. 'जाबलगा' पु०.

१३. चंदी घेतली.

नंतर महाराज निघोन चंदीस गेले. वेढा घातला. मोर्चेबंदी केली. पूर्वी रघुनाथपंतीं राजकारण पक्कें केलेलें होतें. आयास न करिता किल्ला बोलों[1] लागला. विजापुराकडील त्या किल्ल्यांत खानखान[2] याचे लेक रूपखान[3] व नासर महमदखान होते, ते कौल देऊन बाहेर काढिले. त्यांचे मतलब निघते समयीं करार केले त्याप्रमाणें द्रव्य व कांहीं देश त्यांस देऊन समाधान करून स्थापिलें. चंदी-प्रांतीं, किल्ले, कोट ठाणीं होतीं तीं महाराजांनीं घेऊन विठ्ठल पिलदेव गारुडकर[4] यांस सुभा चंदीचा सांगितला. रामाजी[5] नळगे यास किलियाचा हवाला दिला. तिमाजी केशव यास सबनिशी सांगितली. रुद्राजी साळवी यास इमारतीचें काम सांगितलें.

१४. व्यंकोजीस निरोप—'आमचा अर्धा वांटा.'

याप्रमाणें चंदी प्रांत घेऊन, बंदोबस्त करून महाराजानीं अरंदिरी[6] नजीक त्रिवादी कावेरीतीरीं येऊन मुकाम केला. संताजी राजे, शाहाजीराजे यांचे नाटकशाळेचे पुत्र, बहूत शूर, शाहाणे होते, ते चंजाऊरहून[7] व्यंकोजीराजे याजपासोन निघोन भेटीस आले. महाराजांनीं आपले बंधूच म्हणून बहूत आदरेंकरून भेटी घेतली. सन्मान करावयाच्या रितीनें केला. जवळ ठेविले. त्यांचें अंतर्याम बहूत शुद्ध समजलियावरून चंदीचे ठाण्यांत मुख्यत्व सांगून पाठविले. आणि तेथून व्यंकोजीराजे यांस पत्र पाठविलें जे, "आपलेकडील गोविंदभट गोसांवी व काकाजीपंत व निळोबा नाईक व रंगोबा नाईक व तिमाजी यख्तियारराव असे भले लोक पाठवून द्यावे." त्याजवरून व्यंकोजीराजे यांणीं पाठवून दिले. त्यांजपाशीं महाराजांनीं सांगितलें जे, "कैलासवासी महाराज यांणीं कैलासवास केला यास तेरा वर्षें जालीं. महाराजांचें द्रव्य व जडजवाहीर, हत्ती,

---

१. बोलों लागला—तहाचे बोलणे आले. 'किल्ला बाके लागला' की०. २. खान मुहम्मद, खान-इ-खानान खान (सरकार-शिवाजी पृ. २६८). ३. रुहलखान व नासरीखान (सभासद). ४. 'गोराडकर' की० 'गारूडकर' सा० २ 'गरूड' (शि. दि. पृ. ३०६) 'गराडकर' (९१ क. ब. क० ८१ राजवाडे). 'विठ्ठल पिलाजी अत्रे गरोडे प्रांत पुणें' (सदर. भारतवर्ष). ५. 'रायाजी' (सदर. राजवाडे). ६. 'अरंदी' की०. 'अरदरी'. सा० २. ७. 'चंजाउरीं' की०.

घोडे, मुलूख, हें रघुनाथपंतीं तुम्हांस राज्यीं[1] बसवून संपूर्ण[2] तुमचे स्वाधीन जालें.[3] ऐशियास तें पितृधन होय. आमचा अर्धा वांटा [त्याचा] तुम्हींच आजपर्यंत उपभोग केला. तो आम्हीं तुम्हांपाशीं मागावा तरि बहुत दूर होतों. बरें[4] बोलें तुम्ही देणार नाहीं. [यासाठीं] आजपर्यंत आम्हीं सबूरी[5] केली, जे 'तुम्ही महाराजांचे पुत्र आहां. खातात[6] तोंपर्यंतत खावोत. मालाचे धणीच आहेत. आम्हांस जे समयीं पाहिजे [व] फावेल ते समयीं व्यवहार सांगून घेऊं,' ऐसें मनीं धरलें होतें. ऐशियास राजकारण प्रसंगें करून आम्ही कुतुबशाहाचे भेटीस भागानगरीं आलों; तेथून कर्नाटकांत आलों; या प्रांतीं येऊन चंदी घेतली; वरुणतर्फेचा[7] मुलूख हस्तगत केला; शीरखान झगड्यांत गर्दीस मेळविला; शीरखानाचे हातीं प्रांत होता तेवढाही घेतला. कावेरीतीरीं येऊन भले लोक पाठवावे [असें तुम्हांस] लिहिलें. त्याजवरून [तुम्हींही] पाठविले. त्यास याप्रमाणें तुम्ही जाऊन आमचे निरोप सांगावे." म्हणोन सांगोन पत्रेंही या अन्वयें लेहून दिल्हीं. आणि त्यांजबरोबर आपलेकडील बाळंभट गोसावी व कृष्णजोशी[8] व कृष्णाजी सखाजी असे देऊन रवाना केले.

१५. व्यंकोजीची कपटबुद्धी.

त्यांणीं जाऊन महाराजांचें बोलणें व सर्व वृत्तांत सांगितला असतां ते गोष्ट मनांत न आणितां कपटबुद्धी धरून[9] व्यंकोजी राजे आपणच खासा भेटीस निघोन आले. आणि नम्रत्वें बोलोन वांटियाचे बोलणें न करितां, सारेंच आपण खावें ऐसा चित्तीं निश्चय धरिला. महाराजांनीं बहुता रीतीनें बोलविलें, परंतु वांटा द्यावा हें अंतःकरणीं न येई. तेव्हां महाराजांनीं विचार केला जे, "हे धाकटे भाऊ, आधीं बोलणीं निश्चयांत आणून यावें, ते आधींच आपण होऊन[10] भेटीस आले. यांसि धरावें, वांटा घ्यावा, तरि [ही] गोष्ट थोरपणाचे

---

१. 'राज्यीं बसवून संपूर्ण जाली'. सा० २. २. 'पूर्ण' की०. ३. 'केलें' की०. ४. 'बरें बोलून' की०. ५. सबूरी (र) (स्त्री० फा०)–शांतपणा. ६. 'खातील' की०. ७. वेल्लार तर्फ?–वेल्लार नदीच्या आसपास असलेला साठ गावांचा मुलूख (तर्फ). तिरुवादीच्या दक्षिणेस २२ मैलांवर वेल्लार नदीकाठी बोनागीरपट्टम (बोवानीगीरी) या किल्ल्यावर शेरखानास मराठ्यांनी कोंडलें (सरकार–शिवाजी पृ. २८५). ८. कृष्णंभट जोशी सा० २. ९. 'करून' की०. १०. 'बोलून' की०.

इजतीमध्जें[1] लायख[2] नाहीं." या निमित्तें राजे यांस वस्त्रें बहुमान देऊन निरोप दिल्हा. बरोबर पाठवण्यास रुपाजी भोसले व मानसिंग मोरे[3] व अनाजी रंगनाथ मळेकर[4] देऊन [ते] चंजाउरास पोंचऊन आले.[5]

१६. महाराजांनी उपेक्षा केली.

व्यंकोजी राजे गेलियावरि पुन्हां महाराजांनीं शामजी नाईक पुंडे व कोनेरीपंत[6] व शिवाजी शंकर यां हातें बहुता रितीनें सांगून पाठविलें कीं, "तुम्ही व आम्ही वांटे करून परस्परें समाधानें राहावें. गृहकलह वाढविलिया उभयपक्षींही वाईट. कष्ट होत. पूर्वी पांडव कौरव बहूत कष्टी जाले. हें मनांत आणून कलह वाढवूं नये. आम्ही आपला पितृधनाचा अर्धा वांटा मागतों तो द्यावा. हें न करितां धर्म सोडून आमचा अर्धा वांटा आजपर्यंत खादला, पुढें खाऊं इच्छितां, हें विहीत नाहीं, [असें] सांगून पाठविलें असतां उत्तर यथास्थित न करितां त्यांस लावून दिल्हें. महाराजांनीं विवेक केला जे "आपणच आलों. ते भेटीस येऊन गेले कनिष्ट बंधू, त्यांजवरि जातीनें जाऊन पुरुषार्थ करणें विशेष नव्हे." असें समजून उपेक्षा केली.

१७. भवानीचे भविष्य.

यानंतर आरंदर[7] नजीक त्रिवादी[8] कावेरी-तीर याचे मुकामीं रघुनाथपंत यांस, पुढें या राज्याचें भविष्य कसें आहे, हें महाराजांस प्रार्थना करून देवी आणोन विचारावें ऐशी इच्छा होऊन विचारिलें. शालिवाहान शके १५९९ प्रमादी नाम संवत्सरे, चैत्र बहुल त्रयोदशी भौमवारे ते दिवशीं महाराजांचे आंगीं श्री भवानी अविर्भाव होऊन भविष्य सांगितलें. तें वाक्य बाळाजी आवजी चिटणीस व वाकेनीस[9] यांनीं लेहून ठेविलें:—

१. इज्जत (स्त्री०) [अ० इझ्झत]-प्रतिष्ठा. २. लायख (क) [अ० लाइक्]-योग्य. ३. 'मोरवे' की०. ४. 'मलकर' सा० २. 'मरकळे' असे हवे. ५. 'शके १५९९ पिगल संवछरें श्रावण मासी राजश्री सिवजी राजे याची व राजश्री येकोजी राजे याची भेट जाली....येकोजी राजे न पुसता पळोन तजावरास गेले' (जे. श.). ६. 'कान्होरीपंत' सा० २. ७. 'आरंदी नजीक' की०. ८. तिरुमलवाडी-तंजावर-हून उत्तरेस १० मैल (सरकार-शिवाजी पृ. २८६). 'त्रिवापी' की०. ९. यानंतर 'जमेनीस' पु०.

१. देशीचें राज्य तांब्र[1] घेईल. रायगड जाईल. संभाजी राजा सांपडेल. हैराण[2] होतील. कलम १

१. चंदीस राजाराम राज्य करील. चंदीचे राज्याकडून मागती[3] देशींचें राज्य प्राप्त होईल. कलम १

१. पुढें मागती राजा शिव नामें होईल. दिल्लीपावेतों राज्य घेईल. एक—राज्य करील. कलम १

१. पुढें भोसले यांचें राज्य सत्तावीस पिढ्या होतील. एक हजार वर्षेपर्यंत[4] शक चालेल. कलम १

१. पूर्वजन्मीं शिवाजीनीं सत्तावीस कावडी[5] स्व आंगें भागीरथीच्या आणून रामेश्वरीं घातल्या व सत्तावीस जन्म[6] श्री भवानीस शिरकमलें वाहिलीं. कलम १

१. या पुण्यें करून सत्तावीस पुरूष भोसले यांचें राज्य चालेल. सत्ताविसावा पुरूष राजा गर्भांध होईल. तो राज्य सर्वस्वी बुडवील. कलम १

एकूण कलमें साहा.—याप्रमाणें श्रींनी आंगीं येऊन रघुनाथ हणमंते यांणीं श्रीस प्रार्थना केली त्याजवरून सांगितलीं तीं लिहिलीं आणि गुप्तरूपें महाराजांस दाखवून ठेविलीं.

१८. येलूरचा कोट घेतला.

महाराजांनीं चंदी आदीकरून मोठीं मोठीं स्थळें[7] व किल्ले, प्रांत साध्य केले. येलूरचा कोट बहूतच मजबूद, ज्याचे खंदकांत पाणी, त्यांत सुसरी, असा बळकट होता. तोही घेतला. महाराजगड व जगदेवगड व कर्नाटकगड हेही घेतले, दोन[8] चार कोटींचें राज्य साधिलें.

१९. बादशहा दिल्लीहून निघाल्याचे वर्तमान.

ते समयीं दिल्लीस वकील व बातमीदार होते त्यांचीं पत्रें आलीं जे,

---

१. तांब्र (पु०) [सं० ताम्र]–मुसुल्मान. २. हैराण (वि०) [अ० हैरान्]–त्रस्त. ३. मागती (क्रि० वि०)–पुन्हा; लागलीच. ४. 'वर्ष' सा० २ व की०. ५. कावड (स्त्री०) [का० ते० कावडि]–बांबूच्या दोन्ही टोकांना शिंके लावून त्यांत घातलेल्या पाण्याच्या घागरी. ६. 'जन्में' की० ७. 'संस्थानें' पु० व की०. ८. 'वीस लक्ष होनांचें राज्य साध्य केलें' (सभासद).

"'पादशाहास दक्षिण-प्रांतीं जाण्याची इच्छा अंतर्यामीं निर्माण होऊन, फौज सामान तयारी करून आपले प्रांतांत किल्ले कोट यांचे बंदोबस्तास[1] म्हणोन निघणार—निघाले." हें वर्तमान समजलें. तेव्हां देशीं जावें, आपला बंदोबस्त राखावा म्हणोन निघावयाचा विचार करून, चंदी वगैरे राज्य सोडविलें, तेथें संताजी राजे व रघुनाथ नारायण हे मुख्यत्वेंकरून ठेविले; व हंबीरराव सरनौबत व फौज कांही तेथें ठेवून पक्का बंदोबस्त होऊन वहिवाट होई तोंपर्यंत सारी फौज नेणें ठीक नाहीं, म्हणून दाहा हजार फौजेनिशीं सरनौबत ठेविले; आणि महाराज [निघून] घाट चढून कोल्हार बाळापूर तालुक्यांत आले[2]. तेथें ठाणीं घेतलीं. प्रांत काबीज केला, व किल्ले कोट घेतले. नवे किल्ले डोंगर पाहून वसविले. त्या प्रांतींचे पाळेगार कित्येक गर्दीस मेळविले व ज्यांणीं खंडणी सालाबाद करार केली त्यांस स्थापिलें. प्रांत घेऊन त्या प्रांतीं[3] कांहीं फौजेसुद्धां मानसिंग मोरे[4] व रंगो नारायण ठेविले. अरणीचा[5] कोट वेदोभास्कर याजकडे शहाजी महाराज यांणीं दिला होता, त्याप्रमाणें महाराजांनीं, त्यांचे पुत्र आठजण[6] होते ते येऊन भेटले. [ते] बहूत मर्द, शूर, कर्ते पाहून त्यांस तो तालुका प्रांत सुद्धां तीन लक्ष होनांचा इनाम करून देऊन सेवा सांगून चालविला. त्यांणीं त्या प्रांतीं फौज ठेवून प्रांत रक्षावा, सेवा[7] करावीसें केलें. श्रीरंगपट्टण वगैरे खंडण्या घेऊन, गदग लक्ष्मेश्वर[8] येथें आले. दोनही कोट घेतले. खानगौडा देसाई पळोन गेला. गदग प्रांतीं आले. बेलवाडें[9] कर्यातीचे मार्गें येतां मलवाई[10] देसाईण इणें महाराजांचे फौजेचे कहीकबाडास उपसर्ग दिला. हें वर्तमान कळतांच बेलवाडेंयास मोर्चे दिल्हे. सत्तावीस दिवस कोट भांडला. नंतर घेतला. ठाणें घेतलें. मलवाई देसाईण धरली. स्त्रीस शिक्षा काय करावी ? म्हणोन एक दोन गांव खाऊन असावें, अशी हलखूद[11] करून राखिली.

---

१. बंदोबस्त (पु०) [फा० बन्दुबस्त्]—व्यवस्था; नियमन. २. नोव्हेंबर इ. स. १६७७ (सरकार-शिवाजी पृ. २९०). ३. 'त्या प्रांतींचीं' पु०. ४. मोरवे' की०. ५. उत्तर अर्काट जिल्ह्यातील अरणी व इतर कोट ऑक्टोबर इ. स. १६७७ मध्ये शिवाजीने घेतले (सरकार-शिवाजी पृ. २९०). ६. 'साहाजण' पु०. ७. 'सेवा करावीशी केलें' सा० २ व पु०. 'सेवा करावी असें केलें' की०. ८. लक्ष्मेश्वर—गदगहून दक्षिणेस २४ मैल. ९. 'बेलवाडी' पु०. बलवाडा (सभासद). बेलवडी-बेळगावच्या आग्नेयीस ३० मैल. १०. 'मल्हाई' सा० २. 'सावित्री पाटलीण' (९१ क. ब. क० ८२ सानें). ११. 'हलकूद' पु० व की०.

२०. व्यंकोजीराजे चालून आले.

कोल्हार प्रांतीचा बंदोबस्त करून, महाराज पुढें येतां विजापूरकराकडील[१] हुसेनखान माईणा व लोदीखान दाहा हजार स्वारानिशीं आपला प्रांत चंदी वगैरे घेतला म्हणोन चालोन आले. त्यांस तंबी पोहचून मोडून गर्दीस मेळविलें. घोडे, हत्ती पाडाव करून तेथून कोपाल[२] [येथें] तुंगभद्रातीरीं आले. कित्येक पुंड पाळेगार यांजपासून खंडणी घेऊन, पादाक्रांत करून आपलेसे केले. वर्षास खंडणी देणें याचे धारे बांधिले. बावलीखान[३] पठाण आपले प्रांतावर चालून जातो, हें वर्तमान महाराजांस कळतांच निळोजी काटकर यास फौज सुद्धां त्याजवर पाठविलें. त्याणीं दुरगाबाज[४] येथें गांठिलें. युद्ध जालें. बावलीखान यास बुडविलें.

त्यासमयीं व्यंकोजी राजे कावेरी-तीरींहून निरोप घेऊन गेले होते. महाराजांस मनसब्याचे रितीनें देशीं येणें प्राप्त व आपणच त्यांजवर मसलत करणें ठीक नाहीं जाणोन निघोन आले. पत्रें व शामजी नाईक पाठविले असतांही त्यांचें अंतःकरण शुद्ध जालें नाहीं. महाराज तोरगळ प्रांतीं येऊन पोहोंचले असतां तिकडे संताजी भोसले व रघुनाथपंत व हंबीरराव सरनौबत त्या प्रांतीं ठेविले होते, त्यांजवर व्यंकोजीराजे यांणीं कांहीं मोंगली फौज, मोंगलाकडील सरदार यांशीं राजकारणें करून, दुर्बुद्धी धरून तुरूख[५] लोक जमा केले, मेळविले. आणि त्यांचे बुद्धीस लागून व जवळ मुत्सद्दी हलकीं नाकाबिल माणसें यांचे सल्ल्यानें खांसा आपणच चालून[६] आले. युद्ध करावें ही बुद्धी धरून आपली सारी जमियत[७] एकवट करून येऊन, वालगौडापूर येथें येऊन पोंहचले. तेव्हां महाराजांकडील फौज चालून रघुनाथपंत व सरनौबत सर्व मिळोन पुढें गेले. कित्येक प्रकारें सांगून पाठविलें परंतु विचार न करिता महाराजांनीं प्रांत सोडविला, हा सारा आपणाकडे असावा हेंच चित्तीं भरून चालून घेतलें. पंत यांणीं मर्यादा रक्षून लढाई द्यावी म्हणतां,

---

१. विजापूरकडून' पु०. २. कोप्पळ–तुंगभद्रेच्या उत्तरेस; विजापूरहून दक्षिणेस १०५ मैल. ३. 'हावेलीखान' सा० २. ४. 'दुरंगाबाद' सा० २. ५. तुरूख(तुर्क) पु० [सं. तुरुष्क]–मूळ अर्थ तुर्कस्तानचा रहिवासी. येथे मुसुल्मान (सामान्यीकरण). 'शके १५९९ पिंगळ संवछरे कार्तीक मासी येकोजी राजे फौउजेनिसी हंबिराव सरनोबत थासी करनाटकात अहिरी पासी झगडा जाला' (जे. श.). दि. १६–११–१६७७ (श. शि. प्र. १९०). ७. 'जमायत' की०.

तुरूख लोक यांणीं निकड केली. तेव्हां महाराजांचा[१] बचाव राखोन, घोडे चालवून फौज मोडून गर्दीस मेळविली. व्यंकोजी राजे याजकडील प्रतापजी राजे व भिवजी राजे व शिवाजीपंत डबीर ऐसे तिघे पाडाव केले. कित्येक मारिले. पराभव पावोन व्यंकोजी राजे शें-दोनशेंनिशीं यांणीं[२] कसे धरावे म्हणोन मर्यादा केली, [म्हणून] पळोन गेले.

२१. शिवाजीचा निषेध.

हें वर्तमान सरदार व पंत यांणी मुकाम मजकुरीं महाराजांस सविस्तर लिहून पाठविलें. तेव्हां राजे यांसि पत्र[३] लिहिलें[३] जे, "याउपरि वांट्याचा वगैरे निर्गम[४] करावा. नाहीं तरि चंजाऊर सुद्धां अंमल बसविणें प्राप्त आहे." महाराजांस बातमी येऊन पावलियावर व्यंकोजी राजे यांस पत्र[५] निषेधयुक्त पाठविलें जे "तुम्ही महाराजांचे पुत्र, बहूत थोर लोक, असें असोन कांहींच विचार करीत नाहीं. धर्माधर्म विचारीत नाहीं. असें करिता कष्टी व्हाल. तुम्ही म्हणाल कीं, 'काय विचार करावा?' तरि ऐसा विचार करावा होता कीं 'अधर्मेकरून आपण आजपर्यंत खादलें, आतां अर्धा वांटा मागतात तो द्यावा. त्यांचा भाग त्यांस देऊन आपण सुखरूप राहावें;' ऐसा विचार करावा होता. दुसरा विचार करावा होता जे, 'श्री महादेव श्रीतुळजाभवानी यांची त्यांजवरि पूर्ण कृपा जाली आहे. दुष्ट तुरूख[६] लोक ते मोडितात[७] आणि आपण आपले सैन्यांत तुरूख लोकही मेळविले असतां जय कसा होईल? तुरूख[८] लोक त्यांपुढें कसे जगूं पाहतील?' हा विचार करावा होता. आणि युद्धाचा प्रसंग पाडावा[९] न होता. दुर्योधनाची बुद्धी करून लोक मारविलेत सेवकांहातीं अपजय पावून लौकिक करून घेतलात! पुढें तरि येजातीचा हट्ट न करणें. कित्येक प्रांत आमचे आम्हीं घेतले. अरणी, बेंगरूळ, कोल्हार, होसकोट, सिरकटें किरकोळ

---

१. महाराजांचा-व्यंकोजीराजे यांचा. २. यांणीं,-रघुनाथपंत व सरनोबत (मोहिते) यांनी. 'त्यांस' की०. ३. 'पत्रेंही लिहिलीं' की०. हे पत्र रघुनाथपंतांनी व्यंकोजीस लिहिले. ४. निर्गम (पु० सं०)-निकाल. ५. हे पत्र बहुधा तोरगळाहून (बेळगाव जिल्हा) लिहिले असावे म्हणून त्याची अंदाजी तारीख १ मार्च स. १६७८ (श. शि. पृ. १९२). ६. 'मूर्ख' की० ७. 'मारितात' पु०. ८. दुष्ट मूर्ख लोक त्यांपुढें कसे जगूं पाहतील' की०. ९. 'पाडायाचा नव्हता' की० 'पाडावा नव्हता' पु०.

जागा व चंजाऊर असें तुमचे[1] हातीं राहिलें. तें आमचे विभागाचें आमचे लोक यांचे स्वाधीन करावें. नख्त पैके व जडजवाहीर, हत्ती, घोडे यांचा अर्धावांटा महाराजांचे हातची वस्तु-मात्र यांचा देणें. ऐसा विचार करून अम्हांशीं संधी तुम्हीं करणें. तुम्ही ऐसा संधी निर्मळपणें केलियावरि, आम्ही आपणापासोन तुंगभद्रा[2] ऐलाड पनाळा प्रांतीं तीन लक्ष होनांची दौलत तुम्हांस देतों. अथवा आम्हांजवळील[3] तुम्हांस मानेना, तरि कुतुबशाहाशीं बोलोन[4] त्याज पासून तुम्हांस तीनलक्ष होनांची दौलत देववितों. दोहींतून एक मनीं धरून मान्य करणें. हटाचे[5] हातीं न देणें. आपणांत आपण गृहकलह करावा आणि कष्टी व्हावें, याचें प्रयोजन नाहीं. याउपरि तरि आपला आमचा संधिव्यवहार करावा ऐसी बुद्धी मनीं धरून वांटियाचा व्यवहार निर्गमांत आणून टाकणें आणि सुखरूप असणें. गृहकलह बरा नव्हे, आम्ही तरि वडीलपणीं आजपर्यंत सांगितलें. आतांही[6] सांगतों. ऐकाल तरि बरें. तुम्हीच सुख पावाल. न ऐकाल तरि तुम्हीच कष्टी व्हाल." याप्रमाणें लिहून कितेक पर्याय पाठविले, व रघुनाथ पंतासही "याउपरि तह करून घ्यावा, ते खातात ते महाराजांचे पुत्रच आहेत, खावोत; तटीं[7] न लावितां, त्यांचा स्वरूपनाश न करितां, आब राखून सख्य करणें." असें लिहून पाठविलें.

२२. व्यंकोजीने तह ठरविला.

यावर व्यंकोजीराजे यांचे मागें महाराजांची फौज गेली होती, बोलणें लागलें होतें, तों महाराजांचें पत्र निषेधाचें गेलें. तें पाहून, "वडील बंधू वडिलांप्रमाणें व त्यांचें दैवही विचित्र, त्यांशीं कलह करणें चांगलें[8] नव्हे. आपण केलें कर्म [इतर] सर्वांचे बुद्धीस लागलें[9] हें वाईट फार केलें." या प्रकारें बहूतच पश्चात्ताप होऊन, संधीचें राजकारण लावून, तह ठरविला.

---

१. 'आमचे' की० व सा० २. २. 'तुंगभद्रा पैलाड' की० व सा० २. ३. 'हा न माने तरी' की०. ४. 'बोलावून' की०. ५. हट्ट न करणे या अर्थाने. ६. 'असतांही' पु० व सा० २. ७. तंट्यास कारणीभूत न होता या अर्थी. 'तेटीं' पु०. व्यंकोजीच्या पराभवाची बातमी पन्हाळ्यास आल्यावर कळल्यावरून शिवाजीने हे पत्र रघुनाथपंत व हंबीरराव या उभयतांस पाठविले की, 'व्यंकोजीराजे आपले धाकटे बंधु आहेत. मूलबुद्धी केली...त्यास रक्षणें. त्याचें राज्य बुडवूं नका' (सभासद). ८. 'चांगलें न केलें' पु० 'चांगलें न झालें' की०. ९. 'लागले' सा० २.

रघुनाथपंताची भेट व्हावीसें केलें. भेटी[1] व्हाव्या. ऐसे जाल्यावरि[1] पंतीं आड[2] घातली जे, "आम्ही शिवाजीमहाराजांचे सेवक, तुम्ही धाकटे बंधू, आमची भेटी होणें ते महाराजांचे इराद्याप्रमाणें[3] बराबरीहून अधीक [मानानें] व्हावी." ते समयीं त्यांणीं मान्य केलें. मध्यें डेरे देऊन तिकडून राजे हत्तीवर बसोन आले. तसेंच आपणही अंबारींत बसोन मागें सरनौबत व संताजी भोसले यांच्या अंबाऱ्या [ठेवून], पोशाख वगैरे जिलिबी, निशाणें एकसारखें करून, जितके [ते] चालले तितकेच आपण चालून डेरियासमीप बराबरीनें आले. हत्तीवरून उतरणें [तें] राजे उतरल्या वरि आपण उतरले. डेरियांत बराबरीनें हात धरून येऊन, मसनदी[4] दोन करविल्या होत्या. [तेथें] भेटी जाल्या. बसावयास मसनदीपाशीं बराबरीनें हात धरून गेले. आणि पंतांनीं हात सोडून घेऊन, "या मसनदीचे आम्ही चाकर. याजवर बसण्यास योग्य तुम्हीच" म्हणोन राजे यांस बसवून, आपण मुजरे करून पूर्व मर्यादे प्रमाणें बसले. "जसे शिवाजी महाराज तसेच आम्हांस तुम्ही. साहेबांपासून गेलियावरि अर्धासनीं बसण्यास योग्य ऐसे चाकर आहों," असें बोललों. तेव्हां स्वामींनीं[5] "तुम्ही चाकर, सांगूं तितकें करावें" [असें] बोललेत,[6] म्हणून इतकें करावें लागलें. वरकड चाकर तसे आम्ही चाकर नव्हे,[7] असें समजूनच वडिलीं पाळिग्रहण[8] केलें आहे, तसेंच आपणही करावें. आम्ही तुमचे हितावांचून प्राणही गेला तरी चालावयाचे नव्हत,[9] व स्वामी वांकडे चालले असतां विनंती करावयास चुकावयाचे नाहीं. आम्ही हीं संस्थानें व राज्य साधण्याविशीं विनंती करीत गेलों, आपण न ऐकिलें. लहान माणसांचेंच [सांगणें] पथ्य पडत गेलें. महाराज पराक्रमी; सांगतांच दूर देशीं असतांही[10] राज्य साधावें, पराक्रम करावे, म्लेंछ दुष्ट संहार करावे, धर्म[11] स्थापावा हेच वासना; तसीच हिंमत करून, आमची विनंती मान्य करून येऊन तीन चार कोटींचें राज्य संपादिलें. तुमचेठायीं महाराजांचा मोह बहूत, इतर भावना

---

१. 'भेटी झाल्यावर' की०. २. अ (आ) ड (स्त्री०) [का० अड–इ=अडथळा]–अट. 'आड घातला जे' पु० व सा० २. ३. इरादा (पु०) [अ० इरादत्–इरादा]– मूळ अर्थ हेतू. येथे हक्क, मान या अर्थी. ४. मसनद [स्त्री० अ०]–गादी; सिंहासन. ५. तृतीयान्त कर्त्याचे वाक्य कर्तरि प्रयोगात. ६. 'सांगितलें' की०. (परि० ६ पहा). ७. 'नव्हों' (शुद्धरूप). ८. पाळि (ळ) ग्रहण न० [स० पालन+ ग्रहण]–सांभळा; संगोपन. ९. 'नहों' (प्रशस्त). 'नव्हे' की०. १०. यानंतर 'परंतु' पु० व सा० २. ११. 'धर्मस्थापना' पु०.

किमपी नाहीं. बहूत लोभ ममता आहे. वारंवार आम्हांस[1] लिहितात. या उपरि स्वच्छपणीं पूर्वीं जसे श्रीरामचंद्रजीचे आज्ञेंत लक्ष्मण भरत चालले तसेंच चालत जावें. हाच आपला धर्म. येणेंकरूनच वृद्धीस पावाल. हरएक कारण पडल्यास आम्हांस आज्ञा करीत जावी. ते समयीं आम्ही सेनासह येऊन साह्य करूं. आम्हांस जसे महाराज तसेच तुम्ही, दुसरा विचार नाहींच, व [आपणही] न धरावा. कार्यप्रयोजनाव्यतिरिक्त उगेंच लोकांहातीं निष्कारण खाववूं[2] नये. महाराजांचेच प्रमाणें उद्योग करून राज्यसाधन करावें." ऐसें कित्येक प्रकारें बोलोन, निरोप घेऊन, निमे प्रांताचा ऐवज त्यांजकडील येत जावा, असें करून घेऊन, व पूर्वींचे पदार्थ हत्ती, घोडे जवाहीर मर्जीस येईल तें महाराजास रवाना करावें, असें सांगोन निघोन आले. चंदी प्रांतीं पावले.

२३. महाराजांचे महाराष्ट्रात प्रत्यागमन.

इकडे महाराज तोरगळप्रांतांतून पनाळियावरून[3] सातााराप्रांतीं येऊन, श्रीस्वामीचें दर्शन करून, प्रतापगडीं श्रींदेवीचें दर्शन केलें, आणि रायगडावर[3] येऊन पावले. मातुश्रींचें दर्शन घेऊन तिकडील सर्व वृत्त निवेदन केलें. उत्तम पदार्थ आणिले ते दाखविले. द्रव्यही बहूत आणविलें तें सर्व निवेदन केलें. आणि भागानगरीं पादशाहास व मादण्णापंतास लिहून पाठविलें जे, कर्नाटकप्रांतीं स्वारी करून यश व प्रांत घेऊन, स्वदेशीं येऊन सुरक्षित पोहोंचलों. त्याजवरून त्यांणीं वस्त्रें, बहुमान, हत्ती, घोडे, जवाहीर देऊन निराजीपंत[4] तेथें ठेविले[5] होते ते व आपले वकील ऐसे पाठविले. महाराजांनीं वकिलांस बहुमान करून निरोप दिला.

२४. 'एक राज्य, एक आज्ञा.'

महाराज देशीं आलियावरि कांहीं दिवस कर्नाटकप्रांतीं फौज व सरनौबत ठेविले

---

१. 'आम्हांस लिहिलीं येतात' पु०. २. 'खाटावूं नये' की०. खाटा (वि०) [सं० खट्ट. खट्ट (आंबट) हा मूळचा प्राकृत शब्द. त्याचे नंतर संस्कृतीकरण]–(ल०) हलके; वाईट. ३. दि. ४ एप्रिल इ. स. १६७८ रोजी पन्हाळ्यास दाखल (सरकार–शिवाजी पृ. ३८७). मे स. १६७८ मध्ये रायगडास (श. शि. पृ. २०२). ४. प्रल्हाद निराजी हा भागानगरास असून 'निराजीपंत बहादुरखानाजवळ ठेविले होते' (सभासद). ५. 'पाठविले' पु०.

होते. त्यास[1] व्यंकोजी राजे यांचा तह जाला, व तिकडील राज्य साधिलें. तिकडील बंदोबस्त [संबंधें] रघुनाथपंतीं वर्तमान लिहिलें यावरून संताजीराजे व रघुनाथपंत यांणीं राहून दौलत तिकडील सांभाळावीसें करून ठेवून, दाहा हजार फौज त्यांजपाशीं देशींची नेहमीं राहावी, असें करून ठेविलें, आणि हंबीरराव सरनौबत यांस बाकी फौज घेऊन हुजूर येणेंविशीं लिहून आणविलें. त्याजवरून सरनौबत निघोन देशीं महाराजांचे दर्शनास येतां मार्गीं हुसेनखान माइणा व लोदीखान चालून आडवे जाले. त्यांस सरनौबत यांणीं युद्ध करून मोडलें. हुसेनखान आणि लोदीखान उभयतां पाडाव केले. फौज लुटली. फत्ते पावून त्यांस घेऊन आले. महाराज[2] बहूत संतोषी होऊन, सामोरे जाऊन भेटी घेतली. सर्वांस आदरें करून ज्यांणीं ज्यांणीं जशी सेवा केली होती, ते जाणोन त्याप्रमाणें त्यांस बक्षीस, बहुमान, तैनात वाढविणें [करणें] तें करते जाले. हुसेनखान व लोदीखान यांस वस्त्रें बहुमान देऊन खर्चास [व] लवाजमा देऊन विजापुरीं जाण्यास निरोप दिला. याप्रमाणें महाराज यांणीं दक्षिणप्रांतांत सर्व एक राज्य पश्चिमसमुद्रापासून श्रीरामेश्वरापर्यंत दक्षिणचें, एक आज्ञा [चाले] ऐसें केलें. दक्षिणदिग्विजय प्रकरण समाप्त.

---

१. त्यास (क्रि०वि०)-तसे असता. त्या परिस्थितीत. २. प्रथमान्त कर्त्याच्या वाक्याचा कर्मणि प्रयोग.

राज्याभिषेक—प्रकरण ७

१. राज्याभिषेकाचा विचार.

श्रीशिवाजी महाराज यांणीं दक्षिणप्रांतीं जाऊन चंदी वगैरे स्थळें हस्तगत केलीं. वरकड मांडलिक राजे, पाळेगार सर्व पादाक्रांत जाले. करभार खंडणी प्रतिवर्षीं द्यावी याचीं वार्षिकें बांधिलीं. विजापूरची पादशाहात सर्व हस्तगत जाली. भागानगरचे पादशाहाशीं सख्य बहूतच[1] अकृत्रिम जालें. दौलताबादची पादशाहात दिल्लीचे पादशाहांनीं पूर्वीं घेतली, सुभे ठेविले, तेही पराक्रमें करून [बुडवून] त्यांचे प्रांतातील किल्ले व स्थळें बहूत[1] घेतलीं; सुभे बुडविले; दिल्लीस जाऊन पादशाहाची हिंमत व कर्तृत्व पाहिलें. साडेसहा[2] सुभे दक्षिणप्रांत, यांत बहूतकरून राज्य आपणास हस्तगत जालें, व राहिलें त्यांत चौथाई, मोकासा, बाबती,[3] घासदाणा,[4] सावोत्रा,[5] ऐसे तह आपले जबरीनें करून निमे अंमल [रूपानें] आपलें स्वराज्य त्यांतही[6] जालें. एक दिल्लीपती राहिले. त्यांचाही उपमर्द [आपण] केला, व त्यांणीं जे जे सरदार पाठविले ते मारिले,

---

१. विशेष्यानंतर विशेषणाची योजना. २. साडेसहा सुभे–विजापूर, दौलताबाद, अहमदाबाद (गुजरात), बऱ्हाणपुर (खानदेश), हैदराबाद (भागानगर), औरंगाबाद व नागपूर (अर्धा) [शि. दि० पृ० ३०]. ३. बाबती–विशिष्ट बाबींवरील जादा कर. चौथाईचा चतुर्थांश राजाकडे (राजबाबती). ४. घासदाणा–सैन्याला गवत पुरविण्याच्या खर्चासाठी कर. ५. सावोत्रा (साहोत्रा)–उत्पन्नाचा एक षष्ठांश (राजाचा). ६. 'त्यांतही सामील जाले' की०.

गर्दीस नेले. रामेश्वरपर्यंत एक[१] साम्राज्य जालें. याउपरि आपण असे रितीनें राज्य करणें,[२] तेव्हां पाळेगारांतच संख्या[३] आपली होती. यास्तव याउपरि राज्याभिषेक करून, छत्रसिंहासन करून, पूर्वी धर्मेंकरून राजे राज्य अष्टप्रधानादि-युक्त[४] करीत आले, तसें करावें हें [महाराजांनीं] अंतःकरणांत आणून, उद्योग करण्यास प्रारंभ केला.

२. औरंगजेब राजपुतान्यांत.

या समयांत दिल्लीहून औरंगजेब बहूत प्रकारची फौजेची तरतूद करून निघाले तेव्हां [त्यांनीं] विचार केला कीं, "दक्षिण प्रांतीं जाण्यास विजापूरची पादशाहात बुडाल्यांत[५] जमा आहे. शिवाजी राजे यांणीं त्यांचा सर्व प्रांत व स्थळें घेतलीं असतां त्यांशींच सख्य करून स्थळ रक्षून राहिले आहेत.[५] भागानगर [येथील पादशाहा] तरि, त्यांची त्यांची भेटी होऊन अतिसख्यत्व मादण्णापंत तेथील वजीर त्यांचे योगें जालें. तेव्हां दोन्ही उद्योग केले असतां शिवाजी राजे त्यांचें साह्य करणार. त्या अर्थी जावें तरि त्यांजवरिच[६] मोहीम करावी. त्यास आपल्या फौजा व सरदार गेले ते [त्यांनीं] नामोहरम केले. आपण जाऊन त्यांचेच[७] बळें लढावें तर शिवाजी दैववान व फौज खजीना [त्यापाशीं] बहूत. त्यांतही उमराव, सरदार, मुत्सद्दी हे जवामर्द, मनसबेबाज [यांचा] बहूत संग्रह त्यांनीं केला. त्याचा पराभव या काळीं आपले हातें घडावयाचे दिसत नाहीं. [शिवाजी] जातीनें खबरदार आणि विजापूरकर यांचे सर्वस्व घेऊन ईहसान[८] त्यांजवर केलें. भागानगर [-कर तरि] तेच ऐसे जाले. तेव्हां यांचें साह्य [ते] सर्व प्रकारें करतील. यास्तव आपलेच प्रांतीं राहून बंदोबस्त करावा. आपण त्या प्रांतीं चाल केली असतां [ते] आमचे या प्रांतावरि चालून येण्यास याउपरि चुकणार नाहींत. म्हणून किल्ले रणथंबोहर,[९] मातबर

---

१. 'एकसाहा राज्य' सा० २ 'साम्राज्य केलें' की०. २. 'केलें तर' की०. ३. संख्या (स्त्री०)–गणना. ४. 'प्रधान युक्त' की०. ५. 'बुडाल्यांत आहे परंतु शिवाजीराजे यांणीं साह्य शर्तीनें करून, दिलेलखान याणीं मसलत केली, जेर करून कोट घ्यावा, इतक्यांत रक्षिली. आपले फौजेचें कांहीं एक चालूं दिलें नाहीं" सा० २. ६. त्याजवरिच–शिवाजीवरच. ७. त्यांचेच बळें–त्याच फौजांच्या व सरदारांच्या बळावर. 'त्याशीं बळें लढावें' की०. या दृष्टीने बळे म्हणजे मुद्दाम. ८. इहसान (न० अ०)–कृपा. ९. रणथंबोहर (रतनभोर)– हा किल्ला चितोडजवळ मेवाडात.

जागा, किल्ला बहूत मजबूद, तेथील सुभेदार पादशाहाशीं बदलून हुकूम न मानितां राहिला होता, त्याचें पारिपत्य करावें हा विचार सर्व वजीर आदि-करून उमराव यांचे विचारें [करून] त्या प्रांतीं गेले.

३. इलाचीबेगचा पराक्रम.

एके दिवशीं वजीर[१] व सर्व [उमराव] कशी मसलत करावी म्हणून विचारास बसले. तो मोर्चेल[२]-बारदार इलाचीबेग म्हणून मोर्चेल घेऊन मागें उभा होता तो पुढें येऊन [त्यानें] अर्ज केला. "हज़रतीस इतका विचार कां पडला ? मजला पाठवावें दोन फरमान[३], एक किल्लेदार यास व एक लोकांस ऐसे दोन, द्यावे. एकटाच जाऊन किल्ला फत्ते करून येतों." त्याजवरून त्यास नवांजून दोन फरमान दिल्हे, आणि वस्त्रें देऊन रवाना केला. तो एकटाच किल्ल्यावरि गेला. वरतीं जाऊन [त्यानें] किल्लेदार यास एकीकडे हुकूम सांगावयाचा आहे म्हणून उठवून नेला आणि ते स्थळीं कटार[४] चालवून, गळा कापून, शीर रुमालांत घेऊन बाहेर येऊन "हरामखोर[५] सरकार[६]-हुकमें करून मारिला[६]. तुम्हांस पादशाही फर्मान आहेत" [ऐसें] म्हणून काढून देऊन, सर्वांचा दिलासा[७] करून, किल्लेदार याचा लेंक यास खातरजमा करून, पादशाहापाशीं येऊन पोहोंचला, वर्तमान समजाविलें. पादशाहांनीं किल्लेदार याचे लेंकास किल्लेदारी, सुभा दिल्हा, आणि "याउपरि हुकमाखेरीज न चालावें" [ऐसें] सांगितलें. "इलाची बेग याणीं शर्त केली, परंतु त्यास समीप ठेवणें सेवेमध्यें ठीक नाहीं." ऐसें वाटून यास वाढवून दूर ठेवावा म्हणून सरदारी देऊन वाढविला, आणि तेथें छावणी करून पादशाहा राहिले. शिवाजीराजे यांचा प्रताप, फौज पराक्रम विशेष जाला, दक्षिण प्रांतीं जाणें ठीक नाहीं म्हणून त्या प्रांतींच [पादशाहा] राहिले.

---

१. 'वजीर सर्व मिळून' की०. 'सर्व मिळून' को०. 'वजीर व सर्व' सा० व सा० २. २. मोर्चेल–बारदार (पु०) [सं० मयूरचल–फा० बरदार–वाहक (समासात प्रयोग)–मोरपिसांची चौरी वारणारा. ३. फरमान (पु० फा०)–आज्ञापत्र. ४. कटा(ट्या)र (स्त्री०) [सं० कट्टार] एक हात लांबीचे व दुहेरी धारेचे हत्यार. ५. हरामखोर (वि०) [फा० हराम्खुर्]–स्वामिद्रोही. ६. 'सरकार हुकूम यानें अमान्य केला यास्तव यास मारिला' की०. ७. दिलासा (पु०) [फा० दिल्–आसा)–सांत्वन.

४. शिवाजीचे सरकारकून व सरदार.

या नंतर हें सर्व वर्तमान वकील यांणीं हरघडी[1] बातमी अंतर्यामची[2] व बाह्यरंग वजीर आदी [यांच्या] मसलतीची घेऊन लिहिली. याजवरून विचार केला कीं, "दिल्लीपती याजवरि आपलें तेंज पडलें. आपण सिंहासनाधीश्वर व्हावें. सर्व सरकारकून मंत्रविशारद व शूर ऐसा संग्रह जाला. ते राजकार्यांचे ठायीं दक्ष, जनांचे ठायीं दया, परोपकारकर्ते अमात्य[3] व चतुरंगसेनाधिकारी[4] एक एक योग्य असे व चतुरंग सेना व कोश द्रव्य असावें तसा संग्रह जाला. सरकारकून व सरदार व प्रांत कोण कोण किती म्हणून निवडून काढून पाहिले ते ते बिा[5]:—

१. मोरो त्रिमळ पिंगळे पेशवे.
१. रामचंद्र नीळकंठ.
१. रघुनाथ[6] पंडितराव.
१. अण्णाजी दत्तो.
१. जनार्दनपंत हणमंते मजमदार.
१. दत्ताजीपंत वाकेनीस.
१. बाळाजी सोनदेव.
१. निराजी रावजी.
१. प्रल्हाद निराजी.
१. शिवाजी शंकर.
१. कृष्णाजीपंत मथुरे.
१. काशीपंत मथुरे विश्वासराव.
१. कृष्णाजी[7] सखाजी.
१. शामजी आवजी कारखानीस.
१. येसाजी गोविंद.
१. शामजी नाईक पुंडे पोतदार.
१. संक्राजी नीळकंठ.
१. त्रिंबक भास्कर.
१. पंताजी[8] गोपीनाथ बोकील.
१. अण्णाजी रंगनाथ मळेकर.
१. विठ्ठल पिलदेव गारूडकर.[9]
१. तिमाजी केशव सबनीस.
१. कोन्हेरपंत.
१. गोविंदभट उपाध्ये.

---

१. हरघडी (क्रि० वि०) [फा० हर+सं० घटिका]–प्रतिक्षणी. २. 'अंतरंगची व बाह्यांगची' की०. ३. अमात्य (पु०) [सं० अमा (जवळ)+त्य; अमा भवः]–मज्मुदारीचे काम करणारा प्रधान. ४. चतुरंगसेना—हत्ती, घोडे, रथ व पायदळ असलेले सैन्य. मध्ययुगात रथाऐवजी आरमार व तोफखाना असे. ५. बिा (बितप–(फ) शील (क्रि० वि०) [फा० बि-तफ्सील्]–सविस्तर. ६. रघुनाथपंत पंडितराव असावे. हा रघुनाथपंत जयसिंगाकडे हेजीब होता (स० च० पृ. ३११). 'रघुनाथ-रावपंडित' सा० व को०. 'रघुनाथ नारायण पंडितराव' की० व सा० २. ७. कृष्णाजी सबनीस' सा० २. ८. 'दत्ताजी' की०. ९. 'गरूड' सा० व को०.

१. बाळाजी आवजी चिटणीस.	१. रघुनाथ बल्लाळ कोरडे[२]	१. विसाजीपंत[४] मथुरे.
१. चिमणाजी आवजी दफ्तरदार.	२. बाळाजी रघुनाथ व नरहर बल्लाळ सबनीस	१. कृष्ण जोशी.
१. प्रभाकर[१] उपाध्ये.	१. रावजी सोमनाथ सुभेदार.[३]	१. नरहर आनंदराव
१. शिवभट उपाध्ये.	१. व्यंकोजी दत्तो.	१. बाळंभट गोसावी उपाध्ये.
		१. शामराज पद्मनाभ.
१३	३	१२

३८*

या प्रकारें पराक्रम केलेले[५] थोर थोर[५] लिहिले. आणखीही बहूत सुभे, मामले किल्ले कोटांत माहालदार व कारखानदार असंख्यात कर्ते माणूस जाले.[६]

सरदार लोक, नांवाचीं[७] माणसें बिा :—

१. हसाजी[८] हंबीरराव मोहिते सरनोबत.	१. मकाजी आनंदराव पाळक लेक.	१. गोंदजी जगताप.
१. गोमाजी नाईक पानसंबळ.	१. गणोजी दरेकर.	१. संताजी जगताप.
१. संताजी[९] राजे भोसले, शाहाजी महाराजांचे नाटकशाळापुत्र.	१. कान्होजी आंगरे.	१. बाजी नळगे.
१. साबाजी भोसले शिंगणापुरकर.	१. संताजी घोरपडे जुमलेदार.	१. मालोजी नळगे.
	१. धनाजी जाधवराव.	१. संभाजी कावजी.
	१. तेलंगराव पागे सरदार.	१. हरजी राजे महाडीक.
	१. व्यंकोजी[१०] खांडेकर जुमलेदार.	१. आनंदराव हफ्तहजारी.
		१. अचलोजी[११] राजे महाडीक.

---

१. 'भास्करभट उपाध्ये' सा० व को०. २. 'कारंडे' सा० व को०. ३. 'सुरे' सा० व को० 'सुभे' की०. ४. 'विश्वासराव' सा० सा० २ व को०. *याशिवाय की० अधिक सात नावे देते. ती अशीः—गंगो मंगाजी पागे, कृष्णंभट गोसावी उपाध्ये, रघुनाथपंत, नारो सदाशिव, अण्णाजी मल्हार, दाजी आनंदराव व शामजी सदाशिव. यांपैकी गंगो मंगाजी (वाकनीस) आग्र्याहून शिवाजी आला त्या सुमारास वारला (स. च. पृ. ३११). ५. 'केलेले व थोर थोर' सा० व० को०. ६. 'झाले आहेत' की०. ७. 'नामांकित' की०. ८. 'हंसाजी हंबीरराव' की० 'हसाजी बहिरव को०. ९. 'संताजीराव' की०. १०. 'एकोजी' सा०व०को०. ११. 'अतलाजी सा०व को०.

१. रुपाजी भोसले सरदार.[1]
१. मानसिंग मोरे.
१. महादजी नाईक पानसंब्रळ.
१. मुधोजी खाजणकर.[2]
१. कोकाटे.
१. आमरोजी[3] पांढरे.
१. अमृतराव निंबाळकर.
१. हांडे.[4]
१. पदाजी[5] काटकर.
१. नेतोजी[6] काटकर.
१. पिलाजी शिर्के.
१. तानाजी शिर्के.
१. गणोजी शिर्के, पिलाजीचे पुत्र.
१. संभाजी शिर्के.
१. जैसिंग पालकर.
१. परसोजी भोसले.
१. भुजबळराव.
१. अरेराव.
१. बहिरजी घोरपडे.

२३

१. सोमवंशी.
१. कान्होजी भांडवलकर[7]
१. बहिरजी नाईक इंगळे
१. खंडोजी जगताप[8].
१. संभाजी काटकर.
१. सूर्याजी काटकर.
१. रायाजी गडधे.
१. देवजी उघडे.
१, केरोजी पवार.
१. परसोजी शितोळे.
१. रायाजी नळगे.
१. येसाजी खांडेकर.
१. बुवाजी पवार.
१. कृष्णाजी घाटगे.
१. कृष्णाजी पवार.
१. मालोजी निंबाळकर.
१. हिरोजी शेळके.
१. खापणे[9].
१. रुमाजी शिर्के.[10]
१. वाघोजी शिर्के.

२७

१. तुकोजी पालकर.
१. महादाजी नाईक निंबाळकर.
१. येसाजी थोरात.
१. खंडेराव दाभाडे.
१. नेमाजी शिंदे.
१. खटोजी[11] आटोळे.
१. बहिरजी बंडगर.[12]
१. बळवंतराव देवकांते.
१. भवानराव देवकांते.
१. माहार्णवर.[13]
१. काकडे.
१. कड्ड[14]
१. बाळाजी नाईक. निंबाळकर.
१. ढमढेरे.[15]
१. उचाले.[16]
१. जैसिंग पालकर.
१. आनंदराव निंबाळकर.
१. बाजी मोहिते.

२६

७६

---

१. 'सरकारी सरदार' की०. २. 'साजणकर' को० 'खादणकर सा. २. ३. 'अमदोजी' की०. 'कुमराजी' सा० २. ४. 'हंडे' सा० 'बांडे' की०. ५. 'दत्ताजी' को०. ६. 'जैतोजी' को०. ७. 'भाडलकर' की० 'भाडवलकर' सा० २. व को०. ८. 'जखताप' की० 'जगताप' व जखताप' सा० व सा० २. ९. "'आपणे' सा०. १०. 'रामोजी' की०. ११. 'खंडोजी' की०. १२. 'बांडगे' की०. १३. 'महार्णव'? १४. 'लाड' सा० व को०. १५. 'मढदे' को० 'मढढेरे' सा० व सा०२. १६. 'उचले' सा ०, सा०२ व को०.

आणखी सरदार, जुमलेदार, पागे, शिपाई लोक बहूत नामी होते.

मावळेलोक पायदळचे सरदार बिा :—

नांवनिशी मातबर [लोकांची.]

१. येसजी कंक सरनोबत.
१. तानाजीराव मालुसरे.
१. जिवा माहाला
१. सोन माहाला.
१. राजपाटील यशवंतराव.
१. रामाजी[1] विश्वासराव.
१. कृष्णाजी नाईक.
१. सुभानजी[2] नाईक.
१. तान सावंत.
१. कोंडाजी वळखले.
१. बाजीराव पासलकर[3]
१. बाबाजी[4] प्रभू देशपांडे, हिरडस मावळकर.
१. ठाकूर.
१. ढमाले.
१. बाजी मुरार देशपांडे, महाडकर.
१. ढवळे.
१. कुडाळकर.
१. मलधडे.[5]
१. हिरोजी रोटे.
१. रामाजी मोरे.
१. तुकोजी लाड.
१. तुळाजी फर्जंद.
१. हिरोजी भानगिरे.[6]
१. येसाजी दरेकर.
१. सोन दळवी.
१. मुधोजी सासवदेकर[7]
१. खंडोजी नाईक जासूद.
१. बागराव.
१. दिनकरराव.
१. हरजी नाईक जासूद.
१. सूर्याजी काळे.
१. सूर्याजी मालुसरे.[8]
१. तानाजी दुदुसकर.[9]
१. पिलाजी सणस.[10]
१. जावजी पारळे.
१. मुधोजी फुरणव्हणें.[11]
१. विठोजी कड्र.
१. इंद्राजी गाडे.[12]
१. महादजी फर्जंद.
१. हिरोजी फर्जंद.
१. नागोजी फर्जंद. नाईक.
१. हरबाजी[13] फर्जंद.
१. पारठे.
१. चांगोजी कड्र.
१. कृष्णाजी भोसले.

---

१. याऐवजी 'पामाजी विश्वनाथराव' को०. २. 'सुजाननसी नाईक' सा० व को० 'सुभानी नाईक' सा० २. ३. 'पानसलकर' सा० व को०. ४. 'बाजी प्रभू' की०. ५. 'मलधंडे' की० व को० 'मलंधडे' सा० 'मलधडे' सा० २. ६. 'जमनगिरे' सा० व को०. ७. 'सिसवदेकर' को०. ८. 'मांडरे' सा० 'मारडे' को०. ९. 'दुदुसाकर' को० 'दुंदुसकर' की०. १०. 'सग्रणस' की०. ११. 'हुणकणे' सा० २ व की०. १२. 'गोरड' की० व सा० २. १३. 'हरबाजी' इतकेच सा० व को०.

१. दादाजी बापूजी देशपांडे.	१. माल सावंत.	१. गणोजी कावळे.
१. चिमणाजी बापूजी देशपांडे.	१. डोळे.	१. सोमाजी नाईक बंकी.
१. राम दळवी.	१. जावजी मोहने[1].	१. बापूजी मांडरे.
	१. मुधोजी खानवलकर[2].	१. राणोजी दरेकर.
	१. बाजीराव दरेकर[3].	
१७	२०	२०

५७*

आरमारचे सरदार.

१. दर्यासागर.	१. मायनाक भांडारी.[4]	१. इब्रामखान.

सदरहू प्रमाणें सरकारकून सरदार अष्टप्रधान [जाले.]

५. किल्ले कोट व प्रांत.

[आतां] किल्ले कोट व प्रांत बहूत हस्तगत जाला त्यांतील तालुके[5] तपशीलवार :—

प्रांत सातारा व वाई

१. सातारा.	१. पांडवगड.	१. वर्धनगड.
१. परळी [ऊर्फ] सज्जनगड.	१. चंदनगड.	१. महिमनगड.
१. वैराटगड.	१. वंदनगड.	१. ताथवडा [ऊर्फ संतोषगड.]
१. कमलगड.	१. नांदगिरी [ऊर्फ कल्याणगड.]	
४	४	३

११

१. 'माहेने' किंवा 'मोइने' सा० व को०. २. 'खानवेलकर की०. ३. 'ढरेकर' सा० व को०. * को० प्रत त्रेपन्न नावे देते. ४. 'भंडारी' की०. ५. 'तालुके' इतकेच की० तालुके तपशील सा० व को०.

प्रांत कराड.

१. वसंतगड.	१. भूषणगड.	१. का कराड ठाणें.
१. मचिंद्रगड.		

४

प्रांत पनाळा.

१. पनाळा.	१. रांगणा [ऊर्फ प्रसिद्धगड.]	१ भूपाळगड.
१. पावनगड.	१. भूधरगड.[1]	१. मदनगड.
१. खेळणा [ऊर्फ विशाळगड.]	१. भिवगड.	१. गगनगड.
१. गजेंद्रगड.	१. पारगड.	१. बावडागड.
४	४	४

१२

प्रांत मावळ सह्याद्री.

१. रोहिडा [ऊर्फ विचित्रगड.]	१. वासोटा [ऊर्फ व्याघ्रगड.]	१. तुंग [ऊर्फ कठीणगड.]
१. पुरंधर [ऊर्फ दौलतमंगळ.]	१. केळंजा.	१. तिकोना [ऊर्फ वितंडगड.]
१. राजगड.	१. रुद्रमाळ.	१. राजमाची [श्रीवर्धन व मनरंजन हे दोन भाग.]
१. दातेगड.	१. कोंढाणा [ऊर्फ सिंहगड.]	१. शिवनेरी.
१. विसापूर.	१. तोरणा [ऊर्फ प्रचंडगड.]	१. मोरगिरी.
१. लोहगड.[2]	१. कुवारी.	
१. नारायणगड.		
७	६	५

१८

---

१. 'भूदर' सा० २ को० व की०. २. या ऐवजी 'धनगड' सा० व को०.

प्रांत कोंकण बांधारी व जलदुर्ग.[1]

१. मालवण [ऊर्फ सिंधुदुर्ग.]
१. विजयदुर्ग [ऊर्फ घेरिया.]
१. जयदुर्ग.
१. रत्नागिरी.
१. सुवर्णदुर्ग.
१. खांदेरी.
१. उंदेरी.
१. कुलाबा.
१. राजकोट.
१. अंजनवेल [ऊर्फ गोपाळगड.]
१. रेवदंडा.
१. रायगड [रायरी]

१२

१. पाली [ऊर्फ सरगसड.]
१. कलानिधिगड.
१. आरनाळा.
१. सुरंगगड.
१. मानगड.
१. महिपतगड
१. महिमंडण.
१. सुमारगड.[2]
१. रसाळगड.
१. कर्नाळा.
१. भोरप [ऊर्फ सुधागड]
१. बालमगड.[3]
१. सारंगगड.

१३

१. माणिकगड,
१. सिद्गड.
१. मंडणगड.
१. बळगड.[4]
१. लिंगाणा.
१. प्रचीतगड.
१. सामानगड[5]
१. कांगोरी [ऊर्फ मंगळगड.]
१. प्रतापगड.
१. तळागड.
१. घोसाळगड [ऊर्फ वीरगड.]
१. बिरवाडीगड.
१. महिमंतगड.

१३

३८

प्रांत कोंकण

१. भैरवगड.
१. प्रबळगड.
१. अवचितगड [मेढें.]
१. मंडणगड.

१. कुंभगड.
१. मनोहरगड.
१. सागरगड.
१. रत्नगड.[6]

१. सुभानगड.
१. मित्रगड.
१. प्रल्हादगड.
१. मकरंदगड.

---

१. 'नलदुर्ग' की० २. सुरमागड' सा० व को०. ३. 'बल्लाळगड' की०. ४. बाळगड' की० व सा० २. ५. 'समानगड' की०, ६. 'रणगड' की० व सा० २.

१. सहजगड.[१]	१. सेहगोगड.[३]	१. भास्करगड.
१. सिमेरागड.[२]		१. माहुली.
१. महीधरगड.		१. कावनई.[४]
७	५	७

१९

५७*

ठाणीं

१. कल्याण.	१. भिवंडी.	१. वाई.	१. कराड.
१. सुपें.	१. खटाव.	१. बारामती.	१. चाकण.
१. शिरवळ.	१. मिरज.	१. तासगांव.	१. करवीर.
३	३	३	३

१२

प्रांत बागलाण

१. सालेरी	१. अहिवंतगड [ऊर्फ सर्प किल्ला]	१. कणेरा [ऊर्फ कान्हेरा.]
१. मुलेरी	१. घोडप.	१. हरसळ.
१. नाहवा [नाव्हा.]		
३	२	२

७

प्रांत त्रिंबक वगैरे

१. त्रिंबक.	१. चावंडस.	१. मार्कंडेयगड.
१. रामसेज.[५]	१. चांदवड.	१. करोळा.
१. गडगडा.	१. हरींद्रगड.	१. आवंढा [औंढा]

१. 'सहनगड' की०. २. 'शिकेरागड' की० 'सिकरागड' सा० २. ३. 'सेटगागड' सा० २ व की० 'सिहगोगड' को०. ४. 'कावन्ही' की०. *की० एकूण अठ्ठावन्न देते ते घोंसाळा ऊर्फ वीरगड निरनिराळे गणल्यामुळे. ५. 'रामसेन' की०.

१. बहुला.[१]	१. मान्नणागड.	१. पट्टागड [ऊर्फ विश्रामगड.]
१. हर्षण.	१. मनरंजन.	१. राजदेहर.[२]
१. जीवधन.	१. सिद्धगड.	१. अणकई.[३]
१. रवळागड.	१. मनोहरगड.	१. टणकई.
१. जवळागड.	१. मृगगड.	
१. हडसर.	१. सबळगड.	
९	९	७

२५

प्रांत फोंडें बिदनूर[४]

१. कोट फोंडें.	१. कोट मंगरूळ.	१. कोट बल्याळ[९] [हल्याळ?]
१. कोट कडवाल.[५]	१. कोट बकर.	१. कोट लबर्गे.[१०]
१. कोट शिवेश्वर.	१ कोट कठोर.[७]	१. कोट कृष्णगिरी.
१. कोंट काहूर.	१. कोट कहूर[८] [कऊर?]	
१. कोट अंकोला.[६]		
५	४	३

१२

प्रांत कर्नाटक वगैरे.
प्रांत जगदेवगड.

१. जगदेवगड.	१. रम्यगड.[११]	१. प्रबळगड.
१. वारुणगड.	१. सिद्धगड.	१. मार्तंडगड.
१. गगनगड.	१. मल्लिकार्जुनगड.	१. दीर्घपल्लीगड.
१. सुदर्शनगड.	१. नंदीगड.	१. भैरवगड.

१ 'बाहुला' की०. २. 'राजपेहर' की०. ३. 'कणकई' की०.४. 'बिदर' सा० व को० (हस्तदोष असावा). ५. 'कडवळ' की०. ६. 'आकोलें' की०. ७. 'कठर' की०. ८. 'कडणारा' की०. ९. 'ब्राह्मणाळ' की० 'बाहल्याळ' सा०२. १०. 'कलबर्गे' सा० व की०. 'लबरगें' को०. ११. रमणगड' की०.

१. महाराजगड.	१. जवादीगड.	१. मंगळगड.
१. कृष्णगिरी.	१. कस्तुरीगड.	१. रामगड.
६	६	६

१८

प्रांत श्रीरंगपट्टण.

१. कोट धर्मपुरी.	१. रंजनगड.	१. कोट दुटाजटी[३]
१. कोट तळेगिरी.	१. प्रमोदगड.	१. कोट विराडें.[४]
१. कळपगड.	१. कोट आठनूर.	१. कोट अमरापूर.
१. हरिहरगड.	१. कोट आलूर.	१. कोट लखनूर.
१. सुंदरगड.	१. मनोहरगड.	१. कोट चंगमाल.[५]
१. महिनंदगड.[१]	१. कोट त्रिपादूर.[२]	१. कोट तूळ.[६]
१. कोट गरूड.	१. कोट शामल.	१. सूर.[७]
१. कोटवालगोड.	१. भवानीदुर्ग.	
८	८	७

२३*

प्रांत येलूर तालुके व गड.

१. कोट आरकाट.	१. गर्जनगड.	१. यशवंतगड.
१. कोट त्रिमल.	१. कोट त्रिवादी.	१. चेतपावहव्ळी.
१. कोट त्रिकोलनूर.[८]	१. कैलास गड.	१. मुख्यगड.
१. कोट लहनूर.[९]	१. रसाळ गड.	१. प्राणगड.
१. कोट दळणापट्टण.[१०]	१. कर्नाटक गड.[११]	१. साजरा गड.

१. 'महिनदीगड' की०. २. 'त्रिपादुरे' की० व सा०. ३. 'दुटाजेटे' को० 'दुटानेटी' की०. ४. 'विराटे' सा० २. ५. 'चंदमाळ की०. ६. याबद्दल 'तळगोंडा' की०. ७. 'कोटकुसूर' की० 'कोटकुसार' सा० २ 'सूर' सा० व को० (हस्तदोष ?) * 'वालगोड' न दिल्यामुळे की० चे एकूण बावीस. ८. 'कोट त्रिकोनदुर्ग' की०. ९. 'कोट लखनूर' की०. १०. 'कोट पळणापट्टण' की०. ११. कर्मट गड' की०.

१. पाळकोट.[1]
१. चंजी बाराकोट.[2]
१. सागरगड.[3]
१. कोलव्रलगड.[4]
९

१. मडबिंड गड.
१. महिमंडण गड.
१. कोट वृंदावन.
८

१. गोजरा गड.
१. दुभे गड.
१. अनूरगड.
८

२५

प्रांत वनगड वगैरे तालुका.

१. वनगड.
१. गहनगड.
१. सिमदुर्ग[5]
१. नळदुर्ग[6] [ऊर्फ] मिरागड.
१. श्रीमंत दुर्ग.
१. श्रीगदन गड.
१. पराक्रमगड.
७

१. नरगुंद[7] [ऊर्फ] महंत गड.
१. कनकाद्रि गड.
१. ब्रह्म गड.[8]
१. चित्रदुर्ग.
१. प्रसन्न गड.
१. कोपल गड.
१. बाहदूर बिंडा
७

१. व्यंकट गड.
१. गंधर्व गड.
१. ढाकेगड.
१. सुपें गड.
१. हडपसरगड.[9]
१. कांचन गड.
१. अचलागिरी गड.
१. मदन गड.
८

२२

प्रांत कोल्हार, बाळापूर.

१. कोल्हार.
१. ब्रह्म गड.
१. वडन्न[10] गड
१. भास्कर गड.

१. प्रेईवार गड.
१. सोमशेखर गड.
१. मेदगिरी.
१. चेन गड.

१. गणेश गड.
१. खळ गड.
१. बिदनूरकोट
१. मलकोल्हारकोट.[11]

---

१. 'पालेकोट' की० 'पालेकोट' सा० २. २. 'चंजिबराकोट' की०. ३. 'सामारगड' की० ४. 'कोलबालगड' की० ५. 'नुम (जुम) दुर्ग' सा० २. ६. 'निलगुपे निराग्र' सा० २. ७. 'नुरगुंद महगड' सा० २. ८. 'ब्राह्मणगड' सा० २. ९. 'हडसरपंतगड' सा० २. १०. 'वडचूर' सा० २. ११. 'मनकाल्हारकोट' सा०

१. महिपाळ गड.
१. मृगमद गड.
१. हातमंगळ गड.
१. मंचकप्रकाश गड.
१. भीमगड.
९

१. श्रीवर्धन गड.
१. आंबेनिराई गड.
१. बुधलाकोट.
१. माणिकगड.
१. नंदीगड.
९

१. ठाकूर गड.
१. सरस गड.
१. मल्हार गड.
१. भूमंडल गड.
१. बिरूटकोट.
९

२७

प्रांतचंदी

१. राजगड.
१. चैनगड.
२

१. कृष्णगिरी.
१. मदोन्मत्तगड.
२

१. आरवंळू गड.
१. कालाकोट.
२

६

प्रांत व चजाऊर[1] व अरणी

या प्रमाणें व आणखी कित्येक प्रांत, किल्ले हस्तगत जाले. कोठील पाळेगार वश जाले. शिवाय तुंगभद्रातीर, रामेश्वर पासून देखील गोंडवण, चांदें व वराड ह्या प्रांतांत नर्मदेपर्यंत चौथ, मोकासा अंमल बसऊन[2] चालला.

६. राज्याभिषेकास सर्वांचे अनुमोदन.

[तेव्हां आतां] सार्वभौमपद करण्यास, सिंहासन करण्यास, अधिकार जाला. दाहा कोटी खजीना संग्रह जाला, व मंत्री अष्टप्रधान करणें, यांचीं लक्षणें [जशीं] शास्त्रीं तसे [प्रधान] प्राप्त जाले. सैन्य, अश्व, गज, रथ, पदाती चतुरंग [सैन्य] पाहिजे तसें सिद्ध जालें. आपले पूर्वज पूर्वी पासून छत्रसिंहासनयुक्त राज्य करीत आले. त्या कुळीं आपण येऊन त्या सिसोदे कुळींचे धर्म दुष्ट यवनांचें पारिपत्य, त्यांचें न म्हणवितां करणें हे श्रीनीं

१ या प्रांताखाली गड–कोटांची नावे कोणत्याही प्रतीत नाहीत. २ ‘बसून महाराजांचा चालला’ की० ‘चौथ मोकासा अंमल चालला’ सा० २.

कृपा करून श्री सांबानीं व श्री भवानींनीं [आपले-हातें] चालविले. कुलधर्म जतन केला. आरसिंहाचे[१] वंशज छत्रसिंहासन करून राज्य उदापुरीं[२] करीत आहेत, व आपले कुळींचे पुरूष कच्छभूज व नेपाळ येथील[३] राजे राज्य छत्रसिंहासन करून करीत[४] आहेत. आपण हें राज्य दक्षिण प्रांतींचें प्रतापें सोडविलें. श्री महाराणा सजणसिंह यांचे वंश आपण. [तस्मात] छत्रसिंहासन प्रथम करून राज्याभिषेक-युक्त [होत्साते] पूर्वयुगीं राजे धर्में व नीती करून राज्य करीत आले तसें [आपण] करावें म्हणून महाराजांनीं दृढ संकल्प केला.[५]

राज्य करण्यास अंगें सात-राजा व प्रधान व तिसरें राष्ट्र, दुर्ग[६] व कोशबल हीं दोन्ही [आणि] सुहृद्बल व सेना. हीं सात अंगें असावीं तशीं सिद्ध जालीं. या उपरि सिंहासनाधीश्वर म्हणवावें, ऐसें चित्तांत आणून श्रीस प्रार्थना केली. श्रीनींही स्वप्नगत दृश्य होऊन "तुजला वर दिल्हा तसेच त्या कुलांत अंशभूत होऊन धर्म वृद्धिंगत केला, सिंहासनाधीश होणें हाही हेतू पूर्ण करितों," ऐशी आज्ञा जाली. आश्वासन जालें. त्या नंतर मातुश्रीस विनंती केली, त्यांची आज्ञा घेतली. श्रीरामदासस्वामींकडे कारकून पाठविले, विनंती केली, त्यांनीं अनुमोदन दिल्हें. आणि 'कार्यसिद्धी होईल' ऐशी आज्ञा[७] जाली. चिंचवडींचे[८] देव, तुकाराम बावा [यां]कडे[८] कारकून पाठवून त्यांची आज्ञा आणिली आणि सर्व राज्यांतील मोठे पंडित, विद्वान, व वैदिक प्रतिष्ठित ब्राह्मण बोलावून शिबिकादी यानें पाठवून आणिले. सर्व सरकारकून व सरदार जमा केले. आप्त सुहृत्संबंधी, इष्टमित्र यांस आणून, सभा करून आपले मनोगत, "या उपरि या अन्वयें छत्रसिंहासन करावें ऐसें आहे, याचा विचार कसा करावा?!" म्हणून प्रश्न केला, आणि सर्वांचें अनुमोदन घेतलें. राज्याभिषेक करावा ऐसें सिद्ध जालें.

---

१. 'आरसीसिंह की०. २. 'मुद्रापुरीं' 'सा० व को०. ३. याऐवजी 'हे' सा० सा०२ व को०. ४. 'करिता आहेत' सा०. ५. 'करून' सा० सा० २ व को०. ६. याऐवजी 'मंत्रबली' सा० २. ७. आज्ञा-आशीर्वाद. ८. 'इतर साधूंकडे' की०. चिंचवडींचे देव म्हणजे सुप्रसिद्ध सत्पुरुष मोरया गोसावी यांचे वंशज. या वंशात अनेक सिद्धपुरुष होऊन गेले म्हणून हा वंश देव या नावाने ओळखला जाऊ लागला. मराठेशाहीत या घराण्यास मोठा मान असे. (पुरंदरे दप्तर ३. पृ. ११२).

७. गागाभट्टास आणावयाची आज्ञा.

[पुढें] शिष्टसंमतें विचार करितां "राज्याभिषेकास आदौ व्रतबंध होऊन पुढें सर्व विधी जाले पाहिजेत; त्यास श्रीकाशी व पैठण व सर्व क्षेत्रें यांची शिष्टमंडळी यांचे विचारावांचून येथें सिद्ध कैसें करावें?" ऐसा विचार पडला. सर्वही सरकारकून यांस विचार कसा करावा, ऐसें प्राप्त जालें. ते समयीं बाळाजी आवजी चिटणिवीस यांनीं उठोन विनंती केली जे, "सर्व जे जे मनोरथ स्वामींनीं केले ते ते दुर्घट [असतांही] घडले. याचें [च] काय अशक्य आहे? चार[1] वेद, साहा[2] शास्त्रें असें [ज्यांचें] अध्ययन [असे] श्रीकाशींत मुख्य भटांचें घर [आहे.] धर्मवृत्तिग्रंथ[3] त्यांजपासून उत्पन्न होतात. तेच धुरीण पंडित गागाभट्ट अनायासें पैठण येथें महाराजांची कीर्ती श्रवण करून आले आहेत. त्यांस व पैठणचे पंडित [यांस] आणून त्यांचे विचारें सिद्धता करावी." याजवरून त्यांस उद्योग करून आणावयाची आज्ञा जाली. तेव्हां सर्वांचेंही संमत आणावें ऐसें जालें.

८. 'मुहूर्तकाल योजावा ऐसें सांगितलें.'

याजवरून केशव पंडित व भालचंद्रभट पुरोहित हे बाळाजी आवजीचें गुरुस्थान, व सोमनाथ भट कात्रे त्यांचेच आश्रित, यांस दाहा हजार रुपये व पालख्या देऊन बावांस व पैठणकर [यांस] आणावयास रवाना केलें. त्यांणीं जाऊन महाराजांचा उद्योग, मनोरथ त्यांस समजाऊन त्यांस व पैठणकर पंडितांस एकवाक्यता केली. आणि उदापूर, जयपूर येथें राज्याभिषेक विधी होतो त्या प्रमाणें करावेंसें सिद्ध करून घेऊन रायगडीं आले. महाराज सामोरे जाऊन बहूत सत्कार केला. आदर करून ठेवले आणि इकडील सर्व थोर थोर ब्राह्मण व व मुत्सद्दी [यां] सहवर्तमान सभा केली आणि विचार केला कीं, "हे उदापूरचे[4] राणाजींचे घरांतील[5] वंश, सिसोदे कुळपरंपरा पुरुष, पिढ्या लाऊन, या प्रांतीं हिंदुस्थानांतून आले. रजपूत राजवंश महाराष्ट्र देशीं 'म्हराठे' म्हणवितात.

---

१. चार वेद-ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. इतिहासपुराण हा पाचवा वेद. २. साहा शास्त्रे—छंद, निरुक्त, व्याकरण, ज्योतिष, शिक्षा व कल्पसूत्र (धार्मिक विधी, आचार इ.). ३. धर्मवृत्ती—धर्माचरण. ४. 'याबद्दल उदाजीचे राणाजीचे' की०. ५. 'घराणेंतील' की०.

उदापूर, जयपूर येथें राज्याभिषेक, सिंहासन, व्रतबंध होत येतात. जैसिंग यांणीं श्रीकाशीक्षेत्रादी ठिकाणचे ब्राह्मण नेऊन अश्वमेध केला. हा सर्व निर्णय ते समयीं जाला आहे. त्या अन्वयें राज्याभिषेकांग व्रतबंध करून अभिषेक करावा. हे त्यांचे[१] कुळींचे. यांस छत्रसिंहासन अधिकार चाललाच आहे. महाराजांचे वय शेचाळीस वर्षांचें, पुत्र दोन जाले असतां अभिषेकाचे पूर्वांगीं व्रतबंध करावा," ऐसें सिद्ध करून सर्व पंडितजन ब्राह्मण यांचें संमत[२] जालें, सांगितलें. आणि मंत्री लक्षणयुक्त व अभिषेकसंभार साहित्य, समुद्रोदकें, व महानदींचीं[३] पुण्योदकें गज, अश्व सुलक्षणीक व स्थलें कशीं करावीं, ब्राह्मणभोजन लक्षावधी करावें, व्याघ्रादिचर्में व सुवासिनी, कन्या, सुवर्णकलश, पीठ व सिंहासनादी करण्याचा विधी सांगितला असतां, महाराज बहूत संतुष्ट होऊन राज्याभिषेकास मुहूर्तकाल योजावा ऐसें सांगितलें.

९. आमंत्रणाची पत्रे.

सुमुहुर्ताचा नियम शास्त्रीं आहे तो काढिला. पाहाणार ज्योतिषी, गणक,[४] सिद्धांत—वक्ते, परमविचक्षण, निपुण ऐसे तीन असावे. याहून उणे नसावे, अधीक असतील तितके यथासंभव[५] असावे. त्यांणीं विचार करून दक्षिणायन[६] वर्ज, त्यांतही अवश्य कर्तव्यच आलियास कार्तिक, मार्गशीर्ष व पौष हे घ्यावे. उत्तरायणीं[७] चैत्र व अधिक मास व पर्जन्यकाल नसावा.[८] वरकड युक्त आहेत. नक्षत्रांत ध्रुव[९] नक्षत्रें व विष्णुनक्षत्रें[१०] घ्यावीं.[११] याप्रमाणें योग[१२]—करणादी[१३]

---

१. 'त्याच' सा०. २. संमत (वि०)[सं० सम् + मन्]—मान्य. 'संमतो ऽयमर्थः अमुक अमुक पंडितस्य (भट्टस्य)' हा प्रघात. ३. 'महानद्यांचीं' की०. ४. गणक (पु०)—कुंडली मांडणारा ज्योतिषी. 'गणना' सा० व को०. ५. 'यथासंभव त्याणीं विचार करून' हा सर्व प्रतींचा पाठ. ६. दक्षिणायन (न०) [सं० दक्षिण + अयन (सूर्याचे गमन)—कर्क संक्रांतीपासून मकर संक्रांतीपर्यंतचा काळ. 'दक्षणावायनें' सा० व० को०. ७. उत्तरायण (न०)—मकर संक्रांती ते कर्क संक्रांतीकाल. (माघ ते आषाढ). ८. न यावा सा० व को०. ९. ध्रुवनक्षत्र—रोहिणी आणि तिन्ही उत्तरा. १०. विष्णुनक्षत्र—श्रवण किंवा धनिष्ठा. ११. 'असावीं' की०. १२. योग (पु०) [सं० युज्]—विशिष्ट तिथी, वार व नक्षत्र यांचे साहचर्य. १३. करण (न०) [सं० कृ]—१. बव २. बालव ३. कौलव ४. तैतिल ५. गर ६. वणिज ७. विष्टि ८. शकुनी ९. चतुष्पाद १०. नाग व ११. किंस्तुघ्न. दर तिथीस दोन करणे असतात.

योग्य असा निश्चय करावा. त्या प्रमाणें पाहून सर्वमतें आनंदनाम संवत्सर, ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी सिद्ध केली. आणि संपूर्ण क्षेत्रें [येथील] व प्रतिष्ठित ब्राह्मण व मांडलिक राजे, इष्टमित्र,[१] सर्व राज्यांतील सेवकजन यांसि येण्याविषयीं पत्रें आमंत्रणाचीं लेहविलीं.

१०. रायगड–समारंभाचे स्थान.

समारंभास स्थानाची योजना. मुख्य सिंहासन राजधानी करणें यासि पुण्यदेश, पुण्यभूमि पाहून आसमंताद्भागीं पुण्यक्षेत्रें व महानदी व स्थानीं[२] स्थानीं विपुल उदक, कृत्रिम सरिता म्हणजे पाट नहर[३] यांचें[४] उदक, सर्व धान्यें त्याच देशीं व्हावीं, ऐसें स्थान व शत्रूंस दुःसाध्य असावें. याजवरून रायगड[५] ही जागा सर्व राज्यांत दुःसाध्य व श्रीकृष्णा समीप, सर्व उत्तम लक्षणें आहेत पाहून योजिली.[६] तेथें सिंहासनास सभा करविली, ज्या सभेंत सहस्रावधी मनुष्यें बसावीं, त्यांसि शीतोष्ण बाधा न व्हावी, चित्रविचित्र स्तंभ व अष्टप्रधानांचीं स्थानें व भिंती वगैरे परम रमणीय ऐसें करवून त्यांस उल्लोच[७] व वितानें म्हणजे चांदवे चांदण्या सुवर्णमय वस्त्रें किनखाप, बादली ऐशीं[८] करविलीं. पटल म्हणजे पडदे[९] किनखापी करविले. सिंहासनाचें स्थान तेथें सुवर्णाचे स्तंभ चार-त्यांत चांदवा अमोल्य[१०] जरी. त्यास मुक्ताफळांचे गेंदांचे घोस. ऐसे बहूत चांगलें सभास्थान करून सर्व राजमंदिरें त्यांस चित्रें, रंग देऊन जागां जागां उत्तम स्थळें केलीं. थोर थोर ब्राह्मण व मांडलिक राजे येतील त्यांस स्थळें निराळीं निराळीं योग्य अशीं करविलीं—आणि मोठे विस्तीर्ण मंडप सभेस व भोजनशाला वगैरे[११] केलें. सर्व राज्यांतील गुणिजन, वारांगना कलावंत,[१२] गायक, वाद्यें वाजविणारे बहूत कुशल तितके आणिले.–कुंडमंडपविधी करून होमशाळा, अभिषेकस्थान परम निपुण श्रोत्री[१३] ब्राह्मण धुरीण[१४] यांजपासून परम रमणीय असावें तसें करविलें.

---

१. 'इष्टमैत्र' सा० व को०. २. 'त्या स्थानीं' सा० २ व की०. ३. नहर (पु० अ०) –कालवा. ४. 'यांचीं उदकें' की०. ५. रायगडीं' सा० व को०. ६. 'योजिला' (सर्व प्रतींत). (रायगड हा जागा) योजिला. ७. उल्लोच (पु० सं०)–छत; चांदवा. ८. 'ऐशा करविल्या' की०. ९. यानंतर 'ऐसे' सा० को० व की. १०. अमोल्य–अमूल्य या अर्थी. ११. 'वगैरेस' की०. १२. कलावतें' की० 'कलावातें' सा० २ व को०. १३. श्रोत्री (य) (पु.) [सं० श्रुति]–वैदिक ब्राह्मण. १४. 'धुरण' सा० व को०.

११. भोजन साहित्याची तरतूद.

[आतां] बहुत[1] जन येणार त्यांस दुर्गाखालीं स्थळें, ब्राह्मणभोजनास एक एक स्थळीं पांच पांच हजार ब्राह्मणांची पंक्ती व्हावी, ऐशीं दाहापांच स्थळें निराळीं निराळीं [असावीं.] त्यांस मंडप व पारपत्यगार,[2] पाककर्ते व वाढणार [ठेवून] व तरतूद करून दोन प्रहरीं ब्राह्मणभोजनें होत असावीं. दिव्य षड्रस अन्न[3] नित्य नूतन उत्पन्न होत असावें, असें करविलें. तसेंच किल्लयावर पांच सहस्र ब्राह्मणभोजनाचें स्थान व दाहा सहस्र सुहृद आप्त यांचे भोजनाचीं स्थानें करविलीं. तसेंच लक्षावधी ब्राह्मणभोजन, आप्त व राजे मांडलिक व सेवकजन व शिष्ट समुदाय यास अमूक पदार्थ नाहीं किंवा न्यून पडला, सरला असें न व्हावें, ऐशी आज्ञा करून धान्याचे व साहित्याचे पर्वतप्राय [ढीग[4] करविले.] इच्छिला पदार्थ, ज्यांणीं जो मागितला तो सिद्ध तत्काल [व्हावा], कोणाएकास आबालवृद्ध यांचा सत्कार नाहीं जाला असें, चुकोन राहिलें असें, साहित्य न्यून पडलें असें, न होतां करणार अध्यक्ष अधिकारी एक एक पदार्थास एक एक अधिकारी [करविले.] एकएक कारखानाच पदार्थांचा, व कर्मै यांस एकएक अधिकारी व मनुष्य, त्यांजवर एक सर्वाध्यक्ष असे योजून करऊन देविले.

१२. 'अधिकार नेमून दिल्हे.'

सर्व सरकारकून व सरदार व सुभेमामले,[5] कारकून लोक व सेवक लोक असें दाहा पांच लक्ष माणूस जमा जालें. पन्नास हजार ब्राह्मणसमुदाय जमा जाला— सर्वांसही मोठा हर्ष–उत्कर्ष! ज्यास जे अधिकार नेमून दिल्हे, सांगितले ते बहूत सावधपणें तिळमात्र न्यून पडों न देतां प्रथमपासून सिंहासनारोहणापर्यंत कोणतेही दिवशीं प्रातःकालापासून सायंकाळपर्यंत काय व्यवहार होणें, त्यांचें साहित्य काय, कोणास काय देणें याचे नेम करून, जाबते लिहून, पुन्हा गलबल 'द्या' 'घ्या' म्हणावयाची एकही पडूं नये ऐसें करून, ज्याचें

१. 'बहुतजण' की०. २. पारपत्यगार (पु०) [सं० परिपति (रक्षक)+फा० गार]—व्यवस्थापक ३. 'असें असावीं की०. ४. 'डेरे करविले' की०. ५. 'सुभेदार मामलेदार' की०.

त्याजपाशीं देऊन, तिळमात्र गरगशा[1] अथवा बोभाट[2] न पडतां तो दिवस सिद्धीस जावा, ऐसें करून दिल्हें.

१३. यथाविधी समारंभ.

व्याघ्रचर्में, मृगचर्में आणविलीं. समुद्र [उदक] व पुण्यनद्योदकें[3] आणविलीं. सर्व संभार सिद्ध जाला. आणि मुहूर्ताचे समारंभाचे दिवसापूर्वी सात[4] दिवस पूर्वांग[5]-शांति-यज्ञ होणें ते ज्येष्ठ शुा षष्ठीपासून त्रयोदशीपर्यंत नेमले-प्रथम ज्येष्ठ शुा चतुर्थीस व्रतबंधाचे समारंभास प्रारंभ होऊन पंचमीपर्यंत यथाविधी व्रतबंधन[6] जालें. ब्राह्मणभोजन लक्ष ब्राह्मण दोन दिवसांत जाले. तदंग दक्षिणा सर्वांस एक रुपयाप्रमाणें दिल्ही[7]. पंडित, वैदिक, शिष्ट यांची संभावना यथायोग्य जाली —त्यानंतर षष्ठीस प्रथम पटबंधनविधी करून, ऋत्विजवर्णन[8]-पुण्याहवाचन-पूर्वक यज्ञास प्रारंभ करून, विनायकशांती आदौ केली. सात दिवस अग्नीचीं चिन्हें पाहाणें वगैरे करविलीं.[9] सर्वही कार्य निर्विघ्न[10] होतें जालें. महाराज व ऋत्विज निरशन, व्रतस्थ घृत पय फळें [यांचा] आहार करून नक्षत्रशांती व ग्रहशांती, ऐंद्रीशांती व पौरंदरी शांती यथाक्रमें करून राज्याभिषेकांगविधी सांगितले तसे करवित जाले. सात दिवस ब्राह्मणभोजन नित्य पन्नास सहस्र जालें. सर्व जन समारंभास आले, त्यांस मिष्टान्नें करून आदर-आतिथ्य, सत्कार व शिष्टांचे सत्कार जाले. नित्य सभा, गीत, मंगल वाद्य, भेरी[11] [असा] समारंभ[12] अत्यद्भुत, किमपि व्यंग व प्रायश्चित न पडतां सांग जाला.

१४. 'अभिषेकास प्रारंभ जाला.'

या प्रकारें करून त्रयोदशीचा दिवस प्राप्त जाला असतां, अष्टप्रधान करण्याची

---

१. गरगशा (पु०) [फा- घर्धशा]-गोंधळ; गलबल (ध्व०). २. बोभाट (टा) (पु०) [सं० वि+आ+ह्वे > बोबह-बाह (यादवकालीन) > बाभा [अर्वाचीन]-हाकाटी. ३. नद्योदकें-व्याकरणदृष्ट्या 'नद्युदकें' असे हवे. ४. 'दिवस सात दिवस' सा० सा० २ व को० 'समारंभाचे पूर्वी सात दिवस' की०. ५. पूर्वांग (न०)-मुख्य कर्मापूर्वीचे कर्म. ६. 'व्रतबंधनें जालीं' सा० व० को०. 'व्रतबंधन झालें' की०, ७. 'दिल्हे' सा० व को०. ८. वर्णन-व्याकरणदृष्ट्या 'वरण' [सं० वृ] असे हवे. ९. 'पाहाणें करविलें' (प्रशस्त). १०. 'निर्विघ्न कार्य' सा० व को. ११. भेरी (स्त्री० सं०)-मोठा नगारा. १२. विशेष्यानंतर विशेषण.

योजना करून आठ सिद्ध केले. लेखकद्वय-एक पत्रलेखक व एक गणकलेखक-ऐसे योजिले. ऋत्विज, छंदोगामात्य,[1] प्रधान व द्वादश कोश, बारा महाल व अष्टादश शाला कारखाने यांचे अधिकारी, देशाधिकारी नगराधिकारी ऐसे सर्व पृथगाकारें योजिले. सर्वांसही मंगलस्नानें करवून महाराजांनीं मंगलस्नान केलें. विधियुक्त मृत्तिकास्नान, पंचगव्यस्नान व गंगादिपुण्यतीर्थादकें यांनीं व पंचामृतस्नानें केलें. सर्वांनीं शुभ्र वस्त्रें, गंधपुष्प, अलंकार करून व महाराज[2] शुभ्र वस्त्रें, अलंकार, पुष्प परिधान केले. आणि क्षीरवृक्षाचें[3] आसन सवा हात उंच व रुंद ऐसें करून, तें सुवर्णें करून मढून,[4] त्याजवर [त्यांनीं] आरोहण केलें. पट्टराणी यांसि पटबंधन करून सोयराबाई[5] साहेब बसलीं.[6] संभाजी महाराज समीप बसले. पूर्वेस मुख्य प्रधान ब्राह्मण ते मोरोपंडित प्रधान पिंगळे हातीं सुवर्णकलश[7] घृतपूरित घेऊन उभे राहिले. दक्षिणेस क्षत्रियप्रधान असावे ते सेनापती हसाजी[8] हंबीरराव मोहिते रौप्यकलश दुग्धपूर्ण घेऊन उभे राहिले. पश्चिमेस निळोपंत यांचे पुत्र रामचंद्रपंडित अमात्य ताम्रकलश[9] दधिपूर्ण घेऊन उभे राहिले. उत्तरेस छंदोगामात्य प्रधान रघुनाथपंडितराव सुवर्णकलश मधुपूर्ण घेऊन उभे राहिले. त्याजपाशींच मृत्तिकाकुंभांत समुद्रजल व महानद्यांचें[10] जल [घालून] कृष्णा, गोदा, यमुना, गंगा यांचे उदकें करून पूर्ण ऐसा [तो कुंभ] ठेविला. उपदिशांचे[11] ठायीं क्रमें करून अग्निकोनास अण्णापंडित सचिव प्रधान छत्र घेऊन उभे राहिले. नैर्ऋत्यभागीं जनार्दनपंडित हणमंते सुमंत प्रधान व्यजन पंखा घेऊन उभे राहिले. वायव्यकोनास दत्ताजीपंडित मंत्री प्रधान चामर घेऊन उभे राहिले. ईशान्य भागीं न्यायाधीश सोनोपंत यांचे पुत्र बाळाजीपंडित न्यायाधीश दुसरें चामर घेऊन उभे राहिले. सन्मुख सव्य भागीं पत्रलेखक बाळाजी आवजी लेखनपात्र[12] घेऊन उभे राहिले.

---

१. छंदोगामात्य (पु०) [सं० छंदोग+अमात्य]–सामसूक्तें म्हणणारा. पंडितराव. २. प्रथमान्त कर्त्याचे वाक्य कर्मणि प्रयोगात. 'महाराजांनीं' की० 'महाराजास' सा०. ३. क्षीरवृक्ष (न०)–दुधासारखा चीक निघणारे झाड. उंबर. ४. मढून–मढवून. ५. 'सर्वबाई' सा० 'सर्वाबाई' को० 'सईबाई' की० व सा० २. पण यापूर्वीच म्हणजे 'शके १५८१ विकारी संवछर सईबाईस देवआज्ञा जाली' (जे. श.). ६. 'वसली' की०. ७. विशेष्यानंतर विशेषण. ८. 'हसाजी बहिरव' को०. ९. विशेष्यानंतर विशेषण. १०. महानद्याजल' की०. ११. उपदशेचे' सा०. व को० 'उपदशीचे' सा० २. १२. 'लेखनपत्रें' को० 'लेखनपत्र' सा०.

वाम भागीं सन्मुख गणकलेखक चिमणाजी आवजी लेखनपात्र घेऊन उभे राहिले. आसमंताद्भागीं सर्व कोश व शाला यांचे अधिकारी उभे राहिले. मध्यें शिष्ट ब्राह्मण, पंडित, वैदिक, श्रोत्री, प्रतिष्ठित उभे राहिले. सुहृद व मांडलिक राजे भोंवतें उभे राहिले. आणि अभिषेकास प्रारंभ जाला. यथाविधी मंत्रोक्त प्रकारें प्रधान, ब्राह्मण व पुरोहित ऋत्विजसह सुवर्णाचीं पात्रें शतच्छिद्र करून, त्यांत स्थापित उदकें करून व प्रधान द्रव्यकलश घेऊन उभे राहिले. त्यांसहवर्तमान अभिषेक केला. ते समयीं मंगल वाद्य, भेरी, गायनादी समारंभ [जाला.] सर्वही आकाश पृथ्वी [हीं] शब्दें करून पूर्ण जालीं[1]!

१५. सिंहासनावर आरोहण.

नंतर मंगलालंभन[2] [करून] सुवासिनींनीं आरती केली. आणि कांस्यपात्र[3] घृतपूरित त्यांत मुख पाहिलें, व आदर्शांत मुख पाहून ब्राह्मणांस दक्षिणासह दानें[4] दिल्हीं. आणखी शुभ्र वस्त्रें अलंकार परिधान करून तदनंतर सिंहासनारोहण[5] करण्याचा मुहूर्त घटिकादी स्थापना केली होती, [तो साधिला.] सिंहासन—सभा केली. तेथें क्षीरवृक्षांची वेदी वट, औदुंबर यांची करावी तशी करून, त्या ठोकळ्यास सुवर्णें करून तगडें[6] मढून रत्नखचित केलें. प्रमाण आहे तर्ते त्याजवरि चित्रें प्रथम वोळ[7] वृषभांची, त्याजवर मार्जार [यांची] त्याजवरि तरसांचीं, त्याजवरि सिंहांचीं, त्याजवरि व्याघ्रांचीं. ऐशीं एक बाजूस आठाप्रमाणें बत्तीस बत्तीस चित्रें चहूंकडे मिळोन काढून [ठेविलीं.] त्यास सिंहासन ऐसें म्हणावें. तसें सिद्ध केलें होतें. त्याजवरि मृगचर्म घालून कांहीं सुवर्णादि द्रव्य घालावें. त्याजवरि व्याघ्रचर्म घालून त्याजवरि कार्पास-आसनें, मखमलीचीं मृदू ऐशीं घालून, बादली जरी वस्त्रें घालून, उपबर्हण[8] म्हणजे लोड,[9]

१. 'जाले' को० सा० व सा० २. २. 'मंगलस्नान' की० ३. कांस्यपात्र (न० सं०)–कासे (जस्त व तांबे मिश्रित) या धातूचे पात्र. ब्रांझ. विशेष्यानंतर विशेषण. ४. 'दोन दानें' की० या दृष्टीने घृतपात्र व आदर्श. 'ब्राह्मणास दक्षिणा दिल्ही' सा० २. ५. 'सिंहासनावर आरोहण' की० 'सिंव्हासनीं आरोहण' सा० २. ६. तगडें (न०) [फा० तख्त्]–सुवर्णादि धातूंचा पातळ पत्रा; वर्ख. तक(ग)ट. 'तिकटें मढवून' की०. ७. वोळ (ओळ) (स्त्री० [सं० आवलि]–रांग; मालिका. विशेष्यानंतर (षठ्यंत) विशेषण. ८. उपबर्हण (स्त्री०) [सं० उपबर्ह]–उशी. ९. 'लोडें' की०.

तक्ये,[१] मागें प्रभावळ करून त्यास छत्र, त्याजवरि मंडप, चांदवा[२] सुवर्णमय वस्त्राचा, त्यास मुक्ताफळांचे घोस, ऐसें सुशोभित केलें होतें. उत्तम लक्षणी हस्ती व अश्व[३] [व] रथ सजवून, सुवर्णाचे अलंकार घालून, राजांगणीं सिद्ध असावे तसे आणिले. आरोहणमुहूर्त घटिका[४] लग्न नेमिलें, त्या लग्नावरि श्रीविष्णूची सुवर्णमय प्रतिमा करून, प्राणप्रतिष्ठा षोडशोपचारपूजन[५] करून, सव्य हस्ताचे ठायीं [तिची] स्थापना केली. तशीच घेऊन तिजसहवर्तमान[६] मुहूर्तघटिका पूर्ण होतांच, सिंहासनाचे ठायीं आधीं[७] सव्य जाऊन, सव्य[८] गुडघा ठेऊन,[९] नमस्कार करून, पाय न लावितां पूर्वाभिमुख आरोहण करावें तसें केलें. ते समयीं एकदांच भेरी व मंगलवाद्य, तोफा, सरबत्ती[१०] व नृत्य, गीत, वाद्य जयशब्द एकदांच होण्यास प्रारंभ जाला! तो नाद मोठा, गगनचुंबित शब्द होता जाला!! स्वराज्यांत किल्ले, दुर्ग यांस सूचना केली होती जे, एक किलियाच्या तोफा एकानीं ऐकतांच त्याणीं कराव्या. ऐसे सर्व राज्यांतील किल्ले, दुर्ग यांस एकदांच सरबत्ती जाली!!!

१६. 'आपला शक चालविला'.

यानंतर सिंहासनीं बसल्यावरि रक्तांबरें रक्त भूषणें सुवर्णमय बादली[११] परिधान केलीं. दिव्य माणकादी रत्नें, चौकडे, कंठ्या, माळा, शिरपेंच,[१२] तुरा, जेहेगा,[१३] पोंहच्या[१४] ऐसे अलंकार घातले. आणि विधिमंत्रें करून धनुष्यबाणपूजन व

---

१. तक्ये (पु०) [अ० तक्या]—मोठी उशी. २. विशेष्यानंतर विशेषण. ३. 'अश्वरथ' सा० को० व की०. ४. 'लग्नघटिका नेमिले' सा० सा० २ व को०. ५. षोडशोपचार (पु०)—देवाच्या पूजेचे सोळा प्रकार. आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र, यज्ञोपवीत (उपवस्त्र), गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, दक्षिणा, प्रदक्षिणा व मंत्रपुष्प. 'षोडशोपचार पूजन प्राणप्रतिष्ठा करून' सा० सा० २. को व की०. ६. 'त्यासहवर्तमान' सा० सा० २ को० व की०. ७. आधीं सव्य जाऊन—प्रथम (सिंहासनास) प्रदक्षिणा घालून. ८. 'सव्य जानु गुडघा' की०. ९. 'टेकून' सा० २ 'देऊन' की०. १०. सरबत्ती (स्त्री० फा०) —स्फोट. ११. बादली [वि० हिं०]—सूत, रेशीम व जर असलेले (वस्त्र). १२. शिरपेंच (पु०) [फा० सर्पेच्]—पागोटयाचा अलंकार. १३. जेहेगा (जेगा) (पु०) [फा० जीघा]—पागोटयाचा रत्नालंकार. १४. पोहच्या (पोची) (स्त्री० हिं०) —मनगटावरील अलंकार. 'झगा पोंच्या' की० 'जेगा पोंहच्या' सा० २.

खड्गचर्मपूजन[1] करून ते हस्ताचे ठायीं धारण केले. त्यासमयीं सुवर्णाचीं पुष्पें व रौप्यमय [पुष्पें] करून वृष्टी केली! षोडश सुवासिनी यांणीं मंगल आर्त्या, ब्राह्मणकन्या घेऊन, उभें राहून, कराव्या तैसें केलें. त्यांस वस्त्रें, भूषणें, अलंकार दिल्हे. नंतर सिंहासनाचे ठायीं बसल्यावरि मंत्रविधी करणें ते करून ब्राह्मणांचे आशीर्वाद घेणें ते घेतले. ऋत्विज, आचार्य व ब्राह्मण [यांचें] पूजन करून गागा भट्टजी यांस लक्ष रुपये दक्षिणा संभावना केली. वस्त्रें, भूषणें दिल्हीं. सर्व ऋत्विज यांस पांच पांच सहस्र रुपये दक्षिणा, वस्त्रें, अलंकार दिल्हे. पुरोहित [यांस] भूषणें उपाधीक[2] दिल्हें. शिष्ट मंडळी, पंडित, यांस कोणांस सहस्र, पांच शत, दोन शत ऐसे योग्यतेनुरूप [रुपये] दिल्हे. सर्व ब्राह्मणसमुच्चय यास देकार[3] पंचवीस रुपये प्रमाणें मेढा[4] करून तेथें [गडा] खालीं करविला. गोसावी, तडीतापडी,[5] गोरगरीब, भिक्षुक तितक्यांस देकार दोन, चार, पांच रुपये प्रमाणें देविला. किल्लया खालीं व वरतीं[6] देकार वाटणेस प्रारंभ एकदांच करविला. याप्रमाणें महाराज शालिवाहन[7] शके १५९६ पंधराशें शाहांणव आनंद नाम संवत्सरे, ज्येष्ठ शुा त्रयोदशी मंदवासरे सुमुहूर्तें छत्रसिंहासनाधीश्वर जाले. आणि राज्याभिषेक [झाला] त्या दिवसापासून आपला शक चालविला.

१७. सर्वांचे बहुमान केले.

सिंहासनारूढ होऊन त्या नंतर अष्टप्रधान यांस व दरखदार, महालदार, कारखानदार [यां] सर्वांस ज्याचे[8] जे अधिकारी त्यांस अधिकाराचीं वस्त्रें दिल्हीं. अष्टप्रधान यांचे दरख[9] करणें[10] [ते केले.] मुख्य प्रधान यांस व सेनापती यांस बादली वस्त्रें, पांच सनगें[11] व शिरपेंच, मोत्यांचे तुरे, कंठ्या, चौकडे, जगा[12]

---

१. खड्गचर्म–तरवार व ढाल. २. उपाधीक (न०) उपाध्यायास द्यावयाचे द्रव्य. ३. देकार (पु०) [दे (णें) + कार]–दान; दक्षिणा ४. मेढा (पु०) [सं० मेढि] –उभ्या लाकडांचा कोट. ५. तडीतापडी (पु०) [सं० तापसी–द्विरुक्ती–सामान्य अर्थी]–बैरागी. ६. 'वर' की० व सा० २. ७. 'शके १५९६ आनंद सं (व) छर ज्येष्ठ शुध १२ शुक्रवार— तीन घटिका रात्र उरली तेव्हा राजश्री सिवाजी राजे भोसले सिंव्हासनी बैसले' (जे. श.). ८. 'सर्व सभांचे' की०. ९. दरख (क)– (पु०) [अ० दरक्]–हुद्दे; अधिकार. १०. 'केले' की०. ११. सनगे (सणंग) (न०) –उंची वस्त्र. १२. जगा–जहेगा. 'झगे.' की०.

शिके[1]-कटारा व ढाल-तरवारा व चौघडे-नौबती व जरीपटके, हत्ती, घोडे व सोन्याच्या दांडीच्या चवऱ्या, या प्रमाणें देऊन पदें करारपत्रें करून दिल्हीं. अमात्य यांस बादली वस्त्रें, पोशाक, व ढाल-तरवार, चौकडा, कंठी, तुरा, शिरपेंच, शिके-कटार, रुप्याचें कलमदान[2] ताडीचे[3] व चवरी, हत्ती घोडा याप्रमाणें दिल्हें. सचिव पंडित यांस बादली वस्त्रें पोशाक, कंठी, चौकडा, तुरा, शिरपेंच, शिके-कटार, ढाल-तरवार, हत्ती, घोडा ऐसें दिल्हें. सुमंत व मंत्री यांसही पोशाक दागिने सदरहूप्रमाणें ढाल-तरवार हत्ती, घोडे, चवऱ्या दिल्ह्या. पंडितराव यांस बादली पोशाक, शिरपेंच, कंठी, चौकडा, तुरा, चवरी, हत्ती, घोडे याप्रमाणें दिल्हें, व न्यायाधीश यांस त्या अन्वयें दिल्हें. तीं[4] पदें बहुमान घेऊन त्यांनीं महाराजांस नजरा करून मुजरे[5] केले. बाळाजी आवजी यांस चिटणिशीचीं वस्त्रें मंदील,[6] दुमजला[7] दुपेटा, झगा, विजार, कंठी शिरपेंच, चौकडा, रुप्याचें कलमदान पेटीचें, चवरी व घोडा याप्रमाणें दिल्हें. तसेंच चिमणाजी आवजी [यांस] फडणिशीची[8] वस्त्रें कलमदान ताडीचें दिल्हें. त्यांणीं मुजरे केले. अष्टप्रधान यांस स्वारीस जाणें, तालुके राखणें, तेथें राहाणें यास्तव सर्वांस मुतालिक[9] करून दिल्हे. त्यांस वस्त्रें बहुमान दिल्हे[10]. वरकड महालदार, खानदार यांस ज्याचीं त्यास अधिकाराचीं वस्त्रें दिल्हीं. शामजी नाईक पुंडे यास पोतदारीचीं वस्त्रें दिल्हीं बाळाजी रघुनाथ, सबनीस फौजेचे, यांस बक्षीगिरीचीं,[11] वस्त्रें, ढाल-तरवार, कलमदान ताडीचें, ऐसें दिल्हें. वरकड सरदार मातबर फौज वागवणार मानकरी यांस जशी ज्याची योग्यता तशीं कोणास साडे तीन सनगें, कोणास दोन, कंठ्या, शिरपेंच ऐसें योग्यतेनुरूप [दिल्हें.] या प्रमाणें सर्वांचे बहुमान नेमून देविले.

---

१. शिके-कटारा (शिक्के-कटयार) (स्त्री० फा०)-अधिकारचिन्हे. २. कलमदान (न०) [अ० कलम्+फा० दान्)-लेखण्यांची पेटी. विशेष्यानंतर विशेषण. ३. ताडीचे-ताडवृक्षाचे ? ताडपत्रे असलेले ? ४. 'ते' सा० व को०. 'त्यांनीं पदें बहुमानें घेऊन' की०. ५. मुजरा (पु०) [अ० मुज्रा]-वन्दन. ६. मंदील (पु० न०) [अ० मिन्दील्]-जरीचे पागोटे; फेटा. ७. दुमजला-दुहेरी काठाचा. ८. फडणीस (पु०) [फा० फड+नवीस]-फडाचे (दफ्तरखान्याचे) लिहिणे करणारा. ९. मुतालीक (पु०) [अ० मुतअल्लिक्]-कारभारी. १०. यानंतर 'राजाज्ञा पद शंकाजी नीळकंठ महागांवकर यांस दिल्हें.' की०. ११. बक्षीगिरी (स्त्री०) [फा० बख्शी+गिरी]-पगारवाटणी.

१८. महाराजांची मिरवणूक

[नंतर] मुजरे नजरा घेऊन घोडा सुलक्षणिक[१] सोन्याचें जडावाचें सामान बादली, मोत्यांची झालर, ऐसा साज करून आणिला.[२] त्याजवर आरूढ होऊन, राजांगणांत येऊन सोन्याची अंबारी व तीस[३] मोत्यांचे अलंकार, जरी बादली[४] गाशे[५], झालरा ऐसा हत्ती सज्ज करून आणिला [होता.] त्याच्या अंबारींत बसले. हत्तीचे मस्तकीं सेनापती एक मोर्चेल व अंकुश घेऊन बसले. पाठीमागें मुख्य प्रधान खवाशींत[६] मोर्चेल घेऊन बसले. वरकड अष्टप्रधान, दरखदार, यांस निराळ्या निराळ्या अंबाऱ्यांत बसविलें. कोण्ही हौद्यांत,[७] कोण्ही घोड्यावर, याप्रमाणें खासे अंबारीचे पाठीमागें चालणार तितके सरदार वगैरे [वाहनांवर] बसून[८] चालले. सर्व रस्ते, घरें रंगविलीं [होतीं.] ध्वज, पताका, तोरणें लाविलीं [होतीं.] मार्गांनीं झाडून, सडे घालून रांगोळ्या घातल्या [होत्या. असे मार्ग] अलंकृत करविले [होते.] सर्व नगरदेवता यांच्या पूजा यथासांग नैवेद्य, धूप, दीप ऐसे करविले [होते.] त्यामागें करून, पुढें जरीपटका[९] व भगवें निशाण यांचे हत्ती[१०] दोन; त्यामागें प्रधान व सेनापती यांचे पटक्यांचे हत्ती, सर्व फौजेंतील निशाणें, त्यांजबराबर हुजूर पागा; करवल लोक, घोडे सोने रुप्याचे सामानाचे, बंदुखा अमोल्य, उत्तम वस्त्रें, आभरणें करून युक्त ऐसे शूर व सेनाधुरंधर पदाचे अधिकारी बिनी[११] संरक्षणार, त्यांजबराबर चालले. तोफा गाड्यांवरि चालणार स्वारींतील व रथ अश्वांचे व गाड्या, त्यांचे मागें नाना प्रकारचे शूर अश्वांवर व गजांवर बसणार चालले. त्यांचे मागें नाना प्रकारचे पदाती पटेकरी, विटेकरी, सांग[१२] बरची-बाणकरी चालले. खासबारदार बंदुखीचे लोक रणवाद्यें तासे, मरफे[१३]

---

१. 'सलक्षणिक' सा० व० को०. विशेष्यानंतर विशेषण. २. 'आणिलें' सा० सा० २ व को०. ३. 'त्यास' (सर्व प्रतींत). या दृष्टीने संबंध हत्तीकडे. ४. जरी बाबगाशे' की०, 'जरीबादगासे' सा० २ जरी बाहगास झालरा' सा व को०. ५. गाशा (पु०) [अ० घाशिया]–पातळ गादी. ६. खवाशी (स्त्री०) [अ० खवासी]–मानकऱ्याची जागा. ७. हौदा (पु०) [अ० हौदज्]–हत्तीवरील कठडेदार जागा. ८. 'बसून चालविले' की०. ९. जरीपटका (पु०) [फा० झर्+सं० पट्टिका]–मुख्य निशाण. १०. विशेष्यानंतर विशेषण. ११. बिनी (बिन्दी) (स्त्री०) [फा० बीनी]–आघाडी. १२. सांग (स्त्री० हिं०)–भाला. १३. मरफा (पु० फा०) –नगारा.

हलग्या[१] वाजवीत चालले. त्यांचेमागें कोतवाल[२] हत्ती पन्नास व सांडणीस्वार शंभर व बाणांच्या कैच्या[३] उंटावर [असे] चालले. त्यांमागें कोतवाल घोडे शेंपन्नास चालले. त्यांमागें नानाप्रकारचीं मंगलवाद्यें शाहजाने वाजविणार, काळू[४] सनया[५] [वाले] घोडियांवर बसून नगारची चालले. कर्णेकरी, बांके[६] शिंगें हीं सर्व रुप्याचीं, हे [फुंकणारे] चालले. त्यामागें धाडी[७] गाणार घोड्यांवर व भाट बंदिजन प्रताप वर्णन करीत चालले. त्यांचे मागें लग्या[८] निशाणें व बाणदार[९] जरी[१०] व तोमर,[११] भाले [यांचे] व बोथाट्यांचे[१२] लोक व चोबदार[१३] वेत्रधारी चालले. हत्तीवर बसले[१४] ऐसे शूर व मल्ल जेठी[१५] लोक चालले. त्यांचे— मागें महाराजांच्या हत्तीभोंवतें पायचे लोक, सरदार मावळे मोठमोठे पोशाक वस्त्रें अलंकार ऐसे सभोंवतें दुरून चालून, कांहीं अंतरेंकरून सर्व अष्टप्रधान, मुतसद्दी यांच्या अंबाऱ्या शेंपन्नास चालल्या. त्यांचे मागें फौजेचे लोक नेमिले तितकेच याप्रमाणें रस्त्यांतून मिरवत देवतादर्शन करून, त्यांस वस्त्रें, अलंकार, फळें, दक्षिणा देऊन पुन्हा रस्त्यानीं [जातांना] माडीवरून कन्या सुवासिनी मंगलआर्त्या, दधी, लाह्या, पुष्पें, दूर्वा यांची वृष्टी[१६] करितात!! ऐसे होत्साते [महाराज] राजद्वारीं येऊन, रथांत बसून राजांगणांत गेले. तेथून शिबिकेंत बसून सभाद्वारीं गेले. द्वारीं पूर्ण कलश, निंबलोण उतरून टाकिलें. त्यांस[१७] वस्त्रें अलंकार दिल्हे, आणि गृहप्रवेश करिते जाले.

१९. कुलदेवता व मातुश्री यांची पूजा.

आदौ गृहीं कुलदेवता [यांस] नमस्कार, पूजा करून, फल, तांबूल, दक्षिणा

---

१. हलगी (की) (स्त्री० अ०)–डफडी; खंजिरी. २. कोतवाल (वि०) [तु० कोताउल् फा० कोतवाल]–श्रृंगारलेले व बिनस्वारीचे. ३. कैची (स्त्री० तु०)–दारू भरलेली चोवीस बाणांची जुडी. ४. काळू (पु. स्त्री.)–सनई; चौघड्यातील टिमक्या. ५. सनई (स्त्री०) [फा० सूर्नाय्]–पिपाणीसारखे वाद्य. ६. बांका (पु०) (सं० वक्र]–कर्णा. ७. धाडी (पु०) भाट. ८. लगी (स्त्री०) [सं० लगुड]–निशाणे असलेल्या काठ्या. ९. बाणदार–बाणाईत; दारूचे बाण सोडणारे. १०. जरी [अ० जरि (रा) दा ?] –स्वतंत्र. ११. तोमर (पु० न० सं०)–गदा. १२. बोथाटी (स्त्री०)–लाकडी गोळ्यांची काठी. १३. चोब (प) दार (पु० फा०)–काठ्या, भाले घेणारे हुजरे. १४. 'बसलेले' की०. १५. जेठी (पु०) (सं० ज्येष्ठ)–पहिलवान. १६. भूतकाळार्थी वर्तमानाचा उपयोग. १७. त्यांस–कलशनिंबलोण करणारांस.

अर्पण करून, मातुश्रीस नमस्कार केला. राजपत्न्या यांणीं वोवाळिलें. त्यांस वस्त्रें, अलंकार अमोल्य देऊन सिंहासनाचे ठायीं येऊन बसले. सर्वांच्या नजरा घेऊन, सर्वांस विडे देऊन, निरोप दिल्हे. ब्राह्मणभोजनें जालीं. इष्टजन, आप्त, यांसहवर्तमान मिष्टान्नभोजन करून तांबूलभक्षण केलें. आप्त जनांस निरोप देऊन, मातुश्रींपाशीं बसोन "आपले आशीर्वादें मनोरथ सिद्धीस गेले," इत्यादी गोष्टी करून मातुश्रींची पूजा वस्त्रादि [कें] करून अंतःपुरांत गेले.

२०. गुणीजनादिकांचा सत्कार.

द्वितीय दिवसाचे ठायीं सर्व गुणिजन, कलावंतजन[1] यांस विपुल द्रव्य वस्त्रें देऊन संतुष्ट केलें. मांडलिक राजे व संपूर्ण[2] राष्ट्रजन यांस व पंडित शिष्टसमुदाय आले त्यांचे सत्कार भोजनादी करवून वस्त्रें भूषणें देऊन निरोप दिल्हे.

२१. पत्रे व जमाखर्च यांच्या पद्धती.

या प्रकारें महाराजांनीं राज्याभिषेकसमारंभ व तरतूद अत्यद्भुत केली! धर्मस्थापना करून राज्य करण्याचे धर्म, यवनाक्रांत पृथ्वी होऊन लोपले होते, ते पुन्हा जीर्णोद्धार करून[3] स्थापिले!! सिसोद्यांचे कुळांत उत्पन्न होऊन कुलभूषण [होत्साते] कुलधर्मस्थापना केली!!! पत्रें लिहिणें तीं "स्वस्तिश्री राज्याभिषेक [शक] घालून, क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिवछत्रपती स्वामी यांणीं समस्त-राजकार्य-धुरंधर व समस्त-सेना-धुरंधर अथवा राजमान्य राजश्री अथवा राजश्री, ज्याची जशी योग्यता व कोण्हास कसें ल्याहावें याची[4] पद्धती करून ल्याहावेसें केलें[4]. तसेंच जमाखर्ची लिहिणें, झडती, हिशेब लिहिण्यास यवनी नांवें मोडून, गजशाला, अश्वशाला, भंडारगृह[5], वसनागार, पाकशाळा ऐशीं नांवें ठेवून लिहिणें करावेसें[6] केलें. अष्टप्रधान यांचे व्यापार[7] पूर्वीची शास्त्रपद्धती काढून, चाली पाहून, केले.

---

१ 'कलवांतिनी' को० 'कलवांत' सा०. २. 'संपूर्ण जन' की० 'सर्वराष्ट्र जन' को०. ३. 'केला स्थापिलें' सा० सा० २ व को०. ४. याबद्दल 'तसें केलें' की०. ५. भंडारगृह–भांडागार (खजिना). ६. 'करावें तसें केलें' की०. ७. व्यापार–कर्तव्ये.

२२. अष्टप्रधानांची कर्तव्ये.

मुख्य प्रधान यांणीं सर्व राजकार्य, मंत्र, राजकारण[१] [हीं] करावीं. सर्वांशीं समानबुद्धीनें, सर्वांचे अनुमतें, कोण्हाशीं द्वेषबुद्धी न करितां सर्वांस घेऊन चालावें. राजहित तें प्राणाहून अधीक, आपला स्वार्थ तिळप्राय न पाहातां, दक्ष[तेनें] व विचक्षणपणें, निरालस्य, सर्वकाल करीत असावें. सेना घेऊन युद्धादिप्रसंग शूरत्वें [करून] राज्य नित्य नूतन साध्य करावें. शत्रूंची बातमी राखून पराभव[२] करावे. राजपत्रें होतील त्यांजवर मुद्रा मुख्य प्रधान यांणीं आपली दुसरी करावी.

सेनापती यांणीं सर्व सेना रक्षण करून, त्यांचे मानसन्मान रक्षून, वेतन समयाचे समयास पाववून, राजास[३] ज्यांणीं जशी सेवा केली ते[४] निवेदन करून, त्यांस वेतन, बक्षिसें देवावीं. सर्व सैन्य घेऊन युद्धादिप्रसंग करावे.

अमात्य यांणीं सर्व राज्यांतील आयव्यय जमाखर्च होईल तो लेखनाधिकारी यांजपासून चौकशीनें लिहिणें करवून, आपण पाहून, राजास निवेदन करावें. राजपत्रांवर व खर्चाचे[५] हिशेब सर्व राज्यांतील, महालांतील यांजवरि चिन्हें करावीं. राजास नित्य निवेदन करावें, येविशीं दक्ष निपुण असावें, व मोठीं मोठीं राजकार्यें करून युद्धादिप्रसंग सैन्य घेऊन करावे.

सचिव यांणीं राजपत्रें होतील त्यांत न्यूनाधिक अक्षर मजकूर यांचा शोध करून नीट करवावें, व तसेच महाल, परगणे, यांचे हिशेबाचेही शोध करून राजपत्रावरि 'संमत' करून बारचिन्हें[६] रुजू[७] करावें. युद्धादिप्रसंग [करून] राजहित, तें करीत असावें.

मंत्री यांणीं मंत्रकार्यात निपुण असोन राजकारणें राखीत असावीं. राजांनीं जें जें कर्म, कृत्य केलें, त्याची दिनचर्या, वाका,[८] लिहून ठेवावा. आमंत्रण निमंत्रण, राजाचें भोजनादि [काचें] साहित्य, पदार्थ काय पाहिजे हें पाहात

---

१. 'राजकारणें' को० व सा २. २. 'पराभवे' सा० व को०. ३. 'राज्यास' की०. ४. 'तें' की०. ५. 'जमाखर्चाचे' की०. ६. बार (पु० फा०)–नोंद; लेख्य. कीर्दीतील रकमा खतावणीत ज्या त्या खात्यात दाखल करून 'बार बार बार' असे लिहिणे. 'बारः स्याल्लेख्यनामकः' रा० व्य० को० 'चिन्ह' की०. ७. रुजू (स्त्री०) [अ० रुजूअ]–संमत (या अर्थी 'रू' असे लिहिणे). ८. वाका (पु०) [अ० वाकिआ]–वर्तमान; हकीगत.

असावें, व राजकार्याविषयीं दक्ष असोन युद्धादिप्रसंग करावे. राजपत्रावरि 'संमत' अैसें चिन्ह करावें.

सुमंत यांणीं सर्व परराज्यांतील राजकारणें, शत्रूंचे संधिविग्रह पाहून बातमी राखणें, व वकील येतील जातील त्यांचे सन्मान वगैरे करावे. सर्व राजास निवेदन करून आज्ञेनें राजकार्य [व] युद्धादिप्रसंग करावे.[1] राजपत्रावरि 'संमत' अैसें चिन्ह करावें.

पंडितराव यांणीं धर्माधिकार सर्व [चालवावे.] पंडितजन यांचे, विद्वान ब्राह्मण यांचे, सन्मान करावे. धर्माधर्म विवक्षा, यज्ञ करणें व शांतिकपौष्टिक,[2] नित्य-नैमित्तिक, कालाचे कालीं सुचवून करवावें. दंड कोणास कसा करावा हा धर्म पाहाणें, प्रायश्चित्ताचे निर्णय व त्याचीं पत्रें होतील त्यांजवर 'संमत' ऐसें चिन्ह करावें.

न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय अन्याय—वृत्तीचे[3] व भूमीचे—यांचे सर्व काल राजास कांहीं एक दोष न लागे ऐसे न्याय करणार अधिकारी व शास्त्रज्ञ ब्राह्मण नेमिले त्यांचे विचारें धर्मता[4] न्याय करून सर्व काल राजास निवेदन करावें. पाहात असावें. न्यायाचीं निवाडपत्रें[5] होतील त्यांजवर 'संमत' ऐसें चिन्ह करावें.

२३. पत्रलेखकांची कर्तव्ये.

चिटणीस[6] पत्रलेखक यांणीं सर्व राजपत्रें लिहावीं. राजकारणपत्रें लिहावीं. राजाचे हृद्गत जाणून तत्काल नाना प्रकारचें, कल्पना[7] करून, चतुरपणें लेखन करावें. जें युद्धेंकरून, आयासेंकरून, कार्य होणें तें पत्राचे भाव पाहूनच कार्य होत असावें, ऐसें लेखन करावें. पत्रें येतील त्यांचीं उत्तरें ल्याहावीं. चिटणिशी व फडणिशी पत्रें कोणतीं कशीं लिहावीं, दान–पत्रें नांवाचीं, गांवाचें नूतन इनामाचें, फडणिशींतील पत्रें, लेखक वर्तमान [व] भावी व देशमूख देशपांडे व

---

१. 'करीत असावे' की०. २. शांतिकपौष्टिक (न० सं०)–अरिष्टनिरसनाचे विधी. ३. वृत्ति (स्त्री० सं०)–निर्वाहसाधन ४. धर्मता–धर्मतः (धर्मशास्त्राप्रमाणे) या अर्थी. ५. निवाडपत्र (न०)–निकालपत्र ६. चिटणीस (चिट्नवीस) [फा० चिट; हिं० चिठ्ठी+फा० नवीस्]–सर्कारी कार्कून; पत्रलेखक ७. 'कल्प' की० व सा०.

तालुकदार ऐशीं; चिटणिशी निवाडपत्रें, प्रायश्चित्त [पत्रें] वगैरे चिटणीसी, यांचे कानूजाबते[1] ठराव करून दिल्हे, तसें लिहावें.

फडणीस यांणीं अमात्यांचे संमतें सर्व जमाखर्च लिहिणें तत्काळ लेहून बहूत सावधपणें रक्षावे. राजास निवेदन करावें. दक्ष विचक्षण गणनक्रियेंत असावें. बारा महाल व अठरा कारखाने यांचे अधिकारी यांणीं व तालुकदार[2] सुभे, किल्ले यांणीं आपलाले अधिकार करून, आपलाले हिशेबकितेब लिहून मजमू-दफ्तरीं[3] गुजरावे[4]. त्यांणीं एकबेरजी[5] झडती[6] करून सालचे सालांत दुसरे सालीं समजावीत असावें. ऐसे[7] निबंध[8] बांधून दिल्हे.

२४. राजसभेच्या मर्यादा.

पूर्वींही राज्याचा पाया घालून धारे करून दिल्हे होते व नवीन अधिकारी जाले त्यांस पद्धती करून दिल्ह्या. सभा करणें, दरबार [करणें] व आपण प्रातःकाळ पासून उद्योग करण्याचा नेम पूर्वी केला त्याप्रमाणें करून सभेस बसणें, सिंहासनीं अथवा सभेस दरबार कारभार करण्यास बसणें, यास समीप सेवक पाठीमागें आठदाहा असामी विश्वासू, तर्कज्ञ, नाईक नाईक असे, हुजरे वगैरे यांणीं मोरचेल, चामरें व विडे, पंखे ऐसे[9] राजभोग[10] असतील ते घेऊन तितकेच उभें असावें, ते नेमून असावें. त्यानंतर सिंहासनाचे दोन्ही भागीं आप्तविषयीं शरीरसंबंधी विश्वासू ऐसे दाहाबारा नेमून दिल्हे, तितकेयांणींच[11] समीप मर्यादा ठेवून असावें.

प्रथम स्तंभापाशी मुख्य प्रधान यांणीं बसावें.[12] त्यांजपाशीं अमात्य, त्यांजपाशीं सचिव, त्यांजपुढें मंत्री ऐसे चार प्रधान बसावे. [हे] उजवे बाजूस. वामभागीं पंडितराव, त्यांजपाशीं सेनापती, त्यांचेपुढें सुमंत, त्यांचेपुढें

---

१. कानूजाबता (पु०) [अ० कानून + अ० झाबिता] – कायद्याची यादी. (इं०) कोड. २. 'तालुक्यास' को० व सा०. ३. मजमू-दफ्तर (न०) [अ० मज्मूअ + फा० दफ्तर] – वसूलखाते. 'मजमुद दप्तरीं' की०. ४. गुज (द) रणे [फा० गुज़र्. आज्ञार्थी रूप गुज़श्तनचे] – प्रविष्ट करणे. ५. एकबेरजी (स्त्री०) [सं० एक + फा० बरीज्] – एकूण जमा. ६. झडती (स्त्री०) [सं० सद् – सादः] – शोध. ७. 'असे' की०. 'ऐसे' सा० २. ८. निबंध-निर्बंध (प्रशस्त). ९. 'ऐशीं' की०. १०. राजभोग (पु० सं०)–सर्कारचा हक्क. ११. 'तितकियानींच' की० व सा० २. १२. 'असावें' सा० व को०.

न्यायाधीश यांणीं बसावें. उजवे बाजूस,[1] प्रधानांपुढें, चिटणीस; डावेकडे फडणीस [यांनीं] प्रधानांजवळ बसावें. त्यापुढें मोठे मोठे सेनाधिकारी व शूर लोक, सरदार, शिपाई योग्यतेनुरूप डावे बाजूस बसावे. सव्यभागीं[2] उजवे बाजूस कारभारी व मुतसदी[2] व कार्यकर्ते मोठे मोठे सुभे व तालुकदार, महाल्दार, वकील[3] परराज्यांतील,[3] यांणीं योग्यतेनुरूप बसावें. ज्यांचे त्यांचे मुतालीक व कारकून ज्यांचे जे त्यांचे मागें बसावे. ज्याचें कार्य लागेल. त्याणीं पुढें होऊन अर्जविनंती करावी, सांगितली आज्ञा ती ऐकून, उत्तर करून पुन्हा स्थळीं बसावें. गडबड तिळभर होऊं नये. चिटणीस, फडणीस वगैरे [यांनीं] लिहिणें, पत्रें वाचणें, तेव्हां सिंहासनापाशीं आपलाले बाजूस मर्यादेनें बसोन लिहून वाचून दाखवावें. आज्ञा होईल तें कार्य करावें आणि बसणें तें आपलाले स्थळीं बसावें. योग्यतेनें कोण्ही कोण्हाचे पुढें अथवा आपली मर्यादा सोडोन थोराचे स्थळीं बसूं नये. ज्याचें जें स्थळ [तेथें] त्यानीं मर्यादेनेंच असावें. चोपदारांचे नाईक दोन यांणीं सभेंत सन्मुख असोन येतील त्यांचे नांवें मुजरा द्यावा. ज्याचें स्थान योग्यता तसें कोणास भीड न धरितां आधींच जपून जेथील तेथें बसवावें. गलबल केली तरि उठोन[4] बसवावें. दरबारचे[5] देवडीची[6] चौकी[7] चोपदार यांजकडे. मुतसदी यांस बोलावणें, आणणें, त्यांणीं करावें. शूर शिपाई यांस भालदार[8] यांणीं बोलावणें करावें. राजकार्यास येणार तेच पाहून घेत असावें. नवीन आल्यास अर्ज[9] करून घ्यावे. सभेंत दोही भागीं मागें सर्व कारखाने यांचे नाईक, हवालदार, हुजरे[10] वगैरे यांणीं दाटी व अमर्यादा न करितां उभें असावें. वरकड लोक यांणीं पुढें सर्व कारखाने यांचे कामाचे उपयोगी त्यांणीं देवडीपाशीं असावें. नाईक असतील त्यांस कार्य सांगितल्यावरि त्यांणीं आपलाले लोकांस सांगून करवावें. जरीपटका निशाण यापाशीं हुजूरपागेचे[11] लोक व शिपाई लोक यांणीं नेहमीं

१. यानंतर 'चतुः प्रधानांपुढें' की०. २. 'सव्यभागीं कारभारी उजवे बाजूस मुत्सद्दी' (सर्व प्रतींत). ३. 'व किल्लेकरी राज्यांतील' की०. ४. 'उठवून' की०. ५. 'दरबारची' सा० व को०. ६. देवडी (स्त्री०) [सं० देहली; देहुडी (यादवकालीन)]–दाराजवळील ओटी. (ल०) पहारा; चौकी. ७. चौकी (स्त्री०) [सं०. चतुष्किका]–पहारा. ८. भालदार (पु०) [सं० भल्ल+फा०दार्]–वेत्रधारी सेवक. ९. अर्ज (पु०), अर्जी (स्त्री०) [अ० अर्झ्]–निवेदन. १०. हुजऱ्या (पु०) [अ० हुझूर्]–निकटवर्ती सेवक. ११. हुजूरपागा (स्त्री०) [अ० हुझूर्+फा० पायगाह]–राजाचे खास घोडदळ (रिसाला).

बसलें असावें. चौकी असावी. देवडीबाहेर लोक शिपाई वगैरे यांणीं तयार चौकी [वर] असावें. बदलीनें यावें जावें. दरवाज्याबाहेर छबिना[1] तयार [असावा.] हत्ती घोडे वगैरे बारी[2] प्रमाणें असावे. ऐशा मर्यादा करून दिल्ह्या.

२५. अष्टप्रधानादिकांच्या तैनाता.

सहस्र गोप्रदानें[3] सर्व सत्पुरुष यांस वस्त्रें, ग्राम भूमी [यांचे] संकल्प केले. कोणास ग्राम, भूमी देणें तें व सरंजाम[4] देणें ते यवनांचे तहापैकीं[5] चौथाई, मोकासा बाबती ठरलें त्यांत द्यावें.[6] असें देणें द्यावें कीं, पुन्हा आपण अथवा दुसरे-यांनीं हरण केलें ऐसें न होतां दिल्हें तेंच अक्षयी चालावें, ऐसें करून दिल्हें. अष्टप्रधान यांस तैनाता[7] केल्या. मुख्य प्रधान यांस पंधरा हजार होन, अमात्यांस बारा, वरकडांस दाहा हजार होन, याप्रमाणें करून दिल्हें. त्यांत कांहीं मोकासे, सरदेशमुखी, ऐसा[8] ऐवज लावून बाकी इतलाखी[9] ऐसें करून दिल्हें. शिवाय तालुके किल्ले यांचे कारभार निसबतीस नेमून दिल्हे. बाळाजी आवजी यांस "तुमची सेवा बहूत निष्ठेनें जाली व राज्याचे वृद्धीस उपयोग[10] बहूत जाले, यास्तव अष्ट प्रधानांतील पद योजना करणार" म्हणोन अभिषेकापूर्वीं सांगितलें. तेसमयीं, "मी कारकून लिहिणार, दरखदार, मजला प्रधानांतील पद न लगे. सर्वकाल चरणांचे सान्निध्य व अक्षयीं कृपा [असावी. सन्निध] सेवा घडणें यास थोरले पद घेऊन थोरले सेवेस जाणें [तर] चरणांचा वियोग घडेल. माझी सर्व जोड चरणांची सेवा! यापरता लाभ मानीत नाहीं!! स्वामी कृपा करणार, त्या अर्थीं चिटणीसी स्वामींनीं दिल्ही हेच अक्षयीं वंशपरंपरेनें वतनी करून देऊन चालावी ऐसें अभयपत्र करून, दोन्ही धंदे कारखानिशी व जमेनिशी[11] माझे निसबतीस आहेत ते व चिटणिसी अक्षयी करून द्यावी." [अशी विनंती केली.] त्याजवरून कृपाळू होऊन महाराजांनीं चिटणिसीचीं वस्त्रें बहुमान देऊन

---

१. छबिना (पु०) [फा० शबीना]–स्वारीतील मिरवणुकीचे शिपाई. रातपहारेकरी. २. बारी (स्त्री०) [सं० बारम्]–पाळी. ३. गो(प्र)दान (न०) ब्राह्मणास गाईचे दान. ४. सरंजाम (पु० फा०)–जागीर. ५. 'तहेकी' ('तहापैकीं'?) सा० व को०. 'तहेनी' (तहानीं) सा० २. ६. 'घ्यावीं' की० ७. तैनात (स्त्री०) [अ० तई [अयी] नात्]–नेमणूक. ८. 'ऐसे' की० व सा० २. ९. इतलाखी (वि०) [अ० इत्लाक्]–स्वतंत्र. १०. विशेष्यानंतर विशेषण. ११. जमेनीस (पु०) [फा० जम+नवीस्]–वसुलाधिकारी.

पत्र शपथयुक्त करून दिल्हें. साहा हजार होन[1] तैनात केली. त्यास कांहीं मोकासे ठावून दिल्हे. फडणीस चिमणाजी आवजी यास तीन हजार होन तैनात केली. वरकडही महाल [दार] कारखानदार यांस वगैरे कोण्हास पांच, चार, तीन, दोनशें, शंभर ऐशा होनांच्या तैनाती करून दिल्ह्या. तसेंच लोक, सरदार, पायचे[2] लोक व सेवेचे लोक यांस योग्यतेनुरूप सर्वांस पांच, चार हजार होनांपासून दोनशें, शंभर, पन्नास, पंचवीस, पंधरा पर्यंत तैनाती करून चालवावें ऐसें केलें.

२६. बादशहा 'दिलगीर जाले.'

राज्याभिषेक होऊन तख्त[3] केलें हें भागानगरीं व विजापुरीं वर्तमान गेलियावरि, कळोन भागानगरकर [यांची] मैत्रीच होती, त्यांणीं संतोष मानिला; विजापूरकर भयभीत[4] [होत्साते त्यांनीं] बाह्यात्कारें संतोष दाखवून वस्त्रें, जवाहीर, हत्ती, घोडे महाराजांस पाठविले; व सर्व पाळेगार मांडलिक हे चंजाऊरपर्यंत सर्व[5], वस्त्रें, भूषणें, जवाहीर पाठविते जाले. दिल्लीचे पादशाहा रणथंबोहर[6] येथें होते त्यांस सर्व वर्तमान समजलें. ते पादशाहा बहूत खपा[7] होऊन दिलगीर[8] जाले. आणि "खुदानें वर देऊन आम्हांस बारांशें वर्षें पादशाहात दिल्ही ती मर्यादा अवकाश असतां हिंदूंची पादशाहात आम्हांस दिल्ही ती आजच पुन्हा हिंदूंची हिंदूंस देऊन तख्त[9] दुसरें पृथ्वीवर हिंदूंचें जालें. याउपरि चांगली गोष्ट पुढें व्हावयाची व हें तख्त मोडावयाचें कठीण गोष्ट आहे. सुलतान रुकनदीन[10] याचे कुलांत उत्पन्न होऊन आपले कारकीर्दीत हे गोष्ट घडली! व्यर्थ उत्पन्न जालों!! शिवाजीनीं राणाजीचे[11] कुळीं उत्पन्न होऊन पुन्हा छत्र, सिंहासन तख्त केलें, ते धन्य जाले!" म्हणोन तीन दिवसपर्यंत बाहेर दरबारास आले नाहींत. "मक्केस निघून जावें किंवा येच समयीं मसलत करावी तरि बळेंकरून ते अधीक जाले" म्हणून जनान्यांत[12] राहिले.

---

१. होन (पु० का०)–साडेतीन रुपयांचे सोन्याचे नाणे. २. पायचे लोक–पायदळ. ३. तख्त(क्त) (न० फा०)–सिंहासन. ४. 'भयप्रीती' सा० सा० २ व को०. 'भयाभीत' की०. ५. 'सर्वांची' (सर्व प्रतींत). ६. 'रणथंबें' की०. ७. खपा (प्पा–फा) (वि० फा० खफा)–रुष्ट. ८. दिलगीर (वि० फा०) दुःखी. ९. विशेष्यानंतर विशेषण. १०. 'रुकदीन' को० 'रुकद्दीन' की०. ११. राणाजी–उदेपूरचा राजा. १२. जनाना (पु०) [फा० झनाना]–अन्तःपुर.

तेव्हां सर्व वजीर व अमीर यांणीं अर्ज करून, "हे गोष्ट ईश्वरी इच्छेची आहे आपलाही प्रताप, ताले[१] थोर आहेत. प्रयत्नें[२] करून सर्व गोष्टी करितां येतील, म्हणून समाधान करून दरबार करविला. बाहेर आले. आणि सुभ्यास दिलेलखान यास पत्रें लिहिलीं जे, कसेंही करून विजापूरची पादशाही कमजोर जाली, तिजवरि मोहीम करून ते हस्तगत करावी. आणि भागानगरास वोढा[३] लावावा. यांत शिवाजी राजे यांची[४] मदत करितात न करितात हें पाहावें. त्यांशीं सख्य होईल तितकें करून, त्यांचे मुलखाचे वाटे न जातां, आधीं हें कृत्य करावें, असें लिहीत गेले.

२७. जिजाबाईचा मृत्यू.

त्यानंतर त्याच[५] शकांत १५९६[६] ज्येष्ठ वद्य नवमीस जिजाबाई [साहेब] समाप्त जालीं. त्यांची उत्तरक्रिया महाराजांनीं लक्ष रुपये लावून महादानें देकार ऐशी केली. बहूत खेद केला कीं, "तीर्थरूप दूर देशीं जन्मप्रभृती राहिले. मातृवियोग नसतां प्राप्त आज जाला!" म्हणून चार महिने पर्जन्यकाल रायगडींच राहिले. आश्विन शुद्ध पंचमीचे मुहूर्तें पुन्हा सिंहासनारोहणसभा केली.

२८. श्रीरामदासस्वामींच्या सहवासात.

पर्जन्य गेला. यानंतर संभाजीराजे व कारभारी [यां] सह महाराज सर्व संपत्ती व सरदार अष्टप्रधान फौज [यां] सह निघोन राजगडीं येऊन प्रतापगडचे देवीचें दर्शन घेतलें. तेथून श्रीरामदासस्वामींचे दर्शनास आले. ते समयीं महाराजांस लोक 'जोहार[७]' म्हणोन करावयास आले. त्यांस [स्वामींनीं] विचारलें "हे शब्द अर्थरहित काय आहेत? यांत अर्थ कांहीं नाहीं," म्हणतां

---

१. ताले (पु० अनेकवचन) [अ० तालिअ]–प्रारब्ध; हा. मराठीत अनेक-वचनीच प्रयोग होतो. २. 'प्रेत्नें करून' सा० व को०. ३. 'वेढा' की० व सा० २. ४. 'त्यांची' की०. ५. 'त्याचे' सा०, सा० २ व को०. ६. '१६०' सा० व को०. '१६००' की०. 'शके १५९६ आनंद संवछरे चैत्र (ज्येष्ठ ?) वद्य ९ बुधवारी दो प्रहरां रात्री मातुश्री जिजाई आऊ पाचाडात निवर्तली' (जे० श०). ७. जोहार (पु०) [सं० जयहर, योद्धार म० झुंजार]–अस्पृष्टादी कनिष्ठांनी वरिष्ठांस वंदन करताना उच्चारावयाचा शब्द. 'याच्या अर्थांत सामान्यीकरण व विशेषीकरण झालें आहे.' (कुलकर्णी–म. व्यु. को. पृ. ३२२).

महाराजांनीं 'वंदन करण्यास [जोहार] म्हणतात' सांगितलें, आणि 'काय म्हणून बोलावें' [असें स्वामींस] विचारिलें. तेव्हां "राम राम कां म्हणत नाहीं ? म्हणत जावें," सांगितलें. तें सर्व जनांस एक समयीं उपदेशस्थानीं जालें. महाराजांनीं, "स्वामींनीं पर्वतवास करणें त्या अर्थी परळी किल्ला[१] आपला, तेथें असावें, सेवा [मजकडून] घडावी," विनंती केली. "चाफळचे श्रीरामजींचे उत्साहाचा बंदोबस्त करावा" आज्ञा जाली. त्यास अकरा गांवचे मोकासे व सरदेशमुखी श्रीस नेमून अकराशें होन नेमणूक शिवाय करून [बंदोबस्त] करविला. परळीस कड्यांत कोनाडां[२] जागा करून तेथें येणें, राहाणें [स्वामी] करूं लागले. तेथें राजमंदिर[३] [होतें] तें स्थान योजून "मर्जीस येईल तेव्हां राहात जावें, किल्ल्याचा दरवाजा[४] [ह्यावरील लोक] व हवालदार सर्व आपले आज्ञेंत राहात जातील"[४] सांगितलें. यांणीं "किल्लेदार याणींच आमचे आज्ञेंत चालावें, वरकड प्रयोजन नाहीं," सांगितलें. "जेथपर्यंत तुमचें स्वराज्य होईल, अंमल बसेल, तेथपर्यंत ग्रामदेवता [म्हणून] श्रीमारुती स्थापावे," आज्ञा जाली. ती मान्य करून तसें करविलें. पूजा करून पुन्हा राजगडास[५] आले. कांहीं दिवस पुणें वगैरे [येथें] राहिले. श्रीजेजूरी [चें] व शिखरचें दर्शन केलें.

२९. संभाजी दिलेलखानाकडे.

[नंतर] संभाजी महाराज यांस "कारभार[६] करीत जावा [आम्हांस] समजावीत जावें,[६] राज्याचे अधिकारी ज्येष्ठ पुत्र तुम्ही," म्हणोन आज्ञा केली. परंतु उग्र प्रकृती, महाराजांचे मर्जीनुरूप वागणें पडेना, ऐसें होऊं लागलें. कांहीं दिवस राजगडीं राहून रायगडीं गेले. पाचवडीं राहिले. महाराजांचे मनांत हेतू "हे राजपुत्र सर्व गुणसंपन्न असोन [यांनीं] राज्यभार चालवावा, आपणांस विसांवा व्हावा," म्हणून बहुता[७] रितीनें 'मार्गें करून चालावें' हा बोध करून त्यांचा

---

१. विशेष्यानंतर विशेषण. २. कोनाडां (पु०) [सं० कोण]–कोपऱ्यात; गुहेत. ३. 'राजमतें स्थान योजून' की०. ४. 'किल्ल्याचे दरवाजावरचा हवालदार आपले आज्ञेंत रहात जाईल' की०. 'दरवाजा व हवालदार सर्व ××× जाईल' सा० व को० 'दरवाजा हवालदार सर्व' सा० २. ५. 'रायगडास' की०. ६. 'कारभारी यांचा विचार समजोन घेत जावा' की० 'समजत जावा' सा० २. (अर्थात 'कारभार'). ७. 'बहूत रितींनीं' की०.

व्रतबंध[1] करून, युवराज्याभिषेक करावासें मनांत आणून व्रतबंध केला. परंतु संभाजी महाराजांची मर्जी एक प्रकारची! कोण्हे एके दिवशीं हळदकुंकू समारंभ, शीतलागौरी,[2] यास सर्व सुवासिनी स्त्रिया राजवाड्यांत येणार त्यांत कोण्ही रूपवान स्त्री आली. तिजला महालांत नेऊन बलात्कार—अविचार जाला. हें वृत्त महाराजांसही समजलें. ते समयीं बहूत तिरस्कार येऊन बोलले जे "राज्याचे अधिकारी हे, अगम्यागमन[3] श्रेष्ठ वर्णाचे ठायीं जालें, सर्व प्रजा हें राजाचें कुटुंब आप्तसमान,[4] हे[5] पुत्र जाले तरी काय करावयाचे? यांचा त्याग करीन, शिक्षा करीन." ऐसें आग्रह करून बोलले. ही बातमी संभाजी महाराज यांस समजली. त्याजवरून दोन घोडियांवरि आपण व स्त्री ऐसे बसोन, पांच पंचवीस माणसें मावळे आपले खासगीचीं घेऊन रात्रीसच निघोन पाचवडास असतां तेथून गेले. ते वेळे दिलेलखान[6] औरंगाबादेस होते त्यांजपाशीं गेले. कांहीं दिवस त्यांणींही संतोष मानून हें कार्यच जालें म्हणून, दरमहा बांधोन देऊन, बहूत सत्कार करून ठेविले. कांहीं एक फौज लोक जमाव[7] करून ठेविले. आणि दिलेलखान यांणीं आपली फौज कांहीं बरोबर देऊन भूपाळगड[8] जाऊन घ्यावा ऐसा विचार करून, राजे यांस रवाना केलें. ते समयीं[9] तसे चालून येऊन, वेढा घालून मोर्चे लाविले. गोळी गोळा टाकावा तरि संभाजी महाराजच पुढें येऊन उभे राहावे आणि हवालदार यास "दरवाजा उघडावा, नाहींतरि शिरच्छेद करीन, सर्व लोक मारीन." सांगून पाठविलें. तेव्हां कोण्हास धीर न पुरे. गोळा वाजवितां नये. भयाभीत होऊन पळूं लागले. फिरंगोजी नरसाळा हवालदार शास्ताखान याशीं चाकण[10] भांडविली तोच होता. विठ्ठल भालेराव सबनीस[11] होते. नामजाद[12] लोक पळूं[13] लागले ते समयीं यांसही अवसान न पुरे.

---

१. 'शके १५९६ आनंद सं (व) छर माघ वद्य ५ गुरुवारी राजश्री संभाजी राजे यांची मुंज जाली' (जे. श.). २. शीतलागौरी (स्त्री०)—देवी या रोगाची देवता. ३. अगम्यागमन (न०) शास्त्रनिषिद्ध स्त्रीशी व्यभिचार. 'अगम्य-गमन' सा० व को०. ४. 'अपत्यासमान' की० 'आप्त त्या समान' सा० २. ५. 'हे तरी (जरी ?) पुत्र' सा० व को०. ६. 'खान' सा० व को०. ७. 'जमा' की०. ८. भूपाळगड—जतच्या वायव्येस २० मैल. ९. 'तसें' सा० व को०. १०. 'चाकण भांडविला' की० 'चाकणा भांडविली' सा० व को०. ११. सबनीस (सब्नवीस) (पु०) [फा० सफ्नवीस्]—सैन्यातील पगाराचा हिशेबलेखक. १२. नामजाद (त) (पु०) [फा० नाम्झद्]—नियोजित; नियुक्त. १३. 'पळून गेले' की०.

लोकांचा पळ सुटला, काय करावें ? लोकांची गती हे ! आपण दम धरून उभें राहावें, किल्ला भांडवावा तरि महाराज पुढें येणार, गोळा[1] कसा टाकावा[1] ? म्हणून रात्रीस किल्ला सोडून निघोन महाराजांकडे गेले. किल्लेकरी कांहीं राहिले त्यांस किल्ला घेऊन धरिलें. बहुतेकांचे डावे उजवे करून हातपाय तोडिले. उग्र शासन[2] केलें. असेंच सर्व किल्ले[3] यांस समजावें म्हणून दहशत[4] घातली. किल्ला फत्ते करून कांहीं मनांतही विचार केला कीं, हें करणें ठीक नाहीं, म्हणून माघारे निघोन दिलेलखान याजकडे गेले.

३० संभाजीचा पश्चात्ताप.

महाराजांस वर्तमान समजलियावरि पुत्राचें आचरण असें[5] ! म्हणून बहूत खिन्न जाले. आणखी किलियांस येऊन असेंच करतील जाणून ताकीद केली जे, "गोळा वाजवावा, लढावें, किल्ले सोडूं नयेत." आणि संभाजी राजे यांजकडे कारकून पाठवून बोध करविला[6] कीं, "हें कृत्य तुम्ही करितां हें काय ? आम्हीं श्रम करून राज्य सोडविलें हें तुम्हांसाठीं किंवा कोणासाठीं ? तेथें राहून, यवनांचा समागम करून पुन्हा आपलीं स्थळें व राज्य त्यांचे घरीं घालावें हे बुद्धी धरली, हा अपाय तुमचा[7] किंवा आमचा होतो ? आम्हांस याउपरि कांहीं कर्तव्य नाहीं. एखादे क्षेत्रीं वास [करूं] किंवा श्रीरामदासस्वामींचे पाशीं जाऊन बसों.[8] परंतु तुमचीच हानी होईल. मागील जाल्या गोष्टी त्या जाल्या, याउपरि तुम्ही निघोन यावें. पाहिजे तेथें खासगी खर्चास तालुका[9] लावून घेऊन राहावें. कारभार आटोपेल तितका करावा. माहीत व्हावें." ऐशा कित्येक ममतेच्या व विवेकाच्या गोष्टी सांगून पाठविल्या. बोध होईल ते रितीनें करविला. याजवरून त्यांणीं [विचार केला कीं] आपण येथें[10] राहून यांजपाशीं अथवा विजापूर भागानगर यांचे पादशाहींत आपले मनोगतानुरूप चालणार नाहीं, ऐसें महाराजांचे लिहिल्यावर व सांगून पाठवल्यावर[11] अनुताप होऊन

---

१. 'गोळा टाकणेस नये' की०. २. 'दंड केले' की०. ३. 'किल्लेकरी' की०. ४. दहशत (धास्त) (स्त्री०) [अ० दह्‌शत्]–धाक; भीती. ५. 'हें' की०. ६. 'केला' सा० व को०. ७. तुमचा किंवा आमचा–तुम्हांस किंवा आम्हांस. ८. 'बसावें की० व सा० २. ९. 'तालुके' सा० व को०. १०. येथे–मोगलाकडे (दिलेलखानाजवळ). ११. 'पाठविण्यावर' सा०, सा० २ व को०.

स्त्रीसहवर्तमान युक्तीनें निघोन आले.[१] महाराजांचे दर्शन महाराज पन्हाळ प्रांतीं होते तेथें घेतलें.[२]

३१. संभाजीस उपदेश.

ते समयीं एकांतीं बसवून, "तुम्ही सद्वंश, तुम्हांसाठीं राज्य किती संपादिलें? याचे अधिकारी तुम्ही. सर्व प्रजा हें तुमचें कुटुंब, लेंकराचे ठायीं मोजावें.[३] राजे लोक तुम्ही. शतावधी स्त्रियां[४][शीं] लग्न केलें असतां अथवा शक्तीनसार शतावधी उपस्त्रिया नाटकशाळा ठेवून [वर्तन] केलें असतां युक्त आहे. परंतु अविचार अगम्यागमन[५] करणें व परस्त्रीबलात्कार हे दोन्ही यशक्षयास कारण. पूर्वीं मोठेमोठे राजे व रावणादिक राज्यकर्ते या दोषेंकरून राज्य [क्षयास] व कुलक्षयास गेले. राज्यक्षयाचें[६] करणें [योग्य] न होय." ऐसें घरोबियाचे रितीनें जसें समाधान करून ये तसें करून पन्हाळा[७] प्रांत, तीन लक्षांचा[७] तालुका, त्यांचे खर्चास नेमून देऊन, त्यांस कारभारी विठ्ठल त्रिंबक, बाजी मुरार यांचे नातू देशपांडे महाडकर यांस खासनिसी[८] पद देऊन ठेविलें. सोमाजी नाईक बंकी[९] व बावाजी समशेरबहादर हे सरदार लोक वगैरे देऊन ठेविलें. त्यांची चौकशी सांगितली. संभाजी महाराज यांस बुद्धिवाद करून युक्तीनें वागत तसें करावें. ऐसें सांगून ठेविलें. किलियाची परवानगीरसानगी सर्व हवालदार यांचे जिमेस [व] सर्व कारभार, ऐसें करून हवालदाराचेच निसबतीस काम ठेविलें. यांणीं वरतें असावें, खालीं उतरणें तें परवानगीनें लेहून नेऊन करावें, ऐसें करून ठेविलें. कोल्हापूरचे ठाणियांत महाराजांनीं जनार्दन नारायण सुमंत हे ठेविले. याजप्रमाणें बंदोबस्त करून देऊन नजरबंद ऐसेच ठेविले. आणि महाराज निघोन रायगडीं[१०] आले.

---

१. 'शके १६०१ सिधार्थी नाम संवछरें मार्गशीर्ष मासी संभाजी राजे मोगलाईतून पळोन पनालियासी अले' (जे. श.). २. 'पौश वद्य ७ भामवारी राज्याची त्याची भेटी जाली' (सदर). ३. 'मानावें' की०. ४. 'स्त्रिया लग्नें केलीं असतां' की०. ५. 'अगम्यगमन' सा० व को०. ६. 'हें राज्यक्षयाचें कारण होय' की० व सा० २. ७. 'पन्हाळा प्रांतीं नऊ लक्षांचा' को०. 'पन्हाळा या प्रांतांत तीन लक्षांचा' की०. ८. खासनीस (पु०) [अ० खास्+फा० नवीस्]–खासगीचा अधिकारी; खासगीवाले. ९. 'बांकी' की०. १०. 'राजगडीं' को०.

३२. शिवाजीची जालनापुरावर स्वारी.

यानंतर दिलेलखान यांस औरंगजेब यांणीं विजापूरचें पादशाहीवरि मसलत करावी, लिहिलें; व शिवाजी राजे यांशीं विरुद्ध न करितां ते पादशाहात हातीं घालावी.[1] कमजोर[2] जबून[3] जाली आहे,[2] यांत मसलत करावी. त्याजवरून पोक्त सामान फौज तोफखाना वगैरे करून विजापुरावरि चाल केली. भीमानदी उतरून तमाम मुलूख, शहरें मारीत ठाणीं घेतलीं[4]. शहरानजीक भिडला. खान अलीशान मशाऊदखान[5] यांणींही आपली फौज व उमराव जमा करून लढाईचा प्रसंग करविला. परंतु [दिलेर] खानाचें सामान भारी, उपाय न चाले. खजीना व सामान यांची कोताई[6] पडली. याजमुळें कांहीं एक यत्न न चाले. याउपरि पादशाही जाती ऐसें समजोन, बहूतच विचारांत पडून विचार केला जे, "शिवाजी राजे हे आपले पादशाहींतील शाहाजी राजे यांचे बेटे, उमराव. त्यांणीं आपले पादशाहींतील, व दुसरें आणखी दैवेंकरून साध्य करून राज्य-साधन केलें. तख्तनिशीन[7] जाले. आम्हांकडील उमराव चालून गेले, खटाई[8] जाली, तत्रापी तह करून संस्थान रक्षिलें. त्यांचें व आपलें अंतःकरण शुद्ध नाहीं, ऐसेंही आहे. त्यांस लिहिणें, मदत करा म्हणणें. हें खुदानें[9] दैवास आणिलें. विरुद्ध समजोन साह्य करितील न करितील. तत्रापी 'नेकजात'[10] थोर उमराव, पूर्वीपासून त्यांचे वडील या राज्यांत वाढले, त्या अर्थी त्यांसच 'साह्य करावें' ऐसें लिहावें. यांत त्यांची नेकी व कुलीनताही समजेल. मग जसें ताले असतील तसें घडेल." म्हणून दृढ विचार करून "ये समयीचें विघ्न निवारण होण्यास पराक्रमें करून, दैवेंकरून, खजीना, फौज [इत्यादी] सर्वगुणसंपन्न असे तेच आहेत." म्हणून महाराजांस कितेक प्रकारें, "गनीम बहूत जोरावारी"[11] धरून येऊन पोहोंचला, पादशाहात तुमची, येऊन मदत केली पाहिजे," [असें

---

१. 'ध्यावी' की०. २. 'कमजोर न होऊन जाहली आहे.' की०. 'कमजोर नसून जाली आहे' सा० २. ३. जबून (वि०) [फा० झबून्]—दरिद्री. (ल०) मोडकळीस आलेली. ४. 'घालीत' की० व सा० २. ५. 'म्हसूरखान' सा० व को०. ६. कोताई (स्त्री०) [फा० कोताही]—कमतरता. ७. तख्त(क्त) नि(न) शीन (वि०) [फा० तख्त्–निशीन्]—सिंहासनारूढ. ८. खटाई (स्त्री०) [प्रा० दे० खट्ट]—आंबटपणा. (ल०) वैमनस्य. ९. खुदा [पु० फा०]—ईश्वर. १०. नेकजात (वि०) [फा० नेक्झात्]—सुशील. 'खानाजात' सा० २. ११. जोरावारी (स्त्री०) [फा० झोरावर्]—जुल्म; जबरदस्ती.

लिहिलें.] त्याजवरून महाराज यांणीं तेच क्षणीं सर्व फौज, उमराव, पागे वगैरे तोफखाना, दिलेलखानाचें सामान आलें त्याजहून अधीक ऐसें सिद्ध करून, मजल दरमजल पन्हाळा प्रांतीं येऊन पोहोंचले. विजापुरानजीक खासा लष्करानिशीं जाऊन मुकाम केला. आणि विचार केला जे, "गनीम सामान बहूत कट्टें,[1] त्याहीमध्यें पठाण जात हट्टी,[2] याशीं लढाईत माणसें जाया न करितां हुन्नरेंच करून खजील होऊन नामोहरम होय तें करावें," म्हणोन तजवीज केली कीं, त्याचा प्रांत दौलताबाद तालुका यांत आपली फौज पैसावी,[3] वोढा लावावा. त्याजवरून दिलेलखान यास तीन गांवांचें अंतर सोडून, भीमा नदी उतरून, जालनापूर पावेतों त्याचा[4] मुलूख तलफ[5] ताराज करीत[4] चालले. प्रांत, गांव, शहरें मारीत मारीत जालनापुरास जाऊन, चार दिवस मुकाम करून पेठ मारिली.[6] बहूत मालमत्ता हातीं लागली. जालनापूर म्हणजे हें औरंगाबादेपासून चार गावें आहे. त्या जाग्यास शाहाजादा असतां, त्याचा हिसाब न धरितां, पेठ लुटून, सोनें, रुपें, हत्ती, घोडे, याखेरीज मत्ता बहूत सांपडली ती घेऊन पट्टागड तर्फेस स्वार[7] होऊन, कूच करून येत असतां मध्यें रणमस्तखान, असतखान (आसफखान?), जाबितखान ऐसेच आणखी सातपांच उमराव आठदाहा हजार स्वारानिशीं चालून आले. त्यांस जाहांबाजीचे[8] हुनरें जैसी तंबी[9] करून[10] ये तैसी करून, लढाई मारून, घोडे, हत्ती पाडाव करून, पट्टियास गेले. मागती तेथून फौज सरदार त्यांचे मुलखांत धुंदी[11] करावयास पाठविले, व मोरोपंडित प्रधान यांस बागलाणांत व खानदेश प्रांतीं सत्तावीस किल्ले मोंगलाचे घ्यावे, मुलूख काबीज करावा, म्हणोन वीस हजार फौजेनिशीं तिकडे रवाना केलें. आणि महाराज पट्टा किल्ला येथेंच मुकाम करून राहिले.

१. कट्टा (वि०) [सं० कट = अति] – बळकट. विशेष्यानंतर विशेषण. 'कटा' की०. २. हट्टी (वि०) [सं० हठ] – दुराग्रही. ३. पैसणे (क्रि०) [सं० प्रसृ] – पसरणे, फैलावणे. ४. 'तालुकियांत फत्तेराज' को० 'त्याचे मुलूक तलफ तराज' सा० २. 'त्याचे मुलूख तलख्यांत राज्य' की० 'त्याचा मुलूक त फै त रा ज करीत' सा०. ५. तलफ (वि० अ०) ताराज (वि० फा०) – उध्वस्त; बेचिराख. ६. 'शके १६०१ सिधार्थी नाम संवछरें (कार्तिकमासीं) राज्यानी जाऊन जालनापूर लुटिले' (जे. श.). ७. 'स्वारी येऊन' को० व सा०. ८. जा(ज)हां(हं)बाजी (स्त्री). [फा० जान्बाझी] – शौर्य. ९. तंबी (स्त्री०) [अ० तम्बीह्] – दटावणी. १०. 'करूं नये' की०. ११. धुंदी (स्त्री०) [सं० धूमधि?] – बंड.

३३. दिलेलखान 'रोखून धरिला'.

इतकेंही जालें, परंतु दिलेलखान बहूतच विरेस पडून, इकडे कसेंही हो, परंतु विजापूर घ्यावें, पादशाहा दस्त[१] करून नंतर तिकडील विचार करावा, म्हणून बहूतच निकड बसवून तोफांची मारगिरी विजापूरचे कोटास केली. कोणतेविषयीं बाकी ठेविली नाहीं. बहूतच जेरदस्तींत[२] आणिलें. तेव्हां खान अलीशान यांणीं पुन्हा महाराजांस पत्रें लिहिलीं, वकील पाठविले कीं "तुम्ही आपली नेकी करावयाची तितकी करून शाहाजी राजे यांचे पुत्र तुम्ही, या पादशाहींतील त्यांणीं निमक खादलें त्याची चीज करून, आम्ही वांकडेही तुम्हांशीं चाललों असतां येऊन सर्व प्रकारें साह्य केलें, शर्त आपणाकडोन करणें ती केली, मसलतही केली कीं, त्यांचे मुलखांत वोढा[३] लावून गलीम येथून उखळून काढून नंतर घेरून मारावा; सर्व मुलूख त्याचा खराब दराज[४] केला, वोढा लाविला, कोटांत आम्हांसही द्रव्यानीं सामानानीं साह्य केलें. परंतु दिलेलखान बहूतच हट्टास पडोन तिकडे पादशाहाची सर्व दौलत गेली तरी जावो, परंतु विजापूर घ्यावें ऐसे[५] आग्रहास प्रवर्तला आहे.[५] उखळत नाहीं, कोटानजीक येऊन भिडला आहे. ये समयीं कांहीं एक विचार न करितां तुम्हीं येऊन पोहोंचून पादशाही राखिली पाहिजे." त्यावरून महाराज तेथून[६] स्वार पत्रें पावतांच येऊन, फौज मुलखांतील जमा करीत करीत पुन्हा पन्हाळ्यानजीक येऊन मुकाम केला. पूर्वींही सामान खजीना दारूगोळा पाठवून हुशार केलें [होतें,] आणि पुन्हा आलियावर आणखी मागुती द्रव्य व सामान मुबलग हर हुनरें सामान दारूगोळा पाठवून हुशार केलें. त्यांचे मुलखांत सैन्य पइसलें[७] होतें [तें] सर्व बोलावून आणिलें आणि दिलेलखान याजवरि सेनापती वगैरे सरदार, फौज पुढें पाठविली. त्यांणीं जाऊन कांहीं एक अंतरें सडे[८] स्वारीनें उभें राहून कहीकबाड[९] मारावें, रसद गल्ला[१०] सामान कांहीं एक पोहोंचूं देऊं नये, ऐसें करून कुल खाना

---

१. 'पादशाही हस्तगत' की०, को० व सा० २. २. जेरदस्ती (स्त्री०) [फा० झेर्दस्त्] – विपन्नावस्था. ३. वोढा (ओढा) लावून–आकर्षून (दुसरीकडे आकर्षून – हल्ला करून). ४. दराज (वि) [फा० दराझ्]–अधिक. 'खराब पराजय' की०. ५. 'असे आग्रह करून उठत नाहीं' को०. ६. तेथून–पट्टागडाहून. ७. पै (पइ) सणे–क्रि० [सं० प्रसृ]–पसरणे. ८. सडा (वि०) (यादवकालीन सडिवा)–एकटा. ९. 'कबिला बाड' की० 'कांहीं कही बाड' को० 'कही कवाड' सा०. १०. गल्ला (पु०) [अ० घल्ला. द्रा० गल्ले]–रास; ढीग.

भोंवता जवाब[१] धरून, रस्तेबंदी करून, रोखून धरिला. हें वर्तमान शाहाजास[२] कळोन त्याचे मदतीस औरंगाबादेहून रणमस्तखान व बाजे[३] उमराव आठदाहा हजार स्वारांनिशीं रवाना केले. ते येत असतां त्यांजवरि महाराजांची फौज धावून जाऊन त्यांस मारीत, पिटीत औरंगाबादेपावेतों नेलें. कित्येक शहरें लुटीत व देश खराब करीत परतोन येऊन गनिमास घेरून[४] बैसले.

३४. खानाची विजापुराहून माघार.

हें वर्तमान, व पंडित प्रधान हे बागलाण खानदेश प्रांतीं गेले त्यांणीं अहिवंत किल्ला घेतला, अहिवंत म्हणजे जसा पन्हाळा त्याचे समतुल्य किल्ला मातब्बर, तसाच नाहावागड, बागलाणचे[५] मुलकांत बहूत कठीण, तोही घेतला; ऐसे दोन किल्ले नामोशाचे[६], पुरातन जागे, काबीज केले, तेथेंही बहूत मालमत्ता सांपडली. आणि बराबरील जमियत, फौज, होती ती मुलकांत पाठवून, मुल्क लुटोन ठाणीं बसवून बहूत धामधूम केली; कित्येक मुल्क काबीज केला; हें वर्तमान, व पहिली स्वारी खासा महाराजांनीं केली; जालनापूर मारलें; रणमस्तखान नामोहरम करून दिलेलखानास घेरला; विरेस पडून[७] राहिल्यामुळें तमाम[८] फौज [हीस] याउपरि व त्यास गरदीस मेळवून औरंगाबाद व दौलताबाद घेऊन इकडे मसलत करितात; ऐसें पादशाहा यांस समजलियावरून, पादशाहा यांणीं रणथंबें येथें डाकेवरि वाके[९] जाहीर जाल्यावरून, बहूत खिन्न[१०] होऊन आहदीवर[११] आहदी दिलेलखानास पत्रें आलीं जे, "या उपरि तुम्हीं आग्रहास न पडतां, युक्तीनें निघोन शाही न बुडवितां, बचावून कळेल तसें निघावें. शिवाजी राजे यांशीं युद्धाचा प्रसंग पाडूं नये." [अशीं] लिहिलीं[१२] आलीं. दिलेलखान याचे फौजेंत रुपया शेर, अच्छेर अनाज[१३] जालें.

---

१. जवाब (पु० अ०)–उत्तर. (ल०) गराडा. २. शाहाजास–शाहजादास. 'शाहजाहांस' की० व सा० २. 'शाहाजानास' को०. ३. बाजे (वि०) [फा० बअझि]–अवांतर; इतर. 'दोन' की० ४. 'धरून' सा० व को०. ५. 'बागलाणचे दरम्यान' की०. ६. नामोश (पु०) नामोशी (स्त्री०) [अ० नामूस]—कीर्ती; पराक्रम. ७. 'पाडून' सा० व को०. ८. तमाम (वि० अ०)–सर्व. ९. 'बाके' की०. १०. 'खजील' की० व सा० २. ११. अ(आ)हा(ह) दीवर आहदी (पु०) [अ० अह्दी]–एकामागून एक. १२. 'लिह्रिणीं आलीं' की०. 'लिहिलें आलें' सा० २. १३. अनाज (न०) [सं० अन्न]–धान्य.

हत्ती, घोडे, माणसें कित्येक मरूं लागलीं. या जाचतीने[1] [व] सर्व दौलताबादेचा मुलूक खराब करून, वोढा लावून दिलेलखान जेरदस्तींत आणिला. बाहेर माणूस, हत्ती, घोडे कांहीं एक फिरकूं न पावे.[2] निघाले तितके उचलूं लागले. कहीकबाड रसद न चाले. पादशाहाची लिहिलीं आलीं. तेव्हां दिलेलखानास ऐसें कळों आलें कीं, "आपण येथें दम धरून राहिल्यानीं आपली शाही कुल बुडवितील, गरदीस मेळवितील. विजापूर येणेची[3] सर्व मसलत राहिली [च.] परंतु याउपरि आपले प्राण व पादशाही सल्तनत जाऊं पाहातें [ती] बुडविलियाचें अपेश नशिबास न येतां निघोन कोणते प्रकारें जावें ? निभाव कसा पडतो ? बसोन राहिल्याही बसों देत नाहींत. त्या अर्थी निघोन जावें". म्हणोन विजापूर सोडून दिवसास कोश दोन कोश मजली करीत चालला. याप्रमाणें गनीम जेरजूर[4] करून खटा[5] करून उखळला. खान अलीशान यांणी [ही] जैशी कोट राखण्याची शर्त करावी तैशी करून बहूत शर्त केली. कोट लढावून[6] राखला.

३५. शिवाजीचा विजापूरकरांशी तह.

याप्रकारें करून सैन्यें करून व द्रव्यें करून विजापूरचें साह्य महाराजांनीं केलें. ज्या उपायें गनीम उखळून[7] येईल त्या उपायें उखळून विजापूरचें अरिष्ट दूर केलें. पादशाहात रक्षिली. ते समयीं खान अलीशान बहूतच कृतोपकारी होऊन, महाराजांची तारीफ करणें ती करून वस्त्रें, जवाहीर, उत्तम पदार्थ पाठविले. आणि दाली[8] तरवार महाराजांकडे पाठविली. "पुन्हा पाहिजे तरि तुम्हीं बांधावी किंवा आपणास मकेस रवाना करून हे पादशाहात तुमची होय, तुम्हीं संभाळावी, करावी," म्हणून खिलत[9] [व] वकील पाठविले. बेकिलाफपणें[10] बहूतच सरळ होऊन "तुम्ही शाहाजी राजे यांचे पुत्रत्वास उत्तीर्ण जालां. पूर्वी आम्हीं

१. जाचती (जाचणे) [सं॰जच्; जस्.]–छळणूक; त्रास. 'जातीनें' की॰. २. 'थावें' सा॰ व को॰. ३. 'येथें' सा॰ व को॰. 'घेणेची' की॰ 'येणे (ची)' सा॰ २. ४. जेरजूर (वि) [फा॰ झेर् पु॰ न॰]–पराभूत; हैराण. 'जेर जेर' की॰. ५. 'खट्टा' की॰ 'खटक' सा॰ व को॰. ६. 'लढवून' की॰ व सा॰ २. ७. उखळणे (उ॰ क्रि॰) [सं॰ उत्–स्खल्]–मोडणे. 'उखळिला' सा॰ सा॰ २ व को॰. ८. दाली (स्त्री) [सं॰ दाल]–म्यान. 'ढाल' की. ९. खिल (ला) त (पु॰) [अ॰ खिल्अत्]–सन्मानाचा पोषाख. १०. बेकिलाफ (पु॰) [फा॰ बी॰–अ॰ खिलाफ्]–सख्य.

तुम्हांकरितां शाहाजी राजे यांस पीडा केल्या वगैरे सर्व एकीकडे ठेऊन हे गोष्टी तुम्हीं करून दिगांत कीर्ती मेळविलीत! वंशजपणाची धन्य केलीत!!" असें म्हटलें. ते समयीं महाराजांनींही पादशाहास वस्त्रें, हत्ती, घोडे, जवाहीर पाठवून वकिलांबरोबर आपले मातबर देऊन, "आम्हीं राज्य सोडविलें त्यांत या पादशाहींतील [व] आणखीही सोडविलें. तेव्हां आपण आम्हीं वश व्हावें म्हणोन कैलासवासी महाराजांस पीडा केली, परंतु आम्ही त्यांचे स्वाधीन नाहीं समजोन मनसब व मुलूक त्यांजकडेच राखून सर्व शेवटवरि[1] चालविलें. ते कृतोपकार तुम्हीं केले आहेत. थोर शाहा तख्तनिशीन [आहां!] आपणांस लायख तेंच करीत आलां. आम्ही वाढलों, सामान, फौज, खजीना जाला, हें निदानीं तुमचे उपयोगीं पडेल समजोनच संपादिलें, राखिलें. आपले ताले सबळ होते, त्यांणींच आपण फत्ते पावलां. आम्हांकडोन जालें तितकें केलें. कोट जवामर्दी [नें] राखणें [ची] आपण शर्त केली. याउपरि आपली पाह(द?) शाहात, दौलत सुखरूप जतन करून, राखून आपण करावी. आम्हांस[2] संकट पडेल तेव्हां साह्य करण्याविषयीं लिहीत असावें" म्हणोन दाली व तरवार फिरोन पाठविली. आणि तह करारदाद पादशाहांनीं ठरविला[3] कीं, "होसकोटा व बेंगरूळ, अरणी व चंजाऊर आदिकरून पेशजी[4] महाल लागिले आहेत त्यांस पेशकशी[5] व तोफा वगैरे देणें येतें तें माफ असे, दरोबस्त[6] आपणांकडे करार केलें असे. चालावें. शिवाय जे नवीन चंदी वगैरे तालुके किल्ले घेतले तेही दरोबस्त आपणांकडे चालावे. यास कांहीं एक [अडथळा] आम्हांकडून पुन्हा तुम्ही जितका प्रांत बहिवाटितां त्यास व्हावयाचा नाहीं." याप्रमाणें ठरावून दिल्हें. महारांज यांणीं "बाकी तुमचे तालुके राहिले ते तुम्हीं राखावे, त्यांत आमचा उपद्रव होणार नाहीं," असें करोन दिल्हें. याप्रमाणें तहनामा ठरला.

३६. दिलेलखान 'खजील केला'.

[इकडे] दिलेलखान संभाळीत संभाळीत निघोन आदवानी[7] कोपळ प्रांताकडे

---

१. 'सर्व व्यव्हरी' सा० व को०. २. 'आम्हांस' याचा संबंध 'साह्य करण्याविषयीं'कडे. ३. 'लाविला' सा० व को०. ४. पेशजी (क्रि० वि०) [फा० पेश् अझीं]–मागे; पूर्वी. ५. पेशकशी (स) (स्त्री०) [फा० पेश्कश्]–खंडणी. ६. दरोबस्त [वि० फा०]–सर्व. ७. 'आदबानी' की०.

गेला. त्याचे पाठीवर महाराजांनीं फौजा रवाना केल्या होत्या त्यांनीं व प्रथम विजापुरानजीक जाऊन पट्टा[1] गडाकडे गेले ते समयीं जनार्दनपंत सुमंत हणमंते कोपळ प्रांतांत कांहीं फौजेनिशीं ठेविले होते, त्यांणीं तिकडे कितीक पुंडपाळेगारांनीं फिसाहत[2] केली होती, त्यांस मारून काढिलें [होतें] व हुसेनखानाचा भाऊ कासीमखान दोन तीन हजार स्वारांनिशीं आला होता, त्यास व त्याचा कबिला व हुसेनखानाचे दोघे लेक ऐसे कैद केलें. हत्ती[3] पांच व घोडे पांचशें पाडाव केले. याखेरीज पुंडपाळेगार यांचा मुलूक व गड, कोट काबीज करून ठाणीं बसविलीं. फत्ते केली. ऐसें असतां दिलेलखान व सरजाखान व हुसेनखान येतां बहूत करून जमियत फुटली गेली हें कळोन, हेही पांचसाहा हजार स्वारांनिशी गनिमावर गेले. मध्यें गनीम घालून जिकडे जिकडे गनीम जाई[4] तिकडे [तिकडे] जाऊन, जागां जागां गनिमास गोषमाल[5] देऊन तिकडूनही मारून काढिला. तो भीमानदी उतरून पेडगांवास आपले मुलखांत खटा होऊन गेला. दिलेलखान यास ऐसें कळों आलें जे, मागती विजापूरची वाट न धरावी ऐसा खजील केला.

३७. हे वर्तमान व्यंकोजीस कळविले.

याप्रमाणें महाराजांनीं प्रतापें करून, यश, कीर्ती व अर्थ संपादून हें वर्तमान सर्व व्यंकोजी राजे यांस चंजाउरास लिहिलें कीं, "संभाजीराजे दिलेलखान यांजकडे गेले [होते] ते आणावयाचे उपाय बहूत प्रकारें करून आणिले. त्यांसही कळों आलें जे 'पादशाहींत अथवा विजापूर अगर भागानगर पादशाहींत आपले मनोगतानुरूप चालणार नाहीं' ऐसें जाणोन आमचे लिहिल्यावरून[6] स्वार होऊन आले. भेटी जाल्यावरि घरोब्याचे रितीनें जसें समाधान करून[7] ये, तसें केलें; व दिलेलखान मातबर जमाव करून विजापूरची पादशाहात कमजोर पाहून चालून जाऊन शहरकोटास भिडला. याजवरून खान अलीशान यांणीं 'आम्हांस साह्य[8] करावें' ऐशीं पत्रें पाठविलीं. त्याजवरून दरमजल जाऊन

१. 'देवगडाकडे' की०. २. फिसाहत–फि (फ) साद (स्त्री०) [अ० फसाद्]–बंड. ३. विशेष्यानंतर विशेषण. ४. 'जाय' सा० व को०. ५. गोषमाल (स्त्री०) [फा० गोश् (कान)–मालिदन् (ओढणे)–शिक्षा. ६. 'लिहिलेप्रमाणें' की०. ७. करून ये–करू ये; करता आले. 'करावें तसें केलें' की०. ८. 'सख्य' की०.

मुलूक मारून शार्तीनिशीं[1] गनीम उखळून काढिला. विजापूरचें अरिष्ट दूर करून पादशाहात राखिली. यावरून त्यांणीं तह करून तुम्हांस चंजाऊर वगैरे तालुकियाचे तोफा व पेशकसी देणें लागत होती ते आम्हांकडे करून दिल्ही व चंदी वगैरे प्रांत तहामध्यें आम्ही आपणाकडे लावून घेतले. तरि याउपरि हें सर्व आम्हांकडील कारभारी[2] व लोक आहेत त्यांचे स्वाधीन करीत असावें. हें वर्तमान तुम्हांस समजावें." म्हणोन पत्रें रवाना केलीं. आणि भूपाळगड गेला होता तो व बाहादूरबिंडा घेऊन महाराज यशस्वी होऊन पुन्हा रायगडास आले.

३८. राजारामाचा विवाह.

[तेथें] शरिरीं कांहीं व्यथा निर्माण जाली. पुन्हा बरी जालीयानंतर राजाराम याचा[3] विवाह करावा याची योजना करून बहूत समारंभ व तर्तूद करून करविला. शरीरसंबंध प्रतापराव गुजर यांची कन्या वधू करून केला. एक मासपर्यंत मोठा समारंभ सोहळा लक्षावधी खर्च होऊन जाला. शके[4] १६०१ सोळाशें एक यांत लग्नसमारंभ केला.

३९. शिवाजीस ज्वराची व्यथा.

यानंतर महाराजांनीं याप्रकारें करून धर्मार्थकाम तीन पुरुषार्थ अमानुष[5] कर्में करून केले, ते सर्व यथासांग संपादिले. पराक्रम व चमत्कार केले ते वर्णन करण्यास कोणासही शक्ती नाहीं. तत्रापी कांहीं संक्षेपेंकरून पूर्वीं पासून वर्णन करीत आले त्या आधारें [हें वर्णन] जालें. ज्यांची कीर्ती, तुकाराम बावा व रामदासस्वामी परम विरक्त वैराग्याचे शिरोमणी यांणीं अभंग, श्लोक करून [वर्णिली,] प्रताप वर्णिला, त्यांस[6] मान्य जाले, असे राजे, यांचें अद्भुत[6] चरित्र दिवसा दिवसाचे ठायीं नाना प्रकारें केलें तें वर्णन करण्यास इतरांस[7] काय शक्ती आहे?[7]

---

१. 'शर्तनिशीं' सा० व को०. २. 'कारभारी लोक' की०. ३. 'याचा व्रतबंध करून विवाह' की०. ४. शके १६०१ सिधार्थी नाम संवछरे फालगुण वद्य २ राजारामाची मुजी जाली फालगुण वद्य १० राजारामाचा विवाहा जाला रायेगडी प्रतापरायाची लेक कली. (जे. श.). दि० ७ मार्च इ. स. १६८० रोजी राजारामाची मुंज व १५ मार्च रोजी विवाह (सरकार–शिवाजी पृ. ३८८). ५. 'अमानुष्यें' को० 'अमानुषिक' सा० 'अमानुष्य' सा० २ 'अमानुषी' की०. ६. 'त्यांस-मान्य असे राजे जाहले त्यांचे अद्भुत' की०. ७. 'इतरांस शक्ती नाहीं' को०.

राज्याभिषेक होऊन प्रताप केले ते वर्णिले. याउपरि उत्तरखंड[1] चरित्र केलें जे, तीन पुरुषार्थ साध्य जाले. याउपरि चवथा पुरुषार्थ मोक्ष श्रीरामदासस्वामींनीं वरद हस्त ठेवून कृपा केली सांगितला, त्याचें आचरण करावें. शरिरीं व्यथा, याउपरि [आयुष्य] मर्यादा विशेष नाहीं, हें समजोन विरक्तताभ्यासाचें[2] पुनश्चरण आरंभिलें. मोठे मोठे पंडित, ज्ञानी व संन्यासी यांशीं सर्व काळ सहवास करावा, आत्मानात्म[3] विचार करावा, ऐशी वृत्ती उदासीन जाली आणि [त्याप्रमाणें] करिते[4] जाले. पूर्व-युगीं राजे आपण वृद्धापकाल प्राप्त जालियास राज्य पुत्राचे स्वाधीन करून आपण ईश्वरप्राप्तीचा उपाय अरण्यांत जाऊन करिते जाले, तसें करावें हा हेतु; परंतु पुत्राचे ठायीं गुण असावे ते नाहींत. तसेंच टाकून गेलें असतां अपकीर्तीस कारण होईल, या अर्थीं यावद्देह घरींच सत्समागम करून सद्गुरुबोधित महावाक्याचा[5] उपदेश जाला[6] तें साध्य करून सार्थक करावें हेंच उत्तम. षड्वर्गत्याग[7] करून विषयांपासून विरक्त होत्साता सर्वकाळ भगवद्भजन, श्रवण, मनन, निदिध्यास,[8] कीर्तनादिनवविधा भक्तीकरून युक्त[9] ऐसे होऊन सर्वकाळ कालक्षेप करिते जाले. योगादिमार्ग पाहावे ऐसें केलें. पूर्वीं युगयुगाचे[10] ठायीं अवतार निर्माण होऊन बहूत दुष्ट दुर्जनांचा नाश करून [त्यांनीं] धर्म स्थापिले; तसेच महाराजांनीं अवतार-चरित्र केलें. यज्ञयागादी धर्म ब्राह्मणांपासून चालविले. धर्मवृद्धीकरून सर्वांस आनंदरूप [असें] प्रजापालन यथाविधी केलें. शके १५९६ पासून राज्याभिषेक जालियावरि शके १६०२ पर्यंत याप्रमाणें चरित्र करून असतां कांहीं दिवशीं ज्वराची व्यथा जाली.

४०. अवतार समाप्त केला.

या उपरि आपली अवधी[11] पांच सात[12] दिवस इतकी राहिली म्हणोन सर्व मातबर सरकारकून व सरदार आदिकरून जमा करविले, आणि सर्वांस जवळ

---

१. उत्तरखंड–पुढील. २. 'व ज्याचें पुरश्चरण' की०. ३. आत्मनात्मविचार (पु०) [सं० आत्मा + अनात्मा + विचार]–सत्यमिथ्याविचार. ४. 'करीत आले' की० व सा० २. ५. महावाक्य (न० सं०)–जीवब्रह्माचे ऐक्य दर्शविणारी तत्त्वमसि (ब्रह्मैवेदं सर्वं) आदी वाक्ये. ही चार वेदांची चार आहेत. ६. 'जाले यास' सा० व को०. ७. षड्वर्ग (पु०) (अने०)–कामादी सहा विकार ८. 'निजध्यास' सा० सा० २ व की०. ९. 'मुक्त' की०. १०. 'युगायुगाचे' की०. ११. अवधी (स्त्री०)–उर्वरित आयुष्य. १२. 'चार' को०, 'साहा' सा० २.

बोलावून सर्वांस[1] दर्शन, भाषण करणें तसें केलें. प्रधानादी कारभारी व विश्वासू आप्त जवळ बोलावून बसवून सांगितलें जे, "हें राज्य आपण मोठे पराक्रमें श्रीचे वरप्रदानें[2] संपादिलें; ऐशीं हजार पागा केली; किल्ले, कोट, जंजिरे, प्रांत व द्रव्यही[3] अनेक प्रकारचें कोट्यावधी, [असा] संग्रह केला. दानधर्म, यश कीर्ती[4] दोन्ही साध्य केलीं. पुढें याचें रक्षण करून, आम्हांहून[5] अधीक पराक्रम करून एक दिल्लीची पादशाहात व उत्तरचें राज्य साध्य करणें[6] तें [करण्यास] आयुष्य पुरलें नाहीं; व मेळविलें राज्य व माणसें तुम्हीं सर्व मोठे मोठे पराक्रमी यांचीं भूषणें, योग्यता वाढवून अधीक राज्य वाढविणें[7] येविशीं वडील पुत्र वयें करून योग्य, परंतु क्रूर आणि व्यसनी, तेव्हां पुढील विचार [त्याचा] यथास्थित दिसत नाहीं. धाकटे पुत्र गुणें करून युक्त, परंतु वयेंकरून लाहान व धाकटेच. तेव्हां विभाग करून[8] द्यावे, परंतु विभागांनीं चार मातबर लोभाविष्टपणें एकांत एक विरुद्ध चालतील.[9] तेणें करून राज्यवृद्धी राहून कलह प्राप्त होईल. राज्य ऐसी मर्यादा राहाणार नाहीं. वडिलांनीं राज्य करावें, कनिष्ठांनीं त्यांचे आज्ञेंत चालून सेवा करावी, ऐसे राजधर्म; तो योग दिसत नाहीं. शत्रूस संधी होतील.[10] हें राज्य देवाचें देणें, [त्याचा] नाश होईल. वडील [पुत्र] संभाजी राजे, याजकरितां त्याजकडेच सर्व लोक पाहातील, व पाहाणें प्राप्त. परंतु त्यांची चाल एक प्रकार [ची.] सरकारकून व योग्यतेचीं माणसें ज्यांनीं जिवाभ्य[11] श्रम राज्यवृद्धीसाठीं केले तीं थोर थोर माणसें यांच्या अप्रतिष्ठा करतील[12], [त्यांचा] नाश करतील. राज्याचा व द्रव्याचा नाश करतील, बुडवितील, लाहान[13] माणसांचे सहवासेंकरून थोरांच्या अप्रतिष्ठा होतील. निर्नायकी[14] होईल. आम्हीं पाया घातला, माणसें गुणसंपन्न मेळविलीं, वाढविलीं तीं राहाणार नाहींत. द्रव्य, खजीना सर्व नाश पावेल. मोठा सबळ शत्रू औरंगजेब तो आपलें स्थल सोडून निघाला असतां, आमचे तेजप्रभावें[15] आपले राज्यांतच राहिला आहे, तो पुढें

१. 'सर्वांशीं' की० व सा० २. २. 'वरदानें' सा० व को०. ३. विशेष्यानंतर विशेषण. ४. यानंतर 'इहपर' की०. ५. 'याहून' (प्रशस्त). ६. 'करणेंत' की०. ७. 'वाढवणें असे' की० 'वाढवावे असे' सा० २. ८. 'करूनही' सा० सा० २ व की०. ९. 'चालवितील' की०. १०. 'होईल' की०. ११. जीवाभ्य–जिवादारभ्य (क्रि वि०)–जिवापलीकडे. 'जीवामय' की०. १२. 'करील' की०. १३. लाहान (वि०) [सं० लघु]–नीच. १४. 'निर्भयकी' की०. १५. 'राज्यप्रभावें.' की०.

चाल करील. विजापूर, भागानगर पादशाही कमजोर पडल्या घेऊन हें राज्य घेऊन[1] इच्छील. तेव्हां संभाजीचे वस्तू रक्ष [व]णार नाहीं. परंतु [हें] होणारच ऐसें दिसतें." म्हणोन एक घटिकापर्यंत नेत्र झाकून स्तब्ध जाले आणि मुखांतून अक्षरें[2] आलीं कीं, "संभाजी दगा पावेल, राजारामच[3] बळावून[3] पुन्हा राज्य रक्षील. मोरोपंडित, निराजी रावजी, रामचंद्र नीळकंठ, संताजी घोरपडे, धनाजी जाधव पुन्हा राज्यवृद्धीस कारण होतील. पुढें शिवनामें राजा होईल तो दिल्लीपर्यंत राज्य करील." इतकें बोलोन सर्वांकडे पाहिलें. ते समयीं सर्वांस बहूतच कष्ट व दुःख[4] पर्वतप्राय जालें कीं, "महाराजां[5] मागें आमचें सर्वांचें वाचणें जीविका[6] व्यर्थ होय!" ऐसा समय[7] प्राप्त जाला.[7] यानंतर महाराजांनीं आज्ञा केली कीं "हा मृत्युलोक! मोठे मोठे अवतारादिक गेले! होणार [तें] अवश्यानें [होतें] व उत्तरकाल तसें होतच असतें!! तुम्ही सर्व पराक्रमी आहां. कळेल तसे प्रयत्न करून राज्य[8] व धर्म रक्षावा.[8] एक विचारें सर्वांनीं चालावें म्हणून सांगून सर्वांचें समाधान केलें, आणि "बाहेर जवळ बसावें," अशी आज्ञा केली. आणि आपण श्रीगंगोदक घेऊन स्नान केलें. प्रायश्चित्तविधी[9] केला. भस्मधारण रुद्राक्ष–तुलसी–मालाधारण केलें. आणि दर्भासनीं बसले. शत गोप्रदानें प्रत्यक्ष करून सहस्रगोप्रदानें द्रव्यद्वारा संकल्प केला. आणि श्रीदेवाजीचें नामस्मरण अविस्मरणें करून भगवद्गीता व सहस्रनामें [यांचे] पाठ करविले. ब्राह्मणांचे घोष ऐसे होत[10] असतां, शके[11] १६०२ रौद्रनाम संवत्सरे, चैत्र शुद्ध पौर्णिमा, उत्तरायण, दोनप्रहरीं[12] देहत्याग करून अवतार समाप्त श्रीराम! ऐसें म्हणून केला.

४१. मृत्युसमयी दुश्चिन्हे.

ते समयीं दुश्चिन्हें [होतीं जालीं.] दिशा धूम्र [वर्ण] व नक्षत्रपात, भूमिकंप,

१. घेऊन–घेऊ या अर्थी. २. 'अक्षर आलें' सा० व को०. ३. 'राजाराम चंदीकडून' सा० २ व की०. ४. विशेष्यानंतर विशेषण. ५. 'महाराज मागें' सा० व को०. ६. जीविका (स्त्री०)–शक्ती; सामर्थ्य; जीवनोपाय. ७. 'संकटसमय ईश्वरानें प्राप्त केला' की०. ८. 'राज्यधर्म रक्षण करावा' की०. ९. प्रायश्चित्त-विधी (पु०)–पापनिरसनार्थ करावयाचे यज्ञ, उपवास, तप, दान इत्यादी विधी. १०. 'होत्सातां' सा० सा० २ व को०. ११. 'शके १६०२ रै(रौ)द्र संवछर चैत्र शुध १५ पौर्णिमा शनवारी दोंप्रहरां दिवसां रायगडी सिवाजी राजे यांनी देह ठेविला' (जे. श.). १२. यापुढे 'रविवार' की०.

इंद्रधनू रात्रीस, ऐसे उत्पात[1] होते जाले. शंभुमहादेव येथील तळ्याचें पाणी रक्ताप्रमाणें तीन दिवस जालें. जलचरें फार मेलीं. ऐसे अनर्थ जाले!

४२. महाराजांची उत्तरक्रिया.

यावरि सर्व कारभारी, कार्याध्यक्ष, आबालवृद्ध स्त्रीजन [यांचा] मोठा हाहाकार जाला!! नंतर प्रधानादिक मिळोन दरवाजे[2] बंद करून, बातमी बंदोबस्त होय तों न फुटावी, ऐसें करून, शिबिका आणून, सर्व राजचिन्हें व उपचार करून यथाविधी मंत्राग्नी करविला. सहगमन पुतळाबाईसाहेब यांणीं केलें. उत्तरक्रिया साबाजी भोसले सिंगणापूरकर यांजपासून राजाराम यांस समीप बसवून करण्यास प्रारंभ केला. बहूत दान, धर्म महादानादी करते जाले.

४३. चरित्राची फलश्रुती.

या प्रकारेंकरून महाराज पुण्यश्लोक योगियांसही जे गती असाध्य ते चतुर्विध पुरुषार्थ [सुद्धां] साधून मोक्षाचे अधिकारी जाले. प्रकरण समाप्त सप्तम जालें. श्रीरस्तु. मंगलानि भवंतु. याप्रकारेंकरून महाराजांनीं प्रतापचरित्र[3] करून वैकुंठवास केला. हे कथा श्रवण, मनन, पठण केली[4] असतां सर्व विघ्नें दूर होऊन पुण्य व यश प्राप्त होईल. अणि सर्वगुणसंपन्नता प्राप्त होऊन, सकल ऐश्वर्यलक्ष्मी तत्काळ प्राप्त होईल.

४४. राजारामाचे मंचकारोहण.

पुढें सर्व अष्ट प्रधान यांणीं विचार केला जे, संभाजी महाराजांची मर्जी यथास्थित मार्गावरि येण्याचे उपाय करून [यथास्थित] होय तों पर्यंत, संभाजी महाराज यांस आहेत तसे बंदोबस्तानें राखून, सर्व राज्याचा बंदोबस्त राजाराम साहेब येथें आहेत यांस मंचकारोहण करून[5] कार्यें चालवावीं. नंतर सर्वांनीं महाराजांकडे जाऊन, त्यांची मर्जी[6] प्रसन्न करून राज्याभिषेकादी करणें तसें त्यांस करावें. ऐसा संकल्प करून क्रियासमाप्ती जालियावरि राजारामसाहेब यांस

---

१. उत्पात न० [सं० उत्+पत्]—अपशकुन. २. 'दरवाजा' सा० व को०. ३. 'अवतार चरित्र' की०. ४. 'केले' सा० सा०२ व को०. ५. 'करवून करवावा' की०. ६. मर्जी (स्त्री०) [अ० मर्झी]—इच्छा.

सुमुहूर्तें मंचकारोहण करविलें.[1] शके[2] १६०२, रौद्रनाम संवत्सरे, वैशाख वद्य तृतीया. येथून पुढें चरित्र जालें तें संभाजी महाराजाचे चरित्रांत वर्णन केलें आहे.

राज्याभिषेक प्रकरण सप्तम समाप्त.

१. 'केलें' सा० २. २. 'शके १६०२ रै (रौ) द्र संवछर वैशाख शुध ३ त्रितीयेस राजारामास आनाजीपंत सुरणीस यानी मंचकी बैसविले' (जे. श.).

विवरणात्मक टीपा

टीपा

(आकडे परिच्छेदक्रमांक दर्शवितात.)

प्रकरण पहिले

१.

राज्याभिषेक शके १३७—धाकटे शाहूमहाराज इ. स. १८०८ मध्ये ४ मे रोजी मृत्यू पावले होते. त्यांनी आधीच आज्ञा केली असावी व नंतर चिटणिसांनी इ. स. १८११ मध्ये आपल्या ग्रंथास आरंभ केला असावा असे काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात. (स. च. १९२४ पृ.३३).

पूर्वज—मेवाडात चितोड व सिसोदे या एकाच घराण्याच्या दोन शाखा होत्या. अल्लाउद्दिनाने इ. स. १३०३ साली मेवाडवर स्वारी करून चितोड घेतले. चितोडचा रावळ रत्नसिंह व सिसोद्याचा राणा लक्ष्मणसिंह हे पराक्रम करून मरण पावले. सुजनसिंह हा लक्ष्मणसिंहाचा नातू. सुजनसिंहास राज्य न मिळाल्यामुळे तो आपला भाऊ क्षेमसिंह यासह नशीब काढण्यासाठी इ. स. १३३४ च्या सुमारास दक्षिणेत आला. त्यापासून पुढे घोरपडे व भोसले ही दोन घराणी झाली. (शहाजी राजे भोसले १९३५ पृ. १८). उदेपूरचा भीमसिंह (भीमसेन) हा पराक्रमी होता. त्याचा दासीपुत्र बागसिंग हा भाऊबंदांच्या जाचाला कंटाळून खानदेशात आला व नंतर पुण्यास आला. हा भोसल्यांचा पूर्वज. (बुंदेल्याची बखर १९२० पृ. ३). राजवाड्यांच्या मते शिवाजीचा म्हणजे भोसल्यांचा मेवाडच्या शिसोद्यांच्या घराण्याशी काही एक संबंध नाहीं. (ऐतिहासिक प्रस्तावना १९२८ पृ. २३१).

२.

युधिष्ठिर—राजवाडे म्हणतात की, 'ह्या वंशावळी देण्यांत एकंदर तीन हेतु

बखरनविसांच्या मनांत होते असें दिसतें:—(१) युधिष्ठिरापासून शिवाजीपर्यंत एकसारखी परिनालिका दाखवून द्यावयाची. (२) युधिष्ठिरापासून औरंगझेबादि मोंगलांपर्यंत सार्वभौम राजांची मालिका दाखवून द्यावयाची व (३) दिल्ली येथील सार्वभौम मोंगलांची सत्ता तरवारीच्या जोरावर बसविलेली होती व त्यांना दिल्लीच्या गादीला पिढीजात हक्क कांहींएक नव्हता, हें दृष्टोत्पत्तीस येऊन शिवाजीला सार्वभौम सत्ता प्रस्थापित करण्याचा हक्क पिढीजात प्राप्त झाला होता, हेंहि वाचकांच्या ध्यानांत यावें. अशा त्रिविध हेतूने प्रोत्साहित होऊन बखरनविसांनी या वंशावळी दिल्या आहेत. पुराणें, राजावली, तवारिखा वगैरे साधनांच्या सहाय्यानें मूळ यादीकारांनीं ह्या वंशावळी बनविल्या व त्यांवरून बखरनविसांनीं त्या उतरून घेतल्या.' (ऐ. प्र. पृ. २२४).

विक्रम व शालिवाहन—शककर्ते हे दोन पुरुष निश्चित कोण होते यासंबंधी मतभेद आहेत. डॉ. भांडारकरांच्या मते दुसरा चंद्रगुप्त व प्रो. पाठकांच्या मते त्याचा नातू स्कंदगुप्त याला विक्रमादित्य ही पदवी होती. (महाराष्ट्रीय ज्ञानकोश, विभाग २० (१९२६) पृ. २०४-२०६). शालिवाहन हा पुलुमायी आंध्र राजा असावा असे डॉ. भांडारकर म्हणतात. (Early History of the Dekkan (1884) P.30). सातवाहन कुलातील हाल राजा म्हणजेच शालिवाहन अशी एक समजूत आहे.

चेनपाल—हा राजा तुंवरवंशी अनंगपाळ होय. पिठोर चव्हाणवंशी असल्यामुळे यांचा पितापुत्र संबंध नाही. (ऐ. प्र. पृ. २२३).

पिठोर(पृथ्वीराज चौहान)—हा पृथ्वीराज तिसरा (इ. स. ११६८–११९३) होय. याचा जन्म अनहिलवाड येथे झाला. याची पहिली राणी इच्छिनी व दुसरी संयोगिता. याने भीम चालुक्य, परमर्दिदेव चंदेल व जयचंद गाहडवाल यांचा पाडाव केला. अजमेर व दिल्ली ही याच्या राजधानीची ठिकाणे होती. शहाबुद्दीन घोरीने याचा स्थानेश्वर येथे पराभव केला (इ. स. ११९३). हत्तीवरून उतरून घोड्यावरून पळताना सरस्वती नदीजवळ हा मारला गेला. 'पृथ्वीराजविजय', 'पृथुराजरासा' या ग्रंथांत याचे चरित्र आहे.

३.

पैगंबर, रुकनदीन—याऐवजी फकीर व शहाबुद्दीन गोरी ही नावे शिवदिग्विजयकार देतो. (श्रीशिवदिग्विजय श. १८१७ पृ. १८). पिठोर राजाचा

पराभव शके ५१२ त झाला नसून तो शके १११५ मध्ये (इ. स. ११९३) शहाबुद्दिनाने केला. शके ५१२ त (इ. स. ५९०) हिजरी सनाला प्रारंभही झाला नव्हता. बखरनविसाने ज्या यादींवरून ५१२ हा आकडा उतरून घेतला, त्या यादी रमलशास्त्राच्या ग्रंथाच्या समकालीन म्हणजे शके १५९० च्या सुमाराच्या असाव्या. (ऐ. प्र. पृ. २२९).

४.

अनीगोंदी-(आनेगोंदी, अनागोंदी)—का० अने-हत्ती+गुंदी-बोळ. तुंगभद्रेच्या उत्तर तीरावर. इ. स. १३३४ मध्ये महमद तुघलख याने हे काबीज केले. तेथील प्रधान हरिहर संगम (राज्यकाल इ. स. १३३६—इ. स. १३५५) व बुक्क संगम (राज्यकाल इ. स. १३५५-इ. स. १३७७) या बंधूंनी विद्यारण्य स्वामींच्या आज्ञेने तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर विद्यानगर-विजयानगर इ. स. १३३६ त वसविले. हे बंधू होयसळ राजांचे मांडलिक होते. (एपि. इंडि. व्हॉ. ३ पृ. ११५). होयसळचे राज्य नामशेष झाल्यावर विजयानगरचे साम्राज्य निर्माण झाले. इ. स. १५६५ मध्ये तालिकोटच्या लढाईत हे राज्य नष्ट झाले.

किरीटी रामराजा—(मृ. इ. स. स. १५६५). हा रामराय आरविदु विजयनगरचा राजा कृष्णदेवराय तुळुव याचा जावई होता. हा सदाशिवरायाच्या कारकीर्दीत मुख्य प्रधान होता. पुढे तोच सत्ताधारी झाला. हुसेन निजामशहाच्या नेतृत्वाखाली बहामनी राज्याच्या इतर मुसुल्मान अधिपतींनी तालिकोटच्या लढाईत हा व याचा भाऊ व्यंकट या उभयतांस ठार मारिले. याच्यानंतर याचा भाऊ तिरुमल्ल हा अरविदु घराण्याचा पहिला अधिपती झाला.

साहा सुभे—दक्षिणेतील औरंगाबाद (अहमदनगर), वऱ्हाड, खानदेश, विजापूर, गोवळकोंडे (हैदराबाद) व बेदर (कर्नाटक) हे प्रांत.

६.

वरप्रदान झाले—शंकराची पत्नी अपर्णा हिने प्रत्यक्ष येऊन या मुलास (बाप्पास) शस्त्रास्त्रे दिली असे क. टॉड म्हणतात. (राजस्थान प्र. २).

ब्राह्मणास..... झाला—या ब्राह्मणाचे हारित हे नाव होते.

चितोड—बाप्पा याने चितोडचे राज्य मोरी राजापासून इ. स. ७२८ मध्ये घेतले असे क. टॉड म्हणतात. (सदर).

पद्मिनी—(इ. स. १३०३). सिंहलद्वीपाच्या गंधर्वसेन राजाची ही कन्या होती. हिच्या आईचे नाव चंपावती. मेवाडच्या रत्नसिंहाने विवाह करून तिला इकडे आणले. (पद्मावत-मुहंमद जायसी). वस्तुतः ही भीमसिंगाची पत्नी होती. लक्ष्मणसिंग हा अल्पवयी असल्याने त्याचा चुलता भीमसिंग कारभार पाहत असे. पद्मिनीसाठी अल्लाउद्दीन खिलजीने इ. स. १२७५ मध्ये चितोडवर स्वारी केली; पण त्यास हिची प्राप्ती झाली नाही. ती सती गेली. चितोडच्या पूर्वेस सिंहोली येथील ती राजकन्या होती असे एक मत आहे. चिटणिसांनी दिलेला शके १०१२ (इ. स. १०९०) हा काल सुमारे १७५ वर्षे मागे नेला आहे.

महाराणे—मेवाडचा महाराणा प्रतापसिंह (इ. स. १५४०–इ. स. १५९७) याने ही प्रतिज्ञा केली होती.

उदापूर—अकबराने इ. स. १५६८ मध्ये चितोड घेतल्यानंतर उदेसिंगाने उदेपूर हे शहर वसविले.

भीमसिंहजी महाराणा—(इ. स. १७७८–इ. स.१८२८). अरिसिंहाचा पुत्र व कृष्णाकुमारीचा पिता. उदेपूरचा हा राणा होता. मल्हारराव होळकराच्या साह्याने याने चितोडवर स्वारी केली.

सजणसिंहजी—हा दक्षिणेत शके १२२५ च्या सुमारास आला. (क. टॉड). रियासतकारांच्या मते तो इ. स. १३३४ मध्ये आला. त्याच्या बरोबर त्याचा भाऊ क्षेमसिंह होता. सजनसिंह इ. स. १३५२ त मरण पावला. (शहाजी राजे भोसले. (१९३५) पृ. १८–१९).

भोसाजी महाराणा—अल्लाउद्दिनाने चितोड शके १५२५ त घेतले. त्या वेळी सजणसिंह हयात होता. त्याच्यापासून चौथा पुरुष जो भोसाजी तो शके १२०० त दक्षिणेत आला हे जे मल्हार रामराव म्हणतो ते अविश्वसनीय होय. (ऐ. प्र. पृ. २३१).

एक पुरुष—समरसिंगाचा एक मुलगा नेपाळात गेला. (क. टॉड).

७.

भोसले—भोसले या नावाची व्युत्पत्ती नीटशी लागत नाही. भोसे नावाचे गाव किंवा भोसाजी नावाची व्यक्ती यापासून हा शब्द निघाला हे पटण्यासारखे नाही. भोसल, भृशबल, भवशल इत्यादी संस्करण निरनिराळ्या ग्रंथांत सापडते. 'होयसल'चा अपभ्रंश भोसले असे कोणी मानितात. (शहाजीराजे भोसले

(१९३५) पृ. १९). लक्ष्मणसिंहापासून मालोजीपर्यंतच्या एकूण बारा पिढ्यांचा काल सुमारे तीनशे वर्षांचा (इ. स. १३००—इ. स. १६००) होता. भोसले घराण्याचे वास्तव्य निजामशाहीत झाले. (सदर पृ. २०).

मालोजी राजे—मालोजीचा जन्म इ. स. १५५२ मध्ये झाला. (ऐ. घ. वं. पृ. ११०). श्रीमल्हारी मार्तंडास नवस केल्यावर हा झाला म्हणून मालोजी हे नाव ठेविले. (श्रीशिवदिग्विजय श. १८१७ पृ. ३२).

विठोजी—विठोजीचे आठ पुत्र संभाजी, खेळोजी, मालोजी, मंबाजी, नागोजी, परसोजी भांबोरकर, त्रिंबकजी व मकाजी ऊर्फ काघडाजी. (ऐ. घ. वं. पृ. ११०).

८.

लुकजी जाधवराव—(खून इ. स. १६२९). विठोजी जाधवाचा हा मुलगा. याची पत्नी गिरजा. प्रथम हा निजामशाहीतला सरदार होता, पण पुढे तो मोगलास इ. स. १६२१ मध्ये मिळाला. (पत्रसारसंग्रह १४३, १४६). शहाजीला निजामशहा अनुकूल असल्यामुळे हा फितूर झाला असावा. सुमारे दहा वर्षे तो तिकडे राहून परत निजामशाहीत आला. हमीदखानाने याचा भरदरबारात खून केला. (श्रावण शु १५ शके १५५१). शहाजीची पत्नी जिजाबाई ही याची कन्या.

निंबाळकर--हे मूळचे धारचे परमार. यांचा मूळ पुरुष निंबराज. फलटण-जवळील निंबळक येथे वास्तव्य म्हणून निंबाळकर हे नाव पडले. जगपाळराव ऊर्फ वणगोजी निंबाळकर याची बहीण दीपाबाई (उमाब्वा) ही मालोजी भोसले याची पत्नी.

शाहाजी—शहाजीचा जन्म जय संवत्सर शके १५१६ चैत्र शु. ५ (दि. १८–३–१५९४) रोजी झाला. (श. रा. भो. पृ. २०); (ऐ. प्र. पृ. ३३५). राजवाड्यांच्या मते शहाजी व शरीफजी या नावांचे मूळ सिंह व शरभ या संस्कृत शब्दांत दिसते. (राधामाधवविलासचंपू, प्रस्ता० पृ. ३६).

९.

शिमघा—इ. स. १५९९ च्या होलिकोत्सवात सिंदखेडास जाधवरावांच्या वाड्यात रंगपंचमीचा दरबार भरला होता. (श. रा. भो. पृ. २०).

१०.

श्री देवी भगवती......देती जाली—मालोजीला देवीचा दृष्टांत शके १५१५ विजयनाम संवत्सरी माघ शुक्ल १५ रविवारी झाला म्हणून शिवदिग्विजयकार म्हणतो (शि. दि. पृ. ३३) ते खरे आहे. मल्हार रामराव हा दृष्टांत शके १५२५ त (इ. स. १६०३) झाला म्हणून म्हणतो ते अर्थात टाकाऊच धरिले पाहिजे. (ऐ. प्र. पृ. २३३). काव्येतिहाससंग्रहकारांच्या मते शके १५२५ हे साल बरोबर आहे. (स. च. पृ. ४५). रियासतकारांचा त्यास दुजोरा आहे. (श. रा. भो. पृ. २१).

मालोजी राजे......प्रार्थना केली—प्रथमान्त कर्त्यांचे वाक्य कर्मणि प्रयोगात संपविले आहे.

यांणीं खाणून......द्रव्य घेऊन आले—तृतीयान्त कर्त्यांचे वाक्य कर्तरि प्रयोगात संपविले आहे.

श्री शिखर महादेव......तळें बांधिलें—'मालोजी राजांनीं शिखरीं तळें बांधिलें, जीवन केलें, इमारती केल्या, जनयात्रा येऊं लागली'. (राजवाडे खंड ८ लेखांक ७१).

११.

शके १५२६......लग्न केलें—शहाजी व जिजाबाई यांचे लग्न इ. स. १६०५ च्या डिसेंबरात झाले. या वेळी मालोजीला निजामशाहीतून पंचहजारी मनसब, शिवनेर व चाकण हे किल्ले व पुणे व सुपे हे परगणे जागीर मिळाले. (श. रा. भो. पृ. २२).

१२.

शाबाजी अनंत चतुर—हा चतुर साबाजी या नावाने प्रसिद्ध आहे. दौलताबादेस मलिकंबरच्या वेळी मुरार जगदेवाच्या हाताखाली 'बहुत चांगले मर्दे कारभाराचे उपयोगी' होते. 'साबाजीपंतांनीं कारभाराचा आटोप दौलतीचा केला. साबाजीपंत मर्द शहाणे, नेकदार रयतेचा वगैरे बंदोबस्त उत्तम प्रकारें ठेविला. साबाजीपंतीं लावणीचे धारे व जमीन-मोजणी वगैरे शिरस्ते केले. (शि. दि. पृ. ६६).

वजिरीचीं वस्त्रें......सांगितली—'शके १५४१ त (इ. स. १६१९)

मलिकंबर वजीर असल्यामुळें शहाजीस मनसबदारीचींच तेवढीं वस्त्रें मिळालीं असावीं'. (ऐ. प्र. पृ. २३५). मलिकंबरच्या मृत्यूनंतर (इ. स. १६२६) त्याचा पुत्र फत्तेखान निजामशाहीचा कारभार पाहू लागला. (श. रा. भो. पृ. ३७). इ. स. १६३३ च्या सुमारास शहाजी मुक्त्यारीने कारभार करू लागला. (स. च. पृ. ४८).

१३.

मलिकअंबर--(इ. स. १५४६–इ. स. १६२६). निजामशाहीतील प्रसिद्ध मुत्सद्दी. हा मूळचा गुलाम होता. याने शहाजीच्या मदतीने मोगलांचा इ. स. १६२४ साली भातवडी येथे पराभव केला. लुकजी जाधव व शहाजी भोसले यांच्या उत्कर्षाला हा कारणीभूत झाला. (इंडियन हिस्टॉरिकल कार्टर्ली पु. ९ पृ. ६२४–६४४). याने इब्राहिम आदिलशहाचीही नोकरी केली. याचा पुत्र फत्तेखान.

विजापूरनें निघोन--विजापूरहून. पंचमीबद्दल तृतीया विभक्ती.

दादाजी कोंडदेव—(इ. स. १५७७–इ. स. १६४७). शहाजीच्या पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था हा पाहत असे. शिवाजीच्या स्वराज्यकल्पनेस याने प्रोत्साहन दिले. (भारत—इतिहास—संशोधक—मंडळ वार्षिक, श. १८३७ ले० १७२). हा शिवाजीचा शिक्षक असून अनेक मुत्सद्दी याने तयार केले होते. याचा पुत्र कृष्णाजी.

संभाजी राजे—(इ. स. १६१९–१६५५). वेरूळ येथे हा जन्मला. (मराठी दप्तर रुमाल १). हा शिवाजीचा थोरला भाऊ. हा कोलार (शहाजीची जागीर) येथे असे. इ. स. १६५४ मध्ये आदिलशाहीच्या कनकगिरी संस्थानात बंड झाले, त्यात हा मारला गेला. पुत्र सुरतसिंग व उमाजी.

मीर जुमला--(इ. स. १६३०–इ. स. १६६३). याचे मूळ नांव मुहम्मद सय्यद असे होते. हा गोवळकोंडे येथे अबदुल कुत्बशहा याचा दिवाण होता. पुढे इ. स. १६५५ मध्ये तो शहाजहानकडे गेला. औरंगजेबाच्या कारकीर्दीत इ. स. १६६० मध्ये हा बंगालचा सुभेदार झाला. याचे सैन्य चांगले असे.

नारोपंत मुजमदार—(मृत्यु इ. स. १६५३). हा प्रथम मलिकंबर व नंतर लुकजी जाधवराव याजकडे होता. शहाजीने यास कर्नाटकातील जहागिरीचा कारभारी नेमिले. याचे संपूर्ण नाव नारायणाध्वरी नारायण त्रिमल ह्णमंते. याचे पुत्र रघुनाथ व जनार्दन.

मुरार जगदेव—(खून इ. स. १६३५). आदिलशाहीचा हुशार मुत्सद्दी.

इ. स. १६२९ मध्ये हा दौलतखान वजीर (खवासखान) याचा कारभारी झाला. आदिलशाही शहाजहानला अनुकूल झाली त्या वेळी याने पुणे प्रांतावर आदिलशाहीचा अंमल सुरू केला. इ. स. १६३२ मध्ये याने मोगलांचा परिंड्यावर पराभव केला व मुलुखमैदान ही तोफ विजापुरास आणिली. नागरगाव (तुळापूर) येथे त्याने सुवर्णतुला केली. (परि० २२). महमदशहाने प्रथम खवासखानास व नंतर यास ठार मारिलें. 'राजाधिराज' असा याचा उल्लेख ऐतिहासिक पत्रांत व दानपत्रांत येतो.

१४.

माहुली—एका बाजूने आदिलशाहीकडून रणदुल्लाखान व दुसऱ्या बाजूने मोगलांकडून खानजमान हे दोघे माहुलीवर ऑक्टोबर इ. स. १६३६ मध्ये चालून गेले. शहाजीच्या दोनचारशे लोकांनी तीव्र प्रतिकार केला; पण शेवटी नाइलाजाने शहाजीने सहा किल्ले व निजामशहा यास खानजमानच्या स्वाधीन करून रणदुल्लाखानाच्या मध्यस्थीने विजापुरी प्रयाण केले. 'त्या वेळीं चार लखांची जागीर आम्हांस दिली' असे तो आदिलशहास लिहितो. (शिवाजी सूव्हनीर पृ. ११६). शहाजीचे विजापुरी शके १५४८ त प्रयाण झाले हे चिटणिसांचे विधान बरोबर दिसत नाही. कारण वर उल्लेखिलेल्याप्रमाणे शहाजी इ. स. १६३६ (शके १५५९) च्या सुमारास आदिलशाहीस मिळाला. (ऐ. प्र. पृ. २३९). (सरकार-शिवाजी (१९४८) पृ. १७).

१५.

रघुनाथ बल्लाळ कोरडे—(इ. स. १६४०-इ. स. १६७४). शहाजीच्या विश्वासू लोकांपैकी हा असून तो सैन्याचा सबनीस होता. शिवाजीबरोबर हा आग्र्यास गेला होता. वकील या नात्याने तो मोगलांकडे सुमारे इ. स. १६५७ त होता. शिवाजीशी हा अत्यंत एकनिष्ठ असे.

१६.

त्यानंतर......पुत्र जाला—चिटणिसांनी दिलेले साल जुने आहे. अलीकडे नवीन संशोधनाने शके १५५१ शुक्लनाम संवत्सरे फाल्गुन कृष्ण ३ भृगुवासर हे साल सिद्ध झाले आहे. (जेधे शकावली). जुन्या तिथीची तारीख १० एप्रिल इ. स. १६२७ व नव्या तिथीची तारीख १९ फेब्रुवारी इ. स. १६३० या होत.

या बाबतीत मराठी बखरींत एकवाक्यता नाही. रियासतकार सरदेसाई, यदुनाथ सरकार व राजवाडे हे जुनी तीथ मानितात. जेधे शकावलीत शके १५५१ श्रावण पूर्णिमेस लुखजी जाधवरावास मूर्तिजा निजामशाहाने मारिले व फाल्गुन वद्य ३ ला शिवजन्म झाला असे म्हटले आहे.

१९.

भातोडी—विजापूरच्या आदिलशहाने अंकुशखान, फर्हादखान, खैर्यतखान, याकुतखान सर्जा व रणदुल्लाखान हे सरदार मलिकंबरवर पाठविले होते. नगरच्या पूर्वेस दहा मैल असलेल्या भातवडीच्या डोंगराळ प्रदेशात मलिकंबरने पाणी व चिखल पसरून दिली. इ. स. १६२४ च्या ऑक्टोबरात हे युद्ध होऊन मलिकंबरास यश मिळाले. भातवडीच्या युद्धाने निजामशाहीचा बचाव झाला म्हणून इतिहासात हा प्रसंग महत्त्वाचा गणतात. (श. रा. भो. पृ. ३४).

२०.

पाळेगार कनकगिरीकर—आपाखान हा कनकगिरीचा पाळेगार असून तो विजापूरकरांच्या सेवेत होता. त्याने बंड केल्यामुळे अफजलखानास पाठविण्यात आले. शहाजीचा थोरला पुत्र संभाजी हा त्याच्याबरोबर होता. संभाजी मारला गेला (इ. स. १६५४), म्हणून शहाजीने पाळेगाराचा पराभव केला. अफजलखानाने बरोबर पाठपुरावा केला नाही. त्यामुळे शहाजीच्या मनात वैषम्य राहिले. (श. रा. भो. पृ. ७८).

२१.

मलिकाचें पारिपत्य करावें—पुण्याजवळच्या मावळ प्रांतावर आदिलशहा व निजामशहा आपला हक्क सांगत. आदिलशहाकडून शहाजी स्वारी करण्यास आला. कानन खोऱ्याच्या मरळ देशमुखास मलिकंबरने आदिलशाही फौजेवर पाठविले. ही लढाई दि. ४-२-१६२६ रोजी झाली. (रा. खं. १६-१२). त्यानंतर मलिकंबर लवकरच दि. १४-५-१६२६ रोजी मरण पावला. (श. रा. भो. पृ. ३७). मलिकंबरने शहाजीची जागीर काढून घेतली, तेव्हा इ. स. १६२५ त शहाजीने निजामशहास सोडून आदिलशहाचा आश्रय केला. (सदर पृ. ३६).

प्रकरण दुसरे

१.

महाराज—महाराज हा शहाजीस आदिलशाहीकडून मिळालेला किताब होय. मूळ किताब 'महाराज फर्जंद' असा आहे. २१ जानेवारी इ. स. १६४८ च्या फार्सी पत्रात हा किताब आढळतो (ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ लेखांक १९). चुकीने पकडलेल्या शहाजीस कैदेतून सोडल्यावर सन्मान झाला. त्या वेळी हा किताब दिला.

म्हणून......तेच ठेविले—'शहाजीराजे यांसि दौलतेमध्ये पुणें परगणा होता. तेथें दादाजी कोंडदेव शाहाणा, चौकस ठेविला होता. तो बेंगरुळास महाराजांचे भेटीस गेला. त्याबरोबर राजश्री शिवाजीराजे व जिजाबाई आऊ ऐशीं गेलीं. ते समयीं राजियास वर्षें बारा होतीं. [निरोप घेते समयीं] बराबर शामराव नीळकंठ म्हणून पेशवे करून दिले व बाळकृष्णपंत, नारोपंत दीक्षितांचे चुलतभाऊ, मजुमदार दिले व सोनोपंत डबीर व रघुनाथ बलाळ सबनीस ऐसे देऊन दादाजीपंतांस व राजे यांसि पुण्यास रवाना केले.' (सभासदाची बखर). शिवाजीची शहाजीशी ही भेट इ. स. १६४० मध्ये बंगलोर येथे झाली. (सरकार-शिवाजी पृ. ३८१).

२.

बारा मावळें—१ अंदरमावळ २ नाणेमावळ ३ पवनमावळ ४ घोटणमावळ ५ पौडखोरे ६ मोसेमावळ ७ मुठेमावळ ८ गुंजणमावळ ९ वेळवंडमावळ

१० भोरखोरे ११ शिवतरखोरे १२ हिरडसमावळ. ही बारा मावळे म्हणजे उत्तरेस राजमाची व चाकण ह्या स्थानापासून दक्षणेस रायरेश्वराचा डोंगर, अंबेडखिंड खांबटकीचा घाट ह्या स्थानांपर्यंतचा (पुण्याजवळचा) मुलूख होय. "बारा मावळ पुण्याखालीं, बारा मावळ जुन्नराखालीं" असे तानाजी मालुसऱ्याच्या पवाड्यात म्हटले आहे. (ऐ. प्र. पृ. २६२).

५.

एके दिवशीं......बसले—राजवाड्यांच्या मते 'शके १६६३ त चौदा वर्षांचा असतांना शिवाजीच्या हातून हा वरकरणी दिसणारा उद्दामपणा झाला असावा.' (ऐ. प्र. पृ. २५८).

६.

अमदाबादेचे सुभ्यावर......रवाना केले—वस्तुतः औरंगजेबास प्रथम दक्षिणच्या सुभ्यावर पाठविले होते. तेथे तो इ. स. १६३६ ते इ. स. १६४४ पर्यंत होता. त्यानंतर त्याची नेमणूक गुजराथच्या सुभ्यावर झाली. तेथे तो इ. स. १६४५ ते इ. स. १६४७ पर्यंत होता. त्यानंतर तो मुलतानच्या सुभ्यावर होता. इ. स. १६५२ मध्ये तो पुनः दक्षिणच्या सुभ्यावर आला. (स. च. पृ. ९९). रिसासतकारांच्या मते औरंगजेब जानेवारी इ. स. १६५३ मध्ये दक्षिणच्या सुभ्यावर पुनः आला. (New History of the Marathas, Vol. I (1946) P. 109).

त्याजवरून......रवाना केले—निजामशाही बुडविण्यात औरंगजेबाचा प्रत्यक्ष काही संबंध नव्हता. ते काम शहाजहानने स्वतः केले. 'खानदौरान व खानजमान ह्या दोन सरदारांस शहाजहानानें दक्षणचा बंदोबस्त करण्यास पाठवून दिलें, व त्यांच्या पाठोपाठ आपणहि येऊन दाखल झाला.' (ऐ. प्र. पृ. २३८). शहाजी, मुरारी पंडित व रणदुल्लाखान या त्रिवर्गांनी बादशहाच्या फौजेशी सामना दिला होता. या वेळी फत्तेखान हा बादशहाच्या पदरी मनसबदार होता. (श. रा. भोसले पृ. ४८).

त्याचें नांव......शके १५६० यांत—औरंजेबाने औरंगाबाद इ. स. १६५३ मध्ये वसविले. (शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर, कलम २३, फॉरेस्ट तर्जुमा).

७.

रंगमहाल--या वेळी पुणे प्रांत हा एक लहानसा कसबा होता. दादाजीने या कसब्यात रंगमहाल नावाचा वाडा बांधून जवळच हत्ती, घोडे इत्यादिकांची पागा तयार केली होती. मुरार जगदेवाने इ. स. १६३० मध्ये शहाजीचे वाडे जाळले. ते दादाजीने पुनः बांधिले. (श. शि. पृ. २२).

८.

याप्रमाणें......जाले— शके १५६८ पूर्वी शिवाजीने राजकारण करण्यास सुरुवात केली होती ह्यांत काडीमात्र संशय नाही असे राजवाडे म्हणतात (ऐ. प्र. पृ. २६१).

९.

तेव्हां तोरणा किल्ला......घेतला--'तोरणा किल्ला घेतल्यावर सुप्याच्या संभाजी मोहित्यास शिवाजीने फाल्गुनांत दस्त केलें, असें ज्याअर्थी सभासद म्हणतो त्याअर्थी शके १५६८ च्या फाल्गुनांत मोहित्याला दस्त केलें असावें व शके १५६८ च्या फाल्गुनाच्या आधीं तोरणा किल्ला शिवाजीनें घेतला असावा.' (ऐ. प्र. पृ. २६८). इ. स. १६४६ मध्ये तोरणा सर झाला असावा. (सरकार-शिवाजी पृ. ३८१). मल्हार रामराव तोरणा प्रथम घेतला असे म्हणतात; पण शिवदिग्विजयात राजगड अगोदर बांधला असे म्हटले आहे. (शि. दि. पृ. ११५). यासंबंधी राजवाडे म्हणतात की, नवीन किल्ला बांधण्यास सामान्यतः चार पाच वर्षे लागतात. वर्ष सहामहिन्यांत तो बांधून निघणे कठीण आहे. म्हणून तोरणा किल्ला घेण्याच्या सुमारास राजगडचा किल्ला बांधून होत आला असावा व त्या वेळी तोरणा स्वाधीन करून घेण्याची गरज निर्माण झाली असावी. जर प्रथम तोरणा किल्ला शिवाजीच्या ताब्यात आला असता, तर राजगड नवीन बांधीत बसण्याच्या खटपटीत पडून शिवाजीने मेहनतीचा व पैशाचा व्यर्थ व्यय केला नसता. राजगड बांधलेला पाहिल्यावर तोरण्याची दुरधिगम्यता नष्ट झाली व तो किल्ला शिवाजीस हस्तगत झाला. याप्रमाणे राजगड बांधण्याचे व तोरणा घेण्याचे काम परस्परावलंबी होते. (ऐ. प्र. पृ. २६६).

आणि शिवाजी राजे......यागी जाले—शहाजीचे हे कृत्य धूर्तपणाचे दिसते. दि. १६ मे इ. स. १६४९ मध्ये शहाजीची विजापूरच्या शहाने

सन्मानपूर्वक सुटका केली. त्याच वेळी कान्होजी जेधे व त्याचा कारभारी दादाजी कृष्ण लोहोकरे यांचीही सुटका झाली. त्यांस शहाजीने सांगितले की, तुम्ही जमावानिशी चिरंजीव शिवबाजवळ राहावे. यावरून शहाजीचे शिवाजीस प्रोत्साहन होते हे स्पष्ट आहे. तीच वृत्ती दादाजी कोंडदेवाचीही होती. विजापूरच्या बादशहाकडून त्याजवर बंडखोरीचा गुन्हा लागू करण्यात आला. यावरून शिवाजीच्या स्वराज्यकल्पनेस त्याचीही पुष्टी होती हे सिद्ध होते. (श. रा. भो. पृ. ७५, श. शि. पृ. २४ व आदिलशाही फर्मान, सरकार-हाऊस ऑफ शिवाजी १९४० पृ. ८५).

१२.

फिरंगोजी नरसाळा— फिरंगोजी नरसाळा चाकणच्या किल्ल्यावरून घोटण, पौड व मुसे या तीन मावळांवर सत्ता चालवी. शिवाजीने चाकणचे ठाणे इ. स. १६४७ मध्ये घेतले. शायिस्ताखानाने चाकणचा किल्ला काबीज करण्याची खूप खटपट केली. फिरंगोजीने दोन महिने तो लढविला. खानाने फिरंगोजीस पकडून त्याचा गौरव केला व आपल्याला वश होण्यास त्यास लालूच दाखविली. त्याने नकार दिला. खानाने त्यास शिवाजीकडे पाठविले. शिवाजीने त्यास भूपाळगडचा हवालदार नेमिले. पुढे दिलेरखान व संभाजी साताऱ्याच्या पूर्वेस असलेल्या या किल्ल्यावर चालून गेले. संभाजीस पाहून फिरंगोजीने फारसा प्रतिकार केला नाही. शिवाजीने त्याबद्दल त्यास दोष दिला. दि. २ एप्रिल इ. स. १६७९ मध्ये भूपाळगड मोगलांच्या ताब्यात आला.

सिद्दी बिलोल— शहाजीने शिवाजी व जिजाबाई यांच्या तैनातीस असलेल्या दादाजी कोंडदेवाच्या हाताखाली एक हजाराची पागा केली. त्यावर सिद्दी बिलोल (हलाल) यास नेमिले होते. हा हबशी बिलाल लोहगडावरून अंदर, पवन व नाणे या मावळांचा कारभार करी. हा आणि बाजी मोहिते हे वश न झाल्यामुळे त्यांस शिवाजीने शहाजीकडे पाठविले. पुढे तो आपल्या स्वतंत्र पथकासह मोगल बादशहाची चाकरी करू लागला. वणी दिंडोरीचा ठाणेदार असताना त्यास मोरोपंत पेशव्याने लुटले. बहादुरखानाने त्याची निंदा केली. त्यानंतर तो इ. स. १६७२ च्या ऑक्टोबरात शिवाजीस मिळाला.

बाजी मोहिते......स्वारी केली—सप्तप्रकरणात्मक चरित्र, शिवदिग्विजय व ९१ कलमी बखर यांत बाजी मोहिते असे म्हटले आहे; पण संभाजी हेच

बरोबर आहे. शिवाजी महाराजांकडे सुपे परगणा दोनदा येतो. तो प्रथम इ. स. १६४९ मध्ये आला. या वेळी आदिलशाहीकडून शहाजीची सुटका झाली होती. सुपे परगणा शिवाजीकडे पुनः आला तो इ. स. १६५६ च्या सप्टेंबरात. या दुसऱ्या प्रसंगाचे हे वर्णन आहे. सुप्याचा हवालदार संभाजी मोहिते याच्या जुलमी कारभारामुळे शिवाजीने त्यास पकडले. सभासद म्हणतो--'मग सुपे महाल येथें कोणे एके जागां संभाजी मोहिता म्हणोन सावत्र आईचा भाऊ मामा होता. तो महाराजांनीं महालावरी ठेविला होता. त्याचे भेटीस शिमग्याचे (दिवाळीचे?) सणास पोस्त मागावयास म्हणून गेले. मामास कैद करून ठेविलें. त्याचे तीनशें घोडे पागेचे होते व द्रव्यही बहुत होतें, वस्तभाव, कापड हस्तगत करून सुपे देश साधिला.' (शं. ना. जोशी-अर्वाचीन महाराष्ट्रेतिहासकालांतील राज्यकारभाराचा अभ्यास. भाग १. (१९५९) पृ. २०८ व सभासदी बखर).

१३.

शामराज नीळकंठ पारसनीस, रांझेकर--(इ. स. १६४६ ते इ. स. १६६२). याच्याकडे प्रथम सबनिशी होती. त्यास शके १५६५ मध्ये पेशवाई सांगितली असे राजवाडे म्हणतात. (ऐ. प्र. पृ. २६०). शिवाजीने यास इ. स. १६६२ त जंजिऱ्याच्या सिद्दीवर पाठविले. त्यास अपयश आल्यामुळे पेशवेपद काढून घेतले. त्यानंतर महादेव मतिमंत हा पेशवा झाला. (शिवचरित्र-साहित्य २. २१९-२२०; २५३-५६).

येसाजी कंक (मृत्यू इ. स. १६८९ नंतर). हा सरनोबत असून शिवाजीचा परम विश्वासू होता. शिवाजीबरोबर हा कर्नाटकच्या स्वारीत होता. संभाजीच्या वेळी फोंड्याच्या लढाईत शौर्य दाखविल्याबद्दल यास एक हजार होन नेमणूक होऊन त्याचा सन्मान झाला. (राजवाडे खंड १५-३९६). कृष्णाजी कंक हा याचा पुत्र. तोही पराक्रमी होता.

तानाजी मालुसरे—हा उमराठे येथील राहणारा. शिवाजीचा अत्यंत विश्वासू मित्र होता. तो बारा हजार पायदळाचा सुभेदार होता. कोंडाणा किल्ला काबीज करताना तो दि. ४ फेब्रुवारी इ. स. १६७० मध्ये पडला. 'गड आला पण सिंह गेला' म्हणून शिवाजीने त्या किल्ल्याचे नाव सिंहगड असे ठेविले.

(बाजी) पासलकर—(इ. स. १६४० ते इ. स. १७१७). मुसे खोऱ्याचा हा देशमुख होता. हा शिवाजीचा जिवलग मित्र होता. इ. स. १६६० साली

वाडीच्या सावंताचा बंदोबस्त करताना याने चांगला पराक्रम दाखविला. देशमुखी वतनाचे तंटे मिटविण्यात तो तरबेज होता. काय सावंताबरोबर लढताना तो इ. स. १६६० मध्ये मरण पावला. (सभासद).

मोरो त्रिमल पिंगळे—(मृत्यू ऑक्टोबर इ. स. १६८०). हा शिवाजीचा प्रधान होता. याचा बाप कर्नाटकात शहाजीकडे होता. पुरंदरचा कारभार हा पाहत असे. प्रतापगड किल्ला याच्याच देखरेखीखाली तयार झाला. अफझलखान व सिद्दी जोहार यांच्या स्वारीच्या वेळी हा फार उपयोगी पडला. आग्र्यास शिवाजी निघताना हा मागे प्रमुख म्हणून राहिला. दिलेरखान साल्हेर किल्ल्यावर चाल करून आला असता याने त्यास परतविले. (इ. स. १६७२). साल्हेरमुल्हेर असलेला बागलाण प्रांत याने काबीज केला. शिवाजीनंतर हा सोयराबाईस अनुकूल असल्यामुळें संभाजीने त्यास कैद केले. जमिनीची पहिली धारापद्धती याने अमलात आणली. याचा पुत्र निळोपंत.

राघो बल्लाळ अत्रे—(इ. स. १६५० ते इ. स. १६८०). अत्रे कुटुंबातील हा, विठ्ठल शिवदेव व निळोराम ही मंडळी शिवाजीच्या आश्रयास होती. कल्याण, राजापूर, पुणे व पन्हाळा येथील हा सुभेदार होता. शिवाजीच्या सिद्दीवरील स्वाऱ्यांत याने पराक्रम केला. जावळीकर मोरे यांचा पराभव करण्यात हा अग्रभागी होता. हा शिवाजीच्या पठाण शिपायांचा नायक होता. 'राघो बल्लाळ अत्रे चिटणीस लिहिणार म्हणून ठेविले.' (मराठी साम्राज्याची छोटी बखर)

१४.

कोकणवर स्वारी—कोकणवरील स्वारीचा क्रम येथे चुकलेला आहे; कारण शिवाजीने इ. स. २६५६ मध्ये जावळी घेतली व त्यानंतर म्हणजे इ. स. १६५७ मध्ये कोकणवर स्वारी केली. (श. शि. पृ. ४२ व ५०).

बाळाजी आवजी प्रभु– (इ. स. १६४८ ते इ. स. १६८१). आबाजी हरी चित्रे (मुजुमदार) याचा हा पुत्र. याच्या वडिलांस हबशीने गोणत्यात घालून समुद्रात फेकले. याला गुलाम म्हणून विकण्याचा हबशीचा मनोदय होता. त्याच्या मामाने यास सोडविले. शिवाजीने यास इ. स. १६६२ मध्ये चिटणीस नेमिले. लेखनकलेत हा प्रवीण होता. बाळाजी आवजीस संभाजीने अकारण मारिले. चिमणाजी व श्यामजी हे त्याचे दोन बंधू होते. चित्रगुप्ताच्या बखरीचा

व पाणिपतच्या बखरीचा लेखक रघुनाथ यादव याचा चुलत आजा काकाजी प्रभु म्हणजे बाळाजी आवजी होता. (ऐ. प्र. पृ. २१६).

आबाजी सोनदेव बहुतकर-दादाजी कोंडदेवाने यास तयार केले होते. शिवाजीने इ. स. १६४८ मध्ये कल्याणची स्वारी केल्यानंतर यास तेथे सुभेदार नेमिले. शिवराज्याभिषेकाच्या वेळी वसूल व हिशेब हा ठेवीत असे. मजमूचे काम हणमंते कुटुंबास दिले होते. त्यामुळे हा त्याशी चुरशीने वागत असे. 'डफ आपल्या इतिहासाच्या सातव्या भागांत आबाजी सोनदेव यास मजमू दिली म्हणून म्हणतो. परंतु तें ह्या पत्रावरून (खं० ८ ले० १०) निराधार आहे असें दिसतें.' (ऐ. प्र. पृ. ४४४). याचा धाकटा भाऊ निळो सोनदेव.

अण्णाजी दत्तो प्रभुणीकर-(मृत्यू इ. स. १६८१). शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकी हा एक होता. हा संगमेश्वर येथील कुलकर्णी. अफजलखानास भेटतेवेळी शिवाजीने यास प्रतापगडास जिजाबाई व संभाजी यांच्या संरक्षणार्थ मागे ठेविले होते. पन्हाळ्याची कामगिरी याने चांगली केल्यामुळे त्यास इ. स. १६६१ मध्ये वाकनीस नेमिले. इ. स. १६६२ मध्ये यास सुरनीस म्हणजे सचिव केले. शिवाजीच्या सुरतस्वारीच्या वेळी (इ. स. १६६४) हा हजर होता. इ. स. १६७४ साली फोंड्याचा किल्ला याने सर केला. शिवाजी आग्र्यास गेला असता याने राज्य उत्तम प्रकारे सांभाळिले. शिवाजीच्या मृत्यूनंतर सर्व अधिकार याने घेतले. हा संभाजीच्या विरुद्ध होता. अनाजी दत्तो, त्याचा बंधू सोमाजी, हिरोजी फर्जंद व बाळाजी आवजी या प्रमुख मंडळींस संभाजीने परळीखाली कैद करून मारिले. (उग्रप्रकृती संभाजी पृ. ३०).

सुर्वे बुडविले-'पुढें सुर्वे राज्य करीत होते त्यांजवर चालून गेले. शृंगारपूर घेतलें. सुर्वे पळोन देशांतरास गेले. त्यांचे कारभारी शिर्के होते त्यांशीं भेद करून राज्य हस्तगत केलें. त्यांसि महालमुलूख देऊन त्यांची कन्या आपले पुत्रास केली.' (सभासदाची बखर). संभाजीच्या जन्मानंतर (परि० २९) शृंगारपूर एप्रिल २९ इ. स. १६६१ मध्ये घेतले. (शं. ना. जोशी—छत्रपति शिवाजीराजे यांची बखर (१९६०) पृ. ११८). शिवाजीची पत्नी सोयराबाई ही याच शिर्क्यांची कन्या होय. (श. शि. पृ. ८२).

राजगडनें (रायगडास आले)—राजगडहून-पंचमीऐवजी तृतीया विभक्ती.

१६.

लेक आपले......तसें करावें—'त्यांनीं (शहाजी राजे) उत्तर दिलें कीं, आपण आपले स्त्रीचा व पुत्राचा त्याग केला आहे. तुम्हांस कळेल तें करणें. आमचें ते ऐकत नाहींत.' (म. सा. छो० बखर पृ. २२). "मग महाराजांनीं उत्तर दिलें कीं, 'शिवाजी आपला पुत्र, परंतु आपणाजवळून पळोन गेला. तो आपल्या हुकूमांत नाहीं. आपण तो पादशहाशीं रुजुवात एकनिष्ठेनें आहों. शिवाजी आपला पुत्र याजवरि हल्ला करावी, मन मानेल तें करावें, आपण दरम्यान येत नाहीं.' असें उत्तर पाठविलें." (सभासदाची बखर).

१८.

बाजी (राजे) घोरपडे—(इ. स. १६०५ तें इ. स. १६६४). शिवाजी व बाजी एकाच कुळातील होते. शहाजी निजामशाहीत असताना हा विजापुरी होता. राजवाडे म्हणतात की, विजापूरच्या पादशाहांच्या बखरींत लिहिल्याप्रमाणे शहाजीला शके १५६९ च्या वैशाखातच धरिले असले पाहिजे. शके १५७१ त शहाजी अटकेत होता हे डफने दिलेल्या अस्सल पत्रावरून ठरते. (ऐ. प्र. पृ. २७२). हा अफजलखानाबरोबर आला होता. इ. स. १६६४ साली शिवाजीने कोकणातील खवासखानावर स्वारी केली. खवासखानाला मदत करताना बाजी मारला गेला. बाजीने शहाजीस नबाब मुस्तफाखानाच्या ताब्यात दिल्याचा उल्लेख बसातीन-उस-सलातीनमध्ये आहे. (पृ.३२५-३२७).

१९.

दिल्लीस......केला—औरंगजेब २५ जानेवारी इ. स. १६५८ साली औरंगाबादेहून दिल्लीस जावयास निघाला. चिटणीसांनी म्हटल्याप्रमाणे औरंगजेबाने वकील पाठवून राजकारण केले असे नसून, शिवाजीने कृष्णाजी भास्कर यास औरंगजेबाकडे माफी मागण्यासाठी पत्रे देऊन पाठविले. औरंगजेबाने पाठविलेल्या नासिरीखानाने चांभारगोंद्याजवळ इ. स. १६५७ च्या जून ४ तारखेस शिवाजीचा पराभव केला होता. पुढे सप्टेंबरात विजापूरकर व मोगल यांचा तह झाला. शिवाजीने प्रसंग ओळखून या वेळी आपला वकील कृष्णाजी भास्कर यास औरंगजेबाकडे पाठविले. (श. शि. पृ. ५८). औरंगजेबानें वरकरणी शिवाजीस लिहिले 'तुमचें लक्ष निभ्रांत इकडे आहे असें समजून,

तुमचें पूर्वकृत्य मनांत आणीत नाहीं. येविषयींचा संतोष मानून इकडील दौलतीविषयीं कोशीस करीत जावी...आमचे लोभाची पूर्णता समजावी.' (राजवाडे खंड ८–६). हे पत्र दि. २४ फेब्रुवारी इ. स. १६५८ चे आहे.

उदाराम माहूरकर देशमूख—यांचे मूळ नांव उद्धव रामजी असे होते. हा सावरगावचा कुलकर्णी होता. अकबराने याची हुशारी पाहून वाशीम व माहूर मेथील ५२ महालांची देशमुखी त्यास दिली. 'राजे उदाराम' ही पदवी शहाजहानने त्यास दिली. याच्यामुळेच लखुजी जाधव मोगलांस मिळाला. इ. स. १६२४च्या भातवडीच्या लढाईत तो मलिकंबर विरुद्ध लढला. हा इ. स. १६३२ साली मरण पावला. रजपुतांविरुद्ध त्याच्या स्त्रीने युद्ध करून पराक्रम केला. त्याबद्दल औरंगजेबाने तिलां 'रायबागन' हा किताब दिला. (शिवभारत २५–५२,५३ व २८–५५,६१). शिवाजीने सुरत लुटल्यावेळी हिला शिवाजीवर पाठविले होते. ती कैद झाली; पण शिवाजीने तिला सन्मानाने परत पाठविले. ती नंतर शिवाजीची धर्मकन्या म्हणवी. हिचा पुत्र जगजीवन. शेजवलकर हिला जगजीवनाची पत्नी मानितात. (शि. छ. पृ. ३६०).

ते औरंगजेबांनीं......पादशाही बळकाविली—औरंगजेब दिल्लीच्या तख्तावर २१ जुलै इ. स. १६५८ रोजी बसला. (सरकार-शिवाजी पृ. ३८२).

२०.

इकडे शाहाजी महाराज......चिनले—यदुनाथ सरकार म्हणतात की, शहाजीस कैद करून विजापुरास आणल्यानंतर त्यास तुरुंगात टाकले नव्हते. अहमदखान (मुल्ला अहमद नायत) या थोर सरदाराच्या ताब्यात देऊन समेटाची बोलणी करण्याचा प्रयत्न झाला. शहाजीने करार करून बंगलोर व कोंडाणा आदिलशाहीस देण्याचे मान्य केले. त्यानंतर दि. १६ मे इ. स. १६४९ मध्ये शहाजीची सन्मानाने सुटका झाली. (शिवाजी पृ. ३८). ५ मे १६४९ रोजी महमद आदिलशहास मुलगा झाला. या आनंदोत्सवाप्रीत्यर्थ शहाजीस 'क्षमा' करण्यात आली. (महम्मदनामा पृ. ३८९–३९५ व जेधे करीना).

२१.

सिकंदर पादशाहा......जाले—शिकंदर पादशहाऐवजी महंमद आदिलशहा असे हवे; कारण तो त्यावेळी हयात होता. महंमद आदिलशहा इ. स

१६४६ मध्ये आजारी पडला. तो दहा वर्षें रोगाशी झगडून ४ नोव्हेंबर इ. स. १६५६ मध्ये मरण पावला. त्याच्यामागून अली आदिलशहा (दुसरा) हा आला. तो २४ नोव्हेंबर इ. स. १६७२त मरण पावल्यावर चार वर्षांचा शिकंदर गादीवर आला. (सरकार शिवाजी पृ. ३४,४८ व १९०).

२२.

इकडे......पाठविले. चिटणिसांचा हा क्रम चुकलेला दिसतो. शिवाजीने कोंडाणा दोनदा ताब्यात घेतला. इ. स. १६४७ साली आदिलशाहीकडून तो प्रथम घेतला. नंतर शहाजीच्या सुटकेच्या वेळी तो परत केला. इ. स. १६७० साली तानाजीने घेताना तो मोगलांच्या ताब्यात होता. ही घटना शिवाजी आग्र्याला जाऊन (इ. स. १६६६) आल्यानंतर घडली. (सरकार-शिवाजी पृ. १६३).

पुरा मारिला—हा कालक्रम बरोबर नाही. कारण शिवाजीने ९ ऑक्टोबर इ. स. १६४८ रोजी पुरंदर घेतल्यानंतर नगरवर स्वारी केली. (इ. स. १६५७). नगरचा पुरा मारण्याचा शिवाजीचा बेत नगरचा किल्लेदार मुस्तफाखान याने हाणून पाडला. याचवेळी शिवाजीने जुन्नर लुटले. (सरकार-शिवाजी पृ. ४९ ५० व ३८१).

नीळकंठ—महादजी नीळकंठराव हा आदिलशाहीत पुरंदरचा कारभार पाहत असे. नीळकंठराव हा त्याच्या घराण्याचा किताब होता. मावळत्या निजामशाहीत व महंमद आदिलशहा आजारी पडल्यावर दुर्बल आदिलशाहीत हा पुंडावा करू लागला. शिवाजीने पुरंदर सर केल्यावर त्याचा दुसरा पुत्र पिलाजी नीळकंठ यास आपल्याकडे ठेवून कोकणच्या मोहिमेचे काम त्यास सांगितले. (सरकार-शिवाजी पृ. ३८–४०).

हिरोजी फर्जंद—शिवाजीच्या विश्वासू मंडळींपैकी हा होता. आग्र्याला प्रयाण करताना तो शिवाजीच्या बरोबर होता. तेथे महाराज बादशहाच्या अटकेतून निसटल्यावर त्यांनी त्यास 'आपला पोषाख देऊन आपले पलंगावर निजविलें व मदारी मेहतर फरास यास सांगितलें कीं हा मनसुबा तिघांशिवाय फुटूं न देणें.' या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पुढे हिरोजीस पागेवरील सरदारी व पालखी अब्दागिरी दिली. संभाजी मोगलास वश झाला होता; पण नंतर तो शिवाजीकडे पन्हाळ्यास दाखल झाला. त्यावेळी त्याचे अंतःकरण शुद्ध होईपर्यंत

हिरोजी सारख्या जबाबदार मंडळींच्या देखरेखीखाली त्यास ठेविले होते. (श. शि. पृ. १२२, १३०, १३२ व २०५)

२३.

महाराजानीं......संतोषी जाले—तृतीयान्त कर्त्याचे वाक्य कर्तरि प्रयोगात.

इचें लावण्य......असतें!—'मी ईच्या पोटी जन्म घेतला असता परंतु मी प्रारब्धाचा हीन' (शेडगावकर बखर, शके १८३९ पृ. २३).

त्या स्त्रीस......पाठविली—शिवाजीच्या सत्कृत्याबद्दल काफीखानने गौरवाचे उद्गार काढले आहेत. तो म्हणतो की, पराभव झालेल्या लोकांच्या बायका, मुलें व कुराण यांच्या जपणुकीविषयी त्याची कडक शिस्त असे. त्याविरुद्ध कोणी वर्तन केल्यास तो कडक शिक्षा करी. (मुन्तखबुल-लुबाब, भाग २-११९,२७२).

२५.

तीन लग्नें--पुतळाबाई मोहिते (इ. स. १६५३), सकवारबाई गायकवाड (जानेवारी इ. स. १६५७) व काशीबाई जाधव (८ एप्रिल, इ. स. १६५७) या शिवाजीच्या तीन स्त्रिया होत्या. त्यापैकी पुतळाबाई पुढे सती गेली. (श. शि. पृ. २०९)

२६.

चंद्रराव मोरे—'चंद्रराव' हा आदिलशाहीकडून या घराण्यास मिळालेला किताब होता. चंद्रराव, चंदरराऊ, चंदाराव, चंद्रराऊ व चंद्रराजा अशी अपभ्रष्ट नावे मराठी बखरींत आढळतात; परंतु निश्चित चंद्रराव कोण या बाबतीत बखरकारांत एकवाक्यता नाही. जावळीकर मोरे यांच्या छोट्या बखरीत व शिवभारतात कृष्णाजी (कृष्णराव) मोरे असे आढळते. जावळीचा दिवाण हणमंतराव मोरे हा होता यासंबंधी बहुतेक बखरींत एकवाक्यता दिसते. डफ हे नाव हिंमतराव असे देतो. बाजीराव व कृष्णराव ही चंद्ररावाची मुले असा उल्लेख चिटणीस व ९१ कलमी या बखरींत आहे. रिसायतकारांच्या मते यशवंतराव हा 'चंद्रराव' असून शिवाजीने त्यास मुख्य गुन्हेगार म्हणून

ठार मारिले. (श. शि. पृ. ४४). चंद्रराव पळून गेल्याचे भोसलवंशचरित्रात म्हटले आहे. यशवंतरावाच्या बाजी व कृष्णाजी या दोन मुलांनी विजापूरकरांकडे फितूर चालविला, म्हणून पुण्यास शिवाजीने त्यांचा शिरच्छेद केला. शिवापूर दप्तर यादीप्रमाणे बाजी निसटला व तो शिवाजीविरुद्ध जयसिंगास मार्च इ. स. १६६५ मध्ये मिळाला. त्याच्याबरोबर अंबाजी गोविंद मोरे होता असे हफ्त अंजुमनच्या आधारे सरकार म्हणतात. (शिवाजी पृ. ४३). शिवाजीने जावळी १५ जानेवारी इ. स. १६५६ मध्ये सर केली. (सदर पृ. ३८२).

संभाजी कावजी—(मृत्यू इ. स. १६६१). हा शिवाजीचा भालदार व रक्षक होता. हणमंतराव मोऱ्याची कन्या आपणास द्यावी या निमित्ताने त्यास शिवाजीने पाठविले. खासगी भेटीतच त्याने हणमंतरावास ठार मारिले. (सरकार–शिवाजी पृ. ४२). अफजलखानाच्या भेटीच्या वेळी जिवा महाला व संभाजी कावजी यांना शिवाजीने रक्षक म्हणून बरोबर नेले. या प्रसंगाचे वर्णन शेडगावकर बखरीत असे आहे:–'खान याणी गलबला केला की मारीले मारीले दगा जाहला जलदीने धावा असे बोलीले मग भोई याणी जलदीने पालखी आणुन खानास पालखीत घालुन उचलोन चालीले तो इतकियात संभाजी कावजी हुद्देकरी याणे भोयाच्या पायाच्या पट्टयाने ढोण सिरा तोडुन पालखी भुईस पाडली आणी खानाचे डोचके कापुन हाती घेऊन राजीयाजवळ आला.' (मराठी दप्तर रुमाल १, शके १८३९, पृ. ३०). त्याचा मित्र बाबाजी राम हा शायिस्तेखानास मिळाल्यावर संभाजी कावजीची कानउघाडणी शिवाजीने केली. ती सहन न होऊन तोही शायिस्तेखानास मिळाला. 'जोरावर होता घोडा चहूं पाई धरून उचलिला' हा त्याचा पराक्रम पाहून खानाने मौजे मलकर या ठाण्यास पाचशे स्वारानिशी सलाबतखान दख्नी याच्या हाताखाली त्यास ठेविला. पुढे शिवाजीने प्रतापराव गुजर सरनोबत यास त्याच्यावर पाठवून त्यास शके १५७९ (१५८३?) म्हणजे इ. स. १६६१ मध्ये ठार मारिले. (आलमगीरनामा–५८४ व ९१ कलमी बखर ४३).

२७.

किल्ला वसविला—मोरो त्रिंबक पिंगळे याने इ. स. १६५६ मध्ये या किल्ल्याच्या बांधणीचे काम तडीस नेऊन शिवाजीची मर्जी संपादन केली. कोयना–जावळीच्या पश्चिमेस दोन मैलांवर हा किल्ला आहे. तुळजापूरची

भवानी जुनी असली तरी ती दूर होती; म्हणून शिवाजीने या किल्ल्यावर भवानीची स्थापना केली.

२८.

चाकणचा किल्ला घेतला—(परिच्छेद १२, फिरंगोजी नरसाळा ही टीप पाहा).

३१.

रंगनाथस्वामी निगडीकर—(इ. स. १६१२ ते इ. स. १६८४). रामदास-पंचायतनापैकी एक. उपनाव खडके. माध्यंदिन वसिष्ठ गोत्री ब्राह्मण. पिता बोपाजी व माता बयाबाई. यास शिपाईगिरीची आवड होती. बद्रिकाश्रमास जाऊन याने विद्या संपादन केली. वडिलांनी संन्यास घेऊन निजानंद हे नाव धारण केले. यास गुरुपदेश केला. हा राजसयोगी होता. मनोहर हा त्याचा आवडता घोडा होता. भागम्मा व चंद्रम्मा या शिष्यिणी व इतर शिष्यसमुदाय याचा होता. गजेंद्रमोक्ष, गुरुगीता, सुदामचरित्र, शुकरंभासंवाद, पंचीकरण, भानुदास चरित्र व योगवासिष्ठवार ही त्याची रचना होय. हा आनंदसंप्रदायी होता.

जयरामस्वामी (वडगावकर)—(इ. स. १५९९ ते इ. स. १६७२). दासपंचायतनापैकी हे एक होते. हे वसिष्ठ गोत्री देशपांडे. उपनाव कसरे. पिता भिकाजीपंत व माता कृष्णाबाई. गुरू कृष्णाप्पास्वामी. यांनी पंढरपुरी मधुकरी मागून विद्याभ्यास केला. दशमस्कंध टीका, रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर व अपरोक्षानुभव हे यांचे मुख्य ग्रंथ होत. शिवाय पदे व अभंगही आहेत.

केशवस्वामी (भागानगरकर)—रामदास-पंचायतनातील हे असून मोगलाईत राहत. पिता आत्मारामपंत व माता गंगाबाई. तानाशा याच्या पदरी होते. काशिरामस्वामींचा त्यांनी अनुग्रह घेतला होता. 'एकादशीचरित्र' व अभंग-पदे ही यांची रचना होय. यांचा समाधिकाल शके १६०४ दुंदुभि संवत्सर, पौष शुद्ध त्रयोदशी, गुरुवार हा आहे. काहींच्या मते शके १६०८ हा त्यांचा समाधिकाल होय. हैद्राबाद येथे यांची समाधी आहे. प्रकरण ६ (दक्षिणदिग्विजय) मध्ये शिवाजीने यांचे कीर्तन ऐकल्याचा उल्लेख आहे.

३३.

व्रतबंध......सावधान म्हटलें—विवाहप्रसंगी 'सावधान' शब्द ऐकून रामदास पळाल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहे. पण महाराष्ट्र—सारस्वतकार

म्हणतात की, वडील बंधू गंगाधर (श्रेष्ठ-रामीरामदास) याच्याप्रमाणे आपणासही अनुग्रह द्यावा असा नारायणाने (रामदासाने) वडिलांजवळ आग्रह धरिला. तुजला अधिकार नाही असे त्यांनी म्हणताच तो रागाने घरातून निघून गेला. वाटेत एक नदी लागली. ती पोहून तो पलीकडे गेला. एका ब्राह्मणाने त्यास यज्ञोपवीत व वस्त्र दिली. पुढे तो पंचवटीस गेला. (महाराष्ट्र-सारस्वत शके १८७६ पृ. ४०५).

श्रीकृष्णातीरीं येऊन–'बारा वर्षें सर्व भरतखंडांत तीर्थयात्रा करून तेथील धार्मिक, सामाजिक व राजकीय स्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करून ठिकठिकाणीं मठस्थापना करून व तेथें योग्य शिष्यांची योजना करून व अखेर मातृदर्शन घेऊन शके १५६६ सालीं तारणनाम संवत्सरीं वैशाखमासीं समर्थ कृष्णातीरीं आले.' (स. खं. आळतेकर-समर्थचरित्र शके १८५५ पृ. ९५).

३८.

स्वामींची भेटी अकस्मात जाली—समर्थांच्या निधनानंतर चार दिवसांनी लिहिलेल्या वाकेनिशी टिपणात शिवसमर्थ भेटीचा काल वैशाख शुद्ध ९ गुरुवार शके १५७१ मुक्काम सिंगणवाडी असा दिला आहे. हे विश्वसनीय दिसते असे राजवाडे म्हणतात. (ऐ. प्र. पृ. २७१). प्रस्तुत भेटीच्या वादात हे टिपण प्रमाण मानणारा व ते न मानणारा असे दोन पक्ष आहेत. नास्तिपक्षाच्या मते ही भेट शके १५७१ मध्ये न होता शके १५९४ साली झाली. समर्थांनी शिवाजीवर केलेल्या अनुग्रहाचा हाच काल होय. या पक्षाच्या मते ही भेट स्वराज्य-स्थापनेनंतर झाली. म्हणूनच समर्थ हे शिवाजीचे केवळ आध्यात्मिक गुरू होत. अस्तिपक्षात राजवाडे, देव, करंदीकर ही मंडळी आहेत व नास्तिपक्षात भाटे, चांदोरकर, केळुसकर, डॉ. बाळकृष्ण, यदुनाथ सरकार व प्रा. फाटक ही मंडळी आहेत. परंतु शके १५८३ त प्रतापगडावर शिवाजीने तुळजाभवानीची समर्थांच्या हस्ते केलेली स्थापना, शके १६०० मध्ये शिवाजीने समर्थांना दिलेली सनद व दासबोधातील तेराव्या दशकातील सहाव्या समासात (लघुबोध) शिवाजीस उद्देशून असलेला मजकूर या सर्व पुराव्यावरून ही भेट शके १५७१ साली झाली असे दिसते. उपरिनिर्दिष्ट सनदेत श्रीची स्थापना झाल्यापासून म्हणजे शके १५७० पासून शिवसमर्थांच्या संबंधी साद्यंत इतिहास आहे.

याप्रमाणें आज्ञा करून......पदरीं घातली—'आणि मूठभर मातीची, मूठभर खडे, व मूठभर लीद या प्रमाणें महाराजांचे पदरांत प्रसाद घातला.'

(हनुमंतस्वामीकृत समर्थांची बखर, १९५० पृ. ५५). माती, खडे व लीद ही अनुक्रमे भूमी, किल्ले व घोड्यांची पागा यांच्या सामर्थ्याची प्रतीके आहेत.

महाराजांनीं......झाले—तृतीयान्त कर्त्यांचे वाक्य कर्तरि प्रयोगात.

महाराज प्रतापगडीं......जाले—'शके १५७१त प्रतापगड मुळीं अस्तित्वांतच नव्हता.' (ऐ. प्र. पु. २७९). हनुमंतस्वामीकृत समर्थांच्या बखरीतही असाच उल्लेख आहे. (समर्थांची बखर पृ. ५६) प्रतापगड इ. स. १६५६ मध्ये बांधला होता.

३९.

तुकारामाचा उपदेश—परिच्छेद ३६ व ३९ मधील अभंगात्मक पत्र हे शके १५७१ साली शिवाजीला समर्थांचा वैशाखमासी अनुग्रह झाल्यानंतर व फाल्गुनात तुकाराम वैकुंठवासी होण्यापूर्वी लिहिले असले पाहिजे. (स. खं. आळतेकर–समर्थचरित्र पृ. १२९).

प्रतिनिधी—'प्रतिनिधी' या नवव्या प्रधानाच्या पदाची योजना राजारामाने जिंजी येथे इ. स. १६९१ मध्ये केली होती. हे पद प्रल्हाद निराजीस दिले होते. (स्थिरबुद्धी राजाराम, १९३६ पृ. ४१).

छत्रपती—या वेळी शिवाजी खऱ्या अर्थाने छत्रपती नव्हता; कारण राज्याभिषेकाच्या वेळी (इ. स. १६७४) 'क्षत्रियकुलावतंस, सिंहासनाधीश्वर महाराज छत्रपति' अशीं उपपदें स्वीकारून त्यानें आपल्या राज्याची सांगता जाहीर केली.' (श. शि. पृ. १६३). 'प्रतिनिधी' व 'छत्रपती' या शब्दयोजनेमुळे हे अभंग प्रक्षिप्त दिसतात. (स. च. पृ. १२१).

पत्रपती—निःसंग; साधू. बकदाल्भ्य नावाचा ऋषी डोक्यावर वडाचे पान ठेवून तपाचरण करीत होता. पांडवांचा अश्वमेध घोडा त्याच्या आश्रमाजवळ आला. त्या वेळी अश्वसंरक्षक अर्जुनाने त्यास तसे करण्याचे कारण विचारले. सावलीसाठी ते असून आयुष्य थोडे असल्यामुळे मी घर बांधीत नाही असे याने उत्तर दिले. आपण ब्रह्मदेवाची वीस अहोरात्रे पाहिली असेही त्याने अर्जुनास सांगितले. नंतर अर्जुनाने त्यास शिबिकेतून अश्वमेधार्थ नेले. १००० पर्याय (कृत, त्रेता, द्वापर व कली) म्हणजे ब्रह्मदेवाचा दिवस किंवा कल्प (जैमिनी अश्वमेध अ० ६०). बकदाल्भ्य एक लक्ष वर्षे होऊन गेला. (वनपर्व–महाभारत—कुंभकोणम् प्रत).

प्रकरण तिसरे

२.

अली इदलशाहा–(इ. स. १६३८ ते १६७२). अली आदिलशाहा हा मुहंमद आदिलशाहाचा मुलगा होता. हा इ. स. १६५७ मध्ये गादीवर बसला. मदारखान मुहंमद, इब्राहीमखान व अब्दुल्ला मुहंमद हे याचे दिवाण होते. याने औरंगजेबावर खानखानान मुहंमद यास पाठविले. औरंगजेबाने त्याच्या तडाक्यातून कशी तरी सुटका करून घेतली. याने अफजलखानास शिवाजीवर पाठविले; पण त्याचा वध झाला. नंतर त्याने शिवाजीवर सलाबतखानास पाठविले व आपणही चालून गेला. शेवटी त्याला परत फिरावे लागले. हा स्वतः कवी असून गुणी जनांचा भोक्ता होता.

अफजलखान–हा मुहंमद आदिलशहाच्या वेळी प्रसिद्धीस आला. बखरींत याची नावे अफजलखान, अबदुल्लाखान व अफजुलखान अशी आढळतात. वाई येथील चित्राव यांच्या संग्रही असलेल्या एका हुकूमनाम्यात 'खाने अफजलखान महमदशाही' असा उल्लेख असल्याचे राजवाडे म्हणतात. (ऐ. प्र. पृ. २७७). यावरून खानाचे खरे नाव अफजलखान ठरते. चित्रगुप्ताच्या बखरीत व अफजलखानाच्या वधाच्या पोवाड्यात त्यास 'भटारी' असे म्हटलेले आढळते. महंमद आदिलशहाचा हा दासीपुत्र असावा असे रियासतकारांचे मत आहे. (श. शि. पृ. ६५). सभासद त्यास 'अफजलखान वजीर' म्हणतो. राजवाडे म्हणतात की, 'रणदुल्लाखान शके १५७१ च्या चैत्राच्या आधी वारल्यावर वांईची सुभेदारी अफजलखानास मिळाली. ती सुभेदारी शके १५८० च्या

मार्गशीर्षापर्यंत व अर्थात वध होईपर्यंत त्याजकडेसच होती. शके १५८१ च्या आश्वीनांत तो शिवाजीवर स्वारी करण्यास सिद्ध झाला. वजिरी करण्यास शके १५७१ पासून शके १५८१ पर्यंत अफजलखान सतत विजापुरीं कधींच नव्हता. बखरींतून अफजलखानाला वजीर म्हटले आहे तें अर्थात् अविश्वनीय दिसतें.' (ऐ. प्र. पृ. २७८). यदुनाथ सरकारच्या मते अबदुल्ला भटारी याचे उपनाव अफजलखान होते. (शिवाजी पृ. ५८). ते म्हणतात की, वजीर ही संज्ञा मुख्य प्रधान या अर्थी नसून मोठ्या सरकारी अधिकाऱ्यास ती लावीत. (हाऊस ऑफ शिवाजी, १९४० पृ. ५५). कर्नाटक स्वारीच्या वेळी शहाजीबरोबर हाही रणदुल्लाखानाच्या हाताखाली होता. कनकगिरीच्या हल्ल्याच्या वेळी याने शहाजीचा पुत्र संभाजी यास नीटशी मदत केली नाही. त्या वेळी संभाजी ठार झाला म्हणून शहाजीचा याच्यावर राग होता. प्रतापगडच्या पायथ्याशी शिवाजी–अफजल भेट झाली. तेथे हा मारला गेला (इ. स. १६५९ नोव्हेंबर १०).

३.

गारद—(पो० गार्दा; इं० गार्ड)–शरीर संरक्षक शिपाई. हे पुढील कालात होते. हा कालनिर्देशप्रमाद म्हणता येईल.

भोपे—(पु० का० बोप्पी)—देवीचा शूद्रजातीय पुजारी. देवी भोपे यांनी पळविल्याचे चिटणीस सांगतात; पण सभासद म्हणतो 'श्रीभवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून, जातियांत घालून, भरडून पीठ केलें.' रियासतकारांचा त्यास दुजोरा आहे. (श. शि. पृ. ६६). शेडगावकर बखरीत असेच म्हटले आहे. (म. द. रु. १ पृ. २५). 'तुळजापुरीं त्याणें श्रीदेवीस उपद्रव केला होता.' (मराठी साम्राज्याची छोटी बखर पृ. २५). 'तेथील श्रीची गंडकी मूर्ति होती ती पुजारी यांनीं जळांत गुप्त ठेविली. आणि अन्य नूतन पीठस्थानीं ठेवून पूजा केली. खानानें परम क्रोधें मूर्ति फोडून टाकिली.' (चित्रगुप्त).

तेथून......आले—चिटणिसांचा हा क्रम चुकलेला दिसतो. कारण खान प्रथम पंढरपुरास गेला व नंतर तुळजापुरास गेला. (श. शि. पृ. ६६ व सरकार-शिवाजी पृ. ६१). शेजवलकर म्हणतात की, खानाने हिंदूंच्या देवतांस त्रास दिला असे निश्चितपणे सांगता येत नाही. पंढरपूर व तुळजापूर येथील मूर्ती फार प्राचीन वाटतात. खानास हिंदू सरदारांची मने वळवायची होती. (श्री. शिवछत्रपती पृ. ३५७).

४.

राजगडने निघोन—तृतीयेचा पंचमी विभक्तीबद्दल उपयोग.

५.

कृष्णाजी भास्कर—(इ. स. १६५९ ते १७१२). हा कुळकर्णी असून त्यास तयार करून अफजलखानाने शिवाजीच्या भेटीस प्रतापगडावर पाठविले. खानाच्या वधानंतर हा शिवाजीच्या आश्रयास होता. इ. स. १७०९ मध्ये रामचंद्रपंत अमात्यांनी यास सावंतावर पाठविले होते. शिवकालातील हा हुशार मुत्सद्दी होता. (रा. खं. ८·१). औरंगजेबाकडून याने विशाळगड किल्ला घेतला. संभाजीने ता. २८–१०–१६८० रोजी त्यास दिलेले आज्ञापत्र उपलब्ध आहे. (श. शि. पृ. ६६.)

६.

ते समयीं......दिल्हें—सभासद लिहितो–"तों रात्रीं श्रीभवानी तुळजापूरची [इणें] मूर्तिमंत दर्शन दिलें आणि बोलिली कीं, 'आपण प्रसन्न जाहालों. सर्वस्वें साह्य तुला आहे. तुझे हातें अफजलखान मारवितों. तुजला यश देतों. तूं कांहीं चिंता करूं नको." शेडगावकर बखरीत हाच आशय आहे. इतिहासदृष्ट्या अशी वर्णने प्रमाण मानता येणार नाहीत.

७.

महाराजांनी......बसले—तृतीयान्त कर्त्याचे वाक्य कर्तरि प्रयोगात.

खानाचें सांगणें......चालवूं—'तुमचे बाप महाराज त्यांचा आमचा भाईचारांत पुरातन स्नेह चालला आहे; त्यामुळें तुम्ही कांहीं आपणांस इतर नाहीं. तुम्ही येऊन आपल्यास भेटणें. आपण पादशाहाजवळून तुम्हांस तळकोकणचें राज्य व जाहागिरी देववितों. गडकोट घेतले ते करार करवितों. वरकडही नांवाजितों. जितकें तुमचे मनांत असेल तेणेंप्रमाणें सरंजाम देववितों. पादशाहाशीं भेट घेणें तरी घ्या, नाहीं तरि मुलाजमत माफ करवितों'. (सभासद).

९.

खानाचा विचार......दिसोन येते—खानाचा गुप्त बेत कृष्णाजीपंताने शिवाजीस सांगितला असे चिटणीस म्हणतात. त्यास रियासतकारांची (श. शि.

पृ. ६८) व यदुनाथ सरकारांची (शिवाजी पृ. ६५) पुष्टी आहे; पण हा गौप्यस्फोट शिवाजीचा वकील पंताजीपंत याने खानाकडे जाऊन आल्यावर केला असे सभासदाच्या बखरीत म्हटले आहे. या संदर्भात शिवदिग्विजयात पुढील उल्लेख आहे—'शिवाजीचा एक पांच हजार मावळे लोकांचा नाईक, विश्वासराव नानाजी प्रभु मोसेखोरेंकर हा, (ह्यानें) दररोज रात्रीं फकीराचा वेश घेऊन, अबदुलखानाच्या लष्करांत भिक्षा मागण्या करितां जावें. त्यानें अबदुलखानाचे सव विचार वेळोवेळीं महाराजांस कळवावें. कारस्थान महाराजांस कळलें. (पृ. १५९).

१०.

पंताजीपंत बोकील हिवरेकर—याचे मूळ नांव गोपीनाथ रंगनाथ बोकील, हा शिवाजीच्या पदरचा कारकून होता. सातारा येथील बहिरोपंत पिंगळे यांच्या कुळकर्णाच्या दप्तरात पंताजी गोपीनाथ सरसुभेदार हे नाव एका हुकुमनाम्यावर असल्याचे राजवाडे म्हणतात. (ऐ. प्र. पृ. २७८). पोवाड्यात 'पंताजी तो काका ' असा त्याच्यासंबंधी उल्लेख आढळतो. पंताजी गोपीनाथाच्या शिष्टाईमुळे अफजलखान शिवाजीच्या भेटीस गेला यात शंका नाही. शके १५७८ च्या एका सनदेत पंताजीस 'चिटणीस' असें म्हटले आहे. (वि. ल. भावे-अफजलखान वध.) इ. स. १६४७ च्या सुमारास तो पुणे प्रांताचा मुजुमदार होता. पेशवाईतला सखारामबापू हा याचाच वंशज होय.

१५.

महाराजांनीं......बोलले—तृतीयान्त कर्त्याचे वाक्य कर्तरि प्रयोगात.

१६.

संभाजी राजे......ठेविलीं—शिवाजीने या मंडळींबरोबर अण्णाजी दत्तो सचिव, बाळाजी आवजी 'चिटणीस' व वडील भाऊ संभाजी याचा पाच वर्षांचा मुलगा यांस ठेविले होते. 'पुतण्या उमाजी राजाला। पांचशें लोक दिले त्याला ॥ आणि, सराईत उमाजी। राज्य होईल तुम्हाला ॥' असा उल्लेख अफजलखानाच्या पोवाड्यात आहे. रियासतकार म्हणतात की, 'या साहसांत शिवाजीला अपाय झाला तर उमाजीला राज्य द्यावें, असा बेत होतासा दिसतें.' (श. शि. पृ. ६९).

१७.

गोमाजी नाईक पानसंबळ—हा लुकजी जाधवरावाकडे होता. जिजाबाईच्या बरोबर जी माणसे शहाजीकडे आली, त्यापैकी हा एक विश्वासू मनुष्य होता. प्रतापराव गुजराच्या आधी हा शिवाजीचा सरसेनापती होता. इ. स. १६४६ साली हा पुण्याचा हवालदार होता. पुत्र खंडेराव नाईक राजारामाच्या वेळी उदयास आला.

त्रिंबक भास्कर—हा पुरंदर किल्ल्याचा सुभेदार होता. सिद्दी जोहारने पन्हाळ्यास वेढा दिला असताना नेताजी पालकरास पन्हाळ्यास मदत करता आली नाही. त्यामुळे यास सेनापती नेमून युद्धाचे काम सांगितले व शिवाजी तेथून निसटला. (शि. भा. २६-५४-५५). पन्हाळा सिद्दी जोहाराच्या स्वाधीन करून शिवाजीच्या आज्ञेने तो राजगडास आला. (सदर १८–५७). शके १५८३ मध्ये शृंगारपूरच्या स्वारीत याने शौर्य दाखविले, याबद्दल त्यास शिवाजीने प्रभावली प्रांताचा अधिकारी नेमिले. (सदर ३२–२).

याजप्रमाणें सिद्ध जाले—शिवाजीच्या पोषाकाचे वर्णन अन्यत्र असे आढळते. 'सिवाजी राजे यांणी आंगीं चिलखत त्यावरी बखतर डोईस टोप डावे हातीं बिचवा अस्तनींत नवटाकी पटा येश्या मजबूदीने गडावर खबरदारी करून' [९१ कलमी बखर क० ३४ (राजवाडे)]. 'बिचवा, वाघनख, नवटाकी तरवार मजबुतीने घेतली.' [सदर (साने)]. 'नंतर डोईस 'जिरेटोप व आंगांत लोखंडी बखतर त्याचे आंत बारीक जरी दुडी (?) आंगांत घातली आणि कंबरबस्ता करून हातात एक बिचवा व एक वागनख डावे हातात चढविले.' (शेडगावकर बखर). 'अंगीं बख्तर, वरती झगा, पायांत चोळणा, वरती विजार, त्याजवरी काचा भिडविला. डोईस जिरें घालून, वरती पागोटें खिडकीदार पोख्त मराठी चालीचे, शंभर हात लांबीचें बांधलें. मग कंबर कसून, डावे हातीं वाघनखें, जहरी विषाचें पाणी देऊन, किंचित् लागतांच प्राण हरण करणार, अशीं हातांत चढविलीं.' उजवे हातीं पट्टा व खंजीर, बिचवा दाबेस लाविला.' (शिवदिग्विजय).

१९.

जवळ खिजमतगार......लोक घेऊन—'बराबर जिऊ महाला म्हणून मरदाना होता. त्याजवळ एक पट्टा व एक फिरंग व ढाल तैसाच संभाजी कावजी

महालदाराजवळ पट्टा व फिरंग व ढाल ऐसे दोघे माणसें मर्दानी आपणांबराबरि भेटीस घेतलीं'. (सभासद). चिटणिसांच्या बखरीत जिवबा महालाचा उल्लेख पुढे आला आहे. (परि. २०).

२०.

खानांनींच......केला–मराठी बखरी व पोवाडे या सर्वांचा एकमुखी अभिप्राय खानाने कपट करून दगा केला असा आहे. काफीखान व इतर मुसुल्मान इतिहासकार तसेच डॉ. फ्रॉयर, स्कॉट, ग्रँट डफ, फॉरेस्ट व बुंदेल्याची बखर यांच्या मते शिवाजीने खानास विश्वासघाताने मारले. 'भेटी समई येकांगी करून अफजलखान जिवे मारिला' असे जेधे शकावली म्हणते. येकांगी करून याचा अर्थ द्वंद्वयुद्ध किंवा पृथक युद्ध करून असा आहे. यावरून शिवाजी विश्वासघाताच्या आरोपाबाबतीत निर्दोष मानिला पाहिजे. रियासतकार म्हणतात की, 'प्रथम आलिंगन देतांना खानानें शिवाजीस आपल्या डाव्या बगलेंत आवळून धरिलें.' (श. शि. पृ. ६९). यावरून खान दोषी असल्याचे दिसते. भेटीत शिवाजीचे डोके खानाच्या खांद्यापर्यंत पोचले. तत्क्षणी खानाने त्यास घट्ट आवळले असे यदुनाथ सरकारांचे मत आहे. (सरकार-शिवाजी पृ.६७). यावरून शिवाजीकडे दोष येत नाही असे म्हणता येईल. शेजवलकर म्हणतात की, विजापूरच्या राणीनेच खानाला शिवाजीशी कपटाने वागून त्याचा घात करण्यास सांगितले होते, असे रेव्हिंग्टन म्हणतो. (राजापूर येथील इंग्रज फॅक्टरी रेकार्डमध्ये असलेले व खानाच्या मृत्यूनंतर एक महिन्याने लिहिलेले म्हणजे दि. १०-१२-१६५९चे पत्र). अर्थात् शिवाजीचे यापुढील वर्तन जशास तसे झाले एवढाच नैतिक निष्कर्ष इंग्रजांच्या माहितीवरून निघतो. (श्रीशिवछत्रपती पृ. १०५) चंद्रराव मोरे, अफजलखान, शाइस्तेखान, बाजी घोरपडे, पोर्तुगीज, वाडीकर सावंत वगैरेंशी वागताना शिवाजीने योजिलेले उपाय तत्कालीन जनरीतीच्या व राजकारणाच्या ताजव्याने तोलेले पाहिजेत. (सदर पृ. १७). पंतप्रतिनिधींची बखर यावरील टिपणात भारतवर्षकार म्हणतात की, या भेटीत उभयतांची मने साशंक असून मोकळी नव्हती हे खरे. (भारतवर्ष शके १८१९ अं. ८ पृ.४). वेंगुर्ले फॅक्टरीच्या डच नोंदीत असलेल्या व खानाच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांनी गव्हर्नर जनरलला लिहिलेल्या दि. ५ मे १६६० मधील पत्रात उपरिनिर्दिष्ट रेव्हिंग्टनचाच आशय आहे.

जिवबा माहला–याचे संपूर्ण नाव जिवा महाला संकपाळ असे होते. हा जातीनें न्हावी असून कोंडवळीचा राहणारा होता. (भा. इ. सं. मं. पंचम संमेलन वृत्त ले. ४). तो शिवाजीचा अंगरक्षक होता. सैद बंडा हा अफजलखानाकडून शिवाजीवर चालून आला त्या वेळी याने त्यास ठार मारिले. यावरून 'होता जिवा म्हणून वाचला शिवा' अशी म्हण पडली आहे. हुकुमाची अवज्ञा केल्याबद्दल पुढे शिवाजीने त्यास दूर केले. (सदर पृ. १६–१९).

२१.

खंडोजी (बिन धर्मोजी) खोपडे–हा तर्फ उत्रोलीचा देशमुख होता. भोर तर्फेचे जेधे व याचे वाकडे होते. शिरवळच्या हवालदारापुढे हे दोघेही दोषी आहेत असा निकाल लागून त्यांच्या देशमुखी वतनाची वाटणी झाली. (रा. खं. १५—३०२). आदिलशाहीचा नोकर असूनही याने शिवाजीचे वर्चस्व मान्य केले. अफजलखानाने रोहिडखोऱ्याच्या या खोपडे देशमुखास आपल्याकडे वळविले. जेधे मात्र शिवाजीस अनुकूल होते. 'अफजलखान वाईस राजश्री छत्रपति स्वामीवर चालोन आले ते समयीं खंडोजी खोपडे पारख (फारख) होऊन अफजलखानास भेटले, आणि स्वामीस धरून देतों म्हणऊन कबुलाती केली.' (सदर). खानाच्या वधानंतर खंडोजीचा पाडाव झाला. तेव्हा कान्होजी जेध्याने त्यास अभय देण्याबद्दल शिवाजीस विनविले. शिवाजीने त्यास अभय दिले खरे; पण 'ज्या हाते तरवार धरिली तो हात कापिला ज्या पायाने चालोन गेला तो पाय कापिला.' (जेधे करीना). 'खंडोजी खोपडे रोहीलकर जीवे मारिले' असे ९१ कलमी बखर (कलम ३५ भारतवर्ष) म्हणते. 'खंडोजी खोंपडा पाडाव जाला त्यास राजश्री स्वामीनी शास्त केलीं' असा जेधे शकावलीत मोघम उल्लेख आहे. मुसुल्मानी अखबार खंडोजीस ठार मारल्याचा अभिप्राय देतात असे यदुनाथ सरकार म्हणतात. (सरकार शिवाजी पृ. ६९). रियासतकारांचेही तेच मत आहे. (श. शि. पृ. ७१).

अफजलखान याचा लेंक—फाजिलखान हा अफजलखानाचा पुत्र होता. अफजलखानाच्या वधाच्या वेळी खंडोजी खोपड्याने फाजिलखान व त्याचा कबिला यांना आडमार्गांने पळवून कराड येथे सुरक्षितपणे पोचविले म्हणूनच खंडोजीस शिवाजीने मारले. (श. शि. पृ. ७१). हा अली आदिलशाहा

(दुसरा) याचा सेनापती होता. पन्हाळ्याहून शिवाजी निसटल्यावर याने त्याचा पाठलाग केला होता.

२२.

याप्रमाणें महाराजांनीं......गेले—तृतीयान्त कर्त्याचे वाक्य कर्तरि प्रयोगात.

मातुःश्रींनीं......बोलिलीं—(सदर).

२३.

ऐसे गरीबनवाज!—'पुणें, इंदापुर, चाकण, सुपें, बारामती ऐसे इनाम हिंदु व मुसलमान यांसी आहेत, त्यास पेशजी आपणांस मुकासा असतां, अफजलखानाआधीं जेणें प्रमाणें ज्यास जें पावत असेल त्यास तेणेंप्रमाणें देणें ऐसा तह केला असे. (१८ डिसेंबर इ. स..१६६० चा लेख रा. खं. ८–११).

२५.

प्रतापगडची भवानी—शिवाजीने भवानीच्या मूर्तीसाठी हिमालयातील त्रिशूल गंडकी, श्वेतगंडकी व सरस्वती या तीन नद्यांच्या संगमस्थानची शिला पर्वतचा राजा लीलासेन याच्या मदतीने मिळवली. ही मूर्ती नेपाळातील कारागिरांनी घडविली होती. महाराजांनी रायगडावर प्रथम तिचे दर्शन घेतले व त्यानंतर मोरोपंत पिंगळे याच्याकरवी प्रतापगडास तिची स्थापना करविली. त्याच वेळी उत्सवादिकार्याची पद्धती घालून दिली. देवीचे भोपेपण महाराजांनी स्वतःकडे घेतले व त्याची मुतालकी मंबाजी बिन गोमाजी नाईक पानसरे सोनवणी यास दिली. (पोतदार गौरवग्रंथ, मराठी विभाग, पृ. २८–३७). स्वतःबरोबर नेहमी पूजेसाठी असलेल्या देवीची पूजा करण्याचा आदेश शिवाजीने परमानंद पोलादपूरकर यास दिला होता. (शं. ना. जोशी—छत्रपती श्रीशिवाजीराजे यांची बखर (१९६०) पृ. १२७).

२६.

सिदी जोहर—(मृ. १६६१). हा मूळचा गुलाम होता. अफजलखानाच्या वधानंतर यास अली आदिलशहाने सलाबतखान हा किताब देऊन शिवाजीवर पाठविले. पन्हाळ्यास (कोल्हापुराहून वायव्येस १२ मैल) त्याने वेढा दिल्यावेळी

शिवाजी तेथून निसटला. अली आदिलशहास हा फितुर असल्याचा संशय आला होता. यदुनाथ सरकार म्हणतात की, अडचणीत सापडल्यामुळे शिवाजीने सिद्दीस पत्र लिहून सख्याची बतावणी केली. आदिलशाहीपासून सुटका करून स्वतंत्र सत्ताधीश होण्याची सिद्दीची मनीषा होती. सिद्दीने दरबार भरवून शिवाजीशी सख्यत्वाच्या आणभाका केल्या. अशा रीतीने पन्हाळ्यास नाममात्र वेढा चालू होता. शिवाजी दि. १३ जुलै इ. स. १६६० रोजी पन्हाळ्याहून निसटून विशाळगडास गेला. (शिवाजी पृ. ७५). सिद्दी जोहर हा मुख्य असून फाजिलखान हा दुय्यम होता. (श. शि. पृ. ७५). चिटणीस उलट लिहितात. आदिलशाहीविरुद्ध याने बंड पुकारले. पुढे तो पळून रायचूरकडे गेला व तिकडेच मरण पावला. आदिलशहाने यास पकडून विष देऊन मारिले असे शिवभारतकार म्हणतो. (शि. भा. २८-२१). हा प्रकार इ. स. १६६१ च्या आरंभीचा असला पाहिजे. (श. शि. पृ. ७८).

बाजी प्रभू देशपांडे—(मृत्यू इ. स. १६६०). याच्या पित्याचे नाव पिलाजी. हा हिरडसचा देशकुळकर्णी. हिरडसच्या देशमुखास शिवाजीने मारल्या-वर त्याचा दिवाण बाजी प्रभू याचे शौर्य पाहून यास आपल्या पदरी ठेविले. (श. शि. पृ. ४७). फाजिलखानाच्या सैन्याशी याने निकराची झुंज दिली. शिवाजी विशाळगडावर सुखरूप पोचल्याच्या तोफा ऐकून 'मी आपली कामगिरी बजाविली' असे उद्गार काढून त्याने प्राण सोडला. (रा. खं. १५–३६३). बाजी प्रभू देशपांडे सिंधकर प्रधान हा विशाळगडाखाली घोडखिंडीत दि. १३ जुलै इ. स. १६६० मध्यें पडला. महाराज पन्हाळा 'किलियावरून रांगणा किल्ला येथें चालले' हे चिटणिसाचे विधान बरोबर नाही; कारण ते खेळणा ऊर्फ विशाळगडास गेले. (९१ कलमी बखर-कलम ३९ भारतवर्ष). बाजीच्या मृत्यूनंतर शिवाजीने 'मुलांस अन्न देणें' (सदर) या त्याच्या इच्छेनुसार वडील पुत्र बाबाजी यास त्याची सरदारी दिली. (श. शि. पृ. ७८). त्याच्या मृत्यूनंतर त्याचे प्रेत शत्रूच्या हाती लागू न देता महाराजाकडे पोचते करण्यात आले असे रियासतकार म्हणतात. (सदर पृ. ७७).

२९.

रुस्तूमखान—रुस्तूमजमानखान हा रणदुल्लाखानाचा पुत्र होता. शहाजी व शिवाजी यांच्याबद्दल याचे अनुकूल मत होते. रणदुल्लाखान मरण पावल्यावर

मुस्तफाखानाचा पक्ष बादशहाने उचलून धरला. खवासखानाच्या पक्षाचा हा असल्यामुळे तो कैद झाला. अफजलखानाच्या मृत्यूनंतर कोकण-कोल्हापूर ते कारवारपर्यंतच्या मुलुखाचा बंदोबस्त ठेवण्याचे काम याला दिले. कोल्हापूर-नजीक शिवाजीने याचा २८ डिसेंबर इ. स. १६५९ मध्ये पराभव केला व कोकणातील राजापूर, दाभोळ वगैरे ठिकाणे लुटून तो रायगडास पोचला. (इ. स. १६६०). रुस्तूमखान शिवाजीचा गुप्त मित्र असा त्यावर आरोप येऊन त्याला नोकरीस मुकावे लागले. त्याच्या जागी खवासखानाचा भाऊ मुहंमद इखलास-खान याची नेमणूक झाली. (सरकार-शिवाजी पृ. २२३). यास धाकटा रणदुल्लाखान म्हणतात.

अबदुल करीमखान--(मृत्यू इ. १६७३). हा प्रथम मोगलांकडील खानजहान याच्याकडे आश्रयास होता. खानजहान शहाजहानकडून मारला गेल्यावर हा विजापुरास गेला. यास बंकापूरचा नबाब करण्यात आले. खवास-खानास याने कैद करून विजापूरची सत्ता त्याने काबीज केली. खवासखानास याने ठार केल्यावर सर्जाखानाने यास विरोध केला. बहादुरखानाने त्यास मदत केली. या गलबल्यात सीदी मसाऊदास वजिरीचे अधिकार मिळाले. याने प्रतापराव गुजर यास ठार केले. मात्र हंबीरराव मोहित्यांनी याचा पराभव केला. मसाऊद वजीर होण्यापूर्वी हा २३ डिसेंबर इ. स. १६७७ रोजी मरण पावला. (काव्येतिहाससंग्रह-पत्रे यादी वगैरे. ४३८). याचे बहलोलखान (चवथा) असे दुसरे नाव होते. अबदुल करीमखान व बहलोलखान ही भिन्न व्यक्तींची नावे चिटणीस देतात. वस्तुतः ती एकाच व्यक्तीची नावे होती. (शि. छ. पृ.४२६).

३२.

खेम सावंत--हा फोंड सावंताचा पुत्र होता. याने इ. स. १६२७ साली विजापूरच्या आदिलशहाकडून देशमुखी मिळविली होती. सावंतवाडी-कुडाळ राज्याचा हाच संस्थापक होता.

लखम सावंत--(इ. स. १६५१ ते१६७५). हा खेम सावंताचा पुतण्या होय. याने शिवाजीचे वाढते सामर्थ्य पाहून त्याच्याशी पितांबर शेणवी या वकिलामार्फत दि. ५ मार्च इ. स. १६५९ रोजी तह केला. (का. सं. प. या. ४११). पण त्याने हा करार मोडल्यामुळे शिवाजीने इ. स. १६६२ मध्ये

त्याच्यावर स्वारी केली. सभासद लिहितो की, 'त्यानें विजापुरास सांगून पाठविलें कीं, "फौज घोडा राऊत, हशम मेळवून आपण राजियावरि चालोन जातों आणि कोंकण सोडवितों."' त्या वेळी विजापूरहून खवासखान व बाजी घोरपडे हे त्याच्या मदतीस आले; पण त्या अगोदरच त्याचा पराभव झाल्यामुळे तो फिरंगणात आश्रयास गेला. फिरंग्यास शिवाजीचे भय होते, म्हणून त्याने वकिलामार्फत शिवाजीकडे कौल मागितला. 'आपण सावंत–म्हणजे भोसले यांचा गोत्रज. आपलें तुम्ही चालविणें उचित आहे.' (सभासद). असे त्याने विनंती करताच शिवाजीने कुडाळची देशमुखी त्याच्याकडे ठेविली. (सदर).

बाजी घोरपडे रणीं पडले--घोरपड्यांचा व लखम सावंताचा पराभव शहाजीच्या मृत्यूनंतर एक वर्षाने म्हणजे ऑक्टोबर-नोव्हेंबर इ. स १६६४ मध्ये झाला. (सरकार–शिवाजी पृ. २२६–२२७.)

३५.

सिंधुदुर्ग--तानाजी, मानाजी गंगाजी व सावजी कोळी यांनी सिंधुदुर्गाची जागा शोधली. बांधावयाची सारी युक्ती महाराजांनी सांगितली. गोविंद विश्वनाथ प्रभू सुभेदार कुंभार जुवे यास कामावर ठेविले. तिसरे वर्षीं जंजिरा मुस्तेद (तयार) झाला. नाव सिंधुदुर्ग ठेविले. 'महाराजांवर श्रीअंबेनें व समुद्रानें अद्वितीय कृपा केली. हा सिंधुदुर्ग महाराजांचें हृदयकमलच. सिंधुदुर्ग जंजिरा जगीं अस्मानीं तारा, जैसें मंदिराचें मंडण श्रीतुळसीवृंदावन.' (चित्रगुप्ताची बखर). मार्गशीर्ष वा। शके १५८६ रोजी (दि. २५ ११-१६६४) महाराजांनी खुद्द आपल्या हस्ते किल्ला बांधण्यास मुहूर्त करून चिरा भूमीमध्ये बसविला. (श. शि. पृ. १००).

३६.

हसनूर–यदुनाथ सरकार म्हणतात की, दि. ८ फेब्रुवारी इ. स. १६६५ रोजी शिवाजी कोकणातून बेदनूर प्रांतातील बसरूर या मुख्य बंदरावर चालून गेला. हे बसरूर (संस्कृत-वासुपुर) दक्षिण कानडा जिल्ह्यातील कुंदापूरच्या दक्षिणेस १२ मैलावर आहे. बसरूरचे इंग्रजी नाव बार्सिलोर असे आहे. (शिवाजी पृ. २३०). बसरूर याबद्दल हसनूर हा हस्तदोष दिसतो. जेधे शकावलीत बसनूर असे म्हटले आहे. या बसरूरच्या स्वारीच्या वेळी शिवाप्पा

नाईक बिदनूरकर याने तह केल्याचे चिटणीस लिहितात; पण तो यापूर्वीच (इ. स. १६६०) मरण पावला होता. (सरकार-शिवाजी २२२). शेजवलकर म्हणतात की, उमाजी पंडित हेजीब ही व्यक्ती काल्पनिक नसून खरी असण्याचा संभव आहे. हा प्रसंग इ. स. १६७३त राणी (च) कन्नमाजीच्या कारकीर्दीत घडला असावा; कारण तिने खंडणी देण्याचे कबूल केले होते. (श्रीशिवछत्रपती पृ. ३२१).

३७.

राजारामाचा जन्म—चिटणिसांनी दिलेले राजारामाचे जन्मसाल बरोबर नाही; कारण त्याचा जन्म दि. २४ फेब्रुवारी इ. स. १६७० (शके १५९१) रोजी झाला. (जेधे शकावली, स्थिरबुद्धी राजाराम (१९३६) पृ. १७ व सरकार-शिवाजी पृ. ३८४). चिटणिसाप्रमाणे सभासद सांगतो की, 'तो पालथा उपजला...राजे म्हणूं लागले कीं, "दिल्लीची पातशाही पालथी घालील" असें बोलिले.' शिवदिग्विजयकार असेच म्हणतो की, 'जन्मतेसमयीं पालथें बाळ आलें, तें वृत्त दूतमुखें महाराजांस कळलें, त्याजवरून महाराज बोलले, दिल्लीची पादशाही पुत्र पालथी घालील!' (पृ. २२५). शेडगांवकर बखर म्हणते की, 'जनलोक बोलु लागले की हा शिवाजीराजा चार पादशाई बुडवून पालथ्या घालील' (पृ. ३८).

४०.

दत्ताजी त्रिमल (त्र्यंबक) वाकनीस—शिवाजीचा हा एक विश्वासू सेवक होता· तो शिवाजीबरोबर आग्र्यास गेला होता. तेथील कामगिरीबद्दल 'वाकनिसी दत्ताजीपंतास सांगितली. सरकारकुनामध्यें गणना केली' आणि 'वरघाट वांईपासून कोपल तुगंभद्रा पावेतो देश नेमून दत्ताजीपंत वाकनीस याचे स्वाधीन केला. दत्ताजीपंतास पन्हाळा ठेविलें'. (सभासद). राज्याभिषेक-प्रसंगी सिंहासनाच्या उजवी 'मंत्री' म्हणून त्याचा जाब्ता ठरविण्यात आला. हा शिवाजीबरोबर इ. स. १६७७ मध्ये भागानगरास गेला होता. नोव्हेंबर इ. स. १६७७ मध्ये गोवळकोंड्याच्या सैन्याने दिलीरखान व बहलोलखान यांचा पराभव केल्याची संधी साधून दत्ताजीने हुबळी लुटली. (सरकार-शिवाजी पृ. २९९). याने समर्थांचा गुरुपदेश घेतला होता. (रा. खं. ६ व हनुमंतस्वामींची बखर). हा 'शके १६०० कालयुक्त संवछरे पोश वद्य १०' (दि.२८ डिसेंबर इ. स. १६७८) रोजी मरण पावला. (जेधे शकावली). याच्या नावावर शिवछत्रपतीची

९१ कलमी बखर आहे. वाकनीस् [फा. वाकिआ + नवीस] म्हणजे वृत्तांत लेखक. अख्बार्‌नवीस.

४१.

नेताजी पालकर—(इ. स. १६३३ ते इ. स. १६७६). इ. स. १६५९ मध्ये नेताजीस सर-इ-नोबत हे पद मिळाले. (सरकार-शिवाजी पृ. ५७). हा खंडोबाची पाली (जि. सातारा) येथील रहिवासी होता. शिवाजीने प्रतापगडास अफजलखानाच्या भेटीस येते वेळी नेताजीस 'लष्कर घेऊन वरघाटावरि येणें' म्हणोन सांगितलें. त्याने मोंगलाईत स्वाऱ्या करून बालेघाट......गंगातीरपावेतो मुलूख मारून, खंडण्या घेतल्या. शिवाजीने आग्र्यास जाताना नेताजीस मातुश्रीच्या हवाली केले होते. (सभासद). सीदी जोहरने पन्हाळ्यास वेढा देऊन शिवाजीस अडकविले होते त्या वेळी शत्रूच्या सैन्यावर हल्ला करून त्याने पराभव केला. (शिवभारत २६·३६). सभासद म्हणतो की, या वेळी शिवाजीने नेताजीस 'समयास कैसा पावला नाहीस?' म्हणून शब्द लावून, सरनोबती दूर केली. शिवाजी आग्र्याहून परत आल्यानंतर दिलेला हा प्रसंग बरोबर नसल्यामुळे सभासदाचे विधान मान्य करणे कठीण आहे. शिवाजीचे व त्याचे वाकडे आल्यामुळे तो विजापूरकरांकडे गेला; पण जयसिंगाने त्यास पंचहजारी मनसब देऊन मोगलाकडे वळविले. (दि. २० मार्च इ. स. १६६६) (श. शि. पृ. ११७). शिवाजी आग्ऱ्याहून पळून आल्यावर हा 'दुसरा शिवाजी' म्हणून औरंगजेबाने त्यास कैद केले. त्याने मुसुल्मानी धर्माचा स्वीकार करून मुहंमद कुली असे नाव धारण केले. त्याच्या कुटुंबियांनाही दक्षिणेतून आणवून मुसुल्मानी धर्माची दीक्षा देण्यात आली. पुढे त्यास इ. स. १६६७ साली अफ्गाणिस्थानच्या स्वारीवर दहा वर्षे पाठविले. तो इ. स. १६७६ च्या मेमध्ये शिवाजीकडे आला व त्याने पुनः हिंदुधर्म स्वीकारला. (सरकार–शिवाजी पृ. १५५), मआसिर–इ–आलमगीरी, आलमगीरनामा (शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड ३). जेधे शकावलीत 'शके १५९८ नळनाम संवछरे आशाड वद्य ४ रा (दि. १९ जून इ. स. १६७६) नेतोजी पालकर यानी प्राश्चीत घेतले शुध जाले.' असा उल्लेख आहे. शहाजादा अकबर पालीस असताना संभाजीने नेताजीस हिरोजी फर्जंदबरोबर अकबराचे भेटीस पाठविले होते. (उग्रप्रकृती संभाजी (१९३५) पृ. २८). चिटणिसांच्या 'ते

स्वारीस प्रांतास गेले होते. इकडे जरुरीचें कार्य पडिलें' या मोघम वाक्यावरून निश्चित काळ व प्रसंग समजत नाही. त्यामुळे 'समयास न आले' हे वाक्य निरर्थक दिसते. ९१ कलमी बखर म्हणते की, फाजलखानाने पन्हाळ्यास वेढा घातला असताना (इ. स. १६६०) शिवाजीने त्यावर छापा घातला. तेव्हा 'एके दिवशीं नेतोजीचा मेहुणा रात्रीस मोर्चा मारावयास जातां गैरहजीर झाला....त्या समयीं नेतोजी पालकर यांणीं बहुत रदबदली केली. म्हणोन राजे स्वामी पालकर याजवर इतराजी करून दूर केलें.' (कलम ३८ भारतवर्ष व फॉरेस्ट तर्जुमा). बखरीवरून शिवाजी-नेताजी वितुष्टाची कारणस्पष्टता होऊ शकली नसली, तरी हा प्रसंग इ. स. १६६० मधील नसून जयसिंगाशी तह झाल्यानंतर पन्हाळ्याचाच पण इ. स. १६६६ मधील होय. या बाबतीत इतिहासकारांत एकवाक्यता आहे. फार्सी इतिहासग्रंथांत नेताजीचे नाव 'नथूजी, नेतू' असे आढळते.

प्रतापराव गुजर—(मृत्यू दि. २४ फेब्रुवारी इ. स. १६७४). सीदी जौहर सलाबतखान या विजापुरी सरदाराने इ. स. १६६० मध्ये पन्हाळ्यास वेढा दिला असताना प्रतापरावाने वारंवार हल्ले व छापे घालून विजापुरी सेनेस जेर केले. (श. शि. पृ. ७६). शिवाजीने आग्र्यास जाण्यापूर्वी राज्याच्या व्यवस्थेस मोरोपंत पेशवे, निळोपंत मुजुमदार व प्रतापराव गुजर या विश्वासू मंडळीस नेमिले होते. आग्र्याहून परत आल्यावर शिवाजीने मोगलांशी तह केला. त्या अन्वये 'शके १५९० कीलक संवछरें श्रावण शुध अष्टमी बुधवारी प्रतापराऊ... स्वार होऊन फौजेनिसी औरंगाबादेस गेले' (जे. श.). पण पुढे तह मोडल्यामुळे प्रतापराव राजगडला परत आला. वणी–दिंडोरीच्या लढाईत (इ. स. १६७०) व सालेरीच्या लढाईत (इ. स. १६७२) हा हजर होता. इ. स. १६७३ च्या उमराणीच्या लढाईत बहलोलखानास दया दाखवून प्रतापरावाने सोडिले. त्याबद्दल शिवाजीने त्याची निर्भत्सना केली. यानंतर प्रतापरावाने कर्नाटकावर स्वारी करून हुबळी शहर लुटले. मात्र बहलोलखानाबरोबर झालेल्या नेसरीच्या युद्धात प्रतापराव मरण पावला. शिवाजीची सुरतेवर दुसरी स्वारी झाल्यानंतर (इ. स. १६७०) प्रतापरावाने तेथील रयतेस आणखी एकदा स्वारी करण्याचा धाक घातला होता. (श. शि. पृ. १४७). ते प्रतापरावाच्या मृत्यूनंतर त्याच्या नातेवाइकांना आश्रय देऊन त्याची कन्या (जानकीबाई) ही राजारामास करून घेतली. (सरकार–शिवाजी पृ. १९४).

४२.

व्यंकाजी दत्तो—हा अनाजी दत्तो याचा भाऊ होता. 'वेंकाजी दत्तो मोठे लष्करी नामोशाचे सरदार' असे सभासद म्हणतो. इ. स. १६५९ साली राजपुरीच्या सिदीवर यास पाठविले होते. त्या वेळी 'तीनशें हबशी व्यंकाजीपंतीं मारिले. घोडे पाडाव केले.......कस्त फार केली. बारा जखमा व्यंकाजीपंतांस लागल्या.' (सदर). तेथें तो सुभेदार झाला. इ. स. १६७२ फेब्रुवारीमध्ये मोगलाबरोबर झालेल्या साल्हेरच्या लढाईत फत्ते होऊन आल्याबर शिवाजीने व्यंकाजीपंत व आनंदराव मकाजी यांस अपार बक्षीस दिले.

मकाजी आनंदराव—सभासद म्हणतो की, 'मकाजी आनंदराव म्हणजे महाराज शहाजी यांचा फरजंद पाळलेला.' इ. स. १६७३ मध्ये शिवाजीने पन्हाळा काबीज केल्यावर विजापूरकराकडून बहलोलखान चालून आला. त्या वेळी प्रतापराव गुजराबरोबर मकाजी आनंदरावासही पाठविले होते. (श. शि. पृ. १५३). प्रतापरावाने तेव्हा खानास सोडून दिले होते; पण खान पुनः परत फिरला. प्रतापरावाने नेसरीच्या खिंडीत खानास गाठले. दि. २४ फेब्रुवारी इ. स. १६७४ रोजी प्रतापराव पडला. या वेळीही आनंदराव होताच. बहलोलखानास दिलीरखानाची मदत असल्यामुळे आनंदराव हतबल झाला; पण तेवढ्यात त्याने दक्षिणेतील बंकापुराजवळील संपगाव हे खानाचे जहागिरीचे ठिकाण दि. २३ मार्च इ. १६७४ मध्ये लुटले. तेथून परत येताना खानाने त्याचा पाठलाग केला. आनंदराव युक्तीने तेथून निसटला. इ. स. १६७७ मध्ये शिवाजी भागानगरास गेला तेव्हा हा बरोबर होता. नोव्हेंबर इ. स. १६७९ मधील शिवाजीने मोगलावरील केलेल्या जालनापूरच्या स्वारीत हा जखमी झाला होता.

४३.

बहिरजी नाईक—शिवाजीचा हा मुख्य हेर असून याचे आडनाव जाधव असे होते. ग्रँट डफच्या मते तो रामोशी जातीचा असावा. (मराठ्यांची खबर). त्याने सुरत येथील तपशीलवार माहिती शिवाजीस आणून दिली. नोव्हेंबर इ. स. १६७९ च्या जालनापूरच्या लढाईत शिवाजी मोगलांच्या कचाटीत सापडत असता याने डोंगरातील गुप्त वाटांनी दि. २२ नोव्हेंबर रोजी शिवाजीस पट्टा (विश्रामगड) किल्ल्यावर सुरक्षित पोचविलें. (श. शि. पृ. २०७).

सुरतेवरि स्वारी......गेली.—जानेवारी इ. स. १६६४ मध्ये शिवाजीने

सुरतेवर पहिली स्वारी केली व ऑक्टोबर इ. स. १६७० मध्ये त्याने सुरतेवर दुसरी स्वारी केली. चिटणिसांनी पहिल्या स्वारीची हकीगत न देता या दुसऱ्या स्वारीची हकीगत दिली आहे. वस्तुतः ही स्वारी शिवाजी आग्र्याहून आल्यानंतर झाली होती. (सरकार-शिवाजी पृ. ३८४). चिटणीस ती अगोदर देतात. हा कालक्रम चुकीचा होय.

मोहबतखान—(मृ. १६७२) महाबतखान हा मूळचा रजपूत होता असे कोणी म्हणतात तर तो खान-इ-खानानचा पुत्र होता असे मआसिर-इ-आलमगीरी म्हणते. (सरकारकृत भाषांतर-पृ. ३४२). दि. २८ नोव्हेंबर इ. स. १६७० मध्ये औरंगजेबाने त्याची नेमणूक दक्षिणच्या सुभ्यावर केली. दि. ३ जानेवारी इ. स. १६७१ रोजी जसवंतसिंगाबरोबर बऱ्हाणपुराहून निघून तो औरंगाबादेस शाहाजादा मुअज्जम यास भेटण्यास गेला. त्याच महिन्यात चांदोर येथे दाऊदखानासतो मिळाला व उभयतांनी शिवाजीने घेतलेल्या किल्ले अहिवंतास वेढा दिला. दाऊदखानाने वेढा यशस्वी केल्यामुळे आपले श्रेय गेले म्हणून तो त्याच्यावर रागावला. या वेळी भर पावसात सैन्य मरत असताना हा नृत्यांगनांच्या सहवासात ख्यालीखुशाली करीत होता. (सरकार-शिवाजी पृ. १८१). पुढे प्रतापराव गुजरानें दिलेरखानाचा पराभव केल्यावर यास बादशहाने दिल्लीस बोलाविले. तेथून त्यास अफगाणिस्थानात पाठविले. बुंदेल्याच्या बखरीत यास महाबतखान जहांगिरीचा पुत्र म्हटले आहे. (पृ. १४). शेजवलकर याचे नाव महाबतखान लोहरास्प असे देतात. (शि. छ. पृ. ४२८).

दाऊदखान—दाऊदखान कुरेशी विखनखान शेखजादा याचा पुत्र होता. (मआसिर-इ-आलमगीरी). दिलेरखान व जयसिंग यांच्याबरोबर यास दक्षिणेत पाठविले होते. शिवाजीने काबीज केलेली ठाणी परत मिळविल्यामुळे यास खानदेश-बऱ्हाणपूरचा सुभेदार नेमिले होते. (सदर). अहिवंत किल्ला काबीज करण्यात त्याने यश मिळविले. पण या वेळी त्याला श्रेय मिळाल्यामुळे महाबतखान व याचे संबंध बिघडले. दि. १७ ऑक्टोबर इ. स. १६७० रोजी दिंडोरीच्या लढाईत शिवाजीने याचा पराभव केला होता. (सरकार-शिवाजी पृ. १७५). जून इ. स. १६७१ मध्ये त्यास परत बोलाविले गेले. (सदर पृ. १८१). महाबतखानाच्या हाताखाली काम करण्यात त्याला मानहानी वाटल्यावरून आपणास परत बोलाविण्यात यावे अशी बादशाहाजवळ त्याने याचना केल्याचा उल्लेख अखबारांत असल्याचे यदुनाथ सरकार म्हणतात. (सरकार–शिवाजी. पृ. १८०).

४४.

प्रबळगड--कल्याणात ठाणे बसविल्यानंतर कोकणचा कब्जा शिवाजीने घेतला. (शके १५७९). त्यानंतर 'किले प्रबळगडावरी लोक ठेवून बेहबुदी (मज्बुती) केली' असा जेधे करीन्यात उल्लेख आढळतो; पण यापूर्वीच (इ. स. १६५६ अगोदर) शिवाजीने प्रबळगड घेतला असे पेशवे दफ्तर खंड ३१, पत्र २४ अ-आधारे सिद्ध होते. रायरी घेतल्यानंतर तो घेतला असावा. हा केसरसिंग व जालनापुरास इ. स. १६७९ मध्ये शिवाजीला मोगलांकडून विरोध करणारा (सभासदाने उल्लेखिलेला) केसरसिंग हे एकच काय? तसे असल्यास प्रबळगड मोगलांकडून घेतला असे ठरेल. (शि. छ. पृ. ३१८). मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरीत प्रधानगड असे नाव आढळते. (पृ. २१).

४५.

इखलासखान—(इ. स. १६७२ ते इ. स. १६८९). याचे मूळ नाव अब्दुल मुहम्मद. याचा बाप अब्दुल कादिर (दुसरा बहलोल). इ. स. १६७० च्या दिंडोरीच्या लढाईत हा जखमी झाला. इ. स. १६६९ मध्ये त्यास इखलासखान ही पदवी मिळाली. (मआसिर-इ-आलमगीरी). इ. स. १६७२ च्या साल्हेरच्या लढाईत तो मोगलाकडून लढला. त्यात प्रतापराव गुजराने याचा पराभव केला.

जालनापूर पेठ--शिवाजीची जालनापुरावर स्वारी नोव्हेंबर इ. स. १६७९ मध्ये झाली. त्या वेळी रणमस्तखानाने त्यास सामना दिला होता. (सरकार–शिवाजी पृ. ३८८).

प्रकरण चौथे

२.

साहा वर्षे......दिल्ही होती—शामराजपंताचे पेशवेपद काढून घेतल्यावर 'शके १५८३ (इ. स. १६६१) प्लवग संवछर भाद्रपद शुध षष्टी नरहरी अनंदराऊ यांस पेशवाई दिल्ही,' नंतर मतिमंत महादेव व त्यानंतर 'शके १५८४ (इ. स १६६२) शुभकृतसंवछरे चैत्र बद्य दशमी गुरुवारी मोरोपंतास पेशवाई...दिल्हीं.' (जेधे शकावली). प्रधानपद वा पेशवे हे वस्तुतः सारखेच; पण प्रधानपद चालू राहायचे असल्याने पेशवेपद नवीन निर्माण केले गेले व ते प्रथम नरहरि आनंदराऊ व नंतर मोरोपंतास दिले गेले. (छत्रपति संभाजीमहाराज यांचें चरित्र —वा. सी. बेंद्रे (१९६०) (पृ. ९३-९४).

स्वाधीन तालुका प्रांत......केला–प्रकरण तृतीय, परिच्छेद ४० (पेशवे, सुरनीस व वाकनीस यांच्या नेमणुका).

निळो सोनदेव बहुतकर—(मृत्यु इ. स. १६७२). आबाजी सोनदेवाचा हा धाकटा भाऊ. आबाजीपेक्षा तो अधिक हुशार होता. कोंकणात चांगली व्यवस्था ठेवून सिदीविरुद्ध युद्धात त्याने भाग घेतला. त्याच्याकडे भोरच्या किल्ल्याची सबनिशी होती. राज्याभिषेकापूर्वी हा मुज्मूचे काम करी. शिवाजी आग्र्यास गेल्यावर राज्याची जबाबदारी असलेल्यांपैकी हा एक होता. पुत्र नारोपंत व रामचंद्रपंत.

बाळकृष्णपंत तिमाजी हणमंते—हे भोसल्यांचे एकनिष्ठ सेवक. जिजाबाईच्या गरोदरपणी हे शिवनेरीवर होते. इ. स. १६४२–४३ मध्ये शहाजीने

शिवाजीची रवानगी पुण्यास केल्यावेळी इतर हुशार मंडळींबरोबर बाळकृष्णपंत यास पाठविले. जमाखर्चाच्या कामासाठी अमात्य म्हणून याची नेमणूक झाली. रघुनाथ नारायण हणमंते हा याचा पुतण्या. (श. शि. पृ. २३–३६).

सोनोपंत विश्वनाथ डबीर—(मृत्यू इ. स. १६६४). हा मुत्सद्दी असून शिवाजी व जिजाबाईजवळ होता. तो शहाजहान व औरंगजेब यांच्याकडे वकील म्हणून गेला होता. सोनाजीस परमानंद 'अग्रजन्मा' (ब्राह्मण) असे म्हणतो. पौष वद्य ३० शके १५८६ (दि. ६–१–१६६५) मध्ये 'महाबळेश्वरी जिजाई आऊ(ची) तुळा जाली... सोनाजीपंतीही तुळा केली.' (जेधे शकावली). पुत्र त्रिंबकपंत (रा. खं. ८ व १७).

पंडितराव उपाध्ये...केळे—रघुनाथभट पंडितराव व बाळंभट उपाध्ये असे दिसते. धर्माध्यक्ष पंडितराव असत असे काव्येतिहाससंग्रहकार म्हणतात. (स. च. पृ. १९८). 'रघुनाथ भट बिन बाळंभट' सा० २.

निराजी रावजी—शिवाजीबरोबर हा आग्र्यास गेला होता. गोवळकोंड्याचा तानाशा (अब्दुल हसन) व शिवाजी यांचा तह झाला. त्या वेळी हा वकील होता. दक्षिणचा सुभेदार बहादूरखान याच्याशी याने तह घडवून आणला. (सरकार–शिवाजी पृ. २७३). हा शिवाजीचा राज्याभिषेक झाल्यावर मुख्य न्यायाधीश झाला. भागानगरास तह झाल्यावर 'निराजी राहुजी हेजीब नेहमीं ठेविले. निराजीपंतास तेथेंच मृत्यू जाला. त्याउपर (पुत्र) प्रल्हाद निराजी वकिलीस होतें.' (इ. स. १६७६). (९१ कलमी बखर, कलम ७४, राजवाडे व फॉरेस्ट प्रत).

नीळकंठराव प्रभू (नीलकंठ येसाजी महाडकर)—हा शिवाजीचा पारसनीस होता. जिझिया कर बसविल्याबद्दल शिवाजीने याच्याकडून फारसीत एक पत्र लिहवून औरंगजेबाची कानउघाडणी पुढीलप्रमाणे केली. 'पातशाही पुरातन हिंदूंची आहे. तुमचें दक्षिणेंत कांहीं नाहीं. पातशाही तुमची नाहीं. गरीब अनाथ मुंग्या–चिलटांसारखे त्यांस उपसर्ग करण्यांत आपला मोठेपणा नाहीं. (मावजी व पारसनीस–सनदा पत्रे). आग्र्यास व भागानगरास हा शिवाजीबरोबर होता. इ. स. १६६४–६५ मध्यें याच्या हस्ते दक्षिणेतील मोगल अधिकाऱ्यांस लिहिले की 'आपल्या भूमीचें संरक्षण करणें माझें कर्तव्य आहे... मी आपलें कर्तव्य बजावण्यास कधीं चुकणार नाहीं.' (श. शि. पृ. ९५).

पोतदारीविशीं वचन—प्रकरण १ परिच्छेद १०. (मालोजीस साक्षात्कार).

३.

बारा महाल—वहिली (रथशाला) सभासद देतो. चिटणीस देत नाहीत. वसनागर–जामदारखाना यास चिटणीसांनी महाल म्हटले आहे; पण सभासद त्यास कारखाना म्हणतो.

अठरा कारखाने—(कार्यस्थानं तु कार्खाना–रा० व्य० को०). चिटणीस तांबूलशाला–शराबखाना, रथशाला–गाडीखाना, जिन्नसखाना, नाटकशाला–नटखाना ही नावे देतात तर त्याऐवजी सभासद खजीना, दारूखाना, शहतखाना ही नावे देतो. इतरत्र तासेखाना(तास-घटिका वाजण्याचे स्थान), खलबतखाना (एकांताचे स्थान), सराफखाना (मौल्यवान धातूंचे स्थान) व बंदीखाना (कारागार) ही नावे आढळतात.

४.

रावजी सोमनाथ—इ. स. १६६१ मध्ये राजापूर जिंकल्यावर यास तेथील व्यवस्थेसाठी नेमिले. तो कुडाळचा सुभेदार होता. (शिवकालीन पत्रसारसंग्रह क्र. ९४८). कर्नाटकच्या स्वारीस निघताना शिवाजीने राहुजीस रायगडावर प्रतिनिधी म्हणून ठेविले. (परमानंदकाव्य श्लो. १२४). आग्र्याहून परतल्यावर शिवाजीने मोगलांशी तह करण्यासाठी औरंगाबादेस जी मंडळी पाठविली त्यांत हा होता. शाहाजाद्याने याची भेट घेऊन 'त्या मुलखांत राउजी सोमनाथ सरसुभेदार ठेविले.' (सभासद). मृत्युसमयी शिवाजीजवळ जी भली मंडळी होती तींत हा होता. (सदर).

८.

किल्ले, कोट......त्यांचा बंदोबस्त—'गडावरि हवालदार एक व सबनीस एक सरनोबत एक, असे तिघेजण एका प्रतीचे. जो कारभार करणें तो तिघांनीं एका प्रतीचा करावा. गडावरि गल्ल्याचे, सामानाचें अंबर करावें. त्यास कारखाननीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमानें सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथें, त्या गडाचा घेरा थोर, त्या जागा सात-पांच तट-सरनोबत ठेवावें. त्यांस तट वाटून द्यावे. हुशारी-खबरदारीस त्यांनीं सावध असावें.' (सभासदाची बखर).

दाहा माणसांचा......करून ठेवावे—'गडावरि लोक ठेवावे, त्यांस दाहा

लोकांस एक नाईक करावा. 'नऊ पाईक दाहावा नाईक', येणेंप्रमाणें जातीचे लोक ठेवावे. लोकांत बंदुखी व इटेकरी व तिरंदाज व आडहत्यारी असे लोक मर्दाने चौकशीनें आपण राजियांनीं नजरगुजर [करून] एक एक माणूस पाहून ठेवावें...असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे. एक हवालदाराचे हातीं किल्ला नाहीं. हरएक फितवा—फांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना...नवी पद्धत घातली.' (सदर).

किलियांचा बंदोबस्त......करविला.—शिवकालीन राजनीतीचे प्रतिबिंब आज्ञापत्रात दिसते. 'संपूर्ण राज्याचें सार तें दुर्गें.... गडकोट म्हणजे राज्याचें मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचें बळ. गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षक.' (प्रकरण ८).

१०.

पागा यांचा बंदोबस्त—'पागेचें बळ तोलदार केलें. पागांच्या तोलदारी-खालीं शिलेदार ठेविले. स्वतंत्र बंड कोणाचें चालेना.' (सभासदाची बखर).

पंचहजारी—यासंबंधी सभासद म्हणतो 'दर घोड्यासि बारगीर एक. पंचवीस बारगिरांस...हाल्दार एक...पांच हवाल्यांचा एक 'जुमला'...दाहा जुमले म्हणजे एक हजारी....अशा पांच हजारिया मिळोन एक पांच हजारी.' (सदर).

१२.

बारीक चौकशीने धारे केले—'आगट्या जाळितां अगर रात्रीस दिवा घरांत असेल, अविस्राच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो.' (शिवाजीचे फौजेच्या अधिकाऱ्यांस पत्र. रा. खं. ८–२८).

१३.

आठमाही स्वारी करावी—'आठ महिने बाहेर लष्करांनीं परमुलखांत पोट भरावें. खंडण्या घ्याव्या....मर्दांना सांपडला तरि धरावा...बंईल ओझ्यास मात्र धरावा....चार मास छावणी करावी आणि राजाचे भेटीस दसऱ्यास जावें.' (स. ब.)

१७.

हषम मावळे लोक—'मावळे लोकांत दाहा लोकांत एक नाईक. पन्नास

लोक म्हणजे पंच-नायकी यांस एक हवालदार, दोनतीन हवाले मिळून एक जुमलेदार. दहा जुमले मिळून एक हजारी.....सात हजारिया मिळोन एक सरनौबत येसजी कंक म्हणून केला. (सदर). (पदातिसैन्यं हशमं—रा. व्य. को.).

[मोकासे] न दिल्हे—‘मोकाशी जाहालियानें रयत अफरा होईल आणि बळावेल.’ (सभासद).

१८.

हषम (हशम) फौज—शिबंदी व स्वार, पायदळ व घोडदळ (स.च.पृ. २०२)

गांवगन्ना मोजणी—‘मुलखाची जमीन मोजणी करून धुरंग, झाड, चावर करून आकार केला. पांच हात पांच मुठींची काठी, हात चवदा तसूंचा असावा. हात व मुठी मिळून बैंशी तसूंची लांबी काठीची. वीस काठ्या औरसचौरस त्यांचा बिघा एक. बिघे एकशेंवीस त्यांचा एक चावर.’ (स. ब.).

१९.

देवस्थानें—‘मुसलमानांचे पीर, मसिदी, त्यांचे दिवाबत्ती नैवेद्य स्थान पाहून चालविले.’ (सदर).

२०.

श्रावणमासीं—शिवाजी रामदासांच्या सांगण्यावरून श्रावणमासी कोटिलिंगार्चन करी. पुढे संभाजी व राजाराम यांच्या वेळी ही रीत थोडीफार प्रचारात होती. श्रावणमासात धर्मादाय करण्यासाठी शाहूचा हुकूम होता. कोटिलिंगार्चन ब्राह्मणांकडून करवून तो दोनचार लाख रुपये खर्च करी. पेशवेकालात पुण्यास प्रथम शनवारवाड्यात दक्षिणा दिली जाई. नंतर पर्वतीच्या पायथ्याशी रमणा बांधला. नानासाहेबांनी राज्यविस्ताराबरोबर दक्षिणाही वाढविली. काशीरामेश्वराहून विद्वान येत असत. रामशास्त्री, बाळशास्त्री वगैरे मंडळी परीक्षक असत. रमण्याची चार दारे असून पेशवे स्वहस्ते दक्षिणा वाटीत. अगोदर रमण्यात कोंडून नंतर निरनिराळ्या दारांनी ब्राम्हणांस सोडीत. त्या वेळी दक्षिणा मिळे. पेशवे त्यानंतर प्रदक्षिणा घालीत. तेव्हा बंदोबस्त असे. (खरेशास्त्री ९ वा. खंड वर्णन). चिटणिसांचें हे वर्णन अंशतः पेशवेकालीन होय. हा असंबद्धकाल-निर्देश दिसतो.

२१.

शिरच्छेद—शिवाजीच्या वेळी शिक्षेचे प्रकार कडक असत. 'गडकोटचे मामलेदाराने अथवा हरएकाने स्थळास दगा होये यैसी दुर्बुद्धि धरली आहे यैसे वर्तमान आलें तरी आधी प्रमाणाप्रमाण न पाहतां...तात्काळ बेमुलाहिजा त्याचा शिरच्छेद करावा; आणि तें मस्तक गडोगडीं फिरवावें.' (आज्ञापत्र).

२२.

गारद पायदळ--पेशवेकालात गाडदी (गार्ड) असत. यांत प्रामुख्याने परदेशस्थ व मुसुल्मानांचा भरणा होता. कालनिर्देशप्रमादाचे आणखी एक उदाहरण.

कवायती--माळेस बैल (बैलांच्या माळा), गारद, कवायती हे पेशवेकालीन वर्णन होय.

२७.

भुखन (भूषण) कवी-(इ. स. १६१४ ते इ. स. १७१६). हा काश्यप गोत्री कान्यकुब्ज ब्राह्मण होता. उपनाव त्रिपाठी. त्रिविक्रमपूर येथील राहणारा. याचा पिता रत्नाकर असून चिंतामणी, मतिराम व नीलकंठ किंवा जटाशंकर असे त्याचे भाऊ होते. प्रथम हा चित्रकूट येथील राजाच्या आश्रयास होत. शिवाजी आग्र्याहून सुटून आल्यावर तो रायगडास आला. इ. स. १६६७ ते ७४ या कालात तो शिवाजीजवळ होता. याचे 'शिवराजभूषण' हे काव्य शिवराज्याभिषेकानंतर पंधरा दिवसांनी (शके १५९६ ज्येष्ठ वद्य १३ रविवार) पूर्ण झाले. (शि. च. प्रदीप पृ. ३०६). दुसरे काव्य 'शिवाबावनी' शिवाजीनंतर लिहिले. राज्याभिषेकानंतर तो परत स्वदेशी गेला. इ. स.१७०८ व इ. स. १७१५ या वर्षी तो शाहूच्या भेटीस पुनः इकडे आला होता. (शा. शि. पृ. २२२). याचे एकूण चौदा आश्रयदाते असून त्यांपैकी छत्रसालाखेरीज सर्व शिवाजीच्या मृत्यूनंतरचे होत (शि. छ. पृ. ३९१).

२९.

आपण [पादशाहा] भ्रमर......चंपकवृक्ष होत—'अली नौरंगजेब, चंपा शिवराज है' (शिवाबावनी ३८, ३९). 'चंपकास भ्रमर शिवत नाही' हा कविसंकेत आहे. रूपसौरभसमृद्धिसमेतं चम्पकं प्रति ययुर्न मिलिन्दाः। कामिनस्तु जगृहुस्तदशेषं ग्राहकाहि गुणिनां कति न स्युः॥ भ्रमन् वनान्ते नवमंजरीषु।

न षट्पदो गंधफलीमजिघ्रत् ॥ सा किं न रम्या स च किं न रंता । बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥ (सुभाषित).

३२

संधी–'जसा इंद्रानें वृत्रासुराशीं संधी केला असतां त्याचा संधिसमय पाहून वध केला.' (राजनीती पृ.५१).

विग्रह–'शत्रु...व्यसनी पाहून त्यांशीं तत्कालच विग्रह करावा.' (सदर पृ. ५२)

यान–'शल्यराजा पांडवांकडे साह्यत्वास येत असतां प्रसंगेंकरून कौरव यांजकडे जाणें प्राप्त जहालें' (सदर पृ. ५३).

संस्थान (संश्रय)–'अग्नि जो तो उदकेंच करून विझतो.' (सदर पृ. ५४).

आसन–'त्याचें (शत्रूचे) जें जें बल असेल तें (त्याचे राज्यांत जाऊन) तें छेदावें.' (सदर पृ. ५३)

द्वैधीभाव–(दोन शत्रूंत) 'सबळ दिसेल त्याशीं मिळोन एकास जिंकावें.' (सदर पृ. ५४). 'बलिना सह संधिः अबलेन सह विग्रहः इति प्रकारद्वयं द्वैधम्।' (अमरकोश).

३४.

शत्रू व मित्र–याचे आणखीही एक एक प्रकार आहेत. 'आपले देशाची व त्याचे देशाची सीमा एक ठायीं लागली तो प्राकृत अरि' व 'आपले राज्याचे मध्यें एक राज्य टाकून पलीकडे ज्याचें राज्य आहे (तो) प्राकृत मित्र' (राजनीती पृ. ५५).

३८.

श्री जेजोरीचे देवास नवस–यावरून शिवाजीच्या कार्याला शहाजीचा पाठिंबा होता असे दिसते. या संदर्भात 'स्वामीचे आशीर्वादें आज्ञेनें करणें तें केलें!' (परि. ३९) हे शिवाजीचे वाक्य उल्लेखनीय होय.

३९.

तों महाराज श्रीजेजोरीस आले–'महाराज निघून श्री जेजुरीस गेले.

मागें राजांनीं तयारी करून, वरघाटांनीं बारामतीचे मैदानांत फलटणानजीक निरेवरी मुक्काम केला. तेथें उभयपक्षीं सांडणीस्वार व जासूद, हलकारे, कासीद जाऊन येऊन, वर्तमाम पोंहचवून, भेटीचा नेम आरडगांवाचे पलिकडे माळाखालीं ठराविला...विधियुक्त शिवालयीं पूजा होऊन, राजश्री व महाराज भेटले.' (शिवप्रताप शके १८१७ पृ. १२१). ही भेट इ. स. १६६१–६२ च्या सुमारास झाली असावी. (श. रा. भो. पृ. ८०).

४०.

राजगड, रायगड......पाहावीं–'पुण्यास येऊन, नंतर राजगड, तोरणा, सिंहगड, रायगड, लोहगड, वासोटा, रोहुडा, केळणा वगैरे किल्ले दाखवीत सातारियांत आले. नंतर पनाळा व पावनगड व विशाळगड, बावडा दाखविला.' (शिवप्रताप पृ. १२१).

व्यंकोजी (एकोजी) राजे–(इ. स. १६३० ते इ. स. १६८५). हा मोहित्यांची कन्या व शहाजीची द्वितीय पत्नी तुकाई आऊ–तुकाबाई–हिचा पुत्र होय. हा शिवाजीचा सावत्र भाऊ असून शहाजीच्या मृत्यूनंतर (इ. स. १६६४) बंगळूरचा अधिपती झाला. त्याने सेंगमलास ठार मारून दि. १२ जानेवारी इ. स. १६७६ त तंजावर घेतले. (शिवकालीन पत्रसारसंग्रह १८६२). हा विजापूरचा सेवक म्हणवी, खवासखानाच्या कुडाळस्वारीवर व बहिलोलखानाच्या रांगण्याच्या वेढ्यावर हा शिवाजीविरुद्ध होता. इ. स. १६७७ साली शिवाजी कर्नाटकच्या स्वारीवर असताना तिरुमलवाडी येथे त्याने व्यंकोजीची भेट घेतली. शिवाजीस तो त्याचा वाटा देईना म्हणून शिवाजीने त्याच्या जहागिरीचा मुलूख लुटला. (सभासद व ९१ कलमी बखर ८२ व ८३). हंबीरराव मोहित्याने याचा पराभव केला. त्या वेळी झालेल्या तहात शिवाजीने त्याचा मुलूख, त्याची पत्नी दीपाबाई हिला दिला. व्यंकोजीच्या वागणुकीला कंटाळून रघुनाथपंत शिवाजीकडे आला. तंजावर येथील गादी प्रथम शहाजीने मिळविली असे शिवदिग्विजयकार म्हणतो तर व्यकोजीने ती प्रथम मिळविली असे भोसलवंशादी तामिळग्रंथ म्हणतात. (तंजावरचे राजघराणे पृ. २८–३२). शिवाजीचे याच्याशी वर्तन अत्यंत समजूतदारपणाचे होते. 'गृहकलह बरा नव्हे' असे शिवाजीने त्यास लिहिले. (शि. पत्रसारसंग्रह भाग २, क्र. २३३२).

प्रकरण पाचवे

१.

दिले (ली) ल (र) खान–याचे मूळ नाव अब्दुल. बहादुरखान रोहिल्याचा हा धाकटा भाऊ होता. (सरकार--मआसिर-इ-आलमगीरी पृ. ३३६). इ. स. १६७७ च्या सप्टेंबरात औरंगजेबाने बहादुरखानास बदलून दक्षिणचा कारभार याजवर सोपविला. तत्पूर्वी हा शाहजादा मुअझम याच्या हाताखाली होता. शिवाजी आग्र्याहून निसटून गेल्यामुळे जैसिंगास दक्षिणच्या सुभ्यावरून बादशाहाने काढून त्याच्या जागी शाहजाद्याची नेमणूक केली होती; पण शाहजादा व दिलेलखान यांच्यात वितुष्ट आले. बादशाही दरबारात दिलेलखानाचे वर्चस्व शाहजाद्याला सहन झाले नाही. तो बादशाहाचा हेर असावा असा शाहजाद्याचा ग्रह झाला. (सरकार— शिवाजी पृ. १५८). इ. स. १६६५ एप्रिलच्या पुरंदरच्या वेढ्यात खानाने सोडलेल्या बाणाने मुरारबाजी गतप्राण झाला. जयसिंहाने शिवाजींशी सलूखाचे बोलणे चालविले होते; परंतु खान हट्टी असल्याने त्याने पुरंदरचा वेढा सक्तीने चालविला. खानाने शिवाजीस लिहिले की, तुम्ही एकदा येऊन आमच्याशी सामना करावा. (श. शि. पृ. १०६). संभाजी शिवाजीवर चिडून खानास मिळाला. त्याने त्यास सप्तहजारी मनसब दिली. खान व संभाजी यांनी इ. स. १६७९ मध्ये मराठ्यांकडून भूपाळगड किल्ला (सातारा) घेतला. पुढे खानाने विजापुरास वेढा घातला. या वेळी शिवाजीने विजापूरकरांस मदत केल्यामुळे खान वेढा उठवून दि. १४ नोव्हेंबर इ. स. १६७९ त परत फिरला. पुढे खानाने पन्हाळ्यावर स्वारी केली.

तेव्हा संभाजीचे व त्याचे वाकडे आले. संभाजी गुप्तपणे पळून शिवाजीस मिळाला. या सर्व गोष्टींमुळे बादशाहाने खानास परत बोलावून बहादूरखानास पुन: दक्षिणेत नेमिले. (सदर पृ. २०५). दिलेर (धैर्यवान) खान हा त्याचा किताब होता. आपला पुत्र अकबर यास आपणाविरुद्ध सामील असल्याच्या संशयावरून बादशाहाने त्यास कडक शिक्षा केली. 'शके १६०५ रुधिरोद्गारी संवछरे अश्वीन मासी...दिलेरखानने विश घेऊन देह सोडिला.' (जे. श.).

शायि(इ)स्ता(स्ते)खान–शाहशादा मुअझमच्या जागी औरंगजेबाने इ.स. १६५९मध्ये दक्षिणच्या सुभ्यावर याची नेमणूक केली. दि. २५ फेब्रुवारी इ. स. १६६० रोजी अहमदनगरहून निघून तो पुण्याच्या रोखाने शिवाजीवर चालून आला. (सरकार-शिवाजी पृ. ७७) दि. ७ मे रोजी पुण्यास येऊन तो शिवाजीच्या राजवाड्यात राहिला. ऑगस्टमध्ये त्याने चाकणचा किल्ला सर केला. हा एकनिष्ठ, उद्योगी व अनुभवी होता. शिवाजीशी सलूख करावा असे त्याने बादशाहास सल्ला दिला; पण बादशाहास ते मान्य नव्हते. (श. शि. पृ. ६३). शिवाजीने खानावर हल्ला केल्यावेळी 'खानाच्या मुलानें (अबुल फत्ह) एखाद्या सामान्य शिपायाप्रमाणें खानाला उद्देशून म्हटलें, "हे शिपाया, आपला जीव वचावण्याचें सोडून तूं धोक्यांत कां घालीत आहेस ? हे लोक शोधीत आहेत ते तुला मारण्याकरितां शोधीत नसून शाहिस्तेखानालाच पहात आहेत." या शब्दांमुळे बोलणारा इसमच खान आहे असें समजून खऱ्या खानाला सोडून ते त्याच्या मुलावर तुटून पडले. आणि खान निसटला.' (पत्रसारसंग्रह क्र. ९३८). शायिस्ताखानाला शास्त केल्यावर बादशाहाने त्यास बंगाल्यात निघून जाण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणे तो दि. १ डिसेंबर इ. स. १६६३ रोजी निघून गेला. (श. शि. पृ. ८८). शिवाजी आग्र्यास गेला असता बादशाहाची मामी शायिस्ताखानाची बायको तेथे बादशाहाजवळ होंती. तिची बादशाहास टोचणी लागली की, शिवाजीस एकदम मारून टाकावा. (सदर पृ. १२६).

उद्बक—उझबेक ही तुराणी लोकांच्या तुर्की शाखेपैकी एक उपशाखा आहे. हे लोक तुर्कमेन देशाच्या उत्तरेकडील तुर्कस्तानच्या भागात राहणारे असून त्यांस 'मध्य आशियन तुर्क' असे म्हणतात. हे सुन्नी पंथाचे मुसुल्मान आहेत. हल्ली सोव्हिएट रशियातील हे एक लोकराज्य आहे.

३.

चाकण--चाकण हे नगर-कोंकण रस्त्यावर बोरघाटाहून सुमारे ३१ मैल व पुण्याहून १८ मैल आहे. हा किल्ला (भीमेच्या दक्षिणेस) शहाजीच्या जहागिरीत होता. शाइस्तेखानाने दि. १९ जून इ. स. १६६० मध्ये पुणे सोडले व त्यानंतर चाकणच्या किल्ल्यास वेढा घालून तो दि. १५ ऑगस्ट इ. स. १६६० मध्ये सर केला. (आलमगीर नामा). पुढे शिवाजीने इ. स. १६६९-७० मध्ये तो पुनः घेतला. (शि. छ. पृ. २९६).

४.

याप्रमाणें......असे घेऊन— शिवाजी सिंहगडाहून चंद्र ६ रमजान दि. ५ एप्रिल इ. स. १६६३ रोजी सायंकाळी निघाला. बरोबर बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी हे खेडचे दोन शरीर संरक्षक व अत्यंत विश्वासू असे प्रभु सरदार होते. (श. शि. पृ. ८६ व सरकार शिवाजी पृ. ८७). 'बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशकुलकर्णी, तर्फ खेड, हे दोघे बहुत शाहाणे व शूर, राजियाचे प्रीतीपात्र.' (सभासद).

शास्त करितों...म्हणावें--'शास्ताखानास शास्त केली. पादशाहानें नांव ठेविलें परंतु नांव यथार्थ ठेविलें नाहीं. तें नांव आपण शास्त करून नांव रुजू केलें.' (सभासद).

५.

श्रीकृष्णजीनें......सोडला--कालिया सर्पाला श्रीकृष्णाने आपल्या पावलाची खूण ठेवून सोडिले ही उपमा देण्यासाठीच वरील परिच्छेदात शाहिस्ते खानाच्या बायकोची शिवाजीस प्रार्थना आणिली काय ? या गोष्टी कल्पित आणि अतिशयोक्तीच्या होत. (स. च. पृ. २५७).

६.

फौजेंत फितवा असेल—खानाचा सरदार महाराजा जसवंतसिंग हा दहा हजार घोडेस्वारांचा नायक असूनही खानाच्या मदतीस धावून आला नाही. यामुळेच शिवाजीस यश लाभले अशी मोगल सैन्यात व दक्षिणेत लोकांची समजूत होती. शिवाजीने हे सारे श्रेय आपले आहे असे राजापुरी असलेल्या

रावजी पंडितास लिहिले. 'माझ्यावर हल्ला झाला असताना तू अगोदरच लढून मरण पावला असावास अशी माझी समजूत होती' असे खान जसवंतसिंगास म्हणाला. (सरकार-शिवाजी पृ. ९०).

७.

शास्ताखान यास शास्त करून—पुण्यास आल्यावर (इ. स. १६६३ एप्रिल) शाहिस्तेखानाने सिंहगडास फितूर केला. शिवाजीस हे कळल्यावर त्याने मोरोपंत पेशवे व निळोपंत मुजुमदार यांस राजगडाहून सिंहगडास जाण्याची आज्ञा केली व बरोबर तानाजी मालुसऱ्यास नेण्यास सांगितले. नंतर थोड्याच दिवसांत शिवाजीने खानावर छापा घातला. खान पुण्यास येण्यापूर्वी शिवाजी कोकणात नामदारखानावर जाणार होता; पण सिंहगडास फितूर झाल्यामुळे तो बेत तहकूब करावा लागला. (रा. खं. ८ ले० १२).

९.

शके १५८३......केला—शहाजी तुंगभद्रातीरी (बसवापट्टण जिल्हा) दि. २३ जानेवारी इ. स. १६६४ रोजी मरण पावला. (सरकार-शिवाजी पृ. १००). एकोजी राजे यांनी उत्तरक्रिया सांग केली. (श. रा. भो. पृ. ८१).

महादाने— १. तुलापुरुष. २. हिरण्यगर्भ. ३. ब्रह्मांड. ४. कल्पवृक्ष. ५. गोसहस्र. ६. हिरण्यकामधेनू. ७. हिरण्याश्व. ८. हिरण्याश्वरथ. ९. पंच-लांगलक. १०. धरा. ११. विश्वचक्र. १२. कल्पलता. १३. सप्तसागर. १४. रत्नधेनू. १५. महाभूतघट. १६. (काम) धेनू. कालपुरुष.

महाराजांची छत्री— होदीगि (गे) रे शिमोगा जिल्ह्यातील चन्नगिरी तालुक्यात आहे. येरगटनहल्ळी व त्याच्या पूर्वेकडील होदीगिरे या गावांमध्ये शहाजीचे वृंदावन आहे. (शि. छ. पृ. ३५२).

१०.

मिरजा जैसिंग—(इ. स. १६२१-इ. स. १६६७). हा मानसिंगाच्या वंशापैकी असून अंभेर (अंबर) येथील राजा होता. शहाजहान व औरंगजेब यांच्या दरबारी यास मान होता. औरंगजेबाच्या वाढदिवशी म्हणजे दि. ३० सप्टेंबर इ. स. १६६४ रोजी शिवाजीस पराभूत करण्यासाठी याची नेमणूक

झाली. हंडिया (नर्मदा-दि. ९ जानेवारी १६६५), औरंगाबाद (दि. १३ फेब्रुवारी १६६५) या मार्गे तो पुण्यास दि. ३ मार्च १६६५ रोजी आला व महाराजा जसवंतसिंगाकडून त्याने अधिकारसूत्रे हाती घेतली. (सरकार—शिवाजी पृ. १०२). सासवड येथे त्याने तळ दिला. त्याच्याबरोबर दिलीरखान, दाऊदखान कुरेशी, त्याचा पुत्र कीरतसिंग ही मंडळी असून याचे सैन्य १४००० होते. विजापूरकर, सिदी, गोवेकर व दक्षिणेतील लहान संस्थानिक यांच्याकडे त्याने सख्याचे संधान लाविले. पुढे पुरंदरचा तह करण्यास त्याने शिवाजीस भाग पाडले. शिवाजीने रघुनाथ बल्लाळ अत्रे (पंडितराव) याच्यामार्फत जयसिंगाच्या भेटीचा प्रयत्न केला. जयसिंगाने सन्मानाने शिवाजीस भेट दिली. दिलीरखानास अर्थातच हे आवडले नाही. पुरंदरच्या तहान्वये शिवाजीने सर्व किल्ले मोगलास दिले. आग्र्यास बादशहाच्या भेटीस जाण्यासाठी जयसिंगाने शिवाजीचे मन वळविले व त्याच्या संरक्षणाची हमी घेतली. विजापुरावरील मोहिमेचे अपयश व विशेषतः शिवाजीची आग्र्याहून सुटका या घटनांमुळे बादशाहाची त्याच्यावर इतराजी झाली व त्याच्या जागी मे इ.स. १६६७ मध्ये शाहजादा मुअजमची नेमणूक झाली. अपमानित व दुःखी जयसिंग दक्षिणेतून परतताना वाटेत बऱ्हाणपूर येथे दि. २८ ऑगस्ट इ. स. १६६७ मध्ये मरण पावला.

११.

रायगडनें निघोन—पंचम्यर्थी तृतीयेचा प्रयोग.

१२

महाराजांकडे......पाठविलें—चिटणिसांचे हे विधान बरोबर नाही. कारण शिवाजीने पुरंदर लढविणे अशक्य असल्यामुळे कर्माजी या विश्वासू माणसाबरोबर पत्रे पाठवून व आपल्या मुलामार्फत शरणागती पत्करण्याचा निरोप रघुनाथपंतास पाठवून सख्याचा प्रयत्न केला. परंतु जयसिंग या बाबतीत सर्वस्वी उदासीन होता. (हफ्त अंजुमान—बनारस प्रत ५४ अ व ५५ अ). शिवाजीने कोणत्याही अटीशिवाय स्वतः येऊन शरणागती पत्करल्यानंतरच बादशाही दया त्यास दाखविली जाईल असाच जयसिंगाचा आग्रह होता. (सरकार-शिवाजी पृ. १२०).

१३.

दिल्लीस जावें—जयसिंगाने बादशहास लिहिले की, आदिलशाही व कुतुबशाही यांची आपल्याविरुद्ध मैत्री झाल्यामुळे शिवाजीला कसेहीकरून आपल्याकडे वळविणे आवश्यक होय. त्याचप्रमाणे बादशहाची भेट होणे इष्ट होय. बादशहाकडून याचे अनुकूल उत्तर आल्यावर जयसिंगाने शिवाजीस बादशहाची भेट घेण्यासाठी त्याला अनुकूल करण्याचा उद्योग आरंभिला. (सरकारशिवाजी पृ. १३१). शिवाजी बादशहास भेटण्यास आपणहून कधीच तयार नव्हता. बादशाहास भेटल्यावर दक्षिणेची सुभेदारी मिळेल अशी आशा जयसिंगाने त्यास दाखविली असा बहुतेक मराठी बखरींचा आशय दिसतो; पण बादशाहाने तसे वचन कधीही दिले नव्हते. जयसिंगाने शिवाजीला प्रत्यक्ष तशी आशा दाखविली नसली तरी त्याला मनातून तसे वाटत असावे. बादशहाला सांगून सीदीकडून जंजिरा मिळण्याची शिवाजीला शक्यता वाटत होती म्हणून एका दृष्टीने बादशहाच्या भेटीची त्यास गरज होतीच. जयसिंगाने त्याच्या संरक्षणाची हमी घेतली. शिवाजीचे मंत्रिमंडळ त्याने बादशाहाची भेट घ्यावी यासाठी अनुकूल होते. (सरकार-शिवाजी पृ. १३४).

रघुनाथभट पंडितराव......पाठविलें—रघुनाथ बल्लाळ अत्रे (पंडितराव) यास दि० २० मे इ. स. १६६५ च्या सुमारास पाठविले. (सरकार-शिवाजी पृ. १२०).

१५.

वकिलास निरोप देवविला—रघुनाथ बल्लाळ ९ जून (१६६५) रोजी शिवाजीकडे परत आला. (सदर पृ. १२१).

१६.

वेढा घातला—दिलेलखानाने ३० मार्च (१६६५) रोजी वेढा घातला. (सदर पृ. ३८३).

रुद्रमाळ—रुद्रमाळ किल्ला दि. १४ एप्रिल (१६६५) रोजी मोगलांनी सर केला. (श. शि. पृ. १०४).

नारायणाचे देवळापाशीं—'मोरचे नारायेणपेठेकडून चालिले.' (९१ कलमी बखर—क० ५० राजवाडे प्रत).

मुरार बाजी देशपांडे माहाडकर—(इ. स. १६१६—इ. स. १६६५). हा प्रथम जावळीच्या चंद्रराव मोरे यांच्या पथकात होता. याचा बाप बाजी मुरार हा आदिलशाहीचा उमराव असून विजापूरकरांच्या बाजूने मोगलाविरुद्ध लढला. मुरार बाजीस त्रिंबक, शंकराजी, संभाजी व महादजी असे चार भाऊ असून या वंशास 'पंचबाजीचा वंश' असे म्हणत. मोरे यांच्या पाडावानंतर मुरार बाजी शिवाजीस मिळाला. शिवाजीने त्यास पुरंदरचा किल्लेदार नेमिले. पुरंदरच्या लढ्यात त्याने अद्भुत पराक्रम केला. 'दिलेलखान बोलिला जे, 'अरे, तूं कौल घे. मोठा मर्दाना शिपाई तुज नांवाजितों.' मुरारबाजी बोलिला जे, 'तुझा कौल म्हणजे काय ? मी शिवाजीराजाचा शिपाई, तुझा कौल घेतों कीं काय ?' (सभासद). 'म्हणोन शिताफीने धांवोन खानास आटोपिलें. तों खानानें तिरानें बाण मारिला. मशारनिल्हे समागमें तीनशें माणूस ठार पडलें.' (९१ कलमी बखर–क्र० ५० सानेप्रत)

१८.

[खानास] वरतें घेतलें—यास अन्यत्र आधार नाही.

२०.

भेटीस आले.—दि. ११ जून (१६६५) रोजी सकाळी नऊ वाजता रघुनाथ बल्लाळाने शिवाजी आल्याचे जयसिंगास कळविले. जयसिंगाने उदयराज व उग्रसेन कछवा हे आपले लोक त्याचे स्वागत करण्यासाठी पाठविले. मात्र त्याने सर्व किल्ले परत देत असल्यासच यावे नाहीतर परतावे असा स्पष्ट निरोप शिवाजीस पाठविला. (सरकार–शिवाजी पृ. १२१). या भेटीच्या वेळी मनूची (इटालियन) प्रवासी याची व शिवाजीची गाठ पडली. (श. शि. पृ. १०८). दि. १२ जून (१६६५) रोजी दिलेलखानास शिवाजी भेटला. (सरकार-शिवाजी पृ. १२३).

सिद्दी संबूल (जंजिरेकर)—जंजिऱ्याचा प्रमुख फत्तेखान हा मराठ्यांच्या स्वाऱ्यांमुळे जेर झाला व शिवाजीस शरण येण्याच्या बेतात होता. हे सहन न होऊन सिद्दी संबलने बंड पुकारून खानास कैद केले. मोगलांकडून मनसब व तीन लाखाची जहागीर मिळवून तो जंजिऱ्याचा अधिपती झाला. तो व त्याचे दोघे साथीदार सिद्दी कासिम व सिद्दी खैरियत हे पूर्वी फत्तेखानाचे हबशी

गुलाम होते. याकूतखान हा सिद्दी संबलचा किताब होता. फत्तेखान इ. स. १६७४ पर्यंत अधिकारावर होता. सिद्दी संबल मात्र इ. स. १६७१ पासून आरमाराचा अधिपती होता. (सरकार-शिवाजी पृ. २५१). एप्रिल (१६७६) मध्ये सिद्दी कासिमने त्यास आरमाराधिपतीच्या पदावरून दूर केले व कासिम दंडराजपुरीचा सुभेदार झाला. मोगल आरमार मात्र संबलच्या ताब्यात होते. त्या दोघांच्या भांडणाचा निकाल दिल्लीहून इ. स. १६७७ मध्ये लागून कासिम हा आरमाराचा प्रमुख झाला. इंग्रजांनीही कासिम यास पाठिंबा दिला. संबलने कंटाळून शिवाजीचा आश्रय घेतला. त्याचा पुतण्या सिद्दी मिस्री हा मोठा पराक्रमी होता. (सदर पृ. २५८).

२१.

सतावीस किल्ले—दि. १२ जून १६६५ च्या पुरंदर येथील तहान्वये शिवाजीने मोगलांना पुढील तेवीस किल्ले देण्याचे ठरले होते. १. पुरंदर २. रुद्रमाळ ३. कोंढाणा ४. खंडागळा ५. लोहगड ६. ईसागड ७. पतकी (तुंग) ८. तिकोना ९. रोहिडा १०. नारदुर्ग ११. मामोली (माहोली) १२. भंडारदुर्ग १३. पकसखोल (पळसखोल) १४. रूपगड १५. बक्तगड १६. मोरबखन १७ माणिकगड १८ सरूपगड १९. साकरगड २०. मरकगड २१. अंकोला २२. सोनगड २३. मानगड. (आलमगीरनामा, ९०५).

२२.

पेडगावीं......खान राहिले—जयसिंगानंतर आलेल्या जाफरखान या सुभेदाराने पेडगावी तळाची जागा केली. दिलेलखानाने नव्हे. (स. च. पृ. २६१).

२३.

राजे......येते जाले—पन्हाळा या वेळी विजापुरी सरदार सिद्दी मसूद व रणदुल्लाखान यांच्या ताब्यात होता. तेथे शिवाजीस तीव्र प्रतिकार झाल्यामुळे तो परत फिरला व खेळण्यास (विशाळगडास) आला. (हफ्त अंजुमान ८४ ब व ८५ अ; आलमगीरनामा १००२).

रात्रीसच......गेले—याला अन्यत्र आधार नाही. किल्लेकऱ्यांची परीक्षा शिवाजीने कधी केली न कळे; पण ती या वेळी केली नाही. (स. च. पृ. २६१).

२६.

राजारामसाहेब यांस ठेविलें—वस्तुतः राजारामाचा जन्म पुढे चार वर्षांनी म्हणजे दि. २४ फेब्रुवारी इ. स. १६७० रोजी रायगडावर झाला. (स्थिरबुद्धी राजाराम (१९३६) पृ. १७). राजारामऐवजीं 'राजमाता' असा काही तरी शब्द असावा. (वि. स. वाकसकर–शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर (१९३०) पृ. ९५ टीप). प्रकरण ३ परिच्छेद ३७, टीप पाहा.

मोरो पंडित पेशवे......सर्वाध्यक्ष—मुख्य कारभार त्याने (शिवाजीने) जिजाबाईवर सोपविला. प्रधान मोरोपंत, मुजुमदार निळो सोनदेव व सेनापती प्रतापराव गुजर या तिघांनी सर्वत्र दृष्टी ठेवून जिजाबाईचे आज्ञेने वर्तावे असे मंत्रिमंडळ त्याने ठरवून दिले. (श. शि. पृ. १२२. सरकार–शिवाजी पृ.१३४).

त्रिंबक सोनदेव डबीर—सोनोपंत डबीराचा हा मुलगा होता. हा शिवाजीबरोबर आग्र्यास गेला. शिवाजी निघून गेल्यावर हा व रघुनाथपंत कोरडे हे बादशाहाच्या कैदेत होते. दि. ३ एप्रिल इ. स. १६६७ रोजी त्यांची सुटका झाली. (श. शि. पृ. ५९). त्यांच्या मार्फतच शिवाजीने औरंगजेबाशी सख्य केले. (शेजवलकर–श्रीशिवछत्रपती पृ. १२३). याचा पुत्र रामचंद्रपंत हा राज्याभिषेकाच्या वेळी सुमंत होता. (सभासद).

तिकडे......पावले—शिवाजी राजगडाहून दि. ५ मार्च इ. स. १६६६ रोजी उत्तरेकडे जाण्यासाठी निघाला. बादशाहाने खर्चासाठी दक्षिणेतील खजीन्यातून एक लाख रुपये मंजूर केले. गाजीबेग या जयसिंगाच्या फौजेतील अधिकाऱ्यास शिवाजीबरोबर दिले होते. दि. ५ एप्रिल रोजी आग्र्याहून जाफरखानमार्फत वाटेत बादशाहाकडून त्यास पत्र आले. त्यात आपल्यावर पूर्ण विश्वास ठेवून ताबडतोब येण्याविषयी लिहून त्यास खिलत (सन्मानाचा पोशाख) पाठविल्याचे लिहिले. कुमार रामसिंग हा या वेळी जयसिंगाचा आग्रा येथे प्रतिनिधी असून शिवाजीच्या या भेटीचा विश्वस्त होता. रामसिंगाच्या सूचनेप्रमाणे शिवाजी दि. ११ मे (१६६६) रोजी आग्रा येथे पोचला. (सरकार–शिवाजी पृ. १३४–१३५; व हाऊस ऑफ शिवाजी (१९४०) पृ. १३२).

२७.

जाऊन पावलियावरि—जयसिंगाने शिवाजीबरोबर दक्षिणेतून पाठविलेल्या तेजसिंग कछवा याने रामसिंगाची गाठ घालून दिली. (सरकार–शिवाजी पृ.१४०).

त्याप्रमाणें......नेले—दि. १२ मे इ. स. १६६६ रोजी रामसिंगाने शिवाजीस बादशाहाच्या दरबारात नेले. (सदर पृ. ३८४.) हा बादशाहाचा वाढदिवस होता (हाऊस ऑफ शिवाजी पृ. १३५).

२८.

मारवाडकर जसवंतसिंग......बसले—'जसवंतसिंग महाराज, नव कोट मारवाडचा राजा, त्याचे शेजारीं खालते उभे राहावयासाठीं हूकूम [पातशाहानीं] केला. राजे व पुत्र उभे राहिले.' (सभासद). जसवंतसिंगाच्या मागे व बराच वेळ उभे राहावे लागले म्हणून शिवाजीला अपमान वाटला. (सरकार–शिवाजी पृ. १४१). तो म्हणाला–'जसवंतसिंगासारखा उमराव! याच्या पाठी माझ्या लष्करांनीं पाहिल्या असतील!! याचे खालें आपण उभें राहावें म्हणजे काय?' (सभासद).

'दक्षणी राजे........नाहीं'—'जंगली वाघ हयवान, त्यास गर्मी जाहाला. कांहीं करीणा जाहाला.' (सभासद) (सरकार–शिवाजी पृ. १४२).

हवेली...... देवविली.—आग्र्याचा कोतवाल सिद्दी फुलादखान यास बादशाहाने हुकूम केला की, शिवाजीस रदानदाजखानाच्या हवेलीत ठेवावे. आग्र्याचा किल्ला व बादशाहाचे कैदी यांची व्यवस्था रदानदाजखानाकडे होती. (सरकार–शिवाजी पृ. १४३).

२९.

निरोप देणें......नाहीं—शिवाजीस ठार मारावे नाहीतर त्याला पक्क्या बंदोबस्तात ठेवावे असा विचार बादशाहा व त्याचे अंतस्थ मंत्रिमंडळ यांच्यात ठरले. (सदर).

३०.

जाफरखान अमीर—(मृत्यू इ. स. १६७०). हा सादिकखानाचा मुलगा असून शहाजहानचा मीरबक्षी व औरंगजेबाचा इ. स. १६६२ च्या सुमारास मुख्य वजीर होता. शाहिस्ताखानाची बहीण याची पत्नी होती. शिवाजीने याच्यामार्फत सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला. दि. २० मे (इ. स. १६६६) रोजी जाफरखानाने आपली सुटका व्हावी ही शिवाजीची कैफियत बादशाहापुढे मांडली. (हाऊस ऑफ शिवाजी पृ. १४३).

३४.

याप्रमाणें......बसला—हिरोजी फरजंदास निजवून 'एक पोरगा रगडावयास ठेविला.' (सभासद).

महाराज व सर्व निघाले......राहिले—दि. १९ ऑगस्ट इ. स. १९६६ रोजी शिवाजी निसटला. प्रथम शहराबाहेर एकांत स्थळी येऊन तेथे बंग्यावाहकांस रजा दिली. तेथून सहा मैल असलेल्या गावी निराजी रावजी घोडे घेऊन तयार होता. तेथे संभाजीसह आले. तेथील एका जंगलात बेत ठरवून निराजी रावजी, दत्ता (जी) त्रिंबक व राघो मित्रा या सर्वांसह बैराग्याचे वेष घेऊन मथुरेकडे रवाना झाले व इतर मंडळी दुसऱ्या मार्गाने गेली. (सरकार-शिवाजी पृ. १४८). या पूर्वी रामसिंगाने बादशाहाकडून मिळवून दिलेल्या दस्तकान्वये (पासपोर्ट) शिवाजीने 'पागा व मावले वगैरे लोक देशास वाटे लाविले.' (९१ कलमी बखर—क्र० ५४ राजवाडे प्रत).

३५.

रामसिंग ...... धरिला–'शके १५८८ पराभव संवछरें श्रावण वद्य अमवाशेस त्रिंबकपंत व रघुनाथपंत कोरडे अगरा धरिले.' (जे. श.) पकडलेल्या ब्राह्मणांनी रामसिंगाच्या सल्ल्यानेच शिवाजी निसटल्याचे सांगितले.' त्याप्रमाणे रामसिंगवर बादशाहाची इतराजी होऊन त्यास दरबार बंद झाला व नंतर त्यास बडतर्फ केले. पुढे जयसिंगाच्या मृत्यूनंतर त्याच्यावर कृपा होऊन चार हजारांची मनसब त्यास मिळाली. आसामच्या मोहिमेवर त्यास पाठविले असता दुर्धर रोगाने तो मरण पावला. (आलमगीरनामा १०५१).

३६.

तेथून कुरुक्षेत्रास......पावले–शिवाजीचा मार्ग मथुरा, प्रयाग काशी, गया, गोंडवन, हैद्राबाद, विजापूर व राजगड असा असून तो दि० १२ सप्टेंबर इ. स. १६६६ रोजी परत आला. आग्र्याहून सुटल्यानंतर सुमारे २५ दिवसांनी तो स्वगृही पोचला. (सरकार-शिवाजी (पृ. १५५-१५७). दि० ११ डिसेंबर इ. स. १६६६ (शिवापूर यादी).

तेलंगराव सरदार–शिवाजीच्या शिलेदारांपैकी हा होता. (सभासद)

४३.

सत्तावीस किल्ले......बागलाण घेतलें–इ. स. १६७० च्या मार्चमध्ये पुरंदर व कल्याण, मेमध्ये लोहगड व जूनमध्ये माहुली, कर्नाळ व रोहिडा हे किल्ले घेतले. डिसेंबरमध्ये अहिवंत, मार्कंड, रवळा व जवळा हे बागलाणातील किल्ले घेऊन शिवाजीने खानदेशावर स्वारी केली. खानदेशची राजधानी बऱ्हाणपूर येथून दोन मैलांवर असलेला बहादरपुरा लुटला. त्यानंतर कारंजे लुटले. (सरकार-शिवाजी पृ. १७६ व ३८४). कोंडाणा सर केल्यावर 'सवीस गड...चौ महिन्यांनीं घेतले.' (सभासद.)

बहाद(दु)रखान—(मृत्यू इ. स. १६९७). याचे मूळ नाव मीर मलिक हुसेन असे होते. सभासद म्हणतो की, हा 'बहादूरकोका पातशहाचा दूधभाऊ' होता. इ. स. १६७५ मध्ये बादशाहाने त्यास 'खान जहान बहादूर जाफरजंग कोकलताश' ही पदवी देऊन सप्तहजारी केले. इ. स. १६७७ त त्यास दक्षिणेच्या सुभ्यावरून बादशाहाने काढले. त्याच्या जागी शाहजादा आला. त्याची सरदारी व पदवी काढून घेण्यात आली, पण लगेच ती परत दिली. (मआसिर-इ-आलमगीरी) सालेरीच्या युद्धात पराभव झाल्याबद्दल बादशाहाने त्यास दोषी ठरविले. त्यावर त्याने शिवाजीशी तह करणे शहाणपणाचे आहे असे बादशाहास कळविले. (पर्णालपर्वतग्रहणाख्यान अ० २ श्लो० २० ते ५३). कोकलताश हे त्याचे आडनाव असावें; कारण बुंदेल्याच्या बखरीत त्याला उपरिनिर्दिष्ट पदवी मिळण्यापूर्वीच 'कोकलताश बहादुरखान' असे म्हटले आहे. (शेजवलकर-श्रीशिवछत्रपती पृ. ४२७). यास बहादुरखान पहिला व रणमस्तखानास बहादुरखान दुसरा असे म्हणतात. याने तारीख-ई-आसाम ही बखर लिहिली. दिल्लीहून हा शिवाजीवर चालून आला असता, 'राजे बोलिले कीं, "बहादुरखान पेंडीचें गुरूं आहे. त्याचा गुमान काय आहे?"' (सभासद).

४५.

संभाजी राजे......राहावें—'एक सरदार फौज चाकरीस देणें व एक ब्राह्मण देणें.' 'संभाजी राजाचे नांवें हप्त हजारी दौलत द्यावी. पंधरा लक्ष होनांचा मुलूख वऱ्हाड व खानदेश द्यावा असें केलें.' (सभासद).

अनाजी रंगनाथ मळेकर—हा पुरंदरगडचा सबनीस होता. (९१ कलमी बखर क. २८ सानेप्रत). अफजलखानाच्या भेटीच्या वेळी शिवाजीची सदर

सजविण्याचे काम याने केले. (सदर क्र० ३२ राजवाडे प्रत). शिवाजी आग्र्याहून आल्यावर मोगलांशी तह झाला. तेव्हा निराजी रावजी या वकिलाबरोबर हा होता. (सदर क. ६२ राजवाडे प्रत). इ. स. १६७५ च्या सुमारास हा पुरंदरच्या किल्ल्यावर सेनापतीच्या मजमूवर होता. (सदर क्र० ७१ भारतवर्ष प्रत). शिवाजी भागानगरास गेल्या वेळी हा बरोबर होता. व्यंकोजीस भेटण्यास शिवाजी गेला असताः यावेळी हा हजर होता. व्यंकोजीने याचा सत्कार केला. (सदर क्र० ८२ राजवाडे प्रत.) त्याची मळेकर—मलकरे ही चुकीची नावे असून त्याबद्दल मरकळे असे हवे. (शेजवलकर—श्रीशिवछत्रपती पृ. ३५४).

येसाजी मल्हार—औरंगाबादेस मोगलांबरोबर झालेल्या तहाच्या वेळी अनाजी रंगनाथ बरोबर हा होता. येसाजी मल्हार वाईकर असे याचे नाव आढळते. (९१ कलमी बखर क्र० ६२ राजवाडे प्रत). साने प्रतीत येसाजी बल्लाळ व मल्हार वाईकर ही नावे आहेत. फारेस्ट प्रत विसाजी मल्हार हे नाव देते. शिवदिग्विजयात येसाजीपंत वाईकर असे आहे. (शि. दि. श. १८१७ पृ. २८५).

४६.

महाराज यांणीं......घेऊं लागले—तृतीयान्त कर्त्याच्या वाक्याचा कर्तरि प्रयोग.

४७.

परि० ४७—ही परि० ४३ ची पुनरुक्ती दिसते.

४८.

रूमाजी नळगे—रियासतकार म्हणतात की, चांदवडजवळ कणेरागड म्हणून शिवाजीचा किल्ला होता. हशमांचा सरदार रामाजी पांगेरा म्हणून किल्ल्यावर होता. रामाजी पांगेरा व सातशे माणूस उघडे बोडके होऊन लढत असता एक एकास वीस तीस पावेतो जखमा लागल्या. (श. शि. पृ. १४७).

रूपाजी भोसले—हे हिंगणीकर भोसले. रूपाजी व मुधोजी हे शिपाईगिरीचा धंदा करीत. ते प्रथम निजामशाहीत नोकर होते. साल्हेर व उमराणी येथील लढायांत हा मराठ्यांच्या बाजूने लढला. शिवाजीचा हा शिलेदार होता.

(सभासद). इ. स. १६८२ मध्ये रणमस्तखानाने केलेल्या कोकणच्या स्वारीच्या वेळी संभाजीने मोरोपंत पिंगळे याच्याबरोबर यास कल्याणच्या बचावास पाठविले. (उ. सं. पृ. ६०).

सुरेराव (सूर्यराव काकडे)--(मृत्यू इ. स. १६७२). हा शिवाजीचा बालमित्र होता. रोहिडा व जावळी हे किल्ले सर करण्यात याची फार मदत झाली. शिवाजीने 'सुरराव काकडे दोन हजार हासम जावळीवर रवाना केले.' (मोऱ्यांची बखर). 'सूर्यराव म्हणजे सामान्य योद्धा नव्हे. भारती जैसा कर्ण योद्धा त्याच प्रतिभेचा, असा शूर' (सभासद).

हें वर्तमान--सालेरचे युद्ध दि. ५ जानेवारी इ. स. १६७१ रोजी झाले. (सरकार–शिवाजी पृ. ३८५).

४९.

रणमस्तखान--खिजरखान पन्नीचा हा भाऊ. हा इ. स. १६७९ मध्ये जालना येथे मोगलांचा ठाणेदार होता. यास बहादुरखान हा किताब होता. (मआसिर–इ. आलमगीरी २२२ व २३५).

उंबरटी (उमराणी)--उमराणीचे युद्ध दि. १५ एप्रिल इ. स. १६७३ रोजी झाले. (सरकार–शिवाजी पृ. ३८५).

जव (ने) सरी--नेसरीची लढाई दि. २४ फेब्रुवारी इ. स. १६७४ रोजी झाली. (सदर).

हंसाजी (हंबीरराव) मोहिते--याचे उपनाव चव्हाण. हा पंचहजारी सरदार होता. याने इ. स. १६७७ त हुसेनखान मियाना या कोप्पळ जिल्ह्याच्या विजापुरी सरदाराचा पराभव केला. भागानगरास शिवाजीच्या बरोबर हा होता. इ. स. १६७७ त व्यंकोजीचा अहिरी येथे याने पराभव केला. इ. स. १६७९ मध्ये मोगलांबरोबर झालेल्या जालना येथील लढाईत हा जखमी झाला. (सरकार–शिवाजी पृ. ३१४). संभाजी मोगलांकडे पळून गेल्या वेळी याने त्याचा पाठलाग केला होता. इ. स. १६८७ त वाईजवळ झालेल्या लढाईत मोगली सरदार सर्जाखान याचा त्याने पराभव केला; पण हा त्यात मरण पावला. हा सोयराबाईचा भाऊ असून (बेंद्रे–छत्रपती संभाजीमहाराज पृ. १२८ व १५०) कसवे–तळबीड येथील राहणारा होता. (स. च. पृ. २६९).

५१.

संताजी घोरपडे—(मृत्यू जून इ. स. १६९७). बाजी घोरपडे याचा हा पुतण्या होता. हा शिवाजीच्या वेळी उदयास आला. इ. स. १६९१ मध्ये राजारामाने त्यास सेनापती केले. परंतु इ. स. १६९६ मध्ये धनाजीस सेनापती केल्यामुळे उभयतात द्वेष वाढला. मात्र या दोघांनी राजाराम जिंजीस असताना अद्भुत पराक्रम करून मोगलांस जर्जर केले. आपल्या भावास ठार मारल्याबद्दल 'शके १६१९ ईश्वर संवछरे आषाड मासी संताजी घोरपडे यासी नागोजी माने याणी माहादेवाजवल दगा देऊन मारिले.' (जे. श.). पुत्र राणोजी व पिराजी.

धनाजी जाधवराव—(इ. स. १६५० ते इ. स. १७१०). हा लुकजी जाधवरावांच्या घराण्यातील शंभुसिंगाचा मुलगा होता. हा इ. स. १६७३ मधील उमराणीच्या लढाईमुळे प्रसिद्ध झाला. सावनूर येथील युद्धात पराक्रम केल्याबद्दल शिवाजीने यास नावाजिले. हा शाहूस अनुकूल होता. 'औरंगजेबासारखा शत्रु पराभव पावल्याचें यश मशारनिल्हेस प्राप्त झालें' असा ताराबाईचा याच्याविषयीं अभिप्राय होता. (भारतवर्ष, द्वितीयावृत्ती, पत्रयादी अं० ५०). रांगण्याच्या मोहिमेवरून परत येत असता वडगाव (वारणातीर) येथे त्याचा अंत झाला. पुत्र संताजी, चंद्रसेन व शंभुसिंग.

प्रकरण सहावे

दक्षिण-दिग्विजय–जून इ. स. १६७४ मध्ये राज्याभिषेक झाल्यावर पुढे जानेवारी इ. स. १६७७ मध्ये शिवाजी दक्षिणदिग्विजयास म्हणजे कर्नाटकच्या स्वारीवर निघाला. या दृष्टीने 'दक्षिण–दिग्विजय' हे (सहावे) प्रकरण पुढील 'राज्याभिषेक' या (सातव्या) प्रकरणानंतर यावयास पाहिजे. काव्येतिहास-संग्रहकार म्हणतात की, "चिटणिसांनीं 'राज्याभिषेक' हा शेवटचा गोड घांस म्हणून तो विषय शेवटीं सप्तम प्रकरणांत ठेविला असावा." (स. च. पृ. २९५).

१.

श्रीशिवछत्रपती......प्रयत्न केला–औरंगजेब हा प्रथम इ. स. १६३६ ते इ. स. १६४४ पर्यंत व पुन्हा इ. स. १६५३ ते इ. स. १६५८ पर्यंत बादशहाच्या तर्फेने दक्षिणेचा सुभेदार होता. मोगलांची पहिली आगळीक शिवाजीने इ. स. १६५७ च्या उन्हाळ्यात जुन्नर व अहमदनगर या शहरांवर छापा घालून केली. (श. शि. पृ. ४९ व ५०). दि. २१ जुलै इ. स. १६५८ मध्ये औरंगजेब दिल्लीचा बादशाहा झाला. (सरकार-शिवाजी पृ. ३८२).

२.

अष्टप्रधान......असें आहे–'राजा व पट्टराणी राजपुत्र युवराजा ऐसे तीन, अष्टप्रधान व लेखकद्वय ऐसे त्रयोदश यांस राजमंडल ऐसें म्हणावें. अमात्यामध्येंच राजपुत्र याची गणना. यास्तव त्यासही अमात्य ऐसेंच म्हणावें. ऐसे हे राजाचे दोन हस्तच होत.' (चिटणीस-राजनीती पृ. २५).

यदू—ययाती राजास देवयानीपासून झालेला यदू हा ज्येष्ठ पुत्र होता. शुक्राचार्यांच्या शापामुळे ययातीचे तारुण्य नाहीसे झाले. तेव्हा त्याने ते यदूकडे मागितले. त्याने त्यास नकार दिला. त्याचा भाऊ तुर्वसू व ययातीचे शर्मिष्ठेपासून झालेले अनु, द्रुह्यू या पुत्रांनीही तेच उत्तर दिले. आपल्या आज्ञेचा भंग केल्यामुळे ययातीने या तीन्ही पुत्रांना राज्यभ्रष्ट केले; पण शर्मिष्ठेचा सर्वांत धाकटा पुत्र पूरू याने अनुमोदन दिल्यामुळे त्यास ययातीने राज्य दिले. पूरूकुलोत्पन्न ते पौरव व यदुकुलोत्पन्न ते यादव (गवळी). यादवांना छत्रसिंहासनाचा मान नाही. (महाभारत-आदिपर्व, अध्याय ८२, ८३ व ८४).

३.

रामचंद्र (पंत) नीलकंठ अमात्य—(इ. स. १६५० ते इ. स. १७३३). निळो सोनदेवाचा हा मुलगा व मोरोपंत पिंगळे यांचा जावई. (९१ क. ब.—क. ७४ साने). प्रथम हा इ. स. १६६८ मध्ये जंजीरे सिंधुदुर्गावर सबनीस होता. (शि. च. सा. खं. ३–४२६). निळोपंतांच्या मृत्यूनंतर मजमूचे काम यास मिळाले. निळोपंतास "'वडील पुत्र नारोपंत होते ते कांहीं शाहाणे नाहींत. रामचंद्रपंत धाकटे पुत्र, तो शाहाणा. राजियाचा लोभ फार कीं, हा मोठा शाहाणा दैवाचा, भाग्यवंत, बापापेक्षा लक्षगुणीं थोर होईल.' असें म्हणून नारोपंतास मजुमदारी मात्र सांगून हुद्दा चालविला." (सभासद). अण्णाजी दत्तोनंतर सचिवपदही यास मिळाले. (सनदापत्रे पृ. १८६). संभाजीच्या कारकीर्दीत हा सचिवपदावर असावा. शंकराजीपंताला सचिव नेमल्यावर रामचंद्रपंत अमात्य झाला असावा. (शेजवलकर-श्रीशि० छ० पृ. ४०४). एप्रिल इ. स. १६९१ मध्ये तो अमात्य होता. (चाफळ लेखांक ७६). संभाजीच्या पश्चात व राजाराम जिंजीस असताना मराठी राज्याचा सांभाळ करण्यात त्याचे कर्तृत्व प्रगट झाले. त्याच्या नावावर आज्ञापत्र हा राजनीतीपर ग्रंथ आहे. त्यात 'समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हा' असा उल्लेख आढळतो. पुत्र भगवंतराव, मोरेश्वर व शिवराम. (ऐ. घ. वं. पृ. ८७).

५.

रघुनाथ नारायण (हणमंते)—(इ. स. १६५३ ते १६८३). शहाजीच्या पश्चात हा व्यंकोजीच्या जागिरीचा कारभार पाहत होता. यदुनाथ सरकार

आहेत. उदा० शके १५६८ (इ. स. १६४६) मध्ये बादशाही ब्राह्मण हवालदार चंद्रराव मोऱ्यांस 'रामराम' लिहितात व इ. स. १६७७ मध्ये शिवाजी भागानगरहून रा० मालोजी घोरपडे यांस पत्र पाठवितो त्यांत 'जोहार' असें घोरपडे यास लिहितो. (शि. प. सा. सं. क्र. १९०१).

आज्ञा जाली.—शिवाजीने आश्विन शु० १० शके १६०० मध्ये समर्थांना करून दिलेल्या सनदेत पुढील उल्लेख आहे:—'विशेष उपाधीचें कारण काय ? तथापि तुमचें मनीं श्रीची सेवा घडावी हा निश्चय जाहला त्यास यथावकाश जें नेमावेंसें वाटेल तें नेमावें, व पुढें जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसें करीत जावें' याप्रकारें आज्ञा जाहली. (महाराष्ट्र सारस्वत, शके १८७६ पृ. ९६९).

२१.

त्याजवरून......त्यांजपाशीं गेले—त्याउपर संभाजीराजे यांजवर ईतराज जाले श्रीघारपुरी ठेविले पदायास उमा पंडित ठेविले होते तैनाती मावले व स्वार होते. दिलेलखानाकडे राजकारण करून कौल आणून रातोरात निघोन पेडगांवास स्त्रीसहवर्तमान गेले.' (९१ क० ब० क० ६० राजवाडे प्रत). 'शके १५९८ नळनाम संवछरे कार्तीक सुध शष्टी ६ रविवारी राजश्री संभाजी श्रीगारपुरास जाऊन राहिले होते.' (जे. श.). 'एका ब्राह्मण (विवाहित) तरुणीवर हात टाकल्याचा बोभाटा शिवाजीचे कानावर जाऊन त्यानें त्यास पन्हाळगडावर अटकेंत ठेविले. त्यावरून तो शिवाजीवर अत्यंत चिडून गेला; आणि बायको येसूबाईसह ता. १३-१२-१६७८ रोजीं गुप्तपणें पन्हाळ्यावरून निसटून दिलीरखानास भेटण्यासाठी बहादुरगडाकडे गेला...करकंब येथें त्यांची भेट झाली.' (श. शि. पृ २०३-सरकार-शिवाजी, पृ. ३०३). 'संभाजीराजे राजियाचे पुत्र ज्येष्ठ राजियावर रुसून मोगलाईत गेले.' (सभासद). 'संभाजीराजे वर्ष दीड वर्ष रायगडावर नव्हते, इतकेंच नव्हे तर प्रधानमंत्र्याच्या कुटुंबांच्याहि सांनिध्यांत नव्हते, ही एकच गोष्ट बखरकारांच्या लिहिण्यांतील अवास्तवता सिद्ध करते. ...त्यांचा दोस्त शाहा अलम यांचें दक्षिणेंत आगमन हेंच त्यांना या कामीं उद्युक्त करण्यास अधिक कारण झालें असावें.' (बेंद्रे छ. सं. प. पृ. ७६).

भूपाळगड जाऊन घ्यावा—दिलीरखानाने दि. २ एप्रिल इ. स. १६७९ रोजी भूपाळगड काबीज केला. (सरकार-शिवाजी पृ. ३८८). 'सीवाचे लोकांपैकीं

सातशें लोक कैद झाले. प्रत्येकाचा एक हात तोडला...तो किल्ला त्यानें जमीनदोस्त केला.' (बसातीनुस्सलातीन-४७८).

म्हणून......गेले—'किल्लेदारास आज्ञा करून, नरसाला हवालदार यास तोफेचे तोडीं दिल्हा.' (शि. दि. पृ. २६८) 'फिरंगोजी नरसाला भेटीस जातांच गड दिधला म्हणोन तोफेंत देऊन उडविला.' (९१ क. ब. क. ६० राजवाडे प्रत) 'शिवाजीनें त्यास ठपका दिला.' (श. शि. पृ. २०३).

३०.

महाराजांचें दर्शन......घेतलें—संभाजी दिलीरखानास मिळाला तरी एका प्रसंगाने संभाजी त्यास विटला. तो प्रसंग म्हणजे तिकोट्याहून अथणीच्या चढाईचा. अथणी जाळून तेथील तेथील हिंदु रहिवाश्यांस विकून पैसे उकळण्याचा खानाचा डाव होता. संभाजीने त्यास विरोध केला; पण व्यर्थ. (इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्ड–सुरत–१०८, दि. १–१–१६८०). याच वेळेस शिवाजीचे त्यास परत आणण्याचे प्रयत्न सुरू होते. ते यशस्वी होऊन संभाजी आपल्या स्त्रीसह गुप्तपणे पळून विजापुरास मसूदखानाच्या आश्रयास गेला. तेथे शिवाजीचे लोक होते; त्यांच्या मदतीने तो निघून ता. ७ जिल्कादच्या रात्री (१ डिसेंबर इ. स. १६७९) पन्हाळ्यास गेला. (बसातीनुस्सलातीन ५०१). बेंद्रे म्हणतात की, 'येसूबाई मोगलाईत गेलीच नव्हती. ज्याअर्थी एकटी स्त्रीच बरोबर असल्याचा उल्लेख आहे त्याअर्थी ती चंपाच होती यांत संदेह नाहीं.' (छ. सं. म. पृ. ९०). या प्रसंगाच्या संदर्भात शिवाजी व्यंकोजीस लिहितो—'चिरजीव राजश्री संभाजीराजे मोगलाईत गेले होते त्यास आणावयाचा उपाय बहुत प्रकारे केला; त्यासहि कळो आले की ये पातशाहीत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानुरूप चालणार नाही. ऐसें जाणोन त्याणी आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्याची आमची भेट जाली. घरोब्याचे रीतीनें जैसे समाधान करून ये तैसे केले.' (शि. प. सारसंग्रह क्र. २२३६). 'संभाजीराजे भेटले हें वर्तमान पातशहास टाके दाखल जाले दिळेलखानानेंही लेहून पाठविलें होतें. त्यावरून हजुरची तलब आबादी आले जे संभाजी राजे त्याबराबर फौज देऊन बलकटीनें हजुर पाठवणें हें तलब येतांच संभाजीराजे यांजबराबर फौज देऊन रातोरात स्त्रींसहवर्तमान पलविले पठाण इमानी त्यांणीं इमान राखिला' (९१ क. ब.—क. ६१ राजवाडे प्रत). 'आलमगीर बादशहानें संभाजीस हुजूर

बोलाविलें होतें; पण तो अनेक भयांमुळें जाण्यास राजी नव्हता.' (बसातीनुस्खलातीन ५०१).

३१.

त्यांस कारभारी......ठेविलें--'संभाजीचें अंतःकरण निवळेपर्यंत त्यास पन्हाळगडावरील कारभारी बाजी मुरार देशपांडे याचा नातू विठ्ठल त्रिंबक, हिरोजी फर्जंद, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी कंक वगैरे कांहीं मंडळींच्या देखरेखीखालीं ठेवून दिलें, आणि जनार्दनपंत हणमंते खालीं कोप्पळाकडे होता यासही कोल्हापुर प्रांतीं येऊन संभाजीवर नजर ठेवण्याचा हुकूम केला.' (श. शि. पृ. २०६). 'जनार्दन नारायण सरकारकून व सोनोजी नाईक बंकी व बाबाजी ढमढेरे असे ठेविले.' (सभासद)

महाराज......रायगडीं आले--'वाटेंत सज्जनगडास जाऊन ३१ डिसेंबर १६७९ पासून ४ फेब्रुवारी स० १६८० पावेतो समर्थांचा सहवास केला.' (श. शि. पृ. २०६).

३२.

भीमानदी......भिडला--दि. १८ ऑगस्ट इ. स. १६७९ रोजी दिलीरखान विजापूरपासून उत्तरेस ४० मैल असलेले धूळखेड येथे भीमानदी उतरून विजापुरावर चालून गेला. (सरकार शिवाजी पृ. ३१०).

मशाऊद्खान (सिद्दी मसूद)-सीदी जोहर ऊर्फ सलाबतखान याचा हा जावई. दि० १३ जुलै इ. स. १६६० रोजी शिवाजी पन्हाळ्याहून निसटल्यानंतर सीदी जोहरने मसूद व फाजलखान यास शिवाजीच्या पाठलागावर पाठविले; पण शिवाजी विशाळगडावर सुखरूप पोचला. इ. स. १६६३ च्या जूनमध्ये शिवाजीने हस्तगत केलेले दक्षिण कोकणातील कुडाळ काबीज करण्यासाठी अली आदिलशहाने सीदी जोहरचा मुलगा सीदी अजीज व सीदी मसूद यांस शिवाजीवर पाठविले. शिवाय खवासखान व बाजी घोरपडे यांनाही चालून जाण्याचा आदेश दिला. शिवाजीने त्यांचा पराभव केला. बहलोलखानाच्या मृत्यूनंतर मसूद (दक्षणी पक्षाचा नेता) दि. २१ फेब्रुवारी १६७८ ते दि. २१ नोव्हेंबर १६८३ पर्यंत विजापूरचा वजीर होता. (सरकार-हाऊस ऑफ शिवाजी पृ. ५६). मसूद याने दिलीरखानाने कुलबर्गा येथे इ. स. १६७७ च्या

नोव्हेंबरात त्याला तहाच्या घातलेल्या अटी अपमानास्पद वाटल्यामुळे व आदिलशाहीतील अंतस्थ बखेड्यामुळे (पठाणांचे बंड) शिवाजीची मदत मागितली. दिलीरखानास हे नको होते. उलट तो शिवाजीविरुद्ध विजापूरकरांस मदत करण्यास उत्सुक होता. मसूदने शिवाजीस लिहिले की, शत्रूचे बळ वाढले आहे. या वेळी मदत झाली नाही तर किल्ला शत्रूच्या हातात जाईल. शिवाजीने ताबडतोब सहा सात हजार स्वार विजापूरच्या रक्षणासाठी पाठविले. (बसानी-नुस्सलातीन ४७२). दिलेरखान यामुळे चिडला व विजापूर जिंकण्याचा त्याने निश्चय केला; पण दि. १४ नोव्हेंबर इ. स. १६७९ रोजी त्यास वेढा उठवून परत फिरावे लागले. (सरकार-शिवाजी पृ. ३११). औरंगजेबाने विजापुरावर इ. स. १६८५ मध्ये स्वारी केली तेव्हा सिकंदर आदिलशहा व त्याचे सरदार सीदी मसूद, आगा खुस्रू, सर्जाखान व मालोजी घोरपडे हे आवेशाने लढले; पण सिकंदरशहा पुढे इ. स. १६८५ मध्ये शरण गेला व विजापूरचे राज्य नष्ट झाले. (उ. सं. पृ. ८३).

तत्रापी तह......रक्षिलें.—परि० १ टीप पाहा.

महाराज यांणीं......पोहोंचले—तृतीयान्त कर्त्यांचे वाक्य कर्तरि प्रयोगात.

जालनापूर पावेतों—दि. ४-११-१६७९ रोजी शिवाजी सेल्गुरातून बाहेर पडला. त्यानंतर आपण व आनंदराव मकाजी असे मोगली प्रदेशात जाळपोळ करीत दि. १५ नोव्हेंबरच्या सुमारास जालनापूर लुटले. (श. शि. पृ.२०६).

रणमस्तखान—खिजरखान पन्नीचा हा भाऊ. त्यास बहादुरखान हा किताब होता. (मआसिर-इ आलमगीरी २२२, २३५). जालना व अकलूज येथील तो ठाणेदार होता. (सरकार–शिवाजी पृ. ३१४). 'रणमस्तखान यासि कैद करून आणिला'...त्याचे कुमकेस केसरसिंग व सरदारखान व बाजे उमराव असे वीस हजार फौज तीन कोसावर राहिली.' (सभासद).

पट्टियास गेले—'केसरसिंग यानें अंतरंगें सांगून पाठविलें कीं, 'उभयपक्षीं भाऊपणा आहे. आमची गांठ पडली नाहीं तोंवर तुम्हीं कूच करून जाणें.' हें वर्तमान कळतांच राजे तेथून निघाले. लष्कर जड, गिरी मार्गानें जावें अशी तजवीज केली. ते समयीं बहिरजी जासूद यानें कबूल केलें कीं, 'मोंगलांची गांठ न पडतां लष्कर घेऊन ठिकाणास जातों. साहेबीं फिकीर न करणें. तीन रात्रीं खरोन रात्रंदिवस अवकाश न करितां पटागड येथें लष्कर

घेऊन आला. राजे बहिरजी नायकावर खुशाल झाले.' (सभासद). बहीरजी नाईक याने डोगरांतील गुप्त वाटांनी शिवाजीस दि. २२ नोव्हेंबर इ. स. १६७९ रोजी पट्टा (विश्रामगड) किल्ल्यावर (नाशिकहून दक्षिणेस २० मैल) सुरक्षित पोचविले. (श. शि. पृ. २०७).

खानदेश प्रांतीं--दि. २४ ते ३० नोव्हेंबर इ. स. १६७९ या कालात मराठ्यांनी खानदेशवर स्वारी करुन धरणगाव लुटले. (इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्ड, १०८. दि. ८ डिसेंबर इ. स. १६७९) 'वऱ्हाड, खानदेश, माहूर, बागलाण वगैरे बाजूस तें लष्कर गेलें.' (बसातीनुस्सलातीन '५०४)

३३.

दिलेलखान......केली—प्रथमान्त कर्त्याचे वाक्य कर्मणि प्रयोगात.

३४.

दिलेल खान अनाज......जालें—'मुघल लष्करास उपास पडत. शाहझादा मुअज्जम व दिलेरखान यांतील बेबनावामुळे शाहझादा पैसे पाठवीना.' (बसातीनुस्सलातीन ५०३).

विजापूर सोडून......चालला—'शके १६०१ सिधार्थी नाम संवछरें माघ मासी ईदिलशाहाचा मोगलाचा सला जाला विजापूरचा वेढा उठिला.' (जे. श.). पण बसातीनुस्सलानतीनमध्ये पुढील उल्लेख आहे:—'खुद्द शाहझाद्यानें त्यास (मसऊदखानास) गुप्तपणें कळविलें कीं, मला पंचवीस हजार होन दिल्यास मी दिलेरखानास तुमच्या विलायतेंतून बाहेर काढतों. यामुळें तो तह करण्यास राजी झाला नाहीं.' (५०४).

३६.

दिलेलखान......गेला–विजापूरच्या सर्जाखानास घेऊन तो कोप्पळकडचा प्रदेश हस्तगत करण्यासाठी गेला. तेव्हा जनार्दन हणमंते याने त्याचा खरपूस समाचार घेतला. (श. शि. पृ. २०७)

३७.

त्यांणीं तह......घेतले.–जानेवारी इ. स. १६८०मध्ये शिवाजी व्यंकोजीस लिहितो–'त्या करारबावेमधे होसकट व बगळूर व अरणी व चंदाऊर आदीकरून

तुमीचे निसबती आम्ही आपणासीच लाऊन घेतली पेशकसी तोफा तुम्ही निराळा ध्यावा (?)सतत निसबती तुम्हासी लागावी ऐसे केले नाही आवघे आम्हीच मान्य केले. तोफा आम्हीच तुम्हादेखील ध्यावा ऐसा तह ते प्रसंगी करून करारबाब करून सला केला.' (शि. प. सारसंग्रह क्र. २२३६).

३८.

राजाराम याचा विवाह—'प्रतापराव पूर्वील सेनापती होते त्यांची कन्या नवरी नेमस्त केली आणि लग्न सिद्धीतें पात्रविलें. वधूचें [नांव] सौभाग्यवती जानकीबाई असें ठेविलें.' (सभासद). हे लग्न दि. १५ मार्च इ. स. १६८० रोजी झाले. त्यापूर्वी दि. ७ मार्चला त्याची मुंज झाली. (सरकार–शिवाजी पृ. ३८८).

३९.

कांहीं दिवशीं......जाली—दि. २३ मार्च इ. स. १६८० रोजी शिवाजीस ज्वर आला. (सरकार–शिवाजी पृ. ३१७). 'राजे स्वामीस नवज्वर प्राप्त जाहला.' (९१ क. ब.—क० ८९ भारतवर्ष).

४०-

तेव्हां विभाग करून द्यावे—मोगलांकडून संभाजी आल्यानंतर शिवाजीने राज्याची वाटणी अशी केली होती. 'एक चंदीचें राज्य, याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी हें एक राज्य व दुसरें तुंगभद्रा अलीकडे गोदावरी नदीपर्यंत एक राज्य.' शिवाजीने संभाजीस सांगितले "'तूं वडील पुत्र, तुजला कर्नाटकीचें राज्य दिधलें, इकडील राज्य राजारामास देतों.' परंतु संभाजीराजे यांनीं ऐकिलें नाहीं." (सभासद).

संभाजी......होतील—'संभाजी शेवट दगा खाईल. जे गती मलिक अंबर, निजामशाहा [ही] त्याचा पुत्र फत्तेखान मलिका माघारां जाहाला आणि पातशाही बुडविली, तैशीच संभाजीराजा करील. मग राजाराम राज्य करूं लागेल. तेव्हां गमाविलें राज्य साधील. मजपेक्षां पराक्रम विशेष करील...... प्रल्हादपंत निराजीपंतांचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंतांचे पुत्र, हे दोघे ब्राह्मण पराक्रमी होतील. निळोपंत, प्रधानाचा पुत्र, हाही नांव धरील... उरल्यापैकीं संताजी घोरपडे व बहिरजी घोरपडे व धनाजी जाधव हे जरि वांचले तरि हे तिघे मोठे पराक्रम करतील.' (सदर).

ऐसे होत असतां—‘योगाभ्यास करून, आत्मा ब्रह्मांडास नेऊन, दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें.’ (सदर). ‘(सोइरा) बाई साहेबांचे बुद्धीस अविचार-बुद्धि उत्पन्न जाहाली. आणि विष प्रलयेंकरून महाराजांस व्यथित केलें.’ (शि. दि. पृ. ४६२). ‘त्याला गुडघी म्हणून रोग झाला.’ (ग्रँटडफ).

शके १६०२...केला.—शिवाजी रविवार दि. ४ एप्रिल इ. स. १६८० रोजी मरण पावला. (सरकार-शिवाजी पृ. ३१७). ‘रविसुत शनि ऐसें नाम तें वासराला। गणिततिथि सुपर्णा चैत्र मासीं दिनाला। अवतरण शिवानें पूर्ण केलें नृपानें। शतमितिशत सोळा युग्म रौद्राभिधाने ॥ (शि. दि. पृ. ४६७). ‘त्या प्रसंगीं रामचंद्र नीळकंठ, प्रल्हाद निराजी व बाळाजी आवजी एवढेच जुने मुत्सद्दी जवळ होते. पेशवे सचिव वगैरे कोणी नव्हते.’ (श. शि. पृ. २०९)

४१.

ऐसे अनर्थ जाले!—‘ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभुमहादेवीं, तळ्याचे उदक रक्तमय जालें. पाण्यांतील मत्स्य बाहेर पडून अमासवणी उदक जाहालें.’ (सभासद).

४२.

पुतळाबाई—ही मोहित्यांकडील असून शिवाजीची चौथी पत्नी होती. हिचे लग्न शके १५७५ (इ. स. १६५३) मध्ये झाले. ‘शके १६०२ रौद्र नाम संवत्सरे आशाढ शुा येकादसी (२७ जून, १६८०) पुतलाबाई अग्निप्रवेश’ (शिवापूर यादी).

४३.

हे कथा......होईल.—बखरकाराची ही आदरोक्ती होय.

४४.

राजारामसाहेब......करविलें.—प्रल्हाद निराजी, रामचंद्र नीळकंठ व बाळाजी आवजी यांच्या विचारे सोयराबाईने दि. २१ एप्रिल इ. स. १६८० रोजी राजारामास गादीवर बसविले. (उ. सं. पृ. २२).

कालपट

प्रकरण पहिले

परिच्छेद	३	इ. स. ११९३	पृथ्वीराज चौहानाचा पराभव
,,	६	इ. स. १३०२	अल्लाउद्दिनाची चितोडवर स्वारी
,,	७	इ. स. १५५२	मालोजीचा जन्म
,,	४	इ. स. १५६५ जानेवारी २२	विजयनगरचा नाश
,,	८	इ. स. १५९४ मार्च १८	शहाजीचा जन्म
,,	११	इ. स. १६०५ नोव्हेंबर ५	शहाजी-जिजाबाई लग्न
,,	१३	इ. स. १६१९	संभाजीचा जन्म
,,	१८	इ. स. १६२१	मलिकंबराकडून मोगलांचा पाडाव
,,	१९	इ. स. १६२४ नोव्हेंबर	भातवडीची लढाई
,,	१६	इ. स. १६३० फेब्रुवारी १९	शिवाजीचा जन्म
,,	२२	इ. स. १६३३ सप्टेंबर २३	मुरार जगदेवाची तुला
,,	१४	इ. स. १६३६ ऑक्टोबर	शहाजी विजापुरास
,,	२०	इ. स. १६५४	संभाजीचा मृत्यू

प्रकरण दुसरे

परिच्छेद	६	इ. स. १६२६ मे १४	मलिकंबरचा मृत्यू
,,	२१	इ. स. १६३५ ऑक्टोबर	मुरार जगदेवाचा खून
,,	२	इ. स. १६३७ फेब्रुवारी २५	शहाजीस पुण्याची जागीर

परिच्छेद	५	इ. स. १६४० एप्रिल १७	शिवाजी-सईबाई लग्न
,,	१०	इ. स. १६४७ मार्च ७	दादाजी कोंडदेवाचा मृत्यू
,,	९	इ. स. १६४७	शिवाजी तोरणा घेतो
,,	१८	इ. स. १६४८ जुलै २५	शाहाजीस कैद
,,	२२	इ. स. १६४८ ऑक्टोबर ९	शिवाजी पुरंदर घेतो
,,	३८	इ. स. १६४९ एप्रिल ११	शिव-समर्थ भेट
,,	२०	इ. स. १६४९ मे १६	शहाजीची सुटका
,,	२६	इ. स. १६५६ जानेवारी १५	शिवाजी जावळी घेतो
,,	१४	इ. स. १६५६ एप्रिल ६	रायगड सर
,,	२७	इ. स. १६५६	प्रतापगड बांधिला
,,	२२	इ. स. १६५७ एप्रिल २७	नगर लुटले
,,	२८	इ. स. १६५७ एप्रिल ३०	जुन्नर लुटले
,,	२९	इ. स. १६५७ मे १४	संभाजीचा जन्म
,,	२३	इ. स. १६५७ ऑगस्ट २४	शिवाजीची कल्याणवर स्वारी
,,	१९	इ. स. १६५८ जुलै २१	औरंगजेब गादीवर बसतो
,,	२२	इ. स. १६७० फेब्रुवारी ४	कोंडाणा सर

प्रकरण तिसरे

परिच्छेद	४४	इ. स. १६५६ मे	शिवाजी प्रबळगड घेतो
,,	२	इ. स. १६५९ सप्टेंबर	अफजलखान निघतो
,,	२०	इ. स. १६५९ नोव्हेंबर १०	अफजलखानाचा वध
,,	२९	इ. स. १६५९ डिसेंबर २८	रुस्तूमखानाचा पराभव
,,	२६	इ. स. १६६० मार्च २	पन्हाळ्याचा वेढा
,,	,,	इ. स. १६६० जुलै १३	शिवाजी पन्हाळा सोडतो
,,	२७	इ. स. १६६० जुलै १४	बाजी प्रभूचा मृत्यू
,,	२८	इ. स. १६६० जुलै १४	शिवाजी खेळण्यास
,,	२८	इ. स. १६६० सप्टेंबर २२	पन्हाळा आदिलशाहीच्या ताब्यात
,,	२०	इ. स. १६६१	प्रतापगडावर तुळजाभवानीची स्थापना
,,	४३	इ. स. १६६४ जानेवारी ६	शिवाजीची सुरतेवर स्वारी
,,	३२	इ. स. १६६४ ऑक्टोबर २०	बाजी घोरपड्याचा मृत्यू

परिच्छेद	३५	इ. स. १६६४ नोव्हेंबर २५	सिंधुदुर्गाची उभारणी
,,	३०	इ. स. १६६४ नोव्हेंबर	काय सावंताचा पराभव
,,	३४	इ. स. १६६४ नोव्हेंबर	शिवाजी सावंतवाडी घेतो
,,	३६	इ. स. १६६५ फेब्रुवारी ८	बसरूरवर स्वारी
,,	४१	इ. स. १६६६	प्रतापरावास सरनोबतपद
,,	३७	इ. स. १६७० फेब्रुवारी २४	राजारामाचा जन्म
,,	४५	इ. स. १६७० एप्रिल	प्रतापरावाची नगरवर स्वारी
,,	३३	इ. स. १६७५ मे ६	शिवाजी फोंडे घेतो

प्रकरण चौथे

परिच्छेद	४	इ. स. १६६१ मार्च	रावजी सोमनाथ राजापुरास
,,	२	इ. स. १६६२ एप्रिल ३	मोरो त्रिमलास पेशवेपद
,,	३८	इ. स. १६६२	शहाजी-शिवाजी भेट
,,	२७	इ. स. १६६७	भूषण-शिवाजी भेट

प्रकरण पाचवे

परिच्छेद	१	इ. स. १६६० जानेवारी	शायिस्ताखान निघतो
,,	३	इ. स. १६६० ऑगस्ट १५	खान चाकण घेतो
,,	३	इ. स. १६६० ऑगस्ट २६	खान पुण्यास
,,	६	इ. स. १६६३ एप्रिल ५	शायिस्ताखानास शास्त
,,	८	इ. स. १६६४ जानेवारी १५	शायिस्ताखान औरंगाबाद सोडतो
,,	९	इ. स. १६६४ जानेवारी २३	शहाजीचा मृत्यू
,,	१०	इ. स. १६६४ सप्टेंबर ३०	जैसिंग निघतो
,,	१६	इ. स. १६६५ मार्च ३०	पुरंदरचा वेढा
,,	१६	इ. स. १६६५ एप्रिल १४	रुद्रमाळ मोगलांच्या ताब्यात
,,	२०	इ. स. १६६५ जून ११	जैसिंग-शिवाजी भेट
,,	२०	इ. स. १६६५ जून १२	दिलीरखान-शिवाजी भेट
,,	२१	इ. स. १६६५ जून १३	पुरंदरचा तह
,,	२२	इ. स. १६६५ जून १४	शिवाजी जैसिंगाचा निरोप घेतो
,,	२६	इ. स. १६६६ मार्च ५	शिवाजीचे आग्र्यास प्रयाण

परिच्छेद	२७	इ. स. १६६६ मे १२	शिवाजी-औरंगजेब भेट
,,	३४	इ. स. १६६६ ऑगस्ट १९	शिवाजीची सुटका
,,	३६	इ. स. १६६६ सप्टेंबर १२	शिवाजी रायगडास
,,	३८	इ. स. १६६७ मार्च २३	जैसिंग परत जातो
,,	४४	इ. स. १६६७ मार्च २३	शाहजादा मुअज्जमची नेमणूक
,,	४२	इ. स. १६६७	संभाजी-येसूबाई लग्न
,,	४५	इ. स. १६६८ ऑगस्ट ५	प्रतापराव गुजर औरंगाबादेस
,,	४८	इ. स. १६७२ फेब्रुवारी ७	सालेरची लढाई
,,	४९	इ. स. १६७३ एप्रिल १५	उमराणीची लढाई
,,	४९	इ. स. १६७४ फेब्रुवारी २४	प्रतापरावाचा मृत्यू
,,	४३,४७	इ. स. १६७७ नोव्हेंबर	शिवाजी कारंजे लुटतो

प्रकरण सहावे

परिच्छेद	३	इ. स. १६७२	निळो सोनदेवाचा मृत्यू
,,	६	इ. स. १६७६	रघुनाथ हणमंते शिवाजीकडे
,,	८	इ. स. १६७७ जानेवारी	शिवाजी भागानगरकडे
,,	२४	इ. स. १६७७	हुसेनखान मियानाचा पराभव
,,	९	इ. स. १६७७ फेब्रुवारी ५	शिवाजी भागानगरास
,,	११	इ. स. १६७७ मार्च १०	भागानगरहून प्रयाण
,,	११	इ. स. १६७७ मार्च २४	श्रीशैलास आगमन
,,	१३	इ. स. १६७७ मे १५	जिंजी काबीज
,,	१२	इ. स. १६७७ मे २३	वेळूरचा वेढा
,,	१२	इ. स. १६७७ जून २६	शेरखान लोदीचा पराभव
,,	१५	इ. स. १६७७ जुलै १२	शिवाजी-व्यंकोजी भेट
,,	१९	इ. स. १६७७ ऑक्टोबर	अरणी काबीज
,,	१९	इ. स. १६७७ नोव्हेंबर	शिवाजी कोल्हार-बाळापूर प्रांतात
,,	२०	इ. स. १६७७ नोव्हेंबर १६	व्यंकोजीचा मराठी सैन्यावर हल्ला
,,	१९	इ. स. १६७८ जानेवारी १६	शिवाजी लक्ष्मेश्वरास
,,	१९	इ. स. १६७८ जानेवारी २६	बेलवडीचा वेढा
,,	२१	इ. स. १६७८ मार्च १	शिवाजीचे व्यंकोजीस पत्र

परिच्छेद	२२	इ. स. १६७८ मार्च	शिवाजी-व्यंकोजी तह
,,	२३	इ. स. १६७८ एप्रिल ४	शिवाजी पन्हाळ्यास
,,	२३	इ. स. १६७८ मे	रायगडास आगमन

प्रकरण सातवे

परिच्छेद	२६	इ. स. १६७४ जून ६	शिवाजीचा राज्याभिषेक
,,	२७	इ. स. १६७४ जून १८	जिजाबाईचा मृत्यू
,,	२९	इ. स. १६७८ डिसेंबर १३	संभाजी दिलेलखानाकडे
,,	२	इ. स. १६७९ फेब्रुवारी १९	औरंगजेब राजपुतान्यात
,,	२९	इ. स. १६७९ एप्रिल २	दिलेलखान भूपाळगड घेतो
,,	३२	इ. स. १६७९ ऑगस्ट १८	दिलेलखान विजापूरकडे
,,	३२	इ. स. १६७९ ऑक्टोबर ७	दिलेलखान विजापुरास
,,	३४	इ. स. १६७९ नोव्हेंबर १४	खान विजापूर सोडतो
,,	३२	इ. स. १६७९ नोव्हेंबर १५	शिवाजी जालनापूर लुटतो
,,	३२	इ. स. १६७९ नोव्हेंबर २२	शिवाजी पट्टा किल्ल्यावर
,,	३५	इ. स. १६७९ नोव्हेंबर	शिवाजी-विजापूरकर तह
,,	३०	इ. स. १६७९ डिसेंबर ४	संभाजी शिवाजीकडे
,,	३७	इ. स. १६८० जानेवारी	शिवाजीचे व्यंकोजीस पत्र
,,	३८	इ. स. १६८० मार्च १५	राजारामाचे लग्न
,,	४०	इ. स. १६८० एप्रिल ४	शिवाजीचा मृत्यू
,,	४४	इ. स. १६८० एप्रिल २१	राजारामाचे मंचकारोहण

सूची

(व्यक्ती व स्थल)

२१.

समस्त-राजकार्य-धुरंधर--हा मायना अमात्यादिकांना उद्देशून असे. 'समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हा.' (आज्ञापत्र-प्रकरण १).

अष्ट प्रधान......केले—'हीं नांवें शुक्रनीतींतून घेतलीं असा कयास निघतो. शुक्रनीतींत खालील वचनें आहेत:—अष्टप्रकृतिभिर्युक्तो नृपः कैश्चित् स्मृतः सदा। सुमन्त्रः पण्डितो मंत्री, प्रधानः सचिवस्तथा। अमात्यः प्राड्विवाकश्च तथा प्रतिनिधिः स्मृतः। एता भृतिसमास्त्वष्टौ राज्ञः प्रकृतयः सदा॥' त्रै० व० ४ पृ. ७४. यात भृतिसमा=सारखा तनखा घेणारे. (श. शि. पृ. १६४). राजवाडे म्हणतात-'शिवाजीनें ही राज्यपद्धति मुसुलमानांपासून घेतली. पेशवा, मुजुमदार, वाकनीस, सुरनीस, डबीर वगैरे अधिकाऱ्यांचीं नांवें मुसुलमानांच्या दरबारांतील आहेत. त्यांना मुख्य प्रधान, अमात्य, मंत्री, सचिव, सुमंत वगैरे संस्कृत नांवें शिवाजीनें दिलीं. बाकी शिवाजीची पद्धति मुसुल्मानांच्या पद्धतीचेंच हुबेहूब अनुकरण होतें.' (ऐ. प्र. पृ. १०४).

२२.

मुख्य प्रधान--अष्टप्रधानादिकांचा 'कानूजाबता राज्याभिषेक शके १ आनंद नाम संवत्सरे ज्येष्ठ वद्य त्रयोदशी भोमवासरे' (दि. २१-१-इ. स. १६७४) रोजी ठरविण्यात आला. (काव्येतिहाससंग्रह पत्रे यादी वगैरे लेख, ले० २-चित्रशाळा आवृत्ती १९३०).

२३.

फडणिशींतील पत्रें—'सनदा, दानपत्रें वगैरे महालीं हुकुमी यांचा जाबता फडणिसी अलाहिदा त्याप्रमाणें लिहावीं.' (सदर).

२४.

यास समीप सेवक......असावे—'सिंहासनाचे पाठीमागें परिचारक म्हणजे सेवक ते नियमित, मुख्य नाईक त्याजपाशीं छत्र चामरें असावीं, व व्यजन, पंखा व तांबुलादि उपचार घेऊन शस्त्रपाणी व सावध राजानें लक्षावेत असे असावे. परम विश्वासू परंपरागत आणि शूर धैर्यवान् सावध इंगितलक्षणें

ज्यांस अवगत आणि सुंदर वस्त्रादि भूषणें करून अलंकृत असे बारा सोळा इतके असावे.’ (राजनीती पृ. १०).

२५.

ग्राम, भूमी देणें—‘नूतन वृत्ति कोण्हास करून न द्यावी...महसुलांत न्यून न होय यैसें करावें.’ (आज्ञापत्र प्र० ७). हे शिवाजीचे धोरण होते.

पत्र......दिल्हें—हे राजपत्र बाळाजी आवजीस राज्याभिषेकानंतर चार दिवसांनी म्हणजे ज्येष्ठ वद्य १ रोजी दिले. (स. च. पृ. ३७२).

२६.

सुलतान रूकनदीन—परि० ३ प्रकरण १ पाहा.

२७.

जिजाबाई समाप्त जालीं—जिजाबाई दि० १८ जून इ. स. १६७४ रोजी मरण पावली. तिची खाजगी मालमत्ता २५ लाख होनांची होती. (सरकार-शिवाजी पृ. २०९). जिजाबाई ‘पांचाड येथील आपल्या वाड्यांत दिवंगत झाली. पांचाड गांव रायगडाचे उतरणीवर असून तेथें शिवाजीनें मातुश्रीसाठीं भव्य वाडा बांधून त्यांत विहिरी बागा वगैरे सिद्ध करून वैधव्यावस्थेस साजेशी सिद्धता केली. शेवटचीं दहा पांच वर्षें तिनें तेथें काढलीं. रायगडावरून जातां येतांना शिवाजी मातुश्रीचा आशीर्वाद घेऊन कार्योपक्रम करी’. (श. शि. पृ. १६१).

पुन्हा सिंहासनारोहणसभा केली.—परि० ७ गागाभट्टावरील टीप पाहा.

२८.

महाराज......दर्शन घेतलें—प्रथमान्त कर्त्याच्या वाक्याचा कर्मणि प्रयोग.

तें......जालें.—“ ‘येवनी राज्य नसतां जोहार म्हणौन हा शब्द कोण, यास्तव सर्वत्रांनीं रामराम म्हणावा.’ आज्ञा म्हणतांच त्या दिवसापासोन रामराम म्हणावयाची ती प्रवृत्ति हि अद्यापिवत आहे.” (श्रीहनुमंतस्वामीकृत श्रीसमर्थांची बखर, १९५० पृ. ८९). समर्थांच्या आज्ञेने ‘राम राम’ म्हणून एकमेकांना वंदन करण्याचा प्रघात मराठ्यांमध्ये पडला, असा प्रवाद आहे; पण या काला-पूर्वीही ‘रामराम’ व या कालानंतरही ‘जोहार’ असे मायने असल्याचे दाखले

आहेत. उदा० शके १५६८ (इ. स. १६४६) मध्ये बादशाही ब्राह्मण हवालदार चंद्रराव मोऱ्यांस 'रामराम' लिहितात व इ. स. १६७७ मध्ये शिवाजी भागानगरहून रा० मालोजी घोरपडे यांस पत्र पाठवितो त्यांत 'जोहार' असें घोरपडे यास लिहितो. (शि. प. सा. सं. क्र. १९०१).

आज्ञा जाली.—शिवाजीने आश्विन शु० १० शके १६०० मध्ये समर्थांना करून दिलेल्या सनदेत पुढील उल्लेख आहे:—' विशेष उपाधीचें कारण काय ? तथापि तुमचें मनीं श्रीची सेवा घडावी हा निश्चय जाहला त्यास यथावकाश जें नेमावेंसें वाटेल तें नेमावें, व पुढें जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसें करीत जावें' याप्रकारें आज्ञा जाहली. (महाराष्ट्र सारस्वत, शके १८७६ पृ. ९६९).

२९.

त्याजवरून......त्यांजपाशीं गेले—त्याउपर संभाजीराजे यांजवर ईतराज जाले श्रीघारपुरी ठेविले पढायास उमा पंडित ठेविले होते तैनाती मावले व स्वार होते. दिलेलखानाकडे राजकारण करून कौल आणून रातोरात निघोन पेडगांवास स्त्रीसहवर्तमान गेले.' (९१ क० ब० क० ६० राजवाडे प्रत). 'शके १५९८ नळनाम संवछरे कार्तीक सुध शष्टी ६ रविवारी राजश्री संभाजी श्रीगारपुरास जाऊन राहिले होते.' (जे. श.). 'एका ब्राह्मण (विवाहित) तरुणीवर हात टाकल्याचा बोभाटा शिवाजीचे कानावर जाऊन त्यानें त्यास पन्हाळगडावर अटकेंत ठेविले. त्यावरून तो शिवाजीवर अत्यंत चिडून गेला; आणि बायको येसूबाईसह ता. १३-१२-१६७८ रोजीं गुप्तपणें पन्हाळ्यावरून निसटून दिलीरखानास भेटण्यासाठी बहादुरगडाकडे गेला...करकंब येथें त्यांची भेट झाली.' (श. शि. पृ २०३-सरकार-शिवाजी पृ. ३०३). 'संभाजीराजे राजियाचे पुत्र ज्येष्ठ राजियावर रुसून मोगलाईत गेले.' (सभासद). 'संभाजीराजे वर्ष दीड वर्ष रायगडावर नव्हते, इतकेंच नव्हे तर प्रधानमंत्र्याच्या कुटुंबांच्याहि सांनिध्यांत नव्हते, ही एकच गोष्ट बखरकारांच्या लिहिण्यांतील अवास्तवता सिद्ध करते. ...त्यांचा दोस्त शाहा अलम यांचें दक्षिणेंत आगमन हेंच त्यांना या कामीं उद्युक्त करण्यास अधिक कारण झालें असावें.' (बेंद्रे छ. सं. प. पृ. ७६).

भूपाळगड जाऊन घ्यावा—दिलीरखानाने दि. २ एप्रिल इ. स. १६७९ रोजी भूपाळगड काबीज केला. (सरकार-शिवाजी पृ. ३८८). 'सीवाचे लोकांपैकीं

सातशें लोक कैद झाले. प्रत्येकाचा एक हात तोडला...तो किल्ला त्यानें जमीनदोस्त केला.' (बसातीनुस्सलातीन-४७८).

म्हणून......गेले—'किल्लेदारास आज्ञा करून, नरसाला हवालदार यास तोफेचे तोडीं दिल्हा.' (शि. दि. पृ. २६८) 'फिरंगोजी नरसाला भेटीस जातांच गड दिधला म्हणोन तोफेंत देऊन उडविला.' (९१ क. ब. क. ६० राजवाडे प्रत) 'शिवाजीनें त्यास ठपका दिला.' (श. शि. पृ. २०३).

३०.

महाराजांचें दर्शन......घेतलें—संभाजी दिलीरखानास मिळाला तरी एका प्रसंगाने संभाजी त्यास विटला. तो प्रसंग म्हणजे तिकोट्याहून अथणीच्या चढाईचा. अथणी जाळून तेथील तेथील हिंदु रहिवाश्यांस विकून पैसे उकळण्याचा खानाचा डाव होता. संभाजीने त्यास विरोध केला; पण व्यर्थ. (इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्ड–सुरत–१०८, दि. १–१–१६८०). याच वेळेस शिवाजीचे त्यास परत आणण्याचे प्रयत्न सुरू होते. ते यशस्वी होऊन संभाजी आपल्या स्त्रीसह गुप्तपणे पळून विजापुरास मसूदखानाच्या आश्रयास गेला. तेथे शिवाजीचे लोक होते; त्यांच्या मदतीने तो निघून ता. ७ जिल्कादच्या रात्री (१ डिसेंबर इ. स. १६७९) पन्हाळ्यास गेला. (बसातीनुस्सलातीन ५०१). बेंद्रे म्हणतात की, 'येसूबाई मोगलाईत गेलीच नव्हती. ज्याअर्थी एकटी स्त्रीच बरोबर असल्याचा उल्लेख आहे त्याअर्थी ती चंपावत्र होती यांत संदेह नाहीं.' (छ. सं. म. पृ. ९०). या प्रसंगाच्या संदर्भात शिवाजी व्यंकोजीस लिहितो—'चिरजीव राजश्री संभाजीराजे मोगलाईत गेले होते त्यास आणावयाचा उपाय बहुत प्रकारे केला; त्यासहि कळो आले की ये पातशाहीत अगर विजापूरचे अगर भागानगरचे पातशाहीत आपले मनोगतानुरूप चालणार नाही. ऐसें जाणोन त्यांणी आमचे लिहिण्यावरून स्वार होऊन आले. त्याची आमची भेट जाली. घरोब्याचे रीतीनें जैसे समाधान करून ये तैसे केले.' (शि. प. सारसंग्रह क्र. २२३६). 'संभाजीराजे भेटले हें वर्तमान पातशहास टाके दाखल जाले दिलेलखानानेंही लेहून पाठविलें होतें. त्यावरून हजुरची तलब आ~~र्~~दी आले जे संभाजी राजे त्याबराबर फौज देऊन बलकटीनें हजुर पाठवणें हें तलब येतांच संभाजीराजे यांजबराबर फौज देऊन रातोरात स्त्रींसहवर्तमान पलविले पठाण इमानी त्यांणीं इमान राखिला' (९१ क. ब.—क. ६१ राजवाडे प्रत). 'आलमगीर बादशहानें संभाजीस हुजूर

बोलाविलें होतें; पण तो अनेक भयांमुळें जाण्यास राजी नव्हता.' (बसातीनुस्सलातीन ५०१).

३१.

त्यांस कारभारी......ठेविलें--'संभाजीचें अंतःकरण निवळेपर्यंत त्यास पन्हाळगडावरील कारभारी बाजी मुरार देशपांडे याचा नातू विठ्ठल त्रिंबक, हिरोजी फर्जंद, सोमाजी नाईक बंकी, सूर्याजी कंक वगैरे कांहीं मंडळींच्या देखरेखीखालीं ठेवून दिलें, आणि जनार्दनपंत हणमंते खालीं कोप्पळाकडे होता यासही कोल्हापुर प्रांतीं येऊन संभाजीवर नजर ठेवण्याचा हुकूम केला.' (श. शि. पृ. २०६). 'जनार्दन नारायण सरकारकून व सोनोजी नाईक बंकी व बाबाजी ढमढेरे असे ठेविले.' (सभासद)

महाराज......रायगडीं आले--'वाटेंत सज्जनगडास जाऊन ३१ डिसेंबर १६७९ पासून ४ फेब्रुवारी स० १६८० पावेतो समर्थांचा सहवास केला.' (श. शि. पृ. २०६).

३२.

भीमानदी......भिडला--दि. १८ ऑगस्ट इ. स. १६७९ रोजी दिलीरखान विजापूरपासून उत्तरेस ४० मैल असलेले धूळखेड येथे भीमानदी उतरून विजापुरावर चालून गेला. (सरकार शिवाजी पृ. ३१०).

मशऊदखान (सिद्दी मसूद)-सीदी जोहर ऊर्फ सलाबतखान याचा हा जावई. दि० १३ जुलै इ. स. १६६० रोजी शिवाजी पन्हाळ्याहून निसटल्यानंतर सीदी जोहरने मसूद व फाजलखान यास शिवाजीच्या पाठलागावर पाठविले; पण शिवाजी विशाळगडावर सुखरूप पोचला. इ. स. १६६३ च्या जूनमध्ये शिवाजीने हस्तगत केलेले दक्षिण कोकणातील कुडाळ काबीज करण्यासाठी अली आदिलशहाने सीदी जोहरचा मुलगा सीदी अजीज व सीदी मसूद यांस शिवाजीवर पाठविले. शिवाय खवासखान व बाजी घोरपडे यांनाही चालून जाण्याचा आदेश दिला. शिवाजीने त्यांचा पराभव केला. बहलोलखानाच्या मृत्यूनंतर मसूद (दक्षणी पक्षाचा नेता) दि. २१ फेब्रुवारी १६७८ ते दि. २१ नोव्हेंबर १६८३ पर्यंत विजापूरचा वजीर होता. (सरकार-हाऊस ऑफ शिवाजी पृ. ५६). मसूद याने दिलीरखानाने कुलबर्गा येथे इ. स. १६७७ च्या

गु

नोव्हेंबरात त्याला तहाच्या घातलेल्या अटी अपमानास्पद वाटल्यामुळे व आदिलशाहीतील अंतस्थ बखेड्यामुळे (पठाणांचे बंड) शिवाजीची मदत मागितली. दिलीरखानास हे नको होते. उलट तो शिवाजीविरुद्ध विजापूरकरांस मदत करण्यास उत्सुक होता. मसूदने शिवाजीस लिहिले की, शत्रूचे बळ वाढले आहे. या वेळी मदत झाली नाही तर किल्ला शत्रूच्या हातात जाईल. शिवाजीने तात्बडतोब सहा सात हजार स्वार विजापूरच्या रक्षणासाठी पाठविले. (बसातीन-नुस्सलातीन ४७२). दिलेरखान यामुळे चिडला व विजापूर जिंकण्याचा त्याने निश्चय केला; पण दि. १४ नोव्हेंबर इ. स. १६७९ रोजी त्यास वेढा उठवून परत फिरावे लागले. (सरकार-शिवाजी पृ. ३११). औरंगजेबाने विजापुरावर इ. स. १६८५ मध्ये स्वारी केली तेव्हा सिकंदर आदिलशहा व त्याचे सरदार सीदी मसूद, आगा खुस्रू, सर्जाखान व मालोजी घोरपडे हे आवेशाने लढले; पण सिकंदरशहा पुढे इ. स. १६८५ मध्ये शरण गेला व विजापूरचे राज्य नष्ट झाले. (उ. सं. पृ. ८३).

तत्रापी तह......रक्षिलें.—परि० १ टीप पाहा.

महाराज यांणीं......पोहोंचले—तृतीयान्त कर्त्यांचे वाक्य कर्तरि प्रयोगात.

जालनापूर पावेतों—दि. ४-११-१६७९ रोजी शिवाजी सेलगुरातून बाहेर पडला. त्यानंतर आपण व आनंदराव मकाजी असे मोगली प्रदेशात जाळपोळ करीत दि. १५ नोव्हेंबरच्या सुमारास जालनापूर लुटले. (श. शि. पृ.२०६).

रणमस्तखान—खिजरखान पन्नीचा हा भाऊ. त्यास बहादुरखान हा किताब होता. (मआसिर-इ आलमगीरी २२२, २३५). जालना व अकलूज येथील तो ठाणेदार होता. (सरकार–शिवाजी पृ. ३१४). 'रणमस्तखान यासि कैद करून आणिला'...त्याचे कुमकेस केसरसिंग व सरदारखान व बाजे उमराव असे वीस हजार फौज तीन कोसावर राहिली.' (सभासद).

पट्टियास गेले—'केसरसिंग यानें अंतरंगें सांगून पाठविलें कीं, 'उभयपक्षीं भाऊपणा आहे. आमची गांठ पडली नाहीं तोंवर तुम्हीं कूच करून जाणें.' हें वर्तमान कळतांच राजे तेथून निघाले. लष्कर जड, गिरी मार्गांनें जावें अशी तजवीज केली. ते समयीं बहिरजी जासूद यानें कबूल केलें कीं, 'मोंगलांची गांठ न पडतां लष्कर घेऊन ठिकाणास जातों. साहेबीं फिकीर न करणें. तीन रात्रीं खरोन रात्रंदिवस अवकाश न करितां पटागड येथें लष्कर

घेऊन आला. राजे बहिरजी नायकावर खुशाल झाले.' (सभासद). बहीरजी नाईक याने डोंगरांतील गुप्त वाटांनी शिवाजीस दि. २२ नोव्हेंबर इ. स. १६७९ रोजी पट्टा (विश्रामगड) किल्ल्यावर (नाशिकहून दक्षिणेस २० मैल) सुरक्षित पोचविले. (श. शि. पृ. २०७).

खानदेश प्रांतीं--दि. २४ ते ३० नोव्हेंबर इ. स. १६७९ या कालात मराठ्यांनी खानदेशवर स्वारी करुन धरणगाव लुटले. (इंग्लिश फॅक्टरी रेकॉर्ड, १०८. दि. ८ डिसेंबर इ. स. १६७९) 'वऱ्हाड, खानदेश, माहूर, बागलाण वगैरे बाजूस तें लष्कर गेलें.' (बसातीनुस्सलातीन ५०४)

३३.

दिलेलखान......केली—प्रथमान्त कर्त्याचे वाक्य कर्मणि प्रयोगात.

३४.

दिलेल खान अनाज......जालें—'मुघल लश्करास उपास पडत. शाहझादा मुअज्जम व दिलेरखान यांतील बेबनावामुळे शाहझादा पैसे पाठवीना.' (बसातीनुस्सलातीन ५०३).

विजापूर सोडून......चालला—'शके १६०१ सिधार्थी नाम संवछरें माघ मासी ईदिलशाहाचा मोगलाचा सला जाला विजापूरचा वेढा उठिला.' (जे. श.). पण बसातीनुस्सलानतीनमध्ये पुढील उल्लेख आहे :—'खुद्द शाहझाद्यानें त्यास (मसऊदखानास) गुप्तपणें कळविलें कीं, मला पंचवीस हजार होन दिल्यास मी दिलेरखानास तुमच्या विलायतेंतून बाहेर काढतों. यामुळें तो तह करण्यास राजी झाला नाहीं.' (५०४).

३६.

दिलेलखान......गेला–विजापूरच्या सर्जाखानास घेऊन तो कोप्पळकडचा प्रदेश हस्तगत करण्यासाठी गेला. तेव्हा जनार्दन हणमंते याने त्याचा खरपूस समाचार घेतला. (श. शि. पृ. २०७)

३७.

त्यांणीं तह......घेतले.–जानेवारी इ. स. १६८०मध्ये शिवाजी व्यंकोजीस लिहितो–'त्या करारबाबेमधे होसकट व बगळूर व अरणी व चंदाऊर आदीकरून

तुमीचे निसबती आम्ही आपणासीच लाऊन घेतली पेशकसी तोफा तुम्ही निराळा घ्यावा (?) सतत निसबती तुम्हासी लागावी ऐसे केले नाही आवघे आम्हीच मान्य केले. तोफा आम्हीच तुम्हादेखील घ्यावा ऐसा तह ते प्रसंगी करून करारबाब करून सला केला.' (शि. प. सारसंग्रह क्र. २२३६).

३८.

राजाराम याचा विवाह—'प्रतापराव पूर्वील सेनापती होते त्यांची कन्या नवरी नेमस्त केली आणि लग्न सिद्धीतें पाववलें. वधूचें [नांव] सौभाग्यवती जानकीबाई असें ठेविलें.' (सभासद). हे लग्न दि. १५ मार्च इ. स. १६८० रोजी झाले. त्यापूर्वी दि. ७ मार्चला त्याची मुंज झाली. (सरकार–शिवाजी पृ. ३८८).

३९.

कांहीं दिवशीं......जाली—दि. २३ मार्च इ. स. १६८० रोजी शिवाजीस ज्वर आला. (सरकार–शिवाजी पृ. ३१७). 'राजे स्वामीस नवज्वर प्राप्त जाहला.' (९१ क. ब.—क० ८९ भारतवर्ष).

४०-

तेव्हां विभाग करून द्यावे—मोगलांकडून संभाजी आल्यानंतर शिवाजीने राज्याची वाटणी अशी केली होती. 'एक चंदीचें राज्य, याची हद्द तुंगभद्रा तहद कावेरी हें एक राज्य व दुसरें तुंगभद्रा अलीकडे गोदावरी नदीपर्यंत एक राज्य.' शिवाजीने संभाजीस सांगितले "'तूं वडील पुत्र, तुजला कर्नाटकीचें राज्य दिधलें, इकडील राज्य राजारामास देतों.' परंतु संभाजीराजे यांनीं ऐकिलें नाहीं." (सभासद).

संभाजी......होतील—'संभाजी शेवट दगा खाईल. जे गती मलिक अंबर, निजामशाहा [ही] त्याचा पुत्र फत्तेखान मलिका माघारां जाहाला आणि पातशाही बुडविली, तैशीच संभाजीराजा करील. मग राजाराम राज्य करूं लागेल. तेव्हां गमाविलें राज्य साधील. मजपेक्षां पराक्रम विशेष करील....... प्रल्हादपंत निराजीपंतांचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंतांचे पुत्र, हे दोघे ब्राह्मण पराक्रमी होतील. निळोपंत, प्रधानाचा पुत्र, हाही नांव धरील... उरल्यापैकीं संताजी घोरपडे व बहिरजी घोरपडे व धनाजी जाधव हे जरि वांचले तरि हे तिघे मोठे पराक्रम करतील.' (सदर).

ऐसे होत असतां—'योगाभ्यास करून, आत्मा ब्रह्मांडास नेऊन, दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें.' (सदर). '(सोइरा) बाई साहेबांचे बुद्धीस अविचार-बुद्धि उत्पन्न जाहाली. आणि विष प्रलयेंकरून महाराजांस व्यथित केलें.' (शि. दि. पृ. ४६२). 'त्याला गुडघी म्हणून रोग झाला.' (ग्रँटडफ).

शके १६०२...केला.—शिवाजी रविवार दि. ४ एप्रिल इ. स. १६८० रोजी मरण पावला. (सरकार-शिवाजी पृ. ३१७). 'रविसुत शनि ऐसें नाम तें वासराला। गणिततिथि सुपर्णा चैत्र मासीं दिनाला। अवतरण शिवानें पूर्ण केलें नृपानें। शतमितिशत सोळा युग्म रौद्राभिधाने॥ (शि. दि. पृ. ४६७). 'त्या प्रसंगीं रामचंद्र नीळकंठ, प्रल्हाद निराजी व बाळाजी आवजी एवढेच जुने मुत्सद्दी जवळ होते. पेशवे सचिव वगैरे कोणी नव्हते.' (श. शि. पृ. २०९)

४१.

ऐसे अनर्थ जाले!—'ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून जाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्रीशंभुमहादेवीं, तळ्याचे उदक रक्तमय जालें. पाण्यांतील मत्स्य बाहेर पडून अमासवणी उदक जाहालें.' (सभासद).

४२.

पुतळाबाई—ही मोहित्यांकडील असून शिवाजीची चौथी पत्नी होती. हिचे लग्न शके १५७५ (इ. स. १६५३) मध्ये झाले. 'शके १६०२ रौद्र नाम संवत्सरे आशाढ शुा येकादसी (२७ जून, १६८०) पुतळाबाई अग्निप्रवेश' (शिवापूर यादी).

४३.

हे कथा......होईल.—बखरकाराची ही आदरोक्ती होय.

४४.

राजारामसाहेब.....करविलें.—प्रल्हाद निराजी, रामचंद्र नीळकंठ व बाळाजी आवजी यांच्या विचारे सोयराबाईने दि. २१ एप्रिल इ. स. १६८० रोजी राजारामास गादीवर बसविले. (उ. सं. पृ. २२).

कालपट

प्रकरण पहिले

परिच्छेद	३	इ. स. ११९३	पृथ्वीराज चौहानाचा पराभव
,,	६	इ. स. १३०२	अल्लाउद्दिनाची चितोडवर स्वारी
,,	७	इ. स. १५५२	मालोजीचा जन्म
,,	४	इ. स. १५६५ जानेवारी २२	विजयनगरचा नाश
,,	८	इ. स. १५९४ मार्च १८	शहाजीचा जन्म
,,	११	इ. स. १६०५ नोव्हेंबर ५	शहाजी-जिजाबाई लग्न
,,	१३	इ. स. १६१९	संभाजीचा जन्म
,,	१८	इ. स. १६२१	मलिकंबराकडून मोगलांचा पाडाव
,,	१९	इ. स. १६२४ नोव्हेंबर	भातवडीची लढाई
,,	१६	इ. स. १६३० फेब्रुवारी १९	शिवाजीचा जन्म
,,	२२	इ. स. १६३३ सप्टेंबर २३	मुरार जगदेवाची तुळा
,,	१४	इ. स. १६३६ ऑक्टोबर	शहाजी विजापुरास
,,	२०	इ. स. १६५४	संभाजीचा मृत्यू

प्रकरण दुसरे

परिच्छेद	६	इ. स. १६२६ मे १४	मलिकंबरचा मृत्यू
,,	२१	इ. स. १६३५ ऑक्टोबर	मुरार जगदेवाचा खून
,,	२	इ. स. १६३७ फेब्रुवारी २५	शहाजीस पुण्याची जागीर

परिच्छेद	५	इ. स. १६४० एप्रिल १७	शिवाजी-सईबाई लग्न
,,	१०	इ. स. १६४७ मार्च ७	दादाजी कोंडदेवाचा मृत्यू
,,	९	इ. स. १६४७	शिवाजी तोरणा घेतो
,,	१८	इ. स. १६४८ जुलै २५	शाहाजीस कैद
,,	२२	इ. स. १६४८ ऑक्टोबर ९	शिवाजी पुरंदर घेतो
,,	३८	इ. स. १६४९ एप्रिल ११	शिव-समर्थ भेट
,,	२०	इ. स. १६४९ मे १६	शहाजीची सुटका
,,	२६	इ. स. १६५६ जानेवारी १५	शिवाजी जावळी घेतो
,,	१४	इ. स. १६५६ एप्रिल ६	रायगड सर
,,	२७	इ. स. १६५६	प्रतापगड बांधिला
,,	२२	इ. स. १६५७ एप्रिल २७	नगर लुटले
,,	२८	इ. स. १६५७ एप्रिल ३०	जुन्नर लुटले
,,	२९	इ. स. १६५७ मे १४	संभाजीचा जन्म
,,	२३	इ. स. १६५७ ऑगस्ट २४	शिवाजीची कल्याणवर स्वारी
,,	१९	इ. स. १६५८ जुलै २१	औरंगजेब गादीवर बसतो
,,	२२	इ. स. १६७० फेब्रुवारी ४	कोंडाणा सर

प्रकरण तिसरे

परिच्छेद	४४	इ. स. १६५६ मे	शिवाजी प्रबळगड घेतो
,,	२	इ. स. १६५९ सप्टेंबर	अफजलखान निघतो
,,	२०	इ. स. १६५९ नोव्हेंबर १०	अफजलखानाचा वध
,,	२९	इ. स. १६५९ डिसेंबर २८	रुस्तूमखानाचा पराभव
,,	२६	इ. स. १६६० मार्च २	पन्हाळ्याचा वेढा
,,	,,	इ. स. १६६० जुलै १३	शिवाजी पन्हाळा सोडतो
,,	२७	इ. स. १६६० जुलै १४	बाजी प्रभूचा मृत्यू
,,	२८	इ. स. १६६० जुलै १४	शिवाजी खेळण्यास
,,	२८	इ. स. १६६० सप्टेंबर २२	पन्हाळा आदिलशाहीच्या ताब्यात
,,	२०	इ. स. १६६१	प्रतापगडावर तुळजाभवानीची स्थापना
,,	४३	इ. स. १६६४ जानेवारी ६	शिवाजीची सुरतेवर स्वारी
,,	३२	इ. स. १६६४ ऑक्टोबर २०	बाजी घोरपड्याचा मृत्यू

परिच्छेद	३५	इ. स. १६६४ नोव्हेंबर २५	सिंधुदुर्गाची उभारणी
,,	३०	इ. स. १६६४ नोव्हेंबर	काय सावंताचा पराभव
,,	३४	इ. स. १६६४ नोव्हेंबर	शिवाजी सावंतवाडी घेतो
,,	३६	इ. स. १६६५ फेब्रुवारी ८	बसरूरवर स्वारी
,,	४१	इ. स. १६६६	प्रतापरावास सरनोबतपद
,,	३७	इ. स. १६७० फेब्रुवारी २४	राजारामाचा जन्म
,,	४५	इ. स. १६७० एप्रिल	प्रतापरावाची नगरवर स्वारी
,,	३३	इ. स. १६७५ मे ६	शिवाजी फोंडे घेतो

प्रकरण चौथे

परिच्छेद	४	इ. स. १६६१ मार्च	रावजी सोमनाथ राजापुरास
,,	२	इ. स. १६६२ एप्रिल ३	मोरो त्रिमलास पेशवेपद
,,	३८	इ. स. १६६२	शहाजी-शिवाजी भेट
,,	२७	इ. स. १६६७	भूषण-शिवाजी भेट

प्रकरण पाचवे

परिच्छेद	१	इ. स. १६६० जानेवारी	शायिस्ताखान निघतो
,,	३	इ. स. १६६० ऑगस्ट १५	खान चाकण घेतो
,,	३	इ. स. १६६० ऑगस्ट २६	खान पुण्यास
,,	६	इ. स. १६६३ एप्रिल ५	शायिस्ताखानास शास्त
,,	८	इ. स. १६६४ जानेवारी १५	शायिस्ताखान औरंगाबाद सोडतो
,,	९	इ. स. १६६४ जानेवारी २३	शहाजीचा मृत्यू
,,	१०	इ. स. १६६४ सप्टेंबर ३०	जैसिंग निघतो
,,	१६	इ. स. १६६५ मार्च ३०	पुरंदरचा वेढा
,,	१६	इ. स. १६६५ एप्रिल १४	रुद्रमाळ मोगलांच्या ताब्यात
,,	२०	इ. स. १६६५ जून ११	जैसिंग-शिवाजी भेट
,,	२०	इ. स. १६६५ जून १२	दिलीरखान-शिवाजी भेट
,,	२१	इ. स. १६६५ जून १३	पुरंदरचा तह
,,	२२	इ. स. १६६५ जून १४	शिवाजी जैसिंगाचा निरोप घेतो
,,	२६	इ. स. १६६६ मार्च ५	शिवाजीचे आग्र्यास प्रयाण

परिच्छेद	२७	इ. स. १६६६ मे १२	शिवाजी-औरंगजेब भेट
,,	३४	इ. स. १६६६ ऑगस्ट १९	शिवाजीची सुटका
,,	३६	इ. स. १६६६ सप्टेंबर १२	शिवाजी रायगडास
,,	३८	इ. स. १६६७ मार्च २३	जैसिंग परत जातो
,,	४४	इ. स. १६६७ मार्च २३	शाहजादा मुअज्जमची नेमणूक
,,	४२	इ. स. १६६७	संभाजी-येसूबाई लग्न
,,	४५	इ. स. १६६८ ऑगस्ट ५	प्रतापराव गुजर औरंगाबादेस
,,	४८	इ. स. १६७२ फेब्रुवारी ७	सालेरची लढाई
,,	४९	इ. स. १६७३ एप्रिल १५	उमराणीची लढाई
,,	४९	इ. स. १६७४ फेब्रुवारी २४	प्रतापरावाचा मृत्यू
,,	४३,४७	इ. स. १६७७ नोव्हेंबर	शिवाजी कारंजे लुटतो

प्रकरण सहावे

परिच्छेद	३	इ. स. १६७२	निळो सोनदेवाचा मृत्यू
,,	६	इ. स. १६७६	रघुनाथ हणमंते शिवाजीकडे
,,	८	इ. स. १६७७ जानेवारी	शिवाजी भागानगरकडे
,,	२४	इ. स. १६७७	हुसेनखान मियानाचा पराभव
,,	९	इ. स. १६७७ फेब्रुवारी ५	शिवाजी भागानगरास
,,	११	इ. स. १६७७ मार्च १०	भागानगरहून प्रयाण
,,	११	इ. स. १६७७ मार्च २४	श्रीशैलास आगमन
,,	१३	इ. स. १६७७ मे १५	जिंजी काबीज
,,	१२	इ. स. १६७७ मे २३	वेलूरचा वेढा
,,	१२	इ. स. १६७७ जून २६	शेरखान लोदीचा पराभव
,,	१५	इ. स. १६७७ जुलै १२	शिवाजी-व्यंकोजी भेट
,,	१९	इ. स. १६७७ ऑक्टोबर	अरणी काबीज
,,	१९	इ. स. १६७७ नोव्हेंबर	शिवाजी कोल्हार-बाळापूर प्रांतात
,,	२०	इ. स. १६७७ नोव्हेंबर १६	व्यंकोजीचा मराठी सैन्यावर हल्ला
,,	१९	इ. स. १६७८ जानेवारी १६	शिवाजी लक्ष्मेश्वरास
,,	१९	इ. स. १६७८ जानेवारी २६	बेलवडीचा वेढा
,,	२१	इ. स. १६७८ मार्च १	शिवाजीचे व्यंकोजीस पत्र

परिच्छेद	२२	इ. स. १६७८ मार्च	शिवाजी-व्यंकोजी तह
,,	२३	इ. स. १६७८ एप्रिल ४	शिवाजी पन्हाळ्यास
,,	२३	इ. स. १६७८ मे	रायगडास आगमन

प्रकरण सातवे

परिच्छेद	१६	इ. स. १६७४ जून ६	शिवाजीचा राज्याभिषेक
,,	२७	इ. स. १६७४ जून १८	जिजाबाईचा मृत्यू
,,	२९	इ. स. १६७८ डिसेंबर १३	संभाजी दिलेलखानाकडे
,,	२	इ. स. १६७९ फेब्रुवारी १९	औरंगजेब राजपुतान्यात
,,	२९	इ. स. १६७९ एप्रिल २	दिलेलखान भूपाळगड घेतो
,,	३२	इ. स. १६७९ ऑगस्ट १८	दिलेलखान विजापूरकडे
,,	३२	इ. स. १६७९ ऑक्टोबर ७	दिलेलखान विजापुरास
,,	३४	इ. स. १६७९ नोव्हेंबर १४	खान विजापूर सोडतो
,,	३२	इ. स. १६७९ नोव्हेंबर १५	शिवाजी जालनापूर लुटतो
,,	३२	इ. स. १६७९ नोव्हेंबर २२	शिवाजी पट्टा किल्ल्यावर
,,	३५	इ. स. १६७९ नोव्हेंबर	शिवाजी-विजापूरकर तह
,,	३०	इ. स. १६७९ डिसेंबर ४	संभाजी शिवाजीकडे
,,	३७	इ. स. १६८० जानेवारी	शिवाजीचे व्यंकोजीस पत्र
,,	३८	इ. स. १६८० मार्च १५	राजारामाचे लग्न
,,	४०	इ. स. १६८० एप्रिल ४	शिवाजीचा मृत्यू
,,	४४	इ. स. १६८० एप्रिल २१	राजारामाचे मंचकारोहण

सूची

(व्यक्ती व स्थल)

संदर्भ - ग्रंथ

Early History of The Dekkan - Dr Bhandarkar, 1884.
House of Shivaji - Sir Jadunath Sarkar, 1940.
Shivaji and His Times - Sir Jadunath Sarkar, 1948.
The Cambridge History of India, Vol. IV, 1937.
एक्याण्णव कलमी बखर - वाकसकर, १९३०.
ऐतिहासिक पत्रे यादी वगैरे - सरदेसाई, काळे व वाकसकर, १९३०.
ऐतिहासिक प्रस्तावना - वि. का. राजवाडे, १९२८.
छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र - वा. सी. बेंद्रे, १९६०.
फार्शी-मराठी कोश - मा. त्रिं. पटवर्धन, १९२५.
भारतवर्षीय मध्ययुगीन चरित्रकोश - चित्राव, १९३७.
मराठी रियासत - गो. स. सरदेसाई
शहाजीराजे भोसले, १९३५. //
शककर्ता शिवाजी, १९३५. //
उग्रप्रकृती संभाजी, १९३५. //
स्थिरबुद्धी राजाराम, १९३६. //
महाराष्ट्र सारस्वत-वि. ल. भावे, आ० ४ थी, शके १८७३.
महाराष्ट्रीय ज्ञानकोश - विभाग १०, १९२६.
राजनीती-म. रा. चिटणीस १८८७.
राजवाडे खंड ४,८ व १५.
शिवचरित्र प्रदीप - आपटे व दिवेकर, शके १८४७.
शिवचरित्र - वृत्तसंग्रह, खंड २ व ३, - ग. ह. खरे १९३९, १९४१.
शिवछत्रपतीचे चरित्र - सभासद, १८९[illegible].
श्रीशिवछत्रपती - त्र्यं. शं. शेजवलकर, १९६४.

[redacted] / [illegible]!
[illegible]

आमचे काही प्राचीन मराठी गद्यवाङ्मय

* स्मृतिस्थळ

  वा. ना. देशपांडे

* माझा प्रवास : गोडसे भटजी

  स.–द. वा. पोतदार

* अमात्यकृत आज्ञापत्र

  सं.–प्र. न. जोशी

* ९१ कलमी बखर

  सं.–वि. स. वाकसकर

* सभासद बखर

  सं.–वि. स. वाकसकर

* पाणिपतची बखर

  सं.–र. वि. हेरवाडकर

* मराठी बखर गद्य

  सं.–गं. ब. ग्रामोपाध्ये

* प्राचीन मराठी गद्य

  सं.–शं. गो. तुळपुळे

♧ ♧ ♧

व्हीनस प्रकाशन

'तपश्चर्या'

३८१ क, शनिवार पेठ : पुणे २